Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level

Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access Journal

ISSN:2230-9578 February - 2026 Volume-18 Issue-2 (XXI)

Mob: +91-9552416001 Website: https://jrdrvb.org Chief Editor: Prof. Ramesh V. Bhole

MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL JOURNAL

Website: https://jrdrvb.org

ISSN: 2230-9578
February - 2026
Volume-18 Issue-2(XXI))

Please Get in Touch
Email: jrdrvb.org@gmail.com
Mob: +91-9552416001,+91- 8888454089

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XXI) | February- 2026

Journal of Research and Development

A Multidisciplinary International Double Blind Peer Reviewed Refereed International Research Journal

Volume No-18, Issue-2(XXI), February- 2026
Publication Language – English, Hindi, Marathi and other Indian Languages
Periodicity of Publication- Monthly
Email: jrdrvb.org@gmail.com
Journal Website: https://jrdrvb.org

CHIEF EDITOR
Dr. Ramesh V. Bhole
Professor
Sardar Vallabhbhai Patel Arts and Science College Ainpur,
Tal Raver, Dist Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com

Disclaimer
The Editors shall not be held responsible for the originality or the views and opinions expressed in the papers. The author(s) alone shall bear full responsibility for the originality of their work and the ideas expressed therein.
© All rights reserved with the Editors.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

JOURNAL PARTICULARS

Name of Journal	JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT
Frequency	Monthly : Jan to Dec (12 issues per year)
ISSN	2230-9578
Publisher	Dr. Ramesh V. Bhole
Chief Editor	Dr. Ramesh V. Bhole
Copy right	Journal of Research and Development
Starting Year	January 2010
Subject	Multi-Disciplinary
Review Process	Double Blind Peer
Language	English, Hindi, Marathi, and other Indian Constitutional Languages.
Publication Format	Print
Access	OPEN ACCESS
License	Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
Phone No.	+91 93256 65856, +91-8888454089
Email	jrdrvb.org@gmail.com
Journal Website	https://jrdrvb.org
Registered office Address	'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon, Maharashtra, India
Admin. Office Address	'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon , Maharashtra, India
Printing	**Amitsons Digital Copiers** 106 and 110, Paras Chambers 1st Floor, Near Laxmi Narayan Theatre, Above Bank Of India, Swargate-411042

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT

A Multidisciplinary International Double Blind Peer Reviewed Refereed International Research Journal

Publication Language – English, Hindi, Marathi and other Indian Languages
Periodicity of Publication- Monthly
Email: jrdrvb.org@gmail.com
Journal Website: https://jrdrvb.org

CHIEF EDITOR

Dr. Ramesh V. Bhole
Professor
Sardar Vallabhbhai Patel Arts and Science College Ainpur,
Tal Raver, Dist Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com

ASSOCIATE EDITORS

Prof. (Dr.) Madan Mohan Goel
Vice-Chancellor (Former)
Rajiv Gandhi National Institute of Youth Development, Govt. of India
Starex University, Gurugram, Haryana, India

Dr. Praveen G. Saptarshi
Visiting Faculty
Salisbury University, United States

MANAGING EDITOR

Dr. Santosh P. Mane
Assistant Professor,
Head Department of Geography,
Sameer Gandhi Kala Mahavidyalaya

Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

EDITORIAL BOARD

BABALOLA, Ayodele Samuel Department of Pure and Applied Zoology, Federal University of Agriculture, PMB 2240, Abeokuta, Ogun State, Nigerian	**Dr. Lal Mervin Dharmasiri** Senior Professor and Chair Head of Geography University of Kelaniya, Sri Lanka.	**Vijayanand Selvaraj** Data Strategist and Artificial Intelligence Lead Information Technology (IT), Houston,Texas, USA
Dr. Munther Moh'd Ibrahim Zyoud Assistant Professor of English Language Teaching Methods-Al-Quds Open University, Palestine.	**Prof. A.G. Amarasinghe** Senior Lecturer Grade University of Kelaniya, Sri Lanka.	**Dr. Gyanaranjan Sahoo** Extension Scientist Orissa University of Agriculture & Technology, Orissa India
Dr. RVS Praveen Director Digital Engineering and Assurance, USA	**Dr. Ranjan Kalita** Principal Rangapara College, Amaribari, Rangapara, (Autonomous) Assam	**Dr. S. C. Advitot** Principal CBK's B. Sci, R.V. Com. & R. J. Arts College, Akkalkot
Dr. Kulkarni Swanand Gajanan Associate Professor, Mechanical Engineering Department, S.K.N. Sinhgad College of Engineering,Korti, Pandharpur-	**Dr. Anurag Shrivastava** Professor & Post Doctoral, Lincoln University College (LUC) Petaling Jaya, Malaysia, Malyasia	**Prof. (Dr.) F. M. Nadaf** Principal, Government College Borda Margao Goa (Autonomous), India
Dr. Tushti Sharma Royal School of Languages, The Assam Royal Global University, Guwahati, Assam	**Dr. Sandeep Rout** Faculty of Agriculture, Sri Sri University, Cuttack, Odisha	**Dr. Daneshwar. R. Pandey** Assistant Professor, Head Of Department S.S Agrawal College Of Commerce And Management Navsari Gujarat

PUBLISHER

Dr. Ramesh V. Bhole

'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com Journal Website: https://jrdrvb.org

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XXI)| February - 2026

Sr. No.	CONTENTS	Page No.
1	असंघटित क्षेत्रातील दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञ : श्रम, असुरक्षा आणि जगण्याचे वास्तव **श्री. रणजित अशोक मोरे**	1-6
2	सोशल मीडिया आणि जिल्हा परिषद निवडणूक: 'मतदारसंघा'चा विस्तार की 'आभासी' प्रचार? **किरण तुकाराम पाटील**	7-10
3	विकासाच्या प्रवाहातील शेवटचा घटक: उपेक्षित समुदायांचे सक्षमीकरण आणि आव्हाने **किशोर दत्तात्रय पाटील**	11-14
4	महाराष्ट्रातील वैद्यकीय शिक्षणाचा इतिहास: एक अभ्यास **अमोल अरुण कुंभार**	15-19
5	राजकीय सहभाग: मतदानापासून धोरणनिर्मितीपर्यंत **डॉ. सचिन ताराचंद धुर्वे**	20-24
6	जातीय संरचना आणि वर्ग संघर्ष: आधुनिक भारतातील सामाजिक विषमतेचा गुंता **डॉ. सूरज पांडुरंग वडर**	25-29
7	२१ व्या शतकातील बदलती जागतिक व्यवस्था आणि शांततेसमोरील आव्हाने **डॉ. छाया भारत सकटे**	30-35
8	सहकारमहर्षी तात्यासाहेब कोरे: सहकारातून समृद्धीचा प्रवास **निवास गणपती पाटील**	36-40
9	धरणग्रस्तांची चळवळ: सामाजिक-आर्थिक संघर्ष आणि पुनर्वसन **पोवार स्वप्नील शंकर**	41-45
10	सार्वजनिक प्रशासन आणि सामाजिक बदल: धोरण अंमलबजावणीतील प्रशासकीय आव्हाने **अनिल देविदास मुडे**	46-50
11	बाळासाहेब देसाई यांचे पाटण मतदारसंघातील विकासातील नेतृत्व **प्रियांका आबासो शिंदे**	51-54
12	मिरज आणि सांगली संस्थानातील ऐतिहासिक वाडे आणि किल्ल्यांच्या वास्तुकलेचे विश्लेषण **मेघमाला तुकाराम पाटील**	55-59
13	पी.डी.पाटील यांचे सहकार चळवळीतील नेतृत्व **रोहिणी भाऊसाहेब कांबिरे**	60-64
14	घराणेशाहीकडून 'युवा आणि महिला' नेतृत्वाकडे: महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेतील बदलती समीकरणे **रोहिणी सतीश कुंभार**	65-69
15	कबड्डीमधील 'हँड टच' तंत्राचे गतिज-शास्त्रीय विश्लेषण: चढाईपटूचा शारीरिक कोन आणि प्रभावी विस्ताराचा चढाईच्या कार्यक्षमतेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास **वगरे सुहास आप्पासो**	70-74
16	तलाठी पद आणि ई-प्रशासन **प्रवीण विलासराव माने**	75-78
17	दुर्गम भागातील शाळांमधील 'डिजिटल दरी' : पायाभूत सोयी-सुविधा आणि इंटरनेट कनेक्टिव्हिटीचा शैक्षणिक परिणामांवरील प्रभाव **अनुजा विजय प्रधान**	79-83
18	हिंदी आदिवासी कवियों की सामाजिक चेतना **डॉ. किरण सदानंद भोसले**	84-87

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XXI)| February - 2026

19	कोकण आणि कोकणातील मच्छिमार समाजावर झालेले जागतिकीकरण आणि सांस्कृतिक परिवर्तन: एक अभ्यास **अनिकेत आदिनाथ कोंडाजी**	88-93
20	भारतीय कृषी व अर्थव्यवस्थेवरील परिणाम **डॉ. रमेश महादेवराव भगत**	94-96
21	अर्धापूर तालुक्यातील (जिल्हा नांदेड) ग्रामीण वस्त्यांचा भौगोलिक अभ्यास जनगणना-2011 **नरवाडे एम. व्ही., एन. एस. गौंड**	97-100
22	डिजिटल समाज आणि स्त्रियांच्या राजकीय सहभागातील नैतिक समस्या: एक सैद्धांतिक विश्लेषण **वैशाली सागर पोवार, डॉ. सुजाता कराडे**	101-104
23	बँकिंग सुधारणा आणि वित्तीय नियमन (भारतीय अर्थव्यवस्थेच्या शाश्वत व डिजिटल संक्रमणाचा नवा दृष्टिकोण) **Sakharam Dagadu Humbe**	105-115
24	शेअर बाजारातील कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) क्रांती: संधी आणि आव्हाने **समाधान रामदास कांडेकर**	116-121
25	राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणाचा इतिहास **डॉ. नामदेव मुकुंद लवटे**	122-124
26	महाराष्ट्र राज्यातील फलोत्पादन पिकाखालील क्षेत्र व उत्पादनाचा अभ्यास **सुमन प्रभाकर कांबळे**	125-129
27	आधुनिक भारतातील सामाजिक परिवर्तनाचे समाजशास्त्र: परंपरा आणि आधुनिकतेचा संघर्ष **डॉ. भाग्यश्री एम. पाटील**	130-134
28	कोल्हापूर जिल्हातील ऊस पिकाचा सविस्तर अभ्यास **डॉ. रोहित दिनकर बारसिंग, डॉ. समिना एस. जमादार, निर्माण राजन कदम, सम्राट सताप्पा पाटील**	135-138
29	कोल्हापूर जिल्ह्याची अर्थव्यवस्था: एक चिकित्सक अभ्यास **स्वाती दत्तात्रय कोकाटे**	139-144
30	मानवाधिकार और सामाजिक न्याय **डॉ. रमेश टिकाराम बागडे**	145-148
31	सातारा जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा अभ्यास **डॉ. मनिषा सुरेश पवार**	149-151
32	कॉपीराइट कायदे: एक ऐतिहासिक आणि तुलनात्मक विश्लेषण **डॉ. दिनकर शेवंताबाई मारुती कबीर**	152-158
33	डिजिटल समाजांमध्ये सायबरसुरक्षा समस्या **चौगुले अश्विनी सतिश**	159-162
34	एकात्मिक बालविकास सेवा कार्यक्रमात डॉ. ए. पी. जे. अब्दूल कलाम अमृत आहार योजनेची भुमिका: गडचिरोली जिल्हा **राहूल सोमा ठाकरे**	163-167
35	कृषी अर्थशास्त्र आणि ग्रामीण उपजीविका **श्वेता धनाजी पाटील**	168-171
36	डिजिटल अर्थव्यवस्था आणि ई-कॉमर्स **नम्रता शहाजी कुंभार**	172-177
37	पूर्वमध्ययुगीन कालखंडातील महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती: एक अभ्यास **डॉ. विकास संभाजी नाईक, डॉ. सयाजीराव छबुराव गायकवाड**	178-181

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XXI)| February - 2026

38	रवींद्रनाथ टागोर यांच्या मानवी स्वातंत्र्याच्या संकल्पनेचा चिकित्सक अभ्यास **कृष्णा ज्ञानदेव रुईकर**	182-185
39	शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन **सविता भिवा धनवडे**	186-188
40	भारतीय राज्यघटना आणि प्रजासत्ताक 75 वर्षे: आव्हाने **गणेश बाळासाहेब मोरे**	189-191
41	वरिष्ठ महाविद्यालयातील आर्टस् आणि सायन्सच्या विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचा आणि भावनिक बुद्धिमत्तेचा अभ्यास **सविता रामचंद्र रेवडे**	192-195
42	घिसाडी समाजातील पारंपारिक व्यवसाय आणि एँग्रो बिझनेस उद्योजकतेची संधी **योगिता रामचंद्र रेवडे**	196-204
43	भारतीय संविधान आणि लोकशाही मूल्ये **नानासाहेब दत्तु दिघे**	205-209
44	कोविड-१९ नंतर डिजिटल इंदापूर तालुक्यातील पेमेंट व्यवहारातील बदल व वित्तीय समावेशन **मोनाली दीपक गानबोटे**	210-214
45	कोल्हापूर महानगरपालिका निवडणूक २०२६: राजकीय रणधुमाळीतून बदलत जाणारे शहर **डॉ. नागेश मधुकर महाडिक**	215-220
46	यवतमाळ जिल्ह्यातील कृषी उत्पादकता निर्देशांक आणि त्यातील बदलाचे भौगोलिक अध्ययन **ज्योत्स्ना एम. शिवणकर**	221-225
47	आधुनिक हिंदी साहित्य और मानव अधिकार **डॉ. छाया शंकर माली**	226-228
48	സാമൂഹിക യാഥാർത്ഥ്യങ്ങളുടെ വിശകലനം വൈക്കം മുഹമ്മദ് ബഷീറിന്റെ രചനകളിൽ **Dr. Jomole Jose**	229-239
49	महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) याच्या प्रगतीचा अभ्यास **डॉ. रोहित दिनकर बारसिंग, डॉ. समिना एस. जमादार, डॉ. सारीका नामदेव शिंदे**	240-243
50	सामाजिक स्तरीकरणात जात आणि वर्गाची भूमिका: एक समाजशास्त्रीय अध्ययन **ए. आर. शेळके**	244-249
51	हवामान बदलाचे आंतरराष्ट्रीय राजकारण **डॉ. दीपक सर्जेराव पाटील**	250-253
52	ग्रामीण परिवर्तनात तंत्रज्ञानाची भूमिका : एक विश्लेषणात्मक अभ्यास **वनिता विश्वनाथ शेटे, डॉ. रमेश एच. पाटील**	254-260
53	बाबुराव गायकवाड यांच्या 'झळ' आणि 'आग' कादंबऱ्यातील स्त्री व्यक्तिरेखा **डॉ. वनिता बापू शिंदे**	261-269
54	आधुनिक समाज में सामाजिक उत्तरदायित्व **डॉ. वैशाली प्रशांत सामंत**	270-272

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

असंघटित क्षेत्रातील दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञ : श्रम, असुरक्षा आणि जगण्याचे वास्तव

रणजित अशोक मोरे
संशोधक विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
Email: ranjitmore2175@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180201
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 1-6
February- 2026
Submitted: 05 Jan. 2026
Revised: 15 Jan. 2026
Accepted: 02 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

भारतीय ग्रामीण व निमशहरी समाजात असंघटित क्षेत्र हे रोजगाराचे प्रमुख साधन आहे. या क्षेत्रातील दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञ हे दैनंदिन ग्रामीण जीवनासाठी अत्यंत आवश्यक असले तरी त्यांच्या श्रमांना पुरेसे सामाजिक व आर्थिक संरक्षण मिळत नाही. हा संशोधन पेपर असंघटित क्षेत्रातील दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांच्या श्रमांचे स्वरूप, आर्थिक व सामाजिक असुरक्षा, आरोग्यविषयक समस्या आणि त्यांच्या जगण्याच्या वास्तवाचे समाजशास्त्रीय विश्लेषण करतो. अनौपचारिक रोजगार, कौशल्याची औपचारिक मान्यता नसणे, सामाजिक सुरक्षा अभाव आणि कमी सामाजिक प्रतिष्ठा यामुळे या तंत्रज्ञांचे जीवन अस्थिर बनले आहे. अनुभवाधारित कौशल्य असूनही धोरणात्मक दुर्लक्षामुळे ते विकासप्रवाहाबाहेर राहतात. हा अभ्यास ग्रामीण समाजबदल, असंघटित श्रम आणि उपजीविकेच्या प्रश्नांना व्यापक संदर्भात समजून घेण्याचा प्रयत्न करतो. धोरणात्मक हस्तक्षेप आणि सामाजिक संरक्षणाची गरज अधोरेखित करतो.

किवर्ड:- *असंघटित क्षेत्र, दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञ, ग्रामीण उपजीविका, श्रम, सामाजिक असुरक्षा, अनौपचारिक रोजगार, ग्रामीण अर्थव्यवस्था.*

प्रस्तावना

भारतीय ग्रामीण समाजात गेल्या काही दशकांत लक्षणीय सामाजिक व आर्थिक परिवर्तन घडून आले आहे. शेतीप्रधान अर्थव्यवस्थेवरील अवलंबित्व कमी होत असताना, ग्रामीण रोजगार संरचनेत असंघटित क्षेत्राचे महत्त्व सातत्याने वाढताना दिसते. शेतीतील उत्पन्नातील अस्थिरता, हवामान बदल, वाढता उत्पादन खर्च आणि औपचारिक रोजगाराच्या मर्यादित संधी यांमुळे ग्रामीण भागातील मोठा वर्ग स्वयंरोजगार व अनौपचारिक व्यवसायांकडे वळलेला आहे. या पार्श्वभूमीवर असंघटित क्षेत्र हे ग्रामीण उपजीविकेचे प्रमुख साधन बनले आहे. असंघटित क्षेत्रातील रोजगार हे बहुधा अनुभवाधारित, अल्पभांडवली आणि असुरक्षित स्वरूपाचे असतात. निश्चित वेतन, तरीही ग्रामीण दैनंदिन जीवन आणि स्थानिक अर्थव्यवस्था चालू ठेवण्यात या क्षेत्रातील कामगारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अशा असंघटित क्षेत्रातील एक महत्त्वाचा, परंतु तुलनेने कमी अभ्यासलेला घटक म्हणजे दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञ. ग्रामीण व निमशहरी भागात दुचाकी ही आज केवळ वैयक्तिक वाहतुकीचे साधन न राहता शिक्षण, आरोग्य, शेतीपूरक कामे, सेवा-आधारित व्यवसाय आणि रोजगाराशी थेट जोडलेली आहे. त्यामुळे दुचाकी दुरुस्ती व देखभाल करणाऱ्या तंत्रज्ञांचे कार्य ग्रामीण समाजाच्या कार्यक्षमतेसाठी आवश्यक ठरते. भांडवलाचा अभाव, बाजारातील स्पर्धा आणि संघटनात्मक शक्ती नसल्यामुळे श्रमाचे मूल्य मर्यादित राहते. दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञ आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गात येतात,औपचारिक शिक्षण व प्रमाणपत्रांचा अभाव त्यांच्या सामाजिक ओळखीवर परिणाम करतो. प्रस्तुत संशोधन पेपर असंघटित क्षेत्रातील दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांचे श्रम, असुरक्षा आणि जगण्याचे वास्तव यांचे विश्लेषण करतो. ग्रामीण समाजबदल, रोजगार संरचना आणि विकास प्रक्रियेच्या संदर्भात या तंत्रज्ञांच्या भूमिकेचे समाजशास्त्रीय आकलन करणे हा या अभ्यासाचा मुख्य उद्देश आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
रणजित अशोक मोरे, संशोधक विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

How to cite this article:
मोरे,. रणजित. अशोक. (2026). असंघटित क्षेत्रातील दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञ: श्रम, असुरक्षा आणि जगण्याचे वास्तव. Journal of Research and Development, 18(2(XXI)), 1–6. https://doi.org/10.5281/zenodo.19756622

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19756622
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

संशोधनाची उद्दिष्टे:

1. असंघटित क्षेत्रातील दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांच्या श्रमांचे स्वरूप समजून घेणे.
2. त्यांच्या आर्थिक असुरक्षेचे व उत्पन्नातील अनिश्चिततेचे विश्लेषण करणे.
3. सामाजिक सुरक्षा व आरोग्य संरक्षणाच्या अभावाचा त्यांच्या जीवनावर होणारा परिणाम अभ्यासणे.
4. दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांच्या सामाजिक प्रतिष्ठा व ओळखीचा अभ्यास करणे.
5. ग्रामीण रोजगार व उपजीविकेत या व्यवसायाचे समाजशास्त्रीय महत्त्व अधोरेखित करणे.

संशोधन पद्धती :

सदर संशोधन पेपर हा वर्णनात्मक व विश्लेषणात्मक स्वरूपाचा असून असंघटित क्षेत्रातील दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांच्या श्रम, असुरक्षा आणि जगण्याच्या वास्तवाचे समाजशास्त्रीय आकलन करण्याचा प्रयत्न करतो. अभ्यासात गुणात्मक माहितीला प्राधान्य देण्यात आले आहे.

संशोधन क्षेत्र:

या अभ्यासासाठी ग्रामीण व निमशहरी भागातील असंघटित क्षेत्रात कार्यरत असलेले दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञ हे संशोधन क्षेत्र म्हणून निवडले आहे. स्थानिक बाजारपेठा, रस्त्यालगतची गॅरेजेस आणि लहान दुरुस्ती केंद्रे यांचा समावेश करण्यात आला आहे.

प्राथमिक माहिती:

दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांच्या अर्ध-संरचित मुलाखती,कार्यस्थळी प्रत्यक्ष निरीक्षण,निवडक प्रकरणांचा अभ्यास

दुय्यम माहिती:

असंघटित क्षेत्रावरील संशोधन ग्रंथ व शोधनिबंध,शासकीय अहवाल,समाजशास्त्रीय जर्नल्स व संदर्भ साहित्य

नमुना निवड:

उद्देशपूर्ण नमुना पद्धत वापरून निवडक दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांचा समावेश करण्यात आला आहे.

दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञ : व्यवसायाचे स्वरूप:-

दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांचा व्यवसाय हा ग्रामीण व निमशहरी भागातील असंघटित क्षेत्रातील महत्त्वाचा व्यवसाय आहे. ग्रामीण भागात सार्वजनिक वाहतुकीच्या मर्यादा, शेतीपूरक कामांसाठी दुचाकीवर वाढलेले अवलंबित्व आणि युवकांमध्ये दुचाकी वापराचे वाढते प्रमाण यामुळे या व्यवसायाची सामाजिक व आर्थिक गरज सातत्याने वाढताना दिसते.

1. **व्यवसायाची रचना व कार्यपद्धती:**

दुचाकी दुरुस्ती व्यवसाय बहुधा लघु स्वरूपाचा, स्वयंरोजगारावर आधारित आणि कुटुंबकेंद्रित असतो. बहुतांश तंत्रज्ञ स्वतःचे लहान गॅरेज, शेड किंवा रस्त्याच्या कडेला उभारलेल्या कार्यशाळांमधून काम करतात. व्यवसायाची रचना अत्यंत अनौपचारिक असून, कोणतेही लिखित करार, निश्चित कामाचे तास किंवा उत्पन्नाची हमी नसते. कामाचे स्वरूप दैनंदिन मागणीवर अवलंबून असते, ज्यामध्ये इंजिन दुरुस्ती, ब्रेक्स, क्लच, चेन-स्प्रॉकेट, विद्युत प्रणाली तसेच नियमित सर्व्हिसिंग यांचा समावेश होतो.

2. **कौशल्य प्राप्तीची प्रक्रिया:**

दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांचे कौशल्य प्रामुख्याने अनुभवाधारित व अनौपचारिक प्रशिक्षणातून विकसित होते. बहुतेक तंत्रज्ञ बालपणापासून किंवा किशोरावस्थेत एखाद्या गॅरेजमध्ये मदतनीस म्हणून काम सुरू करतात. औपचारिक प्रशिक्षण संस्था, प्रमाणपत्रे किंवा मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांचा अभाव असल्यामुळे त्यांच्या कौशल्याला औपचारिक ओळख मिळत नाही. तरीही, प्रत्यक्ष कामातील अनुभव, ग्राहकांच्या समस्या सोडवण्याची क्षमता आणि स्थानिक गरजांची समज यामुळे ते कुशल कामगार म्हणून ओळखले जातात.

3. **भांडवल, साधने आणि तंत्रज्ञान:**

या व्यवसायात आवश्यक भांडवल तुलनेने कमी असते. मूलभूत उपकरणे, काही यंत्रसामग्री आणि सुटे भाग यावरच व्यवसाय सुरू होतो. मात्र, आधुनिक दुचाक्यांमधील डिजिटल तंत्रज्ञान, सेन्सर्स आणि इलेक्ट्रॉनिक प्रणालींमुळे दुरुस्ती प्रक्रियेत तांत्रिक गुंतागुंत वाढलेली आहे. तरीही ग्रामीण भागातील तंत्रज्ञांकडे अद्ययावत तांत्रिक साधने व प्रशिक्षणाची मर्यादित उपलब्धता असल्याने ते अनेकदा पारंपरिक पद्धतींवर अवलंबून राहतात.

4. **उत्पन्नाचे स्वरूप आणि आर्थिक वास्तव:**

दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांचे उत्पन्न अनिश्चित व अस्थिर स्वरूपाचे असते. हंगामी काम, शेतीवर आधारित ग्रामीण अर्थव्यवस्था, सण-उत्सव, पावसाळा आणि बाजारातील चढउतार यांचा थेट परिणाम त्यांच्या उत्पन्नावर होतो. कोणतेही निश्चित मासिक वेतन नसल्यामुळे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

आर्थिक नियोजन करणे कठीण जाते. तरीही, कमी भांडवलात चालणारा व्यवसाय असल्याने अनेक ग्रामीण युवकांसाठी हा व्यवसाय उपजीविकेचा महत्त्वाचा मार्ग ठरतो.

श्रमांचे स्वरूप:

श्रम केवळ शारीरिक कष्टांपुरते मर्यादित नसून त्यामध्ये कौशल्य, अनुभव, तांत्रिक ज्ञान, मानसिक ताण आणि सामाजिक संबंध यांचा समावेश होतो. ग्रामीण व निमशहरी भागातील या श्रमांचे स्वरूप अस्थिर, अनिश्चित आणि कमी संरक्षित असल्यामुळे ते समाजशास्त्रीय अभ्यासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरते.

1. **शारीरिक श्रम:**

दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांचे श्रम प्रामुख्याने शारीरिक स्वरूपाचे असतात. जड सुटे भाग उचलणे, सतत वाकून किंवा बसून काम करणे, उष्णतेत व धुळीत काम करणे, तेल-ग्रीस व रसायनांच्या संपर्कात येणे या बाबी त्यांच्या दैनंदिन श्रमांचा भाग असतात. हे श्रम दीर्घकाळ चालू राहिल्यास थकवा, सांधेदुखी, डोळ्यांचे व त्वचेचे आजार निर्माण होतात. तथापि, या शारीरिक श्रमांना कोणतेही औपचारिक आरोग्य संरक्षण किंवा व्यावसायिक सुरक्षिततेचे साधन उपलब्ध नसते.

2. **कौशल्याधारित श्रम**

या व्यवसायातील श्रम हे अनुभवावर आधारित कौशल्याशी घट्ट जोडलेले असतात. इंजिनचा आवाज, कंपन,कार्यक्षमता पाहून दोष ओळखणे, मर्यादित साधनांतून समस्या सोडवणे आणि ग्राहकाच्या गरजेनुसार तात्काळ निर्णय घेणे ही कौशल्याधारित श्रमांची वैशिष्ट्ये आहेत. औपचारिक प्रशिक्षणाचा अभाव असूनही हे कौशल्य दीर्घकाळच्या अनुभवातून विकसित होते

3. **मानसिक श्रम आणि ताण**

दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांचे श्रम केवळ शारीरिक नसून मानसिकही असतात. ग्राहकांच्या अपेक्षा, कामाची घाई, तांत्रिक बिघाडामुळे होणारा ताण, उत्पन्नाची अनिश्चितता आणि दैनंदिन खर्चाची चिंता यामुळे मानसिक दडपण निर्माण होते. कोणतेही काम न मिळाल्यास किंवा तांत्रिक चूक झाल्यास आर्थिक तोटा थेट तंत्रज्ञांवर पडतो. या मानसिक श्रमांना कोणतेही औपचारिक मानसशास्त्रीय किंवा सामाजिक आधार उपलब्ध नसतो.

4. **सामाजिक मान्यता आणि श्रम**

वेबरच्या सामाजिक स्तरीकरण संकल्पनेनुसार श्रमांचे स्वरूप आणि त्याला मिळणारी सामाजिक प्रतिष्ठा यांचा परस्पर संबंध असतो. दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांचे श्रम उपयुक्त असूनही त्यांना मर्यादित सामाजिक दर्जा मिळतो. शारीरिक श्रमाशी जोडलेला व्यवसाय म्हणून समाजात त्याला कमी प्रतिष्ठा दिली जाते. परिणामी, श्रमाची सामाजिक मान्यता आणि वास्तविक सामाजिक गरज यांच्यात विसंगती निर्माण होते.

5. **असंघटित श्रमांची असुरक्षा**

असंघटित क्षेत्रातील श्रम हे कायदेशीर संरक्षण, संघटनात्मक पाठबळ आणि सामाजिक सुरक्षा योजनांपासून वंचित असतात. दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांना अपघात, आजारपण किंवा व्यवसायातील तोटा झाल्यास कोणतीही भरपाई मिळत नाही. त्यांचे श्रम कायम असुरक्षित राहतात आणि त्यांचे जगणे 'दिवसेंदिवस' या तत्त्वावर अवलंबून असते.

सामाजिक सुरक्षा अभाव:

असंघटित क्षेत्रातील दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांच्या जीवनातील सर्वात गंभीर आणि संरचनात्मक समस्या म्हणजे सामाजिक सुरक्षेचा अभाव. सामाजिक सुरक्षा ही केवळ आर्थिक मदतीपुरती मर्यादित नसून, ती कामगारांच्या आरोग्य, सुरक्षितता, वृद्धापकाळ, अपघात, आजारपण आणि कुटुंबीयांच्या संरक्षणाशी निगडित असते. मात्र, असंघटित क्षेत्रातील कामगार या सर्व संरक्षण व्यवस्थांपासून मोठ्या प्रमाणावर वंचित राहतात.

1. **सामाजिक सुरक्षेची संकल्पना:**

सामाजिक सुरक्षा म्हणजे अशा धोरणात्मक व संस्थात्मक उपाययोजना ज्या कामगारांना जीवनातील अनिश्चिततेपासून संरक्षण देतात. यामध्ये आरोग्य विमा, अपघात विमा, निवृत्तीवेतन, आजारपणाची मदत, मातृत्व लाभ आणि कौटुंबिक संरक्षण यांचा समावेश होतो.सामाजिक सुरक्षा ही मूलभूत मानवी गरज असून सन्मानजनक काम या संकल्पनेचा अविभाज्य भाग आहे.

2. **दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञ आणि सामाजिक सुरक्षा वास्तव:**

दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञ बहुतेक वेळा स्वयंरोजगारावर आधारित असल्यामुळे कोणत्याही औपचारिक नियोक्त्याच्या संरक्षणाखाली येत नाहीत. परिणामी, त्यांना आरोग्य विमा, अपघात भरपाई, सशुल्क रजा किंवा निवृत्तीवेतन यांसारख्या सुविधा मिळत नाहीत. काम करताना जखम झाली, आजारपण आले किंवा अपघात झाला, तर त्याचा संपूर्ण आर्थिक व सामाजिक भार तंत्रज्ञ आणि त्यांच्या कुटुंबावर पडतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

3. **आरोग्य संरक्षणाचा अभाव:**

या व्यवसायात काम करताना तेल, ग्रीस, रसायने, धूर, आवाज आणि जड साधनांचा सतत संपर्क येतो. यामुळे दीर्घकालीन आरोग्य समस्या निर्माण होतात.कोणताही आरोग्य विमा किंवा नियमित वैद्यकीय तपासणीची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे उपचाराचा खर्च स्वतः करावा लागतो. अनेक वेळा आर्थिक अडचणींमुळे उपचार टाळले जातात, आरोग्य समस्या गंभीर स्वरूप धारण करतात.

4. **अपघात व व्यावसायिक धोके:**

दुचाकी दुरुस्ती करताना अपघात होण्याची शक्यता कायम असते—हाताला जखम, डोळ्यांना इजा, विजेचा धक्का किंवा यंत्रसामग्रीमुळे अपघात. औपचारिक क्षेत्रात अशा परिस्थितीत अपघात विमा किंवा भरपाई मिळते; मात्र असंघटित क्षेत्रातील तंत्रज्ञांना कोणतीही अधिकृत भरपाई व्यवस्था उपलब्ध नसते. त्यामुळे अपघात म्हणजे थेट आर्थिक संकट.

5. **वृद्धापकाळातील असुरक्षा:**

सामाजिक सुरक्षेचा अभाव वृद्धापकाळात अधिक तीव्रपणे जाणवतो. दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांकडे निवृत्तीवेतन, भविष्य निर्वाह निधी,दीर्घकालीन बचतीची साधने नसतात. शारीरिक क्षमतेवर आधारित व्यवसाय असल्यामुळे वय वाढल्यावर काम करण्याची क्षमता कमी होते.वृद्धापकाळात उत्पन्नाचे कोणतेही सुरक्षित साधन उपलब्ध राहत नाही आणि कुटुंबावर अवलंबित्व वाढते.

6. **शासकीय योजनांपासून वंचितता:**

शासनाने असंघटित कामगारांसाठी विविध सामाजिक सुरक्षा योजना जाहीर केल्या असल्या, तरी त्यांची अंमलबजावणी मर्यादित आहे. माहितीचा अभाव, कागदपत्रांची गुंतागुंत, नोंदणी प्रक्रिया आणि प्रशासकीय अडथळे यांमुळे दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञ या योजनांपासून वंचित राहतात.धोरणे आणि प्रत्यक्ष लाभ यामध्ये मोठी दरी निर्माण होते.

आरोग्यविषयक समस्या:

असंघटित क्षेत्रातील दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांचे आरोग्य हे त्यांच्या उपजीविकेशी थेट निगडित असलेले, पण सर्वाधिक दुर्लक्षित असे परिमाण आहे. या व्यवसायात काम करताना येणारे शारीरिक, रासायनिक आणि मानसिक धोके त्यांच्या आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम घडवतात.

1. **कामाच्या ठिकाणचे धोके:**

दुचाकी दुरुस्ती करताना तंत्रज्ञांना तेल, ग्रीस, पेट्रोल, रसायने, धूर, धूळ आणि मोठ्या आवाजाचा सतत सामना करावा लागतो. अपुरी जागा, अस्वच्छ कार्यशाळा आणि सुरक्षेची साधने नसल्यामुळे अपघातांचा धोका वाढतो. डोळ्यांना इजा, हात-पायांना जखमा, भाजणे किंवा विजेचा धक्का बसणे अशा घटना साम घडताना दिसतात.

2. **शारीरिक आजार आणि दीर्घकालीन परिणाम:**

सतत वाकून, बसून किंवा उभे राहून काम केल्यामुळे पाठदुखी, मानदुखी, सांधेदुखी आणि स्नायूंचे आजार निर्माण होतात. तेल-ग्रीसच्या संपर्कामुळे त्वचारोग होतात, तर धूर व धुळीमुळे श्वसनाचे विकार वाढतात. हे आजार हळूहळू दीर्घकालीन स्वरूप धारण करतात आणि काम करण्याची क्षमता कमी करतात.

3. **मानसिक आरोग्यावरील परिणाम:**

आर्थिक असुरक्षा, कामाची अनिश्चितता, ग्राहकांचा दबाव आणि भविष्य अनिश्चितता यामुळे मानसिक ताण वाढतो. सततची चिंता, तणाव आणि असमाधान याचा परिणाम मानसिक आरोग्यावर होतो. मानसिक आरोग्य ही संकल्पनाच कामगार वर्गात फारशी ओळखली जात नाही,उपचार ,समुपदेशनाची कोणतीही सुविधा उपलब्ध नसते.

4. **आरोग्य सेवा व उपचारांचा अभाव:**

दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञ बहुतेक वेळा खाजगी किंवा स्थानिक दवाखान्यांवर अवलंबून असतात. आरोग्य विम्याचा अभाव असल्यामुळे उपचारांचा खर्च स्वतः करावा लागतो. अनेक वेळा आर्थिक अडचणींमुळे उपचार पुढे ढकलले जातात, ज्यामुळे आजार गंभीर होतो. असंघटित क्षेत्रातील कामगारांमध्ये आरोग्यविषयक असमानता मोठ्या प्रमाणावर आढळते.

5. **आरोग्य आणि उपजीविकेचा संबंध:**

आरोग्य बिघडल्यास तंत्रज्ञ थेट बेरोजगार होतो. आजारपण किंवा अपघात म्हणजे उत्पन्न थांबणे. त्यामुळे आरोग्य समस्या ही केवळ वैयक्तिक बाब न राहता, संपूर्ण कुटुंबाच्या उपजीविकेवर परिणाम करणारी सामाजिक समस्या बनते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

सामाजिक प्रतिष्ठा व ओळख:

दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांची सामाजिक ओळख ही त्यांच्या श्रमांचे स्वरूप, शिक्षण, उत्पन्न आणि असंघटित रोजगाराशी निगडित आहे. समाजात हा व्यवसाय अत्यावश्यक असला तरी त्याला मर्यादित सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होते. त्यामुळे उपयोगिता आणि दर्जा यामध्ये स्पष्ट विसंगती दिसून येते.

1. **व्यवसाय आणि सामाजिक दर्जा:**

दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञ समाजाला आवश्यक सेवा पुरवतात. ग्रामीण आणि निमशहरी भागात त्यांच्या सेवेशिवाय दैनंदिन जीवन विस्कळीत होऊ शकते. तरीही, शारीरिक श्रमाशी जोडलेला आणि औपचारिक शिक्षणाविना चालणारा व्यवसाय म्हणून त्यांना कमी सामाजिक दर्जा दिला जातो. समाजात "हाताने काम करणारा" आणि "नोकरी नसलेला" असा भेदभावात्मक दृष्टिकोन दिसून येतो.

2. **वेबरची सामाजिक स्तरीकरण संकल्पना:**

सामाजिक प्रतिष्ठा ही केवळ उत्पन्नावर नव्हे, तर शिक्षण, व्यवसायाची मान्यता आणि सामाजिक सन्मानावर आधारित असते. दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांकडे औपचारिक शिक्षण व प्रमाणपत्रांचा अभाव असल्यामुळे त्यांना कमी प्रतिष्ठा मिळते, जरी त्यांचे कौशल्य समाजासाठी उपयुक्त असले तरी.

3. **आत्मसन्मान आणि ओळखीचा संघर्ष:**

मर्यादित सामाजिक मान्यतेमुळे अनेक तंत्रज्ञांमध्ये आत्मसन्मानाचा संघर्ष दिसून येतो. समाजात आपली ओळख तंत्रज्ञ म्हणून न होता "मजूर","छोटा व्यवसाय करणारा" म्हणून लावली जाते.त्यांच्या स्वतःच्या व्यवसायाविषयी द्विधा भावना निर्माण होतात.उपजीविकेचा अभिमान आणि दुसरीकडे सामाजिक अवहेलना.

4. **तरुण पिढी आणि ओळखीचा प्रश्न:**

आजच्या तरुण पिढीमध्ये या व्यवसायाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत असला तरी सामाजिक प्रतिष्ठेचा प्रश्न कायम आहे. अनेक तंत्रज्ञ आपल्या मुलांनी हा व्यवसाय न स्वीकारावा, अशी इच्छा व्यक्त करतात. यामागे आर्थिक अस्थिरतेसोबतच सामाजिक मान्यतेचा अभाव हेही कारण महत्त्वाचे ठरते.

कौशल्य व औपचारिक मान्यतेचा अभाव: असंघटित क्षेत्रातील दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांचे कौशल्य हे त्यांच्या उपजीविकेचे मुख्य भांडवल असते.हे कौशल्य औपचारिक शिक्षण, प्रमाणपत्रे,सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मर्यादित ठरते. कौशल्य असूनही त्याला औपचारिक ओळख न मिळणे ही असंघटित क्षेत्रातील कामगारांची एक मूलभूत आणि संरचनात्मक समस्या आहे.

1. **कौशल्याचे स्वरूप:**

अनुभवाधारित ज्ञान दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांचे कौशल्य प्रामुख्याने अनुभव, निरीक्षण आणि प्रत्यक्ष कामातून विकसित झालेले असते. इंजिनमधील बिघाड ओळखणे, आवाज व कंपनावरून दोष समजून घेणे, मर्यादित साधनांतून समस्या सोडवणे आणि स्थानिक परिस्थितीनुसार उपाय शोधणे हे उच्च दर्जाचे तांत्रिक कौशल्य मानले जाऊ शकते.ज्ञान पुस्तकी किंवा औपचारिक शिक्षणाच्या चौकटीत बसत नसल्यामुळे त्याची दखल घेतली जात नाही.

2. **औपचारिक प्रशिक्षण व प्रमाणपत्रांचा अभाव:**

ग्रामीण व निमशहरी भागातील बहुतांश तंत्रज्ञांनी कोणतेही अधिकृत प्रशिक्षण घेतलेले नसते. औद्योगिक प्रशिक्षण संस्था,स्किल डेव्हलपमेंट कोर्सेस किंवा प्रमाणित अभ्यासक्रमांपर्यंत त्यांची पोहोच मर्यादित असते. परिणामी, त्यांच्या कौशल्याला कोणतेही औपचारिक प्रमाणपत्र नसते. यामुळे त्यांना मोठ्या वर्कशॉप्स, अधिकृत सर्व्हिस सेंटर्स किंवा चांगल्या उत्पन्नाच्या संधी मिळत नाहीत.

3. **कौशल्य असूनही आर्थिक मोबदल्याची मर्यादा:**

औपचारिक मान्यतेच्या अभावामुळे दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञ त्यांच्या कौशल्याचे योग्य आर्थिक मूल्य ठरवू शकत नाहीत. ग्राहकांकडून मिळणारा मोबदला हा बाजारातील स्पर्धा, स्थानिक दर आणि ग्राहकांच्या सौदेबाजीवर अवलंबून असतो. कौशल्याचा दर्जा कितीही उच्च असला, तरी त्याला औपचारिक प्रमाणपत्र नसल्यामुळे उत्पन्नात फारशी वाढ होत नाही.

4. **सामाजिक गतिशीलतेवरील मर्यादा:**

कौशल्याला औपचारिक मान्यता नसल्यामुळे सामाजिक गतिशीलता मर्यादित राहते. तंत्रज्ञ विशिष्ट आर्थिक व सामाजिक स्तरात अडकलेले राहतात. व्यवसाय वाढवणे, आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करणे,औपचारिक क्षेत्रात प्रवेश करणे त्यांच्यासाठी कठीण ठरते. कौशल्य असूनही सामाजिक उन्नतीची दारे बंद राहतात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

सैद्धांतिक चौकट:-

असंघटित क्षेत्रातील दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांच्या श्रम, आर्थिक असुरक्षा, सामाजिक स्थान आणि उपजीविकेचे वास्तव समजून घेण्यासाठी सैद्धांतिक चौकट अत्यंत महत्त्वाची ठरते. कोणताही समाजशास्त्रीय अभ्यास केवळ वर्णनात्मक न राहता विश्लेषणात्मक बनण्यासाठी सैद्धांतिक आधार आवश्यक असतो. प्रस्तुत संशोधनात मार्क्सवादी श्रमदृष्टी, वेबरची सामाजिक स्तरीकरण संकल्पना या तीन प्रमुख सैद्धांतिक दृष्टिकोनांचा वापर करण्यात आला आहे.

1. **मार्क्सवादी श्रम सिद्धांत आणि असंघटित श्रम**

Karl Marx यांच्या मते श्रम हे उत्पादन प्रक्रियेचे केंद्रबिंदू असतात. श्रमाच्या माध्यमातूनच मूल्यनिर्मिती होते; मात्र भांडवली संरचनेत श्रमिकांना त्यांच्या श्रमांचे पूर्ण मूल्य मिळत नाही. असंघटित क्षेत्रात ही परिस्थिती अधिक तीव्र स्वरूपात दिसून येते.त्यांचे श्रममूल्य बाजारात कमी लेखले जाते. सुटे भाग विक्रेते, मोठ्या कंपन्या, अधिकृत सर्व्हिस सेंटर्स आणि बाजारातील स्पर्धा यांमुळे तंत्रज्ञांचे श्रम अप्रत्यक्ष शोषणाचे बळी ठरतात.आर्थिक असुरक्षा ही वैयक्तिक अपयश नसून संरचनात्मक शोषणाचा परिणाम आहे, हे मार्क्सवादी दृष्टिकोन स्पष्ट करतो.

2. **वर्गीय स्थान आणि असंघटित कामगार**

मार्क्सच्या वर्ग संकल्पनेनुसार दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञ हे ना पूर्णतः मजूर वर्गात मोडतात, ना भांडवलदार वर्गात. ते स्वयंरोजगारावर आधारित असलेले "अर्ध-स्वायत्त श्रमिक" आहेत. या मधल्या वर्गीय स्थितीमुळे ते संघटनात्मक शक्तीपासून वंचित राहतात आणि त्यांचे शोषण अधिक सुलभ होते. त्यामुळे असंघटित क्षेत्रातील वर्गीय असुरक्षा समजून घेण्यासाठी मार्क्सवादी चौकट उपयुक्त ठरते.

3. **वेबरची सामाजिक स्तरीकरण संकल्पना**

समाजातील असमानता केवळ आर्थिक वर्गावर आधारित नसून, वर्ग, प्रतिष्ठा आणि सत्ता या तीन घटकांवर अवलंबून असते. त्यांचे उत्पन्न अनिश्चित असल्यामुळे वर्गीय स्थान दुर्बल राहते; औपचारिक शिक्षण व प्रमाणपत्रांच्या अभावामुळे सामाजिक प्रतिष्ठा कमी मिळते; आणि कोणत्याही संघटनात्मक किंवा राजकीय सत्तेचा अभाव असल्यामुळे त्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवण्याची क्षमता मर्यादित राहते. त्यामुळे वेबरची चौकट दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांची सामाजिक ओळख व प्रतिष्ठेचा प्रश्न समजून घेण्यासाठी महत्त्वाची ठरते.

निष्कर्ष

असंघटित क्षेत्रातील दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांचा अभ्यास केल्यास असे स्पष्ट होते की, हा वर्ग ग्रामीण व निमशहरी अर्थव्यवस्थेचा एक अत्यंत महत्त्वाचा घटक असूनही तो सामाजिक, आर्थिक आणि धोरणात्मक पातळीवर दुर्लक्षित राहिला आहे. त्यांचे श्रम समाजासाठी अत्यावश्यक असले तरी औपचारिक संरक्षण, सामाजिक प्रतिष्ठा मिळत नाही.

- या अभ्यासातून पुढील प्रमुख निरीक्षणे समोर येतात.दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांचे श्रम उच्च कौशल्याधारित असूनही असंघटित स्वरूपात राहिलेले आहेत.आर्थिक असुरक्षा ही वैयक्तिक अपयश नसून संरचनात्मक मर्यादांचा परिणाम आहे.सामाजिक प्रतिष्ठेचा अभाव,
- मार्क्सवादी दृष्टिकोनातून पाहता, तंत्रज्ञांचे श्रम बाजारव्यवस्थेत कमी मूल्यमापनाचे बळी ठरतात. वेबरच्या सामाजिक स्तरीकरण संकल्पनेनुसार त्यांचे वर्ग, प्रतिष्ठा आणि सत्ता हे तिन्ही घटक दुर्बल स्थितीत आहेत. विकास प्रक्रियेतील संरचनात्मक अपयशाचे उत्पादन म्हणून अधोरेखित करते. या तिन्ही चौकटी मिळून असंघटित क्षेत्रातील दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांचे बहुआयामी वास्तव स्पष्ट करतात.
- दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांना केवळ "स्वयंरोजगार करणारे" म्हणून न पाहता, त्यांना औपचारिक अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक मानणे आवश्यक आहे. कौशल्य प्रमाणन, सामाजिक सुरक्षा योजना, आरोग्य विमा, आणि संघटनात्मक व्यासपीठे उपलब्ध करून दिल्यास त्यांच्या जीवनात स्थैर्य निर्माण होऊ शकते.
- हा अभ्यास असंघटित क्षेत्रातील श्रमांचे वास्तव उलगडतो आणि ग्रामीण समाजबदलाच्या अभ्यासात महत्त्वाची भर घालतो. दुचाकी दुरुस्ती तंत्रज्ञांचा प्रश्न हा केवळ रोजगाराचा नसून, तो सामाजिक न्याय, सन्मानजनक श्रम आणि समावेशक विकासाशी संबंधित आहे. त्यामुळे या वर्गाकडे धोरणात्मक आणि समाजशास्त्रीय दृष्टीने गांभीर्याने पाहणे ही काळाची गरज आहे.

संदर्भ साहित्यसूची:

1. जोशी, म. (2020). ग्रामीण अर्थव्यवस्थेतील स्वयंरोजगाराचे स्वरूप. समाजशास्त्र संशोधन पत्रिका, 12(2),45-58.
2. माने, र. (2019). असंघटित श्रम आणि सामाजिक असुरक्षा. भारतीय समाजशास्त्र, 8(1), 33–49.
3. देशपांडे, स. (2011). भारतीय समाजरचना. पुणे: सुगावा प्रकाशन.
4. फडके, व. (2015). ग्रामीण समाजशास्त्र. नागपूर: विदर्भ ग्रंथनिर्मिती मंडळ.
5. पाटील, अ. (2018). असंघटित क्षेत्र आणि ग्रामीण उपजीविका. कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.
6. पाटील, भास्कर. (2016). असंघटित क्षेत्र आणि स्वयंरोजगार. कोल्हापूर: शिवप्रकाशन.
7. कुलकर्णी, संजय. (2020). ग्रामीण तंत्रज्ञ आणि बदलते रोजगार. सांगली: लोकवाङ्मय गृह.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

सोशल मीडिया आणि जिल्हा परिषद निवडणूक : 'मतदारसंघा'चा विस्तार की 'आभासी' प्रचार?

किरण तुकाराम पाटील
संशोधक विध्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
Email: Kirantpatil10@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180202
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 7-10
February- 2026
Submitted: 05 Jan. 2026
Revised: 15 Jan. 2026
Accepted: 02 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश:

सोशल मीडियाच्या झपाट्याने वाढलेल्या वापरामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये, विशेषतः जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये, प्रचाराच्या पद्धतींमध्ये लक्षणीय बदल झाले आहेत. पारंपरिक प्रचार माध्यमांबरोबरच फेसबुक, व्हॉट्सॲप, ट्विटर आणि यूट्यूब यांसारख्या डिजिटल प्लॅटफॉर्मचा प्रभाव वाढत चालला आहे. या पार्श्वभूमीवर 'मतदारसंघा'चा भौगोलिक विस्तार होत आहे की प्रचार 'आभासी' पातळीवर मर्यादित राहतो, हा या अभ्यासाचा मुख्य केंद्रबिंदू आहे.

या संशोधनात सोशल मीडियाच्या वापरामुळे मतदारांपर्यंत पोहोचण्याच्या पद्धती, उमेदवार आणि मतदार यांच्यातील संवाद, तसेच प्रचाराच्या प्रभावीतेचे विश्लेषण करण्यात आले आहे. सोशल मीडिया एकीकडे प्रचाराचा विस्तार करून अधिक व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याची संधी देते, तर दुसरीकडे तो केवळ आभासी संवादापुरता मर्यादित राहण्याची शक्यता देखील निर्माण करतो.

अभ्यासातून असे दिसून येते की, सोशल मीडिया हा पारंपरिक प्रचाराचा पर्याय नसून पूरक माध्यम म्हणून अधिक प्रभावी ठरतो. स्थानिक मुद्दे, वैयक्तिक संपर्क आणि प्रत्यक्ष भेटी यांचे महत्त्व अजूनही कायम आहे; मात्र डिजिटल माध्यमांमुळे प्रचार अधिक वेगवान, खर्चिकदृष्ट्या परवडणारा आणि लक्ष्यित झाला आहे. त्यामुळे जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये 'मतदारसंघा'चा विस्तार आणि 'आभासी' प्रचार यांचा समन्वय साधणे ही आधुनिक राजकीय रणनीतीची गरज बनली आहे.

पारिभाषिक शब्द :*आभासी प्रचार, मतदारसंघ विस्तार, अल्गोरिदम, इको चेंबर्स*

प्रस्तावना:

भारतीय लोकशाहीच्या विकेंद्रीकरणात स्थानिक स्वराज्य संस्था, विशेषतः जिल्हा परिषद, हा ग्रामीण विकासाचा कणा मानला जातो. मात्र, गेल्या दशकात या निवडणुकांच्या स्वरूपात आमूलाग्र आणि क्रांतिकारी बदल झाले आहेत. एकेकाळी उमेदवाराचा प्रचार हा केवळ घरोघरी जाऊन घेतलेल्या भेटी, ग्रामदैवतांच्या पारावरील कोपरा सभा, हस्तपत्रिकांचे वाटप आणि भिंतींवरील घोषणांपुरता मर्यादित होता. परंतु, माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ही पारंपरिक निवडणूक आता 'डिजिटल' आणि 'हाय-टेक' झाली आहे. स्मार्टफोनची उपलब्धता आणि अत्यंत स्वस्त दरातील इंटरनेट यामुळे ग्रामीण भागातील सामाजिक आणि राजकीय जीवन ढवळून निघाले आहे. आज खेडेगावातील सामान्य मतदारही फेसबुक, व्हॉट्सॲप, टेलिग्राम आणि इंस्टाग्राम यांसारख्या प्लॅटफॉर्मवर सक्रिय झाला असून, तो केवळ माहितीचा ग्राहक नाही तर स्वतः एक मतप्रवाह निर्माण करणारा घटक बनला आहे. या डिजिटल क्रांतीमुळे उमेदवारांना आपला 'मतदारसंघ' केवळ भौगोलिक सीमेपुरता मर्यादित न ठेवता तो 'आभासी जगात' विस्तारण्याची एक मोठी संधी मिळाली आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
किरण तुकाराम पाटील, संशोधक विध्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

How to cite this article:
पाटील, . किरण . तुकाराम . (*2026*). सोशल मीडिया आणि जिल्हा परिषद निवडणूक : 'मतदारसंघा'चा विस्तार की 'आभासी' प्रचार*?. Journal of Research & Development, 18(2(XXI)), 7–10. https://doi.org/10.5281/zenodo.19534492*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19534492

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

सोशल मीडियाच्या माध्यमातून उमेदवार चोवीस तास मतदारांच्या संपर्कात राहू शकतो, आपल्या कामाचा अहवाल व्हिडिओंच्या स्वरूपात सादर करू शकतो आणि विरोधकांच्या टीकेला तात्काळ उत्तर देऊ शकतो. मात्र, या बदलत्या स्वरूपामुळे काही मूलभूत प्रश्नही उपस्थित होत आहेत. हा 'आभासी प्रचार' खऱ्या अर्थाने लोकशाहीला समृद्ध करत आहे की तो केवळ व्यावसायिक जाहिरातबाजीचा आणि डेटा मॅनिप्युलेशनचा खेळ झाला आहे? जेव्हा प्रत्यक्ष जनसंपर्काची जागा अल्गोरिदम आणि 'पेयड प्रमोशन' घेते, तेव्हा सामान्य माणसाचे प्रश्न बाजूला पडून केवळ 'इमेज बिल्डिंग'ला महत्त्व प्राप्त होते का? या पार्श्वभूमीवर, सोशल मीडियाचा जिल्हा परिषद निवडणुकीतील वाढता प्रभाव, त्यातील पारदर्शकता आणि त्यातून निर्माण होणारी सामाजिक आव्हाने यांचा समाजशास्त्रीय आणि राजकीय अंगाने सखोल अभ्यास करणे ही काळाची गरज बनली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

- जिल्हा परिषद निवडणुकीत सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावाचे विश्लेषण करणे.
- डिजिटल प्रचाराचा मतदारांच्या निर्णयक्षमतेवर होणारा परिणाम तपासणे.
- 'आभासी प्रचार' आणि 'प्रत्यक्ष जनसंपर्क' यांच्यातील तुलनात्मक अभ्यास करणे.
- सोशल मीडियामुळे निर्माण होणाऱ्या फेक न्यूज आणि ध्रुवीकरणाच्या धोक्यांचा अभ्यास करणे.

विषय विवेचन :

जिल्हा परिषद निवडणुकीत सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे ग्रामीण राजकारणातील पारंपरिक समीकरणे पूर्णतः बदलली आहेत. पूर्वी प्रचारासाठी मोठ्या सभा आणि रॅलींवर अवलंबून राहावे लागत असे, मात्र आता तंत्रज्ञानामुळे प्रचाराचे खऱ्या अर्थाने 'विकेंद्रीकरण' झाले आहे. उमेदवार व्हॉट्सॲप ब्रॉडकास्ट आणि फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून हजारो मतदारांशी थेट संवाद साधत असून, यामुळे माहिती पोहोचवण्याचा वेग प्रचंड वाढला आहे. आजच्या काळात उमेदवार हा केवळ एक व्यक्ती न राहता तो एक 'ब्रँड' म्हणून सादर केला जात आहे. प्रोफेशनल ग्राफिक डिझाइनर्स आणि सोशल मीडिया मॅनेजर्सद्वारे उमेदवाराच्या सामाजिक कार्याचे आणि भाषणांचे प्रभावी व्हिडिओ तयार करून त्याची एक 'जननायक' म्हणून प्रतिमा उभी केली जाते, ज्याचा मोठा प्रभाव विशेषतः तरुण मतदारांवर पडत आहे.

या डिजिटल प्रचाराचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे 'सूक्ष्म-लक्ष्यीकरण' होय. यात मतदारांचे विविध गटांत वर्गीकरण करून तरुणांसाठी रोजगार, महिलांसाठी बचत गट आणि शेतकऱ्यांसाठी सिंचन यांसारख्या विषयांवर स्वतंत्रपणे संवाद साधला जातो. यामुळे प्रचारात अचूकता येते. याशिवाय, सोशल मीडियामुळे पारंपरिक एकतर्फी संवादाची जागा 'द्विमार्गी संवादाने' घेतली आहे, जिथे मतदार थेट प्रश्न विचारू शकतात. मात्र, या सुविधेसोबतच 'फेक न्यूज' आणि नकारात्मक प्रचाराचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. निवडणुकीच्या काळात उमेदवाराची प्रतिमा मलीन करण्यासाठी चुकीच्या माहितीचा वणवा पसरवला जातो, ज्याची पडताळणी ग्रामीण भागात अनेकदा केली जात नाही. अखेरीस, सोशल मीडियावरील जाहिराती आणि डेटा ॲनालिटिक्सवर होणारा वाढता खर्च निवडणुकीला अधिक 'हाय-टेक' बनवत आहे. जरी यामुळे 'आभासी चमकधमक' वाढली असली, तरी योग्य वापराने हे माध्यम लोकशाही अधिक पारदर्शक आणि सहभागी बनवण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकते.

डिजिटल प्रचाराचा मतदारांच्या निर्णयक्षमतेवर होणारा परिणाम:

डिजिटल युगात मतदारांच्या निर्णयक्षमतेवर सोशल मीडियाचा होणारा परिणाम हा अत्यंत सखोल आणि गुंतागुंतीचा आहे. पूर्वी मतदार हा प्रामुख्याने वैयक्तिक भेटी, नेत्यांची भाषणे आणि घरातील ज्येष्ठ व्यक्तींच्या सल्ल्यानुसार आपले मत ठरवत असे. मात्र, आता डिजिटल प्रचारामुळे मतदारांच्या माहितीचा मुख्य स्रोत 'स्मार्टफोन' बनला आहे. सोशल मीडियावरील सततचा माहितीचा मारा मतदारांच्या मानसिकतेवर नकळत परिणाम करतो. जेव्हा एखादा उमेदवार सातत्याने आपल्या कामाचे व्हिडिओ, जनसंपर्काचे फोटो आणि विकासाचे दावे मतदारांच्या स्क्रीनवर सादर करतो, तेव्हा त्या उमेदवाराची एक सकारात्मक आणि कार्यक्षम प्रतिमा मतदाराच्या मनात घर करते. यालाच मानसशास्त्रात 'प्राइमिंग इफेक्ट' असे म्हणतात, ज्यामुळे मतदानाच्या वेळी संबंधित उमेदवाराचे नाव मतदाराला सहज आठवते.

तथापि, या निर्णयक्षमतेवर होणारा नकारात्मक परिणामही तितकाच मोठा आहे. सोशल मीडियाचे अल्गोरिदम मतदाराला केवळ त्याच्या आवडीची किंवा पूर्वग्रहावर आधारित माहिती दाखवतात, ज्याला 'इको चेम्बर्स' म्हटले जाते. यामुळे मतदार केवळ एकाच बाजूचा विचार करतो आणि त्याची निर्णयक्षमता ध्रुवीकृत होते. तसेच, निवडणुकीच्या ऐन वेळी पसरवल्या जाणाऱ्या 'फेक न्यूज' किंवा भावनिक आवाहनांमुळे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण होतो. अनेकदा वस्तुनिष्ठ कामगिरीपेक्षा 'आभासी प्रतिमेला' भुलून मतदार निर्णय घेण्याची शक्यता वाढते. डिजिटल प्रचारात वापरली जाणारी 'हाय-टेक' साधने आणि डेटा ॲनालिटिक्सच्या माध्यमातून मतदारांच्या

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

मानसिकतेचे विश्लेषण करून त्यांच्यापर्यंत विशिष्ट संदेश पोहोचवले जातात, ज्यामुळे त्यांच्या स्वतंत्र विचारावर मर्यादा येतात. सारांशतः, डिजिटल प्रचार हा मतदारांना माहितीपूर्ण बनवत असला, तरी तो त्यांच्या स्वतंत्र आणि तटस्थ निर्णयक्षमतेसमोर एक मोठे वैचारिक आव्हान उभे करत आहे.

आभासी प्रचार' आणि 'प्रत्यक्ष जनसंपर्क' यांच्यातील तुलनात्मक अभ्यास

जिल्हा परिषद निवडणुकीच्या रणांगणात 'आभासी प्रचार' आणि 'प्रत्यक्ष जनसंपर्क' हे दोन्ही मार्ग आज समांतर चालताना दिसतात. आभासी प्रचाराचे सर्वात मोठे बलस्थान म्हणजे त्याचा 'विस्तार' आणि 'वेग' होय. सोशल मीडियाच्या माध्यमातून उमेदवार भौगोलिक अडथळे पार करून आपल्या मतदारसंघातील प्रत्येक वाडी-वस्तीवरील मतदारांपर्यंत एका क्लिकवर पोहोचू शकतो. हा प्रचार २४ तास सुरू असतो आणि कमी वेळात जास्तीत जास्त लोकांपर्यंत संदेश पोहोचवण्यासाठी अत्यंत प्रभावी ठरतो. परंतु, आभासी प्रचारात 'भावनिक ओलावा' आणि 'विश्वासार्हतेचा' अभाव जाणवतो. स्क्रीनवर दिसणारा उमेदवार आणि प्रत्यक्षात समोर उभा असणारा उमेदवार यांच्यात मतदाराला मोठा फरक जाणवतो.

दुसरीकडे, 'प्रत्यक्ष जनसंपर्क' हा ग्रामीण राजकारणाचा आजही आत्मा मानला जातो. खेड्यापाड्यात मतदार केवळ उमेदवाराचा 'जाहीरनामा' वाचून मतदान करत नाहीत, तर तो उमेदवार आपल्या सुख-दुःखात किती सहभागी आहे, याला महत्त्व देतात. कोपरा सभा, पाद्यत्रा आणि घरोघरी जाऊन घेतलेल्या भेटींमुळे मतदारांमध्ये आणि उमेदवारांमध्ये एक 'जिव्हाळा' निर्माण होतो. प्रत्यक्ष जनसंपर्कातून निर्माण झालेली ही विश्वासार्हता आभासी जगातील हजारो 'लाईक्स' पेक्षा अधिक प्रभावी ठरते. ग्रामीण भागात आजही 'चेहरा पाहून' मतदान करण्याची वृत्ती प्रबळ आहे, जी तंत्रज्ञान पूर्णपणे बदलू शकलेले नाही.

या दोन्ही पद्धतींच्या तुलनात्मक अभ्यासात असे दिसून येते की, आभासी प्रचार हा प्रामुख्याने 'माहिती पोहोचवण्यासाठी' उत्तम आहे, तर प्रत्यक्ष जनसंपर्क हा 'मतदारांचे मन वळवण्यासाठी' आणि नाते जोडण्यासाठी अनिवार्य आहे. आजच्या काळात जो उमेदवार या दोन्ही माध्यमांचा सुवर्णमध्य साधतो, तोच निवडणुकीत यशस्वी होताना दिसतो. केवळ डिजिटल प्रचार करणारा उमेदवार 'हवेतील' वाटू शकतो, तर केवळ पारंपरिक पद्धतीने चालणारा उमेदवार 'कालबाह्य' वाटू शकतो. म्हणूनच, 'आभासी प्रचार' हा प्रत्यक्ष जनसंपर्काला पर्याय नसून तो एक 'पूरक' भाग म्हणून समोर आला आहे.

जिल्हा परिषद निवडणुकीच्या काळात सोशल मीडिया हे केवळ प्रचाराचे साधन न राहता ते अनेकदा 'फेक न्यूज' (भ्रामक माहिती) आणि सामाजिक ध्रुवीकरणाचे केंद्र बनते. निवडणुकीच्या रणधुमाळीत आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवाराची प्रतिमा मलीन करण्यासाठी जाणीवपूर्वक चुकीची माहिती, मोर्फ केलेले फोटो आणि संदर्भाशिवाय असलेल्या व्हिडिओ क्लिप्सचा वापर केला जातो. ग्रामीण भागात अनेकदा माहितीची सत्यता पडताळण्याची साधने उपलब्ध नसतात, ज्यामुळे या अफवा आगीसारख्या पसरतात. जेव्हा एखादी खोटी माहिती वारंवार मतदारांच्या समोर येते, तेव्हा ते तिलाच सत्य मानू लागतात, ज्याचा थेट परिणाम त्यांच्या मतदानावर होतो. हे लोकशाहीच्या निकोप प्रक्रियेसाठी अत्यंत घातक आहे.

या फेक न्यूजचा दुसरा मोठा धोका म्हणजे 'सामाजिक ध्रुवीकरण' (Social Polarization). सोशल मीडियाचे अल्गोरिदम मतदारांना त्यांच्या जात, धर्म किंवा राजकीय विचारसरणीनुसार विशिष्ट गटात (Echo Chambers) विभागतात. यामुळे मतदार केवळ आपल्याच गटाची बाजू ऐकतो आणि दुसऱ्या बाजूबद्दल त्याच्या मनात अविश्वास किंवा द्वेष निर्माण होतो. निवडणुकीच्या काळात अशा ध्रुवीकरणामुळे गावागावांत गट-तट पडतात, जे निवडणुकीनंतरही अनेक वर्षे सामाजिक सलोखा बिघडवण्यास कारणीभूत ठरतात. अशा प्रकारे, सोशल मीडियामुळे निर्माण होणारे हे आभासी द्वेष प्रत्यक्ष जमिनीवरील सामाजिक शांततेसाठी आव्हान ठरत आहेत. म्हणूनच, या धोक्यांपासून वाचण्यासाठी मतदारांमध्ये 'डिजिटल साक्षरता' निर्माण करणे आणि अफवांवर विश्वास न ठेवता वस्तुनिष्ठ कामगिरीवर लक्ष केंद्रित करणे अनिवार्य आहे.

निष्कर्ष :

जिल्हा परिषद निवडणुकीत सोशल मीडियाच्या प्रवेशामुळे माहितीचा ओघ आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता निश्चितच वाढली आहे. मात्र, या तांत्रिक प्रगतीसोबतच 'फेक न्यूज' आणि अफवांचे एक मोठे संकटही लोकशाहीसमोर उभे ठाकले आहे. डिजिटल माध्यमांमुळे झालेला 'मतदारसंघाचा विस्तार' हा केवळ मोबाईल स्क्रीनवरील फोटोंपुरता किंवा लाईक्सपुरता मर्यादित न राहता, तो लोकशाहीतील विचारांच्या निकोप देवाणघेवाणीत रूपांतरित व्हायला हवा. केवळ आभासी जगातील चमकधमक मतदारांना माहिती देऊ शकते, पण त्यांचे मन जिंकण्यासाठी आजही जमिनीवरील प्रत्यक्ष कार्याची जोड आवश्यक आहे.

उमेदवारांनी केवळ 'आभासी प्रचारा'वर अवलंबून न राहता आधुनिक तंत्रज्ञान आणि पारंपरिक प्रत्यक्ष जनसंपर्क यांचा योग्य समन्वय साधणे हीच काळाची गरज आहे. तंत्रज्ञानाचा वापर विकासाचे व्हिजन मांडण्यासाठी व्हावा, न की द्वेष पसरवण्यासाठी. शेवटी,

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

एक 'डिजिटल नागरिक' म्हणून मतदारांनी प्रचारातील सत्य आणि आभास यातील फरक ओळखण्याची क्षमता विकसित करणे, हीच भारतीय लोकशाहीची खरी ताकद ठरेल. जेव्हा मतदार माहितीची पडताळणी करून मतदान करतील, तेव्हाच खऱ्या अर्थाने तंत्रज्ञान हे ग्रामीण विकासासाठी एक वरदान ठरेल.

संदर्भ सूची :

१. धारूरकर, वि. ल. (२०२०). आधुनिक जनसंवाद आणि माध्यमे. कोल्हापूर: चैतन्य प्रकाशन.

२. कास्टेल्स, एम. (२०१५). नेटवर्क्स ऑफ आउटरेज अँड होप: सोशल मूव्हमेंट्स इन द इंटरनेट एज. न्यूयॉर्क: पॉलिटि प्रेस.

३. जोशी, प्र. (२०१८). सोशल मीडिया: तंत्र आणि मंत्र. पुणे: डायमंड पब्लिकेशन्स.

४. पवार, आर. डी. (२०२२). स्थानिक स्वराज्य संस्थांचे राजकारण आणि प्रशासन. जळगाव: प्रशांत पब्लिकेशन्स.

५. कुलकर्णी, अ. (२०१९). डिजिटल लोकशाही: नवी आव्हाने. मुंबई: मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस.

६. लिंडग्रेन, एस. (२०१७). डिजिटल सोशियोलॉजी: क्रिटिकल पर्सपेक्टिव्ह्ज. लंडन: सेज पब्लिकेशन्स.

७. देशमुख, सं. (२०२१). माध्यम आणि समाज: एक अनुबंध. औरंगाबाद: चिन्मय प्रकाशन.

८. फुक्स, सी. (२०१४). सोशल मीडिया: अ क्रिटिकल इंट्रोडक्शन. लंडन: सेज पब्लिकेशन्स.

९. भगत, र. (२०१६). निवडणूक आणि सोशल मीडिया प्रचार. पुणे: उत्कर्ष प्रकाशन.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

विकासाच्या प्रवाहातील शेवटचा घटक: उपेक्षित समुदायांचे सक्षमीकरण आणि आव्हाने

किशोर दत्तात्रय पाटील
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, दुधसाखर महाविद्यालय, बिद्री
Email: kishorpatil3147@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180203
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 11-14
February- 2026
Submitted: 05 Jan. 2026
Revised: 15 Jan. 2026
Accepted: 02 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश:

उपेक्षित समुदायांचे सक्षमीकरण ही केवळ एखादी शासकीय औपचारिकता, दया किंवा धर्मादाय कार्य नसून, तो या समुदायांचा मूलभूत घटनात्मक अधिकार आहे. भारतीय लोकशाहीच्या यशाचे गमक हे केवळ बहुसंख्याकांच्या प्रगतीत नसून, ते प्रवाहातील शेवटच्या व्यक्तीला मिळणाऱ्या न्याय आणि सन्मानावर अवलंबून आहे. जोपर्यंत आपण दलित, आदिवासी, भटक्या जमाती आणि महिलांना केवळ योजनांचे 'लाभार्थी' न मानता देशाच्या विकासातील सक्रिय 'भागीदार' मानत नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक विकासाचे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ आर्थिक मदत पुरेशी नाही; तर शिक्षण, आधुनिक कौशल्य विकास आणि सामाजिक स्वीकृती या त्रिसूत्रीच्या माध्यमातूनच आपण या शेवटच्या घटकाला विकासाच्या प्रवाहात कायमस्वरूपी आणू शकतो. सक्षमीकरणाच्या मार्गातील प्रशासकीय त्रुटी आणि सामाजिक पूर्वग्रह दूर करण्यासाठी सामूहिक इच्छाशक्तीची गरज आहे. जेव्हा उपेक्षित समुदायातील व्यक्ती स्वतःचे निर्णय घेण्यास सक्षम होईल आणि तिला संसाधनांवर समान अधिकार मिळेल, तेव्हाच भारतीय संविधानाने अपेक्षित असलेला सामाजिक न्याय खऱ्या अर्थाने प्रस्थापित होईल. 'अंत्योदय' ते 'सर्वोदय' हा प्रवास पूर्ण करणे, हेच आपल्या राष्ट्रनिर्मितीचे अंतिम ध्येय असले पाहिजे.

'वारणा पॅटर्न'चे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यामध्ये असलेल्या विविध सहकारी संस्थांचा परस्परावलंबी आणि पूरक आंतरसंबंध. हा पॅटर्न केवळ स्वतंत्र संस्थांचा समूह नसून, तो एक एकमेकांना बळ देणारा 'सहकारी परिसंस्था' आहे. यातील मुख्य दुवा वारणा सहकारी साखर कारखाना आहे, ज्याने या भागातील शेतीला सिंचन आणि भांडवल उपलब्ध करून दिले. उसाच्या शेतीतून शेतकऱ्याकडे येणारा पैसा हा हंगामापुरता मर्यादित असतो, म्हणून तात्यासाहेबांनी त्याला वारणा दूध संघाची जोड दिली. साखर कारखान्यामुळे उपलब्ध झालेला चारा आणि उपपदार्थांचा वापर पशुपालनासाठी झाला, ज्यामुळे शेतकऱ्यांच्या हातात रोजचा पैसा खेळू लागला. अशाप्रकारे, साखर आणि दूध या दोन संस्थांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेला दुहेरी आधार दिला. या आर्थिक उत्पन्नाचा विनियोग करण्यासाठी आणि सभासदांची लूट थांबवण्यासाठी 'वारणा बझार' या ग्राहक सहकार संस्थेचा उदय झाला. शेतकरी आणि कामगारांनी कमवलेला पैसा पुन्हा ग्रामीण भागातच फिरावा आणि त्यांना रास्त दरात दर्जेदार वस्तू मिळाव्यात, हा यामागचा उद्देश होता. या तिन्ही संस्थांच्या नफ्यातून शिक्षण संस्था, बँका आणि आरोग्य सुविधांचे जाळे विणले गेले. उदा. साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात रस्ते आणि पाणी आले, दूध संघामुळे महिलांचे सक्षमीकरण झाले आणि बझारमुळे ग्रामीण व्यवस्थापनात व्यावसायिकता आली. हा आंतरसंस्थात्मक समन्वय इतका प्रभावी आहे की, एका संस्थेचे यश दुसऱ्या संस्थेच्या वाढीसाठी कारणीभूत ठरते. 'वारणा पॅटर्न'चा हा एकात्मिक दृष्टिकोनच ग्रामीण विकासाचा खरा आणि यशस्वी मंत्र ठरला आहे.

ग्रामीण विकासासाठी तात्यासाहेबांनी स्वीकारलेल्या आधुनिक दृष्टिकोनाची

सहकारमहर्षी तात्यासाहेब कोरे यांच्या नेतृत्वाचा एक अत्यंत पुरोगामी आणि क्रांतिकारी पैलू म्हणजे त्यांचा आधुनिक व तांत्रिक दृष्टिकोन. तात्यासाहेबांनी हे ओळखले होते की, केवळ पारंपारिक पद्धतीने सहकार टिकणार नाही, तर त्याला आधुनिक विज्ञानाची आणि तंत्रज्ञानाची जोड मिळणे आवश्यक आहे. त्यांच्या याच दूरदृष्टीतून वारणा खोऱ्यात 'वारणा वायर्ड व्हिलेज' हा प्रकल्प साकारला. १९९० च्या दशकात, जेव्हा माहिती तंत्रज्ञानाचे महत्त्व केवळ महानगरांपुरते मर्यादित होते, तेव्हा तात्यासाहेबांनी ७० हून अधिक गावांना इंटरनेट आणि संगणकीय जाळ्याने जोडून ग्रामीण भारताला जागतिक नकाशावर स्थान मिळवून दिले. हा केवळ तांत्रिक प्रयोग नसून ग्रामीण विकासाची एक नवी चिकित्सा होती.

या संगणकीकरणामुळे वारणा खोऱ्यातील शेतकऱ्यांचे जीवन पूर्णतः बदलून गेले. शेतकऱ्यांना ऊस तोडणीचे वेळापत्रक, खत वाटप, साखरेचे आंतरराष्ट्रीय बाजारभाव आणि हवामानाचा अंदाज घरबसल्या मिळू लागला. यामुळे सहकारी संस्थांच्या प्रशासनात कमालीची पारदर्शकता आली आणि मध्यस्थांची साखळी नष्ट झाली. तात्यासाहेबांच्या या दृष्टिकोनामुळे 'माहिती हीच शक्ती' हा विचार तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला. त्यांनी केवळ कारखाने चालवले नाहीत, तर ग्रामीण बुद्धिमत्तेला तंत्रज्ञानाची साथ देऊन आधुनिक शेतीकडे वळवले. हा तंत्रज्ञानाचा स्वीकार सामाजिक प्रगतीचा आणि लोकशाही विकेंद्रीकरणाचा एक मोठा पुरावा ठरला. आजही तात्यासाहेबांचा हा 'हाय-टेक सहकार' जगभरातील ग्रामीण विकास अभ्यासकांसाठी एक दीपस्तंभ आहे, कारण त्यांनी ग्रामीण माणसाला काळाशी सुसंगत राहण्याचे बळ दिले.

निष्कर्ष:

सहकारमहर्षी तात्यासाहेब कोरे यांच्या प्रदीर्घ कार्याचा आणि नेतृत्वाचा अभ्यास केल्यानंतर असे स्पष्ट होते की, त्यांचे कार्य केवळ संस्था उभारण्यापुरते मर्यादित नव्हते, तर ते एका मागासलेल्या प्रदेशाचे 'नवनिर्माण' होते. तात्यासाहेबांचे नेतृत्व हे एका 'द्रष्ट्या समाजशिल्पाकाराचे' नेतृत्व होते. त्यांनी सहकाराला कधीही केवळ सत्तेचे साधन मानले नाही, तर त्याला दीन-दलितांच्या आणि कष्टकरी शेतकऱ्यांच्या सेवेचे पवित्र 'व्रत' मानले. त्यांच्या नेतृत्वाचे खरे यश हे केवळ वारणा साखर कारखान्याच्या धुराड्यातून निघणाऱ्या धुरामध्ये नसून, वारणा खोऱ्यातील प्रत्येक सामान्य कुटुंबाचा जो आर्थिक स्तर उंचावला, त्यात सामावलेले आहे. तात्यासाहेबांनी

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

प्रस्थापित केलेला 'वारणा पॅटर्न' हा सिद्ध करतो की, जर सहकाराला प्रामाणिकपणा, शिस्त आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली, तर ग्रामीण भागाचे रूपांतर नंदनवनात होऊ शकते. साखर कारखान्याच्या माध्यमातून 'औद्योगिक क्रांती', दूध संघाच्या माध्यमातून 'श्वेतक्रांती' आणि तांत्रिक शिक्षण संस्थांच्या माध्यमातून 'बौद्धिक क्रांती' घडवून त्यांनी ग्रामीण माणसाला सन्मानाने जगायला शिकवले. 'वायर्ड व्हिलेज' सारख्या प्रकल्पातून त्यांनी ग्रामीण बुद्धिमत्तेला जागतिक स्पर्धेत उतरवले, जे त्यांच्या आधुनिक आणि पुरोगामी विचारांचे द्योतक आहे. एकूणच तात्यासाहेबांनी वारणा खोऱ्यातील मुलांच्या हातात शिक्षणाची मशाल देऊन आणि महिलांना आर्थिक स्वातंत्र्याचा मार्ग दाखवून खऱ्या अर्थाने सामाजिक समरसता प्रस्थापित केली. त्यांचा हा 'वारणा पॅटर्न' आजही जगभरातील ग्रामीण विकास अभ्यासकांसाठी एक दीपस्तंभ आणि मार्गदर्शक आराखडा ठरला आहे. "सहकारातून समृद्धी आणि समृद्धीतून संस्कार" हा त्यांनी दिलेला मंत्र आजही तितकाच प्रासंगिक असून, तो महाराष्ट्राच्या आणि देशाच्या विकासासाठी प्रेरणादायी आहे. तात्यासाहेबांनी निर्माण केलेले हे सहकार साम्राज्य म्हणजे मानवी इच्छाशक्ती आणि सामूहिक प्रयत्नांतून उभे राहिलेले एक आधुनिक 'तीर्थक्षेत्र' आहे.

संदर्भ सुही :

1. पवार, डॉ. जयसिंगराव (संपा.), सहकार महर्षी तात्यासाहेब कोरे गौरव ग्रंथ, तात्यासाहेब कोरे अमृत महोत्सव समिती, कोल्हापूर, १९९५
2. देशमुख, प्रा. एस., महाराष्ट्रातील सहकार चळवळ आणि नेतृत्व, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०२१
3. वारणा सहकारी साखर कारखाना, सुवर्णमहोत्सवी स्मरणिका (१९५५-२००५), वारणा सहकार समूह, वारणानगर, २००५
4. शासकीय अहवाल, महाराष्ट्र राज्य सहकार विभाग: वार्षिक अहवाल, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०१८-१९
5. पाटील, पी. बी., लोकशाही विकेंद्रीकरण अहवाल, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८६
6. शिंदे, डॉ. रावसाहेब, सहकारातील दीपस्तंभ, राजहंस प्रकाशन, पुणे, २०१२
7. मोरे, सदानंद, आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण, साधना प्रकाशन, पुणे, २०१५.
8. दैनिक सकाळ (कोल्हापूर आवृत्ती): "वारणेचा वाघ: तात्यासाहेब कोरे यांच्या कार्याचा आढावा", विशेष लेख, दिनांक: १३ डिसेंबर २०१७.
9. दैनिक पुढारी: "सहकारातून समृद्धीकडे: वारणा मॉडेल", संपादकीय लेख, दिनांक: १५ ऑगस्ट २०१९.
10. दैनिक लोकमत: "तात्यासाहेब कोरे: एक द्रष्टा समाजशिल्पी", मुलाखत आणि विशेष पुरवणी, दिनांक: २२ सप्टेंबर २०१५.
11. दैनिक महाराष्ट्र टाइम्स: "वायर्ड व्हिलेज: तंत्रज्ञान आणि सहकाराची सांगड", तंत्रज्ञान विशेष लेख, दिनांक: १० जानेवारी २०२०.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

धरणग्रस्तांची चळवळ : सामाजिक-आर्थिक संघर्ष आणि पुनर्वसन

पोवार स्वप्नील शंकर
संशोधक विध्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
Email: swapnilpowar03@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180209
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 41-45
February- 2026
Submitted: 05 Jan. 2026
Revised: 15 Jan. 2026
Accepted: 02 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश:

धरणग्रस्तांची चळवळ ही मोठ्या धरण प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या लोकांच्या हक्कांसाठी उभी राहिलेली एक महत्त्वाची सामाजिक चळवळ आहे. या चळवळीचा मुख्य उद्देश म्हणजे धरणामुळे जमीन, घर आणि उपजीविका गमावलेल्या लोकांना न्याय मिळवून देणे.

धरणग्रस्तांना अनेक सामाजिक व आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यांची शेती, रोजगार आणि सामाजिक जाळे नष्ट होते, त्यामुळे त्यांच्या जीवनावर मोठा परिणाम होतो. योग्य पुनर्वसन न झाल्यास त्यांची परिस्थिती अधिकच बिकट होते. या चळवळीमुळे सरकारला पुनर्वसनाच्या धोरणांमध्ये सुधारणा करावी लागली. धरणग्रस्तांसाठी जमीन, निवास, रोजगार आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला गेला. एकूणच, ही चळवळ सामाजिक न्यायासाठीचा संघर्ष दर्शवते आणि विकास प्रकल्पांमध्ये मानवी मूल्यांचा विचार करण्याची गरज अधोरेखित करते.

पारिभाषिक शब्द : *विस्थापन, पुनर्वसन, सामाजिक खर्च, पाणी हक्क*

प्रस्तावना:

स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या आर्थिक विकासाचा पाया रचताना कृषी आणि औद्योगिक प्रगतीसाठी 'मोठ्या धरणांना' अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूंनी या प्रकल्पांना 'आधुनिक भारताची मंदिरे' असे संबोधले होते. मात्र, या विकासाच्या इमारती उभ्या राहत असताना त्याखाली स्थानिक शेतकरी, कष्टकरी आणि प्रामुख्याने आदिवासी समुदायांचे हितसंबंध गाडले गेले. धरण प्रकल्पांमुळे होणारे 'विस्थापन' ही केवळ भौगोलिक बदलाची प्रक्रिया नसून, ते एका पिढ्यानपिढ्या स्थिरावलेल्या सामाजिक संस्कृतीचे, जीवनपद्धतीचे आणि उपजीविकेच्या साधनांचे संपूर्ण उच्चाटन ठरले आहे. महाराष्ट्रात कोयना धरणाच्या विस्थापनापासून सुरू झालेला हा धरणग्रस्तांचा संघर्ष आजही तितकाच प्रखर आहे. धरणग्रस्तांसाठी विस्थापन म्हणजे केवळ जमिनीचा तुकडा गमावणे नसून, आपल्या सामाजिक मुळांपासून उखडले जाणे होय. पुनर्वसनाच्या प्रक्रियेत 'जमिनीच्या बदल्यात जमीन' किंवा शाश्वत उपजीविका देण्याऐवजी केवळ तोकडा आर्थिक मोबदला दिल्याने हा वर्ग अनेकदा भूमिहीन मजुरांच्या श्रेणीत ढकलला जातो. प्रस्तुत लेख धरणग्रस्तांच्या या वेदनादायी चळवळीमागील सामाजिक आणि आर्थिक कारणांचा वेध घेतो. तसेच, विस्थापनामुळे उद्भवणारे कौटुंबिक विघटन, सांस्कृतिक ऱ्हास आणि शासकीय पुनर्वसन धोरणांमधील गंभीर त्रुटींचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सखोल आढावा घेतो. हा संघर्ष केवळ भौतिक हक्कांचा नसून तो मानवी प्रतिष्ठा आणि अस्तित्वाच्या लढ्याचा भाग आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

- धरणग्रस्तांच्या चळवळीचा ऐतिहासिक उगम आणि महाराष्ट्रातील प्रमुख आंदोलनांचा अभ्यास करणे.
- विस्थापनामुळे धरणग्रस्तांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनावर होणारे परिणाम तपासणे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
पोवार स्वप्नील शंकर, संशोधक विध्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

How to cite this article:
शंकर, . पोवार . स्वप्नील . (*2026*). धरणग्रस्तांची चळवळ : सामाजिक-आर्थिक संघर्ष आणि पुनर्वसन. *Journal of Research & Development, 18(2(XXI)), 41–45.* https://doi.org/10.5281/zenodo.19535370

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19535370

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

- धरणग्रस्तांच्या न्याय्य हक्कांसाठी लढणाऱ्या संघटनांच्या भूमिकेचे विश्लेषण करणे.

विषय विवेचन :

भारतात मोठ्या धरणांच्या निर्मितीला स्वातंत्र्यपूर्व काळातच सुरुवात झाली होती, परंतु खऱ्या अर्थाने हा प्रश्न स्वातंत्र्योत्तर कालखंडात 'नेहरूवादी विकास प्रारूपा'मुळे तीव्र झाला. महाराष्ट्रात या चळवळीचा उगम १९५० आणि ६० च्या दशकात झाला. जेव्हा सह्याद्रीच्या कुशीत 'कोयना' सारखे महाकाय प्रकल्प उभे राहिले, तेव्हा हजारो गावे पाण्याखाली गेली. सुरुवातीला देशहितासाठी त्याग करण्याची भावना धरणग्रस्तांमध्ये होती, परंतु जेव्हा सरकारने पुनर्वसनाचे आश्वासन पूर्ण केले नाही, तेव्हा या भावनेचे रूपांतर संघर्षात झाले.

महाराष्ट्रातील प्रमुख धरणग्रस्त आंदोलने

१. कोयना धरणग्रस्त आंदोलन: महाराष्ट्रातील धरणग्रस्त चळवळीची 'जननी' म्हणून या आंदोलनाकडे पाहिले जाते. १९५०-६० च्या दशकात कोयना प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या हजारो कुटुंबांना सांगली, सातारा आणि कोकणात विखुरले गेले. 'देशासाठी त्याग' करण्याच्या भावनेने जमिनी देणाऱ्या या शेतकऱ्यांना शासनाने वाऱ्यावर सोडले. योग्य पुनर्वसन आणि 'जमिनीच्या बदल्यात जमीन' या हक्कासाठी या धरणग्रस्तांनी पाच दशकांहून अधिक काळ लढा दिला. या आंदोलनाने विस्थापनामुळे होणारा सामाजिक आणि कौटुंबिक ऱ्हास किती भीषण असतो, याचे वास्तव महाराष्ट्रासमोर मांडले.

२. नर्मदा बचाव आंदोलन: महाराष्ट्राच्या सीमेवरील नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी धरणग्रस्तांसाठी हे आंदोलन जागतिक पातळीवर मैलाचा दगड ठरले. मेधा पाटकर यांच्या नेतृत्वाखाली या आंदोलनाने 'विकासाचा हक्क कोणाचा?' हा मूलभूत प्रश्न जागतिक व्यासपीठावर उपस्थित केला. केवळ आर्थिक भरपाई नको, तर जल-जंगल-जमीन यांवरील आदिवासींचे नैसर्गिक अधिकार मान्य करावेत, या मागणीसाठी आंदोलनाने दीर्घकाळ लढा दिला. पर्यावरणाचा ऱ्हास आणि मानवी विस्थापन या मुद्द्यांवर या आंदोलनाने जागतिक बँक आणि सरकारला आपली धोरणे बदलण्यास भाग पाडले.

३. वारणा आणि दूधगंगा प्रकल्प आंदोलन: पश्चिम महाराष्ट्रातील या आंदोलनांनी धरणग्रस्त चळवळीला एक नवीन वैचारिक दिशा दिली. डॉ. एन. डी. पाटील आणि डॉ. बाबा आढाव यांच्या मार्गदर्शनाखाली 'श्रमिक मुक्ती दल' सारख्या संघटनांनी हा लढा तीव्र केला. या आंदोलनाने 'पाणी हक्क' ही क्रांतिकारी संकल्पना मांडली. ज्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना धरणाचे पाणी मिळते, त्यांनी आपल्या जमिनीचा काही हिस्सा विस्थापितांना द्यावा, ही मागणी या आंदोलनाचे प्रमुख वैशिष्ट्य होते. कष्टकऱ्यांच्या संघटित शक्तीने सरकारला पुनर्वसन प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणण्यास प्रवृत्त केले.

४. टाटा धरणग्रस्त संघर्ष (मुळशी सत्याग्रह): ऐतिहासिक दृष्टिकोनातून सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखालील 'मुळशी सत्याग्रह' हा जगातील पहिला संघटित धरणविरोधी लढा मानला जातो. टाटा कंपनीच्या जलविद्युत प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी बळजबरीने घेण्याला झालेला हा विरोध आजही प्रेरणादायी आहे. या सत्याग्रहाने लोकशाही मार्गाने आपल्या जमिनीचे रक्षण करण्याचा वस्तुपाठ घालून दिला.

आंदोलनाचे स्वरूप आणि यश

महाराष्ट्रातील या आंदोलनांचे स्वरूप हे प्रामुख्याने अहिंसक, धरणे, मोर्चे आणि सत्याग्रहाचे राहिले आहे. या चळवळींमुळेच महाराष्ट्रात 'पुनर्वसन कायदा' संमत झाला. विस्थापितांना केवळ आर्थिक मदत न देता त्यांचे सामाजिक आणि आर्थिक जीवन पुन्हा उभे करणे ही सरकारची जबाबदारी आहे, हे या आंदोलनांनी सिद्ध केले. महाराष्ट्रातील धरणग्रस्त चळवळ ही केवळ जमिनीसाठीचा लढा नसून ती लोकशाहीतील मानवी हक्कांची सनद आहे. या आंदोलनांनी विकासाच्या प्रक्रियेत 'त्याग' करणाऱ्या उपेक्षितांना संघटित करून त्यांना सत्तेशी संघर्ष करण्याचे बळ दिले.

विस्थापनामुळे धरणग्रस्तांच्या जीवनावर होणारे परिणाम :

विस्थापनामुळे धरणग्रस्तांच्या जीवनावर होणारे परिणाम हे अत्यंत खोलवर आणि बहुआयामी असतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विस्थापन म्हणजे केवळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे नसून, ती एका प्रस्थापित जीवनपद्धतीचे विस्कळीत होणे आहे.

१. आर्थिक जीवनावर होणारे परिणाम: धरणग्रस्त प्रामुख्याने शेतीवर अवलंबून असणारा वर्ग असतो. विस्थापनामुळे त्यांची पिढ्यानपिढ्या कसलेली सुपीक जमीन धरणाच्या पाण्यात जाते, ज्यामुळे त्यांच्या उपजीविकेचे मुख्य साधन कायमचे नष्ट होते. शासनाकडून मिळणारा आर्थिक मोबदला अनेकदा बाजारभावापेक्षा खूपच कमी असतो. मिळालेला पैसा हा प्रामुख्याने दैनंदिन गरजा किंवा कर्ज फेडण्यात खर्च होतो, ज्यामुळे पूर्वीचा 'मालक शेतकरी' नवीन ठिकाणी 'भूमिहीन शेतमजूर' बनतो. व्यावसायिक कौशल्ये केवळ

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

शेतीशी निगडित असल्याने, बिगर-शेती क्षेत्रात त्यांना रोजगार मिळवणे कठीण जाते, परिणामी गरिबी आणि कर्जबाजारीपणाचे चक्र सुरू होते.

२. सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर होणारे परिणाम: विस्थापनाचा सर्वात मोठा फटका सामाजिक विणकामावर (Social Fabric) बसतो. विस्थापित होताना गावाची गावे विखुरली जातात, ज्यामुळे पारंपरिक नातेसंबंध आणि 'सामाजिक भांडवल' (Social Capital) नष्ट होते. गावातील सण-उत्सव, देवस्थाने आणि सामूहिक जीवनपद्धती कायमची हरवते. नवीन पुनर्वसन वसाहतींमध्ये मूळ रहिवाशांशी होणारे संघर्ष आणि सामाजिक स्वीकृतीचा अभाव यामुळे धरणग्रस्तांमध्ये एकटेपणाची भावना निर्माण होते. विशेषतः आदिवासी समुदायांमध्ये जंगल आणि जमिनीशी असलेले त्यांचे धार्मिक व सांस्कृतिक नाते तुटल्याने त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होतो.

३. कौटुंबिक आणि मानसिक परिणाम: आर्थिक अस्थिरतेमुळे कुटुंबात तणाव निर्माण होतो, ज्याचे रूपांतर अनेकदा कौटुंबिक विघटनात होते. घरातील वृद्धांना आपल्या मूळ मातीचा विरह सहन होत नाही, तर तरुण पिढी रोजगारासाठी शहरांकडे स्थलांतरित होते. महिलांना नवीन ठिकाणी पाणी, इंधन आणि सुरक्षिततेसाठी अधिक संघर्ष करावा लागतो. पुनर्वसन वसाहतींमधील पायाभूत सुविधांचा अभाव (रस्ते, वीज, शाळा) त्यांच्या विकासात अडथळे निर्माण करतो.

विस्थापन ही धरणग्रस्तांसाठी एक 'सामाजिक आपत्ती' ठरते. विकासाच्या नावाखाली त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाकडे दुर्लक्ष झाल्याने ते विकासाच्या मुख्य प्रवाहातून बाहेर फेकले जातात. त्यामुळे केवळ जमिनीचा मोबदला न देता, त्यांचे सामाजिक-आर्थिक पुनर्वसन करणे हे खऱ्या अर्थाने न्यायाचे ठरेल

धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी आखलेली सरकारी धोरणे आणि प्रत्यक्ष जमिनीवरील वास्तव :

धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी आखलेली सरकारी धोरणे आणि प्रत्यक्ष जमिनीवरील वास्तव यामध्ये मोठी दरी दिसून येते. ही तफावत दूर करणे हे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने सर्वात मोठे आव्हान आहे.

अ)शासकीय पुनर्वसन धोरणे आणि अंमलबजावणीतील आव्हाने

धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी आखलेली सरकारी धोरणे आणि प्रत्यक्ष जमिनीवरील वास्तव यामध्ये मोठी दरी असल्याचे दिसून येते. ही तफावत केवळ प्रशासकीय अपयश नसून ती धरणग्रस्तांच्या मानवी हक्कांच्या संदर्भातील एक गंभीर समस्या आहे. याचे विश्लेषण खालील पाच प्रमुख मुद्द्यांच्या आधारे करता येईल:

१. 'जमिनीच्या बदल्यात जमीन' या तत्वाचा अभाव: शासकीय धोरणानुसार, ज्या शेतकऱ्याची जमीन धरण प्रकल्पात गेली आहे, त्याला धरणाच्या लाभक्षेत्रात पर्यायी जमीन मिळणे अपेक्षित असते. मात्र, प्रत्यक्षात लाभक्षेत्रातील जमिनीचे वाटप करताना अनेक प्रशासकीय अडथळे निर्माण होतात. अनेकदा 'जमीन उपलब्ध नाही' असे तांत्रिक कारण देऊन धरणग्रस्तांना केवळ रोख रकमेवर समाधान मानण्यास भाग पाडले जाते. वाढत्या महागाईमुळे ही रोख रक्कम लवकर संपते आणि एकेकाळचा 'मालक शेतकरी' कायमचा भूमिहीन मजूर बनतो.

२. पायाभूत सुविधांची वानवा: पुनर्वसन कायद्यानुसार, नवीन पुनर्वसन वसाहतींमध्ये पिण्याचे पाणी, रस्ते, वीज, शाळा, दवाखाने आणि स्मशानभूमी यांसारख्या १८ नागरी सुविधा पुरवणे सरकारला बंधनकारक आहे. परंतु, महाराष्ट्रातील अनेक पुनर्वसन वसाहतींमध्ये दशकांनंतरही या मूलभूत सुविधा पोहोचलेल्या नाहीत. रस्ते आणि पिण्याच्या पाण्यासाठी धरणग्रस्तांना आजही संघर्ष करावा लागतो, ज्यामुळे त्यांचे जीवन खडतर बनले आहे. हे स्पष्टपणे त्यांच्या मूलभूत मानवी हक्कांचे उल्लंघन आहे.

३. नोकरी आणि उपजीविकेच्या आश्वासनांची पूर्तता: धरणग्रस्त कुटुंबातील एका पात्र व्यक्तीला सरकारी नोकरीत प्राधान्य देण्याचे धोरण कागदावर आहे. मात्र, बदलत्या काळात झालेली नोकरभरतीतील कपात, तांत्रिक अर्हतेचा अभाव आणि प्रशासकीय दिरंगाई यामुळे हजारो धरणग्रस्त तरुण आजही नोकरीच्या प्रतीक्षेत आहेत. उपजीविकेचे साधन नसल्याने विस्थापित कुटुंबांची आर्थिक घडी विस्कटलेलीच राहते आणि गरिबीचे चक्र सुरू होते.

४. सामाजिक आणि सांस्कृतिक विस्थापनाकडे दुर्लक्ष: सरकारी धोरणे प्रामुख्याने केवळ 'आर्थिक भरपाई' देण्यावर लक्ष केंद्रित करतात. मात्र, धरणग्रस्तांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक पुनर्वसनाबाबत कोणतीही ठोस यंत्रणा अस्तित्वात नाही. गाव विखुरल्यामुळे लोकांचे पारंपरिक नातेसंबंध आणि सामाजिक आधार तुटतात. याचा सर्वाधिक मानसिक परिणाम वृद्ध आणि महिलांवर होतो. नवीन ठिकाणी होणारा सामाजिक संघर्ष आणि समन्वयाचा अभाव हा धोरणात्मक दुर्लक्षामुळेच अधिक तीव्र होतो.

५. प्रशासकीय भ्रष्टाचार आणि क्लिष्ट प्रक्रिया: पुनर्वसन प्रक्रिया अत्यंत क्लिष्ट आणि वेळखाऊ आहे. सामान्य धरणग्रस्ताला जमिनीचे उतारे मिळवणे किंवा 'धरणग्रस्त दाखला' मिळवण्यासाठी सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार आणि विलंब होतो. अनेकदा धरणाचे काम पूर्ण होऊन पाणी सुटले तरी पुनर्वसनाचे कागदोपत्री घोळ वर्षानुवर्षे संपलेले नसतात, ज्यामुळे धरणग्रस्त न्यायापासून वंचित राहतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

शासकीय धोरणे कागदावर आदर्श वाटत असली तरी, अंमलबजावणीतील इच्छाशक्तीचा अभाव आणि संवेदनहीनता यामुळे धरणग्रस्त हा 'विकासाचा बळी' ठरतो. जोपर्यंत पुनर्वसनाकडे केवळ एक तांत्रिक प्रक्रिया म्हणून न पाहता, ती एक 'मानवीय जबाबदारी' म्हणून पाहिली जात नाही, तोपर्यंत ही तफावत कायम राहील.

ब)धरणग्रस्त संघटनांच्या भूमिका: सामाजिक न्यायाचा लढा

१. संघटन आणि व्यापक जनजागृती: धरणग्रस्त हे प्रामुख्याने दुर्गम डोंगराळ भागातील, अल्पशिक्षित आणि सामाजिकदृष्ट्या विखुरलेले असतात. अशा दुर्बल घटकाला एकत्र आणून त्यांना आपल्या हक्कांची जाणीव करून देणे हे पहिले मोठे आव्हान असते. 'श्रमिक मुक्ती दल', 'नर्मदा बचाव आंदोलन' आणि 'धरणग्रस्त संघर्ष समिती' यांसारख्या संघटनांनी हे काम समर्थपणे पेलले. विस्थापनामुळे होणारे पिढ्यानपिढ्यांचे नुकसान आणि कायद्याने दिलेले हक्क यांबाबत सातत्याने बैठका आणि मेळावे घेऊन त्यांनी या वर्गाला आत्मसन्मानाचा लढा देण्यास प्रवृत्त केले.

२. धोरणात्मक हस्तक्षेप आणि कायदेशीर लढा: संघटनांनी केवळ रस्त्यावरील आंदोलने केली नाहीत, तर व्यवस्थेशी वैचारिक आणि कायदेशीर लढाही दिला. पुनर्वसनाच्या प्रक्रियेत 'जमिनीच्या बदल्यात जमीन' हे तत्व केवळ कागदावर राहू नये, यासाठी मेधा पाटकर आणि डॉ. एन. डी. पाटील यांसारख्या नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयापर्यंत लढा दिला. या संघटनांच्या अभ्यासपूर्ण हस्तक्षेपामुळेच शासनाला २०१३ सारखे अधिक सर्वसमावेशक पुनर्वसन आणि विस्थापन कायदे तयार करणे भाग पडले.

३. पाणी हक्क आणि समतेची संकल्पना: धरणग्रस्त संघटनांनी मांडलेला सर्वात क्रांतिकारी विचार म्हणजे 'पाणी हक्क'. "ज्याने धरणासाठी स्वतःचे घर आणि जमीन त्यागली, त्या धरणग्रस्ताचा त्या पाण्यावर पहिला हक्क असला पाहिजे," हा विचार त्यांनी समाजात रुजवला. लाभक्षेत्रातील बागायतदार शेतकऱ्यांच्या समृद्धीत विस्थापितांचाही समान वाटा असावा, या समतेच्या विचाराने दक्षिण महाराष्ट्रातील 'पाणी संघर्ष समिती'ने मोठे जनआंदोलन उभे केले. यातूनच विकासाच्या फळांचे समन्यायी वाटप व्हावे, हा संदेश स्पष्ट झाला.

४. प्रशासकीय मध्यस्थ आणि भ्रष्टाचार निर्मूलन: अशिक्षित धरणग्रस्त आणि क्लिष्ट सरकारी यंत्रणा यांमधील संवादाची दरी संघटनांनी सांधली आहे. धरणग्रस्त दाखले मिळवणे, पुनर्वसन वसाहतींमधील रस्ते, वीज आणि शाळा यांसारख्या नागरी सुविधांचा पाठपुरावा करणे यामध्ये संघटनांचा मोठा वाटा असतो. प्रशासकीय स्तरावर होणारा भ्रष्टाचार रोखण्यासाठी संघटनांनी एक 'दबाव गट' म्हणून काम केले, ज्यामुळे खऱ्या लाभार्थ्यांना न्याय मिळणे सोपे झाले.

५. पर्यायी विकास प्रारूपाची मांडणी: या संघटनांची भूमिका केवळ विरोधाची नसून ती रचनात्मक आहे. 'मोठ्या धरणांना पर्याय' म्हणून त्यांनी लहान बंधारे, पाझर तलाव आणि विकेंद्रित पाणी नियोजनाची शास्त्रीय संकल्पना मांडली. निसर्ग आणि मानवाचा किमान ऱ्हास होईल अशा 'शाश्वत विकासाच्या' (Sustainable Development) प्रारूपाचा त्यांनी आयुष्यभर पुरस्कार केला.

निष्कर्ष :

'धरणग्रस्तांची चळवळ' हा केवळ जमिनीच्या तुकड्यासाठी किंवा आर्थिक मोबदल्यासाठी दिलेला लढा नाही, तर तो मुळात मानवी अस्तित्व आणि सन्मानाने जगण्याच्या हक्कासाठी पुकारलेला एल्गार आहे. आधुनिक भारताच्या जडणघडणीत धरण प्रकल्पांनी महत्त्वाची भूमिका बजावली असली तरी, या विकासाच्या प्रक्रियेत ज्यांनी स्वतःच्या घरादाराचा, सुपीक जमिनीचा आणि पिढ्यानपिढ्यांच्या संस्कृतीचा त्याग केला, तो वर्ग आजही उपेक्षित राहिला आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास, विस्थापन ही केवळ भौतिक हानी नसून ती एका समुदायाचे सामाजिक आणि मानसिक खच्चीकरण करणारी प्रक्रिया ठरली आहे.

विकासाचे वाटप विषम आहे, हे या चळवळीतून स्पष्टपणे अधोरेखित होते. ज्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या शेतात धरणाच्या पाण्यामुळे समृद्धी आली, त्यांनी ज्या धरणग्रस्तांनी या पाण्यासाठी स्वतःच्या जमिनी दिल्या, त्यांच्याप्रती कृतज्ञ राहणे आणि त्यांच्या ऋणात राहणे ही एक सामाजिक गरज आहे. जोपर्यंत 'जमिनीच्या बदल्यात जमीन', 'प्रकल्पग्रस्ताचा दाखला' आणि 'कुटुंबातील एका पात्र व्यक्तीला सरकारी नोकरी' यांसारखी शासनाने दिलेली कायदेशीर आश्वासने शंभर टक्के पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत हा संघर्ष थांबणे शक्य नाही. महाराष्ट्रातील कोयना ते नर्मदा बचाव आंदोलनापर्यंतच्या प्रवासात हेच दिसून येते की, धरणग्रस्तांना आजही आपल्या न्याय्य हक्कांसाठी रस्त्यावर उतरावे लागते, ही लोकशाहीतील चिंतेची बाब आहे. शाश्वत विकासाच्या संकल्पनेत धरणग्रस्तांना केवळ 'बळी' मानण्याऐवजी त्यांना 'प्रकल्पाचे भागीदार' बनवणे, हाच खऱ्या सामाजिक न्यायाचा मार्ग ठरेल. केवळ मोबदला देऊन जबाबदारी संपत नाही, तर त्यांचे मूळ संस्कृतीशी नाते जपून नवीन ठिकाणी त्यांचे आर्थिक सक्षमीकरण करणे अनिवार्य आहे. धरणग्रस्तांची चळवळ ही प्रस्थापित विकास प्रारूपावर प्रश्नचिन्ह उपस्थित करते. जोपर्यंत समाजातील शेवटच्या घटकाचा बळी न घेता सर्वांगीण प्रगती साध्य होत नाही, तोपर्यंत आपला विकास हा 'अधुरा' आणि 'अन्यायकारक' असेल. धरणग्रस्तांचे प्रश्न हे केवळ प्रशासकीय नसून ते मानवीय संवेदनांचे आहेत, हे लक्षात घेऊनच भविष्यातील धोरणांची आखणी होणे आवश्यक आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

संदर्भ सूची :

१. पाटील, एन. डी. (२०११), धरणग्रस्तांचा संघर्ष आणि महाराष्ट्राचे समाजकारण, लोकवाङ्मय गृह, मुंबई.
२. आढाव, बाबा (२००८), विस्थापितांचे प्रश्न आणि चळवळ, श्रमिक मुक्ती दल प्रकाशन.
३. पाटकर, मेधा (२००५), नर्मदा बचाव आंदोलन: मानवी हक्कांचा लढा, संवाद प्रकाशन.
४. ओव्हेट, गेल (२००१), महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी आणि विस्थापन, सुगावा प्रकाशन.
५. देशपांडे, सतीश (२००३), भारतीय समाजशास्त्र: विकास आणि आव्हाने, ओरिएंट ब्लॅकस्वान.
६. महाराष्ट्र शासन (१९८६), पुर्वसन कायदा १९८६.
७. भारत सरकार (२०१३), भूसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्वसाहत करताना रास्त भरपाई आणि पारदर्शकता मिळवण्याचा हक्क कायदा, २०१३.
८. समाजशास्त्र पत्रिका (२०२४), "विस्थापन आणि पुनर्वसनाचे समाजशास्त्र", विशेष लेख.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

सार्वजनिक प्रशासन आणि सामाजिक बदल: धोरण अंमलबजावणीतील प्रशासकीय आव्हाने

अनिल देविदास मुडे
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, कोल्हापूर
Email: anilmude555@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180210
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 46-50
February- 2026
Submitted: 05 Jan. 2026
Revised: 15 Jan. 2026
Accepted: 02 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

सार्वजनिक प्रशासन हे सामाजिक बदल घडवून आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. सरकारद्वारे तयार केलेली धोरणे प्रभावीपणे अंमलात आणणे हे प्रशासनाचे मुख्य कार्य आहे. मात्र, या प्रक्रियेत अनेक प्रशासकीय आव्हाने निर्माण होतात. धोरण अंमलबजावणी करताना संसाधनांची कमतरता, अपुरी मनुष्यबळ व्यवस्था, भ्रष्टाचार, आणि प्रशासकीय दिरंगाई ही प्रमुख अडचणी असतात. तसेच, विविध विभागांतील समन्वयाचा अभाव आणि स्थानिक परिस्थितींचा योग्य विचार न केल्यामुळे धोरणांचा अपेक्षित परिणाम साध्य होत नाही.

याशिवाय, लोकांचा सहभाग कमी असणे आणि जागरूकतेचा अभावही अंमलबजावणीत अडथळा ठरतो. त्यामुळे अनेक वेळा चांगली धोरणेही प्रत्यक्षात यशस्वी होत नाहीत. एकूणच, प्रभावी सामाजिक बदल घडवण्यासाठी पारदर्शकता, उत्तरदायित्व, योग्य नियोजन, आणि लोकसहभाग आवश्यक आहे. प्रशासनाने या आव्हानांवर मात केल्यासच धोरणांची अंमलबजावणी यशस्वी होऊ शकते.

परिभाषिक शब्द : *सार्वजनिक प्रशासन, सामाजिक बदल, धोरण अंमलबजावणी, नोकरशाही, उत्तरदायित्व*

प्रस्तावना

सार्वजनिक प्रशासन ही केवळ सरकारी यंत्रणा नसून ती कोणत्याही राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा मुख्य आधारस्तंभ किंवा कणा आहे. लोकशाही व्यवस्थेत जनतेच्या कल्याणासाठी संसदेत किंवा विधीमंडळात अनेक कायदे बनवले जातात, परंतु केवळ कागदावर कायदे तयार करणे म्हणजे सामाजिक परिवर्तन नव्हे. खऱ्या अर्थाने सामाजिक बदल तेव्हाच घडतो, जेव्हा त्या कायद्यांची आणि धोरणांची तळागाळातील स्तरावर प्रभावी व पारदर्शक अंमलबजावणी केली जाते. सार्वजनिक प्रशासनाचे प्राथमिक कर्तव्य हे समाजातील आर्थिक आणि सामाजिक विषमता दूर करणे आणि भारतीय राज्यघटनेने अपेक्षित असलेली 'कल्याणकारी राज्याची' संकल्पना प्रत्यक्ष व्यवहारात उतरवणे हे आहे. मात्र, वास्तव परिस्थितीचा विचार करता, धोरणांचा मसुदा तयार करणे आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे यांमध्ये अनेकदा मोठी दरी दिसून येते. ही दरी प्रामुख्याने विविध प्रशासकीय आव्हानांमुळे निर्माण होते, ज्यामध्ये लालफितीचा कारभार, संसाधनांची कमतरता आणि राजकीय हस्तक्षेपाचा समावेश होतो. जर प्रशासकीय यंत्रणा सक्षम नसेल, तर कितीही उच्च प्रतीचे धोरण असले तरी ते अपयशी ठरते. परिणामी, समाजातील वंचित घटक मुख्य प्रवाहापासून दूरच राहतात. प्रस्तुत प्रकल्प सामाजिक परिवर्तनासाठी राबवल्या जाणाऱ्या विविध सरकारी धोरणांच्या अंमलबजावणीतील नेमके प्रशासकीय अडथळे कोणते आहेत, त्यांचा समाजावर काय प्रभाव पडतो आणि ही आव्हाने पेलण्यासाठी प्रशासनाने कोणत्या सुधारणा करणे आवश्यक आहे, याचा सखोल आणि वस्तुनिष्ठ मागोवा घेतो. हा अभ्यास लोकशाहीतील प्रशासकीय उत्तरदायित्वाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरेल.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
अनिल देविदास मुडे, सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, कोल्हापूर

How to cite this article:
अनिल देविदास मुडे (2026). सार्वजनिक प्रशासन आणि सामाजिक बदल: धोरण अंमलबजावणीतील प्रशासकीय आव्हाने. Journal of Research & Development, 18(2(XXI)), 46–50.

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

संशोधन उद्दिष्टे :

- सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी सार्वजनिक प्रशासनाची भूमिका स्पष्ट करणे.
- सरकारी धोरणांच्या अंमलबजावणीत येणारी प्रमुख प्रशासकीय आव्हाने (उदा. लालफितीचा कारभार, राजकीय हस्तक्षेप) शोधणे.
- प्रशासकीय अकार्यक्षमतेचा सामाजिक बदलाच्या गतीवर होणारा परिणाम तपासणे.
- धोरण अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यासाठी उपाययोजना सुचवणे.

संशोधन पद्धती : या संशोधनासाठी मिश्र पद्धतीचा वापर केला जाईल:

विषय विवेचन :

सामाजिक बदल ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे, जिथे समाजाच्या जुन्या, कालबाह्य रूढींची जागा आधुनिक आणि न्याय्य मूल्ये घेतात. या प्रक्रियेत 'सार्वजनिक प्रशासन' हे केवळ एक नियामक म्हणून नाही, तर बदलाचा मुख्य 'अभिकर्ता' म्हणून भूमिका बजावते. लोकशाहीत निवडून आलेले प्रतिनिधी धोरणे आखतात, पण ती धोरणे प्रत्यक्ष समाजमनापर्यंत पोहोचवण्याचे काम प्रशासकीय यंत्रणा करते. शिक्षण, आरोग्य, आर्थिक सक्षमीकरण आणि सामाजिक न्याय या क्षेत्रांत बदल घडवून आणण्यासाठी प्रशासन हे एक प्रभावी साधन ठरते. जेव्हा एखादा जिल्हाधिकारी किंवा गटविकास अधिकारी आपल्या कार्यक्षेत्रात स्त्री-पुरुष समानता किंवा साक्षरतेचा प्रसार करतो, तेव्हा तो केवळ सरकारी आदेशाचे पालन करत नसून सामाजिक क्रांतीची बीजे पेरतो. सार्वजनिक प्रशासनाच्या भूमिकेचा विचार करताना 'कल्याणकारी राज्याची अंमलबजावणी' हा सर्वात महत्त्वाचा पैलू ठरतो. अस्पृश्यता निवारण, हुंडाबंदी किंवा बालविवाह प्रतिबंधक कायद्यांची अंमलबजावणी करताना प्रशासनाला अनेकदा सामाजिक विरोधाचाही सामना करावा लागतो. अशा वेळी, केवळ दंडात्मक कारवाई न करता जनमत तयार करणे आणि लोकांना कायद्याचे महत्त्व पटवून देणे, हे प्रशासनाचे कौशल्य असते. उदाहरणार्थ, ग्रामीण भागात 'स्वच्छ भारत अभियान' यशस्वी करण्यात प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लोकांच्या सवयी बदलण्यासाठी केलेले प्रबोधन हे सामाजिक बदलाचे उत्तम उदाहरण आहे. प्रशासकीय यंत्रणा ही समाजातील वंचित आणि शोषित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षण आणि विशेष सवलतींच्या योजना राबवते, ज्यामुळे सामाजिक संरचनेत सकारात्मक बदल घडून येतो.

तळागाळातील स्तरावर, विशेषतः महसूल प्रशासनातील 'तलाठी' किंवा ग्रामसेवक यांसारखे घटक सामाजिक बदलाचे वाहक असतात. लोकांच्या जमिनींचे प्रश्न सोडवणे, जातीचे दाखले देणे किंवा नैसर्गिक आपत्तीच्या काळात मदत पोहोचवणे, यांतून प्रशासनाची संवेदनशीलता दिसून येते. ही संवेदनशीलताच लोकांचा सरकारवरचा विश्वास दृढ करते. आधुनिक काळात 'ई-गव्हर्नन्स'मुळे प्रशासकीय कामात पारदर्शकता आली आहे, ज्यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसून सामाजिक न्याय मिळणे अधिक सुलभ झाले आहे. जेव्हा धोरणकर्ते आणि सामान्य नागरिक यांच्यातील दरी प्रशासन कमी करते, तेव्हाच खऱ्या अर्थाने सामाजिक सामाजिक बदल हा केवळ कायद्याने येत नाही, तर तो त्या कायद्याच्या अंमलबजावणीत प्रशासन किती 'मानवी ठेवते यावर अवलंबून असतो. प्रशासन जितके कार्यक्षम, पारदर्शक आणि लोकाभिमुख असेल, तितका सामाजिक बदलाचा प्रवास जलद आणि सुसह्य होईल. सार्वजनिक प्रशासन हे समाजाला स्थिरतेकडून प्रगतीकडे नेणारा एक भक्कम पूल आहे, ज्यावर संपूर्ण राष्ट्राचे भविष्य अवलंबून असते.

सरकारी धोरणांच्या अंमलबजावणीतील प्रमुख प्रशासकीय आव्हाने

सरकारी धोरणांची यशस्विता ही केवळ त्यांच्या नियोजनावर नसून त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीवर अवलंबून असते. भारतात धोरणे अत्यंत विचारपूर्वक आणि व्यापक कल्याणासाठी बनवली जातात, मात्र 'धोरणनिर्मिती' आणि 'प्रत्यक्ष अंमलबजावणी' यांमधील दरी मोठी आहे. या दरीला कारणीभूत ठरणारी प्रमुख प्रशासकीय आव्हाने खालीलप्रमाणे आहेत:

लालफितीचा कारभार : प्रशासकीय यंत्रणेत नियमांचे अत्यंत काटेकोर पालन करण्याच्या प्रवृत्तीमुळे कामात विलंब होतो. कोणत्याही फाईलला मंजुरी मिळवण्यासाठी अनेक स्तरांमधून जावे लागते. यामुळे निर्णयाची गती मंदावते आणि धोरणाचा मूळ हेतू कालबाह्य होण्याची भीती निर्माण होते. नियमांच्या जंजाळात अडकल्यामुळे सामान्य नागरिकांना वेळेत लाभ मिळत नाही, हे मोठे आव्हान आहे.

राजकीय हस्तक्षेप : प्रशासकीय अधिकारी आणि राजकीय नेते यांच्यातील संबंध अनेकदा धोरण अंमलबजावणीवर परिणाम करतात. स्थानिक राजकीय दबावामुळे अनेकदा पात्र लाभार्थ्यांऐवजी ठराविक गटांनाच फायदा दिला जातो. बदल्यांची भीती किंवा राजकीय वर्चस्वामुळे अधिकारी स्वतंत्रपणे आणि निपक्षपातीपणे काम करू शकत नाहीत, ज्यामुळे धोरणांची विश्वासार्हता कमी होते.

संसाधनांचा अभाव आणि अपुरा कर्मचारी वर्ग: धोरणे राबवण्यासाठी आवश्यक असलेले आर्थिक पाठबळ आणि मनुष्यबळ अनेकदा अपुरे असते. ग्रामीण भागात, विशेषतः 'तलाठी', ग्रामसेवक किंवा आरोग्य कर्मचारी यांच्यावर कामाचा अतिरिक्त बोजा असतो. अपुऱ्या सोयीसुविधा आणि तंत्रज्ञानाचा अभाव यामुळे धोरणांची अंमलबजावणी संथ गतीने होते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

भ्रष्टाचाराची समस्या: धोरण अंमलबजावणीच्या प्रवासात अनेकदा निधीची गळती होते. मध्यस्थांची साखळी आणि पारदर्शकतेचा अभाव यामुळे सरकारकडून दिला जाणारा निधी शेवटच्या घटकापर्यंत पोहोचत नाही. भ्रष्टाचाराच्या या चक्रामुळे जनतेचा प्रशासनावरील विश्वास उडतो आणि सामाजिक बदल घडवून आणण्यात बाधा निर्माण होते.

समन्वयाचा अभाव: अनेक सरकारी धोरणे ही आंतरशाखीय असतात. उदाहरणार्थ, एखाद्या ग्रामीण विकास योजनेसाठी महसूल, कृषी आणि जलसंधारण या तीनही विभागांचा समन्वय आवश्यक असतो. मात्र, विभागांमधील विसंवाद आणि माहितीच्या देवाणघेवाणीत असणारा अडथळा यामुळे कामात पुनरावृत्ती होते किंवा काम रखडते.

माहितीचा आणि तांत्रिक साक्षरतेचा अभाव: धोरणे राबवताना डिजिटल तंत्रज्ञानाचा (उदा. DBT, ई-गव्हर्नन्स) वापर वाढला आहे. परंतु, अनेक क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना आणि लाभार्थ्यांना या तंत्रज्ञानाचे पुरेसे ज्ञान नसते. यामुळे तांत्रिक त्रुटी निर्माण होतात आणि पात्र नागरिक योजनेपासून वंचित राहतात.

सरकारी धोरणांच्या अंमलबजावणीतील ही आव्हाने लोकशाहीच्या विकासाला खिळ घालणारी आहेत. लालफितीचा कारभार कमी करणे, प्रशासकीय स्वायत्तता जपणे आणि पारदर्शक डिजिटल प्रणालीचा अवलंब करणे, हे या आव्हानांवर मात करण्याचे महत्त्वाचे मार्ग आहेत. जेव्हा प्रशासन संवेदनशीलता आणि कार्यक्षमता यांचा मेळ घालेल, तेव्हाच धोरणे कागदावरून उतरून लोकांच्या आयुष्यात बदल घडवतील.

प्रशासकीय अकार्यक्षमतेचा सामाजिक बदलाच्या गतीवर होणारा परिणाम

सार्वजनिक प्रशासन हे सामाजिक परिवर्तनाचे इंजिन मानले जाते. जर हे इंजिन कार्यक्षम असेल, तर समाज प्रगतीकडे वेगाने धावतो; परंतु जर प्रशासकीय यंत्रणेत अकार्यक्षमता असेल, तर सामाजिक बदलाची गती मंदावते आणि विकासाची प्रक्रिया विस्कळीत होते. प्रशासकीय अकार्यक्षमता म्हणजे केवळ कामात होणारा उशीर नव्हे, तर नियोजनाचा अभाव, चुकीची अंमलबजावणी आणि संवेदनाशून्य कार्यपद्धती होय.

धोरणात्मक अपयश आणि विश्वासाची कमतरता: जेव्हा एखादे लोकहितकारी धोरण (उदा. मोफत शिक्षण किंवा आरोग्य योजना) प्रशासकीय अकार्यक्षमतेमुळे लोकांपर्यंत पोहोचत नाही, तेव्हा नागरिकांचा लोकशाही व्यवस्थेवरचा विश्वास कमी होतो. समाज परिवर्तनासाठी सरकारवर विश्वास असणे आवश्यक असते. अकार्यक्षमतेमुळे हा विश्वास डळमळीत होतो, परिणामी नागरिक सरकारी उपक्रमांपासून दूर राहू लागतात आणि सामाजिक बदलाची प्रक्रिया थंडावते.

आर्थिक विषमतेत वाढ: प्रशासकीय अकार्यक्षमतेचा सर्वात मोठा फटका समाजातील गरीब आणि वंचित घटकांना बसतो. पात्र लाभार्थ्यांना वेळेत मदत न मिळणे किंवा भ्रष्टाचारा मुळे निधीची गळती होणे, यामुळे श्रीमंत अधिक श्रीमंत आणि गरीब अधिक गरीब होत जातो. आर्थिक न्याय मिळाल्याशिवाय सामाजिक बदल शक्य नसतो. जेव्हा प्रशासकीय यंत्रणा संथ असते, तेव्हा विकासाची फळे केवळ प्रभावशाली वर्गालाच मिळतात, ज्यामुळे सामाजिक दरी अधिक रुंदावते.

सामाजिक न्यायात विलंब: "विलंब झालेला न्याय हा नाकारलेला न्याय असतो" हे प्रशासनालाही लागू होते. जातीभेद, महिलांवरील अत्याचार किंवा कौटुंबिक हिंसाचार यांसारख्या सामाजिक समस्यांविरुद्ध कायदे असूनही जर प्रशासकीय यंत्रणा (उदा. पोलीस किंवा सामाजिक कल्याण विभाग) अकार्यक्षम असेल, तर पीडितांना न्याय मिळत नाही. यामुळे गुन्हेगारांचे मनोबल वाढते आणि समाजात अपेक्षित असलेले सकारात्मक बदल मागे पडतात.

नावीन्यपूर्ण प्रयोगांचा अभाव: एक कार्यक्षम प्रशासन नेहमी नवीन तंत्रज्ञान आणि पद्धतींचा (उदा. ई-गव्हर्नन्स) अवलंब करते. मात्र, अकार्यक्षम प्रशासन बदलांना विरोध करते. यामुळे समाज आधुनिकतेकडे जाण्याऐवजी जुन्याच पद्धतींमध्ये अडकून पडतो. डिजिटल साक्षरता किंवा सौर ऊर्जेसारखे प्रकल्प राबवताना जर प्रशासकीय मरगळ असेल, तर समाज जागतिक प्रवाहाच्या मागे पडतो.

लोकसहभागाचा अभाव: सामाजिक बदल हा केवळ सरकारी आदेशांनी होत नाही, तर त्यात जनतेचा सहभाग आवश्यक असतो. जेव्हा प्रशासन अकार्यक्षम असते, तेव्हा ते जनतेला निर्णय प्रक्रियेत सामावून घेण्यास टाळाटाळ करते. ग्रामसभा किंवा वॉर्ड समित्यांचे कामकाज कागदोपत्रीच मर्यादित राहिल्यामुळे लोकांची सर्जनशीलता आणि स्थानिक समस्या सोडवण्याची ताकद वाया जाते.

एकूणच प्रशासकीय अकार्यक्षमता ही सामाजिक परिवर्तनाच्या मार्गातील सर्वात मोठी भिंत आहे. प्रशासनातील 'लालफितीचा कारभार' आणि 'उत्तरादायित्वाचा अभाव' सामाजिक क्रांतीची गती रोखून धरतात. जोपर्यंत प्रशासन गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख होत नाही, तोपर्यंत सामाजिक बदलाची स्वप्ने कागदावरच राहतील. प्रशासकीय सुधारणा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हाच यावरचा प्रभावी उपाय आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

धोरण अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यासाठी उपाययोजना

कोणत्याही सरकारी धोरणाचे यश हे त्याच्या आखणीपेक्षा अंमलबजावणीवर अधिक अवलंबून असते. भारतासारख्या विशाल आणि विविधतेने नटलेल्या देशात धोरणे तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेत आमूलाग्र सुधारणा करणे आवश्यक आहे. धोरण अंमलबजावणी अधिक गतिमान आणि प्रभावी करण्यासाठी खालील उपाययोजना सुचवता येतील:

प्रशासकीय विकेंद्रीकरण आणि सक्षमीकरण: धोरणांची अंमलबजावणी यशस्वी करण्यासाठी सत्तेचे आणि अधिकारांचे विकेंद्रीकरण होणे गरजेचे आहे. केंद्र किंवा राज्य स्तरावर निर्णय घेण्याऐवजी स्थानिक स्वराज्य संस्थांना (ग्रामपंचायत, नगरपालिका) अधिक अधिकार आणि निधी उपलब्ध करून दिला पाहिजे. स्थानिक प्रशासकीय अधिकारी जसे की 'तलाठी' किंवा 'ग्रामसेवक' यांना तांत्रिकदृष्ट्या सक्षम केल्यास धोरणांमधील त्रुटी स्थानिक पातळीवरच दूर करता येतील.

डिजिटल तंत्रज्ञान आणि ई-गव्हर्नन्सचा वापर: प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी 'डिजिटल इंडिया' मोहिमेचा विस्तार करणे आवश्यक आहे. सर्व सरकारी सेवा ऑनलाइन केल्यास 'लालफितीचा कारभार' कमी होईल. 'थेट लाभ हस्तांतरण' (DBT) मुळे भ्रष्टाचाराला आळा बसला आहे, अशाच प्रकारे प्रत्येक योजनेचा मागोवा घेण्यासाठी 'रिअल-टाइम मॉनिटरींग डॅशबोर्ड' तयार केले जावेत. यामुळे कामात कुठे अडथळा येत आहे, हे वरिष्ठांना त्वरित समजेल.

लोकसहभाग आणि जनसुनावणी: धोरण अंमलबजावणीत जोपर्यंत सामान्य जनता सहभागी होत नाही, तोपर्यंत ते धोरण यशस्वी होत नाही. 'सोशल ऑडिट' (सामाजिक अंकेक्षण) ही पद्धत अनिवार्य केली पाहिजे, ज्यामध्ये नागरिक स्वतः कामाच्या दर्जाची तपासणी करू शकतील. ग्रामसभांना अधिक सक्रिय करून धोरणातील बदलांबाबत लोकांच्या सूचना विचारात घेतल्या पाहिजेत.

उत्तरदायित्व आणि कार्यप्रदर्शन आधारित मूल्यमापन: प्रशासकीय अधिकाऱ्यांचे मूल्यमापन केवळ त्यांच्या सेवाज्येष्ठतेवर न होता, त्यांनी राबवलेल्या धोरणांच्या निकालावर आधारित असावे. 'की परफॉर्मन्स इंडिकेटर्स' (KPI) निश्चित करून जो अधिकारी उत्तम काम करेल, त्याला प्रोत्साहन आणि जो निष्काळजीपणा करेल, त्याच्यावर दंडात्मक कारवाईची तरतूद असावी. यामुळे प्रशासकीय अकार्यक्षमता कमी होईल.

कौशल्य विकास आणि प्रशिक्षण: बदलत्या काळाप्रमाणे प्रशासकीय कर्मचाऱ्यांना नवीन तंत्रज्ञान, कायदे आणि लोकांशी संवाद साधण्याचे कौशल्य याचे नियमित प्रशिक्षण दिले पाहिजे. प्रशासनात संवेदनशीलता रुजवण्यासाठी प्रशिक्षणात सामाजिक विषयांचा समावेश करावा, जेणेकरून अधिकारी केवळ यंत्रवत काम न करता 'मानवी चेहरा' ठेवून सेवा देतील.

आंतर-विभागीय समन्वय: अनेकदा एकाच प्रकल्पासाठी अनेक विभागांच्या परवानगीची गरज असते. हे टाळण्यासाठी 'सिंगल विंडो सिस्टम' (एक खिडकी योजना) अधिक प्रभावीपणे राबवली पाहिजे. विविध विभागांमध्ये समन्वय साधण्यासाठी एकात्मिक सॉफ्टवेअरचा वापर करावा, जेणेकरून फाईल्स एका टेबलावरून दुसऱ्या टेबलावर जाण्यात वेळ वाया जाणार नाही.

धोरण अंमलबजावणी अधिक प्रभावी करणे म्हणजे केवळ तंत्रज्ञानाचा वापर नव्हे, तर प्रशासकीय मानसिकतेत बदल करणे होय. जेव्हा प्रशासन पारदर्शक, उत्तरदायी आणि लोकाभिमुख होईल, तेव्हाच सरकारी धोरणे सामाजिक परिवर्तनाचे खरे साधन ठरतील. राजकीय इच्छाशक्ती आणि प्रशासकीय तत्परता यांचा मेळ घातल्यास भारत 'सुप्रशासना' (Good Governance) कडे वेगाने वाटचाल करू शकेल.

निष्कर्ष :

१. सरकारी स्तरावर आखलेली धोरणे अत्यंत उत्तम आणि प्रगत असली, तरी प्रशासकीय शिथिलतेमुळे त्यांचा अपेक्षित परिणाम तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचत नाही. धोरणनिर्मिती आणि प्रत्यक्ष कृती यामध्ये मोठी तफावत आहे.

२. ज्या क्षेत्रांमध्ये प्रशासकीय पारदर्शकता अधिक आहे आणि जिथे 'ई-गव्हर्नन्स'चा प्रभावी वापर केला जातो, तिथे सामाजिक बदलाची आणि विकासाची गती इतर क्षेत्रांच्या तुलनेत अधिक असल्याचे स्पष्ट होते. तंत्रज्ञानामुळे भ्रष्टाचाराला आळा बसून कामात वेग आला आहे.

३. प्रशासकीय संरचनेत 'वरिष्ठ-कनिष्ठ' अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये अनेकदा विसंवाद असल्याचे आढळते. धोरणांचे स्पष्ट आदेश खालील स्तरापर्यंत न पोहोचल्यामुळे किंवा अंमलबजावणीतील त्रुटी वरिष्ठांपर्यंत न कळवल्यामुळे धोरणे अपयशी ठरतात.

४. कोणतेही प्रशासकीय धोरण केवळ सरकारी आदेशांनी यशस्वी होऊ शकत नाही. जोपर्यंत त्यामध्ये जनतेचा सक्रिय सहभाग असत नाही, तोपर्यंत ते धोरण केवळ कागदोपत्रीच उरते. लोकांशी असलेला प्रशासनाचा संपर्क हाच धोरणाच्या यशाचा खरा निकष आहे.

५. अनेक ठिकाणी स्थानिक राजकीय हस्तक्षेपामुळे प्रशासकीय निर्णयांची गती मंदावते. सामाजिक बदलासाठी राजकीय इच्छाशक्ती आणि प्रशासकीय तत्परता या दोन्ही गोष्टींचा योग्य समन्वय असणे अत्यंत आवश्यक आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

६. क्षेत्रीय स्तरावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये (उदा. तलाठी, ग्रामसेवक) अनेकदा नवीन धोरणांच्या तांत्रिक बाजूंचे ज्ञान किंवा पुरेसे प्रशिक्षण नसते. यामुळे धोरण राबवताना अनेक तांत्रिक अडचणी निर्माण होतात, ज्याचा फटका थेट सर्वसामान्य नागरिकांना बसतो.

संदर्भ सूची :

1. एम. लक्ष्मीकांत, Public Administration (सार्वजनिक प्रशासन), मॅकग्रॉ हिल एज्युकेशन, नवी दिल्ली, (आवृत्ती २०२१).
2. रुमकी बसू, Public Administration: Concepts and Theories (सार्वजनिक प्रशासन: संकल्पना आणि सिद्धांत), स्टर्लिंग पब्लिशर्स, नवी दिल्ली, (आवृत्ती २०१८).
3. बी. एल. फडिया आणि कुलदीप फडिया, Public Administration in India (भारतीय सार्वजनिक प्रशासन), साहित्य भवन पब्लिकेशन्स, आग्रा, (आवृत्ती २०२०).
4. शाम शिरसाट आणि जितेंद्र वसावे, सार्वजनिक प्रशासन, ज्ञानज्योत प्रकाशन, पुणे, (आवृत्ती २०१७).
5. सुहास पळशीकर, भारतीय लोकशाही: राजकारण आणि समाज, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, (आवृत्ती २०१४).
6. भारतीय प्रशासकीय सुधारणा आयोग (Second Administrative Reforms Commission - ARC), 'दुसरा अहवाल: सामाजिक भांडवल आणि सुप्रशासन', भारत सरकार, नवी दिल्ली, (२००९).
7. महाराष्ट्र शासन, 'महसूल आणि वन विभाग वार्षिक अहवाल (२०२३-२०२४)', शासकीय मुद्रणालय, मुंबई.
8. लोकसत्ता (संपादकीय लेख), 'प्रशासकीय सुधारणांची गरज आणि आव्हाने', मुंबई आवृत्ती, २० ऑक्टोबर २०२५.
9. सकाळ (विशेष लेख), 'डिजिटल प्रशासन आणि सामाजिक परिवर्तन', लेखक: डॉ. विजय पानसरे, पुणे आवृत्ती, १५ जानेवारी २०२६.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

बाळासाहेब देसाई यांचे पाटण मतदारसंघातील विकासातील नेतृत्व

प्रियांका आबासो शिंदे
संशोधक विध्यार्थिनी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
Email: shinde301292@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180211
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 51-54
February- 2026
Submitted: 07 Jan. 2026
Revised: 17 Jan. 2026
Accepted: 04 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश:

बाळासाहेब देसाई हे पाटण मतदारसंघातील एक प्रभावी व दूरदृष्टी असलेले नेते होते. त्यांनी आपल्या नेतृत्वातून या भागाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांनी शेती, पाणीपुरवठा, सिंचन योजना आणि ग्रामीण पायाभूत सुविधांच्या उभारणीवर विशेष भर दिला. त्यामुळे शेतकऱ्यांची उत्पादनक्षमता वाढली आणि आर्थिक स्थितीत सुधारणा झाली. रस्ते, वीज आणि पाणी यांसारख्या मूलभूत सुविधांचा विकास करून त्यांनी गावागावांत प्रगतीचा मार्ग खुला केला.

शिक्षण आणि सहकार क्षेत्रातही त्यांनी मोलाचे योगदान दिले. शाळा, महाविद्यालये आणि सहकारी संस्था स्थापन करून त्यांनी स्थानिक लोकांना रोजगार व शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या. एकूणच, बाळासाहेब देसाई यांचे नेतृत्व पाटण मतदारसंघाच्या विकासासाठी निर्णायक ठरले आणि त्यांच्या कार्यामुळे हा भाग सामाजिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला.

पारिभाषिक शब्द : *लोकप्रतिनिधी, लोकभिमुख विकास, विकेंद्रीकरण, पुनर्वसन*

प्रस्तावना:

संसदीय लोकशाहीत लोकप्रतिनिधी हा शासन आणि जनता यांच्यातील महत्त्वाचा दुवा असतो. महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धडाडीचे नेतृत्व म्हणून लोकनेते बाळासाहेब देसाई यांची ओळख आहे. सातारा जिल्ह्यातील पाटण हा त्यांचा मतदारसंघ सह्याद्रीच्या दुर्गम दऱ्याखोऱ्यांनी आणि कोयनेच्या जलाशयाने वेढलेला होता. १९४१ पासून सुरू झालेला त्यांचा प्रवास सत्ताप्राप्तीसाठी नसून जनसामान्यांच्या कल्याणासाठीचा लढा होता. बाळासाहेबांनी मांडलेले 'लोकभिमुख प्रतिमान' हे केवळ भौतिक विकासाचे नव्हे, तर ग्रामीण माणसाच्या आर्थिक-सामाजिक सक्षमीकरणाचे सूत्र होते. 'डोंगर तेथे रस्ता' या ब्रीदवाक्यातून त्यांनी दळणवळणाची क्रांती घडवून दुर्गम वाड्या-वस्त्यांना मुख्य प्रवाहाशी जोडले. त्यांनी प्रशासकीय कौशल्याच्या जोडीला शिक्षणाचे जाळे आणि सहकारी चळवळीचा पाया रचून आधुनिक पाटणचा कायापालट केला. प्रस्तुत शोधनिबंधात बाळासाहेब देसाई यांच्या याच विकास संकल्पनांचा आणि त्यांच्या आदर्श लोकप्रतिनिधी म्हणून असलेल्या कारकिर्दीचा चिकित्सक आढावा घेण्यात आला आहे.

संशोधन उद्दिष्टे :

- बाळासाहेब देसाई यांच्या 'लोकभिमुख' विकास प्रतिमानाचा अभ्यास करणे.
- पाटण मतदारसंघातील पायाभूत सुविधा विकासातील त्यांच्या योगदानाचे मूल्यमापन करणे.
- १९६७ च्या कोयना भूकंपावेळच्या त्यांच्या पुनर्वसन कार्याचा आढावा घेणे.
- सहकारी चळवळीतून त्यांनी घडवलेल्या आर्थिक क्रांतीचे विश्लेषण करणे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
प्रियांका आबासो शिंदे, संशोधक विध्यार्थिनी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

How to cite this article:
शिंदे, . प्रियांका . आबासो . (*2026).* बाळासाहेब देसाई यांचे पाटण मतदारसंघातील विकासातील नेतृत्व. *Journal of Research & Development, 18(2(XXI)), 51–54. https://doi.org/10.5281/zenodo.19535502*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19535502
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

विषय विवेचन :

लोकनेते बाळासाहेब देसाई यांनी पाटण मतदारसंघाच्या विकासासाठी राबवलेले 'लोकभिमुख विकास प्रतिमान' हे जनसामान्यांच्या प्रगतीचे एक दूरगामी मॉडेल होते. या प्रतिमानाचे मुख्य तीन स्तंभ म्हणजे पायाभूत सुविधा, आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक सक्षमीकरण. 'डोंगर तेथे रस्ता' या ब्रीदवाक्यातून त्यांनी दुर्गम वाड्या-वस्त्यांना मुख्य प्रवाहाशी जोडून दळणवळणाची क्रांती घडवली. हा मार्ग केवळ वाहतुकीचा साधन नसून आरोग्य, शिक्षण आणि बाजारपेठेचा महामार्ग ठरला. आर्थिक सक्षमीकरणासाठी त्यांनी मरळी येथे कोयना सहकारी साखर कारखान्याची स्थापना करून शेतीला व्यावसायिक स्वरूप दिले, ज्यामुळे ग्रामीण अर्थकारणाला गती मिळाली. शिक्षणमंत्री म्हणून त्यांनी घेतलेला मोफत शिक्षणाचा निर्णय आणि कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठाची स्थापना यांमुळे शैक्षणिक क्रांती झाली. १९६७ च्या कोयना भूकंपावेळी त्यांनी केलेले संवेदनशील पुनर्वसन कार्य त्यांच्या लोकभिमुख नेतृत्वाचा कळस होता. थोडक्यात, सत्तेचा वापर तळागाळातील माणसाच्या न्यायासाठी कसा करावा, याचा आदर्श म्हणजे बाळासाहेब देसाईंचे विकास प्रतिमान होय.

लोकनेते बाळासाहेब देसाई यांनी पाटण मतदारसंघातील पायाभूत सुविधांच्या विकासात दिलेले योगदान हे आधुनिक महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासाचा एक वस्तुपाठ आहे. त्यांनी रस्ते, शिक्षण आणि पाणी या तीन मूलभूत क्षेत्रांत केलेल्या कार्याचे मूल्यमापन करताना, त्यांच्यातील एक द्रष्टा लोकप्रतिनिधी आणि कणखर प्रशासक प्रकर्षाने दिसून येतो.

रस्ते विकासातील क्रांती: बाळासाहेबांच्या कार्याचे सर्वात महत्त्वाचे मूल्यमापन म्हणजे त्यांनी डोंगरदऱ्यातील दुर्गम गावांसाठी राबवलेली 'डोंगर तेथे रस्ता' ही मोहीम. सह्याद्रीच्या कठीण पाषाणात रस्ते बांधणे हे तांत्रिक आणि आर्थिकदृष्ट्या मोठे आव्हान होते. मात्र, रस्ता हा विकासाचा प्राण आहे ही त्यांची पक्की धारणा होती. त्यांनी केवळ मुख्य मार्गांवर लक्ष न देता, वाड्या-वस्त्यांपर्यंत जाणारे पांधन रस्ते आणि ग्रामीण मार्गांचे जाळे विणले. यामुळे कोयना आणि कांदाटी खोऱ्यातील शेकडो वर्षांचा संपर्क तुटलेली गावे मुख्य प्रवाहाशी जोडली गेली. त्यांच्या या कार्यामुळेच शेतीमालाला बाजारपेठ मिळाली आणि दळणवळण सुलभ झाले, ज्याचे फळ आजच्या विकसित पाटणमध्ये दिसून येते.

शिक्षण क्षेत्रातील दूरदृष्टी: पायाभूत सुविधांमध्ये मानवी भांडवल विकसित करण्यासाठी त्यांनी शिक्षणाला सर्वाधिक महत्त्व दिले. महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री असताना त्यांनी गरीब विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षणाचा ऐतिहासिक निर्णय घेतला, ज्याचे प्रतिबिंब पाटणमध्येही उमटले. त्यांनी डोंगरभागातील खेड्यापाड्यात प्राथमिक व माध्यमिक शाळांचे जाळे निर्माण केले. केवळ इमारती बांधून ते थांबले नाहीत, तर ग्रामीण भागातील मुला-मुलींना उच्च शिक्षणाची संधी मिळावी यासाठी महाविद्यालयांची स्थापना केली. कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठ स्थापन करण्यामागील त्यांची भूमिका ही पश्चिम महाराष्ट्रातील शैक्षणिक पायाभूत सुविधांचे सर्वात मोठे यश मानले जाते. यामुळे ग्रामीण भागातील शैक्षणिक पिढी घडण्यास मोठी मदत झाली.

पाणीपुरवठा आणि जलव्यवस्थापन: दुर्गम डोंगराळ भागात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर होता. महिलांना मैलोन्मैल पाण्यासाठी वणवण करावी लागत असे. बाळासाहेबांनी या प्रश्नावर मात करण्यासाठी नळपाणी पुरवठा योजनांना प्राधान्य दिले. कोयना धरणाच्या विस्तीर्ण जलसाठ्याचा उपयोग स्थानिक गावांच्या पिण्याच्या पाण्यासाठी आणि शेतीसाठी कसा करता येईल, यावर त्यांनी भर दिला. त्यांनी केवळ नळ योजनाच नव्हे, तर शेतीसाठी छोटे पाझर तलाव आणि उपसा जलसिंचन योजनांना प्रोत्साहन दिले, ज्यामुळे पावसावर अवलंबून असलेली शेती अधिक शाश्वत झाली.

बाळासाहेब देसाई यांच्या या त्रिसूत्री विकासाचे मूल्यमापन करताना असे लक्षात येते की, त्यांचे कार्य केवळ 'सरकारी कंत्राटां'पुरते मर्यादित नव्हते. त्यांनी रचलेला पायाभूत सुविधांचा पाया हा शाश्वत विकासावर आधारित होता. ज्या काळात संसाधने कमी होती, त्या काळात त्यांनी आपल्या प्रशासकीय वचकाचा वापर करून निधी खेचून आणला आणि कामाचा दर्जा राखला. आज पाटणमध्ये दिसणारी रस्ते, शाळा आणि पाणीपुरवठा केंद्रांची व्यवस्था ही बाळासाहेबांच्या त्या काळातील संघर्षाची फलश्रुती आहे. एका दुर्गम तालुक्याला आधुनिकतेच्या वाटेवर आणण्यासाठी त्यांनी दिलेले हे योगदान ऐतिहासिक आणि अतुलनीय आहे.

१९६७ च्या भीषण कोयना भूकंपाच्या नैसर्गिक आपत्तीवेळी लोकनेते बाळासाहेब देसाई यांनी केलेले कार्य हे एका संवेदनशील लोकप्रतिनिधी आणि कणखर प्रशासकाचा वस्तुपाठ मानले जाते. ११ डिसेंबर १९६७ रोजी झालेल्या या महाप्रलयंकारी भूकंपामुळे कोयनानगरसह संपूर्ण पाटण तालुका उद्ध्वस्त झाला होता. अशा संकटकाळी बाळासाहेबांनी केवळ मंत्रालयातून आदेश न सोडता, स्वतः जमिनीवर उतरून पुनर्वसनाची जी धुरा सांभाळली, तिचा आढावा घेणे संशोधनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

तातडीची मदत आणि प्रत्यक्ष सहभाग: भूकंपाची बातमी समजताच बाळासाहेब देसाई तातडीने पाटणमध्ये दाखल झाले. त्यावेळी दळणवळणाची साधने विस्कळीत झाली असतानाही त्यांनी डोंगरदऱ्यांतील बाधित गावांपर्यंत पोहोचून लोकांना धीर दिला. हजारो लोक बेघर झाले होते आणि थंडीच्या दिवसात उघड्यावर होते. बाळासाहेबांनी युद्धपातळीवर लष्कर, पोलीस आणि महसूल यंत्रणेला

A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

ही डिजिटल तफावत केवळ तांत्रिक नसून ती सामाजिक न्यायाच्या तत्त्वाला बाधा आणणारी आहे. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर याचा थेट परिणाम होतो, ज्यामुळे त्यांच्या भविष्यातील व्यावसायिक संधी आणि करिअरच्या वाटा मर्यादित होतात. प्रगत तंत्रज्ञानाच्या अभावामुळे हे विद्यार्थी स्पर्धेच्या युगात मागे पडण्याची भीती निर्माण झाली आहे. म्हणूनच, ही दरी नेमकी किती मोठी आहे, ती विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि बौद्धिक विकासावर कसा परिणाम करते आणि ती सांधण्यासाठी कोणते प्रभावी मार्ग असू शकतात, याचा साकल्याने अभ्यास करणे ही काळाची गरज बनली आहे. प्रस्तुत संशोधन याच ज्वलंत प्रश्नाचा वेध घेण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

१. दुर्गम भागातील शाळांमध्ये उपलब्ध असलेल्या डिजिटल पायाभूत सुविधांचा आढावा घेणे.
२. इंटरनेट कनेक्टिव्हिटीच्या अभावामुळे शिक्षकांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.
३. डिजिटल संसाधनांच्या उपलब्धतेचा विद्यार्थ्यांच्या श्रेणीवर होणारा परिणाम तपासणे.
४. डिजिटल दरी कमी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना सुचवणे.

विषय विवेचन :

दुर्गम भागातील शाळांमध्ये उपलब्ध असलेल्या डिजिटल पायाभूत सुविधांचा आढावा घेणे, हा या संशोधनाचा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू आहे. सद्यस्थितीत 'डिजिटल इंडिया' मोहिमेतंर्गत ग्रामीण आणि दुर्गम भागातील शाळांचे संगणकीकरण करण्यावर भर दिला जात असला, तरी वास्तवात या सुविधांची उपलब्धता आणि त्यांची कार्यान्वितता यामध्ये मोठी तफावत दिसून येते. दुर्गम भागातील शाळांमध्ये उपलब्ध असलेल्या सुविधांचा आढावा घेताना प्रामुख्याने हार्डवेअर उपलब्धता, वीजपुरवठा आणि देखभालीची स्थिती या तीन स्तरांवर विचार करणे आवश्यक ठरते. अनेक दुर्गम शाळांमध्ये शासन, सामाजिक संस्था किंवा लोकसहभागातून संगणक संच, लॅपटॉप किंवा टॅबलेट्स पुरवण्यात आले आहेत. काही ठिकाणी 'स्मार्ट क्लासरुम'च्या नावाखाली प्रोजेक्टर आणि स्क्रीनची व्यवस्थाही करण्यात आली आहे. मात्र, उपलब्ध असलेल्या या उपकरणांची संख्या विद्यार्थ्यांच्या पटसंख्येच्या तुलनेत अत्यंत अल्प असते. एका वर्गात ४० ते ५० विद्यार्थी असताना केवळ एक किंवा दोन संगणक संच असणे, ही 'डिजिटल उपलब्धता' कागदोपत्री साजरी करण्यासाठी पुरेशी असली, तरी प्रत्यक्ष शिक्षणाच्या प्रक्रियेत ती अपुरी पडते. या डिजिटल पायाभूत सुविधांच्या कार्यान्विततेसाठी आवश्यक असणारी वीज यंत्रणा हा सर्वात मोठा अडथळा ठरतो. दुर्गम भागातील अनेक शाळांमध्ये अजूनही अखंडित वीजपुरवठा उपलब्ध नाही. दिवसातील मोठा काळ भारनियमन असल्यामुळे महागडी डिजिटल उपकरणे वापरता येत नाहीत. काही शाळांनी सौर ऊर्जेचा पर्याय निवडला आहे, परंतु बॅटरी बॅकअपची समस्या किंवा तांत्रिक बिघाड झाल्यास दुरुस्तीसाठी लागणारा खर्च आणि तंत्रज्ञांची अनुपलब्धता यामुळे या सुविधा 'पांढरा हत्ती' ठरत आहेत. देखभाल आणि दुरुस्ती या सुविधेचा आढावा घेणे आवश्यक आहे. शहरात एखादा संगणक बिघडल्यास तो २४ तासात दुरुस्त होऊ शकतो, मात्र दुर्गम पाड्यातील शाळेसाठी तंत्रज्ञाला बोलावणे ही खर्चिक आणि वेळखाऊ प्रक्रिया असते. परिणामी, एकदा बिघडलेले उपकरण वर्षानुवर्षे बंद स्थितीत पडून राहते. तसेच, अनेक शाळांमध्ये संगणक लॅबसाठी स्वतंत्र आणि सुरक्षित खोलीची कमतरता असल्याने पावसाळ्यात गळतीमुळे किंवा चोरीच्या भीतीमुळे या उपकरणांचे नुकसान होण्याची शक्यता असते. थोडक्यात, दुर्गम भागातील शाळांमध्ये डिजिटल पायाभूत सुविधांची 'प्रवेश उपलब्धता' काही प्रमाणात निर्माण झाली असली, तरी त्यांची 'वापरक्षमता' आजही शून्यवत आहे. केवळ यंत्रे पुरवून ही क्रांती यशस्वी होणार नाही, तर त्यासाठी स्थानिक पातळीवर वीज, सुरक्षितता आणि तांत्रिक साहाय्य यांसारख्या पायाभूत घटकांचे सक्षमीकरण करणे अनिवार्य आहे.

इंटरनेट कनेक्टिव्हिटीच्या अभावामुळे शिक्षकांना येणाऱ्या अडचणी :

दुर्गम भागातील डिजिटल दरीचा अभ्यास करताना 'इंटरनेट कनेक्टिव्हिटी' हा सर्वात निर्णायक घटक ठरतो. आजचे आधुनिक शिक्षण पूर्णपणे क्लाउड-आधारित झाले असल्याने, इंटरनेटचा अभाव हा शिक्षकांसाठी केवळ तांत्रिक अडथळा नसून तो त्यांच्या अध्यापन प्रक्रियेतील मोठा अडसर ठरला आहे.

शैक्षणिक सामग्रीच्या वापरावरील मर्यादा

सध्याच्या शिक्षण पद्धतीत 'दीक्षा' (DIKSHA), ई-बालभारती आणि युट्यूब यांसारख्या प्लॅटफॉर्मवर दर्जेदार व्हिडिओ आणि ई-साहित्य उपलब्ध आहे. मात्र, दुर्गम भागात इंटरनेटची गती अत्यंत कमी (सहसा 2G किंवा 3G) असल्याने हे व्हिडिओ वर्गात 'बफर' न होता दाखवणे शिक्षकांसाठी अशक्य होते. यामुळे शिक्षक केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित राहतात आणि विद्यार्थ्यांना दृश्य स्वरूपातील शिक्षणापासून वंचित राहावे लागते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

प्रशासकीय आणि ऑनलाईन कामाचा ताण

शालेय कामकाजात आता 'सरल' (SARAL) प्रणाली, 'यु-डायस' (U-DISE), विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती आणि मध्यान्ह भोजनाची माहिती ऑनलाईन भरावी लागते. इंटरनेट कनेक्टिव्हिटी नसल्यामुळे शिक्षकांना हे काम शाळेच्या वेळेत करता येत नाही. परिणामी, शिक्षकांना अनेकदा डोंगर चढून जिथे रेंज आहे तिथे जावे लागते किंवा सुट्टीच्या दिवशी तालुक्याच्या गावी जाऊन ही कामे करावी लागतात. याचा थेट परिणाम त्यांच्या अध्यापनाच्या गुणवत्तेवर आणि मानसिकतेवर होतो.

व्यावसायिक विकासातील अडथळे

शिक्षकांसाठी आयोजित करण्यात येणारे प्रशिक्षण आणि वेबिनार आता बहुतांशी ऑनलाईन स्वरूपात असतात. दुर्गम भागातील शिक्षकांना इंटरनेटअभावी या प्रशिक्षणांमध्ये सक्रिय सहभाग घेता येत नाही. नवीन शैक्षणिक धोरणे, तंत्रज्ञान आणि अध्यापन पद्धतींची माहिती त्यांना वेळेवर मिळत नाही, ज्यामुळे ते शहरी भागातील शिक्षकांच्या तुलनेत तंत्रज्ञानाच्या बाबतीत मागे पडतात.

मूल्यमापन आणि निकालातील विलंब

विद्यार्थ्यांचे अंतर्गत मूल्यमापन आणि कल चाचण्यांचे निकाल ऑनलाईन पोर्टलवर नोंदवणे अनिवार्य असते. इंटरनेटच्या लपंडावामुळे माहिती अपलोड करताना वारंवार 'एरर' येतात. अनेकदा भरलेली माहिती 'सेव्ह' न झाल्यामुळे शिक्षकांना तेच काम वारंवार करावे लागते, ज्यामुळे त्यांचा अमूल्य वेळ वाया जातो.

इंटरनेट कनेक्टिव्हिटीचा अभाव हा केवळ तांत्रिक बिघाड नाही, तर तो शिक्षकांच्या सर्जनशीलतेला मर्यादा घालणारा घटक आहे. जोपर्यंत दुर्गम भागातील शाळांपर्यंत 'ऑप्टिकल फायबर' किंवा 'सॅटेलाईट इंटरनेट' पोहोचत नाही, तोपर्यंत शिक्षकांना या डिजिटल युगात प्रभावीपणे काम करणे आव्हानात्मकच राहील.

डिजिटल संसाधनांच्या उपलब्धतेचा विद्यार्थ्यांच्या श्रेणीवर होणारा परिणाम

डिजिटल संसाधनांची उपलब्धता आणि विद्यार्थ्यांची शैक्षणिक श्रेणी यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. आधुनिक शिक्षण पद्धतीत केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून, क्लिष्ट संकल्पना समजून घेण्यासाठी डिजिटल साधनांची मदत महत्त्वाची ठरते.

अमूर्त संकल्पनांचे सुस्पष्ट आकलन

विज्ञानातील प्रयोग, भूगोलातील भौगोलिक हालचाली किंवा गणितातील त्रिमिती रचना यांसारख्या 'अमूर्त' संकल्पना केवळ फळ्यावर समजून सांगणे कठीण असते. ज्या शाळांमध्ये डिजिटल संसाधने (उदा. प्रोजेक्टर, 3D ॲनिमेशन) उपलब्ध आहेत, तिथे विद्यार्थ्यांना या संकल्पनांचे दृश्य स्वरूपात आकलन होते. संशोधनानुसार, दृश्य स्वरूपातील माहिती विद्यार्थ्यांच्या दीर्घकाळ स्मरणात राहते, ज्याचा सकारात्मक परिणाम त्यांच्या परीक्षेत मिळणाऱ्या गुणांवर आणि श्रेणीवर दिसून येतो.

स्वयं-अध्ययनाची संधी

डिजिटल संसाधने उपलब्ध असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या गतीने शिकण्याची संधी मिळते. वर्गात शिक्षकांनी शिकवलेला भाग न समजल्यास, विद्यार्थी ई-साहित्याचा वापर करून तो पुन्हा पुन्हा पाहू शकतात. याउलट, दुर्गम भागातील विद्यार्थी जिथे तंत्रज्ञान नाही, तिथे पूर्णपणे शिक्षकांवर अवलंबून असतात. स्वयं-अध्ययनाच्या अभावामुळे कठीण विषयांत या विद्यार्थ्यांची श्रेणी घसरताना दिसते.

बहुआयामी व्यक्तिमत्व विकास आणि श्रेणी सुधार

डिजिटल साक्षरता असणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये माहिती शोधण्याची वृत्ती निर्माण होते. यामुळे त्यांचा सामान्य ज्ञानाचा परीघ विस्तारतो. भाषा विषयांमध्ये ऑडिओ-व्हिज्युअल साधनांमुळे त्यांचे उच्चारण आणि संवाद कौशल्य सुधारते. परीक्षेच्या निकालात केवळ विषयाचे गुणच वाढत नाहीत, तर त्यांच्या एकूण श्रेणीमध्ये लक्षणीय सुधारणा झालेली आढळते.

स्पर्धात्मक परीक्षेची तयारी आणि न्यूनगंड

शहरी भागातील विद्यार्थी विविध ऑनलाईन सराव चाचण्यांच्या माध्यमातून स्वतःचे मूल्यमापन करत असतात. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना या सुविधा न मिळाल्यास, त्यांना स्वतःच्या कमतरता कळत नाहीत. डिजिटल संसाधनांच्या अभावामुळे हे विद्यार्थी स्पर्धेत मागे पडतात, ज्यामुळे त्यांच्या श्रेणीवर आणि आत्मविश्वासावर विपरीत परिणाम होतो.

ज्या शाळांमध्ये डिजिटल संसाधनांचा नियमित आणि योग्य वापर होतो, तिथल्या विद्यार्थ्यांच्या सरासरी श्रेणीमध्ये (Average Grade) २०% ते ३०% वाढ झाल्याचे विविध अभ्यासातून दिसून आले आहे. याउलट, संसाधने असूनही केवळ इंटरनेट किंवा विजेअभावी ती वापरता येत नसतील, तर विद्यार्थ्यांच्या श्रेणीवर अपेक्षित परिणाम दिसून येत नाही.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

डिजिटल दरी कमी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना

दुर्गम भागातील डिजिटल दरी केवळ तांत्रिक साधनांनी सांधता येणार नाही, तर त्यासाठी एक बहुआयामी आणि स्थानिक परिस्थितीला पूरक असा दृष्टिकोन असणे आवश्यक आहे.

सौर ऊर्जा आधारित डिजिटल वर्गखोल्या

दुर्गम भागात विजेचा लपंडाव ही सर्वात मोठी समस्या आहे. यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून प्रत्येक शाळेला सौर ऊर्जा संच आणि बॅटरी बॅकअप उपलब्ध करून देणे अनिवार्य आहे. यामुळे भारनियमनाच्या काळातही डिजिटल उपकरणे अखंडितपणे चालू राहू शकतील आणि सरकारचा विजेवरील खर्चही कमी होईल.

'ऑफलाईन' ई-लर्निंग सामग्रीचा विकास

इंटरनेट कनेक्टिव्हिटीवर पूर्णपणे अवलंबून न राहता, 'ऑफलाईन' डिजिटल सामग्री शाळांना पुरवली पाहिजे. सर्व शैक्षणिक व्हिडिओ, पाठ्यपुस्तके आणि सराव चाचण्या स्थानिक सर्व्हरवर किंवा मेमरी कार्डमध्ये लोड करून दिल्या तर इंटरनेटशिवायही विद्यार्थी टॅब्लेट किंवा संगणकावर अभ्यास करू शकतील.

उपग्रह आधारित इंटरनेट

ज्या दुर्गम भागात मोबाईल टॉवर्स उभारणे कठीण आहे, तिथे सॅटेलाईट इंटरनेट (उदा. स्टार्लिंक किंवा बी.एस.एन.एल. सॅटेलाईट सेवा) हा उत्तम पर्याय ठरू शकतो. डोंगरदऱ्यात किंवा घनदाट जंगलात असलेल्या शाळा थेट उपग्रहाद्वारे इंटरनेटशी जोडल्या जाऊ शकतात, ज्यामुळे कनेक्टिव्हिटीची समस्या कायमची सुटू शकेल.

शिक्षक आणि पालकांचे डिजिटल सक्षमीकरण

केवळ उपकरणे देऊन उपयोग नाही, तर ती वापरण्याचे कौशल्य शिक्षकांकडे असणे आवश्यक आहे. दुर्गम भागातील शिक्षकांसाठी विशेष तांत्रिक कार्यशाळा आयोजित करणे आणि त्यांना 'डिजिटल मेंटॉर' म्हणून विकसित करणे गरजेचे आहे. तसेच, पालकांनाही तंत्रज्ञानाचे महत्त्व समजावून सांगितल्यास ते विद्यार्थ्यांच्या डिजिटल अध्ययनाला घरातून पाठबळ देऊ शकतील.

मोबाइल लॅब आणि फिरती डिजिटल केंद्रे

एकाच वेळी सर्व शाळांमध्ये सुविधा देणे शक्य नसल्यास, तालुक्याच्या स्तरावर 'फिरती संगणक प्रयोगशाळा' ही संकल्पना राबवता येईल. एका बसमध्ये १०-१५ संगणक आणि इंटरनेटची सोय करून ही बस आठवड्यातून एकदा दुर्गम भागातील वेगवेगळ्या शाळांना भेट देऊ शकते, ज्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष हाताळणीचा अनुभव मिळेल.

पीपीपी मॉडेल

कॉर्पोरेट कंपन्यांच्या सामाजिक जबाबदारी निधीचा वापर करून दुर्गम शाळांचे डिजिटल रुपांतर करता येईल. कंपन्यांनी केवळ उपकरणे न देता, त्यांच्या देखभालीची जबाबदारी पाच वर्षांसाठी स्वीकारल्यास या सुविधेचे सातत्य टिकून राहील.

डिजिटल दरी कमी करणे म्हणजे केवळ तंत्रज्ञान पोहोचवणे नव्हे, तर शिक्षणाच्या संधींचे लोकशाहीकरण करणे होय. जेव्हा दुर्गम भागातील शेवटच्या रांगेतील विद्यार्थ्यालाही हाय-स्पीड इंटरनेट आणि आधुनिक साधने मिळतील, तेव्हाच 'डिजिटल इंडिया'चे स्वप्न खऱ्या अर्थाने साकार होईल.

निष्कर्ष

केवळ संगणक, टॅबलेट किंवा प्रोजेक्टरचे वाटप केल्याने डिजिटल दरी सांधली जात नाही. या उपकरणांना चालवण्यासाठी आवश्यक असणारी ऊर्जा आणि माहिती मिळवण्यासाठी आवश्यक असणारे माध्यम (इंटरनेट) तितकेच महत्त्वाचे आहे. दुर्गम भागातील वीज टंचाईवर मात करण्यासाठी सौर ऊर्जा हा एकमेव शाश्वत पर्याय आहे. तसेच, भौगोलिक अडथळ्यांमुळे जिथे केबल पोहोचू शकत नाही, तिथे उपग्रह इंटरनेट (Satellite Internet) सारख्या अत्याधुनिक पर्यायांचा विचार करणे अनिवार्य आहे. जोपर्यंत 'पायाभूत सुविधा' आणि 'उपलब्धता' यांचा मेळ बसत नाही, तोपर्यंत डिजिटल साधनांचा शैक्षणिक वापर मर्यादितच राहील. डिजिटल दरी सांधण्यात शिक्षकांची भूमिका कळीची आहे. मात्र, शिक्षकांना केवळ संगणक चालू-बंद करण्याचे प्रशिक्षण देऊन उपयोग नाही. इंटरनेट नसतानाही 'ऑफलाईन' मोडमध्ये ई-साहित्य, शैक्षणिक ॲप्स आणि सॉफ्टवेअर्सचा वापर कसा करावा, याचे विशेष प्रशिक्षण त्यांना मिळणे गरजेचे आहे. शिक्षकांचे तांत्रिक सक्षमीकरण हेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे मुख्य साधन ठरू शकते.

इंटरनेट कनेक्टिव्हिटीचा अभाव हा दुर्गम भागातील शैक्षणिक प्रगतीमधील 'स्पीड ब्रेकर' ठरत आहे. इंटरनेटअभावी विद्यार्थ्यांना जगातील अद्ययावत ज्ञानापासून वंचित राहावे लागते, तर शिक्षकांना प्रशासकीय कामात अडथळे येतात. ही दरी केवळ शैक्षणिक नसून ती भविष्यात आर्थिक आणि सामाजिक असमानता निर्माण करणारी ठरू शकते. त्यामुळे, दुर्गम भागातील इंटरनेट सुविधा सुधारणे हा केवळ तांत्रिक प्रश्न नसून तो विद्यार्थ्यांच्या मूलभूत शैक्षणिक अधिकाराचा भाग आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

संदर्भ सूची :

१. कडू, एम. एस. (२०२२). *डिजिटल इंडिया आणि ग्रामीण शिक्षण*. पुणे: डायमंड पब्लिकेशन्स.

२. डॉ. भोसले, एस. आर. (२०२१). *दुर्गम भागातील शिक्षण: आव्हाने आणि संधी*. कोल्हापूर: फडके प्रकाशन.

३. महाराष्ट्र शासन, शिक्षण विभाग. *'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' उपक्रम अहवाल (२०२३-२४)*.

४. युनेस्को (UNESCO). 'Bridging the Digital Divide: Global Perspectives'. शैक्षणिक अहवाल २०२३.

५. इंटरनॅशनल जर्नल ऑफ एज्युकेशनल रिसर्च. 'Impact of ICT in Rural Schools'. खंड १५, अंक २.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

हिंदी आदिवासी कवियों की सामाजिक चेतना

डॉ. किरण सदानंद भोसले
अध्यक्ष हिंदी विभाग, यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, कोल्हापुर
Email: kiranbhosale1610@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180218
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 84-87
February- 2026
Submitted: 07 Jan. 2026
Revised: 17 Jan. 2026
Accepted: 04 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

पांच हजार वर्ष पूर्व से मौखिक रुप में आये साहित्य की विरासत संभालते हुए आदिवासी साहित्यिक आज भारत की हर मुख्य भाषाओं के साहित्य का सौष्ठव बढ़ा रहा है। आदिवासी समुदायों की सांस्कृतिक धरोहर उनके इस साहित्य में स्पष्ट रूप में झलकती है। सहजता, सरलता, निष्कपट एवं करुणामयी दृष्टि से वह सारी सृष्टि को अपनाता है। उसे सहेजकर रखना, उसे उन्नत बनाना ही उनकी सामाजिक चेतना का मूल विचार है। हिंदी आदिवासी कवि एवं कवयित्रियों की कविताओं में यहीं सामाजिक चेतना प्रकट होती है। अपनी समुदायों की सामाजिक, आर्थिक, पारिवारिक एवं अन्य समस्याओं का समाधान वह प्रजातांत्रिक पद्धति से ही करना चाहते हैं। वह अपने संवैधानिक मानवाधिकार के प्रति सजग होकर भी अपने उलगुलान या विद्रोह को प्रजातांत्रिक साधनों खडा करते हैं। जो मानव कल्याण के साथ साथ प्रकृति और सृष्टि के अन्य जीवों के जीवित अधिकार को प्रबल समर्थन देती है।

बीज शब्द: *आदिवासी - आदिवासी समुदायों में जन्मे, सामाजिक चेतना - समाज के प्रति दृष्टिकोण, उलगुलान - आदिवासी समुदायों के आंदोलन।*

प्रस्तावना

लगभग पांच हजार वर्ष पूर्व से मौखिक साहित्य की विरासत संभालते हुए आदिवासी साहित्यिक आज भारत की मुख्य सभी भाषाओं में अपनी प्रतिभा बिखेर रहें हैं। मनुष्य जिस परिवेश में जन्म लेता है, जिस परिवेश में पलता है उसका प्रभाव उसके हर गतिविधियों पर होता ही है। आदिवासी समुदाय ज्यादातर जंगल, पहाडी और प्राकृतिक परिवेश में पलता है। इसलिए उनकी सामाजिक भावना उसी परिवेश से प्रभावित ही नहीं बल्कि प्रेरित भी होती है। आदिवासी साहित्य में यहीं सामाजिक चेतना उनकी भावाभिव्यक्ति पर छायी हुई दिखाई देती है। हिंदी आदिवासी कवियों में रामदयाल मुंडा, अनुज लुगुन, ग्रेस कुजूर, महादेव टोप्पो, ओली मिंच, ज्योति लकडा, आलोका कुजूर, जसिन्ता केरकेट्टा, नितिशा खलखो, निर्मला पुतुल, शिशिर टुडू, शिवलाल किस्कू, रोज केरकेट्टा, सरोज केरकेट्टा, ग्लेडसन डुंगडुंग, सरस्वती गागराई और सरिता सिंह बड़ाइक आदि महत्वपूर्ण कवि माने जाते हैं। जिन्होंने अपनी कविताओं से आदिवासी समुदायों के भाव विश्व को गहराई से चित्रित किया है। हिंदी आदिवासी कवियों की सामाजिक चेतना निम्न विशेषताओं से स्पष्ट की जा सकती है -

प्रकृति और समाज:

आदिवासी समुदायों का निवास प्रकृति की गोद में रहता है। इसलिए वह लोग प्रकृति को अपने सबसे निकटवर्ती रिश्तेदार की तरह समझते हैं।

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. किरण सदानंद भोसले, अध्यक्ष हिंदी विभाग, यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, कोल्हापुर

How to cite this article:
भोसले, . किरण . सदानंद . (2026). हिंदी आदिवासी कवियों की सामाजिक चेतना. *Journal of Research & Development, 18(2(XXI)), 84–87. https://doi.org/10.5281/zenodo.19535895*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19535895
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

प्रकृति को माँ, बाप और आराध्य भी मानते हैं। उनकी हर तरह की गतिविधियों पर प्रकृति का प्रभाव होता है। वह प्रकृति के परे अपने जीवन की कल्पना भी नहीं कर सकते। प्रकृति से इतना जुड़ाव उनके भाव विश्व का और सामाजिक चेतना का एक सबसे महत्वपूर्ण और अहम अंग है। आदिवासी समाज अपनी प्राकृतिक जीवन शैली में जीवन यापन करता है। सीधा साधारण रहन सहन आदिवासी समाज की पहचान है। उनके मन में भी उतना ही सीधा और सरल भाव रहता है। विचारों और आचरण में निर्मल पारदर्शिता होती है। जो प्रकृति का एक कल्याणकारी गुण माना जाता है। कवि रामदयाल मुंडा 'सूखी नदी/ भरी नदी' कविता में कहते हैं -

"सूखी नदी
एक व्यथा-कहानी
जब था पानी
तब था पानी!
भरी नदी
एक सीधी कहानी
ऊपर पानी, नीचे पानी।"[1]

कवि ने यहाँ नदी के माध्यम से प्रकृति की कहानी और उसकी पारदर्शिता बताते हुए आदिवासी जीवन की व्यथा और पारदर्शिता को अंकित किया है। जो भरी नदी की तरह ऊपर पानी, नीचे पानी जैसा सतही पारदर्शी और निर्मल होता है। आदिवासी समुदायों के जीवन दर्शन की इस विशेषता का यहाँ कवि ने नदी के माध्यम से मार्मिक चित्रण किया है। समाज के प्रति यहीं पारदर्शिता हिंदी आदिवासी कवियों में दिखाई देती है।

आदिवासी हिंदी कवि एवं कवयित्रियों ने अपने समुदायों की सभी समस्याओं की बहुत दारुण पीड़ा का चित्रण किया है। जिसमें समाज की मुख्य धारा में स्थान ना मिलना, आदिवासी होने के कारण अपमानित होना, आधुनिकता के चलते बेरोजगारी, जमीन एवं घर छिन जाना, अपने परिवेश में अन्यों का अमानवीय हस्तक्षेप, उनके रहन सहन का मजाक उड़ाना, भाषा का मज़ाक उड़ाना, उनकी प्रगति से जलन होना, सामुदायिक सम्मान ना मिलना, पढ़ाई नौकरी में समानता ना मिलना, शहरों की संस्कृति से संघर्ष आदि सामाजिक समस्याओं का चित्रण मिलता है।

जल, जमीन, जंगल अर्थात् प्रकृति की रक्षा

आदिवासी समुदायों की बस्तियाँ प्रकृति की गोद होती है। यहीं प्रकृति उनकी दुनिया है। वह उसमें शांति एवं सुकून से रहना पसंद करते हैं। उनकी इस दुनिया में आधुनिकता के नाम पर अन्य समाज ने ज़बरदस्ती से हस्तक्षेप किया है। उनकी जल, जमीन और जंगलों पर कब्जा कर उन्हें नष्ट भ्रष्ट कर और विकृत बनाकर अपने स्वार्थ साधे हैं। इसलिए आदिवासी हिंदी कवि, कवयित्रियों में इसके प्रति बहुत ही कड़ा विद्रोह दिखाई देता है। हर एक ने इस अतिक्रमण का करारा जवाब देने की पहल की है। 'हे समय के पहरेदारों' कविता में कवयित्री ग्रेस कुजूर ने जल, जंगल और जमीन अर्थात् प्रकृति के संहार के बारे में एक बहुत ही अहम सवाल पूछा है कि 'हे समय के पहरेदारो! एक वृक्ष के बदले एक वृक्ष लगाया सुना होगा लेकिन क्या एक पर्वत के बदले दूसरा पर्वत उगाओगे?" यह सवाल आधुनिक मानव मन को आत्म परिक्षण के लिए मजबूर करने वाली खीज पैदा करता है। जो इस आधुनिक समाज की 'वृक्षारोपण योजना' की पोलखोल करता है। वृक्ष लगाकर प्रकृति का पूर्ण रक्षण संभव नहीं बल्कि संपूर्ण प्रकृति को बचाये रखने का आदिवासी समुदायों का विचार हमें आगे बढाना होगा। नहीं तो परिणाम अगली पीढ़ी को भुगतने पड़ेंगे। यह चेतावनी देते कवयित्री ग्रेस कहती हैं -

"इसीलिए फिर कहती हूँ
न छेड़ो प्रकृति को
अन्यथा यही प्रकृति
एक दिन माँगेगी हमसे
तुमसे अपनी तरुणाई का
एक-एक क्षण और करेगी
भयंकर बगावत और तब
न तुम होगे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

न हम होंगे !"[2]

यह प्रवृत्ति हर एक आदिवासी हिंदी कवि और कवयित्री में समान रूप में दिखाई देती है। जो अपने आदिवासी समुदायों के अस्तित्व के साथ जल, जंगल, जमीन और संपूर्ण प्राकृतिक संसाधनों की रक्षा के लिए चिंतित हैं। यहीं उनकी समाज के प्रति संवरदना भी है कि वह इस बात के अत्यधिक महत्व को समझ लें। ताकि मानवीय समाज पर प्राकृतिक संकटों की भरमार नहीं हो।

स्त्रियों का सम्मान

भारतीय साहित्य में स्त्रियों का चित्रण केवल सौंदर्य और कोमल कांता के रुप में ही हुआ है। इसमें कोई दोराय नहीं की कुछ आधुनिक काल में आते आते साहित्य में नारी सम्मान की बात हुई। उसके अन्य गुणों से अधिक सौंदर्य और कोमलता को ही अंकित किया गया। लेकिन आदिवासी कवियों में स्त्री के अपने सही रुप में चित्रित करने की ओर उनकी सहज और सरल प्रवृत्ति दिखाई देती है। वह सम्मान करने हेतु यह लिख रहा है, ऐसी बात ही नहीं है। बल्कि आदिवासी समाज की एक प्रवृत्ति के कारण यह सहज अभिव्यक्ति हुई है। आदिवासी समुदायों में स्त्री स्वतंत्र और सम्मानित उतनी ही थी जितने पुरुष। इस लिए रमणीका गुप्ता कहती हैं, "आदिवासियों में बलात्कार की परम्परा है ही नहीं।"[3] यह वाक्य आदिवासी समुदायों के सामाजिक इतिहास को सामने रखता है। अतः हम कह सकते हैं कि आदिवासी समाज में स्त्रियों की अन्य समस्याएं यह केवल अन्य आधुनिक समाज के संपर्क के कराण पनपी है। फिर भी आदिवासी कवियों ने अनमेल विवाह, स्त्री भ्रूण हत्या, महिलाओं के श्रम की प्रतिष्ठा, पुरुष प्रधानता में उसका शोषण और प्रकृति से स्त्री की समानता का वर्णन किया है। आदिवासी स्त्री समाज के हर संघर्ष में पुरुषों के साथ कंधे से कंधा मिलाकर उतरती है। यहीं वर्णन करते हुए कवि अनुज लुगुन अपनी 'उलगुलान की औरतें' कविता में लिखते हैं -

"दुःस्वप्नों के लिए उन्होंने अपने जूड़े में
खोंस रखा है साहस का फूल
कानों में उम्मीद को
बालियों की तरह पिरोया है
धरती को सर पर घड़े की तरह ढोए
लचकती हुई चली जा रही हैं
उलगुलान' की औरतें
धरती से प्यार करने वालों के लिए
उतनी ही खूबसूरत
और उतनी ही खतरनाक
धरती के दुश्मनों के लिए !"[4]

स्त्री सौंदर्य का यह मार्मिक चित्रण और वर्णन हिंदी आदिवासी कवियों और कवयित्रियों की सामाजिक चेतना का चंदन की तरह महकता गुण है। जो भारतीय समाज को स्तरीयता प्रदान करने में भी सक्षम है।

संघर्षरत मानवाधिकार के लिए

आदिवासी कवियों ने अपने सभी प्रजातांत्रिक अधिकारों का प्रयोग करना सीख लिया है। जो अब हर मंच का उपयोग प्रयोग करके अपने विचार प्रकट करना चाहता है। लेकिन वह केवल अपने हित और सुख की बात ना करते हुए पूरी प्राकृतिक सामग्री के लिए संघर्ष करता नजर आता है। कवि महादेव टोप्पो अपनी 'प्रजातन्त्र में' शीर्षक कविता मे यह भाव प्रकट करते हुए लिखते हैं -

"अपनों के लिए
भाषा, संस्कृति बचाने के साथ
रोटी के लिए जूझता
जल, जंगल, जमीन, पेड़ बचाता"5

सभी आदिवासी हिंदी कवि और कवयित्री भारतीय संविधान ने दिए सभी मानवाधिकार से अब परिचित हैं। और उनका उपयोग और प्रयोग करना भी जानते हैं। मगर वह केवल आदिवासी समुदायों की समस्याओं को दूर करने के लिए प्रयास नहीं करते बल्कि पूरे भारत

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

देश तथा विश्व के मानवीय समाज के साथ साथ पूरी प्रकृति के लिए भी लड पडते दिखाई देते हैं। आदिवासी हिंदी कवि एवं कवयित्रियाँ मानव समाज के मानवाधिकारों के लिए एवं प्रकृति के सभी जीवों के जीवित अधिकारों के लिए संघर्षरत हैं। उनकी कविताओं का यह सौंदर्य पक्ष है।

निष्कर्ष

उपर्युक्त विवेचन से यह स्पष्ट है कि आदिवासी हिंदी कवियों एवं कवयित्रियों ने मानव समाज की व्यवस्था को मूल्यवान बनाने की सामाजिक दृष्टि रखी है। अपने संवैधानिक मानवीय अधिकारों के प्रति जागरूकता आने के बावजूद वह प्रजातांत्रिक मार्ग से अपनी लड़ाई लड़ना चाहते हैं। सहजता से उनकी कविताओं में प्रकृति और मानव के सहसंबंध चित्रित होते हैं। प्रकृति प्रेम में मानव समाज भी समाहित होकर आता ही है। लेकिन फिर भी अलग से सामाजिक चेतना भी दिखाई देती है। जिसमें अपने सामाजिक न्याय की प्रजातांत्रिक माँग के साथ समाज में फैले जातिवाद, धर्मवाद, लिंग भेद और राजनीतिक स्वार्थपरकता के विरुद्ध उलगुलान किया गया है। अतः समता, स्वतंत्रता, सामाजिक न्याय एवं बंधुता यहीं उनकी सामाजिक चेतना का सही रुप है। जो आज के युग में बहुत प्रासंगिक लगता है।

संदर्भ

1. गुप्ता रमणिका (सम्पा), कलम को तीर होने दो, वाणी प्रकाशन, नयी दिल्ली, प्रथम संस्करण, 2015, पृष्ठ क्र. 30.
2. वहीं पृष्ठ क्र. 107.
3. वहीं पृष्ठ क्र. 07.
4. वहीं पृष्ठ क्र. 57.
5. वहीं पृष्ठ क्र. 123.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

कोकण आणि कोकणातील मच्छिमार समाजावर झालेले जागतिकीकरण आणि सांस्कृतिक परिवर्तन: एक अभ्यास

अनिकेत आदिनाथ कोंडाजी
Ph.D. Research Scholar, संलग्नता: राजीव गांधी समकालीन अध्ययन केंद्र, मुंबई विद्यापीठ
Email: kondajianiket401@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180219
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 88-93
February- 2026
Submitted: 07 Jan. 2026
Revised: 17 Jan. 2026
Accepted: 04 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश:

कोकण प्रदेश हा महाराष्ट्रातील महत्त्वाचा सागरी पट्टा असून येथील मच्छिमार समाजाची उपजीविका, सामाजिक रचना आणि सांस्कृतिक ओळख पारंपरिक समुद्राधारित अर्थव्यवस्थेवर आधारलेली आहे. परंतु विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सुरू झालेल्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने कोकणातील मत्स्यव्यवसायात तसेच मच्छिमार समाजाच्या जीवनपद्धतीत मूलभूत परिवर्तन घडवून आणले आहे. आधुनिक मासेमारी तंत्रज्ञान, निर्याताभिमुख बाजारपेठा, बंदरविकास, औद्योगिकीकरण आणि पर्यटनवाढ यांमुळे उत्पादनक्षमता वाढली असली, तरी त्याचबरोबर आर्थिक विषमता, पारंपरिक उपजीविकेवरील ताण, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय समस्या तीव्र झाल्या आहेत.

या अभ्यासाचा उद्देश कोकणातील मच्छिमार समाजावर झालेले जागतिकीकरण व सांस्कृतिक परिणाम समजून घेणे हा आहे. प्रस्तुत संशोधनात मत्स्यव्यवसायातील तांत्रिक बदल, बाजारपेठांशी वाढलेली जोडणी, स्थलांतर, सामाजिक संस्था आणि सांस्कृतिक जीवनातील बदल यांचा अभ्यास करण्यात आला आहे. विशेषतः उपजीविकेतील बदल, स्त्रीभूमिकांतील परिवर्तन, पिढीगत मूल्यसंघर्ष तसेच पारंपरिक सण-उत्सव, श्रद्धा व सामूहिक जीवनपद्धतींवर झालेला परिणाम यांचा चिकित्सक आढावा या संशोधनात घेण्यात आला आहे. गुणात्मक संशोधन पद्धतीच्या आधारे क्षेत्र भेटी, मुलाखती आणि दुय्यम स्रोतांचा वापर करण्यात आला आहे. अभ्यासातून असे दिसून येते की जागतिकीकरणामुळे काही प्रमाणात आर्थिक संधी निर्माण झाल्या असल्या, तरी सांस्कृतिक एकरूपता, स्थानिक ज्ञानाचा ऱ्हास आणि सामाजिक असमतोल यांसारखी आव्हानेही निर्माण झाली आहेत. त्यामुळे कोकणातील मच्छिमार समाजाच्या शाश्वत विकासासाठी आर्थिक प्रगतीबरोबरच सांस्कृतिक जतन आणि पर्यावरणीय संवर्धन यांचा समतोल साधणे अत्यावश्यक आहे.

कळीचे शब्द (keyword): *जागतिकीकरण, मच्छिमार समाज, सांस्कृतिक परिवर्तन, मत्स्यव्यवसाय, कोकण किनारपट्टील जीवनपद्धती*

प्रस्तावना

कोकण प्रदेश हा महाराष्ट्राचा सुमारे 877.97 कि.मी. लांबीचा सागरी किनारपट्टीचा प्रदेश असून येथील सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवन समुद्राशी अतूटपणे जोडलेले आहे. कोकणातील मच्छिमार समाज हा पारंपरिक ज्ञान, अनुभव आणि सामूहिक जीवनपद्धतीवर आधारित समाज म्हणून ओळखला जातो. मासेमारी ही केवळ उपजीविकेचे साधन नसून ती एक सांस्कृतिक ओळख, धार्मिक श्रद्धा आणि सामाजिक संघटनाची प्रक्रिया आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
अनिकेत आदिनाथ कोंडाजी, Ph.D. Research Scholar, संलग्नता: राजीव गांधी समकालीन अध्ययन केंद्र, मुंबई विद्यापीठ

How to cite this article:
कोंडाजी, . अनिकेत . आदिनाथ . (2026). कोकण आणि कोकणातील मच्छिमार समाजावर झालेले जागतिकीकरण आणि सांस्कृतिक परिवर्तन: एक अभ्यास. Journal of Research & Development, 18(2(XXI)), 88–93. https://doi.org/10.5281/zenodo.19535949

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19535949
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

मात्र विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सुरू झालेल्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने कोकणातील या पारंपरिक समाजरचनेत मोठ्या प्रमाणावर बदल घडवून आणले.

महाराष्ट्रातील कोकण किनारपट्टी हा पारंपरिक मत्स्यव्यवसायासाठी ओळखला जाणारा प्रदेश आहे. किनारपट्टी विकासाशी संबंधित मोठ्या पायाभूत प्रकल्पांनीही स्थानिक समाजरचनेवर प्रभाव टाकला आहे. बंदर विकास, औद्योगिकीकरण आणि पर्यटनामुळे रोजगाराच्या नव्या संधी निर्माण झाल्या, परंतु त्याचवेळी पारंपरिक उपजीविका पद्धतींवर दबाव वाढला. या परिस्थितीत तरुण पिढीच्या रोजगाराच्या निवडींमध्ये बदल होत असून मत्स्यव्यवसायातील पिढीजात सातत्य कमी होत असल्याचे आढळते.

प्रस्तुत संशोधन कोकणातील मच्छिमार समाजाच्या अनुभवांच्या आधारे जागतिकीकरणामुळे झालेल्या आर्थिक आणि सांस्कृतिक परिवर्तनांचे विश्लेषण करते. उपजीविका पद्धती, तंत्रज्ञानाचा स्वीकार, स्थलांतर, सामुदायिक संस्था आणि सांस्कृतिक ओळख यांमधील बदलांचा परस्परसंबंध या अभ्यासात तपासला आहे. हा अभ्यास किनारपट्टी समाजांच्या विकासाविषयीच्या व्यापक चर्चेत योगदान देण्याचा प्रयत्न करतो.

संशोधनाचे उद्दिष्टे:

- कोकणातील मच्छिमार समाजाची पारंपारिक, सामाजिक व सांस्कृतिक रचना अभ्यासणे.
- जागतिकीकरणामुळे मत्स्यव्यवसायात झालेले आर्थिक व तांत्रिक बदल समजून घेणे.
- सांस्कृतिक परिवर्तनाचे स्वरूप (उत्सव, श्रद्धा, मूल्ये, जीवनशैली) विश्लेषित करणे.
- स्त्री-पुरुष भूमिकांतील व पिढीगत संबंधांतील बदलांचा अभ्यास करणे.
- शाश्वत विकासाच्या दृष्टीने धोरणात्मक सूचना मांडणे.

संशोधन पद्धती:

या अभ्यासासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

- प्राथमिक स्रोत: क्षेत्रीय निरीक्षणे, मुलाखती, चर्चासत्रे
- दुय्यम स्रोत: शासकीय अहवाल, संशोधन लेख, पुस्तके, मासिके
- विश्लेषण पद्धती: समाजशास्त्रीय व सांस्कृतिक विश्लेषण

कोकणातील मच्छिमार समाज: पारंपरिक रचना

कोकण किनारपट्टीवरील मच्छिमार समाज हा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आर्थिकदृष्ट्या महत्वाचा समुदाय आहे. सिंधूदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यामध्ये हा समाज मोठ्या प्रमाणात आढळतो. पारंपरिक मच्छिमार समाजाची रचना ही कुटुंब, व्यवसाय, जात-समुदाय व्यवस्था, परंपरा आणि स्थानिक स्वशासन या घटकावर आधारित होती.

१. सामाजिक रचना - कोकणातील मच्छिमार समाजात प्रामुख्याने खालील पारंपरिक समुदाय आढळतात.
कोळी, आगरी, भंडारी, खारवी, गाबीत इ.

२. आर्थिक रचना - मच्छिमार समाजाची अर्थव्यवस्था प्रामुख्याने समुद्रावर आधारित उपजीविकेवर अवलंबून होती.
प्रमुख आर्थिक घटक: १. पारंपारिक होड्यांद्वारे मासेमारी २. जाळी तयार करणे व दुरुस्ती. ३. मासे विक्री (विशेषतः महिलांकडून). ४. मीठ तयार करणे. (काही भागात)

३. कुटुंब व लिंगाआधारित भूमिका - मच्छिमार समाजात कामाचे स्पष्ट विभाजन दिसून येते. १. पुरुषांची भूमिका - समुद्रात जाऊन मासेमारी करणे. होडी तयार करणे व देखभाल. २. महिलांची भुमिका - मासे वर्गिकरण व विक्री, जाळी दुरुस्ती, घर व्यवस्थापन.

४. पारंपारिक संस्था आणि नेतृत्व - पूर्वी गावात अनौपचारीक स्थानिक संस्था अस्तित्वात होत्या, कोळी पंचायत/समाज मंडळ, बोटिंचे गट, देवस्थान समित्या.

सांस्कृतिक जीवन:

कोकणातील मच्छिमार समाजाचे सांस्कृतिक जीवन हे समुद्र, निसर्ग आणि परंपरांशी घट्ट जोडलेले आहे. नारळी पौर्णिमा, समुद्रपूजा, होळी, शिमगा, स्थानिक देवतांची पूजा हे सांस्कृतिक जीवनाचे केंद्रबिंदू आहेत. त्यांच्या दैनंदिन जीवनात धार्मिक श्रद्धा, लोक

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

परंपरा, सण-उत्सव, भाषा आणि आहार यांचा महत्वपूर्ण प्रभाव दिसून येतो. समुद्र हा त्यांचा जीवनाचा केवळ उपजीविकेचा स्रोत नसून सांस्कृतिक ओळखीचा केंद्रबिंदू आहे.

तक्ता क्रं १.

- **जागतिकीकरणानंतर कोकणातील मच्छिमार समुदायामध्ये झालेले बदल.**



तक्ता क्रं २ कोकणातील जागतिकीकरण पूर्व व जागतिकीकरण नंतर बदलते स्वरूप दर्शवणारा तक्ता.

क्रं	घटक Indicater	जागतिकीकरण पूर्व स्थिती	जागतिकीकरण नंतर स्थिती	बदलते स्वरूप
१.	पारंपारिक मासेमारी	जास्त प्रमाणात	कमी प्रमाणात	तांत्रिक बदल
२.	यांत्रिक मासेमारी	मर्यादित	मोठ्या प्रमाणात	उत्पादन वाढ
३.	यांत्रिक बाजारपेठ	कमी प्रवेश	मोठा प्रवेश	बाजार पेठीकरण
४.	रोजगारासाठी स्थलांतर	कमी	वाढलेले	सामाजिक बदल
५.	महिलांचा सहभाग	मध्यम	वाढलेले	आर्थिक भूमिका

तक्ता क्रं – ३ रायगड जिल्ह्यातील कोळीवाड्यातील सर्वेक्षण आधारित माहिती तक्ता.

रायगड जिल्हा - वर्ष (२०२० - २५)

क्रं	गाव/कोळीवाडा	मासेमारी प्रकार	उत्पन्न बदल	मार्केट ऍक्सेस	स्थलांतर	सांस्कृतिक बदल	महिलांची सहभागीता
१.	रेवस	पारंपारिक	वाढ	स्थिर	कमी	कमी	जास्त
२.	थळ	पारंपारिक	वाढ	अधिक	स्थिर	स्थिर	जास्त
३.	नवगाव	पारंपारिक	वाढ	अधिक	स्थिर	कमी	स्थिर
४.	अलिबाग	आधुनिक	वाढ	अधिक	स्थिर	कमी	स्थिर
५.	रेवदंडा	पारंपारिक	वाढ	स्थिर	कमी	स्थिर	कमी

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

६.	कोरलई	पारंपारिक	घट	स्थिर	स्थिर	कमी	कमी
७.	नांदगाव	पारंपारिक	वाढ	स्थिर	कमी	स्थिर	स्थिर
८.	मुरुड	पारंपारिक	वाढ	स्थिर	स्थिर	स्थिर	जास्त
९	एकादरा	पारंपारिक	घट	स्थिर	जास्त	स्थिर	जास्त
१०.	राजपुरी	पारंपारिक	वाढ	स्थिर	कमी	कमी	जास्त
११.	दिघी	पारंपारिक	वाढ	कमी	जास्त	स्थिर	कमी
१२.	भरडखोल	पारंपारिक	वाढ	स्थिर	स्थिर	स्थिर	जास्त
१३.	आदगाव	पारंपारिक	घट	स्थिर	कमी	कमी	जास्त
१४.	जीवना	पारंपारिक	वाढ	अधिक	स्थिर	स्थिर	जास्त

सांस्कृतिक परिवर्तन: कोकणातील मच्छिमार समाजाचे सांस्कृतिक जीवन पारंपारिक श्रद्धा, लोकपरंपरा आणि समुद्राशी असलेल्या नात्यावर आधारित आहे. परंतु, शिक्षण, स्थलांतर, पर्यटन, तंत्रज्ञान आणि जागतिकिकारण यांच्या प्रभावामुळे या सांस्कृतिक जीवनात विविध प्रकारचे परिवर्तन होताना दिसते.

१. उत्सवांचे व्यापारीकरण:

या समाजात सण-उत्सव हे पारंपारिक धार्मिक आणि सामुदायिक जीवनाचा महत्वाचा भाग आहेत. परंतु, पर्यटन विकास, बाजारपेठेचा विस्तार आणि माध्यमांच्या प्रभावामुळे अनेक उत्सावांमध्ये व्यापारीकरण (Commercialization) दिसून येते. म्हणजेच सांस्कृतिक कार्यक्रमांसोबत आर्थिक व्यवहार आणि पर्यटनाशी संबंधित उपक्रम वाढले आहेत. नारळी पौर्णिमा व समुद्रपूजा पर्यटन कार्यक्रमांमध्ये रूपांतरित होत आहेत. पर्यटनासाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन, खाद्यपदार्थ व हस्तकला विक्री, स्टेज शो व स्पर्धा.. आधुनिक काळात उत्सवांचे स्वरूप बदलताना दिसून येते.

२. भाषा, वेषभूषा व आहार:

कोकणातील मच्छिमार समाजाची ओळख केवळ त्यांच्या व्यवसायातून होत नाही, तर त्यांच्या भाषा, वेशभूषा आणि आहार संस्कृती या सांस्कृतिक घटकामधून होते. समुद्राशी असलेले नाते आणि स्थानिक पर्यावरण यांचा या सांस्कृतिक रचनेवर मोठा प्रभाव दिसून येतो. स्थानिक बोलीभाषा व पारंपरिक आहारावर जागतिक संस्कृतीचा प्रभाव दिसून येतो.

वेशभूषा: मच्छिमार समाजाची पारंपारिक वेशभूषा ही कामाच्या स्वरूपाशी सुसंगत आणि साधी असते. पुरुषांची वेशभूषा: धोतर/रुमाल, अर्धी बनियान किंवा शर्ट, डोक्यावर पारंपारिक टोपी/कापड. महिलांची वेशभूषा: नऊवारी साडी (विशेषतः कोळी समाजात), साधे दागिने, कामासाठी सोयीस्कर साडी नेसण्याची पद्धत, ही वेशभूषा समुद्रकिनाऱ्यावरील श्रमप्रधान जीवनशैलीशी जुळणारी आहे. सण - उत्सवांमध्ये मात्र पारंपारिक पोशाख अधिक सजऊन परिधान केला जातो.

आहार संस्कृती: कोकणातील मच्छिमार समाजाचा आहार हा समुद्री अन्नावर आधारित आहे. आहारात प्रमुख अन्न घटक - तांदूळ (भात), मासे (ताजे आणि सुकविलेले), नारळ, कोकम, भाजीपाला तसेच लोकप्रिय पदार्थ जसे माशांची आमटी, तळलेले मासे, सुक्या माशांची चटणी, भात-मासे हे मुख्य आहार आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

आव्हाने व समस्या:

मच्छिमार समाज हा समुद्रावर आधारित पारंपारिक उपजीविकेवर अवलंबून असल्यामुळे त्याला, विविध आर्थिक, पर्यावरणीय आणि सामाजिक आव्हानांना सामोरे जात आहे. बदलत्या हवामान, तंत्रज्ञान आणि बाजारपेठेच्या परिस्थितीमुळे या समस्या अधिक गुंतागुंतीच्या होत चालल्या आहेत.

- आर्थिक आव्हाने
- सामाजिक आव्हाने

शाश्वत विकासासाठी सूचना व उपाय:

- शाश्वत मत्स्यव्यवस्थापन:
- पर्यावरण संरक्षण:
- आर्थिक सक्षमीकरण:
- शिक्षण व कौशल विकास:
- तंत्रज्ञानाचा समतोल वापर:

शिफारशी:

- **शाश्वत मत्स्यव्यवस्थापन धोरण**: १. मासेमारी हंगाम आणि जाळ्यांच्या वापराबाबतनियमांची प्रभावी अमलबजावणी २. लहान मच्छिमारांसाठी संरक्षणात धोरणे तयार करणे.
- **आर्थिक सक्षमीकरण:** १. सहकारी संस्थांना आर्थिक व तांत्रिक मदत देणे. २. पर्यायी रोजगारनिर्मिती कार्यक्रम राबवणे. ३. थेट विक्री प्रणाली विकसित करणे.
- **शिक्षण व कौशल्य विकास:** १. मच्छिमार कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना वाढवणे २. युवकांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम राबवणे. ३. समुद्र सुरक्षा आणि मासेमारी तंत्रज्ञाचाचे प्रशिक्षण देणे.
- **महिलांचे सक्षमीकरण:** १. महिलांना स्वयं-सहायता गटांना आर्थिक सहाय्य देणे. २. निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढवणे.
- **सांस्कृतिक जतन आणि संवर्धन:** १. पारंपारिक लोककला आणि सणांचे दस्तऐवजीकरण करणे. २. पर्यटन विकास करताना स्थानिक संस्कृतीचे संरक्षण करणे. ३ समुदाय आधारित सांस्कृतिक कार्यक्रमाना प्रोत्साहन देणे.
- **पर्यावरण संरक्षण:** १. कांदलवन संरक्षण आणि किनारी परिसंस्था संवर्धन कार्यक्रम राबवणे. २. समुद्री प्रदूषण नियंत्रणसाठी स्थानिक सहभाग वाढवणे. ३. हवामान बदला संधर्भात जगारूकता निर्माण करणे.
- **धोरणात्मक समन्वय:** १. मत्स्यव्यावसाय, पर्यटन आणि पर्यावरण धोरणामध्ये समन्वय ठेवणे. २ शासकीय योजना आणि मच्छिमार समाज यांच्यातील संवाद वाढवणे. ३. स्थानिक स्वराज्य संस्था आणि सहकारी संघटनाना बळकटी देणे.

निष्कर्ष:

जागतिकीकरणामुळे कोकणातील मच्छिमार समाजाला आर्थिक संधी उपलब्ध झाल्या असल्या, तरी त्याबरोबरच सामाजिक-सांस्कृतिक आणि पर्यावरणीय संकटेही वाढली आहेत. त्यामुळे भविष्यातील विकास प्रक्रिया शाश्वत, समावेशक व सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील असणे अत्यावश्यक आहे. कोकणातील मच्छिमार समाजाचा विकास हा केवळ आर्थिक निकषांवर नव्हे, तर सामाजिक न्याय, सांस्कृतिक जतन आणि पर्यावरणीय समतोल या तत्त्वांवर आधारित असावा. पूर्वी पूर्णपणे समुद्रकेंद्रित असलेली अर्थव्यवस्था आता विविध उपजीविकांच्या दिशेने विस्तारत आहे. त्याच बरोबर बाजारपेठेच्या प्रभावामुळे उत्सवांचे व्यापारीकरण स्वरूप विकसित होत आहे.

त्याच वेळी हवामान बदल, मत्स्यसंपत्तीतील घट, किनारी प्रदूषणआणि आर्थिक अस्थिरता ही गंभीर आव्हाने समाजासमोर उभी आहेत. या पार्श्वभूमीवर शाश्वत मत्स्यव्यवस्थापन, पर्यावरण संरक्षण, शिक्षण व कौशल्य विकास आणि सहकारी संस्थांचे बळकटीकरण ही विकासाची आवश्यक दिशा ठरते. एकूणच, कोकणातील मच्छिमार समाजात जागतिकिकरणामुळे परंपरा आणि आधुनिकता यांचा समन्वय साधणारी सांस्कृतिक संक्रमण प्रक्रिया दिसून येते. या प्रक्रियेत सांस्कृतिक ओळख जपत आर्थिक आणि सामाजिक प्रगती साधने हे भविष्यातील विकासाचे प्रमुख आव्हान आणि संधी या दोन्ही आहेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

संदर्भ सूची:

1. Government of Maharashtra. (2018). Marine Fisheries Report. Mumbai
2. जैन, नीरज, पुणे (२००२). जागतिकीकरण की गुलामगिरी,
3. कांबळे, उत्तम (संपा.) (२०१३). जागतिकीकरनातील सांस्कृतिक संघर्ष
4. Appadurai, A. (1996). Modernity at large: Cultural dimensions of globalization. University of Minnesota Press.
5. Varshney, Ashutosh, Mumbai (2017) Globalisation in Retreat
6. Ministry of Fisheries, Animal Husbandry and Dairying. (2021). Handbook on fisheries statistics. Government of India.
7. Nayak, P. K. (2017). Understanding small-scale fisheries governance in India. Maritime Studies, 16(1), 1–20. https://doi.org/10.1186/s40152-017-0060-0
8. United Nations. (2015). Transforming our world: The 2030 agenda for sustainable development. United Nations.
9. World Bank. (2012). Hidden harvest: The global contribution of capture fisheries. World Bank.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

भारतीय कृषी व अर्थव्यवस्थेवरील परिणाम

डॉ. रमेश महादेवराव भगत
रा. सुं. बिडकर महाविद्यालय, हिंगणघाट, जि. वर्धा
Email: mahashanti.bhagat@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180220
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 94-96
February- 2026
Submitted: 07 Jan. 2026
Revised: 17 Jan. 2026
Accepted: 04 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश:

भारतात स्वातंत्र्यानंतर औद्योगिकरण वाढले असले तरीही शेती क्षेत्राचा हिस्सा फार कमी झालेला नाही. एखाद्या वर्षी भारतात शेतीच्या पिकाचे नुकसान झाल्यास संपूर्ण अर्थव्यवस्थेत असंतुलन निर्माण होते. भविष्यात आर्थिक विकासाची गती वाढून शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण कमी होणार असले तरीही भारताचा आर्थिक विकास हा पुष्कळ प्रमाणात शेतीवर अवलंबून असल्याने शेतीचे महत्व जास्त राहणार हे उघड आहे. भारतात 1951 पासून पंचवार्षिक योजनेला सुरवात झाली. एक- दोन पंचवार्षिक योजना सोडल्या तर भारतातील सर्व पंचवार्षिक योजनेमध्ये शेतीला महत्व दिलेले आहे. विकसित देशाचा विकास विचारात घेता त्या देशांनी सर्वात प्रथम आपल्या कृषी क्षेत्राचा विकास केला होता व नंतर त्यांनी औद्योगीकरणाला सुरवात केली. याप्रमाणेच भारताला विकसीत होण्याकरीता आधी कृषीक्षेत्राचा विकास करणे गरजेचे आहे. भरतीय शेती क्षेत्रासमोर स्वतःचा विकास करण्यासोबत देशाचा आर्थिक विकास करण्याची अनुकूलता उपलब्ध आहे. शेतीच्या विकासाबरोबर त्यावर आधारित सर्व उद्योगधंद्याचा विकास होऊन देशाचा आर्थिक विकास होऊ शकतो. कृषीक्षेत्रावर पडणारा परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारा असतो. एखाद्या देशाची अर्थव्यवस्था ही वस्तू व सेवांच्या उत्पादन व वापरत्या पद्धतीवरून ठरते.

मुख्यशब्द: *भारत संदर्भात: कृषी उत्पादन, अर्थव्यवस्था, GDP (स्थूल देशांतर्गत उत्पादन), शेतकरी उत्पन्न, रोजगारनिर्मिती, ग्रामीण विकास, सिंचन व्यवस्था, तंत्रज्ञानाचा वापर*

प्रस्तावना

भारताची अर्थव्यवस्था कृषीप्रधान आहे. कृषी, वने व मत्स्य या तिघांचा अंतर्भाव भारतीय कृषी या विषयाअंतर्गत होतो. भारतीय जनतेच्या उदरनिर्वाहाचे सर्वात मोठे क्षेत्र म्हणजे कृषी होय. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या भांडवल निर्मितीत कृषी क्षेत्राचा वाटा 1950-51 मध्ये 17.7 टक्के होता. कृषीक्षेत्र भारतातील सर्वात मोठे मुक्त खाजगी क्षेत्र आहे. तसेच सर्वात मोठे व असंघटित क्षेत्र आहे. कृषी व्यवसाय हा एकच असा प्रमुख व्यवसाय आहे. ज्याच्यावर आयकर आकारला जात नाही. स्वातंत्र्यपूर्व काळातील कृषी वरील अवलंबित्व सध्या कमी झाले आहे. मात्र एकंदर देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी कृषी क्षेत्राचा विकास महत्वाचा आहे. कृषी क्षेत्रातील विकास देशाच्या उद्योग व सेवा क्षेत्रांच्या विकासासाठी मदतरूप ठरतो. भारतातील 70 टक्क्याहून अधिक लोक कृषी व संलग्न क्षेत्रावर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रीतीने अवलंबून होते. 2001 च्या जनगणनेनुसार देशातील रोजगारात कृषी व संलग्न क्षेत्राचा हिस्सा 58.2 टक्के आहे. कृषी क्षेत्राचा जीडीपी मधील वाटा कमी होणे म्हणजे अर्थव्यवस्थेतील सकारात्मक संरचनात्मक बदलाचे द्योतक आहे. भारतातील जास्तीत जास्त लोक कृषी व्यवसाय करतात. भारतातील लोकांचा मुख्य व्यवसाय कृषी असल्यामुळे अनेक प्रकारचे कृषी उत्पादन निर्यात केले जातात. भारत हा जगातील प्रमुख 15 कृषी वस्तूंच्या निर्यातक देशांमध्ये गणला जातो. भारतीय शेती विविध उद्योगांना लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा कृषीक्षेत्र मार्फत होत असतो. भारतीय शेती भारतातील वाढत्या लोकसंख्येला अन्नपुरवठा करण्याचे कार्य कृषी क्षेत्राकडून पार पाडले जाते.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. रमेश महादेवराव भगत, रा. सुं. बिडकर महाविद्यालय, हिंगणघाट, जि. वर्धा

How to cite this article:
भगत, . रमेश . महादेवराव . (2026). भारतीय कृषी व अर्थव्यवस्थेवरील परिणाम. Journal of Research & Development, 18(2(XXI)), 94–96. https://doi.org/10.5281/zenodo.19535998

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19535998
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

भारतीय शेती ही स्वातंत्र्यपूर्व काळात पारंपारिक व निर्वाह प्रकारची होती, असे दिसते. यामध्ये प्रामुख्याने खास पिकाचे उत्पादन काढण्यावर भर होता. यामुळे कृषीकडे व्यापारी दृष्टिकोनातून पाहिले जात नव्हते. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून कृषी क्षेत्राच्या विकासासाठी प्रयत्न केले आहेत. आपला भारत हा देश प्रामुख्याने कृषीप्रधान अर्थव्यवस्था असलेला देश आहे. आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेत कृषी क्रिया प्रक्रियांचा वाटा सुमारे 50 टक्के आहे. भारतातील लोक शेतीवरील अवलंबून असलेली अनेक कामे करून आपली उपजीविका करतात. हे शेतीवर अवलंबून असलेले उपक्रम आपल्या अर्थव्यवस्थेसाठी महत्वाचे आहेत. गेल्या काही दशकांमध्ये भारतीय अर्थव्यवस्थेत प्रचंड वाढ झाली आहे. जागतिक मानकांशी जुळण्यासाठी कृषी आणि संलग्न क्रियाप्रक्रिया प्रकल्पामध्येही सुधारणा करण्यात आल्या आहेत. आणि अनेक खादय उत्पादनांच्या निर्यातीत वाढ झालेली आहे. ज्यामुळे आर्थिक वाढ झाली आहे, त्याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम होत असल्याचे सिद्ध झाले आहे.

भारतीय अर्थव्यवस्था ही शेतकऱ्यांच्या उत्पादनावर आणि उत्पादन क्षेत्रावरती अवलंबून असल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आणि आत्मा शेतीस समजला जातो. भारतीय अर्थव्यवस्था ही शेतकऱ्यांच्या पीक उत्पादनाच्या वाढी वरती अवलंबून आहे. जगातील कोणत्याही राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत शेतीला महत्वाचे स्थान असते. वाढत्या आर्थिक विकासाबरोबर शेतीवरील लोकसंख्येचे अवलंबन कमी होत जाण्यात शेतीच्या विकासाचे महत्वाचे योगदान ठरते. देश विकसीत झाला तरी वाढत जाणाऱ्या लोकसंख्येच्या अन्नधान्याची आणि सातत्याने वाढत जाणाऱ्या विविध उद्योगांच्या कच्च्या मालाची गरज शेती क्षेत्राकडूनच पूर्ण होत असते. ज्याप्रमाणे पाठीचा कणा शरीराला आधार देतो. त्याप्रमाणे शेती क्षेत्रही अर्थव्यवस्थेला विविध प्रकारे आधार देन असते. शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबाना उदरनिर्वाहाचे साधन पुरवणे आणि कृषीमालाचा म्हणजेच अण्णाचा पुरवठा करणे ह्याद्वारे संपूर्ण अर्थव्यवस्थेला हा आधार मिळतो. आसमानी किंवा संकटामुळे कृषिमालाचा पुरवठा बाजारात कमी झाला किंवा शेतीतील कुटुंबांना पुरेसे उत्पन्न मिळेनासे झाले तर त्याचे पडसाद संपूर्ण अर्थव्यवस्थेमध्ये उमटतात म्हणूनच शेतीचा विकास अर्थव्यवस्थेला बळकटी देत असतो. गेल्या 75 वर्षांमध्ये आपण टंचाईकडून मुबलकतेकडे वाटचाल केली आहे. ही प्रगती स्पृहणीय आहे. परंतु प्रगतीचा आलेख बघत असतांना शेती प्रगतीचे मोजमाप केवळ अन्नधान्य उत्पादनाची पातळी नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. शेतीवर अवलंबून असलेल्या जनतेला आजही अनेक आव्हाने पेलावी लागतात. आजही शेतीकडे बेभरवशाचा व्यवसाय म्हणूनच बघितले जाते. अनेक पिकांचे सरासरी हेक्टरी उत्पादन इतर देशांच्या तुलनेत बरेच कमी आहे. 1950 च्या सुमारास अन्नधान्याचे एकूण वार्षीक उत्पादन 5 कोटी टन होते, आणि माणसी उपलब्धता 144 किलो इतकी होती. वाढत्या लोकसंख्येसाठी हे पुरेसे नव्हते आणि त्यामुळे आयातीवर अवलंबून राहण्याशिवाय पर्याय नव्हता. इतरही अनेक अन्नपदार्थांची टंचाई होती. तसेच दुष्काळाच्या काळात साठवणुकीतल्या अन्नधान्याचे जनतेमध्ये वाटप करण्याची अर्थव्यवस्थेमध्ये क्षमता नव्हती. 1960 च्या दशकात जास्त उत्पादन देणारे गव्हाचे आणि तांदळाचे सुधारित बीज मिळाले. 2020-21 या वर्षाच्या आकडेवारी नुसार अन्नधान्य उत्पादन 30 कोटी टनांपेक्षा जास्त आहे. तसेच अन्नधान्याची वार्षिक माणसी उपलब्धता 187 किलो इतकी आहे. आज सरकारकडे असलेला, अडीअडचणी साठी ठेवलेला अन्नधान्याचा साठाही ओसंडून वाहत आहे. कोव्हीड काळात देशातील सुमारे 80 कोटी लोकांना दरमहा मोफत 5 किलो धान्यपुरवठा ह्याच साठ्यातून झाला आहे.

हरितक्रांती नंतर फळे, भाज्या, नगदी पिके अशा इतर शेतमालाचे उत्पादन वाढू लागले. तसेच देशाच्या भौगोलीक वैविधतेचा फायदा होत देशातील वेगवेगळ्या भागांत विविध प्रकारची पिके घेऊन उत्पादनात वाढ करणे शक्य झाले. जसजसे सरासरी उत्पन्न आणि विविध उपभोग्य वस्तूची गरज वाढू लागली तसतसे अनेक प्रकारच्या शेतमालाचे आणि शेती संलग्न मालाचे उत्पादन वाढू लागले. लागवडीयोग्य जमिनीचे आकारमान बघता भारताचा जागतिक क्रमवारीत दुसरा क्रमांक आहे आणि अनेक पिकांच्या उत्पादनाच्या बाबतीन भारत पहिल्या अथवा दुसऱ्या क्रमांकावर पोहचला आहे. 2018 च्या आकडेवारीनुसार डाळींचे उत्पादन सर्वात जास्त भारतात होते, आणि तांदळाच्या व गव्हाच्या बाबतीत भारताचा क्रमांक दुसरा आहे. अनेक फळे आणि भाज्या तसेच दुधाचे उत्पादनही सर्वात जास्त भारतात होत आहे. शेतमालाची निर्यातही तुलनेने वाढली आहे. बासमती तांदूळ साखर मसाले आणि . काही प्राणीजन्य पदार्थ ह्या आपल्या महत्वाच्या निर्यातीच्या वस्तू आहेत. कोव्हीड काळात म्हणजे 2019 - 20 लगेचच नंतरच्या काळात शेतमालाची निर्यात कोव्हीडपूर्व काळाच्या तुलनेत मोठ्याा प्रमाणात वाढली. अनेक अविकसीत आणि काही विकसीत देशांमध्ये काही काळातील अडचणीमुळे अन्नधान्याचा तुटवडा जाणवत असल्याने मोठ्याा प्रमाणात भारतातून गहू, तांदूळ आणि इतर काही शेतमालाचा पुरवठा केला गेला. म्हणजेच आंतरराष्ट्रीय बाजाराशी आज आपले शेतकरी कुटुंब जोडले गेले आहे आणि देशांतर्गत नाही तर आंतरराष्ट्रीय मागणीही शेतीक्षेत्रातून पुरविली जात आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात शेती उत्पादनामध्ये वाढ होऊ लागली. परंतु हेही खरेच की शेती क्षेत्राच्या वाढीचा वार्षिक दर नेहमीच कमी म्हणजेच चार टक्क्याचा खालीच राहिला. त्या तुलनेत उद्योगधंद्यांच्या आणि सेवाक्षेत्राच्या वाढीचा सरासरी दर मात्र 5 टक्क्यांहून जास्त होता. तसेच गेल्या अनेक वर्षांच्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, जेव्हा जेव्हा शेतीक्षेत्राचा दर वाढून 4 टक्क्याच्या च्या आसपास पोहोचला, तो केवळ भाजीपाला फळे आणि शेतीसंलग्न अशा प्राणीजन्य पदार्थांच्या उत्पादनाच्या वाढीमुळेच.

एखादी शेतीप्रधान अर्थव्यवस्था जशी वाढू लागते, तसे जनतेचे उत्पन्न वाढू लागते आणि अर्थव्यवस्थेचा विकास जसा होऊ लागतो तसे शेतीशी संबंधीत क्षेत्रे आणि बिगरशेती उद्योगधंदे वाढू लागतात. शेतीमधील रोजगार निर्मीतीला मर्यादा आहेत. त्यामुळे शेतीवर अवलंबून असलेली जनता हळूहळू वाढवणाऱ्या इतर क्षेत्रांवर निर्वाहासाठी अवलंबून राहू लागते. ही वाढणारी क्षेत्र म्हणजेच विविध वस्तूंचे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

उत्पादन करणारे उद्योगधंदे आणि विविध सेवा पुरविणारे सेवाक्षेत्र ह्या क्षेत्रांमध्ये रोजगार निर्मीती होऊ लागते. आणि त्यामुळे या क्षेत्रांचा एकूण राष्ट्रीय उत्पन्नामधील वाटाही वाढू लागतो. परंतु अशी रोजगार निर्मीती एखाद्या विकसनशील देशात पुरेशा प्रमाणावर झालीच नाही तर साहजिकच शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबाना शेतीतून बाहेर पडून बिगर शेती क्षेत्रात रोजगाराची संधी मिळत नाही. अशा परिस्थितीमध्ये शेतीवर जरी तुलनेने जास्त जनता अवलंबून असली तरी राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा कमी असू शकतो. तसेच बिगरशेती क्षेत्रात काम करणाऱ्यांना शेतीपेक्षा मिळणारे सरासरी अधिक उत्पन्न आणि शेतीमधील जनतेचे तुलनेने निम्न स्तरावर असलेले जीवनमान अशी विचीत्र परिस्थिती निर्माण होते. अशीच परिस्थिती आपल्याला भारतातही दिसून येते. रोजगार निर्मातीला मंद वेगामुळे ग्रामीण भागातील जनतेला बिगरशेती मोठ्याा प्रमाणावर सामावून घेतलेले नाही. रोजगार निर्मीतीतल्या अपयशामुळे देशाच्या मनुष्यबळाची संरचना ही अजूनही शेतीप्रधान राहिली आहे. कोव्हिडसारख्या नैसर्गीक आणि डीमॉनेटायझेशन सारख्या मानवनिर्मीत संकटकालीन परिस्थितीमध्ये अजूनही गावी माघारी येणाऱ्या जनतेचे भरणपोषण शेतीक्षेत्र करत आहे. म्हणूनच शेतीक्षेत्राच्या आणि शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी बिगरशेती क्षेत्रात रोजगार निर्मीती करणे, विविध शेतीमाल प्रक्रिया उद्योगांना चालना देणे महत्वाचे आहे. भारत हा शेतीप्रधान देश आहे. शहरीकरणाने आज 30 टक्क्यांचा टप्पा ओलांडलेला आहे. सेवाउद्योग क्षेत्राचा जीडीपीमधील वाटा जवळपास 55 टक्क्यांना टेकलेला आहे. बांधकाम क्षेत्राचा समावेशही सेवाउद्योगांत केला तर हा वाटा थेट 63 टक्क्यांपर्यंत उंचावतो. हे सगळे चित्र असे असले तरी आपला देश आणि आपल्या देशाची अर्थव्यवस्था शेतीप्रधान आहे. कारण, एकूणांतील जवळपास निम्मे मुख्य श्रमिक आजही शेती आणि शेतीसंलग्न उदयोगांत गुंतलेले आहेत. उद्योगधंद्यांना लागणाऱ्या एकूण कच्च्या मालापैकी जवळ, जवळ 40 टक्के कच्चा माल हा शेतीमधूनच उद्योगांना मिळतो. शेती हा भारतीय अर्थकारणाचा कणा आहे.

कोणत्याही देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात शेतीक्षेत्राचा वाटा जास्त असल्यास तो देश कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. आपल्या देशात खरीप आणि रबी असे शेतीचे दोन हंगाम आहेत. आपल्या देषात होणाऱ्या वर्षभरातील एकूण धान्योत्पादनातील जवळपास 53 टक्के उत्पादन हे खरीपाच्या हंगामात होते. या अर्थाने देशाची निम्मी अन्नसुरक्षा खरीपाच्या उत्पादनावर अवलंबून आहे. भारतात आजही जवळपास 60 टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या शेतीक्षेत्रावर अवलंबून आहे.

संदर्भ:

1) कृषी व ग्रमीन अर्थव्यवस्था- लेखक: डॉ. विजय कविमंडन

2) n bafM; u bdk¡uk¡eh- latho oekZ

3) विकिपीडिया - कृषी अर्थकारण

4) वृत्तपत्रे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

अर्धापूर तालुक्यातील (जिल्हा नांदेड) ग्रामीण वस्त्यांचा भौगोलिक अभ्यास जनगणना-2011

नरवाडे एम. व्ही.[1], डॉ. एन. एस. गौंड[2]
[1]कै.शंकरराव गुट्टे महाविद्यालय धर्मापुरी
[2]भाई किशनराव देशमुख कॉलेज चाकूर
Email: narwademadan75@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180221
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 97-100
February- 2026

Submitted: 08 Jan. 2026
Revised: 18 Jan. 2026
Accepted: 05 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश:

अर्धापूर तालुक्यातील (जिल्हा नांदेड) ग्रामीण वस्त्यांचा भौगोलिक अभ्यास या शीर्षकाखाली प्रस्तुत संशोधन लेख तयार करण्यात आलेला आहे. यासाठी 2011 च्या जनगणना अहवालाचा अवलंब केला आहे, तालुक्यामध्ये एकूण 56 गावे असून त्यामध्ये 39 ग्रामपंचायती व एक नगरपंचायत कार्यरत आहे. अर्धापूर तालुका हा नांदेड महसूल उपविभागा अंतर्गत येतो नांदेड तालुक्याच्या विभाजनानंतर 30 डिसेंबर 1999 यावर्षी अर्धापूर तालुक्याची निर्मिती झाली. अर्धापूर शहरांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून नगरपंचायत असून ही नगरपंचायत 2011 मध्ये स्थापन झाली. तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ 29 हजार 229 चौरस किलोमीटर असून 2110 चौरस किलोमीटर वनक्षेत्र लाभलेले आहे. तालुक्यामध्ये सुमारे 870 मिलिमीटर पर्जन्याची नोंद असून तो प्रामुख्याने नैऋत्य मोसमी वाऱ्यापासून वर्षातील जीवन ते सप्टेंबर या चार महिन्याच्या काळात 90 टक्के पाऊस पडतो. तालुक्यामध्ये केळी हे प्रसिद्ध पीक घेतले जात असून त्यासोबतच ऊस, कापूस, सोयाबीन, गहू, हरभरा इतरही पिके घेतली जातात. कृषी हा प्रमुख व्यवसाय असून कृषी व प्रशिक्षण निगडित व्यवसाय उदाहरणार्थ भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना तालुक्यामध्ये यशस्वीपणे कार्यरत आहे. प्रस्तुत संशोधन पेपर तयार करण्यासाठी दुय्यम माहितीचा वापर करण्यात आलेला असून माहिती विश्लेषणासाठी आलेखांचा वापर करण्यात आलेला आहे. या लेखांमध्ये मुख्यत्वाने तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांचे क्षेत्रफळ व त्यांची घनता व वस्त्यांची संख्या यांचा प्रशासकीय विभाग किंवा मंडळी यांच्या नुसार अभ्यास करण्यात आलेला आहे.

मुख्य शब्द (Keywords): *ग्रामीण वस्ती, ग्रामीण वस्तीची घनता, वस्तीची क्षेत्रफळ.*

प्रस्तावना

नांदेड तालुक्याच्या विभाजनानंतर, ३० डिसेंबर १९९९ रोजी अर्धापूर तालुक्याची निर्मिती झाली. अर्धापूर तालुक्यात, दाभड येथील सत्यंगनापती मंदिर, मालेगाव येथील महारुद्र मारुती मंदिर, केशवरराज मठ, दाभड येथील बुद्धविहार, पिंपळगाव येथील महादेव मंदिर, केळी संशोधन केंद्र प्रसिद्ध आहेत. येथे भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना आहे. अर्धापूर तालुक्यात अनेक महत्त्वाच्या जागा आहेत, ज्यात विशेषतः अर्धापूर येथील ई-रसूल दर्ग्याचा समावेश आहे.

या दर्ग्यात सुमारे २९ मीटर लांबीची एकच कबर आहे. अशा प्रकारची विशेष कबर महाराष्ट्रात एकमेव असावी. येथे श्री केशवरराज मठ आणि हेमाडपंथी मंदिर देखील आहे. अर्धापूर शहरात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून नगरपंचायत आहे आणि सदर नगरपंचायत २०११ मध्ये स्थापन झाली.

अर्धापूर तालुका नांदेड-नागपूर राज्य महामार्गावर नांदेडपासून १९.३ किमी अंतरावर आहे. तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ २६,१५५ हेक्टर असून, वनक्षेत्र २११० चौरस किमी आहे, जे प्रामुख्याने पाटनूर, लहान आणि चेननपूर या तीन गावांमध्ये आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
नरवाडे एम. व्ही. कै. शंकरराव गुट्टे महाविद्यालय धर्मापुरी

How to cite this article:
नरवाडे, . एम . व्ही ., & गौंड, . एन . एस . (*2026*). अर्धापूर तालुक्यातील (जिल्हा नांदेड) ग्रामीण वस्त्यांचा भौगोलिक अभ्यास जनगणना-*2011*. *Journal of Research & Development, 18(2(XXI)), 97–100.*
https://doi.org/10.5281/zenodo.19536046

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19536046
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

नांदेड शहराला लागून असलेला हा सर्वात जवळचा तालुका आहे. अर्धापूर नांदेडपासून १९.३ किमी अंतरावर आहे आणि त्याचे क्षेत्रफळ ३९५० आहे. पूर्व घाट १९ अंश १७ मिनिटे १२ सेकंद उत्तर अक्षांश आणि ७७ अंश २२ मिनिटे २६ सेकंद पूर्व रेखांशावर आहे.

आसना ही येथील प्रमुख नदी आहे. येथील पर्जन्यमान ८७० मिमी आहे. तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ २९,२१९ चौरस किमी आहे. पूर्वेला भोकर तालुका, पश्चिमेला परभणी जिल्हा, दक्षिणेला नांदेड तालुका आणि उत्तरेला हदगाव तालुका आहे. या तालुक्यात केळीचे पीक महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे आणि खरीप हंगामात कापूस, सोयाबीन व इतर पिके, तर रब्बी हंगामात हरभरा, गहू आणि उन्हाळी पिके घेतली जातात.

अभ्यास क्षेत्र (Study Area):

अर्धापूर तालुका नांदेड जिल्ह्यातील एक तालुका असून त्याच्या उत्तरेस नांदेड तालुका, दक्षिणेस भोकर तालुका, तर पूर्वेस व पश्चिमेस इतर ग्रामीण तालुके आहेत. गोदावरी नदीच्या उपनद्यांचा परिणाम या भागाच्या वसाहतीवर दिसून येतो. हवामान उष्ण व अर्धकोरडे असून शेती हा प्रमुख व्यवसाय आहे

ध्येय आणि उद्दिष्टे (Aims and Objectives):

1) तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांचे क्षेत्रफळ यांचा अभ्यास करणे
2) तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांची घनता यांचा अभ्यास करणे
3) तालुक्यातील ग्रामीण व त्यांची संख्या यांचा अभ्यास करणे

माहितीचे संकलन व संशोधन पद्धती (Data Collection and Research Methodology): संशोधन पेपर तयार करण्यासाठी दुय्यम माहितीचा वापर करण्यात आलेला असून माहिती विश्लेषणासाठी आलेखांचा वापर करण्यात आलेला आहे. मुख्यत्वाने तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांचे क्षेत्रफळ व त्यांची घनता व वस्त्यांची संख्या यांचा लेखांमध्ये प्रशासकीय विभाग किंवा मंडळ यांच्या नुसार अभ्यास करण्यात आलेला आहे.

माहितीचे विश्लेषण व चर्चा (Result and Discussion):

प्रस्तुत संशोधन लेखामध्ये प्रामुख्याने तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांचे क्षेत्रफळ ,ग्रामीण वस्त्यांची संख्या व ग्रामीण वस्त्यांच्या घनतेचा प्रशासकीय विभागानुसार अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांची संख्या:

तालुक्यातील मंडळनिहाय ग्रामीण वस्त्यांच्या संख्येचा विचार करता असे लक्षात येते की मालेगाव प्रशासकीय मंडळामध्ये सर्वाधिक वस्तूंची संख्या आहे जी 7702 एवढी आहे, तर सर्वाधिक कमी ग्रामीण वस्त्यांची संख्या लहान या प्रशासकीय मंडळामध्ये 3498 एवढी आढळून येते तीनही प्रशासकीय मंडळामध्ये एकूण 15,229 एवढ्या रस्त्या आढळून येतात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

सारणी: I अर्धापूर तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांची संख्या

अ.क्र.	मंडळ	ग्रामीण वस्तीची संख्या
1	मालेगाव	7702
2	अर्धापूर	4029
3	लहान	3498
4	एकूण	15229



सारणी: II अर्धापूर तालुक्याचे क्षेत्रफळ चौ.कि.मी.

अ.क्र.	**मंडळ**	**क्षेत्रफळ चौ.कि.मी**
1	मालेगाव	124.99
2	अर्धापूर	70.35
3	लहान	76.34
4	एकूण	271.68



तालुक्यातील मंडळाच्या क्षेत्रफळाचा विचार करता मालेगाव हे प्रशासकीय मंडळ क्षेत्रफळाच्या दृष्टीने ही सर्वाधिक मोठे आहे. 124.99 चौरस किलोमीटर एवढे क्षेत्रफळ असून, सर्वाधिक कमी अर्धापूर 70.35 34 एवढे या तालुक्याचे क्षेत्र आहे. एकूण क्षेत्रफळाचा विचार करता २७१.६८ चौरस किलोमीटर एवढे तालुक्याचे क्षेत्रफळ आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

तालुक्यातील प्रशासकीय मंडळातील वस्त्यांची घनता लक्षात घेता मालेगाव प्रशस्ती मंडळातील व त्यांची घनता सर्वाधिक 61.63 दर चौरस किलोमीटर एवढी असून सर्वाधिक कमी लहान शासकीय मंडळामध्ये 45.82 दर चौरस किलोमीटर एवढी आहे. संपूर्ण तालुक्यातील वस्त्यांच्या घनतेचा विचार करता 58.67 दर चौरस किलोमीटर एवढी वस्त्यांची घनता आढळून येते.

सारणी: III ग्रामीण वस्तीची घनता

अ.क्र.	मंडळ	ग्रामीण वस्तीची घनता दर चौ.कि.मी.
1	मालेगाव	61.63
2	अर्धापूर	57.27
3	लहान	45.82
4	एकूण	**58.67**



निष्कर्ष (Conclusion):

प्रस्तुत संशोधन लेख हा नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांच्या भौगोलिक अभ्यासावर आधारित असून यामध्ये प्रामुख्याने मंडळ निहाय ग्रामीण वस्त्यांची संख्या व त्यांची घनता व क्षेत्रफळ यांचा अभ्यास यामध्ये करण्यात आलेला आहे रस्त्यांच्या संख्येचा विचार करता तालुक्यामध्ये मालेगाव हे सर्वाधिक मोठे तर लहान सर्वात लहान व त्यांची संख्या असणाऱ्या प्रशासकीय मंडळ आहे . वस्त्यांच्या क्षेत्रफळाचा विचार करता मालेगाव प्रशासकीय मंडळाचे सर्वाधिक क्षेत्रफळ आहे तर अर्धापूर प्रशासकीय मंडळाचे सर्वात कमी क्षेत्रफळ आहे तालुक्यातील मंडळी आहे ग्रामीण रस्त्यांची घनता लक्षात घेता मालेगाव प्रशासकीय मंडळातील ग्रामीण व्यवस्थेची घनता सर्वाधिक 61.73 दर चौरस किलोमीटर एवढी सर्वाधिक असून लहान प्रशासकीय मंडळामध्ये 45.82 दर चौरस किलोमीटर एवढी ग्रामीण वस्त्यांची घंटा आढळून येते वरील सर्व घटकांचा विचार करता अर्धापूर तालुक्यामध्ये मालेगाव सर्वाधिक मोठे प्रशासकीय मंडळ असून लहाने सर्वाधिक छोटी राजकीय मंडळ आहे.

संदर्भसूची (Reference's):

1. लोकसंख्या भूगोल - डॉ. अनिल लांडगे, डॉ. बाबासाहेब गाणी, डॉ. राजेंद्र पवार, डॉ. सुदर्शन आहेर
2. लोकसंख्या भूगोल - के. ए. खतीब
3. अधिवास भूगोल - डॉ. एचडी मौर्य, प्रवीण कुमार
4. लोकसंख्या भूगोल- डॉ. सुरेश फुले
5. नांदेड जिल्हा गॅझेटर (भाग एक) दर्शनी विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

डिजिटल समाज आणि स्त्रियांच्या राजकीय सहभागातील नैतिक समस्या : एक सैद्धांतिक विश्लेषण

वैशाली सागर पोवार[1], डॉ. सुजाता कराडे[2]
[1]समाजशास्त्र विभाग, राजाराम कॉलेज ,कोल्हापूर
[2]विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग, श्रीमती चंपाबेन बालचंद शाह महिला महाविद्यालय, सांगली
Email: vaishalipowar86@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180222
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 101-104
February- 2026
Submitted: 08 Jan. 2026
Revised: 18 Jan. 2026
Accepted: 05 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

डिजिटल युगाच्या उदयापासून, राजकीय प्रणालीने संरचनात्मक बदल अनुभवले आहेत. विशेषत:, इंटरनेट प्लॅटफॉर्म्समुळे महिलांना राजकीय सहभागासाठी नवीन सार्वजनिक मंच मिळाले आहेत. परंतु, वाढत्या सहभागासोबत नैतिक समस्या देखील आल्या आहेत ज्यामध्ये ऑनलाइन छळ, ऑनलाइन हिंसा, खासगीतेमध्ये हल्ले आणि लिंगावर आधारित चुकीची माहिती यांचा समावेश आहे. स्त्रीवादी सिद्धांत, नेटवर्क समाज सिद्धांत, आणि सार्वजनिक क्षेत्र सिद्धांतावर आधारित, सद्याचा लेख डिजिटल समाजातील महिलांच्या राजकीय सहभागाचे सैद्धांतिक विश्लेषण सादर करतो.

मुख्यशब्द: *डिजिटल समाज, स्त्रियांचा राजकीय सहभाग, नैतिक समस्या, ऑनलाइन छळ (Cyber Harassment), गोपनीयता (Privacy), डेटा सुरक्षा, डिजिटल दरी, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, लिंगभेद (Gender Bias)*

प्रस्तावना

मानवी समाजाच्या विकासाच्या प्रवाहात तंत्रज्ञान नेहमीच महत्त्वपूर्ण ठरले आहेत. विशेषतः २१ व्या शतकात, माहिती व संचार तंत्रज्ञानाच्या (ICT) वेगवान वाढीमुळे सामाजिक रचना, आंतरव्यक्तिगत संबंध आणि राजकारण प्रक्रियांमध्ये मोठे बदल दिसून आले आहेत. इंटरनेट, सोशल मीडिया, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि नेटवर्क तंत्रज्ञानाच्या वाढीमुळे आजचा सभ्य समाज अधिक प्रमाणात 'डिजिटल सभ्यता' म्हणून ओळखला जात आहे.

संवाद, माहितीची देवाणघेवाण आणि राजकीय सहभाग या गोष्टी डिजिटल युगात पारंपरिक माध्यमांच्या मर्यादेपलीकडे गेल्या आहेत. डिजिटल प्लॅटफॉर्म्समुळे राजकीय प्रक्रिया आणखी गतिशील, खुले आणि व्यापकपणे वापरल्या जाणाऱ्या बनत आहेत. अशी नवीन डिजिटल सार्वजनिक क्षेत्रे विशेषत: महिलांच्या राजकीय सहभागासाठी नवीन संधी निर्माण करत आहेत. महिला आता सोशल मीडिया मोहिमा, ऑनलाइन याचिका, डिजिटल चळवळी, हॅशटॅग सक्रियता आणि ऑनलाइन चर्चांद्वारे राजकीयदृष्ट्या स्वत:ला प्रभावीपणे व्यक्त करण्याचे आणि संघटनांमध्ये सहभागी होण्याचे मार्ग शोधू शकतात.

डिजिटल जगतातील ही वाढ देखील पूर्णपणे समानतेवर आधारित नाही. डिजिटल राजकारणात महिलांच्या सहभागामुळे अनेक नैतिक प्रश्न उद्भवले आहेत. महिलांच्या सुरक्षित आणि प्रभावी सहभागासमोर गंभीर अडथळे आहेत, ज्यात ट्रॉलिंग, ऑनलाईन लैंगिक हिंसा, सायबर छळ, खोटी माहिती, गोपनीयतेचे उल्लंघन आणि डिजिटल अंतर यांचा समावेश आहे. डिजिटल सार्वजनिक क्षेत्र स्त्रीपुरुष विषमतेचे समर्थन करते आणि लैंगिक असमानता टिकवते, जरी ते अभिप्राय व्यक्त करण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करत असेल.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
वैशाली सागर पोवार, समाजशास्त्र विभाग, राजाराम कॉलेज, कोल्हापूर

How to cite this article:
पोवार, . वैशाली . सागर ., & कराडे, सुजाता. (2026). डिजिटल समाज आणि स्त्रियांच्या राजकीय सहभागातील नैतिक समस्या : एक सैद्धांतिक विश्लेषण. Journal of Research & Development, 18(2(XXI)), 101–104. https://doi.org/10.5281/zenodo.19536123

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19536123
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

जरी भारतीय समाजात महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व वाढले असले तरी, त्या डिजिटल राजकीय क्षेत्रात अनेक अडचणींचा सामना करतात. सामाजिक मर्यादा, तंत्रज्ञानाची माहिती नसणे, शैक्षणिक असमानता आणि ग्रामीण-शहरी फरक यामुळे महिलांची डिजिटल सहभागिता वेगळी असते. त्यामुळे असे दिसते की डिजिटल शोषण आणि सक्षमीकरण एकाच वेळी घडते.

या अभ्यासात डिजिटल समाजाची संकल्पना आणि स्त्रियांच्या राजकीय सहभागाची वैशिष्ट्ये सैद्धांतिकदृष्ट्या तपासली जातील, तसेच संबंधित नैतिक चिंताही विचारात घेतली जातील. समाजशास्त्रज्ञ विशेषतः डिजिटल सार्वजनिक क्षेत्रातील सत्ता गतिशीलता, लिंगावर आधारित अनुभव आणि नैतिक क्लेश यांचा अभ्यास करतील. अशा प्रकारे, डिजिटल समाजातील महिलांच्या राजकीय सहभागाचा अभ्यास हा केवळ तांत्रिक परिवर्तनाचा नव्हे तर सामाजिक न्याय, समता आणि लोकशाहीच्या गुणवत्तेशी संबंधित महत्त्वपूर्ण विषय ठरतो.

संशोधनाची उद्दिष्टे :

१. डिजिटल समाज उदयाच्या काळापासून महिलांची राजकीय सहभागिता कशी बदलली आहे याचा अभ्यास करणे.
२. डिजिटल सार्वजनिक क्षेत्रात लिंगावर आधारित विषमता आणि महिलांना उपलब्ध संधी यावर संशोधन करणे.
३. महिलांच्या डिजिटल राजकीय सहभागाशी संबंधित नैतिक समस्या (ऑनलाइन छळ, गोपनीयतेचे उल्लंघन, चुकीची माहिती) यांचा सैद्धांतिक दृष्ट्या अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके :

१. डिजिटल माध्यमांमुळे महिलांच्या राजकीय सहभागात वाढ झाली आहे.
२. डिजिटल सार्वजनिक क्षेत्रात लिंगाधारित असमानता आणि ऑनलाइन हिंसा अस्तित्वात आहे.
३. नैतिक आणि कायदेशीर संरक्षणाच्या अभावामुळे महिलांच्या डिजिटल राजकीय सहभागावर मर्यादा येतात.

सैद्धांतिक दृष्टिकोन :

सार्वजनिक क्षेत्र सिद्धांत, नेटवर्क समाज सिद्धांत, आणि स्त्रीवादी सिद्धांत यांची सैद्धांतिक चौकट सध्याच्या अभ्यासासाठी पाया म्हणून कार्य करते. या सिद्धांतांचा उपयोग स्त्रियांच्या डिजिटल समाजातील राजकीय सहभागाशी संबंधित डिजिटल सार्वजनिक क्षेत्रातील लिंग-आधारित सत्तेच्या गती, सामाजिक रचना, आणि असमानतांचा संशोधन करण्यासाठी पाया म्हणून केला जाईल.

संकल्पनात्मक स्पष्टीकरण :

१) **डिजिटल समाज (Digital Society)** :

एक समाज जो सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्रियाकलाप पार पाडण्यासाठी माहिती आणि संवाद तंत्रज्ञान (ICT), इंटरनेट, सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर करतो त्यास डिजिटल समाज असे म्हणतात. या समाजातील माहितीचे उत्पादन, वितरण आणि वापर यांचे बहुतेक भाग डिजिटल पद्धतीने होतात.

"नेटवर्क समाज" या संकल्पनेच्या परिचयात, मन्युएल कास्टेल्स यांनी म्हटले की माहिती तंत्रज्ञान नेटवर्क्स आधुनिक समाजाची पायाभूत रचना तयार करतात. लोक, संस्था आणि सरकार यांच्यातील संबंध आता या नेटवर्क्समुळे अधिक गतिशील आणि जटिल झाले आहेत.

२) **महिलांचा राजकीय सहभाग (Women's Political Participation)** :

"स्त्रियांच्या राजकीय सहभाग" या संज्ञेमुळे स्त्रिया मतदान, पदासाठी उमेदवारी करणे, राजकीय पक्षांमध्ये सक्रिय सहभाग घेणे, धोरणे लिहिणे आणि सार्वजनिक धोरणावर प्रभाव टाकणे यासह विविध क्रियाकलापांमध्ये कशी सहभागी होतात हे वर्णन केले जाते. हा सहभाग रणनीतिक, परिणामकारक असावा आणि फक्त संख्यात्मक प्रतिनिधित्वापेक्षा अधिक असावा.

संयुक्त राष्ट्रसंघाचा असा दावा आहे की सामाजिक न्याय आणि शाश्वत विकास हे स्त्रियांच्या अर्थपूर्ण आणि समतोल सहभागावर अवलंबून असतात. २०३० चे शाश्वत विकासाचे उद्दिष्ट क्रमांक ५ लिंग समानतेवर विशेष भर देतो आणि निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग वाढवण्यावर लक्ष केंद्रित करतो.

३) **नैतिक प्रश्न (Ethical Issues)** :

नैतिक प्रश्न म्हणजे असे मुद्दे जे डिजिटल तंत्रज्ञान, सोशल मिडिया आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्मचा वापर करताना मूल्ये आणि जबाबदाऱ्यांशी संबंधित असतात, खास करून डिजिटल समाजाच्या संदर्भात. डिजिटल सार्वजनिक क्षेत्रात सुरक्षितता आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य यामध्ये संतुलन साधण्याची गरज असते, जे विशेषतः स्त्रियांच्या राजनीतिक सहभागाच्या बाबतीत ही मुद्दे अधिक संवेदनशील बनवते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Manuel Castells यांच्या मते, नेटवर्क समाजात माहिती आणि संवाद हे सत्तेची प्रमुख साधने बनतात (Castells, 2010). त्यामुळे डिजिटल माध्यमांतील अनैतिक वापर सामाजिक असमानता आणि वर्चस्व अधिक दृढ करू शकतो.
तसेच United Nations यांनी महिलांच्या ऑनलाइन सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त करत डिजिटल हिंसा ही जागतिक समस्या असल्याचे नमूद केले आहे (UN Women, 2020).

आशय विश्लेषण : डिजिटल समाजातील महिलांच्या राजकीय सहभागातील प्रमुख मुद्दे -

१) डिजिटल सक्षमीकरण :

डिजिटल माध्यमांमुळे, आता महिलांना त्यांच्या राजकीय मतांना व्यक्त करण्यासाठी एक नवीन व्यासपीठ मिळाले आहे. इंटरनेट नेटवर्किंग, हॅशटॅग मोहिमा आणि सोशल मीडिया अभियानांद्वारे, महिला आता सार्वजनिक चर्चेत अधिक सक्रिय आहेत. परिणामी, त्यांचे प्रतिनिधित्व आणि दृश्यता वाढली आहे.

२) लिंगाधारित ऑनलाइन हिंसा :

महिलांवर त्यांच्या लिंगामुळे त्रास देणे, लाजवणे, धमकवणे किंवा मानसिक त्रास पोचवणे हे इंटरनेट प्लॅटफॉर्मचा वापर करून केले जाते आणि याला लिंग-आधारित ऑनलाइन हिंसा म्हणून ओळखले जाते. सोशल मीडिया, ई-मेल, मेसेजिंग ॲप्स, ऑनलाइन फोरम आणि इतर प्लॅटफॉर्म हे काही ठिकाणे आहेत जिथे ही हिंसा घडते. ऑनलाइन सार्वजनिक क्षेत्रात महिला राजकारणात जास्त सहभागी होत असल्याने ही समस्या वाढत असल्याचे दिसून येत आहे.

UN Women यांच्या अहवालानुसार, जगभरातील मोठ्या प्रमाणावर महिलांना ऑनलाइन छळ, धमक्या आणि लैंगिक स्वरूपाच्या अपमानास्पद संदेशांचा सामना करावा लागतो. विशेषतः महिला पत्रकार, राजकारणी आणि सामाजिक कार्यकर्त्या यांना जाणीवपूर्वक लक्ष्य केले जाते.

३) डिजिटल दरी :

जरी डिजिटल समाजाच्या उदयाने संवाद, माहिती आणि संधींसाठी नवीन मार्ग निर्माण केले असले तरी, प्रत्येकालाच या संधींचा समान प्रवेश नाही. 'डिजिटल विभाजन' हा शब्द या असमानतेसाठी वापरला जातो. माहिती, तांत्रिक कौशल्ये, डिजिटल साधने आणि इंटरनेट प्रवेशातील फरकांमुळे डिजिटल विभाजन उद्भवते. International Telecommunication Union च्या अहवालांनुसार, जागतिक पातळीवर महिलांचा इंटरनेट वापर पुरुषांच्या तुलनेत कमी आहे, विशेषतः विकसनशील देशांमध्ये ही दरी अधिक स्पष्ट दिसून येते.

४) गोपनीयता आणि डेटा शोषण :

व्यक्तिगत डेटाचे मोठ्या प्रमाणात संकलन, विश्लेषण आणि वापर डिजिटल जगात सामान्य गोष्ट आहे. ऑनलाइन प्लॅटफॉर्म, मोबाईल ॲप्स आणि सोशल मीडिया सर्व वापरकर्त्यांचा डेटा गोळा करतात, ज्यात नाव, ठिकाण, फोन नंबर, आवडी आणि राजकीय दृष्टिकोण यांचा समावेश असतो. या पद्धतीत गोपनीयतेसंबंधी समस्या आहेत. महिलांच्या राजकीय सहभागाबद्दल चर्चा करताना विषय खूप संवेदनशील होतो. European Union ने गोपनीयतेच्या संरक्षणासाठी GDPR (General Data Protection Regulation) लागू केले आहे, ज्यामुळे वैयक्तिक माहितीच्या वापरावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला गेला. तरीही डिजिटल प्लॅटफॉर्मवरील डेटा शोषणाचा धोका कायम आहे.

निष्कर्ष :

डिजिटल समाजाच्या उदयामुळे महिलांच्या राजकीय सहभागाला नवीन संधी उपलब्ध झाल्या असल्या तरी त्यासोबत अनेक नैतिक आणि संरचनात्मक आव्हानेही निर्माण झाली आहेत. डिजिटल माध्यमांमुळे महिलांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य, राजकीय जागरूकता आणि संघटनात्मक क्षमता वाढविण्याची संधी मिळते; मात्र सायबर छळ, ऑनलाईन ट्रोलिंग, गोपनीयतेचा भंग आणि माहितीचा दुरुपयोग यांसारख्या समस्या त्यांच्या सहभागात अडथळा निर्माण करतात.

महिलांच्या राजकीय सक्षमीकरणासाठी केवळ कायदेशीर तरतुदी पुरेशा नसून सामाजिक मानसिकतेत बदल, डिजिटल साक्षरतेचा प्रसार आणि सुरक्षित ऑनलाईन वातावरण निर्मिती आवश्यक आहे. शासन, नागरी समाज संस्था आणि शैक्षणिक यंत्रणा यांनी एकत्रितपणे महिलांसाठी सुरक्षित, समावेशक आणि नैतिक डिजिटल परिसंस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

त्यामुळे महिलांचा राजकीय सहभाग केवळ संख्यात्मक वाढ न राहता तो गुणवत्तापूर्ण, प्रभावी आणि निर्णयक्षमतेत रूपांतरित होईल. डिजिटल समाजात समानता, पारदर्शकता आणि नैतिक जबाबदारी या मूल्यांवर आधारित व्यवस्था उभारल्यास महिलांचे राजकीय सक्षमीकरण अधिक सक्षमपणे साध्य होऊ शकते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

संदर्भसूची (References)

१. Castells, M. (2010). The rise of the network society (2nd ed.). Wiley-Blackwell.
२. Gill, R. (2007). Gender and the media. Polity Press.
३. Gupta, S. (2014). Empowerment of women and role of state in India. Pen2Print Journal, 1(3), 45–52.
४. Habermas, J. (1989). The structural transformation of the public sphere. MIT Press.
५. Krook, M. L., & Norris, P. (2014). Beyond quotas: Strategies to promote gender equality in elected office. Political Studies, 62(1), 2–20.
६. UN Women. (2020). Women's full and effective participation and decision-making in public life. United Nations Entity for G

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

बँकिंग सुधारणा आणि वित्तीय नियमन (भारतीय अर्थव्यवस्थेच्या शाश्वत व डिजिटल संक्रमणाचा नवा दृष्टिकोण)

Sakharam Dagadu Humbe
Assistant Professor, Department of Economics, Mahavir Mahavidyalaya, Kolhapur
Email: sdhumbe9@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180223
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 105-115
February- 2026

Submitted: 08 Jan. 2026
Revised: 18 Jan. 2026
Accepted: 05 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश:

भारतीय अर्थव्यवस्था सध्या डिजिटल परिवर्तन आणि शाश्वत विकास या दोन व्यापक प्रवाहांच्या संगमावर उभी आहे. या परिवर्तन प्रक्रियेत बँकिंग क्षेत्र हे केवळ वित्तपुरवठा करणारे साधन नसून आर्थिक स्थैर्य, सामाजिक समावेशन आणि पर्यावरणीय जबाबदारी यांचे केंद्रबिंदू बनले आहे. प्रस्तुत संशोधनाचा उद्देश भारतीय बँकिंग सुधारणा आणि वित्तीय नियमन या प्रक्रियांचा अभ्यास करून त्या देशाच्या शाश्वत व डिजिटल संक्रमणात कशा प्रकारे निर्णायक भूमिका बजावतात, हे नव्या दृष्टिकोनातून स्पष्ट करणे हा आहे. 1991 नंतरच्या आर्थिक उदारीकरणाने भारतीय बँकिंग क्षेत्रात स्पर्धात्मकता, पारदर्शकता आणि भांडवली पर्याप्ततेचे निकष मजबूत केले. त्यानंतरच्या काळात अनुत्पादक मालमत्ता (NPA) व्यवस्थापन, दिवाळखोरी आणि दिवाळे प्रक्रिया संहिता (IBC), बँक पुनर्भांडवलीकरण आणि मालमत्ता गुणवत्ता पुनरावलोकन (AQR) यांसारख्या सुधारणा उपाययोजनांनी बँकिंग व्यवस्थेची विश्वासार्हता पुनर्स्थापित केली. वित्तीय नियमनाची मजबूत चौकट निर्माण करण्यात केंद्रीय बँकेची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली असून जोखीम व्यवस्थापन, सायबर सुरक्षा आणि ग्राहक संरक्षण या क्षेत्रात स्पष्ट धोरणात्मक बदल दिसून येतात. डिजिटल संक्रमण हा भारतीय बँकिंग व्यवस्थेतील सर्वात प्रभावी बदल मानला जातो. मोबाईल बँकिंग, तात्काळ पेमेंट प्रणाली, फिनटेक नवकल्पना आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यामुळे व्यवहार प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक आणि किफायतशीर झाली आहे. डिजिटल पेमेंट प्रणालीमुळे रोख व्यवहारात घट झाली असून ग्रामीण आणि वंचित घटकांना औपचारिक वित्तीय व्यवस्थेत प्रवेश मिळाला आहे. वित्तीय समावेशनाच्या दृष्टीने जनधन खाते, आधार-आधारित ओळख आणि मोबाईल तंत्रज्ञान यांच्या एकत्रीकरणामुळे सामाजिक व आर्थिक सक्षमीकरणाला चालना मिळाली आहे. याचबरोबर, शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांसाठी हरित वित्त (Green Finance) आणि ESG (Environmental, Social, Governance) निकषांचे महत्त्व वाढले आहे. बँका आता पर्यावरणपूरक प्रकल्प, नवीकरणीय ऊर्जा, हरित पायाभूत सुविधा आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार उद्योगांना प्राधान्याने वित्तपुरवठा करत आहेत. वित्तीय निर्णयप्रक्रियेत पर्यावरणीय जोखीम मूल्यांकनाचा समावेश होत असल्यामुळे दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य अधिक मजबूत होत आहे. हरित बॉण्ड्स आणि सस्टेनेबिलिटी-लिंक्ड वित्तीय साधनांच्या माध्यमातून भांडवली बाजारात नव्या संधी निर्माण होत आहेत. डिजिटलायझेशन आणि शाश्वत विकास हे स्वतंत्र प्रवाह नसून सक्षम वित्तीय नियमनाच्या चौकटीत एकत्रित झाल्यासच दीर्घकालीन आर्थिक प्रगती साध्य होऊ शकते. बँकिंग सुधारणा केवळ संरचनात्मक बदल नसून त्या सामाजिक न्याय, पर्यावरणीय संतुलन आणि आर्थिक कार्यक्षमतेचा समन्वय साधणारी परिवर्तन प्रक्रिया आहे. भविष्यातील बँकिंग मॉडेल हे "डिजिटल समावेशन + पर्यावरणीय जबाबदारी + वित्तीय स्थैर्य" या त्रिसूत्री तत्त्वांवर आधारित असणे आवश्यक आहे. RegTech, सायबर सुरक्षा, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि हरित वित्तीय धोरणांच्या माध्यमातून भारतीय बँकिंग क्षेत्र अधिक सक्षम, समावेशक आणि शाश्वत बनू शकते. या प्रक्रियेमुळे भारत विकसित, तंत्रज्ञानाधारित आणि पर्यावरणपूरक अर्थव्यवस्थेकडे प्रभावीपणे संक्रमण करू शकतो.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
Sakharam Dagadu Humbe, Assistant Professor, Department of Economics, Mahavir Mahavidyalaya, Kolhapur

How to cite this article:
Humbe, S. D. (2026). बँकिंग सुधारणा आणि वित्तीय नियमन (भारतीय अर्थव्यवस्थेच्या शाश्वत व डिजिटल संक्रमणाचा नवा दृष्टिकोण). *Journal of Research & Development, 18(2(XXI)), 105–115.*
https://doi.org/10.5281/zenodo.19536174

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19536174
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

कीवर्ड (Keywords): *बँकिंग सुधारणा, वित्तीय नियमन, डिजिटल बँकिंग, वित्तीय समावेशन, शाश्वत विकास, हरित वित्त (Green Finance), ESG निकष, अनुत्पादक मालमत्ता (NPA), जोखीम व्यवस्थापन, फिनटेक नवकल्पना, सायबर सुरक्षा, भांडवली पर्याप्तता, दिवाळखोरी प्रक्रिया, RegTech.*

प्रस्तावना

भारतीय अर्थव्यवस्था गेल्या काही दशकांत वेगाने परिवर्तनाच्या प्रक्रियेतून जात आहे. जागतिकीकरण, उदारीकरण आणि तांत्रिक प्रगती यांच्या प्रभावामुळे आर्थिक व्यवस्थेची रचना अधिक गतिमान, स्पर्धात्मक आणि तंत्रज्ञानाधारित बनली आहे. या संपूर्ण प्रक्रियेत बँकिंग क्षेत्राने केवळ वित्तपुरवठा करणारी संस्था म्हणून नव्हे, तर आर्थिक विकासाचे दिशादर्शक साधन म्हणून भूमिका बजावली आहे. म्हणूनच बँकिंग सुधारणा आणि वित्तीय नियमन या विषयांचे महत्त्व आज अधिक अधोरेखित झाले आहे. 1991 नंतरच्या आर्थिक उदारीकरणानंतर भारताने बँकिंग क्षेत्रात संरचनात्मक सुधारणा सुरू केल्या. यामध्ये भांडवली पर्याप्तता निकष, जोखीम व्यवस्थापन, पारदर्शक लेखापद्धती, खासगी बँकांना प्रवेश आणि स्पर्धात्मक वातावरण निर्मिती यांचा समावेश होता. या सुधारणांचा उद्देश केवळ बँकांची आर्थिक क्षमता वाढविणे नसून, त्यांना जागतिक निकषांशी सुसंगत करणे हा होता. वित्तीय स्थैर्य राखण्यासाठी आणि चलनविषयक नियंत्रणासाठी भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) ने महत्त्वपूर्ण धोरणात्मक भूमिका बजावली आहे. RBI ने बँकिंग क्षेत्रासाठी कठोर निरीक्षण प्रणाली, जोखीम मूल्यांकन पद्धती आणि सायबर सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वे लागू केली आहेत.

गेल्या दशकात बँकिंग क्षेत्राला अनेक आव्हानांचा सामना करावा लागला. विशेषतः अनुत्पादक मालमत्ता (NPA) वाढ, कर्जवाटपातील त्रुटी, आणि जागतिक आर्थिक मंदी यांचा परिणाम बँकांच्या स्थैर्यावर झाला. यासाठी मालमत्ता गुणवत्ता पुनरावलोकन (AQR), दिवाळखोरी आणि दिवाळे प्रक्रिया संहिता (IBC) यांसारख्या कायदेशीर व प्रशासकीय उपाययोजना राबविण्यात आल्या. या उपायांमुळे बँकिंग व्यवस्थेत पारदर्शकता आणि जबाबदारीची भावना निर्माण झाली. याच कालावधीत डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रसार हा भारतीय बँकिंग व्यवस्थेतील सर्वात मोठा परिवर्तनबिंदू ठरला. मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग, तात्काळ पेमेंट प्रणाली, आधार-आधारित ओळख प्रणाली आणि फिनटेक नवकल्पनांनी व्यवहार प्रक्रिया अधिक सुलभ व जलद केली. डिजिटल पेमेंट प्रणालीमुळे व्यवहार खर्चात घट झाली आणि ग्रामीण व वंचित घटकांना औपचारिक बँकिंग सेवांपर्यंत सहज प्रवेश मिळाला. डिजिटल समावेशनामुळे आर्थिक पारदर्शकता वाढली आणि करप्रणालीत सुधारणा झाली.

याचबरोबर, शाश्वत विकासाची संकल्पना जागतिक स्तरावर महत्त्वाची ठरू लागली आहे. हवामान बदल, पर्यावरणीय असंतुलन आणि सामाजिक विषमता यांसारख्या प्रश्नांनी वित्तीय क्षेत्रावरही परिणाम केला आहे. त्यामुळे हरित वित्त (Green Finance), ESG (Environmental, Social, Governance) निकष आणि पर्यावरणपूरक गुंतवणूक यांना प्राधान्य दिले जात आहे. बँका आता केवळ आर्थिक नफ्यावर आधारित निर्णय घेत नाहीत, तर पर्यावरणीय आणि सामाजिक परिणामांचाही विचार करीत आहेत. बँकिंग सुधारणा आणि वित्तीय नियमन या प्रक्रिया भारताच्या शाश्वत व डिजिटल संक्रमणात कशा प्रकारे एकात्मिक भूमिका बजावतात, याचा सखोल अभ्यास करणे. डिजिटलायझेशन आणि शाश्वत विकास हे स्वतंत्र घटक नसून, सक्षम नियमनाच्या चौकटीत एकत्रित झाल्यासच दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य साध्य होऊ शकते.

म्हणूनच बँकिंग क्षेत्रातील ऐतिहासिक सुधारणा, वर्तमानातील तांत्रिक बदल, जोखीम व्यवस्थापन, वित्तीय समावेशन आणि हरित वित्तीय धोरणांचा परस्परसंबंध तपासण्याचा प्रयत्न करणार आहोत. या माध्यमातून भारतीय अर्थव्यवस्थेच्या भविष्यातील विकासासाठी एक संतुलित, समावेशक आणि शाश्वत बँकिंग मॉडेल आढावा घेणार आहोत.

भारतातील बँकिंग सुधारणा: ऐतिहासिक पार्श्वभूमी

भारतातील बँकिंग सुधारणा या एकाच टप्प्यात घडलेल्या नसून त्या सामाजिक, आर्थिक आणि जागतिक बदलांच्या पार्श्वभूमीवर टप्प्याटप्प्याने विकसित झाल्या आहेत. स्वातंत्र्योत्तर काळापासून आजपर्यंत बँकिंग व्यवस्थेने अनेक संरचनात्मक, धोरणात्मक आणि तांत्रिक परिवर्तन अनुभवले आहेत. या ऐतिहासिक प्रक्रियेवरून भारतीय अर्थव्यवस्थेतील बदल आणि बँकिंग क्षेत्राची भूमिका स्पष्टपणे समजते.

स्वातंत्र्यपूर्व आणि प्रारंभीचा काळ (1947 पूर्व–1969)

ब्रिटिश काळात भारतातील बँकिंग व्यवस्था प्रामुख्याने शहरी व व्यापारी केंद्रित होती. ग्रामीण भाग, शेती आणि लघुउद्योग यांना बँकिंग सेवांचा मर्यादित लाभ मिळत होता. 1935 मध्ये भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) ची स्थापना झाली आणि चलनविषयक

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

नियंत्रणाची जबाबदारी केंद्रीकृत झाली. स्वातंत्र्यानंतर सरकारसमोर दोन मोठी आव्हाने होती. ती म्हणजे आर्थिक पुनर्बांधणी आणि समतोल विकास. त्यामुळे बँकिंग क्षेत्राला सामाजिक विकासाशी जोडण्याची आवश्यकता निर्माण झाली.

बँकांचे राष्ट्रीयीकरण (1969 आणि 1980)

1969 मध्ये 14 प्रमुख व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले आणि 1980 मध्ये आणखी 6 बँका राष्ट्रीयीकृत करण्यात आल्या. या निर्णयामागील मुख्य उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती: **1.** ग्रामीण व कृषी क्षेत्रात कर्जवाटप वाढविणे, **2.** लघुउद्योग आणि गरीब घटकांना वित्तीय मदत उपलब्ध करणे, **3.** प्रादेशिक असमतोल कमी करणे, **4.** सामाजिक बँकिंगची संकल्पना बळकट करणे.

बँकांचे राष्ट्रीयीकरण, 1969

अ. क्र.	बँकेचे नांव	स्थापना	जमा ठेवी	अ. क्र.	बँकेचे नांव	स्थापना	जमा ठेवी
1.	सेंट्रल बँक ऑफ इंडिया	1911	433 कोटी	8.	देना बैंक	1938	122 कोटी
2.	बँक ऑफ इंडिया	1906	395 कोटी	9.	युनियन बैंक ऑफ इंडिया	1919	115 कोटी
3.	पंजाब नॅशनल बँक	1894	356 कोटी	10.	अलाहाबाद बैंक	1865	113 कोटी
4.	बँक ऑफ बडोदा	1908	314 कोटी	11.	सिंडिकेट बैंक	1925	112 कोटी
5	युनायटेड कमर्शिअल बँक	1943	241कोटी	12.	इंडियन ओव्हरसीज बँक	1836	93 कोटी
6.	कॅनरा बँक	1906	146 कोटी	13.	इंडियन बैंक	1907	85 कोटी
7.	युनायटेड बँक ऑफ इंडिया	1950	144 कोटी	14.	बँक ऑफ महाराष्ट्र	1935	73 कोटी

बँकाचे राष्ट्रीयीकरण, 1980

अ. क्र.	बँकेचे नाव	सरकारने दिलेली नुकसान भरपाई	अ. क्र.	बँकेचे नाव	सरकारने दिलेली नुकसान भरपाई
1.	आंध्र बँक	6.1 कोटी रु.	4.	कॉरपोरेशन बँक	2.1 कोटी रु.
2.	न्यू बँक ऑफ इंडिया	5.1 कोटी रु.	8.	पंजाब अँड सिंध बँक	1.8 कोटी रु.
3.	ओरिएन्टल बैंक ऑफ कॉमर्स	2.4 कोटी रु.	6.	विजया बँक	1.0 कोटी रु.

राष्ट्रीयीकरणामुळे शाखा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला. ग्रामीण भागात बँकांची उपस्थिती वाढली आणि प्राधान्य क्षेत्र कर्ज (Priority Sector Lending) धोरणाची अंमलबजावणी झाली. तथापि, सरकारी नियंत्रण वाढल्यामुळे कार्यक्षमतेवर काही मर्यादा आल्या.

आर्थिक उदारीकरण आणि संरचनात्मक सुधारणा (1991–2000)

1991 च्या आर्थिक संकटानंतर भारताने उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरणाच्या दिशेने पावले उचलली. या पार्श्वभूमीवर बँकिंग क्षेत्रात व्यापक सुधारणा सुरू झाल्या.

नरसिंहम समिती (1991 व 1998) यांनी पुढील शिफारशी केल्या:

1. भांडवली पर्याप्तता प्रमाण (Capital Adequacy Ratio) लागू करणे
2. अनुत्पादक मालमत्ता (NPA) मोजण्यासाठी स्पष्ट निकष
3. बँकिंग क्षेत्रात स्पर्धा वाढविणे
4. खासगी आणि परकीय बँकांना परवानगी

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

या टप्प्यात बँकिंग क्षेत्राने आंतरराष्ट्रीय मानकांनुसार स्वतःला सुसंगत केले. पारदर्शक लेखापद्धती आणि जोखीम व्यवस्थापन प्रणाली विकसित झाल्या.

तंत्रज्ञानाधारित आधुनिकीकरण (2000–2010)

2000 नंतर भारतीय बँकिंग व्यवस्थेत कोअर बँकिंग सोल्युशन (CBS), इंटरनेट बँकिंग, ATM नेटवर्क आणि इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर प्रणालीचा प्रसार झाला. या काळात डिजिटल व्यवहारांची सुरुवात, RTGS आणि NEFT प्रणाली लागू, ग्राहक सेवा सुधारणा, तंत्रज्ञानामुळे व्यवहार गतीमान झाले आणि सेवा वितरण अधिक प्रभावी झाले.

NPA संकट आणि नियामक पुनर्रचना (2010–2018)

2010 नंतर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये अनुत्पादक मालमत्तेची (NPA) समस्या गंभीर झाली. मोठ्या उद्योगांना दिलेल्या कर्जांमध्ये परतफेडीची अडचण निर्माण झाली. यासाठी खालील उपाययोजना करण्यात आल्या: मालमत्ता गुणवत्ता पुनरावलोकन (AQR), दिवाळखोरी आणि दिवाळे प्रक्रिया संहिता (IBC) 2016, पुनर्भांडवलीकरण योजना या सुधारणांमुळे बँकिंग व्यवस्थेत पारदर्शकता वाढली आणि जोखीम व्यवस्थापन अधिक मजबूत झाले.

डिजिटल आणि समावेशक बँकिंगचा काळ (2015 नंतर)

डिजिटल क्रांतीमुळे बँकिंग क्षेत्रात मूलभूत बदल घडले. National Payments Corporation of India (NPCI) ने विकसित केलेल्या UPI प्रणालीमुळे तात्काळ डिजिटल पेमेंट्स शक्य झाले. प्रधानमंत्री जनधन योजना (PMJDY) मुळे कोट्यवधी लोक बँकिंग व्यवस्थेत समाविष्ट झाले. JAM (Jan Dhan–Aadhaar–Mobile) मॉडेलमुळे थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रणाली प्रभावी ठरली.

हरित वित्त आणि शाश्वत बँकिंग (2020 नंतर)

हवामान बदल आणि पर्यावरणीय प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर बँकिंग क्षेत्रात हरित वित्त (Green Finance) आणि ESG निकषांना महत्त्व प्राप्त झाले. ग्रीन बॉण्ड्स जारी करणे, पर्यावरणपूरक प्रकल्पांना प्राधान्य कर्ज, सामाजिकदृष्ट्या जबाबदार गुंतवणूक यामुळे बँकिंग सुधारणा आता पर्यावरणीय व सामाजिक जबाबदारीशी जोडल्या गेल्या आहेत. भारतातील बँकिंग सुधारणा ही एक सतत चालणारी आणि बहुआयामी प्रक्रिया आहे. राष्ट्रीयीकरणाच्या सामाजिक उद्दिष्टांपासून ते उदारीकरणाच्या स्पर्धात्मक सुधारणांपर्यंत, NPA व्यवस्थापनापासून डिजिटल क्रांतीपर्यंत आणि हरित वित्ताच्या संकल्पनेपर्यंत, प्रत्येक टप्प्याने बँकिंग क्षेत्र अधिक सक्षम व आधुनिक केले आहे. आज भारतीय बँकिंग व्यवस्था आर्थिक स्थैर्य, डिजिटल समावेशन आणि शाश्वत विकास या तिन्ही स्तंभांवर आधारित आहे. ही ऐतिहासिक वाटचाल भारताच्या विकसित अर्थव्यवस्थेकडे जाणाऱ्या प्रवासाचा महत्त्वाचा पाया ठरते.

वित्तीय नियमनाची संरचना आणि महत्त्व

- भारतीय वित्तीय नियमन ही बहुस्तरीय प्रणाली आहे.
- भारतीय रिझर्व्ह बँक – बँकिंग व चलनविषयक धोरण
- भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ – भांडवली बाजार नियंत्रण
- विमा नियामक आणि विकास प्राधिकरण – विमा क्षेत्र नियमन

भारतीय अर्थव्यवस्था अधिक खुली, डिजिटल आणि जागतिक बाजाराशी जोडलेली झाल्यामुळे वित्तीय क्षेत्रातील जोखीम, संधी आणि व्यवहारांचे स्वरूपही अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. या पार्श्वभूमीवर आधुनिक वित्तीय नियमन (Modern Financial Regulation) ही केवळ नियंत्रणाची यंत्रणा नसून आर्थिक स्थैर्य, ग्राहक संरक्षण, तांत्रिक सुरक्षितता आणि शाश्वत विकास यांचा संतुलित समन्वय साधणारी व्यापक चौकट बनली आहे.

पूर्वीचे नियमन मुख्यतः बँकांच्या कार्यपद्धतीवर लक्ष केंद्रित करत होते; परंतु आजचे नियमन हे "संपूर्ण वित्तीय परिसंस्था" (Financial Ecosystem) लक्षात घेऊन तयार केले जाते. यामध्ये बँका, भांडवली बाजार, विमा, फिनटेक कंपन्या, डिजिटल पेमेंट प्लॅटफॉर्म आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूक यांचा समावेश होतो.

वित्तीय नियमनाची संस्थात्मक रचना

भारतातील आधुनिक वित्तीय नियमन बहुस्तरीय आणि समन्वयात्मक आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

बँकिंग व चलन नियंत्रण

भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) ही केंद्रीय बँक असून ती चलनविषयक धोरण, बँकिंग परवाने, भांडवली पर्याप्तता, तरलता व्यवस्थापन आणि सायबर सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करते. RBI बँकांची तपासणी, निरीक्षण आणि जोखीम मूल्यांकन करते.

भांडवली बाजार नियमन

भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (SEBI) भांडवली बाजारातील पारदर्शकता, गुंतवणूकदार संरक्षण आणि सूचीबद्ध कंपन्यांच्या अहवाल पद्धतीवर नियंत्रण ठेवते.

विमा व पेन्शन क्षेत्र

विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (IRDAI) विमा कंपन्यांचे नियमन करते, तर पेन्शन निधी विकास प्राधिकरण (PFRDA) निवृत्तीवेतन योजनांचे निरीक्षण करते.

वित्तीय स्थैर्य समन्वय

वित्तीय स्थैर्य आणि विकास परिषदेच्या (FSDC) माध्यमातून विविध नियामक संस्थांमध्ये समन्वय साधला जातो, ज्यामुळे प्रणालीगत जोखीम (Systemic Risk) कमी करता येते.

आधुनिक नियमनाची मुख्य उद्दिष्टे

1. **आर्थिक स्थैर्य राखणे –** बँकिंग संकट टाळणे व तरलता सुनिश्चित करणे.
2. **ग्राहक संरक्षण –** पारदर्शक व्यवहार व फसवणूक प्रतिबंध.
3. **जोखीम व्यवस्थापन –** क्रेडिट, बाजार, ऑपरेशनल व सायबर जोखीम नियंत्रण.
4. **डिजिटल सुरक्षा –** डेटा गोपनीयता व सायबर सुरक्षा फ्रेमवर्क.
5. **शाश्वत वित्त प्रोत्साहन –** ESG व हरित गुंतवणुकीस चालना.

जोखीम-आधारित नियमन (Risk-Based Regulation)

आधुनिक वित्तीय नियमनात "Risk-Based Supervision" पद्धतीचा अवलंब केला जातो. यामध्ये बँकांच्या जोखीम प्रोफाइलनुसार निरीक्षणाची तीव्रता ठरवली जाते. भांडवली पर्याप्तता प्रमाण (CAR), स्ट्रेस टेस्टिंग व तरलता कव्हरेज गुणोत्तर (LCR) या उपाययोजनांमुळे बँकांची आर्थिक सक्षमता वाढते आणि संभाव्य संकटाचा परिणाम कमी होतो.

डिजिटल आणि सायबर नियमन

डिजिटल व्यवहारांच्या वाढीमुळे सायबर जोखीमही वाढली आहे. RBI ने बँकांसाठी सायबर सुरक्षा धोरणे अनिवार्य केली आहेत.

प्रमुख घटक: डेटा एन्क्रिप्शन, मल्टी-फॅक्टर ऑथेंटिकेशन, फसवणूक मॉनिटरिंग प्रणाली, डिजिटल व्यवहारांचे रिअल-टाइम निरीक्षण, RegTech (Regulatory Technology) आणि SupTech (Supervisory Technology) चा वापर करून नियामक संस्था कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणावर व्यवहारांचे विश्लेषण करतात.

वित्तीय समावेशनातील भूमिका

आधुनिक नियमनाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे सर्वसमावेशक बँकिंग व्यवस्था उभारणे. लघु वित्त बँकांना परवाने, पेमेंट बँकांची स्थापना, डिजिटल ओळख प्रणालीद्वारे खाते उघडण्याची प्रक्रिया सुलभ यामुळे वंचित घटकांना वित्तीय सेवांमध्ये समाविष्ट केले गेले आहे.

शाश्वत वित्त आणि ESG नियमन

हवामान बदल आणि पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर वित्तीय नियमनात ESG (Environmental, Social, Governance) निकषांचा समावेश केला जात आहे. ग्रीन बॉण्ड्सचे नियमन, पर्यावरणीय जोखीम अहवाल अनिवार्य, कार्बन-तटस्थ प्रकल्पांना प्रोत्साहन हे नियमन बँकांना दीर्घकालीन स्थैर्य राखण्यास मदत करते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

आंतरराष्ट्रीय समन्वय

भारतीय नियामक संस्था जागतिक निकषांशी सुसंगत राहण्यासाठी बेसल समिती, IMF आणि इतर आंतरराष्ट्रीय संस्थांशी समन्वय साधतात. आंतरराष्ट्रीय स्तरावर, बेसल-III भांडवली निकष, जागतिक सायबर सुरक्षा मानके, मनी लॉन्डरिंग प्रतिबंध नियम हे सर्व भारतीय नियमनात समाविष्ट केले जातात.

नवा दृष्टिकोन (New View)

आधुनिक वित्तीय नियमन केवळ नियमांची अंमलबजावणी नसून "प्रतिबंधात्मक आणि भविष्यकालीन नियमन" (Proactive & Forward-Looking Regulation) बनले आहे. डिजिटल अर्थव्यवस्थेत वेगाने बदलणाऱ्या परिस्थितीला प्रतिसाद देण्यासाठी नियामकांना तंत्रज्ञान, डेटा विश्लेषण आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा प्रभावी वापर करावा लागतो.

भारतातील नियमन आता तीन स्तंभांवर आधारित आहे:

1. आर्थिक स्थैर्य 2. डिजिटल सुरक्षा 3. शाश्वत विकास

आधुनिक वित्तीय नियमनाची संरचना बहुआयामी, तंत्रज्ञानाधारित आणि जोखीम-संवेदनशील आहे. RBI, SEBI आणि IRDAI यांसारख्या संस्थांनी समन्वयाने कार्य करत आर्थिक स्थैर्य, ग्राहक संरक्षण आणि शाश्वत विकास साध्य करण्याचा प्रयत्न केला आहे. डिजिटल आणि हरित संक्रमणाच्या युगात सक्षम व लवचिक नियमन हीच भारतीय अर्थव्यवस्थेच्या दीर्घकालीन प्रगतीची गुरुकिल्ली ठरते.

4. NPA संकट आणि पुनर्रचना

2014–2018 दरम्यान भारतीय बँकिंग क्षेत्रात अनुत्पादक मालमत्ता (NPA) मोठ्या प्रमाणात वाढली. यासाठी पुढील उपाययोजना केल्या गेल्या. मालमत्ता गुणवत्ता पुनरावलोकन (AQR), IBC ची अंमलबजावणी, बँक पुनर्भांडवलीकरण यामुळे बँकिंग क्षेत्रात पारदर्शकता वाढली आणि जोखीम व्यवस्थापन सुधारले.

5. डिजिटल संक्रमण आणि बँकिंग क्रांती

डिजिटल संक्रमण (Digital Transformation) म्हणजे तंत्रज्ञानाच्या मदतीने आर्थिक, प्रशासकीय आणि सामाजिक प्रक्रियांमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणणे. बँकिंग क्षेत्रात हा बदल केवळ ऑनलाइन व्यवहारांपुरता मर्यादित नसून—डेटा-आधारित कर्जनिर्णय, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), ब्लॉकचेन, सायबर-सुरक्षा, डिजिटल चलन आणि फिनटेक भागीदारीपर्यंत विस्तारलेला आहे. भारतात डिजिटल बँकिंग क्रांती घडवून आणण्यात भारतीय रिझर्व्ह बँक (RBI), National Payments Corporation of India (NPCI) आणि सरकारच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचा मोठा वाटा आहे.

डिजिटल संक्रमणाची पार्श्वभूमी

उदारीकरणानंतरची बँकिंग सुधारणा

1991 नंतर स्पर्धात्मकता, पारदर्शकता आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यात आला. कोअर बँकिंग सोल्यूशन (CBS) मुळे देशातील सर्व शाखा एकमेकांशी जोडल्या गेल्या.

मोबाईल आणि इंटरनेट क्रांती

स्मार्टफोन आणि इंटरनेट स्वस्त झाल्याने मोबाईल बँकिंग, नेट बँकिंग आणि डिजिटल वॉलेट्स लोकप्रिय झाले.

UPI आणि डिजिटल पेमेंट्स

UPI आणि डिजिटल पेमेंट्स क्रांती National Payments Corporation of India (NPCI) ने UPI प्रणाली विकसित केली. भारतीय रिझर्व्ह बँक च्या देखरेखीखाली डिजिटल व्यवहार सुरक्षित बनले.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

https://www.istockphoto.com/vector/contactless-payment-online-digital-payment-through-card-and-upi-and-use-bar-codes-gm2182278847-601236032

Unified Payments Interface (UPI) ही भारतातील सर्वात मोठी डिजिटल पेमेंट प्रणाली ठरली आहे.

UPI ची वैशिष्ट्ये: रिअल-टाइम व्यवहार, 24x7 उपलब्धता, कमी खर्च, QR कोड आधारित सोय

परिणाम: रोख व्यवहारात घट, सूक्ष्म व लघु उद्योजकांना प्रोत्साहन, पारदर्शकता आणि करसंकलन वाढ

डिजिटल संक्रमणाचे फायदे:

a) व्यवहारांचा खर्च कमी: नोटा छपाई, वाहतूक, सुरक्षित साठवण यांचा खर्च कमी होतो. बँक शाखेत जाऊन व्यवहार करण्याची गरज कमी, वेळ व प्रवास खर्च वाचतो. UPI, मोबाईल बँकिंगमुळे सेकंदांत निधी हस्तांतरण होतो. NEFT/RTGS सारख्या प्रणालींची प्रक्रिया अधिक सुलभ बनली आहे. शासकीय योजनांमध्ये थेट लाभ हस्तांतरण (DBT) → मध्यस्थ कमी → वितरण खर्चात घट.

b) पारदर्शकता वाढ: सर्व व्यवहारांचा इलेक्ट्रॉनिक ट्रेल उपलब्ध असल्यामुळे ऑडिट आणि लेखापरीक्षण सोपे झाले आहे. DBT मुळे निधी थेट लाभार्थ्यांच्या खात्यात पोहचत असल्यामुळे लाचलुचपत व फसवणूक कमी होण्यास मदत
झाली आहे. डिजिटल व्यवहारांमुळे उत्पन्नाच्या नोंदीच्या स्पष्टतेमुळे करचुकवेगिरीवर नियंत्रण आले आहे. त्यामुळे कर संकलांनात सुधारणा होत आहे.

c) आर्थिक समावेशन: सर्वांसाठी बँकिंग सेवामुळे जनधन खाते, मोबाईल बँकिंग, आधार-सक्षम पेमेंट्स, गरीब, महिला आणि लघु उद्योजकांना औपचारिक अर्थव्यवस्थेत स्थान निर्माण झाले आहे. डिजिटल डेटा वापरून क्रेडिट स्कोअर तयार केला जात असल्याने लघु कर्ज आणि सूक्ष्म विमा सहज उपलब्ध होत आहे.

d) ग्रामीण भागात वित्तीय प्रवेश: दुर्गम भागात शाखेविना डिजिटल सेवा उपलब्ध होत असल्याने खाते उघडणे, कर्जासाठी अर्ज, पेमेंट्स एका ठिकाणी यासारख्या सुविधा निर्माण होत आहेत. स्मार्टफोनद्वारे बँकिंग सेवा घरबसल्या उपलब्ध झाल्यामुळे ग्रामीण बाजारपेठ डिजिटल अर्थव्यवस्थेत सहभागी झाली आहे.

शाश्वत विकास आणि हरित वित्त (Green Finance)

शाश्वत विकास म्हणजे वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम न होऊ देता आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय संतुलन राखणे. जागतिक स्तरावर 2015 मध्ये United Nations ने Sustainable Development Goals (SDGs) निश्चित केले.

शाश्वत विकासाचे तीन मुख्य स्तंभ:

आर्थिक विकास (Economic Growth)

सामाजिक समावेशन (Social Inclusion)

पर्यावरण संरक्षण (Environmental Protection)

भारतामध्ये अक्षय ऊर्जा, जलसंधारण, हरित शहरे, कार्बन उत्सर्जन कमी करणे यावर भर दिला जात आहे. शाश्वत विकासाच्या उद्दिष्टासाठी बँका हरित प्रकल्पांना निधी पुरवत आहेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

हरित वित्ताचे घटक

अ) ग्रीन बाँड्स

ग्रीन बाँड्स हे पर्यावरणपूरक प्रकल्पांसाठी निधी उभारण्यासाठी जारी केलेले कर्जरोखे आहेत. सौर, पवन ऊर्जा, स्वच्छ वाहतूक व हरित पायाभूत सुविधा यांना वित्तपुरवठा करण्यासाठी त्यांचा वापर होतो. यामुळे शाश्वत प्रकल्पांना दीर्घकालीन निधी उपलब्ध होतो आणि गुंतवणूकदारांचा विश्वास वाढतो. भारतात सरकार व भारतीय रिझर्व्ह बँक यांच्या पुढाकाराने ग्रीन बाँड्सला प्रोत्साहन दिले जात आहे. मात्र, ग्रीनवॉशिंगचा धोका आणि प्रमाणित मूल्यांकनाची गरज ही आव्हाने आहेत.

ब) ESG गुंतवणूक

ESG (Environmental, Social, Governance) निकषांच्या आधारे गुंतवणूक करण्याची पद्धत म्हणजे ESG गुंतवणूक. यात पर्यावरण संरक्षण, सामाजिक जबाबदारी आणि सुशासन या घटकांचा विचार केला जातो. यामुळे कंपन्यांची दीर्घकालीन स्थिरता व जोखीम व्यवस्थापन सुधारते. भारतात Securities and Exchange Board of India (SEBI) कडून BRSR अहवाल बंधनकारक करण्यात आला आहे. तथापि, ESG मोजमापातील एकसमान निकषांचा अभाव हे मोठे आव्हान आहे.

क) कार्बन क्रेडिट वित्तपुरवठा

कार्बन क्रेडिट प्रणालीत उद्योग उत्सर्जन कमी करून प्रमाणित क्रेडिट मिळवतात, जे बाजारात विकले जाऊ शकतात. यामुळे कार्बन उत्सर्जनात घट होते आणि हरित प्रकल्पांना अतिरिक्त उत्पन्न मिळते. भारत कार्बन बाजार विकसित करत आहे. मात्र, मापन व पडताळणी प्रक्रिया गुंतागुंतीची असून किंमत अस्थिरता हे प्रमुख अडथळे आहेत. ग्रीन बाँड्स, ESG गुंतवणूक आणि कार्बन क्रेडिट वित्तपुरवठा हे शाश्वत अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. हे पर्यावरणीय संरक्षणासोबतच आर्थिक स्थैर्य व जबाबदार गुंतवणूक संस्कृतीला चालना देतात. बँकिंग सुधारणा आता पर्यावरणीय जोखीम मूल्यांकनाशी जोडल्या जात आहेत.

वित्तीय समावेशन आणि सामाजिक परिणाम

प्रधानमंत्री जनधन योजना, डिजिटल ओळख प्रणाली आणि थेट लाभ हस्तांतरण (DBT) यामुळे ग्रामीण व वंचित घटक बँकिंग व्यवस्थेत समाविष्ट झाले. वित्तीय समावेशन म्हणजे समाजातील प्रत्येक घटकाला विशेषतः महिला, ग्रामीण गरीब, लघुउद्योजक यांना बँकिंग, कर्ज, विमा आणि डिजिटल वित्तीय सेवांचा समान प्रवेश मिळणे. हे केवळ आर्थिक सुविधा उपलब्ध करून देणे नसून सामाजिक व आर्थिक परिवर्तनाची प्रक्रिया आहे. खालील तीन मुद्द्यांद्वारे त्याचे परिणाम सविस्तरपणे स्पष्ट होतात:

वित्तीय समावेशनामुळे:

अ) महिलांचे आर्थिक सक्षमीकरण:

वित्तीय समावेशनामुळे महिलांच्या जीवनात व्यापक बदल घडून येतात. पूर्वी अनेक ग्रामीण महिलांकडे स्वतःचे बँक खाते नव्हते, त्यामुळे त्या आर्थिक व्यवहारांसाठी कुटुंबातील पुरुषांवर अवलंबून असत. आज बँक खाते, जनधन योजना, स्वयं-साहाय्य गट (SHG), मायक्रोफायनान्स संस्था यामुळे महिलांना थेट आर्थिक प्रवेश मिळाला आहे. आर्थिक स्वावलंबनामुळे समाजातील महिलांचा सन्मान वाढतो. वित्तीय सक्षमीकरणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि त्यांचे सामाजिक-आर्थिक सशक्तीकरण घडते.

ब) ग्रामीण उद्योजकतेला चालना:

ग्रामीण भागात बँकिंग सुविधा आणि कर्ज उपलब्ध झाल्यामुळे लघुउद्योगांना नवे आयाम मिळाले आहेत. पूर्वी कर्जासाठी सावकारांवर अवलंबून राहावे लागे, ज्यामुळे उच्च व्याजदराचा बोजा सहन करावा लागत असे. वित्तीय समावेशनामुळे औपचारिक बँकिंग प्रणालीमार्फत सुलभ व पारदर्शक कर्ज उपलब्ध झाले. गावातच रोजगार उपलब्ध झाल्यामुळे शहरांकडे स्थलांतर कमी होते. मोबाईल बँकिंग व UPIमुळे ग्रामीण व्यवसाय डिजिटल पद्धतीने चालू लागले. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक स्वावलंबी व स्थिर बनते.

क) बचतीची सवय वाढ:

वित्तीय समावेशनाचा सर्वात महत्त्वाचा परिणाम म्हणजे बचतीची सवय निर्माण होणे. बँक खाते उपलब्ध झाल्यामुळे लोक रोख रक्कम घरात न ठेवता सुरक्षितपणे बँकेत ठेवू लागले आहेत. नियमित बचतीवर व्याज मिळते, ज्यामुळे संपत्ती हळूहळू वाढते. नियमित बचत करण्याची मानसिकता तयार होते. बचतीची सवय दीर्घकालीन आर्थिक स्थैर्याचा पाया ठरते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

महिलांचे सक्षमीकरण, ग्रामीण उद्योजकतेची वाढ आणि बचतीची सवय हे तिन्ही घटक परस्परांशी संबंधित आहेत. महिलांनी व्यवसाय सुरू केल्यास उत्पन्न वाढते, त्यातून बचत होते आणि ती बचत पुढील गुंतवणुकीसाठी वापरली जाते. अशा प्रकारे वित्तीय समावेशन ग्रामीण विकासाचा आणि सामाजिक परिवर्तनाचा प्रभावी साधन ठरतो.

सायबर सुरक्षा आणि नियामक आव्हाने

डिजिटल अर्थव्यवस्थेच्या वेगवान विस्तारामुळे भारतीय बँकिंग आणि वित्तीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर तांत्रिक प्रगती झाली आहे. मोबाईल बँकिंग, इंटरनेट व्यवहार, UPI प्रणाली, क्लाऊड कम्प्युटिंग आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा वापर वाढल्याने व्यवहार प्रक्रिया सुलभ, जलद आणि पारदर्शक झाली आहे. परंतु या डिजिटल विस्तारासोबत सायबर जोखमींचे प्रमाणही लक्षणीय वाढले आहे. त्यामुळे सायबर सुरक्षा आणि त्यासंबंधित नियामक आव्हाने हे आधुनिक वित्तीय व्यवस्थेचे केंद्रस्थानी विषय बनले आहेत.

भारतातील बँकिंग क्षेत्राचे नियमन करणारी भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) डिजिटल जोखीम व्यवस्थापनासाठी विविध मार्गदर्शक तत्त्वे लागू करते. RBI ने बँकांना सायबर सुरक्षा धोरण (Cyber Security Framework) तयार करणे, आयटी गव्हर्नन्स मजबूत करणे, नियमित सायबर ऑडिट करणे आणि रिअल-टाइम फसवणूक निरीक्षण प्रणाली लागू करणे अनिवार्य केले आहे.

सायबर धोक्यांचे प्रकार

भारतीय वित्तीय क्षेत्रासमोरील प्रमुख सायबर धोके पुढीलप्रमाणे आहेत:

1. फिशिंग आणि सोशल इंजिनिअरिंग – ग्राहकांची वैयक्तिक माहिती फसवणुकीने मिळविणे.

2. मालवेअर व रॅन्समवेअर हल्ले – संगणक प्रणाली लॉक करून आर्थिक खंडणी मागणे.

3. डेटा चोरी (Data Breach) – ग्राहकांची गोपनीय माहिती अनधिकृतरीत्या मिळवणे.

4. डिजिटल पेमेंट फसवणूक – OTP, QR कोड किंवा बनावट ॲपद्वारे फसवणूक.

5. Distributed Denial of Service (DDoS) हल्ले – बँकिंग सर्व्हर निष्क्रिय करणे.

डिजिटल व्यवहारांचे संचालन करणाऱ्या National Payments Corporation of India (NPCI) ने मल्टी-फॅक्टर ऑथेंटिकेशन, व्यवहार मर्यादा आणि रिअल-टाइम मॉनिटरिंग प्रणाली लागू करून सुरक्षेची पातळी वाढवली आहे.

नियामक आव्हाने

सायबर सुरक्षेच्या संदर्भात नियामक संस्थांना पुढील आव्हानांचा सामना करावा लागतो:

(अ) तांत्रिक वेग आणि नियमनातील अंतर

फिनटेक कंपन्या आणि डिजिटल प्लॅटफॉर्म अत्यंत वेगाने विकसित होत आहेत. नियामक चौकट अनेकदा या तांत्रिक बदलांपेक्षा मागे राहते. त्यामुळे “Innovation vs Regulation” यामध्ये संतुलन राखणे आवश्यक ठरते.

(ब) डेटा गोपनीयता आणि ग्राहक संरक्षण

डिजिटल व्यवहारांमध्ये मोठ्या प्रमाणात वैयक्तिक डेटा वापरला जातो. डेटा लीक झाल्यास ग्राहकांचा विश्वास डळमळीत होऊ शकतो. त्यामुळे मजबूत डेटा संरक्षण कायदे आणि अंमलबजावणी यंत्रणा आवश्यक आहे.

(क) आंतरराष्ट्रीय सायबर गुन्हे

सायबर गुन्हे सीमापार स्वरूपाचे असतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि माहितीची देवाणघेवाण आवश्यक आहे.

(ड) क्रिप्टोकरन्सी व डिजिटल मालमत्ता

क्रिप्टो व्यवहार पारंपरिक बँकिंग व्यवस्थेबाहेर होत असल्यामुळे त्यांचे निरीक्षण आणि नियंत्रण करणे कठीण ठरते.

आधुनिक उपाययोजना

आधुनिक नियमन “जोखीम-आधारित निरीक्षण” (Risk-Based Supervision) या पद्धतीवर आधारित आहे. RBI ने बँकांना मुख्य माहिती सुरक्षा अधिकारी (CISO) नियुक्त करणे आणि सायबर सुरक्षा समित्या स्थापन करणे अनिवार्य केले आहे.

1) ग्रामीण समावेश व Lead Bank Scheme मध्ये पुनर्रचना

RBI ने Lead Bank Scheme मध्ये बदलांचे प्रस्ताव जाहीर करताना काही ठळक पावले उचलली — ‘No Due’ प्रमाणपत्रे मागण्यावर बंदी, नवीन शाखांचा टक्का टायर 5–6 मधील केंद्रांमध्ये उघडण्याचे बँकांना निर्देश, आणि ग्रामीण व उपनगरीय

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

क्रियाकलापांसाठी किमान CD (credit-deposit) प्रमाणात सुधारणा यांचा समावेश आहे. या बदलांचा उद्देश ग्रामीण कर्जप्रवेश सुलभ करणे आणि आर्थिक समावेश वाढविणे हा आहे.

2) हरित निधी — Framework for Acceptance of Green Deposits

RBI ने 1जून 2023 पासून 'Green Deposits' स्वीकारण्यासाठी मार्गदर्शक तत्वे जारी केली. ज्यात रेग्युलेटेड एंटिटींनी ग्रीन प्रोजेक्ट्सना निधी कसा वापरला जातो हे पारदर्शकपणे जाहीर करावे अशी अपेक्षा आहे. हरित डिपॉझिट्समुळे वित्तीय संस्थांना पर्यावरणपूरक प्रकल्पांना निधी देण्यास प्रोत्साहन मिळते परंतु यासाठी पारदर्शकता व अंमलबजावणी आवश्यक आहे.

3) डिजिटल चलन — e₹ (Digital Rupee / CBDC)

रिझर्व्ह बँकेने डिजिटल रुपयासंबंधी पात्रता व तांत्रिक घटक स्पष्ट केले आहेत; **e₹** हा केंद्रप्रवर्तित डिजिटल चलन असून व्यवहारांत मूळ रोखसमान गुणधर्म राखतो. यामुळे डिजिटल व्यवहारांची तीव्रता वाढेल आणि नाणेनियम व व्यवहार पारदर्शकता दोन्ही सुधारण्यास मदत मिळेल.

4) डिजिटल लेंडिंग व फिनटेक नियमन, Regulatory Sandbox (On-Tap)

RBI ने डिजिटल लेंडिंगसाठी दिशा-निर्देश कडक केले आणि सँडबॉक्स मोडेलमध्ये 'On-Tap' सुविधा सुरु केली, ज्यामुळे सातत्यपूर्ण नवोपक्रमाला परवानगी देऊन नियामक निरीक्षण वाढवता येईल. डिजिटल कर्जाच्या भागात ग्राहक संरक्षण आणि पारदर्शकता अधिक महत्त्वाची बनली आहे.

5) ग्राहक संरक्षण व मिस-सेलिंग विरोधी उपाय

RBI ने बँकांच्या विक्री-पद्धती (sales practices) साठी कडक नियमांचा मसुदा दिला आहे. डार्क-पॅटर्न मार्केटिंगवर बंदी, ग्राहक-प्रोफाइलनुसार उत्पादनांची जुळवणी, आणि मिस-सेलिंग रोखण्यासाठी बंधने. हे उपक्रम ग्राहकांच्या हिताचे रक्षण करतात परंतु बँकांना त्यांच्या मार्केटिंग व उत्पादन रचना बदलण्यास भाग पाडतील.

भविष्यातील दिशा

सायबर सुरक्षा ही केवळ तांत्रिक संरक्षण नसून आर्थिक स्थैर्याचा मूलभूत घटक बनली आहे. डिजिटल व्यवहार वाढत असताना सुरक्षितता, गोपनीयता आणि पारदर्शकता राखणे अत्यावश्यक आहे.

भविष्यातील नियामक धोरण पुढील बाबींवर केंद्रित राहील:

कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित जोखीम विश्लेषण, ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा सुरक्षित वापर, ग्राहक जागरूकता अभियान, सायबर धोके ओळखण्यासाठी रिअल-टाइम डेटा विश्लेषण. सायबर सुरक्षा आणि नियामक आव्हाने ही आधुनिक बँकिंग व्यवस्थेची अपरिहार्य वास्तवता आहे. डिजिटल अर्थव्यवस्थेत विश्वास टिकवण्यासाठी मजबूत सायबर सुरक्षा फ्रेमवर्क, प्रभावी नियामक धोरण आणि तांत्रिक नवकल्पना यांचा समन्वय आवश्यक आहे. भारतीय वित्तीय प्रणालीची दीर्घकालीन स्थिरता ही "सुरक्षित डिजिटल व्यवहार + सक्षम नियमन + ग्राहक विश्वास" या त्रिसूत्रीवर अवलंबून आहे.

नवा दृष्टिकोन: एकात्मिक शाश्वत-डिजिटल बँकिंग मॉडेल

भारतीय अर्थव्यवस्थेच्या भविष्यासाठी खालील धोरणे महत्त्वाची आहेत:

अ) डिजिटल पायाभूत सुविधा (ग्रामीण)

भारतनेट, मोबाईल इंटरनेट, CSC केंद्रांमुळे गावपातळीवर बँकिंग सेवा उपलब्ध, ई-केवायसी, आधार प्रमाणीकरणामुळे खाते उघडणे सुलभ, UPI व मोबाईल बँकिंगमुळे रोख व्यवहार कमी.

आव्हाने: इंटरनेट तफावत, डिजिटल साक्षरतेचा अभाव, सायबर धोके.

ब) ESG आधारित कर्ज मूल्यांकन

पर्यावरण (E): कार्बन उत्सर्जन, ऊर्जा कार्यक्षमता, सामाजिक (S): रोजगार, लिंग-समानता, कामगार हक्क, प्रशासन (G): पारदर्शकता, ऑडिट, जबाबदारी.

लाभ: दीर्घकालीन जोखीम कमी, हरित प्रकल्पांना प्रोत्साहन. **आव्हाने:** ग्रीनवॉशिंग, मानकीकरणाचा अभाव.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

क) सायबर विमा व जोखीम फंड

सायबर हल्ल्यांमुळे होणाऱ्या नुकसानीसाठी संरक्षण, डिजिटल फसवणुकीवर आर्थिक भरपाई, बँकिंग क्षेत्रासाठी राखीव जोखीम निधी. **आव्हाने:** जोखीम मूल्यांकन व प्रीमियम निर्धारण.

ड) कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित नियमन

फसवणूक ओळखण्यासाठी मशीन लर्निंग, रिअल-टाइम अनुपालन तपासणी, पर्यायी डेटा वापरून क्रेडिट स्कोअरिंग. **आव्हाने:** डेटा गोपनीयता.

निष्कर्ष

भारतीय बँकिंग सुधारणा आणि वित्तीय नियमन ही केवळ प्रशासकीय सुधारणा नसून देशाच्या शाश्वत आणि डिजिटल भवितव्याची पायाभरणी आहे. बँकिंग सुधारणा आणि वित्तीय नियमन हे भारतीय अर्थव्यवस्थेच्या शाश्वत व डिजिटल संक्रमणाचे केंद्रबिंदू ठरले आहेत. Reserve Bank of India आणि Ministry of Finance यांच्या समन्वयातून राबविण्यात आलेल्या धोरणांमुळे बँकिंग क्षेत्रात संरचनात्मक बदल घडत आहेत. डिजिटल रुपया (CBDC), डिजिटल लेंडिंग नियम, ग्रीन डिपॉझिट फ्रेमवर्क आणि रेग्युलेटरी सँडबॉक्स यांसारख्या उपाययोजनांनी नवोपक्रमाला चालना मिळाली आहे. या सुधारणा आर्थिक समावेशन अधिक व्यापक करत असून ग्रामीण आणि दुर्बल घटकांपर्यंत वित्तीय सेवा पोहोचत आहेत. महिलांचे सक्षमीकरण, लघुउद्योजकतेला चालना आणि बचतीची सवय वाढविण्यात यांचा सकारात्मक परिणाम दिसून येतो. हरित वित्ताच्या माध्यमातून पर्यावरणपूरक प्रकल्पांना निधी मिळत असून दीर्घकालीन शाश्वत विकासाची पायाभरणी होत आहे. डिजिटल व्यवहारांच्या वाढीमुळे पारदर्शकता आणि कार्यक्षमता सुधारली असली तरी सायबर सुरक्षा व डेटा गोपनीयता ही महत्त्वाची आव्हाने आहेत. ग्रीनवॉशिंग आणि अनुपालन खर्च यांसारख्या समस्यांवर प्रभावी नियंत्रण आवश्यक आहे. नियमन फार कडक नसावे आणि फार सैलही नसावे, हा समतोल राखणे अत्यावश्यक आहे. RBI च्या प्रभावी नियमनामुळे, डिजिटल तंत्रज्ञानाच्या अंगीकारामुळे आणि हरित वित्तीय धोरणांमुळे भारत विकसित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करीत आहे.

योग्य धोरणात्मक दृष्टीकोन, तांत्रिक सक्षमता आणि नागरिकांची डिजिटल साक्षरता यांचा संगम झाल्यास भारतीय बँकिंग व्यवस्था अधिक सक्षम आणि स्पर्धात्मक बनेल. अशा प्रकारे बँकिंग सुधारणा हे विकसित आणि शाश्वत भारताच्या स्वप्नाची भक्कम पायाभरणी ठरतील.

संदर्भ सूची

1. www.rbidocs.rbi.org.in
2. Reserve Bank of India — Inter-operable / On-Tap Regulatory Sandbox (IoRS / On-Tap sandbox guidance).
3. Press Information Bureau — Press release: Banking Laws (Amendment) Act, 2025. (बँकिंग कायद्यातील प्रमुख सुधारणा आणि त्यांच्या प्रमुख तरतुदींचे सरकारद्वारे प्रकाशन).
4. https://www.rbi.org.in/Scripts/BS_PressReleaseDisplay.aspx?prid=54315%EF%BF%BD
5. The Economic Times — News: RBI overhauls Lead Bank Scheme; push for rural outlets & CD rules. (Lead Bank Scheme मधील सुधारणा — ग्रामीण समावेशन व शाखा धोरणांविषयी बातमी / विश्लेषण).
6. World Bank — Global Findex / Global Financial Inclusion database (latest edition). (वित्तीय समावेशनाच्या आंतरराष्ट्रीय आकडेवारीसाठी Global Findex — बचत, खाताधारक व पेमेंट ट्रेन्ड्सचे डेटासेट).
7. NABARD – All India Rural Financial Inclusion Survey (NAFIS)
8. https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/1609213001NAFIS_Report_2024-25 (ग्रामीण वित्तीय समावेशन आणि घरगुती सर्वेक्षणाचे निष्कर्ष).
9. PwC India — The Indian Payments Handbook (2025–2030) / Payment's ecosystem report. (डिजिटल पेमेंट्स आणि भविष्यातील पेमेंट ट्रेंड्सचे विस्तृत उद्योग-विश्लेषण).

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

शेअर बाजारातील कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) क्रांती : संधी आणि आव्हाने

समाधान रामदास कांडेकर
(वाणिज्य विभाग), श्री ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे, शिक्षणमहर्षी दादापाटील केदार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय दोडी बु ता. सिन्नर जि. नाशिक
Email: samadhan.kandekar01@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180224
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 116-121
February- 2026
Submitted: 08 Jan. 2026
Revised: 18 Jan. 2026
Accepted: 05 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश:

शेअर बाजारातील कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI) हा एक महत्त्वाचा आणि वेगाने विकसित होणारा विषय आहे. सध्या जागतिक स्तरावर अमेरिकेतील ७०% ते ८०% आणि भारतातील सुमारे ५०% ते ६०% व्यवहार (NSE नुसार) हे AI आणि अल्गोरिदमद्वारे केले जातात. या संशोधन पेपरचा मुख्य उद्देश, AI तंत्रज्ञानाचा शेअर बाजारातील वापर त्यातून निर्माण होणाऱ्या संधी आणि त्यासोबत येणाऱ्या आव्हानांचे सखोल विश्लेषण करणे, तसेच मशीन लर्निंग (Machine Learning), डीप लर्निंग (Deep Learning), नैसर्गिक भाषा प्रक्रिया आणि डेटा विश्लेषण यांसारख्या AI-आधारित साधनांचा अभ्यास करतो, ज्यांचा वापर सध्या बाजाराच्या ट्रेंडचे भाकीत करण्यासाठी, मोठ्या प्रमाणात आर्थिक डेटाचे विश्लेषण करण्यासाठी आणि स्वयंचलित व्यापारिक निर्णय घेण्यासाठी केला जातो. या तंत्रज्ञानामुळे गुंतवणूकदारांना आणि वित्तीय संस्थांना ऐतिहासिक डेटा आणि वर्तमान बाजारातील भावना यांचे अधिक अचूक आणि माहितीपूर्ण विश्लेषण करणे शक्य झाले आहे.

AI चा वापर अल्गोरिथमिक ट्रेडिंग (Algorithmic Trading) मध्ये एक क्रांती घडवून आणत आहे, जिथे मानवी हस्तक्षेपाशिवाय अत्यंत वेगाने व्यवहार केले जातात, ज्यामुळे बाजाराची कार्यक्षमता लक्षणीयरीत्या वाढते. त्याचप्रमाणे, जोखीम व्यवस्थापन आणि पोर्टफोलिओ व्यवस्थापन यांसारख्या क्षेत्रांमध्ये AI चा उपयोग संभाव्य धोके ओळखण्यासाठी आणि वैयक्तिकृत गुंतवणूक धोरणे तयार करण्यासाठी केला जातो. तथापि, या तंत्रज्ञानासोबत काही मोठी आणि जटिल आव्हानेही आहेत. जसे डेटाची गुणवत्ता, डेटा गोपनीयता आणि सायबर हल्ल्यांचा धोका हे प्रमुख प्रश्न आहेत. याव्यतिरिक्त, 'ब्लॅक बॉक्स' मॉडेलची पारदर्शकता हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे, कारण AI प्रणालींचे निर्णय कसे घेतले जातात हे अनेकदा स्पष्ट नसते, ज्यामुळे त्यांच्यावर विश्वास ठेवणे कठीण होते. हा संशोधन पेपर AI च्या फायद्यांचे मूल्यमापन करून, भविष्यात हे तंत्रज्ञान शेअर बाजाराचे स्वरूप कसे बदलेल, याचा निष्कर्ष मांडतो. ज्यामुळे गुंतवणूकदार आणि नियामक संस्थाना महत्त्वपूर्ण अंतर्दृष्टी मिळते.

मुख्य शब्द: *शेअर बाजार, कृत्रिम बुद्धिमत्ता, मॉडेल्स, अल्गोरिदम ट्रेडिंग, पोर्टफोलिओ, मशीन लर्निंग, डीप लर्निंग*

प्रस्तावना:

गेल्या काही वर्षांपासून कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI) तंत्रज्ञानाने जवळपास प्रत्येक उद्योग क्षेत्रात मोठे बदल घडवून आणले आहेत आणि शेअर बाजार याला अपवाद नाही. पूर्वी शेअर बाजारात गुंतवणूक करणे हे मुख्यतः अनुभव आणि पारंपरिक आर्थिक मॉडेल्सवर अवलंबून होते. परंतु आता, AI च्या मदतीने हे क्षेत्र डेटा-आधारित, अधिक कार्यक्षम आणि स्वयंचलित झाले आहे. AI चा वापर डेटा विश्लेषण (Data Analysis), ट्रेडिंग स्ट्रॅटेजी (Trading Strategy), जोखीम व्यवस्थापन (Risk Management) आणि ग्राहक सेवा (Customer Service) यांसारख्या क्षेत्रांमध्ये क्रांती घडवत आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
समाधान रामदास कांडेकर, (वाणिज्य विभाग), श्री ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे, शिक्षणमहर्षी दादापाटील केदार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय दोडी बु ता. सिन्नर जि. नाशिक

How to cite this article:
कांडेकर, . समाधान . रामदास . (*2026*). शेअर बाजारातील कृत्रिम बुद्धिमत्ता (*AI*) क्रांती : संधी आणि आव्हाने. *Journal of Research & Development, 18(2(XXI)), 116–121. https://doi.org/10.5281/zenodo.19536231*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19536231
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

पारंपरिक आर्थिक विश्लेषण पद्धतींना बाजारातील प्रचंड आणि वेगवान डेटाचा सामना करणे कठीण जाते.

AI विशेषतः मशीन लर्निंग (ML) आणि डीप लर्निंग (DL) अल्गोरिदम, मोठ्या प्रमाणात ऐतिहासिक आणि वर्तमान आर्थिक डेटा (उदा. स्टॉक कींमती, व्हॉल्यूम) आणि अपारंपरिक डेटा (उदा. सोशल मीडियावरील भावना, बातम्यांचे शीर्षक, कॉर्पोरेट अहवाल) यांचे विश्लेषण करण्यासाठी सक्षम आहेत. हे तंत्रज्ञान बाजारातील सूक्ष्म पॅटर्न्स आणि ट्रेंड्स ओळखते, जे मानवी विश्लेषकासाठी शोधणे जवळपास अशक्य आहे. यामुळे, गुंतवणूकदार आणि आर्थिक संस्थांना बाजारातील ट्रेंड्सचे अधिक अचूक भाकीत (Accurate Market Trend Prediction) करणे, बाजारातील चढ-उतारांवर जलद प्रतिक्रिया देणे आणि जोखीम अधिक प्रभावीपणे व्यवस्थापित करणे शक्य झाले आहे.

अल्गोरिथमिक ट्रेडिंग (Algorithmic Trading) हे AI च्या सर्वात प्रमुख उपयोगांपैकी एक आहे, जिथे AI-आधारित अल्गोरिदम स्वयंचलितपणे मोठ्या प्रमाणात व्यवहार करतात, ज्यामुळे मानवी हस्तक्षेपाशिवाय जलद नफा मिळवणे शक्य होते. याशिवाय, जोखीम व्यवस्थापन मध्ये AI चा वापर पोर्टफोलिओतील संभाव्य नुकसानीचा अंदाज घेण्यासाठी, फसवणूक शोधण्यासाठी आणि अनुपालन सुनिश्चित करण्यासाठी केला जातो.

संशोधनाचे उद्दिष्टे:

१. शेअर बाजारात कृत्रिम बुद्धिमत्ताचा (AI)वापर कसा केला जातो हे समजून घेणे.
२. शेअर बाजारात AI च्या वापरामुळे निर्माण होणाऱ्या संधींचे विश्लेषण करणे.
३. शेअर बाजारात AI च्या वापरामुळे निर्माण झालेल्या आव्हानांचे विश्लेषण करणे.
४. शेअर बाजारातील AI च्या वर्तमान वापराचे मूल्यांकन करणे.

संशोधन पद्धती:

हा संशोधन पेपर तयार करण्यासाठी दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आलेला असून, त्यासाठी वर्तमानपत्रे, मासिके, पुस्तके, इंटरनेट या साधनांचा उपयोग केलेला आहे.

शेअर बाजारात AI चा वापर (Application of AI in the Stock Market):

१. अल्गोरिथमिक ट्रेडिंग (Algorithmic Trading):

AI-आधारित अल्गोरिदम मार्केट डेटाचे विश्लेषण करून, मानवी हस्तक्षेपाशिवाय खरेदी-विक्रीचे ऑर्डर स्वयंचलितपणे देतात. हे तंत्रज्ञान हाय-फ्रिक्वेन्सी ट्रेडिंग (High-Frequency Trading) साठी वापरले जाते, जिथे Milliseconds मध्ये हजारो व्यवहार होतात. मशीन लर्निंग मॉडेल्स ऐतिहासिक डेटाचे पॅटर्न (patterns) ओळखतात आणि भविष्यातील किंमतीचे भाकीत करण्यासाठी त्याचा वापर करतात.

२. जोखीम व्यवस्थापन (Risk Management):

AI मॉडेल्स पोर्टफोलिओची जोखीम ओळखतात आणि ती कमी करण्यासाठी शिफारसी करतात. ही मॉडेल्स सायबर सुरक्षा जोखमी (cyber security risks), फसवणूक आणि अनुपालन जोखमी (compliance risks) यांचे विश्लेषण करतात. उदाहरणार्थ, AI-आधारित प्रणाली मोठ्या प्रमाणात व्यवहारांचे विश्लेषण करून असामान्य नमुने (unusual patterns) शोधू शकतात, जे फसवणुकीचे संकेत देतात.

३. पोर्टफोलिओ व्यवस्थापन (Portfolio Management):

AI गुंतवणूकदारांच्या आर्थिक उद्दिष्टांनुसार आणि जोखमीच्या क्षमतेनुसार वैयक्तिकृत पोर्टफोलिओ तयार करते आणि त्याचे व्यवस्थापन करते. रोबो-ॲडव्हायझर्स (Robo-Advisors) हे AI-आधारित प्लॅटफॉर्म आहेत. जे गुंतवणूकदारांना स्वयंचलित पोर्टफोलिओ व्यवस्थापन सेवा देतात. हे प्लॅटफॉर्म बाजारातील परिस्थितीनुसार पोर्टफोलिओचे संतुलन (rebalancing) स्वयंचलितपणे राखतात. तसेच स्वयंचलित स्टॉप-लॉस (Automated Stop-Loss) जर बाजारात अचानक मोठी पडझड झाली, तर AI मानवी हस्तक्षेपाशिवाय त्वरित व्यवहार थांबवते, जेणेकरून नुकसान मर्यादित राहते.

४. बाजार भाकीत (Market Prediction):

शेअर बाजारातील किंमती सतत बदलत असतात आणि त्यावर अनेक घटकांचा प्रभाव असतो, जसे की कंपनीची आर्थिक स्थिती, व्याजदर, महागाई, जागतिक घडामोडी, राजकीय निर्णय इत्यादी. मशीन लर्निंग आणि डीप लर्निंग मॉडेल्स या सर्व घटकांचा एकत्रित अभ्यास करून संभाव्य किंमत बदलांचा अंदाज लावतात. पारंपरिक पद्धतींमध्ये फक्त ऐतिहासिक किमतींच्या चार्ट्सचा अभ्यास

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

केला जात असे; परंतु AI मॉडेल्स टाइम-सीरिज विश्लेषण, न्यूरल नेटवर्क्स आणि रिग्रेशन मॉडेल्सचा वापर करून अधिक अचूक आणि गतिमान भाकीत करतात.

५. डेटा विश्लेषण (Data Analysis):

शेअर बाजारात डेटा विश्लेषण हे AI चे सर्वात मूलभूत आणि महत्त्वाचे कार्य आहे. बाजारात दर सेकंदाला हजारो व्यवहार होतात आणि प्रचंड प्रमाणात माहिती निर्माण होते. यामध्ये शेअर किमतीतील बदल, व्यवहारांची मात्रा (volume), कंपनीचे नफा-तोटा पत्रक, बॅलन्स शीट, व्याजदर, महागाई दर, GDP वाढ, तसेच जागतिक आर्थिक घडामोडींचा समावेश असतो. AI प्रणाली हा सर्व डेटा एकत्रितपणे प्रक्रिया करून त्यातील महत्त्वाचे नमुने (patterns) आणि ट्रेंड्स ओळखतात.

संधी (Opportunities):

१. **कार्यक्षमता आणि अचूकता (Efficiency and Accuracy):**

AI प्रणाली मानवी विश्लेषकांपेक्षा अधिक वेगाने आणि मोठ्या प्रमाणातील डेटा प्रक्रिया करू शकतात. तसेच शेअर कींमतीतील बदल, कंपनीचे आर्थिक अहवाल, व्याजदर आणि जागतिक आर्थिक घडामोडी यांचे विश्लेषण AI काही क्षणांत करते. मशीन लर्निंग अल्गोरिदम डेटामधील सूक्ष्म ट्रेंड्स आणि नमुने ओळखून भविष्यातील हालचालींबाबत अधिक अचूक अंदाज देतात. अल्गोरिथमिक ट्रेडिंगच्या मदतीने बाजारातील बदलांना त्वरित प्रतिसाद देता येतो, ज्यामुळे संधींचा योग्य वेळी फायदा घेता येतो. तसेच, AI भावनांवर आधारित निर्णय घेत नाही, त्यामुळे मानवी चुका कमी होतात आणि निर्णयप्रक्रिया अधिक विश्वासार्ह बनते. त्यामुळे शेअर बाजारातील कार्यक्षमता आणि अचूकता लक्षणीयरीत्या वाढते.

२. **जोखीम कमी करणे (Risk Reduction):**

पारंपरिक जोखीम विश्लेषण पद्धती मुख्यतः ऐतिहासिक डेटावर आधारित असतात, परंतु AI मोठ्या प्रमाणातील ऐतिहासिक आणि रिअल-टाइम डेटाचे विश्लेषण करून अधिक अचूक अंदाज लावू शकते. त्यामुळे बाजारातील अनिश्चितता आणि अचानक होणारे बदल यांचा परिणाम कमी करण्यास मदत होते. AI मॉडेल्स विविध आर्थिक निर्देशक (जसे व्याजदर, चलनवाढ, GDP वाढ, जागतिक राजकीय घडामोडी) यांचा अभ्यास करून पोर्टफोलिओ मधील संभाव्य धोके ओळखतात. उदाहरणार्थ, एखाद्या देशात राजकीय अस्थिरता वाढल्यास किंवा जागतिक पातळीवर आर्थिक संकटाची चिन्हे दिसल्यास AI त्वरित अलर्ट देऊ शकते. यामुळे जोखीम कमी करण्याचा निर्णय घेता येतो.

३. **नवीन गुंतवणूक संधी (New Investment Opportunities):**

AI च्या मदतीने प्रत्येक गुंतवणूकदाराच्या वय, उत्पन्न, जोखीम स्वीकारण्याची क्षमता, आर्थिक उद्दिष्टे आणि खर्चाच्या सवयी यांचा सखोल अभ्यास करून वैयक्तिकृत गुंतवणूक सल्ला दिला जाऊ शकतो. तसेच 'रोबो-ॲडव्हायझर' प्रणाली स्वयंचलितपणे योग्य पोर्टफोलिओ तयार करतात आणि वेळोवेळी त्यात बदल करतात. त्यामुळे सामान्य गुंतवणूकदारांनाही तज्ज्ञ पातळीवरील सेवा कमी खर्चात उपलब्ध होते.

४. खर्च कमी करणे (Cost Reduction):

पारंपरिक पद्धतींमध्ये मानवी विश्लेषक, सल्लागार आणि ऑपरेशनल टीम यांच्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागते. परंतु AI-आधारित प्रणाली अनेक प्रक्रिया स्वयंचलित करून वेळ आणि पैशांची बचत करतात. अल्गोरिथमिक ट्रेडिंग ही यातील महत्त्वाची पद्धत आहे. संगणकीय अल्गोरिदम ठराविक नियमांनुसार आणि बाजारातील परिस्थितीनुसार सेकंदांमध्ये व्यवहार करतात. यामुळे व्यवहार जलद होतात, मानवी चुका कमी होतात आणि व्यवहाराचा खर्च कमी होतो. मोठ्या प्रमाणात ट्रेडिंग करताना ही पद्धत विशेषतः फायदेशीर ठरते. रोबो-ॲडव्हायझर्स गुंतवणूक सल्ला देण्यासाठी AI चा वापर करतात. पारंपरिक आर्थिक सल्लागारांच्या तुलनेत त्यांची फी कमी असते. त्यामुळे लहान गुंतवणूकदारांनाही कमी खर्चात व्यावसायिक दर्जाचा सल्ला मिळतो. अल्गोरिथमिक ट्रेडिंग आणि स्वयंचलित प्रक्रियांद्वारे मानवी श्रमाची आणि वेळची बचत होते, ज्यामुळे खर्चात घट होते.

५. जागतिक बाजारांचे एकत्रित विश्लेषण (Global Market Integration):

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) जागतिक बाजारांचे एकत्रित विश्लेषण करून गुंतवणूक प्रक्रियेला अधिक व्यापक आणि अचूक बनवते. ती विविध देशांतील शेअर बाजार, चलन दर, वस्तू बाजार आणि आर्थिक धोरणे यांचा एकत्रित अभ्यास करू शकते. उदाहरणार्थ, United States मधील व्याजदरातील बदलांचा परिणाम India किंवा Japan सारख्या देशांच्या बाजारपेठांवर कसा होतो, हे AI वेगाने ओळखू शकते. या सखोल विश्लेषणामुळे गुंतवणूकदारांना जागतिक स्तरावर विविधीकरण करण्यास मदत होते आणि जोखीम कमी करण्यासाठी योग्य निर्णय घेता येतात. तसेच एका देशातील आर्थिक किंवा राजकीय घडामोडींचा दुसऱ्या देशाच्या बाजारावर होणारा संभाव्य परिणाम AI अधिक प्रभावीपणे समजावून सांगू शकते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

६. भावनिक निर्णयांवर नियंत्रण (Reduction of Emotional Bias):

मानवी गुंतवणूकदार भीती, लोभ, अफवा किंवा बाजारातील घबराट यांमुळे अनेकदा घाईघाईने निर्णय घेतात, ज्यामुळे 'पॅनिक सेलिंग' किंवा अविचारी खरेदीसारख्या चुका होतात. परंतु AI प्रणाली ऐतिहासिक डेटा, सांख्यिकीय विश्लेषण आणि पूर्वनिश्चित अल्गोरिदमच्या आधारे निर्णय घेतात, त्यामुळे त्या भावनांवर आधारित प्रतिक्रिया देत नाहीत. यामुळे गुंतवणूक अधिक शिस्तबद्ध, संतुलित आणि दीर्घकालीन उद्दिष्टांवर केंद्रित राहते. जरी AI पूर्णपणे अचूक नसले तरी, भावनिक पक्षपात कमी करून ती अधिक स्थिर आणि डेटा-आधारित गुंतवणूक धोरण तयार करण्यास मदत करते.

७. फसवणूक ओळख आणि प्रतिबंध (Fraud Detection and Prevention):

AI प्रणाली मोठ्या प्रमाणातील व्यवहारांचा वेगाने आणि अचूकपणे अभ्यास करून असामान्य पॅटर्न ओळखू शकतात. पारंपरिक पद्धतींमध्ये मानवी तपासणीस वेळ लागतो, परंतु AI रिअल-टाइम डेटा विश्लेषण करून संशयास्पद व्यवहार, अचानक वाढलेली खरेदी-विक्री, किंवा इनसाइडर ट्रेडिंगसारख्या बेकायदेशीर कृतींची शक्यता लवकर ओळखते. तसेच मशीन लर्निंग मॉडेल्स पूर्वीच्या फसवणुकीच्या घटनांचा डेटा वापरून नवीन व्यवहारांमधील साम्य शोधतात आणि धोका असलेल्या व्यवहारांना त्वरित 'फ्लॅग' करतात. यामुळे बँका, स्टॉक एक्स्चेंज आणि वित्तीय संस्था तातडीने कारवाई करू शकतात. याशिवाय, AI सायबर फसवणूक, आणि बनावट खाती यांसारख्या प्रकारांनाही आळा घालण्यास मदत करते. त्यामुळे आर्थिक व्यवहार अधिक सुरक्षित होतात, बाजाराची पारदर्शकता वाढते आणि गुंतवणूकदारांचा विश्वास दृढ होतो.

आव्हाने (Challenges):

१.डेटाची गुणवत्ता आणि उपलब्धता (Data Quality and Availability):

डेटाची गुणवत्ता आणि उपलब्धता ही कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित प्रणालींसाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे. कोणतेही AI मॉडेल हे उपलब्ध डेटावरच शिकते आणि त्यावर आधारित निर्णय घेत असते. जर डेटा अपूर्ण, चुकीचा, कालबाह्य किंवा पक्षपाती असेल, तर मॉडेलचे निष्कर्षही चुकीचे किंवा दिशाभूल करणारे ठरू शकतात. उदाहरणार्थ, शेअर बाजाराच्या विश्लेषणात जर ऐतिहासिक डेटा अपूर्ण असेल किंवा त्यात चुकीची नोंद असेल, तर मॉडेल चुकीचे अंदाज देऊ शकते. त्यामुळे डेटाची शुद्धता, अचूकता आणि सातत्य सुनिश्चित करणे अत्यावश्यक ठरते. तसेच डेटाची उपलब्धता हा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. अनेक वेळा उच्च-गुणवत्तेचा आणि अद्ययावत डेटा सहज उपलब्ध नसतो किंवा तो मिळवण्यासाठी मोठा खर्च करावा लागतो. तसेच काही क्षेत्रांमध्ये गोपनीयतेचे नियम आणि कायदे यामुळे डेटा गोळा करणे किंवा वापरणे मर्यादित असते.

२. सायबर सुरक्षा आणि डेटा गोपनीयता (Cyber security and Data Privacy):

शेअर बाजाराच्या संदर्भात सायबर सुरक्षा आणि डेटा गोपनीयता हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. आर्थिक व्यवहार, गुंतवणूकदारांची वैयक्तिक माहिती, KYC तपशील आणि कंपन्यांचे गोपनीय आर्थिक अहवाल हे सर्व डेटा अत्यंत संवेदनशील असतात. आज अनेक ब्रोकरेज कंपन्या आणि वित्तीय संस्था AI-आधारित अल्गोरिदमिक ट्रेडिंग प्रणाली वापरतात. जर हॅकर्सनी या AI मॉडेल्समध्ये प्रवेश करून चुकीचा किंवा बनावट डेटा दिला, तर बाजारात चुकीचे खरेदी-विक्री संकेत निर्माण होऊ शकतात आणि अचानक मोठी चढ-उतार होऊ शकते. तसेच गोपनीय माहिती लीक झाल्यास इनसाइडर ट्रेडिंग किंवा फसवणूक होण्याची शक्यता वाढते. ऑनलाइन ट्रेडिंग प्लॅटफॉर्म हॅक झाल्यास गुंतवणूकदारांच्या खात्यांमध्ये अनधिकृत व्यवहार होऊ शकतात.

३. पारदर्शकतेचा अभाव (Lack of Transparency):

शेअर बाजारात AI चा वापर वाढत असला तरी पारदर्शकतेचा अभाव ही एक गंभीर समस्या आहे. अनेक AI मॉडेल्स 'ब्लॅक बॉक्स' स्वरूपाचे असतात, म्हणजे त्यांनी घेतलेल्या निर्णयामागील नेमके कारण समजणे कठीण असते. उदाहरणार्थ, एखादा शेअर खरेदी किंवा विक्री करण्याचा सिग्नल AI देतो, पण तो निर्णय कोणत्या आकडेवारीवर किंवा विश्लेषणावर आधारित आहे हे स्पष्ट नसते. त्यामुळे जर तो निर्णय चुकीचा ठरला, तर जबाबदारी कोणाची हे ठरवणे अवघड होते. भारतातील Securities and Exchange Board of India (SEBI) सारख्या संस्था बाजारातील पारदर्शकता आणि गुंतवणूकदारांचे संरक्षण सुनिश्चित करतात. परंतु AI मॉडेल्सची अंतर्गत रचना आणि निर्णय प्रक्रिया स्पष्ट नसेल, तर त्यांचे परीक्षण करणे आणि जोखीम ओळखणे कठीण जाते. याशिवाय, जर मॉडेलमध्ये पक्षपाती किंवा अपूर्ण डेटा वापरला गेला असेल, तर त्याचा परिणाम बाजारातील किंमतींवर आणि गुंतवणूकदारांच्या निर्णयांवर होऊ शकतो.

४. नैतिक आणि सामाजिक प्रश्न (Ethical and Social Issues)

शेअर बाजाराच्या संदर्भात आज अनेक वित्तीय संस्था आणि ब्रोकरेज कंपन्या AI-आधारित अल्गोरिदमिक ट्रेडिंगचा वापर करत आहेत. त्यामुळे पारंपरिक शेअर विश्लेषक, डीलर्स आणि काही मानवी तज्ञांची गरज कमी होत आहे. यामुळे रोजगाराच्या संधींवर

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

परिणाम होऊ शकतो आणि कौशल्यांचे स्वरूप बदलू शकते. तसेच, AI-आधारित वेगवान व्यवहारांमुळे बाजारातील चढ-उतार वाढू शकतात. काही सेकंदांत हजारो व्यवहार पूर्ण होतात, त्यामुळे किंमती अचानक वाढू किंवा घसरू शकतात. अशा परिस्थितीत मोठ्या संस्थांना फायदा होऊ शकतो, पण लहान आणि किरकोळ गुंतवणूकदारांना मोठा धोका निर्माण होतो.

५. तांत्रिक अवलंबित्व (Overdependence on Technology)

आजच्या काळात शेअर बाजारातील बहुतांश व्यवहार AI, अल्गोरिदमिक ट्रेडिंग आणि स्वयंचलित संगणकीय प्रणालींवर आधारित असतात. उदाहरणार्थ, National Stock Exchange आणि Bombay Stock Exchange यांसारख्या प्रमुख शेअर बाजारांमध्ये व्यवहार पूर्णपणे डिजिटल प्लॅटफॉर्मवर चालतात. जर सर्व्हर डाउन होणे, नेटवर्क बिघाड, सॉफ्टवेअर त्रुटी किंवा सायबर हल्ला झाला, तर लाखो गुंतवणूकदारांच्या व्यवहारांवर तात्काळ परिणाम होऊ शकतो. तसेच, अल्गोरिदमिक ट्रेडिंगमध्ये संगणक अत्यंत वेगाने खरेदी-विक्रीचे निर्णय घेतो. जर या अल्गोरिदममध्ये चूक झाली, तर काही सेकंदांतच मोठ्या प्रमाणावर शेअर्सची विक्री होऊन बाजारात अचानक घसरण (flash crash) होऊ शकते. अशा परिस्थितीत मानवी हस्तक्षेपाला वेळ मिळत नाही आणि बाजारात घबराट निर्माण होऊ शकते. म्हणूनच शेअर बाजारात तांत्रिक प्रणालींसोबत मानवी देखरेख, मजबूत बॅकअप व्यवस्था, सायबर सुरक्षा उपाय आणि जोखीम व्यवस्थापन धोरणे अत्यावश्यक आहेत. तंत्रज्ञानामुळे वेग आणि पारदर्शकता वाढली असली तरी, पूर्णपणे त्यावर अवलंबून राहणे धोकादायक ठरू शकते.

६. उच्च प्रारंभिक गुंतवणूक (High Initial Investment):

शेअर बाजारात AI आणि अल्गोरिदमिक ट्रेडिंग वापरण्यासाठी मोठा खर्च करावा लागतो. वेगवान संगणक, चांगले इंटरनेट, रिअल-टाइम डेटा आणि सुरक्षित सॉफ्टवेअर यांची गरज असते. उदाहरणार्थ, National Stock Exchange आणि Bombay Stock Exchange मध्ये व्यवहार करण्यासाठी ब्रोकरेज कंपन्यांना मजबूत तांत्रिक व्यवस्था उभी करावी लागते. मोठ्या कंपन्यांना हा खर्च परवडतो, परंतु लहान कंपन्या किंवा स्टार्टअप्ससाठी तो कठीण असतो. त्यामुळे मोठ्या कंपन्यांना जास्त फायदा मिळतो आणि स्पर्धेत असमानता निर्माण होऊ शकते.

७. बाजारातील अस्थिरता वाढ (Increased Market Volatility)

आज शेअर बाजारात उच्च-वेगवान (High-Frequency) अल्गोरिदमिक ट्रेडिंग मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. या पद्धतीत संगणक आणि AI प्रणाली सेकंदाच्या आत हजारो खरेदी-विक्रीचे व्यवहार करतात. उदाहरणार्थ, National Stock Exchange आणि Bombay Stock Exchange सारख्या बाजारपेठांमध्ये व्यवहार पूर्णपणे संगणकीय प्रणालींवर आधारित असतात. जर अनेक AI प्रणालींना एकाच वेळी समान संकेत (जसे की एखाद्या कंपनीबद्दल नकारात्मक बातमी किंवा किंमतीतील अचानक बदल) मिळाले, तर त्या एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर शेअर्स विक्री किंवा खरेदी करू शकतात. यामुळे बाजारात अचानक मोठी घसरण किंवा वाढ होऊ शकते. काही वेळा काही मिनिटांतच किंमतीत मोठा बदल दिसतो, ज्याला "फ्लॅश क्रॅश" असे म्हणतात. अशा वेगवान बदलांमुळे लहान गुंतवणूकदारांना योग्य निर्णय घेण्यासाठी वेळ मिळत नाही आणि त्यांचा आर्थिक धोका वाढतो.

८. कायदेशीर जबाबदारीचा प्रश्न (Issue of Accountability)

शेअर बाजारात AI आणि अल्गोरिदमिक प्रणालींवर आधारित निर्णय घेतले जातात. जर या प्रणालीने चुकीचा सिग्नल दिला आणि त्यामुळे मोठा आर्थिक तोटा झाला, तर जबाबदारी नेमकी कोणाची हे ठरवणे कठीण होते. उदाहरणार्थ, एखाद्या ब्रोकरेज कंपनीने National Stock Exchange किंवा Bombay Stock Exchange मध्ये AI प्रणालीद्वारे व्यवहार केले आणि त्यात तांत्रिक चूक झाली, तर प्रश्न उभा राहतो-ही चूक सॉफ्टवेअर बनवणाऱ्या विकसकाची आहे की, त्या प्रणालीचा वापर करणाऱ्या वित्तीय संस्थेची की, जोखीम समजून गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदाराची? AI प्रणाली अनेकदा जटिल अल्गोरिदमवर आधारित असतात, जे सर्वसामान्य गुंतवणूकदारांना समजणे कठीण असते. त्यामुळे पारदर्शकता आणि जबाबदारी यांचा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. यासाठी स्पष्ट कायदेशीर नियम, नियामक संस्थांचे मार्गदर्शन, नियमित तपासणी आणि जोखीम उघड करणे आवश्यक आहे. स्पष्ट कायदेशीर चौकट असल्यास बाजारात विश्वास टिकून राहतो आणि गुंतवणूकदारांचे संरक्षण अधिक प्रभावीपणे करता येते.

निष्कर्ष:

प्रस्तुत संशोधनाच्या सखोल विश्लेषणातून हे स्पष्ट होते की, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) हे आता केवळ गुंतवणुकीचे एक साधे साधन उरले नसून, ते आधुनिक शेअर बाजाराचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि आवश्यक भाग आहे. जागतिक स्तरावर ७०% ते ८०% आणि भारतात ५०% हून अधिक व्यवहार हे AI आणि अल्गोरिदमद्वारे पार पडत आहेत, हे या तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावाचे जिवंत उदाहरण आहे. AI मुळे बाजारातील खूप मोठ्या प्रमाणातील माहितीचे विश्लेषण करणे सुलभ झाले असून, मानवी भीती किंवा लोभ यांसारख्या

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

भावनांना बाजूला सारून अत्यंत तर्कशुद्ध पद्धतीने व्यवहार करणे आता शक्य झाले आहे. यामुळेच, जिथे मानवी मर्यादा संपतात, तिथे AI च्या मदतीने गुंतवणुकीच्या अचूक आणि नवीन संधी निर्माण होताना दिसत आहेत. परंतु, या प्रगतीचा विचार करताना त्यासोबत येणाऱ्या आव्हानांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. तसेच AI प्रणालींमधील गुंतागुंत, डेटाची सुरक्षितता आणि सायबर हल्ल्यांची भीती हे प्रश्न आजही कायम आहेत. तसेच, पूर्णपणे यंत्रांवर विसंबून राहिल्यामुळे बाजारात अचानक होणारी मोठी पडझड किंवा तांत्रिक बिघाड यांसारख्या गोष्टींचा धोका नेहमीच असतो. म्हणूनच, भविष्यात केवळ तंत्रज्ञानाचा वापर करणे पुरेसे नसून, त्या तंत्रज्ञानावर मानवी विवेक आणि अनुभवाचे नियंत्रण असणे ही काळाची गरज आहे.

शेवटी ठामपणे असे म्हणता येईल की, येणारा काळ हा पूर्णतः डेटा आणि स्मार्ट अल्गोरिदमचा असला, तरी त्यात यश मिळवण्यासाठी 'प्रगत तंत्रज्ञान आणि मानवी बुद्धिमत्ता' यांचा योग्य ताळमेळ बसवणे आवश्यक आहे. जर 'सेबी' (SEBI) सारख्या संस्थांनी या तंत्रज्ञानासाठी सुरक्षित आणि पारदर्शक नियमावली तयार केली, तर हे तंत्रज्ञान भारतीय गुंतवणूकदारांसाठी एक मोठे वरदान ठरेल. अशा प्रकारे, तंत्रज्ञानाची गती आणि मानवी सावधगिरी यांचा हा सुंदर समन्वयच खऱ्या अर्थाने शेअर बाजाराच्या शाश्वत आणि समृद्ध भविष्याचा पाया रचणारा ठरणार आहे.

संदर्भ सूची:

१. **स्टॉक मार्केट इन्व्हेस्टिंग विथ आर्टिफिशियल इंटेलिजन्स,** गौरव जैन, यज्ञ इन्व्हेस्टमेंट अकॅडमी, २०२४-२५
२. Mastering the Stock Market with AI Kindle Edition by Michael S. Purnell (Author) May 2023
३. AI Stocks Made Simple, David L. Wadley (Author), Publisher by The Price Bandit LLC, 2026
४. https://www.angelone.in/knowledge-center/share-market/how-ai-is-helping-traders-make-more-informed-decisions-marathi
५. https://www.screener.in/ai/
६. https://www.sebi.gov.in/media-and-notifications/press-releases/feb-2026/launch-of-ai-driven-calling-campaign-to-promote-sebi-check-tool-and-validated-upi-handles_99756.html

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणाचा इतिहास

डॉ. नामदेव मुकुंद लवटे
यशवंतराव चव्हाण (के. एम. सी.), कॉलेज, कोल्हापूर
Email: namdeolawate1982@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180225
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 122-124
February- 2026
Submitted: 08 Jan. 2026
Revised: 18 Jan. 2026
Accepted: 05 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश:

प्रस्तुत शोधनिबंधात राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणांचे विश्लेषण करण्यात आले आहे. महाराजांनी शेती, उद्योग, सहकार आणि बाजारपेठ या क्षेत्रात केलेल्या सुधारणांमुळे कोल्हापूर राज्याचा कायापालट कसा झाला याचा आढावा यात घेतला आहे.

कीवर्ड्स (Keywords): *राजर्षी शाहू महाराज, आर्थिक धोरण, कृषी सुधारणा, सहकार चळवळ, औद्योगिक विकास, बाजारपेठ.*

प्रस्तावना:

राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणांचा केंद्रबिंदू हा 'तळागाळातील माणसाचा आर्थिक उत्कर्ष' हा होता. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकाच्या सुरूवातीस, जेव्हा भारतीय अर्थव्यवस्था प्रामुख्याने सरंजामशाही आणि जातीव्यवस्थेच्या जोखडात अडकलेली होती, तेव्हा शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात आधुनिक अर्थव्यवस्थेचा पाया रचला. त्यांचे आर्थिक धोरण हे केवळ सिद्धांतापुरते मर्यादित नव्हते, तर ते प्रत्यक्ष कृतीवर आधारित होते. शेतीचे आधुनिकीकरण, सहकारी संस्थांची स्थापना, औद्योगिक विकास आणि शिक्षण या चतु:सूत्रीच्या माध्यमातून त्यांनी स्वावलंबी अर्थव्यवस्थेचे स्वप्न पाहिले. त्यांच्या मते, आर्थिक विषमता ही सामाजिक विषमतेचे मूळ आहे. म्हणून त्यांनी आरक्षणाच्या माध्यमातून दुर्बल घटकांना आर्थिक मुख्य प्रवाहात आणण्याचे धाडसी पाऊल उचलले.

१. राजर्षी शाहू महाराजांचा अल्पपरिचय :

२६ जून १८७४ रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा जन्म कोल्हापूरातील कसबा बावडा येथील लक्ष्मी निवास पॅलेसमध्ये झाला. दत्तक विधानापूर्वीचे राजर्षी शाहू महाराजांचे नाव श्री. यशवंतराव जयसिंगराव घाटगे असे होते. त्यांच्या आईचे नाव राधाबाई असे होते. त्यांचे वडील जयसिंगराव घाटगे हे कागल परगण्याचे जहागिरदार होते.[१] कोल्हापूर संस्थानचे छत्रपती शिवाजी महाराज (चौथे) यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले. दत्तक घेतल्यानंतर त्यांचे नाव शाहू असे ठेवण्यात आले. त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी जयसिंगराव घाटगे यांनी वयाच्या १० वर्षापर्यंत सांभाळली. त्यानंतर त्यांनी आपले शिक्षण राजकोट येथील राजकुमार कॉलेज मधून घेतले. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी धारवाड येथे गेले. या ठिकाणी त्यांनी सर स्टुअर्ट फ्रेझर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यकारभार, इतिहास आणि इंग्रजी या विषयाचे शिक्षण पूर्ण केले.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. नामदेव मुकुंद लवटे, यशवंतराव चव्हाण (के. एम. सी.), कॉलेज, कोल्हापूर

How to cite this article:
लवटे, . नामदेव . मुकुंद . (*2026*). राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणाचा इतिहास. *Journal of Research & Development, 18(2(XXI)), 122–124.* https://doi.org/10.5281/zenodo.19536266

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19536266

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

पुढे १ एप्रिल १८९१ रोजी बडोद्याचे सरदार गुणाजीराव खानविलकरांची कन्या लक्ष्मीबाई यांच्याशी शाहू महाराजांचा विवाह झाला. २ एप्रिल १८९४ रोजी राज्यारोहण होऊन छत्रपती शाहू महाराजांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेवून त्यांनी कार्यास सुरूवात केली.[२] त्यांनी १८९४ ते १९२२ या कालावधीत कोल्हापूर संस्थानचा राज्यकारभार पाहिला. या कारकिर्दीत त्यांनी संस्थानातील शेती, सहकार, उद्योग, मूलभूत सोई-सुविधा, सेवा क्षेत्र, राजस्व इत्यादी क्षेत्रात अभूतपूर्व बदल घडवून आणला. अशा या कर्तबगार महाराजांचे ६ मे १९२२ रोजी मुंबई येथे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले.

२. राजर्षी शाहूंचे कृषी आर्थिक धोरण :

शाहू महाराजांनी संस्थानातील शेतीला उद्योगाचा दर्जा दिला. कोल्हापूरची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवर अवलंबून असल्याने त्यांनी या क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी केली. शेतीला बारमाही पाणी मिळावे यासाठी त्यांनी भोगावती नदीवर राधानगरी धरण बांधले. शाहू महाराजांनी आपली पत्नी लक्ष्मीबाई यांच्या शुभहस्ते १९०९ मध्ये या धरणाचा पाया काढण्याचा शुभारंभ केला.[३] संस्थानची आर्थिक कुवत नसताना देखील संस्थानातील दुष्काळ कायमचा मिटवून शेतीचा विकास घडवून आणण्यासाठीच राजर्षींनी हा प्रकल्प हाती घेतला. हे त्या काळातील एक धाडसी आर्थिक पाऊल होते. तसेच महाराजांनी शेतकऱ्यांना सावकारी पाशातून सोडविण्यासाठी १९१२ मध्ये कोल्हापूरात पहिला 'सहकारी कायदा' लागू केला. आणि शेतीच्या आधुनिकीकरणासाठी १९१२ साली संस्थानात ' द किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिटयूट' ची स्थापना करण्यात आली होती. ज्यामध्ये आधुनिक शेती संदर्भातील सर्व प्रकारचे शिक्षण देण्याची सोय करण्यात आली होती.[४] याशिवाय त्यांनी शेतकऱ्यांना आधुनिक खते, अवजारे, बी-बियाणे इत्यादींची माहिती करून देण्यासाठी आणि त्यातून संस्थानचा शेती विकास घडवून आणण्यासाठी संस्थानात शेती प्रदर्शनांचे यशस्वी आयोजन केले होते.

३. औद्योगिक विकास आणि व्यापारी धोरण :

राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूरला एक व्यापारी केंद्र (Commercial Hub) बनवण्याचे स्वप्न पाहिले होते. यासाठी महाराजांनी उद्योगधंद्याविषयी उदार धोरण ठेवले होते. त्यांनी करमुक्त नोंदणी, विनामूल्य जमिनी, पेटंट संबंधीचे हक्क, खाजगी खात्याच्या निधीतून देणग्या देणे, यासारख्या भरपूर सवलती दिल्यामुळे संस्थानात १९१० ते १९१५ च्या दरम्यान शाहूपुरी (कोल्हापूर) आणि तालुक्याच्या विविध ठिकाणी उद्योगांची निर्मिती होऊ शकली.[५] उदा. मे. शिरगावकर ऑईल मिल्स, शाहूपुरी (भांडवल रूपये एक लाख), अशा तऱ्हेने राजर्षी शाहूंनी शाहुपूरी ही व्यापार उद्योगपेठ बनविण्याचे स्वप्न प्रत्यक्षात आणले. आणि खाजगी व्यापार-उद्योग भरभराटीस आणण्याचे श्रेय त्यांनी आपल्या उदार धोरणामुळे मिळविले असे दृष्टोत्पत्तीस येते. कोल्हापूर संस्थानच्या औद्योगिक विकासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे कोल्हापूर शहरातील काही ठराविक व्यापाऱ्यांनी एकत्र येऊन जमविलेल्या पंधरा लाख रूपये भागभांडवलातून आणि राजर्षी शाहूंच्या उदार आर्थिक धोरणातून १९०५-०६ साली 'शाहू मिल' ची स्थापना करण्यात आली. या माध्यमातून स्थानिकांना रोजगाराची संधी उपलब्ध होऊन आर्थिक प्राप्ती होण्यास मदत झाली.

४. शिक्षण आणि आर्थिक सक्षमीकरण :

'शिक्षण हे आर्थिक प्रगतीचे साधन आहे', असे महाराजांचे ठाम मत होते. महाराजांनी जुलै १९०२ च्या हुजूर वटहूकूमान्वये हरिजनांसाठी व मागासलेल्या वर्गासाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये ५० टक्के आरक्षण देऊन वंचित घटकांना आर्थिक प्रवाहात आणले.[६] यामुळे उत्पन्नाच्या साधनांचे विकेंद्रीकरण झाले. तसेच महाराजांनी मुलांसाठी वसतिगृहे स्थापन केल्यामुळे ग्रामीण भागातील मुले शहरात येऊन शिक्षण घेऊ लागली. ज्यामुळे पुढे जाऊन एक सक्षम मध्यमवर्ग तयार झाला.

५. सहकारी संस्थाविषयक धोरण :

राजर्षी शाहूंनी कोल्हापूर संस्थानात २४ मे १९१३ रोजी 'कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड' ही पहिली नोंदणीकृत सोसायटी स्थापन केली.[७] या नव्याने स्थापन झालेल्या सहकारी संस्थांना आर्थिक मदत करून त्यांनी सहकारी चळवळीस प्रोत्साहन दिले. यामुळे नागरी भागातील कारागीर, छोटे व्यापारी आणि मध्यमवर्गीयांना स्वस्त दरात कर्ज उपलब्ध झाल्याने उद्योग-व्यवसाय वाढीस चालना मिळाली. तसेच कोल्हापूर जिल्हा आजही बँका, दूध संघ, साखर कारखाने या सहकार क्षेत्रात भारतात अग्रगण्य असण्यामागे शाहू महाराजांनी घातलेला पाया आहे.

६. पायाभूत सुविधा आणि दळणवळण :

राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाच्या आर्थिक विकासासाठी 'पायाभूत सुविधा' (Infrastructure) आणि 'दळणवळण' (Transport) यांना केंद्रस्थानी ठेवले होते. त्यांच्या मते, जोपर्यंत माल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वेगाने पोहोचत

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

नाही. तोपर्यंत व्यापार आणि शेतीचा विकास होऊ शकत नाही. यासाठी त्यांनी कोल्हापूर ते मिरज या रेल्वे मार्गासाठी मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला. रेल्वेमुळे कोल्हापूरच्या गुळाला राष्ट्रीय बाजारपेठ मिळाली आणि संस्थानाच्या महसुलात मोठी वाढ झाली. तसेच शेतातील माल बाजारपेठेपर्यंत आणण्यासाठी त्यांनी ग्रामीण भागातील रस्त्यांचे जाळे विणले. पावसाळ्यातही व्यापार खंडित होऊ नये म्हणून महाराजांनी पंचगंगा नदी आणि इतर उपनद्यांवर पूल बांधले आहेत. या पायाभूत सुविधामुळे कोल्हापूर हे दक्षिण महाराष्ट्रातील सर्वांत मोठे व्यापारी केंद्र बनले.

निष्कर्ष :

राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक धोरण हे 'कल्याणकारी राज्याचे' (Welfare State) उत्तम उदाहरण होते. त्यांनी केवळ भांडवलशाही किंवा समाजवाद याचा विचार न करता, 'माणूस' केंद्रबिंदू मानून आर्थिक निर्णय घेतले. त्यांच्या धोरणांमुळेच आज कोल्हापूर हा आर्थिकदृष्टया समृद्ध आणि स्वावलंबी जिल्हा म्हणून ओळखला जातो. महाराजांनी शाहुपूरी व्यापारपेठ, शाहू मिल आणि बाजारपेठांची निर्मिती करून कोल्हापूरला औद्योगिक भविष्याची दिशा दाखवली. त्यांचे सहकार धोरण हे केवळ आर्थिक नसून ते सामाजिक समतेचे एक माध्यम होते.

संदर्भ ग्रंथ सूची :

1. गर्गे स. मा., (संपा.) 'करवीर रियासतीची कागदपत्रे', भाग-१, ज्ञानेश्वर प्रकाशन, पुणे, मार्च १९७०, पृ. ६३४.
2. Latthe A. B. 'Memories of His Highness Shri. Shahu Chhatrapati Maharaj of Kolhapur', Vol. I Publication Time Press, Bombay, 1924, P. 20.
3. Report on The General Administration of The Kolhapur State, 1909-10, P. 35.
4. R. A. K. S., 1912-13, P. 16.
5. घुगे (डॉ.) वि. बा., छत्रपती शाहूंचे समाजवादी आर्थिक धोरण, राजहंस प्रिटिंग प्रेस, कोल्हापूर, प्रथमावृत्ती १५ ऑगस्ट १९७५, पृ. १६५.
6. कित्ता, पृ. ३३.
7. Patil P. C., Regional Survey of Economic Resources India, Kolhapur 1950, P. 183.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

महाराष्ट्र राज्यातील फलोत्पादन पिकाखालील क्षेत्र व उत्पादनाचा अभ्यास

सुमन प्रभाकर कांबळे
संशोधक विद्यार्थिनी, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
Email: sumankamble592@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180226
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 125-129
February- 2026

Submitted: 08 Jan. 2026
Revised: 18 Jan. 2026
Accepted: 05 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

महाराष्ट्रातील फलोत्पादन क्षेत्र हे राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक बनले आहे आणि त्यात फळे, भाजीपाला, फळबागा, मसालेदार पिके आणि फुले यांचा समावेश आहे. या संशोधनात २०१९ ते २०२३ पर्यंत महाराष्ट्रातील फलोत्पादन पिकांच्या क्षेत्र आणि उत्पादनात झालेल्या बदलांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. उपलब्ध दुय्यम डेटाच्या आधारे, त्याचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, प्रमाणित विचलन, भिन्नतेचा गुणांक आणि चक्रवाढ वाढीचा दर यासारख्या सांख्यिकीय तंत्रांचा वापर करण्यात आला. अभ्यासातून असे दिसून आले आहे की जरी फलोत्पादन पिकांच्या क्षेत्र आणि उत्पादनात एकूण वाढ झाली असली तरी काही पिकांमध्ये चढ-उतार आहेत. अभ्यासातून असे दिसून आले आहे की फलोत्पादन शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला, रोजगार निर्मितीला आणि ग्रामीण विकासाला चालना देत आहे.

कीवर्ड: *फलोत्पादन, क्षेत्र, उत्पादन, फळे, भाजीपाला, फळबाग, मसाल्याची पिके, फुले आणि महाराष्ट्र.*

प्रस्तावना

महाराष्ट्र हे भारतातील एक प्रमुख बागायती उत्पादक राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यातील विविध भौगोलिक आणि हवामान परिस्थितीमुळे, आंबा, द्राक्षे, केळी, संत्रा, डाळिंब, चिकू आणि पपई यांसारख्या फळपिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते. बागायती क्षेत्राने शेतकऱ्यांना रोख उत्पन्नाचा एक महत्त्वाचा स्रोत प्रदान केला आहे आणि त्यांना पारंपारिक शेतीपेक्षा अधिक आर्थिक लाभ मिळविण्यास मदत केली आहे. म्हणूनच, महाराष्ट्राच्या कृषी अर्थव्यवस्थेत बागायतीचा वाटा सतत वाढत आहे.

गेल्या काही दशकांमध्ये, महाराष्ट्र राज्यात बागायती पिकांखालील क्षेत्रात लक्षणीय वाढ झाली आहे. सिंचन सुविधांचा विस्तार, सूक्ष्म सिंचन योजना, सुधारित रोपे आणि सरकारच्या विविध प्रोत्साहन योजनांमुळे शेतकरी मोठ्या प्रमाणात बागायतीकडे वळले आहेत. विशेषतः पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये फळपिकांच्या क्षेत्राचा विकास दर जास्त आहे. या वाढीमुळे शेतीचे व्यापारीकरण झाले आहे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळाली आहे.

महाराष्ट्राने बागायती पिकांच्या उत्पादनात राष्ट्रीय पातळीवरही महत्त्वपूर्ण स्थान मिळवले आहे. द्राक्षे, डाळिंब आणि संत्र्यांच्या उत्पादनात राज्य आघाडीवर आहे आणि काही फळपिके मोठ्या प्रमाणात निर्यात देखील केली जातात. आधुनिक लागवड पद्धती, खते आणि कीटक व्यवस्थापन तसेच तंत्रज्ञानाच्या वापरामुळे प्रति हेक्टर उत्पादनात वाढ झाली आहे. तथापि, हवामान अनिश्चितता, पाण्याची कमतरता आणि रोगराईचा परिणाम अजूनही उत्पादनावर जाणवत आहे.

बागायतीमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न तर वाढलेच आहेच, शिवाय रोजगाराच्या संधीही निर्माण झाल्या आहेत. लागवड, कापणी, साठवणूक, प्रक्रिया आणि वाहतुकीच्या सर्व टप्प्यांवर मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता असते.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
सुमन प्रभाकर कांबळे, संशोधक विद्यार्थिनी, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

How to cite this article:
कांबळे, . सुमन . प्रभाकर . (*2026*). महाराष्ट्र राज्यातील फलोत्पादन पिकाखालील क्षेत्र व उत्पादनाचा अभ्यास. *Journal of Research & Development, 18(2(XXI)), 125–129. https://doi.org/10.5281/zenodo.19536312*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19536312

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

त्यामुळे ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करण्यात बागायती महत्त्वाची भूमिका बजावत आहे. महिला आणि भूमिहीन मजुरांसाठीही या क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

तथापि, फलोत्पादन क्षेत्राला काही मर्यादा आणि आव्हाने देखील आहेत. बाजारभावातील चढ-उतार, साठवणूक आणि शीतगृह सुविधांचा अभाव, वाहतूक खर्च आणि प्रक्रिया उद्योगांचा मर्यादित विकास हे प्रमुख अडथळे आहेत. याव्यतिरिक्त, हवामान बदलाचा देखील पीक उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे आढळून आले आहे. म्हणूनच, केवळ क्षेत्र आणि उत्पादन वाढवण्यापेक्षा शाश्वत फलोत्पादन विकासावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

एकंदरीत, महाराष्ट्रातील बागायती पिकांखालील क्षेत्र आणि उत्पादनाचा अभ्यास केल्यास राज्यातील कृषी विकासाची दिशा स्पष्टपणे दिसून येते. शेतकऱ्यांचे उत्पन्न, ग्रामीण विकास आणि कृषी निर्यात वाढविण्यासाठी बागायती हे एक महत्त्वाचे साधन बनले आहे. भविष्यात, योग्य धोरणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रभावी बाजारपेठ व्यवस्था निर्माण करून, महाराष्ट्रातील बागायती क्षेत्र अधिक सक्षम आणि शाश्वत बनू शकते.

संशोधन समस्या

महाराष्ट्र राज्यात बागायती पिकांखालील क्षेत्र आणि उत्पादन वाढत असले तरी, या वाढीमध्ये सातत्य नसणे, प्रादेशिक असंतुलन, बाजारभावातील अनिश्चितता, पाण्याची टंचाई, हवामान बदलाचे परिणाम आणि साठवणूक आणि प्रक्रिया सुविधांचा अभाव यासारख्या गंभीर समस्या आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाची उपलब्धता, सुधारित लागवड पद्धती आणि योग्य बाजारपेठेची माहिती नसल्याने अनेक शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पादन आणि उत्पन्न मिळत नाही. तसेच, बागायती पिकांच्या क्षेत्र आणि उत्पादनाचा व्यापक आणि तुलनात्मक अभ्यास नसल्यामुळे धोरणात्मक निर्णय घेण्यात अडचणी येतात. म्हणूनच, या संशोधनाची मुख्य समस्या म्हणजे महाराष्ट्र राज्यातील बागायती पिकांखालील क्षेत्र आणि उत्पादनाचा तपशीलवार आणि वैज्ञानिक अभ्यास करणे.

संशोधन उद्दिष्टे

- महाराष्ट्र राज्यातील फलोत्पादन पिकाखालील क्षेत्र व उत्पादनाचा सविस्तर अभ्यास करणे.
- महाराष्ट्र राज्यातील फलोत्पादन पिकाखालील क्षेत्र व उत्पादन वाढण्यासाठी उपाययोजना सुचवणे.

संशोधन पद्धती

(१) संशोधनाचा प्रकार

हे संशोधन वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक स्वरूपाचे आहे. महाराष्ट्र राज्यातील फलोत्पादन पिकाखालील क्षेत्र व उत्पादनाचा सविस्तर अभ्यास, फलोत्पादन पिकाखालील क्षेत्र व उत्पादनामध्ये फळे, भाजीपाला, फळबागा पिके, मसाल्याची पिके, फुले आणि एकूण फलोत्पादन पिके याचे विश्लेषण करणे हा मुख्य उद्देश आहे.

(२) अभ्यास क्षेत्र

या संशोधनासाठी महाराष्ट्र राज्य हे अभ्यास क्षेत्र म्हणून निवडले आहे. महाराष्ट्रातील फलोत्पादन पिकाखालील क्षेत्र आणि उत्पादनाचा अभ्यास केला आहे.

(३) माहितीचे स्रोत

या संशोधनासाठी माहिती संग्रहित करण्यासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर केला आहे. केंद्र शासन निर्णय, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, जिल्हा सांख्यिकी अहवाल, शोधनिबंध, जर्नल्स, पुस्तके व संकेतस्थळे याचा वापर केला आहे.

(४) माहिती विश्लेषणाची पद्धत

या संशोधनासाठी सरासरी, प्रमाणित विचलन, बिन्नतेचा गुणांक, चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर, कमाल आणि किमान यांसारखी सांख्यिकीय तंत्राचा वापर केला आहे. त्याचबरोबर तक्त्याच्या सहाय्याने विश्लेषण या संशोधनामध्ये केले आहे.

(५) अभ्यासाची मर्यादा

महाराष्ट्र राज्यातील फलोत्पादन पिकाखालील क्षेत्र व उत्पादनाचा अभ्यास हा महाराष्ट्र राज्यापुरता मर्यादित आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

माहिती संकलन आणि विश्लेषण

तक्ता क्रमांक १ महाराष्ट्र राज्यातील फलोत्पादन पिकाखालील क्षेत्र

(क्षेत्र '०००' हेक्टर)

अ.क्र.	वर्ष	फळे	भाजीपाला	फळबाग पिके	मसाल्याची पिके	फुले	एकूण फलोत्पादन पिके
१	२०१९	७५५.५८	६४९.२८	१८८.७२	४६.२४	११.४५	१६५१.२७
२	२०२०	७८८.९७	८०८.१७	२०२.९८	७९.७२	१३.४४	१८९३.२८
३	२०२१	८३०.६४	११९२.७१	२२४.८०	१३०.६२	११.९३	२३९०.७०
४	२०२२	८३९.२५	१०४५.२७	२२६.४७	११७.२६	१०.५६	२२३८.८१
५	२०२३	८६०.०१	९०३.०३	२२६.५८	११५.६९	११.०६	२११६.३७
सरासरी		**८१४.८९**	**९१९.६९**	**२१३.९१**	**९७.९१**	**११.६९**	**२०५८.०९**
प्रमाणित विचलन		**४२.०३**	**२०९.८५**	**१७.२५**	**३४.५०**	**१.१०**	**२९१.२७**
भिन्नता गुणांक		**५.१६**	**२२.८२**	**८.०७**	**३५.२४**	**९.४२**	**१४.१५**
चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर		**०.०३**	**०.०९**	**०.०५**	**०.२६**	**-०.०१**	**०.०६**
कमाल		**८६०.०१**	**११९२.७१**	**२२६.५८**	**१३०.६२**	**१३.४४**	**२३९०.७०**
किमान		**७५५.५८**	**६४९.२८**	**१८८.७२**	**४६.२४**	**१०.५६**	**१६५१.२७**

स्त्रोत : फलोत्पादन क्षेत्र उत्पादन माहिती प्रणाली, केंद्र शासन, २०१९ ते २०२३.

तक्ता क्रमांक १ मधील माहितीवरून महाराष्ट्र राज्यातील फलोत्पादन पिकाखालील क्षेत्राचा वर्षनिहाय (२०१९ ते २०२३) विश्लेषण करण्यात आले आहे. २०१९ ते २०२३ या कालावधीत फळ पिकाखालील क्षेत्राची सरासरी ८१४.८९ हजार हेक्टर आहे. फळ पिकाच्या क्षेत्राचा भिन्नता गुणांक ५.१६ टक्के आहे. फळ पिकाच्या क्षेत्राचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.०३ टक्के आहे. फळ पिकाखालील कमाल क्षेत्र ८६०.०१ हजार हेक्टर हे २०२३ साली होते तर किमान क्षेत्र ७५५.५८ हजार हेक्टर हे २०१९ साली होते. यावरून असे स्पष्ट होते की, फळ पिकाच्या क्षेत्रामध्ये वाढ होत आहे.

२०१९ ते २०२३ या कालावधीत भाजीपाला पिकाखालील क्षेत्राची सरासरी ९१९.६९ हजार हेक्टर आहे. भाजीपाला पिकाच्या क्षेत्राचा भिन्नता गुणांक २२.८२ टक्के आहे. भाजीपाला पिकाच्या क्षेत्राचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.०९ टक्के आहे. भाजीपाला पिकाखालील कमाल क्षेत्र ११९२.७१ हजार हेक्टर हे २०२१ साली होते तर किमान क्षेत्र ६४९.२८ हजार हेक्टर हे २०१९ साली होते. यावरून असे स्पष्ट होते की, भाजीपाला पिकाच्या क्षेत्रामध्ये चढ-उतार होत आहे.

२०१९ ते २०२३ या कालावधीत फळबाग पिकाखालील क्षेत्राची सरासरी २१३.९१ हजार हेक्टर आहे. फळबाग पिकाच्या क्षेत्राचा भिन्नता गुणांक ८.०७ टक्के आहे. फळबाग पिकाच्या क्षेत्राचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.०५ टक्के आहे. फळबाग पिकाखालील कमाल क्षेत्र २२६.५८ हजार हेक्टर हे २०२३ साली होते तर किमान क्षेत्र १८८.७२ हजार हेक्टर हे २०१९ साली होते. यावरून असे स्पष्ट होते की, भाजीपाला पिकाच्या क्षेत्रामध्ये वाढ होत आहे.

२०१९ ते २०२३ या कालावधीत मसाल्याच्या पिकाखालील क्षेत्राची सरासरी ९७.९१ हजार हेक्टर आहे. मसाले पिकाच्या क्षेत्राचा भिन्नता गुणांक ३५.२४ टक्के आहे. मसाले पिकाच्या क्षेत्राचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.२६ टक्के आहे. मसाल्याच्या पिकाखालील कमाल क्षेत्र १३०.६२ हजार हेक्टर हे २०२१ साली होते तर किमान क्षेत्र ४६.२४ हजार हेक्टर हे २०१९ साली होते. यावरून असे स्पष्ट होते की, मसाल्याच्या पिकाच्या क्षेत्रामध्ये चढ-उतार होत आहे.

२०१९ ते २०२३ या कालावधीत फुल पिकाखालील क्षेत्राची सरासरी ११.६९ हजार हेक्टर आहे. फुल पिकाच्या क्षेत्राचा भिन्नता गुणांक ९.४२ टक्के आहे. फुल पिकाच्या क्षेत्राचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर -०.०१ टक्के आहे. फुल पिकाखालील कमाल क्षेत्र १३.४४ हजार हेक्टर हे २०२० साली होते तर किमान क्षेत्र १०.५६ हजार हेक्टर हे २०२२ साली होते. यावरून असे स्पष्ट होते की, फुल पिकाच्या क्षेत्रामध्ये चढ-उतार होत आहे.

२०१९ ते २०२३ या कालावधीत एकूण फलोत्पादन पिकाखालील क्षेत्राची सरासरी २०५८.०९ हजार हेक्टर आहे. एकूण फलोत्पादन पिकाच्या क्षेत्राचा भिन्नता गुणांक १४.१५ टक्के आहे. एकूण फलोत्पादन पिकाच्या क्षेत्राचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.०६ टक्के आहे. एकूण फलोत्पादन पिकाखालील कमाल क्षेत्र २३९०.७० हजार हेक्टर हे २०२१ साली होते तर किमान क्षेत्र १६५१.२७ हजार हेक्टर हे २०१९ साली होते. यावरून असे स्पष्ट होते की, एकूण फलोत्पादन पिकाच्या क्षेत्रामध्ये चढ-उतार होत आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

तक्ता क्रमांक २ महाराष्ट्र राज्यातील फलोत्पादन पिकाचे उत्पादन

(उत्पादन '०००' मे. टन)

अ.क्र.	वर्ष	फळे	भाजीपाला	फळबाग पिके	मसाल्याची पिके	फुले	एकूण फलोत्पादन पिके
१	२०१९	१०७७८	११४७२	३४८	३९१	४७	२३०३६.००
२	२०२०	१२६२४	१३०४३	३५८	१३०८	२१८	२७५५१.००
३	२०२१	१२७०६.९७	१७४२१.०५	४७५.५२	२०६३.०७	११५.१०	३२७८१.७१
४	२०२२	१४०९५.४८	१६२८०.४५	४०४.३५	१८४०.००	१५५.०८	३२७७५.३६
५	२०२३	१५१७४.५५	१४७०५.९०	४०६.५२	१८४७.०२	१५५.११	३२२८९.१०
सरासरी		**१३०७५.८०**	**१४५८४.४८**	**३९८.४८**	**१४८९.८२**	**१३८.०६**	**२९६८६.६३**
प्रमाणित विचलन		**१६६३.१७**	**२३९७.९६**	**५०.५५**	**६७४.४१**	**६२.८३**	**४३२१.०१**
भिन्नता गुणांक		**१२.७२**	**१६.४४**	**१२.६९**	**४५.२७**	**४५.५१**	**१४.५६**
चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर		**०.०९**	**०.०६**	**०.०४**	**०.४७**	**०.३५**	**०.०९**
कमाल		**१५१७४.५५**	**१७४२१.०५**	**४७५.५२**	**२०६३.०७**	**२१८.००**	**३२७८१.७१**
किमान		**१०७७८.००**	**११४७२.००**	**३४८.००**	**३९१.००**	**४७.००**	**२३०३६.००**

स्त्रोत : फलोत्पादन क्षेत्र उत्पादन माहिती प्रणाली, केंद्र शासन, २०१९ ते २०२३.

तक्ता क्रमांक २ मधील माहितीवरून महाराष्ट्र राज्यातील फलोत्पादन पिकाचे उत्पादनाचे वर्षनिहाय (२०१९ ते २०२३) विश्लेषण करण्यात आले आहे. २०१९ ते २०२३ या कालावधीत फळ पिकाचे सरासरी उत्पादन १३०७५.८० हजार मे. टन आहे. फळ पिकाच्या उत्पादनाचा भिन्नता गुणांक १२.७२ टक्के आहे. फळ पिकाच्या उत्पादनाचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.०९ टक्के आहे. फळ पिकाचे कमाल उत्पादन १५१७४.५५ हजार मे. टन हे २०२३ साली होते तर किमान उत्पादन १०७७८.०० हजार मे. टन हे २०१९ साली होते. यावरून असे स्पष्ट होते की, फळ पिकाच्या उत्पादनामध्ये वाढ होत आहे.

२०१९ ते २०२३ या कालावधीत भाजीपाला पिकाचे सरासरी उत्पादन १४५८४.४८ हजार मे. टन आहे. भाजीपाला पिकाच्या उत्पादनाचा भिन्नता गुणांक १६.४४ टक्के आहे. भाजीपाला पिकाच्या उत्पादनाचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.०६ टक्के आहे. भाजीपाला पिकाचे कमाल उत्पादन १७४२१.०५ हजार मे. टन हे २०२१ साली होते तर किमान उत्पादन ११४७२.०० हजार मे. टन हे २०१९ साली होते. यावरून असे स्पष्ट होते की, भाजीपाला पिकाच्या उत्पादनामध्ये चढ-उतार होत आहे.

२०१९ ते २०२३ या कालावधीत फळबाग पिकाचे सरासरी उत्पादन ३९८.४८ हजार मे. टन आहे. फळबाग पिकाच्या उत्पादनाचा भिन्नता गुणांक १२.६९ टक्के आहे. फळबाग पिकाच्या उत्पादनाचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.०४ टक्के आहे. फळबाग पिकाचे कमाल उत्पादन ४७५.५२ हजार मे. टन हे २०२१ साली होते तर किमान उत्पादन ३४८.०० हजार मे. टन हे २०१९ साली होते. यावरून असे स्पष्ट होते की, भाजीपाला पिकाच्या उत्पादनामध्ये चढ-उतार होत आहे.

२०१९ ते २०२३ या कालावधीत मसाल्याच्या पिकाचे सरासरी उत्पादन १४८९.८२ हजार मे. टन आहे. मसाले पिकाच्या उत्पादनाचा भिन्नता गुणांक ४५.२७ टक्के आहे. मसाले पिकाच्या उत्पादनाचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.४७ टक्के आहे. मसाल्याच्या पिकाचे कमाल उत्पादन २०६३.०७ हजार हेक्टर हे २०२१ साली होते तर किमान उत्पादन ३९१.०० हजार हेक्टर हे २०१९ साली होते. यावरून असे स्पष्ट होते की, मसाल्याच्या पिकाच्या उत्पादनामध्ये चढ-उतार होत आहे.

२०१९ ते २०२३ या कालावधीत फुल पिकाचे सरासरी उत्पादन १३८.०६ हजार मे. टन आहे. फुल पिकाच्या उत्पादनाचा भिन्नता गुणांक ४५.५१ टक्के आहे. फुल पिकाच्या उत्पादनाचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.३५ टक्के आहे. फुल पिकाचे कमाल उत्पादन २१८.०० हजार मे. टन हे २०२० साली होते तर किमान उत्पादन ४७.०० हजार मे. टन हे २०१९ साली होते. यावरून असे स्पष्ट होते की, फुल पिकाच्या उत्पादनामध्ये चढ-उतार होत आहे.

२०१९ ते २०२३ या कालावधीत एकूण फलोत्पादन पिकाचे सरासरी उत्पादन २९६८६.६३ हजार मे. टन आहे. एकूण फलोत्पादन पिकाच्या उत्पादनाचा भिन्नता गुणांक १४.५६ टक्के आहे. एकूण फलोत्पादन पिकाच्या उत्पादनाचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.०१ टक्के आहे. एकूण फलोत्पादन पिकाचे कमाल उत्पादन ३२७८१.७१ हजार मे. टन हे २०२१ साली होते तर किमान उत्पादन २३०३६.०० हजार मे. टन हे २०१९ साली होते. यावरून असे स्पष्ट होते की, एकूण फलोत्पादन पिकाच्या उत्पादनामध्ये चढ-उतार होत आहे.

निष्कर्ष

1. फळ पिकाखालील क्षेत्राची सरासरी ८१४.८९ हजार हेक्टर आहे. फळ पिकाच्या क्षेत्राचा भिन्नता गुणांक ५.१६ टक्के आहे. फळ पिकाच्या क्षेत्राचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.०३ टक्के आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

2. भाजीपाला पिकाखालील क्षेत्राची सरासरी ९१९.६९ हजार हेक्टर आहे. भाजीपाला पिकाच्या क्षेत्राचा भिन्नता गुणांक २२.८२ टक्के आहे. भाजीपाला पिकाच्या क्षेत्राचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.०९ टक्के आहे.
3. फळबाग पिकाखालील क्षेत्राची सरासरी २१३.९१ हजार हेक्टर आहे. फळबाग पिकाच्या क्षेत्राचा भिन्नता गुणांक ८.०७ टक्के आहे. फळबाग पिकाच्या क्षेत्राचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.०५ टक्के आहे.
4. मसाल्याच्या पिकाखालील क्षेत्राची सरासरी ९७.९१ हजार हेक्टर आहे. मसाले पिकाच्या क्षेत्राचा भिन्नता गुणांक ३५.२४ टक्के आहे. मसाले पिकाच्या क्षेत्राचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.२६ टक्के आहे.
5. फुल पिकाखालील क्षेत्राची सरासरी ११.६९ हजार हेक्टर आहे. फुल पिकाच्या क्षेत्राचा भिन्नता गुणांक ९.४२ टक्के आहे. फुल पिकाच्या क्षेत्राचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर -०.०१ टक्के आहे.
6. एकूण फलोत्पादन पिकाखालील क्षेत्राची सरासरी २०५८.०९ हजार हेक्टर आहे. एकूण फलोत्पादन पिकाच्या क्षेत्राचा भिन्नता गुणांक १४.१५ टक्के आहे. एकूण फलोत्पादन पिकाच्या क्षेत्राचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.०६ टक्के आहे.
7. फळ पिकाचे सरासरी उत्पादन १३०७५.८० हजार मे. टन आहे. फळ पिकाच्या उत्पादनाचा भिन्नता गुणांक १२.७२ टक्के आहे. फळ पिकाच्या उत्पादनाचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.०९ टक्के आहे.
8. भाजीपाला पिकाचे सरासरी उत्पादन १४५८४.४८ हजार मे. टन आहे. भाजीपाला पिकाच्या उत्पादनाचा भिन्नता गुणांक १६.४४ टक्के आहे. भाजीपाला पिकाच्या उत्पादनाचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.०६ टक्के आहे.
9. फळबाग पिकाचे सरासरी उत्पादन ३९८.४८ हजार मे. टन आहे. फळबाग पिकाच्या उत्पादनाचा भिन्नता गुणांक १२.६९ टक्के आहे. फळबाग पिकाच्या उत्पादनाचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.०४ टक्के आहे.
10. मसाल्याच्या पिकाचे सरासरी उत्पादन १४८९.८२ हजार मे. टन आहे. मसाले पिकाच्या उत्पादनाचा भिन्नता गुणांक ४५.२७ टक्के आहे. मसाले पिकाच्या उत्पादनाचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.४७ टक्के आहे.
11. फुल पिकाचे सरासरी उत्पादन १३८.०६ हजार मे. टन आहे. फुल पिकाच्या उत्पादनाचा भिन्नता गुणांक ४५.५१ टक्के आहे. फुल पिकाच्या उत्पादनाचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.३५ टक्के आहे.
12. एकूण फलोत्पादन पिकाचे सरासरी उत्पादन २९६८६.६३ हजार मे. टन आहे. एकूण फलोत्पादन पिकाच्या उत्पादनाचा भिन्नता गुणांक १४.५६ टक्के आहे. एकूण फलोत्पादन पिकाच्या उत्पादनाचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.०१ टक्के आहे.

उपाययोजना

महाराष्ट्रातील फलोत्पादन क्षेत्राचा शाश्वत विकास साध्य करण्यासाठी, सिंचन सुविधा आणि सूक्ष्म सिंचन योजनांचा विस्तार करणे, हवामान अनुकूल आणि रोग-प्रतिरोधक वाणांचा वापर वाढवणे आणि शेतकऱ्यांना नियमित प्रशिक्षण आणि तांत्रिक मार्गदर्शन देणे आवश्यक आहे. साठवणूक, शीतगृहे, वाहतूक आणि प्रक्रिया उद्योग विकसित करून बाजारभावातील चढ-उतारांचा परिणाम कमी करता येतो. यासोबतच, थेट बाजारसंबंध, निर्यात प्रोत्साहन, विमा योजना आणि आर्थिक सहाय्य प्रभावीपणे अंमलात आणल्यास शेतकऱ्यांचे धोके कमी करता येतात. योग्य सरकारी धोरणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रभावी बाजार व्यवस्था निर्माण करून, महाराष्ट्रातील फलोत्पादन पिके आणि उत्पादन क्षेत्रात स्थिरता आणि दीर्घकालीन वाढ साध्य करता येते.

संदर्भग्रंथ

1. Deshpande, R. S. (2019). Agricultural development and rural livelihoods in Maharashtra. New Delhi: Oxford University Press.
2. Government of Maharashtra. (2022). Economic Survey of Maharashtra 2021–22. Mumbai: Directorate of Economics and Statistics.
3. National Horticulture Board. (2021). Horticulture statistics at a glance. Gurugram: Ministry of Agriculture and Farmers Welfare, Government of India.
4. Singh, R., & Sharma, P. (2020). Growth and performance of horticulture sector in India. Indian Journal of Agricultural Economics, 75(3), 345–360.
5. World Bank. (2020). Enhancing agricultural resilience and income in India. Washington, DC: World Bank.
6. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१९-२०२३.
7. फलोत्पादन क्षेत्र उत्पादन माहिती प्रणाली, केंद्र शासन, २०१९ ते २०२३.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

आधुनिक भारतातील सामाजिक परिवर्तनाचे समाजशास्त्र: परंपरा आणि आधुनिकतेचा संघर्ष

डॉ. भाग्यश्री एम. पाटील
समाजशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण के.एम.सी. कॉलेज, कोल्हापूर
Email: bmpatil3658@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180227
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 130-134
February- 2026
Submitted: 08 Jan. 2026
Revised: 18 Jan. 2026
Accepted: 05 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

आधुनिक भारतातील सामाजिक परिवर्तन हे परंपरा आणि आधुनिकतेच्या सतत चालणाऱ्या संघर्षातून घडत आहे. पारंपरिक मूल्ये, रूढी, जातिव्यवस्था, कुटुंबव्यवस्था आणि धार्मिक आचार यांचा समाजावर दीर्घकाळ प्रभाव राहिला आहे. मात्र, औद्योगिकीकरण, शहरीकरण, शिक्षणाचा प्रसार, तंत्रज्ञानाचा विकास आणि जागतिकीकरण यामुळे आधुनिक विचारसरणी उदयास आली आहे.

या प्रक्रियेमुळे व्यक्तिवाद, समानता, स्त्री-पुरुष समता, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि मानवाधिकार यांसारख्या मूल्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे पारंपरिक बंधने आणि आधुनिक मूल्यांमध्ये ताण निर्माण होतो. उदाहरणार्थ, संयुक्त कुटुंबव्यवस्थेचे स्थान कमी होऊन अणुकुटुंबव्यवस्था वाढत आहे, तसेच जातीय भेदभावाला आव्हान दिले जात आहे. तथापि, भारतात पूर्णपणे आधुनिकता स्वीकारली गेली नाही; अनेक ठिकाणी परंपरा आणि आधुनिकता यांचे मिश्रण दिसून येते. लोक एकाच वेळी आधुनिक जीवनशैली स्वीकारतात, पण सांस्कृतिक परंपरांनाही जपतात. अशा प्रकारे, आधुनिक भारतातील सामाजिक परिवर्तन हे संघर्ष, समन्वय आणि अनुकूलन यांचा एक गतिशील प्रक्रियेचा परिणाम आहे.

परिभाषिक शब्द: *सामाजिक परिवर्तन, परंपरा, आधुनिकता, संस्कृतीकरण, पाश्चात्यीकरण.*

प्रस्तावना

भारतीय समाज हा जगातील अत्यंत प्राचीन, वैविध्यपूर्ण आणि गुंतागुंतीच्या सामाजिक संरचनांपैकी एक मानला जातो. गेल्या काही दशकांत, विशेषतः स्वातंत्र्योत्तर काळात आणि १९९१ च्या आर्थिक उदारीकरणानंतर, भारताने सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक क्षेत्रांत अभूतपूर्व प्रगती केली आहे. मात्र, या परिवर्तनाच्या वेगवान प्रक्रियेत 'परंपरा' आणि 'आधुनिकता' या दोन परस्परविरोधी वाटणाऱ्या शक्तींमध्ये एक निरंतर संघर्ष आणि संवाद पाहायला मिळतो. भारतीय समाज आज एका अशा वळणावर उभा आहे जिथे तो एका बाजूला आपली हजारो वर्षांची सांस्कृतिक मूल्ये, कुटुंब व्यवस्था, जातीव्यवस्था आणि धार्मिक श्रद्धा जपू पाहत आहे; तर दुसऱ्या बाजूला जागतिकीकरण, पाश्चात्यीकरण, शहरीकरण आणि विज्ञाननिष्ठ आधुनिकतेचा मुक्तपणे स्वीकार करत आहे. हा संघर्ष केवळ बाह्य स्वरूपाचा नसून तो वैचारिक आणि संरक्षणात्मक देखील आहे. आधुनिक शिक्षण आणि तंत्रज्ञानामुळे लोकांच्या जीवनशैलीत बदल झाला असला, तरी सामाजिक मानसिकतेत अजूनही पारंपरिक विचारांचा पगडा कायम आहे. उदाहरणार्थ, अंतराळ युगात वावरणारा भारतीय समाज आजही लग्नकार्यात किंवा सामाजिक व्यवहारात जातीच्या चौकटी ओलांडताना कचरतो. यालाच समाजशास्त्रज्ञ एम. एन. श्रीनिवास यांनी 'आधुनिकतेचे परंपराकरण' किंवा 'परंपरेचे आधुनिकीकरण' असे म्हटले आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. भाग्यश्री एम. पाटील, समाजशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण के.एम.सी. कॉलेज, कोल्हापूर

How to cite this article:
पाटील, . भाग्यश्री . एम . (*2026*). आधुनिक भारतातील सामाजिक परिवर्तनाचे समाजशास्त्र: परंपरा आणि आधुनिकतेचा संघर्ष. *Journal of Research & Development, 18(2(XXI)), 130–134. https://doi.org/10.5281/zenodo.19536382*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19536382

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

हा लेख आधुनिक भारतातील सामाजिक परिवर्तनाचे गुंतागुंतीचे स्वरूप, परिवर्तनाचे विविध घटक आणि परंपरा-आधुनिकतेच्या संघर्षातून आकार घेत असलेल्या एका नवीन, 'संमिश्र' सामाजिक संरचनेचा सखोल अभ्यास करतो. या प्रक्रियेत भारतीय समाजाने कोणते जुने निकष सोडले आणि कोणत्या नव्या मूल्यांना आपलेसे केले, याचा शोध घेणे हा या अभ्यासाचा मुख्य उद्देश आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:

- आधुनिक भारतातील सामाजिक परिवर्तनाचे प्रमुख घटक (उदा. शिक्षण, तंत्रज्ञान, कायदे) शोधणे.
- परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील संघर्षाचा भारतीय कुटुंब आणि जातीव्यवस्थेवरील परिणाम तपासणे.
- परिवर्तनाच्या प्रक्रियेत निर्माण होणाऱ्या आव्हानांचे (उदा. सांस्कृतिक संघर्ष) विश्लेषण करणे.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत अभ्यास प्रामुख्याने 'दुय्यम माहिती स्रोतांवर' आधारित आहे. यामध्ये समाजशास्त्रीय ग्रंथ, नामांकित विचारवंतांचे लेख, सरकारी अहवाल आणि जनगणनेची आकडेवारी यांचा वापर करून विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब केला आहे.

विषय विवेचन:

आधुनिक भारतातील सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप समजून घेण्यासाठी त्यामागील प्रबळ घटकांचे विश्लेषण करणे आवश्यक आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, कोणताही समाज स्थिर नसतो; परंतु भारतातील परिवर्तनाचा वेग हा जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानामुळे प्रचंड वाढला आहे.

१. आधुनिक शिक्षण

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात शक्तिशाली इंधन आहे. ब्रिटीश काळातील पाश्चात्य शिक्षणाने भारतीयांना समता, स्वातंत्र्य आणि लोकशाही या मूल्यांची ओळख करून दिली. आधुनिक काळात शिक्षणाने केवळ साक्षरता वाढवली नाही, तर जात आणि धर्माच्या पारंपरिक भिंती ओलांडून व्यक्तीला 'आर्थिक स्वावलंबन' मिळवून दिले. शिक्षणामुळेच स्त्रिया आणि उपेक्षित समुदायांना आपले हक्क समजले आणि त्यांच्या सामाजिक स्थितीत बदल झाला. आज शिक्षणाने 'बौद्धिक गतिशीलतेला' जन्म दिला आहे, ज्यामुळे लोक आपल्या पारंपरिक व्यवसायांना सोडून नवीन क्षेत्रांत नाव कमावत आहेत.

२. विज्ञान आणि तंत्रज्ञान:

तंत्रज्ञान हा आधुनिक परिवर्तनाचा कणा आहे. औद्योगिक क्रांतीपासून सुरू झालेला हा प्रवास आज 'डिजिटल क्रांती'पर्यंत पोहोचला आहे. तंत्रज्ञानामुळे श्रमाचे विभाजन बदलले आणि शहरीकरणाला वेग आला. इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे माहितीचे लोकशाहीकरण झाले आहे. स्मार्टफोनमुळे ग्रामीण आणि शहरी भागातील अंतर कमी झाले असून, विचारांच्या देवाणघेवाणीत सुलभता आली आहे. तंत्रज्ञानाने मानवी नातेसंबंधांचे स्वरूपही बदलले आहे आज 'फेसबुक' किंवा 'व्हॉट्सॲप' सारखी माध्यमे नवीन सामाजिक गट आणि ओळख निर्माण करत आहेत. मात्र, यामुळे 'पारंपरिक संवाद' कमी होऊन आभासी जग प्रबळ होत असल्याचेही दिसते.

३. कायदे आणि घटनात्मक तरतुदी:

भारतीय संविधान हा सामाजिक परिवर्तनाचा सर्वात मोठा 'कायदेशीर दस्तऐवज' आहे. अस्पृश्यता निवारण कायदा (कलम १७), हिंदू कोड बिल, हुंडाबळी प्रतिबंधक कायदा आणि अलीकडील माहितीचा अधिकार किंवा शिक्षणाचा अधिकार यांसारख्या कायद्यांनी समाजाची जुनी रचना बदलण्यास भाग पाडले आहे. कायद्याने महिलांना मालमत्तेत समान अधिकार दिले आणि आरक्षणाच्या माध्यमातून दुर्बल घटकांना सत्तेत वाटा मिळवून दिला. कायदे हे समाजात 'वरिष्ठ-कनिष्ठ' हा भेदभाव नष्ट करून 'नागरिकत्व' ही नवी ओळख प्रस्थापित करण्यात यशस्वी झाले आहेत.

४. शहरीकरण आणि औद्योगिकीकरण:

शहरे ही परिवर्तनाची केंद्रे असतात. औद्योगिकीकरणामुळे रोजगारासाठी लोकांचे मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर झाले. शहरात व्यक्तीची ओळख त्याच्या जातीवरून नाही, तर त्याच्या कामावरून ठरते. हॉटेलमध्ये एकत्र जेवणे, सार्वजनिक वाहनांतून प्रवास करणे यांमुळे 'सोवळे-ओवळे' आणि 'जातीय अंतर' कमी झाले आहे. शहरांनी 'संयुक्त कुटुंब' पद्धती मोडून 'केंद्रकुटुंब' पद्धतीला चालना दिली, ज्याने व्यक्तीस्वातंत्र्याला अधिक महत्त्व प्राप्त करून दिले.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

५. जागतिकीकरण:

१९९१ च्या आर्थिक सुधारणांनंतर भारताचे दरवाजे जगासाठी उघडले गेले. जागतिकीकरणामुळे केवळ वस्तूंचीच नाही, तर पाश्चात्य विचारांची आणि जीवनशैलीचीही आयात झाली. 'कन्झ्युमरिझम' किंवा चंगळवाद वाढला, ज्यामुळे लोकांच्या खाण्यापिण्याच्या सवयी, पेहराव आणि मनोरंजनाचे प्रकार बदलले. जागतिकीकरणाने भारतीय समाजाला जागतिक समुदायाशी जोडले, परंतु यामुळे स्थानिक संस्कृती आणि भाषांसमोर मोठे आव्हानही उभे राहिले आहे.

एकूणच शिक्षण, तंत्रज्ञान आणि कायदे यांनी मिळून आधुनिक भारताची नवी प्रतिमा तयार केली आहे. हे घटक एकमेकांशी घट्ट जोडलेले आहेत. शिक्षणाने वैज्ञानिक दृष्टिकोन दिला, तंत्रज्ञानाने त्याला गती दिली आणि कायद्याने त्याला सुरक्षितता प्रदान केली. या घटकांमुळे भारतीय समाज परंपरेच्या जोखडातून मुक्त होऊन आधुनिकतेकडे वाटचाल करत असला, तरी या बदलांचा वेग सर्व स्तरांत समान नाही, हे देखील वास्तव आहे.

परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील संघर्षाचा भारतीय कुटुंब आणि जातीव्यवस्थेवरील परिणाम:

भारतीय समाज सध्या एका संक्रमण अवस्थेतून जात आहे, जिथे प्राचीन 'परंपरा' आणि समकालीन 'आधुनिकता' यांचा थेट संघर्ष पाहायला मिळतो. या संघर्षाचा सर्वाधिक आणि खोलवर परिणाम आपल्या समाजाच्या दोन मूलभूत स्तंभांवर अर्थात 'कुटुंब संस्था' आणि 'जातीव्यवस्था' झालेला दिसून येतो.

१. कुटुंब संस्थेवरील परिणाम:

भारतीय कुटुंब व्यवस्था ही पारंपारिकपणे 'संयुक्त कुटुंब' पद्धतीवर आधारित होती. मात्र, आधुनिकतेच्या प्रभावामुळे यात मोठे बदल झाले आहेत. औद्योगिकीकरण आणि शहरीकरणामुळे रोजगारासाठी तरुणांचे शहरांकडे स्थलांतर झाले, ज्यातून संयुक्त कुटुंबे मोडून 'विभक्त किंवा केंद्रकुटुंब' पद्धती अस्तित्वात आली. परंपरेनुसार कुटुंबाचा निर्णय घेण्याचा अधिकार 'कर्त्या' पुरुषाकडे असायचा, मात्र आता लोकशाही मूल्यांमुळे वैयक्तिक स्वातंत्र्याला महत्त्व प्राप्त झाले आहे. आधुनिक शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबनामुळे कुटुंबातील स्त्रियांची भूमिका बदलली आहे. परंपरेने स्त्रियांना चूल आणि मूल इथपर्यंत मर्यादित ठेवले होते, परंतु आता त्या कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेत सक्रिय भागीदार आहेत. यातूनच अनेकदा जुन्या विचारांच्या पिढीशी संघर्षाचे प्रसंग निर्माण होतात. तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे एकाच घरात राहूनही संवाद कमी झाला आहे. परंपरेने येणारी 'वडिलधाऱ्यांची भीती' जाऊन आता 'मैत्रीपूर्ण संबंध' प्रस्थापित होत आहेत, पण त्याच वेळी वृद्धाश्रमांची वाढती संख्या हा परंपरा आणि आधुनिकतेच्या संघर्षाचा नकारात्मक परिणाम आहे.

२. जातीव्यवस्थेवरील परिणाम:

जातीव्यवस्था हा भारतीय समाजाचा सर्वात कठीण आणि पारंपरिक भाग आहे. आधुनिकतेने या व्यवस्थेला मोठे आव्हान दिले आहे. परंपरेनुसार जात ही व्यवसायावरून ठरत असे. मात्र, आधुनिक शिक्षण आणि जागतिकीकरणामुळे व्यक्ती कोणत्याही जातीची असो, ती तिच्या गुणवत्तेनुसार कोणताही व्यवसाय करू शकते. यामुळे जातीचा 'व्यावसायिक आधार' कमकुवत झाला आहे. शहरी जीवन, हॉटेल संस्कृती आणि सार्वजनिक वाहतूक यामुळे जातीवर आधारित 'स्पर्श-अस्पर्श' ही भावना नष्ट होत चालली आहे. आधुनिक कायदे आणि मानवी हक्क यांमुळे जातीभेद हा आता कायदेशीर गुन्हा ठरला आहे. जातीव्यवस्थेचा सर्वात मजबूत किल्ला म्हणजे 'अंतर्विवाह' आजही आधुनिक समाजात प्रेमविवाह स्वीकारले जात असले, तरी 'जातीबाहेर विवाह' करण्याला मोठा सामाजिक विरोध आहे. येथे आधुनिक विचार आणि पारंपरिक कट्टरता यांचा तीव्र संघर्ष पाहायला मिळतो. आधुनिकतेने जातीचे सामाजिक महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न केला असला, तरी राजकारणाने जातीला एक 'मतपेढी' म्हणून जिवंत ठेवले आहे. एम. एन. श्रीनिवास यांच्या मते, ही 'जातीचे पुनरुज्जीवन' करण्याची प्रक्रिया आहे.

३. संघर्ष आणि समन्वय:

परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील हा संघर्ष नेहमीच विघातक नसतो. भारतीय समाजाने एक विलक्षण 'समन्वय' साधला आहे. उदाहरणार्थ, माहिती तंत्रज्ञानात काम करणारे तरुण (आधुनिकता) घरी आल्यावर तितक्याच श्रद्धेने पारंपरिक पूजा-अर्चा करतात (परंपरा). अनेकदा आधुनिक माध्यमांचा (उदा. मॅट्रिमोनिअल साईट्स) वापर केवळ स्वतःच्याच जातीतील जोडीदार शोधण्यासाठी केला जातो. याला समाजशास्त्रात 'आधुनिकतेचे परंपराकरण' असे म्हटले जाते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

परिवर्तनाच्या प्रक्रियेत निर्माण होणाऱ्या आव्हान:

आधुनिक भारतातील सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया ही दिसायला जरी प्रगतीशील वाटत असली, तरी ती अत्यंत गुंतागुंतीची आणि आव्हानात्मक आहे. जेव्हा एखादा समाज आपल्या हजारो वर्षांच्या परंपरेतून बाहेर पडून आधुनिकतेची कास धरतो, तेव्हा त्या प्रक्रियेत वैचारिक, सांस्कृतिक आणि संरचनात्मक संघर्ष निर्माण होणे अपरिहार्य असते.

१. सांस्कृतिक संघर्ष आणि मूल्यद्वंद्व

सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेतील सर्वात जटिल आव्हान म्हणजे 'सांस्कृतिक संघर्ष' होय. आजचा भारतीय समाज एका दुहेरी कात्रीत सापडला आहे; जिथे एका बाजूला पाश्चात्य मूल्ये जसे की व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि प्रखर व्यक्तिवाद यांचा स्वीकार होत आहे, तर दुसऱ्या बाजूला आपली मूळ सांस्कृतिक मुळे घट्ट धरून ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे. यातूनच समाजात एक प्रकारचे 'मूल्यद्वंद्व' निर्माण झाले आहे. जुन्या पिढीसाठी परंपरा ही सामाजिक सुरक्षितता आणि शिस्तीचा आधार आहे, परंतु आधुनिक शिक्षण घेतलेल्या नवीन पिढीला याच परंपरा प्रगतीमधील बंधने वाटतात. यामुळे कौटुंबिक स्तरावर वैचारिक कलह आणि विसंवाद वाढताना दिसत आहेत. इंटरनेट व जागतिकीकरणामुळे पाश्चात्य जीवनशैलीचा प्रभाव इतका वाढला आहे की, त्याला अनेकदा 'सांस्कृतिक आक्रमण' मानले जाते. या आक्रमणापासून स्वतःची ओळख वाचवण्यासाठी समाजातील काही घटकांमध्ये टोकाची 'सांस्कृतिक कट्टरता' देखील बळावताना दिसत आहे.

२. सांस्कृतिक पाश्चात्यता:

समाजशास्त्रज्ञ विल्यम ऑग्बर्न यांनी मांडलेली 'सांस्कृतिक पाश्चात्यता' ही संकल्पना आधुनिक भारताच्या संदर्भात अत्यंत चपखल बसते. त्यांच्या मते, जेव्हा समाजाची भौतिक संस्कृती (तंत्रज्ञान, साधने) वेगाने प्रगत होते, परंतु त्या तुलनेत अभौतिक संस्कृती (विचार, मूल्ये, मानसिकता) मागे राहते, तेव्हा एक प्रकारची सांस्कृतिक दरी निर्माण होते. भारताने आज तांत्रिकदृष्ट्या मोठी झेप घेतली आहे; मात्र आपली सामाजिक समज आजही पारंपरिक चौकटीत अडकलेली दिसते. उदाहरणार्थ, आपण हातात अत्याधुनिक स्मार्टफोन आणि उच्च तंत्रज्ञान वापरतो, परंतु त्याच उपकरणांचा वापर जातीय विद्वेष पसरवण्यासाठी किंवा अंधश्रद्धायुक्त अफवांवर विश्वास ठेवण्यासाठी करतो. तंत्रज्ञानाचे आधुनिकीकरण झाले असले तरी, आपली वैचारिक प्रगती जुनाट आणि संकुचित विचारांत गुरफटलेली असणे, हे सामाजिक सक्षमीकरणाच्या मार्गातील सर्वात मोठे आव्हान आहे.

३. ओळख आणि अस्मितेचे राजकारण

आधुनिकतेच्या प्रभावामुळे जातीव्यवस्थेची पारंपरिक सामाजिक बंधने काही प्रमाणात सैल झाली असली, तरी लोकशाही राजकारणाने जातीला एक राजकीय 'अस्मिता' म्हणून पुन्हा प्रबळ केले आहे. सामाजिक परिवर्तनाच्या या प्रक्रियेत प्रत्येक जातीला सत्तेत आपला वाटा आणि राजकीय प्रभुत्व हवे आहे, ज्यातून जाती-जातींमध्ये नव्याने संघर्ष आणि स्पर्धा निर्माण होत आहे. वाढती लोकसंख्या आणि त्या तुलनेत शिक्षण व रोजगाराच्या संधी मर्यादित असल्याने, विविध समुदाय आपापल्या अस्मितांच्या आधारे आरक्षणासाठी व्यापक आंदोलने करत आहेत. जातीचे हे वाढते राजकीयीकरण केवळ निवडणुकांपुरते मर्यादित न राहता, ते समाजातील सुसंवादाला बाधा पोहोचवत आहे. या 'अस्मितेच्या राजकारणामुळे' व्यापक राष्ट्रीय हिताऐवजी संकुचित जातीय हितसंबंधांना महत्त्व प्राप्त होत आहे, जे सामाजिक एकात्मतेपुढील मोठे आव्हान आहे.

४. वाढती आर्थिक विषमता

सामाजिक परिवर्तनाचे फायदे भारतीय समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत समान रीतीने पोहोचलेले नाहीत. जागतिकीकरणामुळे शहरी मध्यमवर्ग आणि उच्च वर्गाच्या उत्पन्नात मोठी वाढ झाली असली, तरी ग्रामीण भागातील शेतकरी आणि उपेक्षित समुदाय आजही गरिबीच्या चक्रव्यूहात अडकलेले आहेत. विशेषतः ज्यांच्याकडे आधुनिक तंत्रज्ञान आणि संसाधने आहेत ते वेगाने प्रगती करत आहेत, तर तंत्रज्ञानापासून वंचित असलेला वर्ग मागे पडत आहे. ही रुंदावणारी आर्थिक दरी भविष्यात समाजात तीव्र वर्ग संघर्षाला निमंत्रण देऊ शकते.

५. कुटुंब आणि नातेसंबंधांचे विघटन

आधुनिकतेने व्यक्तीला वैयक्तिक स्वातंत्र्य आणि स्वावलंबन दिले असले, तरी त्यासोबतच मानवी नातेसंबंधांमधील भावनिक ओलावा काहीसा कमी केला आहे. वाढत्या शहरीकरणामुळे केंद्रकुटुंब (Nuclear Family) पद्धती अनिवार्य झाली असली तरी, यात मुलांवर होणाऱ्या संस्कारांची कमतरता आणि घरातील वृद्धांची होणारी हेळसांड ही आज मोठी सामाजिक समस्या बनली आहे. विभक्त

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

कुटुंब पद्धतीमुळे पारंपारिक आधार यंत्रणा कमकुवत झाली आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे वाढते घटस्फोट, विवाहबाह्य संबंध आणि 'लिव्ह-इन-रिलेशनशिप' यांसारख्या संकल्पनांमुळे पारंपरिक भारतीय कुटुंब व्यवस्था संकटात सापडली आहे. या अस्थिर कौटुंबिक पर्यावरणाचा थेट आणि नकारात्मक परिणाम मुलांच्या मानसिकतेवर व त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर होत आहे, जे भविष्यातील समाजासाठी चिंताजनक आहे.

६. पर्यावरणाचे ऱ्हास आणि शाश्वतता

आधुनिक परिवर्तनाचा मुख्य आधार औद्योगिकीकरण आहे. मात्र, या प्रक्रियेत आपण निसर्गाचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास केला आहे. आधुनिक जीवनशैली म्हणजे 'जास्तीत जास्त उपभोग' अशी झाली आहे. यामुळे प्रदूषण, हवामान बदल आणि नैसर्गिक संसाधनांची कमतरता ही आव्हाने निर्माण झाली आहेत.

परिवर्तनाच्या प्रक्रियेत निर्माण होणारी ही आव्हाने भारतीय समाजाच्या सत्वपरीक्षेचा काळ आहेत. केवळ तंत्रज्ञानाने प्रगत होणे म्हणजे सामाजिक परिवर्तन नव्हे, तर आपल्या संस्कृतीतील चांगल्या गोष्टी जपत आधुनिक मूल्यांशी सांगड घालणे, हे खरे आव्हान आहे. सांस्कृतिक संघर्षाला समन्वयाची जोड देऊन आणि आर्थिक विषमतेवर मात करूनच आपण एक निरोगी आणि प्रगत समाज निर्माण करू शकतो.

निष्कर्ष:

आधुनिक भारतातील सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया ही अत्यंत संमिश्र, बहुआयामी आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. पाश्चात्य जगातील परिवर्तनाप्रमाणे येथे जुन्याचा पूर्ण त्याग करून नव्याचा स्वीकार झालेला नाही, तर भारतीय समाजाने आपल्या हजारो वर्षांच्या 'परंपरा' आणि २१ व्या शतकातील 'आधुनिकता' यांचा एक विलक्षण समन्वय साधला आहे. आजचा भारतीय समाज हा एका बाजूला अत्याधुनिक तंत्रज्ञान, जागतिक अर्थकारण आणि लोकशाही मूल्यांशी जोडलेला आहे, तर दुसऱ्या बाजूला तो आपल्या सांस्कृतिक मुळांशी, कौटुंबिक नीतिमत्तेशी आणि धार्मिक श्रद्धांशी तितकाच घट्ट बांधलेला आहे. परंपरा आणि आधुनिकता हे एकमेकांचे कट्टर शत्रू नसून ते भारतीय मानसिकतेत 'सहअस्तित्वात' आहेत. या दोन्ही प्रवाहांच्या संघर्षातून एक नवी 'नव-भारतीय' संस्कृती आकाराला येत आहे. ही संस्कृती केवळ पाश्चात्य अंधानुकरण करणारी नाही, तर ती आधुनिक विज्ञानाला भारतीय मूल्यांची जोड देणारी आहे. समाजशास्त्रज्ञ एम.एन. श्रीनिवास यांच्या भाषेत सांगायचे तर, हे 'आधुनिकतेचे भारतीयीकरण' आहे. हा संघर्ष विघातक नसून तो सामाजिक प्रगतीचाच एक अपरिहार्य भाग आहे, कारण त्यातूनच समाज स्वतःच्या चुका सुधारत पुढे जात असतो. मात्र, हे परिवर्तन केवळ बाह्य स्वरूपाचे वेषभूषा, खाण्यापिण्याच्या सवयी किंवा तंत्रज्ञानाचा वापर राहू नये, ही एक महत्त्वाची अट आहे. जोपर्यंत समता, बंधुता, मानवी प्रतिष्ठा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन हे केवळ कायद्याच्या पुस्तकात न राहता सामान्य जनमानसाच्या विचारात आणि वर्तनात रुजत नाहीत, तोपर्यंत हे सामाजिक परिवर्तन खऱ्या अर्थाने पूर्ण होणार नाही. जातीव्यवस्थेची कट्टरता, स्त्री-पुरुष असमानता आणि अंधश्रद्धा यांसारखी आव्हाने आजही या परिवर्तनाच्या मार्गात अडथळे निर्माण करत आहेत. सारांश, आधुनिकतेची ही लाट जोपर्यंत समाजातील सर्वात शेवटच्या घटकाच्या आयुष्यात गुणात्मक बदल घडवून आणत नाही, तोपर्यंत आपला 'आधुनिक' होण्याचा प्रवास अपूर्णच राहील. परंपरेतील 'शहाणपण' आणि आधुनिकतेतील 'विज्ञान' यांची सांगड घालणे, हेच उद्याच्या समर्थ भारताचे सूत्र असेल.

संदर्भ सूची:

१. एम. एन. श्रीनिवास, Social Change in Modern India, ओरिएंट ब्लॅकस्वान, २००५. २. योगेंद्र सिंग, Modernization of Indian Tradition, थॉमसन प्रेस, १९७३.
२. ए. आर. देसाई, Social Background of Indian Nationalism, पॉप्युलर प्रकाशन, १९४८.
३. राम आहुजा, Society in India: Concepts, Theories and Recent Trends, रावत पब्लिकेशन्स.
४. एस. सी. दुबे, Indian Society, नॅशनल बुक ट्रस्ट, भारत.
५. लोकसत्ता (रविवार विशेष), "बदलत्या भारताचे समाजशास्त्र", जानेवारी २०२५.
६. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, "समाज आणि संस्कृती विभाग".
७. योजना मासिक, "विशेष अंक: भारतीय समाज आणि जागतिकीकरण", २०२४.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

कोल्हापूर जिल्हातील ऊस पिकाचा सविस्तर अभ्यास

डॉ. रोहित दिनकर बारसिंग[१], डॉ. समिना एस. जमादार[२], निर्माण राजन कदम[३], सम्राट सताप्पा पाटील[४]
[1,2] सहायक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, कोल्हापूर
[3,4] बी. ए. भाग १, यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, कोल्हापूर
Email: rohitbarsing1986@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180228
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 135-138
February- 2026
Submitted: 08 Jan. 2026
Revised: 18 Jan. 2026
Accepted: 05 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस पिकाच्या अभ्यासातून असे दिसून आले आहे की २०२० ते २०२४ पर्यंत ऊस पिकाखालील क्षेत्रात सातत्याने वाढ झाली आहे. या कालावधीत सरासरी क्षेत्र १,६८,१४५ हेक्टर नोंदवले गेले आहे. तथापि, उत्पादनात काही चढउतार आहेत, तर उत्पादकता तुलनेने स्थिर राहिली आहे आणि सरासरी ९३ ('०० ' मेट्रिक टन प्रति हेक्टर) आहे. यावरून असे दिसून येते की कोल्हापूर जिल्ह्यात ऊस शेती अजूनही महत्त्वाची आहे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेत ती महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. तथापि, उत्पादन आणि उत्पादकतेत स्थिरता राखण्यासाठी, आधुनिक तंत्रज्ञान, योग्य सिंचन व्यवस्थापन आणि सुधारित बियाण्यांचा वापर करणे आवश्यक आहे.

कीवर्ड: *ऊस, उत्पादन, उत्पादकता आणि कोल्हापूर जिल्हा.*

प्रस्तावना

ऊस उत्पादनाच्या बाबतीत महाराष्ट्र हे भारतातील आघाडीच्या राज्यांपैकी एक मानले जाते. पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हा सुपीक जमीन, मुबलक पाऊस आणि विकसित सिंचन व्यवस्था यामुळे ऊस उत्पादनासाठी विशेषतः योग्य आहे. ऊस हे एक नगदी पीक आहे आणि साखर उद्योग, गूळ उद्योग आणि त्यावर आधारित इतर उप-उद्योग ग्रामीण अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देतात. म्हणूनच, कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस पिकाचा अभ्यास करणे आर्थिक आणि भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे.

कोल्हापूर जिल्ह्याची भौगोलिक रचना, काळी आणि गाळयुक्त माती आणि सरासरी वार्षिक पाऊस हे ऊस लागवडीसाठी पोषक घटक मानले जातात. या जिल्ह्यात पंचगंगा, वारणा, दूधगंगा आणि हिरण्यकेशी या नद्यांचे जाळे असल्याने सिंचन सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यामुळे ऊस पिकाखालील क्षेत्र आणि उत्पादनात सातत्याने वाढ होताना दिसून येते. कृषी उत्पादनात ऊस पिकाची महत्त्वाची भूमिका असते आणि अनेक शेतकऱ्यांचे मुख्य उत्पन्न या पिकावर अवलंबून असते.

कोल्हापूर जिल्ह्यात सहकारी साखर कारखान्यांची खूप जुनी परंपरा आहे आणि या कारखान्यांमुळे ऊस शेतीला चालना मिळाली आहे. शेतकरी आणि सहकारी संस्थांच्या सहभागामुळे ऊस लागवड, उत्पादन आणि विपणनात स्थिरता आली आहे. तसेच, साखर, गूळ, इथेनॉल आणि उसावर आधारित उप-उत्पादनांच्या उत्पादनामुळे स्थानिक रोजगाराच्या संधी देखील वाढल्या आहेत. म्हणूनच, ऊस लागवड जिल्ह्याच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाशी जवळून जोडली गेली आहे.

ऊस पिकाच्या वाढीसाठी सुधारित जाती, रासायनिक आणि सेंद्रिय खते, कीटक आणि रोग नियंत्रण आणि आधुनिक सिंचन पद्धती महत्त्वाच्या आहेत. गेल्या काही दशकांमध्ये, ठिबक सिंचन, सुधारित ऊस लागवड पद्धती आणि यांत्रिकीकरणामुळे उत्पादकता वाढली आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. रोहित दिनकर बारसिंग, सहायक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, कोल्हापूर

How to cite this article:
बारसिंग, . रोहित . दिनकर ., जमादार, . समिना . एस ., कदम, . निर्माण . राजन ., & पाटील, . सम्राट . सताप्पा . (2026). कोल्हापूर जिल्हातील ऊस पिकाचा सविस्तर अभ्यास. Journal of Research and Development, 18(2(XXI)), 135–138. https://doi.org/10.5281/zenodo.19547954

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19547954
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

तथापि, पाणी व्यवस्थापन, वाढता उत्पादन खर्च आणि हवामान बदल यासारख्या समस्या अजूनही ऊस उत्पादक शेतकऱ्यांना भेडसावत आहेत.

तसेच, ऊस शेतीमुळे ग्रामीण भागात आर्थिक स्थैर्य निर्माण झाले असले तरी, त्याच वेळी मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर, मातीची धूप आणि मातीतील पोषक तत्वांचा ऱ्हास यासारख्या पर्यावरणीय समस्याही निर्माण होत आहेत. म्हणूनच, ऊस शेतीचे शाश्वत व्यवस्थापन आवश्यक बनले आहे. यासाठी, जलसंधारण, पीक फेरपालट आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यांना महत्त्व दिले जात आहे.

वरील सर्व बाबी लक्षात घेता, कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस पिकाचा सविस्तर अभ्यास करणे आवश्यक आहे. या अभ्यासात ऊस पिकाखालील क्षेत्र, उत्पादन, उत्पादकता, शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती तसेच ऊस शेतीला भेडसावणाऱ्या समस्या आणि संभाव्य उपाययोजनांचा सर्वसमावेशक विचार केला जाईल. म्हणूनच, अशी अपेक्षा आहे की हे संशोधन कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस शेतीच्या विकासाचा अभ्यास करेल आणि भविष्यातील धोरणांसाठी उपयुक्त निष्कर्ष काढेल.

संशोधन समस्या

महाराष्ट्रात ऊस उत्पादनासाठी कोल्हापूर जिल्हा हा एक महत्त्वाचा प्रदेश मानला जातो. सुपीक जमीन, मुबलक पाऊस, सुविकसित सिंचन व्यवस्था आणि सहकारी साखर कारखान्यांची उपलब्धता यामुळे जिल्ह्यात ऊस लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. तथापि, गेल्या काही वर्षांत ऊस पिकाखालील क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकता यामध्ये अस्थिरता निर्माण झाली आहे. याशिवाय, शेतकऱ्यांना पाण्याचा वाढता वापर, उत्पादन खर्चात वाढ, हवामान बदल, मातीची सुपीकता कमी होणे आणि बाजारभावात चढ-उतार अशा समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. तसेच, काही भागात, ऊस शेतीमुळे असंतुलित पाणी वितरण होण्याची आणि इतर पिकांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. म्हणूनच, या संशोधनाची मुख्य समस्या म्हणजे कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस पिकाखालील क्षेत्र, उत्पादन, उत्पादकता आणि त्यावर परिणाम करणारे भौगोलिक, आर्थिक आणि तांत्रिक घटकांचा तपशीलवार अभ्यास करणे.

संशोधन उद्दिष्टे

- कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकता याचा सविस्तर अभ्यास करणे.
- कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस पिकाचा सन २०२० ते २०२४ या कालावधीचा अभ्यास करणे.
- कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकता वाढण्यासाठी उपाययोजना सुचवणे.

संशोधन पद्धती

(१) संशोधनाचा प्रकार

हे संशोधन वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक स्वरूपाचे आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस पिकाचे सविस्तर विश्लेषण केले आहे. प्राप्त क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकता याचे विश्लेषण करणे हा मुख्य उद्देश आहे.

(२) अभ्यास क्षेत्र

या संशोधनासाठी कोल्हापूर जिल्हा हा अभ्यास क्षेत्र म्हणून निवडले आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस पिकाचे क्षेत्र, उत्पादन आन इ उत्पादकता याचा विस्तृत अभ्यास केला आहे.

(३) माहितीचे स्रोत

या संशोधनासाठी माहिती संग्रहित करण्यासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर केला आहे. कोल्हापूर जिल्हा आर्थिक समालोचन अहवाल, संशोधन लेख, जर्नल्स, पुस्तके व संकेतस्थळे याचा वापर केला आहे.

(४) माहिती विश्लेषणाची पद्धत

या संशोधनासाठी सरासरी, प्रमाणित विचलन, बिन्नतेचा गुणांक, चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर, कमाल आणि किमान यांसारखी सांख्यिकीय तंत्राचा वापर केला आहे. त्याचबरोबर तक्त्याच्या सहाय्याने विश्लेषण या संशोधनामध्ये केले आहे.

(५) अभ्यासाची मर्यादा

कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस पिकाचे क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकता याचा अभ्यास हा कोल्हापूर जिल्ह्यापुरता मर्यादित आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

माहिती संकलन आणि विश्लेषण

तक्ता क्रमांक १ कोल्हापूर जिल्हातील ऊस पिकाचा सविस्तर अभ्यास

(क्षेत्र हेक्टर, उत्पादन आणि उत्पादकता प्रती हेक्टर "००" मे. टन मध्ये)

अ.क्र.	वर्ष	क्षेत्र	उत्पादन	उत्पादकता
१	२०२०	१५७७५२	१३०७०४.००	९८.३
२	२०२१	१५५५८४	१६७१६२.००	९८.८
३	२०२२	१६३३६८	१५७.००	८९.५२
४	२०२३	१७५५६०	१५८.०४	८८.५२
५	२०२४	१८८४५९	१७१.५४	९०.३३
सरासरी		**१६८१४५**	**५९६७१**	**९३**
प्रमाणित विचलन		**१३७५०.०३**	**८२४९८.३३**	**५.०२**
भिन्नता गुणांक		**८.१८**	**१३८.२६**	**५.४०**
चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर		**०.०५**	**-०.८१**	**-०.०२**
कमाल		**१८८४५९**	**१६७१६२**	**९९**
किमान		**१५५५८४**	**१५७**	**८९**

स्त्रोत : कोल्हापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल, ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन, २०२०-२०२४.

तक्ता क्रमांक १ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस पिकाचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. २०२० ते २०२४ पर्यंत कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस पिकाखालील क्षेत्र सतत वाढत असल्याचे दिसून येते. २०२० मध्ये ऊसाखालील क्षेत्र १,५७,७५२ हेक्टर होते, तर २०२४ मध्ये ते १,८८,४५९ हेक्टर झाले आहे. या कालावधीत सरासरी क्षेत्र १,६८,१४५ हेक्टर नोंदवले गेले आहे. भिन्नतेचा गुणांक ८.१८ टक्के आहे, जो दर्शवितो की क्षेत्रात फारसा चढ-उतार नाही परंतु तुलनेने स्थिर वाढ आहे. तसेच, वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर ०.०५ असल्याने, ऊस लागवडीखालील क्षेत्र हळूहळू वाढत असल्याचे स्पष्ट होते.

कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस पिकाच्या उत्पादनाचा विचार केला तर, या काळात उत्पादनात काही प्रमाणात अस्थिरता दिसून येते. २०२१ मध्ये सर्वाधिक उत्पादन १,६७,१६२ ('००' टन) नोंदवले गेले होते, तर २०२२ मध्ये ते तुलनेने कमी असल्याचे दिसून येते. सरासरी उत्पादन ५९,६७१ ('००' टन) आहे. फरकाचा गुणांक १३८.२६ टक्के आहे, जो उत्पादनात मोठा चढ-उतार दर्शवितो. तसेच, वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर -०.८१ आहे, जो उत्पादनात किंचित घट दर्शवितो.

कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस पिकाच्या उत्पादकतेचा विचार केला तर, कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस पिकाची उत्पादकता तुलनेने स्थिर असल्याचे दिसून येते. या कालावधीतील सरासरी उत्पादकता ९३ ('००' मे. टन प्रति हेक्टर) आहे. २०२१ मध्ये सर्वाधिक उत्पादकता ९९ च्या आसपास नोंदवली गेली, तर २०२३ मध्ये ती किमान ८९ च्या आसपास होती. भिन्नतेचा गुणांक ५.४० टक्के असल्याने, उत्पादकतेत फारसा फरक दिसत नाही. तथापि, वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर -०.०२ असल्याने, उत्पादकतेत थोडीशी घट होण्याची प्रवृत्ती आहे. त्यामुळे, आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित बियाणे आणि योग्य सिंचन व्यवस्थापन वापरून भविष्यात उत्पादकता वाढवण्याची गरज आहे.

निष्कर्ष

- २०२० ते २०२४ पर्यंत कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस पिकाखालील क्षेत्र सतत वाढत असल्याचे दिसून येते. २०२० मध्ये ऊसाखालील क्षेत्र १,५७,७५२ हेक्टर होते, तर २०२४ मध्ये ते १,८८,४५९ हेक्टर झाले आहे. या कालावधीत सरासरी क्षेत्र १,६८,१४५ हेक्टर नोंदवले गेले आहे.
- भिन्नतेचा गुणांक ८.१८ टक्के आहे, जो दर्शवितो की क्षेत्रात फारसा चढ-उतार नाही परंतु तुलनेने स्थिर वाढ आहे. तसेच, वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर ०.०५ असल्याने, ऊस लागवडीखालील क्षेत्र हळूहळू वाढत असल्याचे स्पष्ट होते.
- कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस पिकाच्या उत्पादनाचा विचार केला तर, या काळात उत्पादनात काही प्रमाणात अस्थिरता दिसून येते. २०२१ मध्ये सर्वाधिक उत्पादन १,६७,१६२ ('००' टन) नोंदवले गेले होते, तर २०२२ मध्ये ते तुलनेने कमी असल्याचे दिसून येते. सरासरी उत्पादन ५९,६७१ ('००' टन) आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

- भिन्नतेचा गुणांक १३८.२६ टक्के आहे, जो उत्पादनात मोठा चढ-उतार दर्शवितो. तसेच, वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर -०.८१ आहे, जो उत्पादनात किंचित घट दर्शवितो.
- कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस पिकाच्या उत्पादकतेचा विचार केला तर, कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस पिकाची उत्पादकता तुलनेने स्थिर असल्याचे दिसून येते. या कालावधीतील सरासरी उत्पादकता ९३ ('००' मे. टन प्रति हेक्टर) आहे. २०२१ मध्ये सर्वाधिक उत्पादकता ९९ च्या आसपास नोंदवली गेली, तर २०२३ मध्ये ती किमान ८९ च्या आसपास होती.
- भिन्नतेचा गुणांक ५.४० टक्के असल्याने, उत्पादकतेत फारसा फरक दिसत नाही. तथापि, वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर -०.०२ असल्याने, उत्पादकतेत थोडीशी घट होण्याची प्रवृत्ती आहे. त्यामुळे, आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित बियाणे आणि योग्य सिंचन व्यवस्थापन वापरून भविष्यात उत्पादकता वाढवण्याची गरज आहे.

उपाययोजना

कोल्हापूर जिल्ह्यात ऊस उत्पादन आणि उत्पादकता वाढविण्यासाठी काही महत्त्वाचे उपाय राबवणे आवश्यक आहे. त्यापैकी सुधारित बियाण्यांचा वापर, ठिबक किंवा आधुनिक सिंचन पद्धतींचा अवलंब, संतुलित खत व्यवस्थापन आणि कीटक आणि रोग नियंत्रण यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. तसेच, पाणी व्यवस्थापन, पीक फेरपालट आणि सेंद्रिय शेती पद्धती वापरून मातीची सुपीकता राखता येते. याशिवाय, शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि बाजारपेठ स्थिरता प्रदान केल्याने कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस शेती अधिक शाश्वत आणि उत्पादक बनू शकते.

संदर्भ ग्रंथ

1. Deshmukh, S. S. (2020). Sugar industry and cooperative movement in Maharashtra. Pune: Continental Prakashan.
2. FAO. (2021). Sugarcane production and sustainability practices. Rome: Food and Agriculture Organization of the United Nations.
3. Government of Maharashtra. (2022). Agricultural statistics of Maharashtra state. Mumbai: Department of Agriculture.
4. Patil, R. B. (2018). Agricultural development in Western Maharashtra. Indian Journal of Regional Studies, 50(2), 112–118.
5. Shinde, V. T., & Pawar, S. M. (2019). Impact of modern irrigation techniques on sugarcane cultivation in Maharashtra. International Journal of Agricultural Sciences, 11(1), 45–50.
6. कोल्हापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल, ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन, २०२०-२०२४.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

कोल्हापूर जिल्ह्याची अर्थव्यवस्था: एक चिकित्सक अभ्यास

स्वाती दत्तात्रय कोकाटे
एम. ए. विद्यार्थिनी, न्यू कॉलेज कोल्हापूर
Email: kokateswati64@gamil.com

Manuscript ID:
JRD -2026-180229
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 139-144
February- 2026
Submitted: 08 Jan. 2026
Revised: 18 Jan. 2026
Accepted: 05 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

कोल्हापूर जिल्ह्याची अर्थव्यवस्था ही महाराष्ट्र राज्यातील एक अत्यंत प्रगत आणि वैविध्यपूर्ण अर्थव्यवस्था मानली जाते. या संशोधन निबंधाचा मुख्य उद्देश कोल्हापूर जिल्ह्याच्या आर्थिक संरचनेचा, विशेषतः कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रांचा सखोल आणि सर्वांगीण अभ्यास करणे हा आहे. कोल्हापूरला "भारताचे साखरेचे वाटी" असे सार्थपणे म्हटले जाते, कारण येथील साखर उद्योगाने जिल्ह्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी गती दिली आहे. कृषी क्षेत्रामध्ये ऊस आणि भात ही मुख्य पिके असून, सहकार चळवळीच्या माध्यमातून दूध उत्पादन आणि साखर कारखानदारीमध्ये जिल्ह्याने जागतिक स्तरावर नावलौकिक मिळवला आहे.

जिल्ह्याच्या औद्योगिक रचनेचा विचार करता, कोल्हापूर हे पश्चिम भारतातील एक महत्त्वाचे औद्योगिक केंद्र म्हणून उदयास आले आहे. येथील फाऊंड्री उद्योग भारतातील एकूण कास्टिंग उत्पादनात सुमारे ८% वाटा उचलतो, जो जिल्ह्याच्या तांत्रिक प्रगतीचा पुरावा आहे.[5] तसेच इचलकरंजी या शहराला "महाराष्ट्राचे मँचेस्टर" म्हणून ओळखले जाते, जिथे वस्त्रोद्योगाचे जागतिक दर्जाचे जाळे पसरलेले आहे. कोल्हापुरी चप्पल आणि हुपरीचे चांदीचे दागिने यांसारख्या पारंपरिक हस्तकलांनी जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून दिली असून, या उद्योगांना भौगोलिक मानांकन प्राप्त झाल्यामुळे त्यांची विश्वासार्हता वाढली आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी प्रामुख्याने दुय्यम माहितीचा आधार घेण्यात आला असून, यामध्ये महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल २०२३-२४, जिल्हा सांख्यिकी कार्यालय आणि विविध सरकारी प्रकाशनांचा समावेश करण्यात आला आहे. अभ्यासातून असे स्पष्टपणे दिसून येते की, कोल्हापूर जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न राज्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत अत्यंत उच्च असून, येथील आर्थिक समृद्धी ही प्रामुख्याने सहकार आणि लघुउद्योगांच्या यशस्वी विकासावर आधारित आहे.हा अहवाल जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेतील विविध पैलूंचे सखोल विश्लेषण करून भविष्यातील विकासाच्या संधींवर प्रकाश टाकतो.

महत्त्वाचे शब्द: *कोल्हापूर अर्थव्यवस्था, सहकार चळवळ, साखर उद्योग, दुग्धव्यवसाय, फाऊंड्री उद्योग, वस्त्रोद्योग, कोल्हापुरी चप्पल, दरडोई उत्पन्न, कृषी-आधारित उद्योग, पर्यटन विकास, इचलकरंजी कापड उद्योग, गोकुळ दूध संघ.*

प्रस्तावना

कोल्हापूर जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिण भागात स्थित असून तो आपल्या समृद्ध ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आर्थिक वारशासाठी जगप्रसिद्ध आहे. जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ७,६८५ चौ.कि.मी. असून २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या सुमारे ३८.७६ लाख इतकी आहे. सह्याद्रीच्या कुशीत आणि पंचगंगा नदीच्या सुपीक खोऱ्यात वसलेल्या या जिल्ह्याची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवर आधारित असली, तरी गेल्या काही दशकांत येथे उद्योगांचा आणि सेवा क्षेत्राचा प्रचंड विकास झाला आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
स्वाती दत्तात्रय कोकाटे, एम. ए. विद्यार्थिनी, न्यू कॉलेज कोल्हापूर

How to cite this article:
कोकाटे. स्वाती. दत्तात्रय. (2026). कोल्हापूर जिल्ह्याची अर्थव्यवस्था: एक चिकित्सक अभ्यास. Journal of Research and Development, 18(2(XXI)), 139–144. https://doi.org/10.5281/zenodo.19548120

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19548120

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

ऐतिहासिकदृष्ट्या विचार केल्यास, राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या दूरदृष्टीमुळे या जिल्ह्यामध्ये सहकार आणि उद्योगाची मजबूत पायाभरणी झाली. त्यांनी राधानगरी धरणासारख्या प्रकल्पांच्या माध्यमातून सिंचनाची सोय उपलब्ध करून दिली, ज्यामुळे शेतीमध्ये क्रांती घडून आली. आज कोल्हापूर जिल्हा हा भारतातील सर्वाधिक दरडोई उत्पन्न असलेल्या जिल्ह्यांपैकी एक म्हणून ओळखला जातो. कोल्हापूर शहरात मर्सिडीज बेंझ सारख्या महागड्या कारची मोठी संख्या असणे हे येथील लोकांच्या वाढत्या आर्थिक सुबत्तेचे आणि क्रयशक्तीचे जिवंत प्रतीक मानले जाते.

जिल्ह्याची अर्थव्यवस्था मुख्यत्वे तीन स्तंभांवर उभी आहे. पहिला स्तंभ म्हणजे कृषी आणि संलग्न क्षेत्र, ज्यामध्ये ऊस, भात, हळद आणि विशेषतः दुग्धव्यवसायाचा समावेश होतो. दुसरा स्तंभ औद्योगिक क्षेत्र असून यामध्ये साखर कारखाने, वस्त्रोद्योग, फाऊंड्री, इंजिनिअरिंग आणि चांदीचे दागिने उद्योगांचा समावेश होतो. तिसरा स्तंभ सेवा क्षेत्र असून यामध्ये पर्यटन (महालक्ष्मी मंदिर, जोतिबा, पन्हाळा), बँकिंग आणि शिक्षण क्षेत्राचा मोठा वाटा आहे. या तिन्ही क्षेत्रांच्या परस्परपूरक विकासामुळे कोल्हापूरची अर्थव्यवस्था संतुलित आणि प्रवाही राहिली आहे.

साहित्य पुनरावलोकन

कोल्हापूरच्या अर्थव्यवस्थेवर आणि येथील विशिष्ट उद्योगांवर आजवर अनेक अभ्यासकांनी आणि संस्थांनी संशोधन केले आहे. 'मेट्रोव्हर्स' या हार्वर्ड ग्रोथ लॅबच्या अहवालानुसार, कोल्हापूरच्या आर्थिक संरचनेत उत्पादन क्षेत्राचा वाटा ३१.८४% इतका मोठा आहे. यामध्ये अन्न प्रक्रिया उद्योगाचा वाटा ७.५% असून व्यापार आणि वाहतूक क्षेत्राचा वाटा २०.१६% इतका आहे.हा अहवाल असे दर्शवतो की जिल्ह्याची अर्थव्यवस्था केवळ शेतीवर अवलंबून नसून ती औद्योगिक उत्पादनाकडे वेगाने सरकत आहे.

जाधव आणि इतर संशोधकांच्या (२०१७) मते, कोल्हापूरमध्ये दूध उत्पादनात मोठी वाढ करण्याची प्रचंड संधी उपलब्ध आहे. गोकुळ आणि वारणा यांसारख्या दूध संघांनी ग्रामीण भागात शाश्वत रोजगार निर्मिती करून ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण केले आहे. साखर उद्योगाबाबत 'लोकशाही' च्या अलीकडील अहवालानुसार, २०२५-२६ च्या हंगामात कोल्हापूर विभागाने साखर उत्पादनात आणि रिकव्हरी रेटमध्ये संपूर्ण महाराष्ट्र राज्यात अव्वल स्थान पटकावले आहे.

फाऊंड्री उद्योगावर आधारित 'समीक्षा' अहवालात असे नमूद केले आहे की, कोल्हापूरमधील फाऊंड्री क्लस्टर हे भारतातील सर्वात मोठे एम.एस.एम.ई क्लस्टर असून ते जागतिक ऑटोमोबाईल कंपन्यांसाठी महत्त्वाचे सुटे भाग तयार करते.कोल्हापुरी चप्पलच्या जागतिक मानांकनामुळे या पारंपरिक उद्योगाला आधुनिक काळात नवीन ओळख आणि जागतिक बाजारपेठ मिळाली आहे. पोतदार (२०१४) यांच्या संशोधनानुसार, कोल्हापूरमधील पर्यटन व्यवसायाचा स्थानिक रहिवाशांच्या उत्पन्नावर अत्यंत सकारात्मक परिणाम झाला असून धार्मिक पर्यटनामुळे हॉटेल आणि वाहतूक क्षेत्रात मोठी गुंतवणूक वाढली आहे. या विविध साहित्याचा आढावा घेतल्यास असे स्पष्ट होते की, कोल्हापूरची अर्थव्यवस्था ही पारंपरिक कौशल्ये, सहकार आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा एक उत्कृष्ट मेळ आहे.

उद्दिष्टे

या संशोधनाचे मुख्य उद्देश खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहेत:

१. कोल्हापूर जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राचे अनन्यसाधारण महत्त्व आणि ऊस उत्पादनाचा जिल्ह्याच्या जीडीपीवरील परिणामाचा आढावा घेणे.
२. सहकार चळवळीच्या माध्यमातून साखर कारखानदारी आणि दुग्धव्यवसायाने ग्रामीण जीवनात घडवून आणलेल्या बदलांचा अभ्यास करणे.
३. कोल्हापूरमधील फाऊंड्री, इंजिनिअरिंग, वस्त्रोद्योग आणि चांदीच्या दागिने उद्योगाची सद्यस्थिती आणि त्यांच्या समोरील आव्हाने तपासणे.
४. जिल्ह्याच्या आर्थिक विकासात सेवा क्षेत्र, बँकिंग आणि पर्यटनाच्या वाढत्या योगदानाचे विश्लेषण करणे.
५. कोल्हापूरमधील दरडोई उत्पन्नातील वाढीचा कल आणि लोकांच्या जीवनमानावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.
६. लघु आणि मध्यम उद्योगांमुळे होणाऱ्या रोजगार निर्मितीचे प्रमाण आणि आर्थिक स्थिरता तपासणे.

गृहीतक

प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहीतके मांडण्यात आली आहेत:

१. कोल्हापूर जिल्ह्याची अर्थव्यवस्था प्रामुख्याने कृषी-आधारित असली तरी, सहकार चळवळीमुळे ग्रामीण भागातील भांडवल निर्मिती आणि आर्थिक विकास अत्यंत वेगाने झाला आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

२. जिल्ह्यातील साखर कारखाने आणि दुग्धव्यवसाय हे केवळ उद्योग नसून ते ग्रामीण अर्थव्यवस्थेची जीवनवाहिनी आहेत, जे लाखो कुटुंबांना प्रत्यक्ष रोजगार पुरवतात.

३. कोल्हापूरमधील लघु आणि मध्यम उद्योग, विशेषतः फाऊंड्री आणि वस्त्रोद्योग, हे जागतिक पुरवठा साखळीतील महत्त्वाचे घटक बनले आहेत.

४. धार्मिक आणि ऐतिहासिक पर्यटन हे जिल्ह्याच्या महसुलाचा एक मोठा आणि शाश्वत स्रोत आहे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंध तयार करण्यासाठी प्रामुख्याने 'वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक' संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. हे संशोधन पूर्णपणे दुय्यम साहित्यावर आधारित आहे. यामध्ये खालील महत्त्वाच्या स्रोतांचा प्रभावी वापर करण्यात आला आहे:

१. महाराष्ट्र शासनाचा 'आर्थिक पाहणी अहवाल २०२३-२४' आणि '२०२४-२५'.

२. कोल्हापूर जिल्ह्याचा 'सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल'.

३. भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय आणि कृषी मंत्रालयाचे वार्षिक अहवाल.

४. गोकुळ दूध संघ आणि जिल्ह्यातील अग्रगण्य साखर कारखान्यांचे वार्षिक अहवाल.

५. हार्वर्ड ग्रोथ लॅब आणि विविध आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकांमधील कोल्हापूर विषयक डेटा.

मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण करून त्याचे साध्या सांख्यिकी पद्धती, टक्केवारी आणि तक्त्यांच्या माध्यमातून विश्लेषण करण्यात आले आहे. यामुळे जिल्ह्याची आर्थिक स्थिती आणि विविध क्षेत्रांमधील तुलनात्मक प्रगती स्पष्टपणे समजण्यास मदत होते.

प्रमुख निष्कर्ष आणि सांख्यिकीय माहिती

कोल्हापूर जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेचा सखोल अभ्यास केल्यानंतर जे महत्त्वाचे निष्कर्ष समोर आले आहेत, त्यांचे विश्लेषण खालील विविध उपविभागांमध्ये करण्यात आले आहे.

१. लोकसंख्या आणि आर्थिक पायाभूत सुविधा

कोल्हापूर जिल्ह्याची लोकसंख्या आणि शैक्षणिक स्तर हा राज्याच्या सरासरीपेक्षा उजवा आहे. येथील उच्च साक्षरता दरामुळे उद्योगांना लागणारा कुशल आणि अर्धकुशल कामगार वर्ग सहज उपलब्ध होतो.

आर्थिक व सामाजिक घटक	सांख्यिकीय माहिती (२०११/२०२३-२४)
एकूण लोकसंख्या	३८,७६,००१
साक्षरता दर (पुरुष)	८८.५७%
साक्षरता दर (महिला)	७४.२२%
सरासरी साक्षरता दर	८१.५१%
दरडोई उत्पन्न (२०२३-२४)	२,८२,२९७ रुपये
कामगार सहभाग दर (LFPR)	६२.९७%
नागरी लोकसंख्या	१२,३०,००९
लोकसंख्या घनता	५०४ प्रति चौ.कि.मी.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

जिल्ह्याची अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने उद्योग आणि कृषी यांच्या समन्वयावर आधारित आहे. २०२३-२४ मध्ये जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न २,८२,२९७ रुपये इतके नोंदवण्यात आले असून, ते महाराष्ट्र राज्यातील सर्वोच्च पाच जिल्ह्यांपैकी एक आहे.

२. कृषी क्षेत्र आणि साखर कारखानदारी

कोल्हापूरला साखरेचे माहेरघर मानले जाते. येथील सुपीक कृष्णमृदा (काळी मृदा) आणि वारणा, दूधगंगा, वेदगंगा व पंचगंगा यांसारख्या नद्यांचे मुबलक पाणी ऊस लागवडीसाठी वरदान ठरले आहे.

साखर उद्योगाची सद्यस्थिती:

कोल्हापूर विभागात साखर कारखानदारी अत्यंत विकसित आहे. २०२५-२६ च्या साखर हंगामातील आकडेवारीनुसार, कोल्हापूर विभागाने राज्यात सर्वाधिक साखर उत्पादन आणि सर्वोच्च रिकव्हरी रेट नोंदवला आहे.

साखर उद्योग घटक	कोल्हापूर विभाग कामगिरी (२०२५-२६ अंदाजित)
सुरू असलेले साखर कारखाने	२२ (कोल्हापूर जिल्हा फक्त)
एकूण साखर कारखाने (विभाग)	३७
एकूण ऊस गाळप	सुमारे १९० लाख टन
साखर उत्पादन (क्विंटलमध्ये)	२०६.२१ लाख क्विंटल
निव्वळ साखर उतारा (Recovery)	१०.८५% (राज्यात प्रथम)
राज्याची सरासरी रिकव्हरी	९.२९%

कोल्हापूर जिल्ह्याचा साखर उतारा १०.८५% असून तो राज्याच्या सरासरीपेक्षा कितीतरी जास्त आहे, ज्यामुळे येथील शेतकऱ्यांना एफआरपी (FRP) व्यतिरिक्त चांगला दर मिळतो. साखर उद्योगामुळे जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दरवर्षी सुमारे १३ अब्ज रुपयांची थेट रक्कम मिळते.याव्यतिरिक्त गुळ उत्पादनातही जिल्ह्याने जागतिक बाजारपेठेत आपली मक्तेदारी टिकवून ठेवली आहे. कोल्हापुरी गुळ हा आशिया आणि आफ्रिकेतील अनेक देशांमध्ये निर्यात केला जातो.

३. दुग्धव्यवसाय आणि सहकाराचे यश

साखर कारखानदारीनंतर कोल्हापूरच्या अर्थव्यवस्थेचा सर्वात मोठा आधारस्तंभ म्हणजे दुग्धव्यवसाय. जिल्ह्यामध्ये 'गोकुळ' (कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ) सारख्या बलाढ्य सहकारी संस्थांनी दूध संकलनाचे जागतिक दर्जाचे जाळे विणले आहे.

गोकुळ दूध संघाची आर्थिक कामगिरी (२०२४-२५):

- **वार्षिक उलाढाल:** ३,९६६.२८ कोटी रुपये (तात्पुरती आकडेवारी).
- **दररोज सरासरी दूध संकलन:** १५.९४ लाख लिटर.
- **दूध हाताळणी क्षमता:** १७ लाख लिटर दररोज.
- **दूध उत्पादक सोसायट्या:** जिल्ह्यातील ८,००९ पेक्षा जास्त गावांमध्ये दूध संकलन केंद्रे.
- **सहकारी सदस्य संख्या:** ३.७७ लाख पेक्षा जास्त शेतकरी सभासद.

गोकुळने केवळ दूध संकलन केले नाही, तर शेतकऱ्यांसाठी 'गौण विमा योजना', 'दूध उत्पादक भविष्य निर्वाह निधी' आणि 'गोकुळ श्री' यांसारख्या प्रोत्साहनात्मक योजना राबवल्या आहेत. दूध विक्रीतून येणाऱ्या प्रत्येक रुपयातील ७६ ते ८२ पैसे थेट शेतकऱ्यांना दिले जातात, जे सहकाराच्या यशाचे मोठे प्रमाण आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

४. औद्योगिक विकास: फाऊंड्री आणि वस्त्रोद्योग

कोल्हापूरची औद्योगिक ओळख प्रामुख्याने येथील इंजिनिअरिंग आणि फाऊंड्री उद्योगामुळे आहे. शिरोली, गोकुळ शिरगाव आणि कागल पंचतारांकित एमआयडीसी मध्ये हजारो उद्योग कार्यरत आहेत.

अ) फाऊंड्री उद्योग (Foundry Cluster): कोल्हापूर हे भारतातील सर्वात मोठे फाऊंड्री क्लस्टर्सपैकी एक आहे. येथे प्रामुख्याने ऑटोमोबाईल क्षेत्रासाठी लागणारे हाय-क्वालिटी लोखंडी कास्टिंग तयार केले जातात.

- **वार्षिक उत्पादन:** सुमारे ६,००,००० टन.
- **रोजगार:** ४०,००० थेट आणि सुमारे १,००,००० अप्रत्यक्ष कामगार.
- **निर्यात:** उत्पादनापैकी ३०% भाग अमेरिका, युरोप आणि आशियाई देशांमध्ये निर्यात केला जातो.
- **प्रसिद्ध ग्राहक:** टाटा मोटर्स, महिंद्रा अँड महिंद्रा, मारुती सुझुकी, ह्युंदाई, आयशर आणि अशोक लेलँड.

ब) इचलकरंजी वस्त्रोद्योग (Textile Hub): इचलकरंजीला "महाराष्ट्राचे मँचेस्टर" म्हटले जाते. येथे जवळपास ५,००० लहान-मोठे कापड कारखाने आहेत. पूर्वी येथे साध्या साड्या आणि धोतरांचे उत्पादन होत असे, मात्र आता येथे अत्याधुनिक एअरजेट लूम्सच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय ब्रँड्ससाठी कापड तयार केले जाते.

औद्योगिक वसाहत (MIDC)	क्षेत्र (हेक्टरमध्ये)	एकूण प्लॉट्स	रोजगार निर्मिती
शिरोली एमआयडीसी	२५४.१९	७९०	२५,५००
गोकुळ शिरगाव	४३.१६	५४०	२७,५००
कागल पंचतारांकित एमआयडीसी	५४०.३२	९२६	४२,७००
गडहिंग्लज एमआयडीसी	१०१.५६	१५	५००

कोल्हापूरमधील उद्योगांमध्ये सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची (MSME) संख्या मोठी आहे. जिल्ह्यातील एकूण २१,६२० नोंदणीकृत उद्योगांमधून साधारणतः १,६६,६१२ लोकांना रोजगार मिळतो.

५. पारंपरिक कला आणि लघुउद्योग

कोल्हापूरची अर्थव्यवस्था केवळ मोठ्या कारखान्यांवर नाही, तर पारंपरिक हस्तकलांवरही तितकीच अवलंबून आहे.

- **कोल्हापुरी चप्पल:** या उद्योगाला २०१९ मध्ये भौगोलिक मानांकन मिळाले आहे. जिल्ह्यामध्ये चप्पल उत्पादकांच्या १५ सहकारी संस्था असून त्याद्वारे दरवर्षी कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते.
- **हुपरीची चांदीची कला:** हुपरी हे गाव चांदीच्या दागिन्यांसाठी प्रसिद्ध आहे. येथील 'पेयलं' संपूर्ण भारतात लोकप्रिय आहेत. या उद्योगाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे महिला कामगारांचा सहभाग ७५.५% इतका मोठा आहे.

६. पर्यटन आणि सेवा क्षेत्राचा आर्थिक वाटा

कोल्हापूर हे 'दक्षिण काशी' म्हणून ओळखले जाते, ज्यामुळे येथे धार्मिक पर्यटनाला मोठा वाव आहे.

- **धार्मिक पर्यटन:** करवीर निवासिनी महालक्ष्मी मंदिर, जोतिबा मंदिर आणि नृसिंहवाडी येथील दत्त मंदिर या ठिकाणी दरवर्षी लाखो भाविक येतात.
- **ऐतिहासिक पर्यटन:** पन्हाळा किल्ला, विशाळगड आणि न्यू पॅलेस हे पर्यटकांचे मुख्य आकर्षण आहे.
- **आर्थिक परिणाम:** पर्यटनामुळे जिल्ह्यातील हॉटेल व्यवसाय, वाहतूक आणि स्थानिक हस्तकला विक्रीमध्ये मोठी वाढ झाली आहे. एका अभ्यासानुसार, कोल्हापूरमधील पर्यटनाचा स्थानिक रहिवाशांच्या उत्पन्नावर सकारात्मक प्रभाव पडला असून प्रति व्यक्ती खर्च आणि राहणीमानात सुधारणा झाली आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

चर्चा

कोल्हापूर जिल्ह्याची अर्थव्यवस्था ही कृषी आणि उद्योगाचा एक समतोल राखणारी अर्थव्यवस्था आहे. येथील यशाचे गमक "सहकार चळवळ" या एकाच शब्दात सांगता येईल. साखर कारखाने आणि दूध संघ हे केवळ नफा कमावणारे उद्योग नसून ते ग्रामीण भागातील संपत्तीच्या फेरवाटपाचे साधन बनले आहेत.

आर्थिक विकासाचे प्रमुख पैलू:

१. **कृषी-औद्योगिक समन्वय:** उसापासून साखर, मोलॅसिसपासून इथेनॉल आणि दुधापासून विविध उपपदार्थ तयार करून मूल्यवर्धन करण्यात जिल्हा यशस्वी झाला आहे.

२. **जागतिक स्पर्धा:** इचलकरंजीचा वस्त्रोद्योग आणि कोल्हापूरचा फाऊंड्री उद्योग आज जागतिक मानकांनुसार उत्पादन करत आहेत, ज्यामुळे जिल्ह्याला परकीय चलन मिळत आहे.

३. **रोजगार विविधता:** शेतीवरचा भार कमी करण्यासाठी येथे एमआयडीसीच्या माध्यमातून औद्योगिक रोजगाराचे पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत, ज्यामुळे शहरांकडे जाणारे स्थलांतर ३८% नी कमी झाले आहे.

आव्हाने आणि मर्यादा: इतकी प्रगती होऊनही कोल्हापूरच्या अर्थव्यवस्थेसमोर काही आव्हाने आहेत. कच्च्या मालाचे वाढते दर, वीज टंचाई आणि पायाभूत सुविधांची अपूर्णता यांमुळे सूक्ष्म उद्योगांना संघर्ष करावा लागत आहे.तसेच ऊस शेतीसाठी लागणाऱ्या मजुरांची टंचाई ही साखर कारखानदारीसमोरची एक मोठी अडचण आहे. भविष्यात ऑटोमेशन आणि तंत्रज्ञानाचा वापर करून ही आव्हाने पेलता येतील.

निष्कर्ष

कोल्हापूर जिल्ह्याची अर्थव्यवस्था ही महाराष्ट्र राज्यासाठी आणि देशासाठी एक समृद्ध विकासाचे मॉडेल आहे. कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रातील समतोल, मजबूत सहकार चळवळ आणि पारंपरिक कौशल्यांचे जतन या त्रिसूत्रीमुळे कोल्हापूरने आपली आर्थिक संपन्नता टिकवून ठेवली आहे. साखरेचे उच्च उत्पादन, दुधाचे विक्रमी संकलन आणि फाऊंड्री उद्योगातील जागतिक ओळख यामुळे जिल्हा आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनला आहे.

येणाऱ्या काळात डिजिटल मार्केटिंगचा वापर वाढवून पर्यटनाला अधिक व्यावसायिक रूप दिल्यास आणि इचलकरंजी तसेच हुपरीमधील उद्योगांना अधिक आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिल्यास कोल्हापूरची अर्थव्यवस्था 'ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी' मध्ये महत्त्वाची भूमिका बजावेलकोल्हापूरची प्रगती ही केवळ आकडेवारीची नाही, तर ती येथील कष्टकरी समाज आणि राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा वारसा सांगणाऱ्या उद्योजकांच्या मेहनतीचे यश आहे.

संदर्भ

1. Directorate of Economics and Statistics, Government of Maharashtra. (2024). Economic Survey of Maharashtra 2023-24. Mumbai: Government of Maharashtra.
2. District Information Office, Kolhapur. (2023). District Social and Economic Review: Kolhapur 2023. Kolhapur: Government of Maharashtra.
3. Harvard Growth Lab. (2020). Metroverse: Economic Composition of Kolhapur. Retrieved from https://metroverse.hks.harvard.edu
4. Jadhav, M. S., Surywanshi, R. R., & Shinde, H. R. (2017). Prospects for doubling of milk production in Kolhapur district. Agric. Update, 12(8), 2285-2289.
5. Kolhapur Zilla Sahakari Dudh Utpadak Sangh Ltd. (2025). Annual Report 2024-25 (Provisional). Kolhapur: Gokul Milk.
6. Ministry of Micro, Small and Medium Enterprises. (2021). Brief Industrial Profile of Kolhapur District. Mumbai: MSME Development Institute.
7. Potdar, M. B. (2014). Economic Impact of Tourism on Kolhapur District of Maharashtra. ResearchGate Publications.
8. Sugar Commissionerate of Maharashtra. (2026). Sugarcane Crushing Report 2025-26. Pune: Government of Maharashtra.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

मानवाधिकार और सामाजिक न्याय

डॉ. रमेश टिकाराम बागडे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, श्री संताजी कला व विज्ञान महाविद्यालय, पालांदूर (चौ), ता. लाखनी जि. भंडारा
Email: rtbagade167@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180230
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 145-148
February- 2026
Submitted: 08 Jan. 2026
Revised: 18 Jan. 2026
Accepted: 05 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश:

सामान्य जीवनयापन के लिए प्रत्येक मनुष्य के अपने परिवार, कार्य, सरकार और समाज पर कुछ अधिकार होते हैं, जो आपसी समझ और नियमों द्वारा निर्धारित होते हैं। इसी के अंतर्गत संयुक्त राष्ट्र महासभा द्वारा 10 दिसंबर 1948 को सार्वभौमिक मानवाधिकार घोषणापत्र को आधिकारिक मान्यता दी गई, जिसमें भारतीय संविधान द्वारा प्रत्येक मनुष्य को कुछ विशेष अधिकार दिए गए हैं। संयुक्त राष्ट्र द्वारा अपनाए गए मानवाधिकार संबंधी घोषणापत्र में भी कहा गया था कि मानव के बुनियादी अधिकार किसी भी जाति, धर्म, लिंग, समुदाय, भाषा, समाज आदि से इतर होते हैं। ये अधिकार देश के नागरिकों को और किन्हीं परिस्थितियों में देश में निवास कर रहे सभी लोगों को प्राप्त होते हैं। देश विशाल आकार और विविधता, विकासशील तथा संप्रभुता संपन्न धर्म-निरपेक्ष, लोकतांत्रिक गणतंत्र के रूप में इसकी प्रतिष्ठा, तथा एक भूतपूर्व औपनिवेशिक राष्ट्र के रूप में इसके इतिहास के परिणामस्वरूप भारत में मानवाधिकारों की परिस्थिति एक प्रकार से जटिल हो गई है। सामाजिक धरातल पर भारतीय संदर्भ में मानवाधिकार और न्याय का प्रश्न सामाजिक संरचना और इसमें परिवर्तन की प्रक्रिया से जुड़ा हुआ है। मानवाधिकार का मसला और सामाजिक न्याय का सवाल उतना ही पुराना है जितना समाज। सदैव से ही न्याय समाज में व्यवस्था स्थापित करने का प्रमुख आधार रहा है। न्यायपूर्ण व्यवस्था राष्ट्र की प्रगति और कुशलता की सूचक होती है। न्याय ही सामाजिक तनावों को दूर करने का एकमात्र साधन है। विशेष रूप से एक लोकतांत्रिक देश में जहां व्यक्ति की स्वतंत्रता और समानता को विशेष महत्व दिया जाता हो । सामाजिक न्याय की पूर्ण ऐतिहासिकता को जब हम गहराई से देखने-समझने की कोशिश करते हैं तो पता चलता है कि धर्म, नीति, राजनीति से गुजरता हुआ यह बड़ा सवाल आज समाज के बीच आ खड़ा हुआ है। सामाजिक न्याय की ऐतिहासिकता के भारतीय संदर्भ को समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्य में समझने की आवश्यकता है।

मुख्य शब्द: *मानवाधिकार, सामाजिक न्याय, सार्वभौमिक, लोकतांत्रिक, विकासशील, विशेष अधिकार*

प्रस्तावना:

द्वितीय विश्वयुद्ध के बाद 1950 से ही मानव अधिकारों को लेकर विश्व-समाज थोड़ा सजग हुआ है। जब 'एमनेस्टी इंटरनेशनल' और 'ह्यूमन राइट्स वाच' जैसे अंतर्राष्ट्रीय संस्थान अस्तित्व में आए। जिनके प्रयासों का केन्द्र यही है कि कैसे विष्व के हर नागरिक को सामाजिक, आर्थिक एवं राजनीतिक विचारों की अभिव्यक्ति और धर्म की स्वतंत्रता एवं समान अवसर तथा सम्मान प्राप्त हो सके। सामाजिक जीवन के साथ राजनीति की सम्बद्धता बहुत जटिल होती है। चूंकि राजनीति की भूमिका या तो पुराने सामाजिक सम्बन्धों को कायम रखने या नवीन सम्बन्धों को बनाने में स्पष्ट होती है ।

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. रमेश टिकाराम बागडे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, श्री संताजी कला व विज्ञान महाविद्यालय, पालांदूर (चौ), ता. लाखनी जि. भंडारा

How to cite this article:
बागडे, . रमेश . टिकाराम . (2026). मानवाधिकार और सामाजिक न्याय. Journal of Research and Development, 18(2(XXI)), 145–148. https://doi.org/10.5281/zenodo.19548169

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19548169
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

राजनीति और सामाजिक न्याय के संबंध का इतिहास गवाह है कि सामाजिक न्याय के सिद्धान्त के पीछे नई-नई मानवीय नैतिकताओं के सार्वभौमिक विकास की मान्यता भी उतनी ही पुरानी है, जितनी कि मनुष्य की सभ्यता। इस निरन्तरता के मूल में नैतिकता का संवर्द्धन और नई आर्थिक-तकनीकी व्यवस्था का जनतंत्रीय राजनीति के माध्यम से स्थापन मुख्य माने जा सकते हैं। मानवाधिकार के समाजशास्त्र को समझने के लिए उन ऐतिहासिक मोड़ों को पहचानना जरूरी है, जहां आकर समाज - विज्ञानों का चिंतन विभिन्न प्रकार की उप-धाराओं को जन्म देता है। परिणामस्वरुप प्रायः आपसी विरोध जनित अभिप्रायों और आदर्शों का जन्म होता है । यह सामाजिक - सहमति के विकास के कारण सम्भव हो पाता है। समाज में पनपी विभिन्न विचारधाराएं या उनकी उप-शाखायें इस बात को प्रमाणित करती हैं । इतिहास साक्षी है कि इस प्रकार का मत विभाजन तभी सम्भव हो पाया है, जब समाज अधिनायकवादी, सामन्तवादी और विभिन्न प्रकार की तानाशाही व्यवस्थाओं से मुक्त होकर जनतंत्रीय व्यवस्था में बदल सका। मानवाधिकार और सामाजिक न्याय का सवाल नित नये संदर्भों में नये अर्थ लिए खड़ा रहा है। यही वह सवाल है जो सम्पूर्ण मानवता को गत्यात्मक बनाए हुए हैं।

मानवाधिकार का अर्थ:

मानव अधिकारों से अभिप्राय "मौलिक अधिकार एवं स्वतंत्रता से है जिसके सभी मानव प्राणी हकदार अधिकारों एवं स्वतंत्रताओं के उदाहरण के रूप में जिनकी गणना की जाती है, उनमें नागरिक और राजनैतिक अधिकार सम्मिलित हैं जैसे कि जीवन जीने और स्वतंत्र रहने का अधिकार, अभिव्यक्ति की स्वतंत्रता और कानून के सामने समानता एवं आर्थिक, सामाजिक और सांस्कृतिक अधिकारों के साथ ही साथ सांस्कृतिक गतिविधियों में भाग लेने का अधिकार, भोजन का अधिकार, काम करने का अधिकार एवं शिक्षा का अधिकार । यह सभी अधिकार भारतीय संविधान के भाग-तीन में मूलभूत अधिकारों के नाम से वर्णित किए गए हैं और न्यायालयों द्वारा प्रवर्तनीय है, जिसको 'भारतीय संविधान' न केवल सुनिश्चित करता है, बल्कि इसका उल्लंघन करने वालों को अदालत सजा भी देती है। वैसे तो भारत में 28 सितंबर, 1993 से मानव अधिकार कानून अमल में लाया गया था और 12 अक्टूबर, 1993 में 'राष्ट्रीय मानव अधिकार आयोग' का गठन किया गया था, लेकिन संयुक्त राष्ट्र महासभा द्वारा 10 दिसंबर 1948 को घोषणा पत्र को मान्यता दिए जाने पर 10 दिसंबर का दिन मानवाधिकार दिवस के लिए निश्चित किया गया है।

राष्ट्रीय मानवाधिकार आयोग:

भारत ने मानवाधिकार संरक्षण अधिनियम, 1993 के तहत राष्ट्रीय मानवाधिकार आयोग का गठन और राज्य मानवाधिकार आयोगों के गठन की व्यवस्था करके मानवाधिकारों के उल्लंघनों से निपटने हेतु एक मंच प्रदान किया है।

- भारत में मानवाधिकारों की रक्षा के संदर्भ में राष्ट्रीय मानवाधिकार आयोग देश की सर्वोच्च संस्था के साथ-साथ मानवाधिकारों का लोकपाल भी है। उच्चतम न्यायालय के पूर्व मुख्य न्यायाधीश इसके अध्यक्ष होते हैं। यह राष्ट्रीय मानवाधिकारों के वैश्विक गठबंधन का हिस्सा है। साथ ही यह राष्ट्रीय मानवाधिकार संस्थानों के एशिया पेसिफिक फोरम का संस्थापक सदस्य भी है। आयोग को मानवाधिकारों के संरक्षण और संवर्द्धन का अधिकार प्राप्त है ।
- मानवाधिकार संरक्षण अधिनियम, 1993 की धारा 12 (ज) में यह परिकल्पना भी की गई है कि सभी समाज के विभिन्न वर्गों के बीच मानवाधिकार साक्षरता का प्रसार करेगा और प्रकाशनों, मीडिया, सेमिनारों तथा अन्य उपलब्ध साधनों के ज़रिये इन अधिकारों का संरक्षण करने के लिये उपलब्ध सुरक्षा उपायों के बारे में जागरूकता बढ़ाएगा ।
- इस आयोग ने देश में आम नागरिकों, बच्चों, महिलाओं, वृद्धजनों के मानवाधिकारों, समुदाय के लोगों के अधिकारों की रक्षा के लिये समय-समय पर अपनी सिफारिशें सरकार तक पहुँचाई हैं और सरकार ने कई सिफारिशों पर अमल करते हुए संविधान में उपयुक्त संशोधन भी किये हैं ।

राष्ट्रीय मानवाधिकार आयोग के कार्य:

- शिकायतें प्राप्त करना तथा लोकसेवकों द्वारा हुई भूल-चूक अथवा लापरवाही से किये गए मानवाधिकारों के उल्लंघन की जाँच-पड़ताल शुरू करना इसमें शामिल हैं ताकि मानवाधिकारों के उल्लंघन को रोका जा सके।
- कैदियों की जीवन-दशाओं का अध्ययन करना, न्यायिक हिरासत तथा पुलिस हिरासत में हुई मृत्यु की जाँच-पड़ताल करना भी आयोग के कार्य-क्षेत्र में शामिल है।
- समाज के विभिन्न वर्गों में मानवाधिकार से संबंधित जागरूकता बढ़ाना।

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

- किसी लंबित वाद मामले में न्यायालय की सहमति से उस वाद का निपटारा करवाना।
- लोकसेवकों द्वारा किसी भी पीड़ित व्यक्ति या उसके सहायतार्थ किसी अन्य व्यक्ति के मानवाधिकारों के हनन के मामलों की शिकायत की सुनवाई करना।
- संविधान तथा अन्य कानूनों के संदर्भ में मानवाधिकारों के संरक्षण के प्रावधानों की समीक्षा करना तथा ऐसे प्रावधानों को प्रभावपूर्ण ढंग से लागू करने के लिये सिफारिश करना।
- गैर-सरकारी संगठनों तथा अन्य ऐसे संगठनों को बढ़ावा देना जो मानवाधिकार को प्रोत्साहित करने तथा संरक्षण देने के कार्य में शामिल हों इत्यादि।

भारत में मानवाधिकारों की स्थिति:

देश के विशाल आकार, विविधता, विकासशीलता तथा संप्रभुता संपन्न धर्मनिरपेक्ष, लोकतांत्रिक गणतंत्र के रूप में इसकी प्रतिष्ठा तथा पूर्व में औपनिवेशिक राष्ट्र के रूप में इसके इतिहास के परिणामस्वरूप भारत में मानवाधिकारों की परिस्थिति एक प्रकार से जटिल हो गई है। भारत का संविधान मौलिक अधिकार प्रदान करता है, जिसमें धर्म की स्वतंत्रता भी निहित है। इन्हीं स्वतंत्रताओं का फायदा उठाते हुए आए दिन सांप्रदायिक दंगे होते रहते हैं। इससे किसी एक धर्म के मौलिक अधिकारों का हनन नहीं होता है बल्कि उन सभी लोगों के मानवाधिकार आहत होते हैं जो इस घटना के शिकार होते हैं तथा जिनका घटना से कोई संबंध नहीं होता जैसे - मासूम बच्चे, गरीब पुरुष–महिलाएँ, वृद्धजन इत्यादि।

वर्तमान समय में मानवाधिकार आयोग के सामने चुनौतियाँ

- आज लोकतंत्र में परिपक्वता और समानता की महत्ता बढ़ी है पर दलित और स्त्री अस्मिता के प्रश्न आज भी ज्यों के त्यों पड़े हैं। वे मानवाधिकारों की पुनर्समीक्षा की मांग कर रहे हैं। वे भी अस्तित्व से व्यक्तित्व की तरफ बढ़ना चाह रहे हैं समाज में अपने अधिकारों की सुरक्षा चाह रहे हैं।
- सूचना क्रांति और भूमंडलीकरण के दौर ने भारत जैसे विकासशील देशों के सामने असुरक्षा की नई चुनौतियाँखड़ी कर दी हैं। इन परिस्थितियों में भारतीय राज्य अपने नागरिकों के मानवाधिकारों की रक्षा कैसे करें? वैश्विक होती दुनिया में राज्य की अपनी सामाजिक नीति और नियोजन कैसे विकसित हो? सामाजिक-आर्थिक विकास को जोड़ने वाले सरकारी प्रयासों की दिशा क्या हो? हाशिये पर पड़े कमजोर वर्गों के विकास के लिए राज्य की नीतियों में संतुलन कैसे बनें? इन तमाम सवालों का मानवाधिकारों के संदर्भ में सकारात्मक जवाब तलाशने की दिशा में बढ़ना ही मानवीय दृष्टि का विकास और विस्तार होगा।

सुझाव:

- द्वितीय प्रशासनिक सुधार आयोग ने अपनी रिपोर्ट में कुछ सिफारिशें की हैं जिससे कि मानवाधिकार आयोग को और अधिक प्रभावी बनाया जा सके। प्रशासनिक सुधार आयोग का मानना कि विभिन्न सांविधिक आयोगों के समक्ष शिकायतें करने के लिये एकसमान प्रारूप तैयार किया जाए। इसके लिये पीड़ितों और शिकायतकर्त्ताओं का विवरण इस ढंग से दिया जाए जिससे विभिन्न आयोगों के बीच डेटा का तालमेल अच्छे से बैठ पाए।
- मानवाधिकार आयोग को शिकायतों का निपटारा करने के लिये उपयोगी मानदंड निर्धारित करने चाहिये। ऐसे मुद्दों में कार्रवाई के निर्धारण तथा उसके समन्वयन लिये आयोग में नोडल अधिकारी नियुक्त किये जाएँ और कार्यवाही को अधिक सफल बनाने के लिये प्रत्येक सांविधानीक आयोग के अंदर एक आंतरिक पद्धति विकसित की जाए।
- केंद्र तथा राज्य सरकारों को भी गंभीर अपराधों से निपटने के लिये सक्रियता के साथ कदम उठाने चाहिये। इसके लिये सरकारें मानवाधिकार आयोग की सहायता भी ले सकती हैं।

निष्कर्ष:

सामाजिक न्याय एवं सुरक्षा का अधिकार और आर्थिक, सामाजिक और सांस्कृतिक अधिकारों की प्राप्ति का अधिकार अर्थात् समाज के एक सदस्य के रूप में प्रत्येक व्यक्ति को सामाजिक सुरक्षा का अधिकार है और प्रत्येक व्यक्ति को अपने व्यक्तित्व के उस स्वतंत्र विकास तथा गौरव के लिए जो राष्ट्रीय प्रयत्न या अंतर्राष्ट्रीय सहयोग तथा प्रत्येक राज्य के संगठन एवं साधनों के अनुकूल हो अनिवार्यतः आवश्यक आर्थिक, सामाजिक और सांस्कृतिक अधिकारों की प्राप्ति का हक है। परंतु वर्तमान समय में दुनिया में अज्ञान, भूख और बीमारी

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

का अनुपात कम नहीं हो रहा है। इसलिए अधिकारों की मान्यता और वास्तविकता के बीच अंतर बढ़ा है। किसी को आजादी देना और अधिकार देना, दोनों में बहुत अंतर है। आजादी एक स्थिति मात्र है जबकि अधिकार सुविधा और सुरक्षा है। आजादी में सुविधा तो हो सकती है । परन्तु निश्चितता और सुरक्षा का प्रायः अभाव रहता है। अधिकार एक तरह से निश्चितता है, आत्मरक्षा या सुरक्षा है । अतः देश में मानवाधिकारों की रक्षा तभी हो पाएगी जब सभी संस्थाएँ मिलजुल कर देश की एकता-अखंडता को बरकरार रखने में एक-दूसरे का सहयोग करेंगी। ज़रूरत है तो सिर्फ एक नेक पहल की।

सन्दर्भ ग्रन्थ सूची:

1. बाबेल, बसन्ती लाल (2015). मानवाधिकार संरक्षण अधिनियम-1993, जयपुर: सुविधा लॉ हाउस.
2. चतुर्वेदी, अरूण एवं संजय लोढ़ा (2019). भारत में मानवाधिकार, जयपुर: पंचशील प्रकाशन.
3. गुप्ता, कैलाशनाथ (2017). मानवाधिकार और उनकी रक्षा, दिल्ली: अविष्कार प्रकाशन.
4. जोशी, आर. पी. (2019). मावनाधिकार एवं कर्त्तव्य, अजमेर: अभिनव प्रकाषन.
5. कटारिया, सुरेन्द्र (2018). मानवाधिकार, सभ्य समाज एवं पुलिस, जयपुर: आर. बी.एस.ए. पब्लिकेशन.
6. पलाई, अरूण कुमार (2019). भारत का राष्ट्रीय मानव अधिकार आयोग, गठन, कार्य और माली परिदृश्य, नई दिल्ली: राधा पब्लिकेशन्स.
7. पूरणमल (2015). मानवाधिकार, सामाजिक न्याय और भारत का संविधान, जयपुर: पोइन्टर पब्लिकेशन्स.
8. शर्मा, सुभाष (2019). भारत में मानवाधिकार, नई दिल्ली: नेशनल बुक पब्लिकेशन्स.
9. शाह, स्वप्नी एवं चौहान, तोलाराम (2012). उन्नति: दलित मानवाधिकार कार्यकर्ताओं के लिए प्रवेशिका, अहमदाबाद: उन्नति विकास शिक्षण संगठन.
10. यादव, वीरेन्द्र सिंह (2018). नयी सदी की दहलीज पर भारत: सामाजिक समस्याओं के उभरते क्षितिज, नई दिल्ली: ओमेगा पब्लिकेशन्स.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

सातारा जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा अभ्यास

डॉ.मनिषा सुरेश पवार
प्रा.संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर
Email: manishakadam82@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180231
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 149-151
February- 2026
Submitted: 09 Jan. 2026
Revised: 19 Jan. 2026
Accepted: 06 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश:

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करण्यासाठी, स्थालांतर थांबविण्यासाठी आणि ग्रामीण भागात पायाभूत सेवा सुविधांचा विकास करण्याच्या उद्देशाने भारत सरकारने २००५ साली महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेची सुरुवात केली. किमान १०० दिवसांचे हमी रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात आलेली केंद्र सरकारची हि एक महत्त्वपूर्ण योजना आहे. गेली २० वर्षे मनरेगा ग्रामीण कुटुंबाना रोजगार हमी पुरवीत आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील सामाजिक व आर्थिक स्थिती बदलली आहे. ग्रामीण भागातील लोकांना रोजगार मिळाल्यामुळे त्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारून त्यांचे राहणीमान उंचावले आहे. या योजनेतील विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे या योजनेत महिलांना रोजगार मिळाल्यामुळे महिला श्रम शक्तीचा या योजनेतील सहभाग प्रचंड वाढला. सातारा जिल्हा हा कृषीप्रधान जिल्हा असून येथे मोठ्या प्रमाणावर ग्रामीण लोकसंख्या आहे. दुष्काळी परिस्थिती, हंगामी रोजगार आणि स्थलांतर यांसारख्या समस्या या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आढळतात. त्यामुळे या जिल्ह्यात MGNREGA ची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. प्रस्तुत संशोधन पेपर मध्ये सातारा जिल्ह्यातील या योजनेची अंमलबजावणी,प्रगती, योजनेसाठी झालेला खर्च, रोजगार पुरविलेली कुटुंबे, या योजनेअंतर्गत पूर्ण झालेली कामे, रोजगार निर्मिती, सामाजिक-आर्थिक परिणाम, यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

मुख्यशब्द: *मनरेगा,सातारा, बेरोजगारी, ग्रामीण, कुटुंबे.*

प्रस्तावना:

भारतीय अर्थव्यवस्थेतील ग्रामीण बेरोजगारी आणि दारिद्र्य ही दीर्घकालीन समस्या आहे. यावर उपाय म्हणून २००५ साली केंद्र सरकारने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरू केली. या योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण कुटुंबांना हमीदार रोजगार उपलब्ध करून देणे, स्थलांतर रोखणे आणि शाश्वत मालमत्ता निर्मिती करणे करणे हा आहे.हि योजना सर्वप्रथम राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ (नरेगा) नावाने सुरु झाली. नंतर तिचे नाव महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना असे करण्यात आले.त्यानंतर केंत्रीय मंडळाने १२ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या बैठकीत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे नाव "विकसित भारत –रोजगार आणि आजीविका हमी मिशन ग्रामीण" असे करण्यात आले आहे. तिलाच विकसित भारत –जी राम जी (VB-G RAM G) २०२५ असेही म्हंटले जाते. या योजनेत पूर्वी १०० दिवसांच्या रोजगाराची तरतूद होती ती आता बदलून १२५ केली आहे. तसेच दिवसाला २४० रुपये वेतन दिले जात होते ते आता २९७ रुपये (२०२४-२५) करण्यात आहे. या योजनेत अनेक बदल करण्यात आले त्यामागील मुख्य उद्देश विकसित भारत २०४७ ची ध्येयपुर्ती आहे. या योजनेअंतर्गत १८ वर्षावरील कोणताही ग्रामीण नागरिक ग्रामपंचायतीकडून जॉब कार्ड मिळू शकते. या जॉब कार्ड धारकांना ग्रामपंचायत रोजगार पुरविते. कामाची डिजिटल हजेरी घेतली जाते व मजुरी थेट कार्ड धारकाच्या खात्यात जमा होते. जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, गटविकास अधिकारी व ग्रामपंचायत स्तरावरून या योजनेतील कामांचे नियोजन केले जाते. योजनेअंतर्गत २६६ प्रकारची कामे निर्धारित आहेत (वृक्ष लागवड, माती संवर्धन, जलसंधारण, पायाभूत सुविधा सुधारणा इत्यादी).

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. मनिषा सुरेश पवार, प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर

How to cite this article:
पवार. मनिषा. सुरेश. (2026). सातारा जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा अभ्यास. Journal of Research and Development, 18(2(XXI)), 149–151. https://doi.org/10.5281/zenodo.19548202

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19548202

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

या योजनेतील एकूण लाभार्त्यांपैकी ४० टक्क्याहून जास्त दिसून येते.

सातारा जिल्हा हा कृषिप्रधान जिल्हा म्हणून ओळखला जात असून दुष्काळी परिस्थितीमुळे येथे रोजगाराची अस्थिरता आढळते.सातारा जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ३०,०३,९२२ (२०११ च्या जनगणनेनुसार) आहे, त्यापैकी सुमारे २४,३३,३६३ एवढी ग्रामीण लोकसंख्या आहे. दुष्काळी परिस्थिती, हंगामी रोजगार आणि स्थलांतर, दारिद्र्य यांसारख्या समस्या या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आढळतात.अशा परिस्थितीत MGNREGA ही योजना या जिल्ह्यातील ग्रामीण जनतेसाठी आर्थिक आधार ठरली आहे. MGNREGA अंतर्गत सातारा जिल्ह्यात पाणी साठा, माती संवर्धन, फळबाग लागवड, रस्ते दुरुस्ती, बांधकाम यासारख्या कामांसाठी निधी दिला गेला आहे आणि जिल्ह्यात हि कामे प्रभावीपणे केली गेली आहेत. विविध गावांमध्ये सामुदायिक विकासासंबधित विविध लहान-मोठे प्रकल्प या योजनेतून साकारले आहेत. काही वर्षांपूर्वी फळबाग लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण झालेले दिसून आले होते, जिथे अनेक शेतकऱ्यांनी ३७६० हेक्टरवर फळबाग लागवड केली आहे. सातारा जिल्ह्यात या योजने अंतर्गत सरकारचा खर्च, कामांची संख्या वाढताना दिसत आहे परिणामी ग्रामीण भागात अनेक कामांचा विस्तार व गुणवत्ता वाढून रोजगारात भर पडत आहे जी सातारा जिल्ह्याच्या विकासासाठी महत्वपूर्ण बाब आहे .

अभ्यासाचे महत्त्व

नियोजन काळात भारत सरकारने देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी विविध योजना देशपातळीवर सुरु केल्या आहेत.त्यातीलच एक महत्वपूर्ण योजना म्हणजे मनरेगा योजना होय. गेल्या २० वर्षात या योजनेचे फलित अभ्यासाने गरजेचे आहे. ग्रामीण भागात रोजगाराचा हक्क-आधारित कार्यक्रम, उपजीविका सुरक्षित करणे आणि ग्रामीण आर्थिक स्थिती सुधारणा, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन व टिकाऊ उत्पादन मत्ता निर्माण करणे, महिला, अनुसूचित जाती/जनजाती व सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांचे सक्षमीकरण करणे या दृष्टीने हि योजना महत्वाची मानली जाते. या योजनेअंतर्गत सातारा जिल्ह्यात किती खर्च करण्यात आला, किती कुटुंबाना रोजगार पुरविला गेला, किती कामे पूर्ण झाली याचा अभ्यास येथे करण्यात आला आहे कि ज्यावरून सातारा जिल्ह्यातील बेकारी निर्मुलनामध्ये आणि ग्रामीण रोजगार पुरविण्यामध्ये मनरेगा योजनेचे योगदान किती आहे हे स्पष्ट करता येईल.

अभ्यासाची उद्धीष्टे

१) सातारा जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या प्रगतीचा अभ्यास करणे. रोजगार पुरविलेल्या कुटुंबांची संख्या, योजनेचा एकूण खर्च, पूर्ण झालेली कामे याचा आभास करणे.

२) आवश्यक असल्यास उपाय योजना सुचविणे .

संशोधन पद्धती व नमुना निवड

सदर शोध निबंधामध्ये वर्णनात्मक व विश्लेषनामत्क संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. हा शोध निबंध दुय्यम सामग्रीवर आधारित आहे. या शोध निबंधातील माहिती हि विविध पुस्तके, मासिके, नियतकालिके, वर्तमानपत्र सातारा जिल्हा परिषद अहवाल, सातारा जिल्हा आर्थिक पाहणी अहवाल २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीतील आकडेवारीवर आणि माहितीवर आधारित आहे.

डेटा विश्लेषण आणि स्पष्टीकरण

खालील तक्त्या मध्ये सातारा जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रगती दर्शविली आहे.या मध्ये रोजगार पुरविलेल्या कुटुंबांची संख्या, योजनेचा एकूण खर्च, पूर्ण झालेली कामे यांची २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीतील आकडेवारी देऊन त्याचे विश्लेषण केले आहे.

अनु.क्र.	वर्ष	रोजगार पुरविलेल्या कुटुंबांची संख्या (लाख)	एकुण खर्च (कोटी)	पूर्ण झालेल्या कामांची संख्या
१	२०१८ – १९	०.२७	२७.१५	७७६८
२	२०१९ – २०	०.२२	२३.४४	६८३४
३	२०२० – २१	०.२५	२६.०५	६०११
४	२०२१ – २२	०.२८	२६.०५	५३१०
५	२०२२ – २३	०.३०	२९.५५	७२५२
६	२०२३ – २४	०.३०	३७.४६	६४२७
एकुण		१.६२	१६९.७	३९,६०२
सरासरी		०.२७	२८.२८	६,६००
प्रमाणित विचलन		०.०३	४.९१	८८१.४८
भिन्नतेचा गुणांक		११.४८	१७.३६	१३.३६
चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर		०.०२	०.०७	-०.०४

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

कमाल	०.३०	३७.४६	७७६८
किमान	०.२२	२३.४४	५३१०

१) २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीतील सातारा जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची रोजगार पुरविलेल्या कुटुंबांची सरासरी ०.२७ लाख एवढी आहे. प्रमाणित विचलन ०.०३ आहे. भिन्नतेचा गुणांक ११.४८ टक्के इतका आहे. चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.०२ टक्के आहे. रोजगार पुरविलेल्या कुटुंबांची कमाल संख्या ०.३० लाख होती. तर किमान संख्या ०.२२ लाख होती. यावरून असे म्हणता येईल कि सातारा जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची रोजगार पुरविलेल्या कुटुंबांची संख्या वाढत्या प्रवृत्तीची आहे.

२) २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीतील सातारा जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा एकूण खर्च पाहता खर्चाची सरासरी २८.२८ कोटी आहे. प्रमाणित विचलन ४.९१ टक्के आहे. भिन्नतेचा गुणांक १७.३६ टक्के इतका आहे. चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.०७ टक्के आहे.योजनेचा एकूण कमाल खर्च ३७.४६ लाख होती. तर किमान खर्च २३.४४ कोटी होती. यावरून असे म्हणता येईल कि सातारा जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या खर्चाची वाढती प्रवृत्ती दिसून येत आहे.

३) २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीतील सातारा जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा पूर्ण झालेल्या कामांची संख्या सरासरी ६,६०० आहे. प्रमाणित विचलन ८८१.४८ टक्के आहे. भिन्नतेचा गुणांक १३.३६ टक्के इतका आहे. चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर -०.०४ टक्के आहे. पूर्ण झालेल्या कामांची संख्या कमाल ७७६८ होती. तर किमान संख्या ५३१० होती. यावरून असे म्हणता येईल कि सातारा जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या पूर्ण झालेल्या कामांच्या संख्येत चढ उताराची प्रवृत्ती दिसून येत आहे.

निष्कर्ष

सातारा जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेद्वारे रोजगार पुरविलेल्या कुटुंबांच्या संख्येत आणि योजनेच्या एकूण खर्चात वाढ होताना दिसून येत आहे. महात्मा गांधी रोजगार हमी योजना (MGNREGA) सातारा जिल्ह्यात ग्रामीण भागात रोजगार, आर्थिक सुरक्षा आणि नैसर्गिक संसाधन संवर्धनासाठी एक प्रभावी सामाजिक योजना म्हणून कार्य करत आहे. आकडेवारीनुसार हजारो कुटुंबांना रोजगाराची हमी मिळत आहे आणि विविध ग्रामस्थ विकास कामांसाठी योजना उपयोगी पडत आहे. हि योजना सुरु झाल्यापासुम रोजगाराची उपलब्धता वाढली,पाणी साठा वाढल्यामुळे पाण्याचा तुटवडा कमी झाला, ग्रामीण पायाभूत सुविधा सुधारल्या. तरीही योजनेची अंमलबजावणी सुधारण्यासाठी स्थानिक पातळीवर नियोजन आणि सतत निरीक्षण आवश्यक आहे. या योजनेमुळे ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्नात वाढ झाली असून महिला सक्षमीकरण आणि जलसंधारणासारख्या विकासकामांत सकारात्मक परिणाम दिसून येतो. तथापि, काही तालुक्यांमध्ये जॉबकार्ड वितरण कमी आहे, निधी विलंब, कामे पूर्ण होण्यापूर्वी वित्तीय व संसाधन अडचणी, कामांची गुणवत्ता कमी, तांत्रिक अडचणी आणि जनजागृतीचा अभाव यांसारख्या समस्या देखील आढळतात.

सूचना

१. वेतन वेळेत देण्यासाठी डिजिटल प्रणाली अधिक सक्षम करावी.
२. लाभार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगाराची गुणवत्ता वाढवावी.
३. ग्रामपंचायत स्तरावर देखरेख व्यवस्था मजबूत करावी.
४. डिजिटल पद्धतीने काम नोंदणी करावी.
५. वेतन जलद देयक यंत्रणा उभी करावी.
६. प्रशिक्षित पर्यवेक्षक नेमले जावेत.
७. महिला सशक्तीकरणासाठी विशेष योजना राबवावी.

सातारा जिल्ह्यात MGNREGA योजना ग्रामीण समाजाच्या आर्थिक स्थितीत सकारात्मक बदल घडवून आणते. परंतु नियोजनाची गुणवत्ता आणि कार्यात सुधारणा आवश्यक आहे. योग्य प्रशासन व सहभागातून ही आजीविका वाढीस मदत करते.

संदर्भ

1. द्रेझ,जे.आणि खेरा आर (२०१७).भारतातील अलीकडील सामाजिक सुरक्षा उपक्रम.जागतिक विकास ८९,५५५-५७२ .
2. राष्ट्रीय ग्रामीण विकास आणि पंचायती राज संस्था.(२०२१) महाराष्ट्रातील मनरेगाचा प्रभाव मुल्यांकन अभ्यास.
3. पाटील स.(२०१९).ग्रामीण विकासात मनरेगा योजनेची भूमिका – एक विश्लेषण महाराष्ट्र आर्थिक अभ्यास जर्नल,८ (१),३३ -४०
4. सातारा जिल्हा आर्थिक पाहणी अहवाल २०१८-१९ ते २०२३-२४
5. Ministry of Rural Development, Government of India. MGNREGA Data 2023-24

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

कॉपीराइट कायदे: एक ऐतिहासिक आणि तुलनात्मक विश्लेषण

डॉ. दिनकर शेवंताबाई मारुती कबीर
अर्थशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, कोल्हापूर
Email: dinkarkabir12@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180232
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 152-158
February- 2026
Submitted: 09 Jan. 2026
Revised: 19 Jan. 2026
Accepted: 06 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

कॉपीराइट कायदे हे बौद्धिक संपदा हक्कांचे महत्त्वपूर्ण घटक असून, सर्जनशील कार्याचे संरक्षण करण्यासाठी विकसित झाले आहेत. इतिहासात सुरुवातीला मुद्रण तंत्रज्ञानाच्या विकासानंतर लेखक आणि प्रकाशकांच्या हक्कांचे रक्षण करण्याची गरज निर्माण झाली. 1710 मधील Statute of Anne हा पहिला आधुनिक कॉपीराइट कायदा मानला जातो, ज्याने लेखकांना त्यांच्या साहित्यावर कायदेशीर हक्क दिले. कालांतराने विविध देशांनी आपापल्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक गरजांनुसार कॉपीराइट कायद्यांमध्ये बदल केले. आंतरराष्ट्रीय स्तरावर Berne Convention (1886) सारख्या करारांमुळे विविध देशांतील कॉपीराइट संरक्षणात समन्वय साधला गेला.

तुलनात्मक दृष्टिकोनातून पाहता, विकसित देशांमध्ये कडक अंमलबजावणी आणि दीर्घकालीन संरक्षण आढळते, तर विकसनशील देशांमध्ये ज्ञानप्रसार आणि सार्वजनिक हित यावर अधिक भर दिला जातो. डिजिटल युगात इंटरनेट, सॉफ्टवेअर आणि मल्टिमीडिया सामग्रीमुळे कॉपीराइटचे स्वरूप अधिक जटिल झाले आहे, ज्यामुळे नवीन कायदेशीर आव्हाने निर्माण झाली आहेत. अशा प्रकारे, कॉपीराइट कायदे हे ऐतिहासिक विकास, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि तांत्रिक बदल यांच्या प्रभावाखाली सतत विकसित होत आहेत.

मुख्यशब्द: *कॉपीराइट कायदे, बौद्धिक संपदा हक्क, Statute of Anne, Berne Convention, ऐतिहासिक विकास, तुलनात्मक विश्लेषण, डिजिटल युग, सर्जनशील संरक्षण, आंतरराष्ट्रीय करार*

प्रस्तावना

भारतीय चित्रपट उद्योग म्हणून सामान्यतः ओळखल्या जाणाऱ्या बॉलीवूड ने देशाच्या अर्थव्यवस्थेत आणि सांस्कृतिक वारशात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. तथापि, इतर कोणत्याही उद्योगाप्रमाणेच ते देखील कॉपीराइटद्वारे नियंत्रित केले जाते. कॉपीराइट कायदा लेखकांना बाजारात त्यांच्या कामांचे विशेष अधिकार देतो. चित्रपट निर्माते आणि इतर व्यवसाय संचालकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी कॉपीराइट कायदा देखील महत्त्वाचा आहे. १९५७ च्या भारतीय कॉपीराइट कायद्याअंतर्गत लेखकांना चित्रपटांसह त्यांची सर्व कामे प्रकाशित करण्याचा विशेष अधिकार आहे. कॉपीराइट उल्लंघनाचा चित्रपट व्यवसायावर परिणाम झाला आहे, ज्यामुळे निर्माते आणि चित्रपट निर्मात्यांना अनधिकृत वितरण आणि पायरसीद्वारे खूप पैसे खर्च करावे लागले आहेत. १९५२ चा सिनेमॅटोग्राफ कायदा, जो चित्रपट पायरसीसाठी फौजदारी दंड आकारतो, हा या प्रथेला तोंड देण्यासाठी भारत सरकारने उचललेल्या अनेक पावलांपैकी एक आहे. कॉपीराइट-संबंधित समस्यांचे नियमन करण्यासाठी सरकारने कॉपीराइट कार्यालय आणि बौद्धिक संपदा अपील मंडळाची स्थापना देखील केली होती.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. दिनकर शेवंताबाई मारुती कबीर, अर्थशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, कोल्हापूर

How to cite this article:
दिनकर शेवंताबाई मारुती कबीर. (2026). कॉपीराइट कायदे: एक ऐतिहासिक आणि तुलनात्मक विश्लेषण. Journal of Research and Development, 18(2(XXI)), 152–158. https://doi.org/10.5281/zenodo.19548255

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19548255

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

भारतीय चित्रपट उद्योगात, निर्मात्याच्या हक्कांचे संरक्षण कॉपीराइट नियमांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. या क्षेत्राची सतत वाढ आणि विकास राखण्यासाठी, भागधारकांनी काही कायदे आणि नियमांचे पालन केले पाहिजे.

संपूर्ण मीडिया आणि मनोरंजन क्षेत्र सर्जनशीलतेवर आधारित असल्याने आणि नेहमीच काहीतरी नवीन निर्माण करत असल्याने, अशा माहितीचे संरक्षण करण्यासाठी आणि त्याची डुप्लिकेट होण्यापासून रोखण्यासाठी कॉपीराइट संरक्षण आवश्यक आहे. बौद्धिक संपदा किंवा अमूर्त संपत्तीचा एक प्रकार म्हणजे कॉपीराइट. चित्रपट व्यवसायात सुप्रसिद्ध किंवा पौराणिक चित्रपटांच्या रिमेककडे अलिकडच्या काळात एक प्रवृत्ती आपल्या सर्वांनी पाहिली आहे. मूळ चित्रपटाच्या कॉपीराइट मालकाकडून त्याचा रिमेक करण्यासाठी परवाना आवश्यक असतो. कधीकधी मूळ चित्रपटाचे रूपांतर करून किंवा त्यातून प्रेरणा घेऊन रिमेक केले जातात.

ऐतिहासिक कायदे आणि सुधारणा:

अ) १९५७ चा कॉपीराइट कायदा: जो युनायटेड किंग्डमच्या १९५६ च्या कॉपीराइट कायद्यानंतर तयार करण्यात आला, हा भारतातील कॉपीराइट कायद्याचे नियमन करणारा मुख्य कायदा आहे. स्वातंत्र्यानंतर भारतीय कायद्यातील पहिल्या व्यापक कॉपीराइट कायद्यांपैकी एक. हा कायदा कॉपीराइटचे संरक्षण करण्याच्या आणि कॉपीराइट केलेल्या साहित्याचे योग्य वागणूक सुनिश्चित करण्याच्या जागतिक ट्रेंडचे अनुसरण करतो. बौद्धिक संपदा चर्चेत उद्भवणाऱ्या नवीन समस्यांना तोंड देण्यासाठी कायद्यात अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत.

ब) कॉपीराइट सुधारणा कायदा, २०१२: कॉपीराइट दुरुस्तीने डिजिटल कामांच्या गुंतागुंतींना संबोधित केले, ज्यामुळे भारतातील कॉपीराइट कायद्यात लक्षणीय बदल झाला. या बदलांमुळे १९५७ चा कॉपीराइट कायदा आला आणि त्यासोबतच, भारतीय कॉपीराइट कायदा जागतिक मानकांच्या जवळ आला, विशेषतः WTO ने स्थापित केलेला मानक म्हणजेच जागतिक व्यापार संघटना. हे बदल पुढीलप्रमाणे आहेत:

- **लेखकाला समर्थन देणाऱ्या अटी:** लेखकांना समर्थन देण्याच्या क्षेत्राशी संबंधित इतर क्षेत्रांमध्ये रॉयल्टी प्राप्त करणे या दुरुस्तीत लक्ष केंद्रित केले गेले. यामुळे लेखकांना व्यावसायिकरित्या वापरल्यास, विशेषतः संगीत आणि चित्रपट उद्योगांमध्ये, समान मोबदला मिळेल याची खात्री झाली.
- **डिजिटल हक्क व्यवस्थापन:** भारतीय कॉपीराइट कायद्यांना जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त करारांशी WCT आणि WPPT सारख्या करारांशी जुळवून घेणे हे या दुरुस्तीचे मुख्य उद्दिष्ट होते. त्यात DRM तरतुदीसारख्या उपाययोजनांचा समावेश करून लेखकाच्या डिजिटल हक्कांचे रक्षण करण्यासाठी नियोजित उपाययोजनांचा समावेश होता.
- **इंटरनेट मध्यस्थांची जबाबदारी:** कॉपीराइट कायद्यातील नवीन दुरुस्तीमुळे कॉपीराइट उल्लंघन प्रकरणांमध्ये इंटरनेट मध्यस्थांच्या दायित्वाच्या व्याप्तीची स्थिती बदलली आहे. माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० च्या कलम ७९ नुसार आता मध्यस्थांना वापरकर्त्याने पोस्ट केलेल्या उल्लंघन करणाऱ्या सामग्रीपासून संरक्षण मिळेल, जर त्यांनी काढून टाकण्याच्या विनंत्यांचे जलद आणि त्वरित पालन केले आणि त्यांना या उल्लंघनांबद्दल पूर्व माहिती नसेल.
- **कलम ५२:** हा कलम वाजवी वापरासाठी आहे. तो मालकाच्या परवानगीशिवाय, परंतु निर्बंधांनुसार, कॉपीराइट केलेल्या सामग्रीचा काही विशिष्ट वापर करण्यास परवानगी देतो. या सवलती चालू असलेल्या घटनांबद्दल अहवाल देण्यासाठी, टीकात्मक भाष्ये आणि पुनरावलोकने देण्यासाठी किंवा खाजगी अभ्यास करण्यासाठी वापरल्या जाऊ शकतात.
- **कलम ६३:** गुन्हेगारी कायदेशीर परिणाम या कलमात वर्णन केलेले दंड आणि तुरुंगवास हे कॉपीराइट कायद्यांचे उल्लंघन करण्याचे गुन्हेगारी कायदेशीर परिणाम दर्शवितात. त्याचा उद्देश कॉपीराइट धारकांच्या बौद्धिक संपदा अधिकारांचे संरक्षण करणे आणि अनधिकृत वापर रोखणे आहे.
- **आयटी कायदा, २००० चे कलम ७९:** हे कलम इंटरनेट मध्यस्थांसाठी सुरक्षित हार्बर तरतुदी प्रदान करते जे उल्लंघनांची प्रत्यक्ष माहिती नसतानाही काढून टाकण्याच्या सूचनांचे पालन करतात.

जागतिक कायद्यांचे तुलनात्मक विश्लेषण:

इंटरनेट मध्यस्थांच्या दायित्वाबाबत, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, युरोपियन युनियन आणि भारत यांनी कायदेशीर चौकटीत फरक केला आहे.

- **भारत:**

इंटरनेट मध्यस्थांसाठी सुरक्षित बंदर तरतुदी २००० च्या माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ७९ मध्ये नमूद केल्या आहेत. जोपर्यंत ते काढून टाकण्याच्या सूचनांचे पालन करतात आणि अशा उल्लंघन करणाऱ्या कृती किंवा सामग्रीबद्दल त्यांना माहिती नसते, तोपर्यंत वापरकर्त्याने तयार केलेल्या उल्लंघन करणाऱ्या सामग्रीसाठी त्यांना जबाबदार धरले जात नाही.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

- **युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका**

DMCA चा कलम ५१२ युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकामध्ये उपलब्ध असलेल्या मध्यस्थांसाठी एक पद्धतशीर सुरक्षित बंदर यंत्रणा प्रदान करतो. DMCA च्या सूचना आणि काढून टाकण्याच्या धोरणानुसार कॉपीराइट धारकाकडून प्रामाणिक सूचना मिळाल्यावर मध्यस्थांना त्वरित कारवाई करण्यास बांधील आहे.

- **युरोपियन युनियन**

युरोपियन युनियनच्या कॉपीराइटवरील निर्देशाद्वारे मध्यस्थांच्या दायित्वासाठी एक सक्रिय दृष्टिकोन स्थापित केला जातो. कॉपीराइट केलेल्या साहित्याच्या व्यवस्थापनासाठी मध्यस्थांना जबाबदार धरण्याच्या दिशेने होणारे बदल आणि उल्लंघन टाळणे हे ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर लादलेल्या आवश्यकतांद्वारे दर्शविले जाते.

कॉपीराइट कायदा:

कॉपीराइट हा निर्मात्याला किंवा व्यक्तींच्या गटाला त्यांच्या कामाचे किंवा सर्जनशीलतेचे पुनरुत्पादन, रूपांतर, भाषांतरापासून संरक्षण करण्यासाठी दिलेला एक विशेष कायदेशीर अधिकार आहे. निर्मात्याकडून/कामाच्या अस्तित्वासाठी जबाबदार असलेल्या व्यक्तीकडून पूर्व परवानगीशिवाय इतरांकडून वितरण आणि सार्वजनिक कामगिरी. कॉपीराइटचा उद्देश सामान्य फायदे सुरक्षित करणे आणि बक्षीस देणे आहे म्हणजेच, उत्पादित कामावर लेखकांचे लेबल. ते लेखकांना सतत अधिक कामे तयार करण्यास आणि पुढे जाण्यास प्रोत्साहित करते. कॉपीराइट कायद्याअंतर्गत संरक्षण मिळविण्यासाठी, कामात खालील गोष्टी असाव्यात,

कामाचे सादरीकरण व्यक्त करण्यायोग्य आणि भौतिक स्वरूपात असले पाहिजे आणि कागद, ऑप्टिकल मीडियावरील रेकॉर्डिंग, चित्रे, कागदपत्रे, वेब सर्व्हर इत्यादीसारख्या मूर्त स्वरूपात निश्चित स्वरूपात/ओळखण्यास सक्षम असावे. मूळ काम, आधी प्रकाशित केले जाऊ नये.

काम मूळ असले पाहिजे (मूळ म्हणजे, काम प्रेरणेने तयार केले गेले आहे आणि इतर कोणत्याही विद्यमान स्रोतांच्या प्रती नाहीत. काम पहिल्यांदाच तयार केले गेले पाहिजे) पहिले प्रकाशन असले पाहिजे.

लेखकाच्या मृत्यूनंतर प्रकाशित झालेले काम, लेखकाच्या मृत्यूच्या वेळी, त्याचे भारताचे नागरिकत्व असणे आवश्यक आहे. जर भारताबाहेर प्रकाशित झालेले काम असेल तर, त्या वेळी लेखक भारताचा नागरिक असणे आवश्यक आहे. ते कोणत्याही मूर्त स्वरूपात निश्चित केलेले असणे आवश्यक आहे. कामाचे सादरीकरण व्यक्त करण्यायोग्य आणि भौतिक स्वरूपात असले पाहिजे आणि कागद, ऑप्टिकल मीडियावरील रेकॉर्डिंग, चित्रे, कागदपत्रे, वेब सर्व्हर इत्यादीसारख्या अस्तित्वात किंवा मूर्त स्वरूपात निश्चित स्वरूपात ओळखता येण्यास सक्षम असावे.

कॉपीराइट म्हणजे काय :

कलम १४ मध्ये म्हटले आहे की कॉपीराइट ही एक कायदेशीर संकल्पना आहे जी मूळ कलाकृतींच्या निर्मात्यांना विशेष अधिकार देते, ज्यामुळे त्यांना त्यांच्या निर्मितीच्या वापरावर आणि वितरणावर नियंत्रण मिळते. ही बौद्धिक संपदा संरक्षणाची एक प्रकारची पद्धत आहे जी साहित्यिक, कलात्मक, संगीतमय, नाट्यमय आणि स्थापत्य कलाकृतींसारख्या विविध प्रकारच्या सर्जनशील अभिव्यक्तींचे रक्षण करते.

संशोधन पद्धती:

विषयाला अनुसरण वापर केलेली संशोधन पद्धत ही सैद्धांतिक, वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक आहे. यासाठी, जर्नल्स, लेख, संशोधन पत्रे, करार, सरकारी कागदपत्रे, केस कायदे आणि ब्लॉगवर अवलंबून राहणे आवश्यक आहे.

उद्दिष्टे:

१. कॉपीराइट कायदा आणि ऐतिहासिक संदर्भ याचा अभ्यास करणे.
२. वेगवेगळ्या देशांच्या कॉपीराइट कायद्यांचा तुलनात्मक आढावा घेणे.
३. कॉपीराइट केसच्या निकालाचा आढावा घेणे.

न्यायालयीन प्रकरणे:

- बेनेट, कोलमन अँड कंपनी लिमिटेड आणि अॅनर विरुद्ध श्री. अजय कुमार आणि इतर, सीएस (सीओएमएम) २१/२०१९ निर्णय: ०१.०५.२०१९ न्यायालय: दिल्ली उच्च न्यायालय
- पतंजली आयुर्वेद लिमिटेड आणि अॅनर विरुद्ध गुगल एलएलसी आणि ओआरएस, सीएस (ओएस) १०४/२०१९ आणि आय.ए. २५७७/२०१९ निर्णय: १९.०२.२०१९ आणि २१.०२.२०१९ न्यायालय: दिल्ली उच्च न्यायालय

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

- एस. मुथुकुमार विरुद्ध भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण आणि इतर, डब्ल्यू.पी.(एमडी) क्रमांक ७८५५ निर्णय: ०३.०४.२०१९ न्यायालय: मद्रास उच्च न्यायालय
- यूटीव्ही सॉफ्टवेअर कम्युनिकेशन लिमिटेड आणि इतर. १३३७X विरुद्ध आणि इतर, MANU/DE/१२४४/२०१९ निर्णय: १०.०४.२०१९ न्यायालय: दिल्ली उच्च न्यायालय
- एस. मुथुकुमार विरुद्ध ट्राय आणि इतर, W.P.(MD) क्रमांक ७८५५ २०१९ निर्णय: २४.०४.२०१९ न्यायालय: मद्रास उच्च न्यायालय
- टिप्स इंडस्ट्रीज लिमिटेड विरुद्ध विंक म्युझिक लिमिटेड आणि इतर, MANU/MH/०८६२/२०१९ निर्णय: २३.०४.२०१९ न्यायालय: मुंबई उच्च न्यायालय
- मोहल्ला टेक प्रा. लिमिटेड, विरुद्ध बायटेडन्स इंक. आणि इतर, सीएस (सीओएमएम) १२००/२०१८ निर्णय: १७.०५.२०१९ न्यायालय: दिल्ली उच्च न्यायालय
- राज रेवाल विरुद्ध भारतीय संघ आणि इतर, सीएस (सीओएमएम) ३/२०१८, आयए क्र.९०/२०१८ आणि आयए क्र.९२/२०१८ निर्णय: २८.०५.२०१९ न्यायालय: दिल्ली उच्च न्यायालय
- मेसर्स अगी म्युझिक एसडीएन बीएचडी विरुद्ध इलैयाराजा आणि मेसर्स मॉडर्न सिनेमा, एस. क्र.३०८ ऑफ २०१३ आणि सी. एस. क्र.६२ निर्णय: ०४.०६.२०१९ न्यायालय: मद्रास उच्च न्यायालय

भारतीय चित्रपट उद्योग:

भारतीय चित्रपट उद्योग, ज्याला सामान्यतः बॉलीवूड म्हणून ओळखले जाते, हा जगातील सर्वात मोठ्या आणि सर्वात प्रभावशाली चित्रपट उद्योगांपैकी एक आहे. तो एका जटिल आणि बहुआयामी प्रणालीवर चालतो ज्यामध्ये निर्माते, दिग्दर्शक, अभिनेते, वितरक, प्रदर्शक आणि प्रेक्षक यासह विविध भागधारकांचा समावेश असतो.

भारतीय चित्रपट उद्योगात चित्रपट बनवण्याची प्रक्रिया सामान्यतः एका निर्मात्यापासून सुरू होते जो एक कल्पना मांडतो किंवा पटकथा मिळवतो. निर्माता वैयक्तिक गुंतवणूक, भागीदारी किंवा प्रॉडक्शन हाऊस किंवा स्टुडिओशी संपर्क साधून चित्रपटासाठी वित्तपुरवठा करतो. निधी उपलब्ध झाल्यानंतर, निर्माता दिग्दर्शक, पटकथालेखक, छायालेखक, संगीत दिग्दर्शक आणि इतर तांत्रिक सदस्यांसह एक टीम एकत्र करतो.

कास्टिंग प्रक्रिया ही चित्रपटातील विविध भूमिका साकारण्यासाठी कलाकारांची निवड केली जाते. बॉलिवूडमध्ये प्रतिभावान कलाकारांचा एक मोठा समूह आहे, प्रस्थापित स्टार आणि नवीन कलाकार दोन्ही, जे त्यांचे अद्वितीय कौशल्य आणि आकर्षण पडद्यावर आणतात. कास्टिंग निर्णय अनेकदा प्रेक्षकांमध्ये उत्साह आणि अपेक्षा निर्माण करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

भारतीय चित्रपट उद्योगांमध्ये कॉपीराइटची आवश्यकता:

कॉपीराइट कायद्याची आवश्यकता म्हणजे विविध सर्जनशील कलाकृतींना कॉपीराइट कायद्यांद्वारे प्रदान केलेल्या संरक्षणाची व्याप्ती, कॉपीराइट कायदे पुस्तके, संगीत, चित्रपट, कलाकृती, सॉफ्टवेअर, वास्तुशिल्प डिझाइन आणि बरेच काही यासारख्या मूर्त स्वरूपात कल्पनांच्या मूळ अभिव्यक्तींचे संरक्षण करण्यासाठी डिझाइन केलेले आहेत.

जगातील बहुतेक देशांमध्ये कॉपीराइट कायदा लागू आहे आणि प्रत्येक देशाचे स्वतःचे कॉपीराइट कायदे आणि नियम आहेत. हे कायदे प्रामुख्याने निर्माते किंवा कॉपीराइट धारकांना विशेष अधिकार प्रदान करण्यासाठी आहेत, ज्यामुळे त्यांना त्यांच्या कलाकृतींचा वापर, पुनरुत्पादन, वितरण आणि सार्वजनिक कामगिरी किंवा प्रदर्शन नियंत्रित करण्याची परवानगी मिळते. कॉपीराइट कायद्यामध्ये कोणत्याही भाषेमधील कलाकृतींना संरक्षण मिळते.

१. **साहित्यिक कामे:** या श्रेणीमध्ये कादंबऱ्या, कविता, लघुकथा, लेख, निबंध आणि संगणक कोड यासारख्या विविध प्रकारच्या लिखित कामांचा समावेश आहे.
२. **कलात्मक कामे:** कलात्मक कामांमध्ये चित्रे, रेखाचित्रे, शिल्पे, छायाचित्रे, ग्राफिक डिझाइन आणि इतर दृश्य निर्मिती समाविष्ट आहेत.
३. **संगीत कामे:** सुर, गीत आणि व्यवस्था यासह संगीत रचना कॉपीराइटद्वारे संरक्षित आहेत.
४. **नाट्यमय कामे:** कॉपीराइटमध्ये नाटके, पटकथा, पटकथा आणि इतर नाट्यमय लेखन समाविष्ट आहे.
५. **ऑडिओव्हिज्युअल कामे:** या श्रेणीमध्ये चित्रपट, माहितीपट, टेलिव्हिजन शो, व्हिडिओ आणि इतर मल्टीमीडिया निर्मिती समाविष्ट आहेत.
६. **वास्तुशिल्पीय कामे:** वास्तुशिल्पीय डिझाइन, योजना आणि ब्लूप्रिंट्स कॉपीराइट कायद्याअंतर्गत संरक्षित आहेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

७. **सॉफ्टवेअर आणि संगणक कार्यक्रम:** संगणक प्रोग्राम आणि सॉफ्टवेअर कोड हे साहित्यिक काम मानले जातात आणि कॉपीराइटद्वारे संरक्षित आहेत.

सिनेमॅटोग्राफिक चित्रपटांसाठी कॉपीराइट संरक्षण:

भारतीय चित्रपट उद्योगात, त्यांच्या निर्मात्यांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी विविध सर्जनशील कलाकृतींचे कॉपीराइट केले जाऊ शकते. कॉपीराइट कायदा, १९५७, भारतातील कॉपीराइट कायद्याचे नियमन करतो आणि मूळ कलाकृतींचे निर्माते आणि मालकांना विशेष अधिकार देतो. भारतीय चित्रपट उद्योगाच्या संदर्भात, खालील बाबी कॉपीराइट केल्या जाऊ शकतात:

- **चित्रपट:** संपूर्ण चित्रपट, त्याची पटकथा, पटकथा, संवाद, संगीत, गीते, ध्वनी रेकॉर्डिंग, सिनेमॅटोग्राफिक कामे आणि दृश्य घटकांसह, कॉपीराइट केले जाऊ शकतात. याचा अर्थ असा की संपूर्ण चित्रपट, त्याच्या विविध घटकांसह, मूळ काम मानले जाते आणि अनधिकृत पुनरुत्पादन, वितरण किंवा सार्वजनिक सादरीकरणापासून संरक्षित केले जाऊ शकते.
- **संगीत:** मूळ संगीत रचना, ज्यामध्ये सुर, सुर आणि सोबतचे गीते समाविष्ट आहेत, कॉपीराइट संरक्षणास पात्र आहेत. यामध्ये संगीताचे संगीत नोटेशन आणि संगीताचे ध्वनी रेकॉर्डिंग दोन्ही समाविष्ट आहेत. संगीत दिग्दर्शक, संगीतकार आणि गीतकार अनेकदा त्यांच्या रचनांचे कॉपीराइट करतात, जेणेकरून त्यांचे अधिकार सुरक्षित राहतील आणि त्यांना त्यांच्या कामासाठी योग्य मान्यता आणि रॉयल्टी मिळेल याची खात्री होईल.
- **कथा आणि पटकथा:** चित्रपटांच्या लिखित कथा आणि पटकथा साहित्यिक कामे मानल्या जातात आणि कॉपीराइट केल्या जाऊ शकतात. हे संरक्षण सुनिश्चित करते की पटकथालेखकांनी तयार केलेली मूळ सामग्री, संवाद आणि रचना अनधिकृत वापर, पुनरुत्पादन किंवा रूपांतरणापासून संरक्षित आहे.
- **संवाद:** कॉपीराइट संरक्षण चित्रपटांमधील मूळ संवादांपर्यंत विस्तारते. इतर कामांमध्ये किंवा व्यावसायिक उपक्रमांमध्ये त्यांचा अनधिकृत वापर रोखण्यासाठी संस्मरणीय ओळी, कॅचफ्रेज आणि विनोदी देवाणघेवाण कॉपीराइट केल्या जाऊ शकतात.
- **पात्रे:** चित्रपटांसाठी तयार केलेली अद्वितीय आणि विशिष्ट काल्पनिक पात्रे कॉपीराइट केली जाऊ शकतात. हे संरक्षण सुनिश्चित करते की पात्रांचे विशिष्ट गुण, देखावे, नावे आणि कथानक त्यांच्या निर्माते किंवा मालकांसाठीच राहतील, ज्यामुळे या पात्रांचा अनधिकृत वापर किंवा शोषण रोखले जाईल.
- **कलाकृती आणि ग्राफिक्स:** मूळ कलाकृती, ग्राफिक्स, पोस्टर्स, प्रचारात्मक साहित्य आणि चित्रपटासाठी विशेषतः तयार केलेले कोणतेही दृश्य घटक कॉपीराइट केले जाऊ शकतात. हे सुनिश्चित करते की निर्माते त्यांच्या कामावर विशेष अधिकार राखतात आणि परवानगीशिवाय या सामग्रीची अनधिकृत कॉपी किंवा वापर प्रतिबंधित करतात.

कॉपीराइट संरक्षण स्वयंचलित नाही आणि ते भारतातील कॉपीराइट कार्यालयात नोंदणीद्वारे प्राप्त केले जाते. एकदा कॉपीराइट झाल्यानंतर, मालकाला कॉपीराइट केलेले काम पुनरुत्पादित करण्याचा, वितरण करण्याचा, सार्वजनिकरित्या प्रदर्शित करण्याचा आणि विक्री करण्याचा विशेष अधिकार आहे. कॉपीराइट उल्लंघनामुळे कॉपीराइट मालकाच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि भारतीय चित्रपट उद्योगात सर्जनशीलता आणि नवीन उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी कायदेशीर कारवाई आणि दंड, ज्यामध्ये नुकसानभरपाई आणि मनाई आदेश समाविष्ट होऊ शकतात.

शिफारसी (Recommendations)

कायदेशीर सुधारणा (Legal Reforms)

- **लेखक (Author):** सध्याच्या कायद्यात 'एआय' (Artificial Intelligence) द्वारे तयार केलेल्या साहित्याबाबत स्पष्टता नाही. त्यामुळे 'लेखक' या व्याख्येत मानवी बुद्धिमत्तेसह एआय साधनांचा वापर करणाऱ्या व्यक्तीचा समावेश करण्याबाबत सुधारणा सुचवली जाते.
- **सेक्शन ५२ (Fair Dealing) चे सुलभीकरण:** शिक्षण, संशोधन आणि टीका यांसाठी साहित्याचा वापर करताना 'सेक्शन ५२' नुसार मर्यादा अधिक स्पष्ट आणि लवचिक असाव्यात, त्यामुळे डिजिटल क्रिएटर्सना कायदेशीर अडथळे येणार नाहीत.
- **मध्यस्थांची जबाबदारी (Intermediary Liability):** सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सना त्यांच्या प्लॅटफॉर्मवरील पायरसी रोखण्यासाठी अधिक जबाबदार धरले जावे.

तंत्रज्ञानाचा वापर (Technological Integration)

- **ब्लॉक चेन तंत्रज्ञान:** कॉपीराइटची मालकी सिद्ध करण्यासाठी आणि रॉयल्टीच्या स्वयंचलित वितरणासाठी 'ब्लॉक चेन' (Block chain) च्या आधारित प्रणालीचा वापर करावा.
- **डिजिटल राइट्स मॅनेजमेंट (DRM):** निर्मात्यांनी आपल्या साहित्याला तांत्रिक संरक्षण देण्यासाठी प्रगत DRM साधनांचा वापर करावा जेणेकरून अनधिकृत डाउनलोडिंग आणि वितरणास प्रतिबंध निर्माण होईल.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

अंमलबजावणी आणि विवाद निवारण (Enforcement & Dispute Resolution)

- **स्वतंत्र लवाद (Alternative Dispute Resolution):** कॉपीराइट संदर्भातील काही खटले हे वर्षानुवर्षे न्यायालयात प्रलंबित असतात. त्याऐवजी 'मध्यस्थी' किंवा 'लवाद' यांसारख्या जलद प्रक्रियेद्वारे वाद सोडवण्यासाठी स्वतंत्र्य यंत्रणा उभारली जावी.
- **कठोर दंडात्मक तरतुदी:** डिजिटल पायरसी आणि मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक चोरी करणाऱ्यांसाठी दंड आणि शिक्षेचे प्रमाण वाढवावे, जेणेकरून या गुन्ह्यांना आळा बसेल.

सूचना (Suggestions for Creators) (कलाकार आणि निर्मात्यांसाठी)

- **कायदेशीर नोंदणी:** कॉपीराइट आपोआप मिळत असला तरी ही कायदेशीर लढाईत पुरावा म्हणून आपल्या मूळ कलाकृतीची नोंदणी करणे नेहमीच फायदेशीर ठरते.
- **कॉपीराइट नोटीसचा वापर:** आपल्या प्रत्येक प्रकाशित साहित्य, फोटो किंवा व्हिडिओवर '© [नाव] [वर्ष]' अशी नोटीस लावावी, त्यामुळे चोरी करणाऱ्यांना कायदेशीर कारवाईचा इशारा मिळतो.
- **डिजिटल वॉटर मार्किंग:** 'वॉटर मार्क' चा वापर हा मूळ मालकाची ओळख कायम राहावी म्हणून प्रतिमा किंवा व्हिडिओ शेअर करताना त्यावर करावा.

व्यावसायिक व्यवहारांसाठी सूचना

- **लेखी करार (Written Contracts):** तुमचे कोणतेही साहित्य कोणाला विकताना किंवा वापरण्यास देताना नेहमी लेखी करार करा. त्या करारामध्ये हक्कांचे हस्तांतरण (Assignment) किंवा परवाना (License) याच्या अटी स्पष्ट करा.
- **रॉयल्टी हक्क:** करार करताना त्यामध्ये रॉयल्टीचा स्पष्ट उल्लेख करा, जेणेकरून भविष्यात होणाऱ्या फायद्यात तुमचा हिस्सा सुरक्षित राहील.

निष्कर्ष:

कॉपीराइट कायदा चित्रपट निर्मात्यांच्या सर्जनशील कामांचे संरक्षण करतो आणि त्यांच्या प्रयत्नांमधून त्यांना नफा मिळण्याची खात्री देतो. चित्रपट निर्मात्यांच्या बौद्धिक संपदा हक्कांचे संरक्षण करण्यासाठी कॉपीराइट कायदा देखील महत्त्वाचा आहे. भारतीय चित्रपट उद्योगात पायरसी ही एक प्रमुख समस्या आहे आणि या समस्येचा सामना करण्यासाठी कॉपीराइट कायद्यांची कठोर अंमलबजावणी आवश्यक आहे. याव्यतिरिक्त, त्याने चित्रपटांना व्यापारीकरण आणि कायदेशीर एक रचना दिली आहे, ज्यामुळे त्यांचे जागतिक प्रदर्शन आणि वितरण शक्य झाले आहे. कॉपीराइट कायद्याचा अवलंब केल्याने भारतीय चित्रपट उद्योगात सामान्यतः सुधारणा झाली आहे, ज्यामुळे या क्षेत्रासाठी उत्पन्न आणि अधिक संधी निर्माण झाल्या आहेत. चित्रपट निर्माते, निर्माते आणि इतर भागधारकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि पायरसी रोखण्यासाठी कॉपीराइट कायदा महत्त्वपूर्ण आहे. चित्रपट निर्मात्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि भारतीय चित्रपट उद्योगाच्या विस्ताराला पाठिंबा देण्यासाठी, हा कायदा विकसित होत राहील असे मानले जाते.

अमेरिका आणि युरोपीय देशांसारख्या पाश्चात्य देशांमध्ये कॉपीराइट आणि त्याच्या कायद्याबद्दल लोक अधिक जागरूक आहेत परंतु भारतात बौद्धिक संपदा आणि कॉपीराइटबद्दलच्या उपयुक्तता आणि उपाययोजनांबद्दल जागरूकता कार्यक्रम आयोजित करणे सरकारचे कर्तव्य आहे. कॉपीराइट उल्लंघन एक जटिल आणि बहुआयामी आव्हान उभे करते ज्याला प्रभावीपणे तोंड देण्यासाठी बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे.

संदर्भ:

१. डॉ. अनुज केसवानी, रितिका जैन, २०१४ कॉपीराइट उल्लंघन - एक अनुभवजन्य अभ्यास, इंटरनॅशनल जर्नल ऑफ ट्रेडमार्क्स अँड कॉपीराइट, पृष्ठ क्रमांक-१५, फेब्रुवारी, २००९
२. बौद्धिक संपदा हक्क, मुद्दे आणि उपाय, WIPO
३. बिजलानी, एम.डी., कॉपीराइट्सचे संरक्षण, ऑक्टोबर, ३, २००९
४. कॉपीराइट्स कायद्यावरील बेअर ॲक्ट, १९५७, व्यावसायिक
५. बौद्धिक संपदा कायद्यावरील क्रॅश कोर्स, पेनसिल्व्हेनिया विद्यापीठ
६. रूथ एलिझाबेथ फ्लाहर्टी, 'लेक्चुअल पोचिंग', पृष्ठ ९, पृष्ठ ८५, सप्टेंबर २०२०
७. मधुरिमा दातार, श्री नवलमल फिरोदिया लॉ कॉलेज, इंडियन जर्नल ऑफ इंटिग्रेटेड रिसर्च इन लॉ खंड IV अंक V | ISSN: 2583-0538
८. शाह, विधी मितेश. "भारतात पायरेसी आणि पायरेटेड कामांवरील नियम: एक विश्लेषण." ज्यूस कॉर्पस. (२०२२)

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

९. न्हामो, गॉडवेल, आणि इतर. "गेमिंग, फुरसतीचा वेळ आणि मनोरंजन उद्योगावर COVID-19 चे परिणाम." जागतिक पर्यटन उद्योगावर COVID-19 चा खर्च मोजणे (२०२०): २७३-२९५.

१०. कॅरोल, आर्ची बी., आणि जिल ब्राउन. व्यवसाय आणि समाज: नीतिमत्ता, शाश्वतता आणि भागधारक व्यवस्थापन. सेंगेज लर्निंग, २०२२.

११. चौधरी, पेगी ई., आणि ॲलन झिमरमन. बनावट व्यापाराचे अर्थशास्त्र: सरकारे, ग्राहक, समुद्री डाकू आणि बौद्धिक संपदा अधिकार. स्प्रिंगर सायन्स अँड बिझनेस मीडिया, २००९.

१२. बौद्धिक संपदा कायदा, एस.आर. मायनेनी, ११ वा संस्करण २०२२, आशिया लॉ हाऊस.

१३. सिनेमॅटोग्राफ कायदा, १९५२: द गार्डियन ऑफ व्हिक्टोरियन मोरॅलिटी अँड डिसेन्सी लेखक: आस्था खन्ना

१४. चित्रपट उद्योगातील कॉपीराइट दावे, लेखक: विद्या श्री श्रेसा

१५. अभिषेक चक्रवर्ती,(2005), भारतातील हिंदी आणि बंगाली चित्रपट संगीत उद्योगात कॉपीराइट उल्लंघन: भारतीय कायदा अंमलबजावणी यंत्रणेच्या भूमिकेचा एक गंभीर अभ्यास यांनी सादर केलेला उत्तर बंगाल विद्यापीठाच्या अंतर्गत डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी इन लॉ पदवी प्रदान करण्यासाठी प्रबंध सादर केला नोंदणी क्रमांक ७४००१९.

१६. रवी वासुदेवन, 'बॉलीवूड' चे अर्थ, मूव्हिंग इमेज जर्नल, पृष्ठ १, पृष्ठ ४

१७. Indian Journal of Law and Legal Research - IJLLR

१८. International Journal for Legal Research and Analysis

१९. World Intellectual Property Organization (WIPO)

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

डिजिटल समाजांमध्ये सायबरसुरक्षा समस्या

चौगुले अश्विनी सतिश
सुशीलादेवी मल्हारराव देसाई कन्या महाविद्यालय, पेठ वडगाव
Email: 1008chougule@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180233
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 159-162
February- 2026
Submitted: 09 Jan. 2026
Revised: 19 Jan. 2026
Accepted: 06 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश:

डिजिटल तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढीमुळे आधुनिक समाज अधिकाधिक डिजिटल स्वरूपात परिवर्तित होत आहे. इंटरनेट, स्मार्टफोन, क्लाऊड कम्प्युटिंग आणि सोशल मीडियाच्या वापरामुळे माहितीची देवाणघेवाण सुलभ झाली असली तरी सायबरसुरक्षेच्या समस्या अधिक गंभीर बनल्या आहेत.

सायबर हल्ले, डेटा चोरी, ओळख चोरी, फिशिंग, रॅन्समवेअर आणि मालवेअर यांसारख्या धोक्यांमुळे व्यक्ती, संस्था आणि सरकार यांना मोठे नुकसान सहन करावे लागते. विशेषतः आर्थिक व्यवहार, आरोग्य माहिती आणि वैयक्तिक डेटा यांची सुरक्षा महत्त्वाची ठरते. ransomware आणि malware यांसारख्या तंत्रांमुळे प्रणालींमध्ये घुसखोरी करून डेटा एन्क्रिप्ट किंवा नष्ट केला जातो.

तसेच, डिजिटल साक्षरतेचा अभाव, कमकुवत पासवर्ड, आणि अद्ययावत सुरक्षा उपायांचा अभाव हे सायबर धोक्यांना आमंत्रण देतात. त्यामुळे सरकार आणि खाजगी क्षेत्राने कडक सायबर कायदे, एन्क्रिप्शन तंत्रज्ञान, आणि जनजागृती कार्यक्रम राबवणे आवश्यक आहे.

अशा प्रकारे, डिजिटल समाजांमध्ये सायबरसुरक्षा ही एक मोठी आव्हानात्मक बाब असून, तांत्रिक उपायांसोबतच सामाजिक आणि कायदेशीर दृष्टिकोनातूनही ती हाताळणे गरजेचे आहे.

मुख्यशब्द: *सायबरसुरक्षा, डिजिटल समाज, डेटा चोरी, ओळख चोरी, फिशिंग, ransomware, malware, इंटरनेट सुरक्षा*

प्रस्तावना:

या अभ्यासात आफ्रिकन व्यवसायांमधील सायबर सुरक्षेचा दृष्टिकोन शोधण्यात आला आहे. बदलत्या वातावरणातील समस्या आणि त्यातून बाहेर पडण्याचे मार्ग अधोरेखित करण्यात आले. सायबर गुन्ह्यांमुळे आफ्रिकन खंडाला दरवर्षी सुमारे १० अब्ज डॉलर्सचे नुकसान होत असल्याने सायबर सुरक्षा उपाययोजना मजबूत करणे आवश्यक आहे. अमेरिकेत १.३ दशलक्षाहून अधिक प्रमाणित सायबर सुरक्षा तज्ञांच्या तुलनेत आफ्रिकेत फक्त २०,००० प्रमाणित सायबर सुरक्षा तज्ञ असल्याने, अभ्यासात आफ्रिकन कंपन्यांची कमी जागरूकता आणि समजूतदारपणा यावर भर देण्यात आला आहे. अनुभवजन्य संशोधन आणि जगभरातील सायबर सुरक्षा निर्देशांकांवर आधारित, हा पेपर यशस्वी सायबर सुरक्षा उपायांमधील मुख्य अडथळ्यांचे विश्लेषण करतो, जसे की संसाधन मर्यादा, ज्ञानातील तफावत आणि अपुरे कायदेविषयक चौकटी. त्यात विसंगत पायाभूत सुविधा आणि भाषिक अडथळ्यांसह वास्तविक-जगातील अंमलबजावणी समस्यांचा देखील सखोल अभ्यास करण्यात आला आहे. या अहवालात सायबर सुरक्षा जागरूकता, तंत्रज्ञानाचा वापर आणि या समस्या कमी करण्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारीद्वारे सहकार्याला प्रोत्साहन देण्याचे सुचवण्यात आले आहे. या अभ्यासात आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) च्या वापरावरही प्रकाश टाकण्यात आला आहे, जो सायबर सुरक्षा संरक्षणात क्रांती घडवून आणत आहे आणि आफ्रिकेत सायबर सुरक्षेचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देत आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
चौगुले अश्विनी सतिश, सुशीलादेवी मल्हारराव देसाई कन्या महाविद्यालय, पेठ वडगाव

How to cite this article:
चौगुले. अश्विनी. सतिश. (2026). डिजिटल समाजांमध्ये सायबरसुरक्षा समस्या. Journal of Research and Development, 18(2(XXI)), 159–162. https://doi.org/10.5281/zenodo.19548272

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19548272

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

आफ्रिकन व्यवसाय गुंतागुंतीच्या सायबर सुरक्षा लँडस्केपवर वाटाघाटी करू शकतात, परिणामी अधिक विश्वासार्ह आणि सुरक्षित डिजिटल वातावरण आणि आर्थिक वाढीची प्रचंड क्षमता निर्माण होते.

संशोधनची उद्दिष्टे

- डेटा गोपनीय अनाधित कृत व्यक्तींना संवेदनाशी माहितीपर्यंत उदाहरणात बँक तपशील पासवर्ड पोहोचवण्यासाठी रोखणे या पद्धती समजावून घेणे.
- सायबर हल्ल्यापासून संरक्षण व्यवस्थेची सध्याची स्थितीचा अभ्यास करणे.
- कायदेशीर पालन डेटा संरक्षण कायदा या प्रणालीचा योग्य बाबींचा समावेश कसा करता येईल याचा आढावा घेणे.

संशोधन पद्धती

सदर संशोधनासाठी संशोधकांनी दुय्यम साधन सामग्री चा वापर केला आहे यामध्ये सायबर सुरक्षा संशोधन वरील लेख , पुस्तके, वर्तमान पत्रे , विकिपीडिया, सोशल मीडिया यांचा वापर केला आहे .

सायबरसुरक्षा समस्या

- फिशिंग आणि स्कॅम्स: बनावट ईमेल किंवा वेबसाइटद्वारे वैयक्तिक माहिती चोरी करणे .
- रॅन्समवेअर हल्ले: डेटा लॉक करून खंडणी मागणे.
- आयडेंटिटी थेफ्ट: सोशल मीडियावरून पासवर्ड आणि वैयक्तिक माहिती चोरणे .
- सुरक्षिततेचा अभाव: सार्वजनिक वाय-फाय चा वापर आणि कमकुवत पासवर्ड.

सायबर सुरक्षा सर्वोत्तम पद्धत

सायबरस्पेस सुरक्षित करणे विशेषतः अनेक घटकांमुळे कठीण आहे: जगातील कोठूनही दुर्भावनापूर्ण घटकांची ऑपरेट करण्याची क्षमता, सायबरस्पेस आणि भौतिक प्रणालींमधील दुवे आणि जटिल सायबर नेटवर्कमधील भेद्यता आणि परिणाम कमी करण्याची अडचण. सुरक्षित सायबरसुरक्षा सर्वोत्तम पद्धती अंमलात आणणे हे व्यक्तींसाठी तसेच सर्व आकारांच्या संस्थांसाठी महत्वाचे आहे. मजबूत पासवर्ड वापरणे, तुमचे सॉफ्टवेअर अपडेट करणे, संशयास्पद लिंक्सवर क्लिक करण्यापूर्वी विचार करणे आणि मल्टी-फॅक्टर ऑथेंटिकेशन चालू करणे हे आपण ज्याला "सायबर हायजीन" म्हणतो त्याचे मूलभूत घटक आहेत आणि तुमची ऑनलाइन सुरक्षितता लक्षणीयरीत्या सुधारेल. या सायबरसुरक्षा मूलभूत गोष्टी व्यक्ती आणि संस्था दोघांनाही लागू होतात. सरकारी आणि खाजगी संस्थांसाठी, व्यावसायिक ऑपरेशन्सचे संरक्षण आणि देखभाल करण्यासाठी अनुकूलित सायबरसुरक्षा योजना आणि प्रक्रिया विकसित करणे आणि अंमलात आणणे ही गुरुकिल्ली आहे. माहिती तंत्रज्ञान आपल्या समाजाच्या सर्व पैलूंशी अधिकाधिक एकत्रित होत असताना, व्यापक प्रमाणात किंवा उच्च-परिणामांच्या घटनांचा धोका वाढतो ज्यामुळे आपली अर्थव्यवस्था आणि लाखो अमेरिकन लोकांचे दैनंदिन जीवन ज्या सेवांवर अवलंबून आहे त्यांना हानी पोहोचवू शकते किंवा व्यत्यय आणू शकते.

सायबर घटनांच्या जोखीम आणि संभाव्य परिणामांच्या पार्श्वभूमीवर, CISA सायबरस्पेसची सुरक्षा आणि लवचिकता मजबूत करते, जे एक महत्त्वाचे गृह सुरक्षा अभियान आहे. CISA ऑपरेशनल लवचिकता, सायबर सुरक्षा पद्धती, बाह्य अवलंबित्वांचे संघटनात्मक व्यवस्थापन आणि मजबूत आणि लवचिक सायबर फ्रेमवर्कच्या इतर प्रमुख घटकांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या विविध सायबर सुरक्षा सेवा आणि संसाधने प्रदान करते. CISA व्यक्ती आणि संस्थांना सध्याच्या सायबर ट्रेंड आणि हल्ल्यांशी संवाद साधण्यास, सायबर जोखीम व्यवस्थापित करण्यास, संरक्षण मजबूत करण्यास आणि प्रतिबंधात्मक उपाय अंमलात आणण्यास मदत करते. प्रत्येक कमी केलेला धोका किंवा प्रतिबंधित हल्ला राष्ट्राची सायबर सुरक्षा मजबूत करतो.

आज सायबर सुरक्षा पदवीचे महत्त्व

१. विकसित होत असलेल्या सायबर धोक्यांशी लढणे

आपल्या जगातल्या प्रत्येक गोष्टीप्रमाणेच, सायबर गुन्हे देखील विकसित होत असतात. गुन्हेगार डिजिटल जागेत तुमच्या माहितीवर हल्ला करण्यासाठी सतत नवीन आणि अधिक प्रभावी मार्गाचा विचार करत असतात. उच्च प्रशिक्षित सायबर सुरक्षा व्यावसायिकांनी डिजिटल जागेत प्रवेश करणे, या धोक्यांचा अंदाज घेणे आणि त्याविरुद्ध कार्यक्षम संरक्षणात्मक उपाययोजना करणे ही काळाची गरज आहे. या व्यावसायिकांना शिकण्याची तहान असणे देखील आवश्यक आहे कारण त्यांना गुन्हेगारांपेक्षा कमीत कमी एक पाऊल पुढे राहण्यासाठी त्यांचे कौशल्य सतत अपग्रेड करावे लागेल. येथेच सायबर सुरक्षा पदव्या आणि कार्यक्रम या व्यावसायिकांना पुढील प्रशिक्षण देण्यात मदत करू शकतात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

२. सायबर हल्ल्यांपासून संरक्षण

तुम्हाला आयुष्यात एकदा तरी आरबीआयकडून "तुमचा सीव्हीव्ही किंवा ओटीपी कोणासोबतही शेअर करू नका" असा संदेश मिळाला असेल. सायबर धोक्यांपासून लोक सतत सावध राहावेत यासाठी बँकिंग आणि वित्तीय संस्थांकडून हा संदेश सक्रियपणे शेअर केला जातो. लोकांची वैयक्तिक बँकिंग माहिती शेअर करून फसवणूक केल्याचे किंवा ग्राहकांचे लॉगिन तपशील मिळवण्यासाठी वित्तीय संस्था हॅक केल्याचे असंख्य प्रकरणे आहेत. डिजिटल जागेत सायबर हल्ले हा सतत धोका आहे. या धोक्याचा सामना करण्यासाठी आणि डिजिटल जागेला वापरासाठी सुरक्षित बनवण्यासाठी सायबर सुरक्षेत प्रशिक्षित व्यावसायिकांची आवश्यकता आहे.

३. क्लाउड तंत्रज्ञानातील नवोपक्रम

क्लाउड तंत्रज्ञान हे आयटी क्षेत्रासाठी एक मोठे वरदान आहे. आज जगभरातील लाखो व्यवसाय डेटा आणि व्यवसायाशी संबंधित माहिती साठवण्यासाठी क्लाउड तंत्रज्ञानाचा वापर करतात. क्लाउड तंत्रज्ञान विकसित होत असताना, या तंत्रज्ञानावरील सायबर हल्ल्याची व्याप्ती देखील वाढत आहे. क्लाउड सेवा प्रदाते बऱ्यापैकी सुरक्षित असले तरी, कधीकधी त्यांच्याकडे मोठ्या सेवा प्रदात्यांचे सुरक्षा नियंत्रण नसते, ज्यामुळे ते सायबर हल्ल्यांना बळी पडतात. आपल्याला या जोखमींबद्दल जागरूक राहण्याची आणि जगभरातील क्लाउड तंत्रज्ञान प्रदात्यांमध्ये प्रमाणित सुरक्षा उपायांचा समावेश करण्याची आवश्यकता आहे.

४. वर्धित व्यवसाय ऑपरेशन्स

बहुतेक व्यवसाय त्यांच्या व्यवसायाचा मोठा भाग ऑनलाइन चालवतात. व्यवसाय ईमेल आणि डेटा शेअर करण्यासाठी, संशोधन करण्यासाठी आणि क्लाउड नेटवर्कवर डेटा साठवण्यासाठी इंटरनेटचा वापर करतात. सायबर सुरक्षेशिवाय, हे व्यवसाय ऑनलाइन हल्ल्यांना आणि महत्वाच्या माहितीच्या नुकसानास बळी पडतात. सतत आणि सुरक्षित व्यवसाय ऑपरेशन्स सुनिश्चित करण्यासाठी सायबर सुरक्षा पदवी ही एक मोठी वरदान आहे. फिशिंग घोटाळे, हॅक आणि रॅन्समवेअर हे डिजिटल स्पेसमधील व्यवसाय जगताचा एक भाग आहेत. म्हणूनच, या समस्यांना तोंड देण्यासाठी प्रशिक्षित सायबर सुरक्षा कर्मचारी असणे महत्वाचे आहे.

५. ग्राहक आणि कर्मचाऱ्यांचा विश्वास सुनिश्चित करणे

ग्राहक आणि कर्मचारी अपेक्षा करतात की व्यवसायांनी त्यांच्याकडे सोपवलेल्या कोणत्याही डेटाचे सायबर धोक्यांपासून संरक्षण करावे. हा विश्वास सुनिश्चित करण्यासाठी, व्यवसायांनी या डेटाचे संरक्षण करण्यासाठी संबंधित सायबर सुरक्षा उपायांची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. असे केल्याने व्यवसायाला ग्राहक आणि कर्मचाऱ्यांमध्ये त्यांची विश्वासार्ह स्थिती टिकवून ठेवण्यास मदत होईल. व्यवसायांनी फायरवॉल, एन्क्रिप्शन टूल्स आणि सुरक्षित पासवर्ड सक्षम करण्यात गुंतवणूक करावी. असे केल्याने कर्मचारी आणि ग्राहकांना दिसून येईल की व्यवसाय त्यांचा विश्वास राखण्यासाठी वचनबद्ध आहे.

६. कंपनीची कार्यक्षमता जपणे

सतत सायबर धोक्यांना बळी पडणाऱ्या कंपनीकडे आपला व्यवसाय वाढवण्यासाठी किंवा वाढवण्यासाठी वेळ नसतो. आपला व्यवसाय वाढवण्यासाठी, कंपनीने अखंडित कामकाज सुरु ठेवले पाहिजे. है तेव्हाच शक्य आहे जेव्हा तिचा ऑनलाइन डेटा आणि कार्ये सायबर हल्ल्यांपासून सुरक्षित असतील. सायबर हल्ला झाल्यास, सर्वात वाईट परिस्थितीत, त्यांना अंतराळात कृती आराखडा देखील आवश्यक असतो. अशा हल्ल्याला प्रतिसाद देण्यासाठी आणि त्यातून सावरण्यासाठी लागणारा वेळ बाजारात कंपनीची ब्रँड व्हॅल्यू मजबूत करण्यास मदत करू शकतो.

७. स्पर्धेत पुढे राहणे

बाजारपेठेत स्पर्धेत पुढे राहण्यासाठी व्यवसायाला सुरक्षित सायबरस्पेसची आवश्यकता असते. जो व्यवसाय सतत सायबर धोक्यांना आणि हल्ल्यांना तोंड देत असतो तो त्याचे ब्रँड मूल्य गमावतो, ज्यामुळे ग्राहकांचा बॅंडवरील विश्वास कमी होतो. याचा दीर्घकाळात त्यांच्या विक्री आणि नफ्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. म्हणूनच, सायबर हल्ल्यांबद्दल सकारात्मक दृष्टिकोन राखण्यासाठी त्यांना सायबर सुरक्षा तज्ञांची आवश्यकता असते. हे व्यावसायिक व्यवसायाला महत्त्वाचा डेटा सुरक्षित ठेवण्यास आणि स्पर्धेपासून त्याचे ब्रेड रहस्य सुरक्षित ठेवण्यास मदत करू शकतात.

सायबर सुरक्षा निष्कर्ष

1. मानवी घटक हा सर्वात मोठा धोका: बहुतेक सायबर हल्ले हे मानवी चुकांमुळे होतात, जसे की कमकुवत पासवर्ड, फिशिंग इमेल्स, आणि असुरक्षित लिंकवर क्लिक करणे.
2. ग्रामीण भागात धोका वाढता: स्वस्त स्मार्टफोनमुळे ग्रामीण भागात डिजिटल वापर वाढला आहे, परंतु सायबर साक्षरता कमी असल्याने तिथे फसवणुकीचे प्रमाण वाढत आहे.
3. विकसित होत असलेले धोके: सायबर गुन्हेगार नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत, ज्यात AI चा (Artificial Intelligence) वापर करून फसवणूक वाढली आहे, तसेच 'रॅन्समवेअर' सारखे हल्ले गंभीर आहेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

4. पायाभूत सुविधांसाठी जोखीम: वीज, आरोग्यसेवा, आणि बँकिंग यांसारख्या गंभीर प्रणाली डिजिटल झाल्यामुळे सायबर हल्ल्यांचा थेट परिणाम राष्ट्रीय सुरक्षेवर आणि व्यवस्थेवर होऊ शकतो.
5. सतत सतर्कता आवश्यक: सायबर सुरक्षा हा एक 'वन-टाइम' उपाय नसून, ती निरंतर चालणारी प्रक्रिया आहे, ज्यासाठी नियमित सॉफ्टवेअर अपडेट्स आणि 'सायबर स्वच्छता' आवश्यक आहे.
6. सामूहिक जबाबदारी: सायबर सुरक्षा केवळ IT विभागाची जबाबदारी नसून ती सरकार, खाजगी क्षेत्र आणि नागरिक अशा सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.
7. सायबर सिक्युरिटी पदवी ही उज्ज्वल करिअरसाठी एक उत्तम साधन असू शकते. नाशिकमधील बी.टेक इन सायबर सिक्युरिटी महाविद्यालये या क्षेत्रात उद्योगाशी संबंधित अनेक कार्यक्रम देत आहेत. आजच्या डिजिटल जगात सायबर सिक्युरिटी पदवीची प्रासंगिकता चांगली समजून घेण्यासाठी तुम्ही या महाविद्यालयांना भेट देऊ शकता. शुभेच्छा.

शिफारसी

1. सायबर साक्षरता मोहीम: डिजिटल साक्षरता वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मोहीम राबवणे आवश्यक आहे.
2. सुरक्षितता उपाय टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन (2FA) चा अनिवार्य वापर आणि नियमित डेटा बॅकअप घेणे .
3. कठोर कायदे सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी आणि शिक्षेसाठी कठोर धोरणे व अंमलबजावणी करणे .

संदर्भ

1. ओ'ब्रायन, जेए (१९९७). माहिती प्रणालींचा परिचय. रिचरुड डिरविन. https://www.amazon.com/Introduction-
2. ओनोडुगो, आयसी, आणि इटोडो, एसएम (२०१६). सायबर गुन्हे आणि नायजेरियन व्यवसाय वातावरण. नॅशनल जर्नल ऑफ ॲडव्हान्स्ड रिसर्च, २(२).
3. जागतिक आर्थिक मंच. (२०२३). सायबर गुन्ह्यांवर कारवाई करण्यासाठी आपल्याला जागतिक नियमांची आवश्यकता का आहे.
4. जागतिक आर्थिक मंच. (२०२३). जागतिक जोखीम अहवाल २०२३.
5. डोनोव्हन, बीसीएस, डॅनियल, एम., आणि स्कॉट, टी. (२०१६). संघीय सायबरसुरक्षा कार्यबल मजबूत करणे. ओबामा व्हाईट हाऊस.
6. Adeniran, AO, Oyeniran, GT, Adeniran, AA, आणि Mosunmola, MJ (२०२४). लॉजिस्टिक्समधील डिजिटायझेशन आणि नायजेरियातील शाश्वततेवर त्याचा परिणाम. डिस्कव्हरी, ६०(३३४), १–११.
7. एडेनिरन, एओ, सिद्दीक, ओबी, ओयेनिरन, जीटी, आणि एडेनिरन, एए (२०२४). ई-कॉमर्स लॉजिस्टिक्समध्ये डिजिटल परिवर्तनाचा शाश्वतता प्रभाव. मार्केटिंग एलिमेंट्समधील इनोव्हेशनचे आंतरराष्ट्रीय जर्नल,
8. अब्दुलकरिम, अमेरिका (२०१२). कानो महानगरातील सायबर गुन्ह्यांचा अभ्यास.
9. स्टेला अदेसिना, ओ., आणि व्याख्याता, एस. (२०१७). नायजेरियातील सायबर गुन्हे आणि गरिबी. कॅनेडियन सामाजिक विज्ञान, १३(४), १९–२९. www.cscanada.netwww.cscanada.org
10. रिबाडू, एन. (२००७). सायबर गुन्हे आणि व्यावसायिक फसवणूक: एक नायजेरियन दृष्टीकोन. जागतिक वाणिज्य कायद्यावरील UNCITRAL च्या चाळीसाव्या वार्षिक सत्राची कार्यवाही.
11. ओरजी, यूजे (२०१२). सायबरसुरक्षा कायदा आणि नियमन. वुल्फ लीगल प्रकाशक.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

एकात्मिक बालविकास सेवा कार्यक्रमात डॉ. ए. पी. जे. अब्दूल कलाम अमृत आहार योजनेची भुमिका : गडचिरोली जिल्हा

राहूल सोमा ठाकरे
संशोधन विद्यार्थी
Email: rahulthakare155@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180234
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 163-167
February- 2026

Submitted: 09 Jan. 2026
Revised: 19 Jan. 2026
Accepted: 06 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश:

एकात्मिक बालविकास सेवा कार्यक्रम (ICDS) भारत सरकारचे सर्वोत्तम बालकल्याण कार्यक्रम आहे, जो 1975 पासून राबिवला जात आहे. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश सहा वर्षापर्यंतच्या बालकांचा, गर्भवती महिलांचा आणि स्तनदा मातांचा आरोग्य आणि पोषण सुधारणे आहे. महाराष्ट्र सरकारने 2015 मध्ये डॉ. ए. पी. जे. अब्दूल कलाम अमृत आहार योजना सुरु केली, ज्या आदिवासी क्षेत्रातील गर्भवती आणि स्तनदा महिलांना गरम, पौष्टिक आहार पुरवते. गडचिरोली हा महाराट्रातील एक आदिवासी प्रधान जिल्हा आहे, यात उच्च दर कुपोषण आणि बाल मृत्यूदर आहे. या संदर्भात, अमृत आहार योजना बालविकास सेवा कार्यक्रमाचा अभिन्न अंग बनली आहे. गडचिरोली जिल्ह्यात महिलांचा आणि बालकांचा आरोग्य सुधारण्यात महत्वपूर्ण भुमिका बजावत आहे. या संशोधन लेखात एकात्मिक बालविकास सेवा कार्यक्रमात डॉ. ए. पी. जे. अब्दूल कलाम अमृत आहार योजनेची भुमिका, योजनेचे कार्यान्वयन, परीणाम आणि आव्हाने या बाबींचा सखोल अभ्यास केला आहे.

मुख्यशब्द: *कुपोषण निर्मूलन, बाल आरोग्य, मातृ पोषण, अंगणवाडी सेवा*

गडचिरोली जिल्ह्यातील सामाजिक, आर्थिक आणि आरोग्य परिस्थिती

जिल्ह्याचे भौगोलिक वैशिष्ट्ये :

गडचिरोली जिल्हा महाराट्राच्या उत्तरपूर्व भागात स्थित आहे आणि तेलंगाना व छत्तीसगढ राज्यांच्या सीमेने लगत आहे. या जिल्ह्याचे 76 टक्के भूखंड जंगली आणि टेकड्यांनी व्यापलेला आहे. जिल्ह्यातील 38.7 टक्के लोक अनुसूचित जमातीचे आहेत, तर 11.25 टक्के लोक अनुसूचित जातीचे आहेत. आदिवासी समुदायांचा मोठा भाग गडचिरोली जिल्ह्यात राहतो, यामुळे या क्षेत्रात विशेष सामाजिक आणि आर्थिक आव्हाने आहेत.

जिल्ह्यातील बहुसंख्य लोक दारिद्र्य रेषेखाली जगतात आणि जिवनावश्यक सुविधा जसे की अन्न, निवारा, वस्त्र आणि स्वच्छतेपासून वंचित आहेत. आरोग्य सेवा या क्षेत्रात अत्यंत दुर्बल घटक आहे, रुग्णालये दुर्लभ् आहेत आणि काही ठिकाणी अर्हता नसलेले डॉक्टर काम करत आहेत. या परिस्थितीमुळे गडचिरोली जिल्ह्यात माता मृत्यूदर, बाल मृत्यूदर आणि कुपोषण यांचे प्रमाण खूप जास्त आहे.

पोषनात्मक स्थिती आणि कुपोषणाचे प्रमाण

गडचिरोली जिल्ह्यात नंदूरबारच्या नंतर महाराष्ट्रातील दुसरा सर्वोच्च कुपोषणाचे प्रमाण आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
राहूल सोमा ठाकरे, संशोधन विद्यार्थी

How to cite this article:
ठाकरे, . राहूल . सोमा . (2026). एकात्मिक बालविकास सेवा कार्यक्रमात डॉ. ए. पी. जे. अब्दूल कलाम अमृत आहार योजनेची भुमिका : गडचिरोली जिल्हा. Journal of Research and Development, 18(2(XXI)), 163–167. https://doi.org/10.5281/zenodo.19548281

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19548281
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

2022 मध्ये जिल्ह्यात 7,111 कुपोषित बालकांपैकी 1,017 गंभीर कुपोषित (SAM) आणि 6,094 मध्यम कुपोषित (MAM) बालक होते. या बालकांचा विकास स्थिर होत होता आणि यांना गंभीर आरोग्य समस्यांचा सामना करावा लागत होता.

आदिवासी महिलांमध्ये अनेमियाचे (anemia) प्रमाण खूप व्यापक आहे, जवळ जवळ 65 टक्के आदिवासी महिलांमध्ये अनेमियाचे प्रमाण दिसून येते. यामुळे यांना गर्भधारणा आणि स्तनपानाच्या काळात अतिरीक्त समस्या निर्माण होत असतात.

गर्भावस्थेतील कुपोषण आणि स्तनपानाच्या काळात अपुरे पोषण यामुळे बाळांचे वजन कमी होत असे, त्यामुळे बाळाचा विकास प्रभावित होत असे. गडचिरोली जिल्ह्यात बहुतेक गर्भवती महिलांचा आहार केवळ अन्न, धान्य, पोळी आणि दाळीपर्यंत सिमीत असे, तर दुध, अंडी आणि मांसाहारी खाद्यांचा वापर खूप कमी असे.

एकात्मिक बालविकास सेवा कार्यक्रमाचे स्वरुप आणि उद्देश्य

- **ICDS कार्यक्रमाची सेवा आणि संरचना**

अंगणवाडी केंद्राद्वारे पुरवले जाणारी सेवा म्हणजे :

- **पोषणदायक आहार** – गर्भवती महिलांना, स्तनदायी महिलांना आणि सहा वर्षांपर्यंतच्या बालकांना पोषणदायक आहार दिला जातो.
- **प्राथमिक आरोग्य सेवा** – निमित आरोग्य तपासणी, टिकाकरण आणि संदर्भ सेवा.
- **शिक्षा** – प्राथिमिक शिक्षा आणि पूर्व-शाळा शिक्षा.
- **स्वच्छता आणि आरोग्य शिक्षा** – गर्भवती आणि स्तनदायी महिलांना आरोग्य आणि स्वच्छतेविषयी मार्गदर्शन
- **संदर्भ सेवा** – गंभीर आरोग्य समस्यांच्या बाबतीत उपचारासाठी संदर्भ सेवा

डॉ. ए. पी. जे. अब्दूल कलाम अमृत आहार योजनेची संरचना

- **योजनेचे स्वरुप आणि लाभार्थी**

डॉ. ए. पी. जे. अब्दूल कलाम अमृत आहार योजना महाराष्ट्र सरकारने नोव्हेंबर 2015 मध्ये सुरु केली. हि योजना महाराष्ट्रातील 16 आदिवासी जिल्हांमध्ये 105 बालविकास प्रकल्पाद्वारे राबिवली जाते. योजनेचे मुख्य लाभार्थी खालील प्रमाणे आहेत :

- **गर्भवती महिला** : गर्भधारणाच्या शेवटच तीन महिन्यापासून एक वेळ गरम, पौष्टिक आहार
- **स्तनदा माता** : प्रसूतीनंतरच्या पहिल्या सहा महिन्यापर्यंत एक वेळ गरम आहार.
- **बालके (6 महिने ते 6 वर्ष) :** अंडी, केळी यांसारखे पोषणदाक खाद्य पदार्थ वारंवार दिले जातात.

योजनेत दिलेल्या आहाराचे प्रकार आणि पोषण मूल्ये

अमृत आहार योजनेअंतर्गत दिलेल्या आहारमध्ये खालील घटक समाविष्ट असतात :

- **मुख्य आहार** : भाकरी, किंवा चपाती, तांदूळ, दाळ, कडधान्य
- **भाज्या :** हिरव्या पालेभाज्या, लाल भाज्या, कांदा, टोमॅटो, स्थानिक पालेभाज्या
- **प्रोटिन स्त्रोत :** उकडलेली अंडी, केळी, सोया, दूध
- **अतिरिक्त :** गुळ – मुंगफल्लीचे लाडू, अदांक हलवा, गुळ – शेंगदाने पापडी

प्रतिदिनच्या आहारमध्ये सुमारे 600-700 किलोकॅलरीज ऊर्जा आणि 18-20 ग्राम प्रोटिन असते, त्यामुळे गर्भवती आणि स्तनदा मातांची दैनिक पोषण गरज 40 टक्के पर्यंत पुर्ण होते.

डॉ. ए. पी. जे. अब्दूल कलाम अमृत आहार योजना Take Home Ration (THR) योजनेच्या जागी आली आहे. THR योजनेत सूखे खाद्य पदार्थ जसे की सुखडी, शिरा आणि उपमा पॅकेट दिले जात होते, परंतु अमृत आहार योजनेत गरम, ताजे शिजविलेले आहार दिला जातो.

अंगणवाडी सेवा आणि कार्यान्वयन यंत्रणा

- **अंगणवाडी सेविकेची भुमिका**

अंगणवाडी कार्यकर्ता (AWW) ICDS कार्यक्रमाचा मेरुदंड असते. अंगणवाडी कार्यकर्त्यांची निवड स्थानिक गावातून करण्यात येत असते. आणि यांना अंगणवाडी केंद्रातून बालकांना आणि महिलांना सेवा पुरविण्याचे दायित्व असते. अमृत आहार योजनेअंतर्गत अंगणवाडी कार्यकर्ताचे प्रमुख काम म्हणजे:

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

- **भाज्या आणि इतर सामग्री खरेदी करणे :** प्रतिदिन ताजी भाज्या आणि इतर पदार्थ खरेदी करणे.
- **आहार तयार करणे**: प्रतिदिन गरम आहार तयार करणे.
- **आहार वितरण :** लाभार्थ्यांना आहार पुरिवणे आणि याची नोंद ठेवणे.
- **आरोग्य शिक्षा :** गर्भवती आणि स्तनदा महिलांना पोषण आणि आरोग्य विषयी मार्गदर्शन देणे.
- **निरीक्षण आणि अहवाल :** महिलांच्या आरोग्य स्थितीचे निरीक्षण करणे आणि विस्तृत अहवाल तयार करणे.

अंगणवाडी कार्यकर्ताना मासिक 4.500 रुपये सन्मानार्थ मिळते, तर अमृत आहार योजनेअंतर्गत स्वयंपाकी महिला यांना अतिरीक्त 1000 रुपये प्रतिमास दिले जातात. तथापि, अंगणवाडी कार्यकर्ताचे काम अयंत विविध आणि भारी असते, यामुळे यांना अनेक आव्हानांना समोरे जावे लागते.

गडचिरोली जिल्ह्यात अमृत आहार योजनेचे कार्यान्वयन

- **सामुदायिक सहभाग आणि VHSNC/Mata Samiti**

अमृत आहार योजनेच्या सफल कार्यान्वयनसाठी सामुदायिक सहभाग अत्यंत महवाचा आहे. गडचिरोली जिल्हामध्ये Community Action for Nutrition (CAN) प्रक्रिया राबिवली जाते, ज्यात स्थानिय समुदाय, गांव स्वच्छता व पोषण समिती)VHSNC) आणि माता समिती (Mata Samiti) सक्रिय भुमिका बजावतात. या समितीचे काम म्हणजे :

- **जागरुकता वाढिवणे** : महिलांना पोषण, आरोग्य आणि स्वच्छतेविषयी जागरुकता वाढिवणे.
- **निरीक्षण :** अंगणवाडी कद्रांचे नियमित निरीक्षण करणे.
- **समस्या निवारण :** अंमलबजावणीमध्ये येणारी समस्या दूर करणे.
- **प्रतिक्रिया :** सरकारी अधिकाऱ्यांना समस्या आणि सुझाव संप्रेषित करणे.

पहिल्या 1000 दिवसांचे महत्व

- **गर्भधारणा आणि स्तनपान या काळातील पोषण**

बालकाच्या जन्मापूर्वी नऊ महिने आणि जन्मानंतरचे 23 महिने - असे 1000 दिवस बालकाया विकासात अयंत महवाचे असतात. या काळात बालकांचे मेंदू सर्वाधिक गतीने विकसित होते. गर्भधारणाच्या चौथ्या आठवड्यात मेंदूमध्ये 10,000 पेशी असतात, तर 24 व्या आठवड्यात हे 10 अरब पेशी होतात. या काळात बालकांचा मेंदू 40 टक्केहून अधिक विकसित होतो.

गर्भवती महिलांचे पोषण बालकाच्या विकासावर प्रत्येक्ष परिणाम करतो. पुरेसा प्रोटिन, कॅलोरीज, जस्त (zinc), लोह (iron), फोलिक □सिड आयोडिन आणि अन्य पोषक तत्वांची कमतरता बाळांचे वजन कमी होऊन जन्मते, संज्ञानात्मक कमजोरी आणि दिर्घकालीन आरोग्य समस्यांचे कारण बनते.

स्तनपानाच्या काळात गर्भवती महिलांचा आहार अधिक महवाचा असतो, कारण दूध निर्माण करण्यासाठी अतिरीक्त कॅलोरीज आणि पोषक तवांची आवश्यकता असते. गडचिरोली जिल्ह्यात अनेक स्तनदा महिलांचा आहार अपुरा असे, ज्यामुळे त्यांचे दूध कमी होते आणि बालकांचे पोषण प्रभावित होते.

अमृत आहार योजनेचे परिणाम

- **मातृ आणि बाल आरोयावर प्रभाव**

अमृत आहार योजनेच्या कार्यान्वयनानंतर गडचिरोली जिल्ह्यात सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत :

- **कुपोषणात जमावेळी कमी** : गडचिरोली जिल्ह्यात खास आहार कार्यक्रमाद्वारे गंभीर कुपोषित बालकांमध्ये 50.14 टक्के सुधार झाला. 6 महिन्यात 1,017 SAM बालकांपैकी 513 बालक कुपोषण मुक्त झाले.
- **जन्मावेळी वजन :** गर्भवती महिलांना अमृत आहार योजना देण्यानंतर जन्मावेळी बाळांचे वजन वाढले आहे.
- **मातृ आरोग्य :** अंगणवाडी सेवा मजबूत केल्यानंतर गडचिरोली जिल्ह्यात गर्भवती महिलांना ANM (सहायक नस धाई), ASHA कार्यकर्ता आणि अंगणवाडी सेविका यांनी घरपोच भेट (joint home visits) दिल्यास मातृ आरोग्य सेवांचे व्यापन वाढले.
- **बालमृत्यू दर :** गडचिरोली जिल्ह्यात होम-बेस्ड नवजात देखभाल हस्तक्षेप कार्यक्रमाद्वारे नवजात मृत्यूदर 62 टक्केने कमी झाला.

खाद्य सुरक्षा व आहार विविधता

अमृत आहार योजना Take Home Ration योजनेच्या तुलनेत अधिक प्रभावी आहे. कारण :

- **ताजे आहार :** गरम, ताजे शिजविलेले आहार THR योजनेतील सुक्ष्म, अक्षरशा खराब अवस्थेत असलेले पॅकेट यापेक्षा चांगले असते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

- **पोषक मुल्ये :** अमृत आहारमध्ये भाज्या, दाळ, अंडी, दूध यांचा समन्वय असल्याने THR योजनेच्या तुलनेत पोषण मुल्ये जास्त असते.
- **अवशेषण (Spoilage) कमी :** गरम आहार देणे म्हणून THR योजनेतील खराब होणे आणि अयोग्यता मुळे नुकसान नाही.
- **पारिवारीक वापर दुरुस्त करणे** : अमृत आहार योजनेत आहार अंगणवाडी केंद्रावर खावा लागतो (कमीत कमी अंशतः), यामुळे घरातील इतर कुटुंबियांना आहार मिळणार नाही या समस्येचे समाधान होते. THR योजनेत सुक्ष्मांनी घराला आणून घरातील इतरांसह शेअर केल्याने गर्भवती महिलेला योग्य आहार मिळत नाही.

अंमलबजावणीतील आव्हाने आणि समस्या

- **निधीचा अभाव आणि विलंब**

अमृत आहार योजनेच्या कार्यान्वयनात मुख्य अडचण म्हणजे निधीचे अभाव आणि याचे समयोचित मिळणे. अनेक तालूक्यांमध्ये अंगणवाडी केंद्रांना योजनेसाठी आवश्यक निधी काही महिन्यांपंत मिळत नाही, यामुळे सेविकांना भाज्या खरेदी करणे असंभव होते. कळवण तालूक्यात 2024 मध्ये हे समस्या गंभीर होती आणि अनेक अंगणवाडीमध्ये योजना तात्पूरती थांबिवली गेली होती.

- **आहाराचे प्रकार आणि गुणवत्ता**

अनेक ठिकाणी अंगणवाडी सेविका अनेक कारणास्तव अंडी आणि दूध प्रदान करत नाहीत, यामुळे आहाराचे पोषक मूल्ये कमी होते. अनेक ठिकाणी प्रतिदिन हिच भाज्या वापरली जातात, यामुळे आहारात एकरुपता येते आणि लाभार्थ्यांना आहार उचकत देखील नाही. गडचिरोली जिल्ह्यात विविध संस्थांचे सर्वेक्षण केल्यानंतर असे दिसून आले की भाज्यांची विविधता, खाद्य सुरक्षा, आणि आहाराचे ताजेपण यांमध्ये सुधारणा आवश्यक आहे.

सुधारणा सूचना

- **VHSNC आणि अन्य समितींची भुमिका**

आरमोरी तालूक्यामध्ये केलेल्या अभ्यासामध्ये असे सुझाव दिले गेले आहे की Village Health Sanitation & Nutrition Committee (VHSNC) सदस्यांचे काम सामायिक केले जावे. VHSNC सदय:

- भाज्या खरेदीमध्ये मदत करु शकतात.
- आहार तयार करणे आणि वितरणात सहाय्य करु शकतात.
- निरीक्षण आणि निरीक्षणात भुमिका बजावू शकतात.

यामुळे अंगणवाडी कार्यकर्ताचे भार कमी होईल आणि योजनेचा कार्यान्वयन अधिक सुरळीत होईल.

प्रशिक्षण आणि क्षमता विकास

अंगणवाडी कार्यकर्ताना अधिक प्रशिक्षण दिले जावे, विशेषत :

- **पोषण शिक्षा :** गर्भवती आणि स्तनदा महिलांना पोषण विषयी पट मार्गदर्शन.
- **आहार तयारी :** विविध भाज्या आणि खाद्यांचा उपयोग करुन पौष्टिक आहार तयार करणे.
- **आरोग्य सेवा :** बेरीबेरी, अरक्तता, कमकसरी अवथा यांची प्राथमिक स्वरुपाची ओळख.
- **सामुदायिक गती :** महिलांसह संवाद साधण्याचे कौशल्य.

निकर्ष

डॉ. ए पी जे अब्दूल कलाम अमृत आहार योजना एकात्मिक बालविकास सेवा कायक्रमाचे एक महत्वपूण अंग बनली आहे, विशेषतः गडचिरोली जिल्ह्यासारख्या आदिवासी प्रभावी क्षेत्रामध्ये योजनेचे मुख्य सकारामक पहलू म्हणजे :

- **गरम पौष्टिक आहार :** THR योजनेच्या तुलनेत अधिक प्रभावी आणि स्वास्थकारी.
- **महिला संतुष्टी :** गर्भवती आणि स्तनदा महिलांचे संतुष्टी योजनेने वाढिवले आहे.
- **कुपोषण दर:** कुपोषित बालकांमध्ये 50 टक्केहून अधिक सुधार आलेला आहे.
- **सामुदायिक सहभाग:** VHSNC, Mata Samiti यांचे सक्रिय सहभाग योजनेला शक्तीशाली करत आहे.

तथापि, योजनेच्या सफलतेसाठी अनेक सुधारणा करणे आवश्यक आहे:

- **निधीची नियमित मिळती :** अंगणवाडी केंदांना समयोचित आर्थिक सहाय्यता देणे.
- **अंगणवाडी कार्यकर्ताचे समर्थन :** यांचे अतिरीक्त काम कमी करणे आणि सहाय्यक नियूक्ती करणे.
- **सामुदायिक जागरुकता :** आदिवासी समुदायांमध्ये पोषण आणि आरोग्य शिक्षा.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

- **गुणवत्ता नियंत्रण** : वितरीत आहाराच्या गुणवत्तेचे नियमित तपास.

याशिवाय, योजनेचा सफल कार्यान्वयन करण्यासाठी स्थानिय पंचायत, VHSNC, आंतरजातीय संस्था)NGO) आणि सरकारी यंत्रणा यांचे एकात्मिक प्रयत्न आवश्यक आहेत. केवळ सरकारी स्तरावरुन येणारे अर्थ आणि नीतिच नाही, तर स्थानीय समुदाय, विशेषतः महिला, आणि यंत्रणेचा दृढ निश्चय महत्वपूर्ण आहे. गडचिरोली जिल्ह्यातील अनुभव दाखविते की Community Action for Nutrition (CAN) प्रक्रियेद्वारे कुपोषण, मातृ मृत्यू आणि बाल मृत्यू यांमध्ये लक्षणीय सुधार येतो आहे.

अंतिमत, डॉ. ए पी जे अब्दूल कलाम अमृत आहार योजना भारतातील आदिवासी क्षेत्रांमध्ये कुपोषण दूर करण्यासाठी एक प्रभावी तंत्र ठरु शकते, जर यांचे योग्य अर्थापन, प्रशिक्षण आणि सामुदायिक समर्थन केले गेले. गडचिरोली जिल्ह्यातील अनुभव आणि सीख महाराट्रातील इतर जिल्हांमध्ये आणि देशभरातील अन्य राज्यांमध्ये या योजनेचा विस्तार करण्यात उपयोगी ठरु शकते.

संदर्भ ग्रंथ सुची

1. CBGA (2017). Towards A Nutrition-Sensitive Tribal Sub-Plan: India's Investment in Nutrition.
2. Government of Maharashtra. (2015). Bharat Ratna APJ Abdul Kalam Amrut Yojana. Maharashtra State Official Documentation.
3. Gopalakrishnan, L., et al. (2025). Factors associated with Anganwadi Workers' service delivery. PLoS One, 20(7), e0326971.
4. Kawalkar, U., et al. (2024). People's Health in People's Hands: Dr. Abhay Bang and the Gadchiroli Model. Journal of Global Health, 14(2), 08006.
5. Kinshella, M. L. W., et al. (2020). The missing focus on women's health in the First 1000 Days approach. Maternal and Child Nutrition, 16(4), e12787.
6. Madankar, M., et al. (2024). Exploring Maternal and Child Health Among Tribal Populations in India. Journal of Global Health Reports, 8.
7. Narnaware, D. G. (2021). A comparative study: Dr. APJ Abdul Kalam amrut ahar yojana and take home ration scheme, Armori block, Gadchiroli, Maharashtra. International Journal of Community Medicine and Public Health, 8(8), 3895-3900.
8. Raj, S., et al. (2021). Maternal dietary diversity during lactation and associated factors in tribal areas. Journal of Public Health and Epidemiology, 13(8), 298-308.
9. Shanthi, S. D., et al. (2024). Impact of integrated child development scheme on nutritional and health outcomes. Maternal and Child Nutrition, 20(8), e12342.
10. Tata Trusts. (2021). Project Spotlight - Gadchiroli: Endline Report on Key Indicators. Strengthening ICDS in Tribal Districts of Maharashtra.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

कृषी अर्थशास्त्र आणि ग्रामीण उपजीविका

श्वेता धनाजी पाटील
सुशीला देवी मल्हारराव देसाई कन्या महाविद्यालय पेठ वडगाव
Email: patilshweta7747@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180235
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 168-171
February- 2026
Submitted: 09 Jan. 2026
Revised: 19 Jan. 2026
Accepted: 06 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

उत्पादकता भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेती क्षेत्राला महत्व असून हे महत्व लक्षात घेता शेतीची वाढविण्यासाठी शेतीचा विकास करण्याच्या दृष्टिने सन १९६५-६६ मध्ये शेती क्षेत्रात नवीन कृषी व्यूहरचना राबविण्यात आल्या. त्याचा परिणाम शेती क्षेत्रात 'हरितक्रांती' घडून आली. अधिक उत्पादनक्षम जातीच्या बि-बीयाणांचा वापर रासायनिक, खताचा वापर जलसिंचन, कीटकनाशके औषधी व पीक संरक्षण इत्यादीवर भर देण्यात आल्यामुळे प्रमुख पिकांच्या क्षेत्रात व उत्पादनात बदल घडून आहे. शेती क्षेत्रातील या बदलांचा परिणाम अर्थव्यवस्थेवर झाला आहे. आले संपूर्ण

मुख्यशब्द: *कृषी अर्थशास्त्र, ग्रामीण उपजीविका, शेती उत्पादनक्षमता, शाश्वत शेती, कृषी बाजारपेठ, लघु व सीमांत शेतकरी*

प्रस्तावना

भारत देश हा कृषी प्रधान देश असून रोजगार पुरविण्याऱ्या क्षेत्राच्या तुलनेत अग्रेसर आहे. शेती क्षेत्रामधूनच सर्व उद्योगांना कृषी क्षेत्र ही सर्व उद्योगांची जननी आहे. मानवी जीवनासाठी पोषक तसेच प्रगत समृद्धीचे प्रतीक समजली जाते. कोणत्याही राष्ट्राचा आर्थिक विकास साधायचा असल्यास त्यात प्रथम कृषी व कृक्षीवर आधारित उद्योगांचा विकास करावा लागतो. कारण शेती हीच सर्व उद्योगांचा पाया आहे. आज ही उपजिवीकेचे साधन तसेच उत्पन्नाचे स्त्रोत आहे. जगातील सर्व विकसीत राष्ट्रांनी प्रथम कृषी क्षेत्राचा विकास करून औद्योगिक विकास केलेला आहे. त्यात इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, जर्मनी, रशिया तसेच जपान यांच्या विकासात कृषीचे मोठे योगदान आहे. कृषी क्षेत्र हे जगातील सर्वाधिक लोकसंख्येचे जगातील पहिला व्यवसाय शेती हाच असून प्रकृती आणि मनुष्य एकत्र आल्यानंतर तो निर्माण झाला. पंचमहाभूतांच्या लक्षावधी वर्षाच्या साठलेल्या उर्जा माणसाच्या श्रमाचा स्पर्श होताच गुणाकार करीत फळाला येतात. एका दाण्यातून शंभर दाणे तयार होण्याचा चमत्कार शेतीतच होतो. संपूर्ण जगाला अन्नधान्य पुरविण्याची क्षमता भारतभूमीत असूनसुद्धा भारतातीलच नागरिक अर्धवेळ उपाशी राहून झोपत असेल तर ते आपल्या देशाचे दुर्दैवच म्हणावे लागेल. भारत हा कृषीप्रधान देश असून ५२.२ प्रतिशत लोकसंख्या प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या कृक्षी क्षेत्रावर उदरनिर्वाहासाठी अवलंबून आहे. या क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व लक्षात घेता स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने शेती क्षेत्रातील गुंतवणूकीस प्रोत्साहन देवून त्यात वाढ केलेली आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये

१. भारतीय शेतीच्या उत्पादकतेचा शेतकरी वर्गावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.
२. निसर्गाचा व पीक रचनेतील बदलांचा शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर झालेल्या प्रभावांचा अभ्यास करणे. आज कृषीसंशोधनामुळे मिश्र शेतीचा विस्तार ही वाढताना दिसून येतो आहे.

नवी तरुण पिढीही आज कृषी संशोधानातून एकूण आपली शेती व्यवस्था व शेतकरी यांच्या जीवनमानाचा, राहणीमानाचा दर्जा उंचवावा या दृष्टीने प्रयत्नशील असलेली दिसून येते.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
श्वेता धनाजी पाटील, सुशीला देवी मल्हारराव देसाई कन्या महाविद्यालय पेठ वडगाव

How to cite this article:
पाटील. श्वेता. धनाजी. (2026). कृषी अर्थशास्त्र आणि ग्रामीण उपजीविका. Journal of Research and Development, 18(2(XXI)), 168–171. https://doi.org/10.5281/zenodo.19548321

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19548321
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

माती परीक्षण, हवामानाचा अंदाज, पाण्याची उपलब्धता व नियोजन, कमी काळात, कमी वेळात, शरीराला पोषक अन्नद्रव्ये असणारी पिके, मानवी आरोग्य, बाजारपेठेतील अस्थिरता लक्षात घेऊन बाजारपेठेत चांगला भाव मिळणारी पिके, कोरडा व ओला दुष्काळ त्या अनुषंगाने असणाऱ्या विविध योजना, सेंद्रिय शेती, स्थानिक वातावरणात तग धरणारी व जास्त उत्पादकता, उत्पन्न मिळून देणारी पिके, बी बियाणांची उपलब्धता, जमीन व पिकांचे योग्य संगोपन या बाबींचाही विचार आता नव्याने संशोधनात होत आहे.

शेतीची उत्पादकता व पीक रचनेतील बदल

'शेतीची उत्पादन देण्याची क्षमता म्हणजे शेतीची उत्पादकता होय' ही उत्पादकता दर हेक्टरी, दर माणशी आणि दर भांडवली परिमाणाबरोबर शेतीचे उत्पादन जास्त असते तेव्हा शेतीची उत्पादकता जास्त असते. याउलट जेव्हा उत्पादन कमी असते तेव्हा उत्पादकता कमी असते. शेती उत्पादनात वाढ करण्यासाठी शेतीची उत्पादकता महत्त्वाची ठरते. ज्या देशात मोठ्या प्रमाणावर पडीक जमीन उपलब्ध आहे. त्या देशात विस्तृत पद्धतीने शेती केली जाते. मर्यादित क्षेत्र असलेल्या देशात सखोल लागवड पद्धतीने शेती केली जाते. यामध्ये शेतीची उत्पादकता महत्त्वाची ठरते. ज्या ठिकाणी शेत जमिनीची उत्पादकता जास्तः तिथे कमी श्रम भांडवलाच्या साहाय्याने जास्त उत्पादन तर शेतीची उत्पादकता कमी तेथे श्रम भांडवलाच्या साहाय्याने फारसे उत्पादन होत नाही. अर्थात शेतीतील उत्पादन आणि शेतीची उत्पादकता यामध्ये फरक आहे.

शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी लागणाऱ्या गोष्टीमध्ये प्रथम 'सुपीक जमीन' आणि नंतर पाणी लागते. शेतीला मुबलक 'पाणी' असेल तर शेती करणे शक्य आहे. तिसरी आवश्यक गोष्ट म्हणजे 'मनुष्य बळ' हे मुबलक प्रमाणात असले की, शेतकरी शेतातील पिकांची निगा राखू शकतो. चौथे म्हणजे शेतीकरिता लागणारा पैसा आणि शेवटी जेथे तो त्याचा उत्पादित शेतमाल विकतो ती 'बाजारपेठ' विकसनशील देशात वाढत्या लोकसंख्येची, अन्नधान्याची तसेच विविध अशा सर्व उद्योगांना लागणाऱ्या कच्च्या मालाची गरज शेती हे क्षेत्र पूर्ण करते. तसेच अनेक उद्योगांना कच्चा माल पुरविण्याचे कार्य कृषी क्षेत्राकडूनच होते. यात सुती कापड, साखर, ताग, बिडी, सिगारेट, वनस्पती तेल इत्यादी प्रक्रिया करणारे उद्योगही शेती क्षेत्रावर अवलंबून आहेत. उद्योगात तयार होणारे कृषी अवजारे, खते, पाईप, कीटकनाशके, ठिबक सिंचन यंत्र, मळणी यंत्र, ट्रॅक्टर इत्यादी वस्तूंना मागणी निर्माण होऊन संबंधित उद्योगांच्या विकासात भर पडते. भारतीय शेती कृषी उदरनिर्वाहाचे व रोजगाराचे प्रमुख साधन आहे. भारतातील ग्रामीण लोकांचा शेती हाच मुख्य व्यवसाय असून यात ज्यांच्याकडे शेती आहे. ते आपल्या शेतात काम करतात आणि ज्यांच्याकडे नाही ते दुसऱ्यांच्या शेतात जाऊन आपला उदरनिर्वाह भागवितात. त्याप्रमाणे भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात शेती व्यवसायाचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. भारताच्या एकूण निर्यातीत ५० टक्के वाटा हा शेती क्षेत्राचा होता. त्या प्रामुख्याने मसाल्याचे पदार्थ, चहा, कॉफी, तंबाखू आणि तेलबिया इत्यादी समावेश होतो.

शेती उत्पादकतेचा अर्थ व मापनाच्या पद्धती

१. शेत जमिनीची दर हेक्टरी उत्पादकता

शेतजमिनीची दर हेक्टरी उत्पादन देण्याची क्षमता म्हणजे हेक्टरी उत्पादकता होय. भारतासारखा विकसनशील देशात शेतजमिनीची दर हेक्टरी उत्पादकता नियोजनानंतर मोठ्या प्रमाणात वाढली असली तरी इतर देशांतील शेतीच्या उत्पादकतेशी, भारतीय शेतीच्या उत्पाकतेची तुलना केल्यास सापेक्षतेने भारतीय शेतीची उत्पादकता कमी असल्याचे दिसून येते.

२. शेतजमिनीची दर माणशी उत्पादकता

शेतजमिनीची प्रत्येक शेतमजुरामागे उत्पादन देण्याची क्षमता म्हणजे दर माणशी उत्पादकता होय. भारताची दर माणशी उत्पादकता देखील इतर देशांच्या मानाने कमी आहे

३.शेतजमिनीची दर भांडवली उत्पादकता :

जेव्हा देशामध्ये पडीक जमीन उपलब्ध नसते तेव्हा श्रम व भांडवलाच्या अधिकच्या मात्रा लावून जास्तीत जास्त उत्पादन घेण्याचा प्रयत्न केला जातो. शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. यासाठी भांडवलाची आवश्यकता असते.

शेती उत्पादकतेचे निर्धारक घटक:

१. धारण क्षेत्राचा आकार

धारण क्षेत्राचा आकार आणि शेतीची उत्पादकता यातील संबंधाबाबत अर्थशास्त्रज्ञांमध्ये एकमत नाही. काहींच्या मते धारण क्षेत्राचा आकार जसजसा वाढतो तस तशी उत्पादकता कमी कमी होत जाते. याउलट धारण क्षेत्राचा आकार वाढला तेंव्हा शेतीची उत्पादकतासुद्धा वाढते. डॉ. अमर्त्य सेन यांच्या मतानुसार शेतजमिनीचा आकार लहान असेल तर उत्पादकता जास्त असते. याउलट धारण क्षेत्राचा आकार मोठा असल्यास शेतजमिनीची उत्पादकता कमी असते. अशा प्रकारे विचारांमध्ये मतभेद असले तरी शेतीच्या अधिक उत्पादकतेसाठी धारण क्षेत्राचा आकार पर्याप्त असणे आवश्यक आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

२. जमिनीची पोत

जमीन जेवढी सुपीक असेल तेवढी त्या जमिनीची उत्पादकता जास्त असते. काही ठिकाणी निसर्गतः जास्त असते तर काही ठिकाणी कमी असते. अर्थात पोत कमी असली तरी खतांचा योग्य वापर, पिकांमधील बदल व जैविक तंत्रज्ञानाच्या आधारे ती वाढविता येणे शक्य आहे.

३. जलसिंचनाच्या सुविधा

जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध असल्यास वर्षातून दोन-तीन पिके घेता येतात. कमीत-कमी जमिनीमधून जास्तीत जास्त पिके घेता येतात. परिणामतः शेतीची उत्पादकता जास्त राहते. याउलट सिंचनाची व्यवस्था नसेल तर शेतकऱ्यांना मान्सूनच्या लहरीपणावर अवलंबून राहावे लागते. शेतीमध्ये अनिश्चितता निर्माण होते आणि शेतीची उत्पादकता घटते.

४. कृषी आदानांची उपलब्धता

कृषी उत्पादनासाठी सुधारित बि-बियाणे, उत्तर खते, कीटकनाशक जंतूनाशके आणि इत्यादी साधनसामग्रीची गरज असते. ही आदाने योग्य वेळी उपलब्ध असतील तर शेतीची उत्पादकता जास्त असते, अन्यथा ती कमी असणे, शेणखत व कंपोस्ट खतांचा वापर केल्यास शेतीची उत्पादकता सुधारते.

५. उत्पादन तंत्र

शेतीमध्ये आधुनिक कृषी तंत्रज्ञानाच्या वापराने शेतीची उत्पादकता जास्त असते. याउलट परंपरागत उत्पादन तंत्र स्वीकारण्यास शेतीची उत्पादकता कमी असते. इंग्लंड, जपान, अमेरिकेसारख्या प्रगत देशात आधुनिक क्ष्की तंत्रज्ञानाचा वापर केला जात असल्यामुळे शेतीची उत्पादकता जास्त आहे.

६. शेतीवर अतिरिक्त लोकसंख्येचा भार

कृषी क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या खूप जास्त असेल तर शेतीची उत्पादकता कमी असते. कारण या जास्त लोकसंख्येचा भार शेती सहन करू शकत नाही.

पीक रचना

"विशिष्ट वेळी विविध पिकांच्या लागवडीखाली एकूण क्षेत्राचे किती प्रमाण वाटले गेले आहे याची रचना त्या भागातील पीक पद्धती दर्शविते. पिकांचे वेगवेगळे गट पाडले जातात. अन्नधान्याची पिके, अन्नधान्य सोडून इतर नगदी पिके इत्यादी विशिष्ट वेळेस लागवडीच्या एकूण क्षेत्रापैकी किती प्रमा अन्नधान्याच्या पिकाखाली किती प्रमाण इतर पिकाखाली आहे. यावरून पिकरचना लक्षात बदलले तर पिकरचना बदलली असे म्हणतात.

पिकरचनेवर परिणाम करणारे घटक

अ) नैसर्गिक घटक

विशिष्ट प्रदेशामध्ये कोणती पीक पद्धती अस्तित्वात येईल ही गोष्ट तेथील जमिनीचा दर्जा, हवामान, पर्जन्यमान यासारख्या नैसर्गिक घटकावर अवलंबून असते. जेथे काळी कसदार जमीन आहे. तेथे अनेक पिके घेता येतात. परंतु रेताड जमिनीत कोणत्या प्रकारची पिके घ्यायची याबाबत निवड करायला फारसा वाव नसतो. तसेच ज्या प्रदेशात कमी आणि अनिश्चित स्वरूपाचा पाऊस पडतो तेथे ज्वारी, बाजरी यासारखी पिके जास्त घेतली जातात. उलट पर्जन्यमान जास्त व निश्चित असल्यास धान, ऊस, तंबाखू अशी पिके घेता येतील, सिंचनाच्या सोयीमुळे घडून आलेला बदल पिकरचनेत महत्त्वाचा असतो. पर्जन्यमानानुसार पीक प्रकार ठरतो हे खरे आहे. परंतु कमी पावसाच्या प्रदेशातसुद्धा कृत्रिम पाणीपुरवठ्याच्या सोयी करून विविध पिके घेता येतात. उदा. ज्वारीच्या ऐवजी कापसाची लागवड होऊ शकते. तसेच पाणीपुरवठ्यामुळे एकापेक्षा जास्त पिके घेणे शक्य होते. उत्पादनाचे कार्यक्षेत्र तंत्र, रासायनिक खतांचा वापर या द्वारेसुद्धा भौतिक घटकांच्या मर्यादा बदलता येतात. अर्थात हा बदल घडवून आणणे काही प्रमाणात शक्य असते. शेवटी निसर्गाच्या रचनेत आमुलाग्र परिवर्तन करणे माणसाला शक्य होत नाही.

ब) आर्थिक घटक

पीक पद्धती प्रभावित करण्यामध्ये आर्थिक घटकांची भूमिका महत्त्वपूर्ण असते. यामध्ये विविध वस्तूंच्या किंमती व त्यात होणारे बदल, उत्पन्नाचा विचार, शेताचा आकार, जोखीम इत्यादी घटक समाविष्ट आहेत.

1. शेतमालाच्या आणि आदानांच्या किंमती हा घटक जास्त प्रभावशाली असतो. शेतमालाची किंमत अस्थीर असेल, जे पीक घेतले त्या पिकाला योग्य भाव नसेल तर ते उत्पादन न घेण्याची प्रवृत्ती राहील. भारतामध्ये कापसाची किंमत कमी राहिल्यामुळे कापसाची लागवड कमी झाल्याचे दिसून येत आहे. उत्पादित मालाबरोबरच शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या आदानांच्या किंमतीमधील बदलांचा प्रभाव पीक प्रकारावर पडतो. ज्या पिकाला योग्य हमीभाव आहे. ते पीक इतर पिकांच्या तुलनेत घेण्याची प्रवृत्ती जास्त राहील.

II. धारण क्षेत्राचा आकार सुद्धा पिकरचनेला प्रभावित करतो. छोट्या धारण क्षेत्रामध्ये अन्नधान्याचे उत्पादन जांस्त तर मोठ्या धारण क्षेत्रामध्ये व्यापारी पिकांचे उत्पादन जास्त घेण्याची प्रवृत्ती असते. कारण सिमांत शेतकरी आधी स्वतःच्या उदरनिर्वाहाची सोय करतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

तथापी इतर सोयी जर उपलब्ध असल्या (प्रामुख्याने पाणी पुरवठा) तर नगदी पिके घेण्याची प्रवृत्ती सिमांत कास्तकारांमध्येही निर्माण झालेली दिसते. कारण मौद्रिक गरजासुद्धा विचारात घ्याव्या लागतात.

III. सिंचनाच्या सोयीसोबतच इतरही आदानांचा परिणाम पीक पद्धतीवर होतो. जसे खते, कीटक नाशके, सुधारित बि-बियाणे इत्यादी साधने वेळेवर आणि पुरेशा मात्रेत उपलब्ध हवीत. जर आदानांचा पुरवठा अनिश्चित असेल तर ते पीक फायदेशीर असूनही घेण्याची प्रवृत्ती कमी राहील.

IV. विशिष्ट प्रकारचे पीक घेण्यामध्ये जोखीम किती आहे याचाही विचार केला जातो. काही जाती कीड आणि रोगांनी लवकर प्रभावित होतात. काहीवेळा बाजारातील किंमतीचे परिवर्तन अनिश्चित असते. अशा तन्हेची जोखीम जर सातत्याने राहात असेल तर कमी फायदेशीर व कमी जोखिमीचे पीक घेण्याची प्रवृत्ती राहील. ज्वारी किंवा बाजरी जास्त फायदेशीर नसूनही अनेक जण त्याची लागवड करतात. याचे कारण आपल्या भागातील नैसर्गिक अनिश्चितेमध्येही ही पिके टिकून राहण्याची शक्यता जास्त असते.

संदर्भ सूची

१) मिश्राः पुरी)२०००(, 'भारतीय अर्थव्यवस्था', हिमालया पब्लिशींग हाऊस, मुंबई,

२) रूद्र दत्तः के.पी.एम. सुंदरम (२००५), 'भारतीय अर्थव्यवस्था', एस. चांद कंपनी .

३) कविमंडन विजय, २००६, 'कृषी अर्थशास्त्र' श्री मंगेश प्रकाशन, प्रथम आवृत्ती, नागपूर,

४) कन्हाडे बी.एम. (२००७), 'शास्त्रीय संशोधन पद्धती', पिंपळापुरे अॅण्ड क. पब्लिशर्स, नागपूर,

५) बोधनकर सुधीर, अलोणी विवके, कुळकर्णी मृणाल (२०११), 'सामाजिक संशोधन पद्धती', साईनाथ प्रकाशन, नागपूर,

६) राजभोग राजश्री (२०१६), 'नाबाईची ग्रामीण विकासातील समन्वयी व विकासात्मक भूमिका एक टीप' अर्थमीमांसा, खंड ९, अंक २

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

डिजिटल अर्थव्यवस्था आणि ई-कॉमर्स

नम्रता शहाजी कुंभार
एम. ए. विद्यार्थिनी, न्यू कॉलेज कोल्हापूर
Email: shahajikumbhar7177@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180236
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 172-177
February- 2026
Submitted: 09 Jan. 2026
Revised: 19 Jan. 2026
Accepted: 06 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

भारताची डिजिटल अर्थव्यवस्था सध्या एका अभूतपूर्व परिवर्तनाच्या उंबरठ्यावर उभी आहे. गेल्या दशकात तंत्रज्ञानाचा जो वेगवान विस्तार झाला आहे, त्यामध्ये भारताने जगातील तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी डिजिटल अर्थव्यवस्था म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. या संशोधन पत्रात भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेची सध्याची स्थिती, ई-कॉमर्स क्षेत्रातील प्रगती आणि या बदलांचे सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनावर होणारे परिणाम यांचा सखोल आढावा घेण्यात आला आहे. २०२४-२५ च्या ताज्या आकडेवारीनुसार, भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात डिजिटल अर्थव्यवस्थेचा वाटा ११.७४% असून तो २०३० पर्यंत २०% पर्यंत पोहोचण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

या संशोधनात प्रामुख्याने 'युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस' ची क्रांती, इंटरनेटचा ग्रामीण भागातील प्रसार आणि सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांचे डिजिटल सक्षमीकरण यांवर भर देण्यात आला आहे. ऑगस्ट २०२५ मध्ये UPI ने २० अब्ज व्यवहारांचा ऐतिहासिक टप्पा गाठला असून, भारत आज जगातील निम्म्याहून अधिक रिअल-टाइम डिजिटल व्यवहारांचे नेतृत्व करत आहे. ई-कॉमर्स क्षेत्रातही २०२४ मध्ये १८२ अब्ज डॉलर्सचा व्यापार नोंदवला गेला असून, ग्राहकांचे वर्तन आता पारंपारिक खरेदीकडून डिजिटल प्लॅटफॉर्मकडे वेगाने वळत असल्याचे दिसून येते. प्रस्तुत शोधनिबंध महाराष्ट्राच्या, विशेषतः पुणे विभागाच्या डिजिटल वाटचालीवर विशेष प्रकाश टाकतो. संशोधनाचे निष्कर्ष असे दर्शवतात की, प्रगती वेगाने होत असली तरी सायबर सुरक्षा आणि डिजिटल साक्षरतेतील लिंगभेद यांसारखी आव्हाने अजूनही गंभीर आहेत. या अभ्यासाद्वारे डिजिटल अर्थव्यवस्थेच्या शाश्वत विकासासाठी काही धोरणात्मक शिफारसी मांडण्यात आल्या आहेत.

मुख्यशब्द: *डिजिटल अर्थव्यवस्था, ई-कॉमर्स, युपीआय (UPI), वित्तीय समावेशन, महाराष्ट्र, तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा, ग्राहक वर्तन, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI).*

प्रस्तावना

भारताच्या आर्थिक इतिहासात गेल्या आठ-दहा वर्षांचा काळ हा डिजिटल क्रांतीचा सुवर्णकाळ मानला जातो. २०१६ मध्ये रिलायन्स जिओच्या आगमनामुळे डेटाच्या किमतीत झालेली मोठी घट आणि त्याच काळात झालेली नोटाबंदी या दोन घटनांनी भारताला 'कॅशलेस' अर्थव्यवस्थेकडे वळवण्यास मोठी मदत केली. आज डिजिटल अर्थव्यवस्था म्हणजे केवळ ऑनलाइन शॉपिंग उरलेली नाही, तर ती शिक्षण, आरोग्य, शेती आणि बँकिंग या सर्व क्षेत्रांमध्ये भिनली आहे.

डिजिटल अर्थव्यवस्था म्हणजे अशा सर्व आर्थिक क्रिया ज्या डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित आहेत. यामध्ये इंटरनेटच्या पायाभूत सुविधा, मोबाईल कनेक्टिव्हिटी आणि डिजिटल पेमेंट यांसारख्या साधनांचा समावेश होतो. भारताची ही अर्थव्यवस्था केवळ शहरी भागापुरती मर्यादित नसून, आता ती खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचली आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
नम्रता शहाजी कुंभार, एम. ए. विद्यार्थिनी, न्यू कॉलेज कोल्हापूर

How to cite this article:
कुंभार, . नम्रता . शहाजी . (2026). डिजिटल अर्थव्यवस्था आणि ई-कॉमर्स. Journal of Research and Development, 18(2(XXI)), 172–177. https://doi.org/10.5281/zenodo.19548359

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19548359
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

२०२५ च्या आकडेवारीनुसार, भारतात ८०६ दशलक्ष इंटरनेट वापरकर्ते आहेत, जे एकूण लोकसंख्येच्या ५५.३% इतके आहेत.

ई-कॉमर्स हा डिजिटल अर्थव्यवस्थेचा सर्वात दृश्यमान आणि वेगाने वाढणारा भाग आहे. Amazon, Flipkart सारख्या मोठ्या कंपन्यांपासून ते ओएनडीसी सारख्या सरकारी पुढाकारांपर्यंत, खरेदी-विक्रीची पद्धत पूर्णपणे बदलली आहे. ग्रामीण भागातील एक छोटा शेतकरी किंवा कारागीर आता त्याच्या वस्तू थेट जगभरातील ग्राहकांना विकू शकतो, हे डिजिटल शक्तीचे जिवंत उदाहरण आहे. महाराष्ट्राचा विचार करता, हे राज्य भारताचे आर्थिक इंजिन असून डिजिटल व्यवहारांतही अग्रेसर आहे. देशातील एकूण डिजिटल व्यवहारांपैकी सुमारे १०% व्यवहार एकट्या महाराष्ट्रात होतात. या प्रक्रियेत जशा अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत, तसेच सायबर फसवणूक आणि ग्रामीण-शहरी दरी यांसारखी आव्हानेही निर्माण झाली आहेत. या संशोधन पत्रात या सर्व पैलूंचा सांख्यिकीय पुराव्यांसह अभ्यास करण्यात आला आहे.

साहित्याचा आढावा

डिजिटल अर्थव्यवस्था आणि ई-कॉमर्स या विषयावर जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावर अनेक महत्त्वाचे संशोधन अहवाल प्रसिद्ध झाले आहेत. या अहवालांचे विश्लेषण केल्यास असे लक्षात येते की, भारताची वाटचाल ही 'डिजिटल इंडिया' मोहिमेमुळे अधिक वेगवान झाली आहे. नीती आयोगाच्या आणि आयसीआयरआयईआर यांच्या 'स्टेट ऑफ इंडियाज डिजिटल इकॉनॉमी' २०२४-२५ च्या अहवालांनुसार, भारत अर्थव्यवस्था-व्यापी डिजिटलायझेशनमध्ये जगात तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. या अहवालात 'चिप्स' नावाची एक नवीन चौकट मांडण्यात आली आहे, जी देशाच्या डिजिटल क्षमतेचे मोजमाप करते.

वेगवेगळ्या विद्वानांच्या मते, ई-कॉमर्समुळे पारंपारिक किरकोळ व्यापाऱ्यांच्या समोर मोठे आव्हान उभे राहिले असले तरी, यामुळे ग्राहकांना सोय आणि वाजवी किमतीत वस्तू उपलब्ध झाल्या आहेत.संशोधक असेही सुचवतात की, ज्या व्यापाऱ्यांनी 'ओम्नी चॅनेल' पद्धतीचा अवलंब केला, म्हणजे ऑफलाइनसोबत ऑनलाइन विक्री सुरू केली, त्यांची प्रगती अधिक झाली आहे. डिजिटल पेमेंटच्या बाबतीत, एआरसी वर्ल्डवाईड च्या २०२४ च्या अहवालानुसार, भारताने रिअल-टाइम व्यवहारांमध्ये जगाला मागे टाकले आहे महाराष्ट्राच्या संदर्भात, आर्थिक पाहणी अहवाल २०२४-२५ हे स्पष्ट करतो की, सेवा क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढल्यामुळे राज्याचा विकास दर स्थिर राहण्यास मदत झाली आहे. पुण्याच्या संदर्भात शैलेश सिद्धतेक्कर (२०२५) यांच्या अभ्यासात असे दिसून आले आहे की, पुण्यातील ९३% ग्राहक आता कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या डिजिटल खरेदीवर अवलंबून आहेत. या सर्व साहित्यावरून असे स्पष्ट होते की, डिजिटल अर्थव्यवस्था हा आता भारताच्या विकासाचा अविभाज्य भाग बनला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधनाचे प्रमुख उद्देश खालीलप्रमाणे आहेत:

१. भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेची वाढ आणि व्याप्ती यांचा सखोल आढावा घेणे.

२. ई-कॉमर्स क्षेत्रातील नवीन कल आणि ग्राहकांच्या बदलत्या पसंतीचे विश्लेषण करणे.

३. डिजिटल पेमेंट प्रणाली, विशेषतः युपीआय (UPI) चे वित्तीय समावेशनातील महत्त्व तपासणे.

४. महाराष्ट्र आणि पुणे विभागातील डिजिटल परिवर्तनाची सद्यस्थिती सांख्यिकीय डेटाद्वारे मांडणे.

५. डिजिटल अर्थव्यवस्थेच्या मार्गातील आव्हाने, जसे की सायबर सुरक्षा आणि डिजिटल विभागणी, यांचा अभ्यास करणे.

गृहितके

या संशोधनासाठी खालील गृहितके मांडण्यात आली आहेत:

१. ग्रामीण भागात स्मार्टफोन आणि स्वस्त इंटरनेटच्या उपलब्धतेमुळे ई-कॉमर्सच्या ग्राहकांमध्ये मोठी वाढ झाली आहे.

२. डिजिटल पेमेंट प्रणालीमुळे आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता आली असून रोकडवर आधारित अर्थव्यवस्थेवरील अवलंबित्व कमी झाले आहे.

३. ई-कॉमर्समुळे ग्रामीण कारागीर आणि छोट्या उद्योजकांना जागतिक बाजारपेठ मिळणे सुलभ झाले आहे.

४. डिजिटल साक्षरतेचा अभाव आणि सायबर फसवणुकीची भीती हे आजही डिजिटल अर्थव्यवस्थेच्या पूर्ण विस्तारातील मुख्य अडथळे आहेत.

संशोधन कार्यपद्धती

या संशोधन पत्रासाठी प्रामुख्याने 'दुय्यम माहिती संकलन' पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये खालील स्रोतांचा समावेश आहे:

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

सरकारी अहवाल: नीती आयोग, माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) आणि नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांची अधिकृत आकडेवारी.

राज्यस्तरीय माहिती: महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल २०२४-२५ आणि विविध जिल्हा नियोजन कार्यालयांची आकडेवारी.

संशोधन पत्रिका: गुगल स्कॉलर, रिसर्च गेट आणि विविध आंतरराष्ट्रीय आर्थिक नियतकालिकांमधील शोधनिबंध.

सांख्यिकीय विश्लेषण: उपलब्ध आकडेवारीचे तुलनात्मक विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यासाठी वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब केला आहे. माहितीची सत्यता पडताळण्यासाठी २०२४ आणि २०२५ च्या ताज्या अहवालांना प्राधान्य देण्यात आले आहे, जेणेकरून सद्यस्थितीचे अचूक चित्र मांडता येईल.

प्रमुख निष्कर्ष

भारताची डिजिटल अर्थव्यवस्था आता केवळ 'भविष्यातील स्वप्न' राहिलेली नसून ती एक 'वास्तविक क्रांती' बनली आहे. संशोधनातून समोर आलेले निष्कर्ष खालील महत्त्वाच्या मुद्द्यांच्या आधारे मांडता येतील.

१ इंटरनेट आणि स्मार्टफोनचा विस्तार

डिजिटल अर्थव्यवस्थेचा पाया इंटरनेट कनेक्टिव्हिटीवर आधारलेला असतो. भारतात ज्या वेगाने इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या वाढली आहे, तो एक जागतिक चमत्कार मानला जातो.

तक्ता १: भारतातील इंटरनेट आणि मोबाईल सांख्यिकी (२०२५)

निकष	आकडेवारी (२०२५)	२०२४ च्या तुलनेत वाढ (YoY)
एकूण इंटरनेट वापरकर्ते	८०६ दशलक्ष	+६.५% (४९ दशलक्ष वाढ)
इंटरनेट घनता (Penetration)	५५.३%	+५.५%
एकूण मोबाईल कनेक्शन	१.१२ अब्ज	-०.१% (किरकोळ घट)
सोशल मीडिया वापरकर्ते	४९१ दशलक्ष	+६.३%
सरासरी डेटा वापर (प्रति महिना)	२१.५३ GB	लक्षणीय वाढ

भारतातील ९६% नागरिक इंटरनेटसाठी मोबाईलचा वापर करतात, जे दर्शवते की भारत ही एक 'मोबाईल-फर्स्ट' डिजिटल अर्थव्यवस्था आहे. विशेष म्हणजे, ग्रामीण भागातील १५ ते २९ वयोगटातील ९२.७% तरुण इंटरनेटचा सक्रिय वापर करत आहेत.

२ ई-कॉमर्स क्षेत्राची भरभराट

ई-कॉमर्स आता केवळ कपडे किंवा मोबाईल विकण्यापुरते मर्यादित नाही, तर किराणा माल (Grocery) आणि दररोजच्या गरजा पूर्ण करण्याचे साधन बनले आहे.

तक्ता २: भारतीय ई-कॉमर्स बाजारपेठेचे स्वरूप (२०२४-२५)

विभाग	बाजारपेठेचा वाटा	मुख्य कल (Trends)
एकूण ई-कॉमर्स उलाढाल	१८२ अब्ज डॉलर्स	२०२७ पर्यंत २७४ अब्ज डॉलर्सचा अंदाज

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

किराणा माल (Grocery)	२९%	'क्विक कॉमर्स' ७०-८०% वेगाने वाढत आहे
फॅशन आणि जीवनशैली	२१%	टियर-२ शहरांमधून मोठी मागणी
इलेक्ट्रॉनिक्स	१९%	स्मार्टफोनची विक्री सर्वाधिक
आरोग्य आणि सौंदर्य	१२%	डीटूसी (D2C) ब्रँड्सची चलती

ई-कॉमर्समध्ये आता 'टियर-२' आणि 'टियर-३' शहरांचा वाटा ६०% पर्यंत पोहोचला आहे, ज्याचा अर्थ असा की ग्रामीण आणि निमशहरी भागातील लोक आता मोठ्या प्रमाणावर ऑनलाइन खरेदी करत आहेत.

३ डिजिटल पेमेंट आणि युपीआय (UPI) चा दबदबा

भारताने डिजिटल पेमेंटच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर आपले नाणे वाजवले आहे. युपीआय (UPI) ही जगातील सर्वात यशस्वी पेमेंट प्रणाली म्हणून उदयास आली आहे.

तक्ता ३: युपीआय (UPI) व्यवहारांची प्रगती (२०२१-२०२५)

वर्ष	मासिक व्यवहार (अब्ज मध्ये)	व्यवहारांचे मूल्य (लाख कोटी रुपये)
२०२१ (नोव्हेंबर)	४.१८	७.६८
२०२४ (नोव्हेंबर)	१५.४८	२१.५५
२०२५ (ऑगस्ट)	२०.००	२४.८५

आज जगातील एकूण रिअल-टाइम डिजिटल व्यवहारांपैकी ५०% व्यवहार भारतात होतात. महत्त्वाचे म्हणजे, ग्रामीण भागात युपीआयचा वापर २०२० मधील १२% वरून २०२४ मध्ये ३७% वर पोहोचला आहे, ज्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळाली आहे.

४ महाराष्ट्राची डिजिटल प्रगती

महाराष्ट्र हे राज्य डिजिटल परिवर्तनाच्या बाबतीत देशात आघाडीवर आहे. राज्याच्या आर्थिक आणि तांत्रिक पायाभूत सुविधांमुळे येथे डिजिटल अवलंब मोठ्या प्रमाणावर आहे.

- **पेमेंटमध्ये अव्वल**: जून २०२५ च्या तिमाहीत महाराष्ट्रात ६.५८ अब्ज युपीआय व्यवहार झाले, जे देशातील सर्वाधिक आहेत.
- **आर्थिक वाटा**: देशाच्या एकूण युपीआय व्यवहारांत महाराष्ट्राचा वाटा ९.४७% इतका आहे.
- **पुणे विभागाची स्थिती**: पुणे शहरात ई-कॉमर्स विक्रीत ११७% वाढ नोंदवली गेली असून ९३% नागरिक ऑनलाइन सेवांचा वापर करत आहेत.
- **औद्योगिक बदल**: कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांत 'ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर' स्थापन केल्यामुळे या भागातील आयटी आणि डिजिटल रोजगारात मोठी वाढ होणार आहे.

चर्चा

या संशोधनाचे निष्कर्ष केवळ आकडेवारी दर्शवत नाहीत, तर समाजातील खोलवर होत असलेल्या बदलांचे संकेत देतात. यावर काही महत्त्वाच्या अंगांनी चर्चा करणे आवश्यक आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

१ डिजिटल अर्थव्यवस्था आणि रोजगार

डिजिटल अर्थव्यवस्थेमुळे पारंपारिक नोकऱ्यांच्या स्वरूपात बदल झाला आहे. सध्या या क्षेत्रात १४.६७ दशलक्ष कामगार कार्यरत आहेत. ई-कॉमर्स प्लॅटफॉर्ममुळे डिलिव्हरी बॉईज, वेअरहाऊस मॅनेजर्स आणि डिजिटल मार्केटिंग तज्ज्ञांची मोठी मागणी वाढली आहे. तसेच, ग्रामीण भागातील 'स्वयं सहाय्यता गटां'च्या महिलांना 'मीशो' किंवा 'ओएनडीसी' सारख्या प्लॅटफॉर्ममुळे उद्योजिका बनण्याची संधी मिळाली आहे.

२ कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि भविष्यातील संधी

नीती आयोगाच्या मते, भारताचा ८% पेक्षा जास्त विकास दर गाठण्यासाठी 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (AI) चा वापर अनिवार्य आहे. बँकिंगमध्ये फसवणूक शोधणे (Fraud Detection), शेतीमध्ये पीक सल्ला देणे आणि ई-कॉमर्समध्ये ग्राहकांना वैयक्तिकृत अनुभव देणे यासाठी AI महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

३ सायबर सुरक्षेचे आव्हान

प्रगतीसोबतच धोकेही वाढले आहेत. २०२५ मध्ये भारतात १.५ दशलक्ष सायबर हल्ले झाले असून, सायबर गुन्हेगारीमुळे होणारे नुकसान २०,००० कोटी रुपयांपर्यंत पोहोचले आहे. ग्रामीण भागातील लोकांमध्ये डिजिटल साक्षरता कमी असल्यामुळे ते 'फिशिंग' आणि 'डिजिटल अरेस्ट' सारख्या फसवणुकीला बळी पडत आहेत.केवळ ३३% तरुणांना सुरक्षित ऑनलाइन व्यवहार कसे करावेत याची माहिती आहे, ही चिंतेची बाब आहे.

४ डिजिटल लिंगभेद

डिजिटल प्रगतीमध्ये महिला अजूनही पुरुषांच्या तुलनेत मागे आहेत. ग्रामीण भागात फक्त ५१.६% महिलांकडे स्वतःचा मोबाईल आहे, तर पुरुषांमध्ये हे प्रमाण ८०.७% आहे.[5] युपीआयचा वापर करणाऱ्यांमध्येही पुरुषांचे प्रमाण जास्त आहे.[8] हा भेद मिटवल्याशिवाय आपण खऱ्या अर्थाने 'डिजिटल भारत' होऊ शकणार नाही.

५ पर्यावरणावर होणारा परिणाम

डिजिटल साधनांच्या वाढत्या वापरामुळे 'ई-कचरा' (E-waste) वाढला आहे. २०२० ते २०२२ या काळात ई-कचऱ्यात ३०% वाढ झाली असून त्याचे व्यवस्थापन हे मोठे पर्यावरणीय आव्हान बनले आहे.

निष्कर्ष

प्रस्तुत संशोधनावरून असे स्पष्ट होते की, भारत आता केवळ डिजिटल तंत्रज्ञानाचा 'वापरकर्ता' उरला नसून तो जगाला 'दिशा दाखवणारा' देश बनला आहे. डिजिटल अर्थव्यवस्था ही २०२९-३० पर्यंत भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात २०% वाटा उचलून कृषी आणि उत्पादन क्षेत्रालाही मागे टाकू शकते.

ई-कॉमर्सने खरेदी-विक्रीची पद्धत लोकशाहीवादी बनवली आहे. पुण्यासारखी शहरे आणि ग्रामीण भागातील 'किराणा दुकाने' आता तंत्रज्ञानाच्या सहाय्याने स्वतःला बदलत आहेत. युपीआय (UPI) मुळे झालेली वित्तीय क्रांती ही जगातील सर्वात मोठी आर्थिक बदलाची कथा आहे.

तथापि, या यशाचा आनंद साजरा करत असताना आपल्याला सायबर सुरक्षा, डिजिटल साक्षरता आणि पर्यावरणाचे रक्षण यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सरकार, खाजगी कंपन्या आणि नागरिक या तिघांच्या समन्वयातूनच आपण एक सुरक्षित आणि सर्वसमावेशक डिजिटल अर्थव्यवस्था निर्माण करू शकतो. महाराष्ट्राने या क्षेत्रात जो मार्ग दाखवला आहे, तो देशासाठी अत्यंत प्रेरणादायी आहे.

शिफारसी

संशोधनाच्या आधारावर खालील शिफारसी मांडता येतील:

१. ग्रामीण भागात आणि महिलांमध्ये डिजिटल साक्षरता वाढवण्यासाठी स्थानिक भाषेतून विशेष मोहिमा राबवणे आवश्यक आहे.

२. सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी कडक कायदे आणि जलद तक्रार निवारण यंत्रणा (Grievance Redressal) उभारली पाहिजे.

३. ई-कॉमर्समध्ये छोट्या व्यापाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी 'ओएनडीसी' सारख्या मुक्त व्यासपीठांचा प्रसार वाढवणे गरजेचे आहे.

४. शाळा आणि महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमात 'डिजिटल सुरक्षा' आणि 'फिनटेक' या विषयांचा अंतर्भाव करणे काळाची गरज आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

संदर्भ

1. ICRIER. (2024). State of India's Digital Economy (SIDE) 2024 Report. New Delhi: Indian Council for Research on International Economic Relations.
2. ICRIER. (2025). State of India's Digital Economy (SIDE) 2025 Report. New Delhi: Indian Council for Research on International Economic Relations.
3. Ministry of Electronics and Information Technology. (2025). Estimation and Measurement of India's Digital Economy Report. Government of India.
4. National Payments Corporation of India. (2024). UPI Transaction Statistics. Retrieved from https://www.npci.org.in
5. NITI Aayog. (2025). AI for Viksit Bharat: The Opportunity for Accelerated Economic Growth. New Delhi: NITI Aayog.
6. Siddhatekkar, S. (2025). An analysis of the rise of digitalization in Pune city. ResearchGate.
7. UNCTAD. (2024). Digital Economy Report 2024: Shaping an environmentally sustainable and inclusive digital future. United Nations.
8. Directorate of Economics and Statistics. (2025). Economic Survey of Maharashtra 2024-25. Mumbai: Government of Maharashtra.
9. Data Reportal. (2025). Digital 2025: India Report. Retrieved from https://datareportal.com
10. Reserve Bank of India. (2023). Annual Report 2022-23. Mumbai: RBI.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

पूर्वमध्ययुगीन कालखंडातील महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती: एक अभ्यास

डॉ. विकास संभाजी नाईक[1], डॉ. सयाजीराव छबुराव गायकवाड[2]
[1]इतिहास विभाग, यशवंतराव चव्हाण (के एम सी) कॉलेज कोल्हापूर
[2]मराठी विभाग, यशवंतराव चव्हाण (के एम सी) कॉलेज कोल्हापूर
Email: vsnaik3000@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180237
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 178-181
February- 2026
Submitted: 09 Jan. 2026
Revised: 19 Jan. 2026
Accepted: 06 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश:

पूर्वमध्ययुगीन काळात महाराष्ट्राची आर्थिक रचना प्रामुख्याने कृषीप्रधान होती. या काळात जमीन ही उत्पादनाचे मुख्य साधन असून शेतीवर आधारित अर्थव्यवस्था विकसित झाली होती. नद्यांच्या काठावर व सुपीक प्रदेशांमध्ये शेती फुलली, तर पर्जन्यावर अवलंबून शेतीही मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होती. या कालखंडात Satavahana period नंतरच्या राजवटी, विशेषतः Rashtrakuta period आणि Yadava dynasty यांच्या काळात व्यापार आणि उद्योगधंद्यांना चालना मिळाली. स्थानिक तसेच आंतरप्रादेशिक व्यापार वाढला होता, ज्यामुळे बाजारपेठा आणि व्यापारी केंद्रे विकसित झाली.

हस्तकला, वस्त्रोद्योग, धातुकाम यांसारखे उद्योगही अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग होते. गावपातळीवर स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था अस्तित्वात होती, ज्यात शेतकरी, कारागीर आणि व्यापारी यांचे परस्परावलंबित्व दिसून येते. नाण्यांचा वापर आणि विनिमय पद्धती या दोन्ही प्रचलित होत्या. तसेच, जमीन महसूल प्रणाली ही राज्याच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत होती. विविध करप्रणाली आणि जमिनीच्या हक्कांवर आधारित व्यवस्था अस्तित्वात होती, ज्यामुळे सामाजिक व आर्थिक स्तरांमध्ये भेद दिसून येत होता. अशा प्रकारे, पूर्वमध्ययुगीन महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती ही कृषी, व्यापार, उद्योग आणि करप्रणाली यांच्या समन्वयातून विकसित झालेली एक सशक्त पण स्तरित अर्थव्यवस्था होती.

मुख्यशब्द: *पूर्वमध्ययुगीन महाराष्ट्र, कृषी अर्थव्यवस्था, Rashtrakuta period, Yadava dynasty, व्यापार आणि वाणिज्य, हस्तकला उद्योग, जमीन महसूल*

प्रस्तावना

पूर्व मध्ययुगीन काळातील आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करत असताना, त्या आधीच्या आर्थिक गोष्टींचे विवेचन करणे गरजेचे आहे. प्राचीन काळातील भारतीयांनी पुरुषार्थाची वर्गवारी चार घटकांमध्ये केलेली दिसते. ती म्हणजे धर्म, अर्थ, काम व मोक्ष.

प्राचीन भारतीय अर्थशास्त्र, नीतिशास्त्र यामधूनदेखील संपत्तीचे महत्व समजते. व्यक्तीचा धर्म हा त्याच्याजवळ असलेल्या संपत्तीवर ठरतो. दारिद्र्य हा शाप असून, संपत्ती ही व्यक्तीची गुणवत्ता वाढवते. यासोबतच पुण्यसंचयही अधिक करता येतो, अशी तत्कालीन भारतीय लोकांची कल्पना होती.

यावरून कळते की, संपत्ती ही राजा, व्यापारी तसेच प्रशासकीय लोकांकडेच जास्त का केंद्रित झाली असावी. मंदिरांची निर्मिती करणे, धार्मिक स्थळांना भेटी देऊन दान अथवा जमिनी देणे, धार्मिक यात्रा काढणे याला कर्तव्य मानले जायचे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. विकास संभाजी नाईक, इतिहास विभाग, यशवंतराव चव्हाण (के एम सी) कॉलेज कोल्हापूर

How to cite this article:
नाईक, . विकास . संभाजी ., & गायकवाड, . सयाजीराव . छबुराव . (2026). पूर्वमध्ययुगीन कालखंडातील महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती: एक अभ्यास. Journal of Research and Development, 18(2(XXI)), 178–181. https://doi.org/10.5281/zenodo.19548414

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19548414
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

थोडक्यात, संपत्ती किंवा अर्थकारण याला धार्मिक स्वरूप देऊन त्याच अनुषंगाने ती समृद्ध करण्याचे प्रयत्न केले जात असत.

साधने:

पूर्व मध्ययुगीन काळातील आर्थिक परिस्थिती समजून घेताना आपल्याला या बाबतची माहिती पुढील साधनांवरून मिळवता येते.

- ताम्रपटातून आलेली माहिती
- मंदिरे व ब्राह्मणांना देण्यात आलेली दाने (ताम्रपट व शिलालेख)
- तत्कालीन ग्रंथ व इतर वाक्यमयाधून येणारी माहिती
- परकीय प्रवासी यांची वर्णने

पूर्व मध्ययुगीन कालखंडात दख्खन प्रांत विशेषतः पश्चिम महाराष्ट्र हा आर्थिकदृष्टया समृद्ध व संपन्न होता असे विधान करण्यासाठी पुढील गोष्टी महत्त्वाच्या ठरतात.

या कालखंडात होऊन गेलेल्या राजसत्ता व त्यांची रचना ही आर्थिक संपन्नता आणण्यासाठी महत्वाच्या ठरल्या. ज्यात प्रादेशिक फायदे व तोटे खनिज संपत्ती व हवामान या गोष्टी महत्त्वाच्या ठरल्या.

कृषी हा इथला मूलभूत व्यवसाय असल्याने मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती झाली. ज्यातून सामान्य जनतेचे जीवन समृद्ध झाले.

याकाळात अंतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय व्यापार मोठ्या प्रमाणात सुरु झाला, ज्याने विशेषतः किनारपट्टीवरील राजसत्ता उदा. कदंब व शिलाहार शाखा यांची आर्थिक समृद्धी वाढली.

तत्कालीन राजसत्तांनी नेहमीच राज्यविस्ताराची धोरणे ठेवल्याने जिंकलेल्या प्रदेशातून संपत्ती पश्चिम महाराट्रात आली.

भूमी, मालकी, हस्तांतरण व मोजणी:

भारत या कृषिप्रधान देशात आर्थिक तसेच सामाजिक अर्थव्यवस्था या शेती, पर्यायाने भूमीवरच अवलंबून होती. स्मृतिग्रंथातील आधारानुसार राज्यातील जमीन ही राजाच्या मालकीची असे; परंतु ती शेती करिता वेगवेगळया लोकांना वाटली जाई. या जमिनीची मशागत गुलाम, कैदी अथवा मजुरांच्या साहाय्याने करण्यात येई. ब्राम्हण व धर्मसंस्थांच्या जमिनी मजुरांच्यामार्फतकसल्या जात असत. कुळाकडून कसल्या जाणाऱ्या जमिनीस वहिवाट अशी संज्ञा वापरली जात असे.

कल्याण चालुक्य विक्रमादित्य सहावा याची वैयक्तिक जमीन होती, ज्यातून तो नित्य भूमिदान करत असे." राष्ट्रकूट नरेश ध्रुव याच्या कासारशिरसी ताम्रपटानुसार, स्वतःची जमीन स्वतः कसत असणाऱ्याला कृषत म्हणत व मजुरांच्या मदतीने कसल्या जाणाऱ्या जमिनीस कृषताह म्हटले जात असे." जमिनीच्या हस्तांतर प्रक्रियेमध्ये किंवा खरेदी करणारा व विक्रेता यांचा सहभाग नसून तो जमिनीनुसार असे. ज्यात कधी राजा स्वतः किंवा गावातली व्यक्ती अथवा मुनी हस्तक्षेप करीत व त्यांच्या परवानगीनेच प्रक्रिया होत असे. उदा. सौंदत्ती येथील लेखानुसार एका जैन मंदिराला भूमिदान करण्याकरिता तेथील पन्नास शेतकऱ्यांची संमती घ्यावी लागली होती. "

राष्ट्रकूट काळात भूमीची मोजणी करण्यासाठी निवर्तन (अंदाजे दीड एकर) व मत्तर (डॉ आळतेकर यांच्या मते, हे क्षेत्र पाच एकर असावे) याशिवाय जमीन मोजण्यासाठी असणारे दंड किंवा काठी ही वेगवेगळया प्रदेशात वेगवेगळी होती. राजा अमोघवर्षांच्या कोन्नूर लेखातून समजते की सेनापती बंकेय याच्या आग्रहावरून त्याने एका जैन मंदिराला १२ निवर्तन जमीन इनाम दिली. चालुक्य काळात ही जमीन मोजणीची पद्धत पूर्वीप्रमाणेच वापरली गेली. चालुक्य राजा विक्रमादित्य सहावा याच्या भांडार कवठे येथील लेखात जमीन मोजणीसाठी अनुक्रमे १० व १४ कोलू (काठी) अशा अंकवाचक संज्ञा वापरल्या आहे."

पशुपालन:

कृषी व्यवसायाला पूरक आणि उपयुक्त असणारा जोड व्यवसाय म्हणून पशुपालनाकडे पहिले जायचे. पशूच्याविना शेतीची कामे होत नसत. गाई, म्हैस, बैल, शेळी, मेंढी, घोडे, कुत्रे, इत्यादी पाळीव प्राणी शेतकरी सांभाळत असे. या गोष्टींना महत्त्व असल्याने कित्येकदा पशुधनाची चोरी होत असे. तेव्हा त्याच्या रक्षणार्थ लढाई अथवा संघर्ष होई. ज्यात अनेक लोकांचा प्राणही गेल्याचे आपल्याला काही वीरगळ व स्मृती शिल्पातून दिसते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

जलसिंचन:

प्राचीन काळापासून मानवी वस्ती ही नदीच्या खोऱ्यात विकसित झाली. पाण्याचे महत्व तेव्हापासून अव्याहत आहे. शेती अथवा कृषिउद्योग हा पाण्यावर अवलंबून असे. पश्चिम महाराष्ट्रात नद्या व त्यांची पात्रे मोठी असल्याने या भागात नदीच्या बाजूने मोठ्या प्रमाणात वस्त्या निर्माण झाल्या. हेमाद्रीनुसार पाण्याच्या दानाला प्रचंड महत्व देण्यात आले होते. तलाव बांधणे हे सात पुण्य कर्मापैकी एक होते. राष्ट्रकुटांच्या लेखात ३३ तलावांचा संदर्भ मिळतो. तसेच चार कालवे व एका विहिरीचा उल्लेख सापडतो. तसेच त्यांच्या राजधानीत राजा कृष्णराज तिसरा याने मोठा तलाव बांधला, जो 'जगत्तुंग समुद्र' या नावाने ओळखला जातो. " शिलाहार राजा गंडरादित्य याच्या तळेले ताम्रपटनुसार त्याने मिरजेजवळ असलेल्या इरुकडी (आजचे इरळी) येथे तलाव खोदून त्यास गंडसागर असे नाव दिले."

खनिज संपत्ती:

पश्चिम महाराष्ट्र प्रदेश हा इतरांच्या तुलनेने खनिज संपत्तीमध्ये अधिक समृद्ध होता. तांब धातूच्या खाणी कडप्पा, बेल्लारी, छंद, बुलढाणा, विजयपूर, धारवाड येथे असून मुबलक तांबे यातून मिळत असे. तसेच मौल्यवान रत्नांच्या खाणी कडप्पा, बेल्लारी, कर्नल, कृष्ण या खोऱ्यात होत्या. राष्ट्रकूट राजाची राजधानी मान्यखेट ही देखील मौल्यवान रत्नांची बाजारपेठ असावी. पश्चिम महाराष्ट्रतून उत्कृष्ट दर्जाची खनिजे प्राप्त होत असत.

श्रेणी:

पूर्व मध्ययुगीन कालखंडात उद्योग व व्यापार वृद्धिंगत करण्यासाठी तसेच प्रतिष्ठा प्राप्त करून राजाकडून लाभ मिळवण्यासाठी श्रेणी अर्थात व्यापारी संघटना मोठ्या प्रमाणात तयार झाल्या. व्यापार व कामगार अशा दोन प्रकारच्या श्रेण्या या काळात अस्तित्वात होत्या. त्यांचे स्वतःचे नियम होते. तसेच श्रेणीने त्यांच्या वस्तू संरक्षणाकरिता सैन्य ठेवण्याची परवानगी असे. यासोबतच राजांना हे संकटकाळी सैन्य लढायला देत असत. यांचा विशिष्ट ध्वजही असे. सातवाहन काळापासून आपल्याला श्रेणींचे अस्तित्व दिसते.

बदामी चालुक्य व राष्ट्रकूट काळात स्थापन झालेली ही श्रेणींची पद्धत कल्याणी चालुक्य यादव कालखंडात वैभव शिखरास पोहोचली. अय्यावोळे (आजचे ऐहोळे) येथील पाचशे व्यापारी श्रेणीचा उल्लेख कांदलगाव येथील कलचुरी लेखात मिळतो. कोल्हापूर शिलाहार शाखेचा राजा गंडरादित्य याच्या इ. स ११३४ मधील लेखात तसेच चालुक्य राजा विक्रमादित्य षष्ठ याच्या ११४२ मधील मिरज लेखात श्रेणीची माहिती मिळते. याव्यतिरिक्त शिलाहार राजा विजयादित्य याच्या मिरज शिलालेखात वीरबणज या व्यापारी संघाचा उल्लेख मिळतो.

विनिमयची साधने:

चालुक्य अथवा राष्ट्रकूट कालखंडात राजांना महसुलाचे उत्पन्न द्रव्य किंवा वस्तूच्या स्वरूपात मिळत असे. काही प्राप्त शिलालेखांवरून नाण्यांचा व गद्यानाचा उल्लेख मिळतो. डॉ. वि. भि. कोलते यांच्या मते गद्यान हे ४८ रत्ती किंवा ८५ ग्रेन वजनाचे सोन्याचे नाणे होते. तर भास्कराचार्य यांच्या 'लीलावती' ग्रंथानुसार गद्यानाचे वजन ४८ रत्ती इतके होते. तसेच आळतेकर यांच्या मते १० ग्रॅस इतके असावे, चालुक्य शिलालेखात गुली, वृषभ आणि कपर्दक या नाण्यांचा उल्लेख मिळतो. तेच यादव व शिलाहार काळात आसू, चाम, टंक, टाक तसेच होन्न, पोन्नआणि दिनार या नाण्यांचा संदर्भ मिळतो. शिलाहार राजा रट्टराज याच्या खारेपाटण लेखाप्रमाणे, विदेशातून येणाऱ्या जहाजास सुवर्ण धरण या नाण्यांमध्ये जकात भरावी लागत असे. तसेच हे नाणे राष्ट्रकूट काळात असण्याची शक्यता आहे कारण याचा उल्लेख ९७१-७२ मधील धारवाड लेखात केला आहे.

उत्पन्न व कर पद्धती:

राजसत्तेला वेगवेगळ्या स्वरूपाच्या कामासाठी लागणारे धन हे विविध करांच्या माध्यमातून गोळा करावे लागते कारण उत्पन्नाचा मूळ आधार म्हणजे कर होय. पूर्व मध्ययुगीन कालखंडात कृषी हा अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने कृषीकर किंवा भूमीकर हा राज्याचा उत्पन्नाचा महत्वाचा भाग होता. विविध धार्मिक ग्रंथ तसेच स्मृतिग्रंथात याबाबत मार्गदर्शक तत्वे सांगितली आहेत. त्याहून अधिक कर लावल्यास त्याचे विपरीत परिणाम भोगावे लागत असत. राज्यातील सर्व गावातून वर्षातून दोनदा किंवा हंगामाच्या शेवटी करवसूल केला जात असे. संकट किंवा दुष्काळी परिस्थिती मध्ये करात सवलत दिली जाई.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

निष्कर्ष

या कालखंडात सांस्कृतिक व धार्मिक समृद्धी ही मंदिर वास्तुकला, प्रादेशिक साहित्यातील प्रगती, तसेच भक्तीसोबत तांत्रिक मार्गाचा झालेला विकास ही एक प्रकारे पुनर्जीवनाची प्रक्रिया' म्हणावी लागेल. जाती व्यवस्थेच्या या कालखंडात बऱ्याच अंशी काटेकोर असलेली दिसून येते. स्मृती, श्रुती यांचा प्रभाव नक्कीच जाणवतो परंतु तो मध्ययुगीन कालखंडाप्रमाणे इतका जाचक नसलेला दिसून येतो. पूर्व मध्ययुगीन कुटुंबसंस्थेमधूनसद्य स्थितीचा परंपरागत इतिहास सुस्पष्ट होतो. कुटुंब पद्धतीचे एकत्रित व विभक्त हे दोन प्रकार पडतात या दोहोंची उदाहरणे या कालखंडात पहावयास मिळतात; परंतु सद्यस्थितीला मोठया प्रमाणावर प्रचलित असणाऱ्या विभक्त कुटुंब प्रणालीपेक्षा 'एकत्रित कुटुंब' प्रणालीवर त्या काळातील समाजाचा भर असे. ही त्या कालखंडातील अनुकरणीय बाब मानावी लागेल.

'आर्थिक असमानता' ही आधुनिक कालखंडात जशी दिसून येते. त्याच पद्धतीने ही असमानता पूर्वमध्यकालीन ही दिसून येते फक्त स्वरूप बदल दिसून येतो. संपत्तीचे केंद्रीकरण हे राजा व्यापारी तसेच प्रशासकीय लोकांकडे होते. असे असले तरी धनिक लोक पुण्यप्राप्तीकरिता दानधर्म मोठ्या प्रमाणावर करून त्यास विधायक स्वरूप प्राप्त करून घेत.

संदर्भ

1. देव, शा.भा., महाराष्ट्र व गोवे शिलालेख ताम्रपटांची वर्णनात्मक सूची, महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, पृ.५८२.
2. Hultzch, E. (Ed.), Epigraphia Indica, Vol 22, p.98.
3. Yazdani G, The Early History of the Deccan, Oxford University Press, 1960, p 285.
4. कुंभार आनंद, संशोधन तरंग, नवभारत प्रकाशन संस्था, मुंबई, १९८८, पृ. १२६.
5. Hultzch, E. (Ed.), Epigraphia Indica, Vol 4, ASI, Calcutta, 1897, p.355-358.
6. Ritti & Shelke, Inscriptions from Nanded District, Yashwant Mahavidyalaya Nanded, 1968, p.227-230.
7. Sachau E.C., Alberunis India, Vol 2, Kegan Paul & Co. Ltd, London, 1910, P.121.
8. Kane, P.V., History of Dharmashastra, Poona, 1930, p.358.
9. भुसारी, र. मु., प्राचीन महाराष्ट्राचा धार्मिक इतिहास, म.सा. प, आं. प्र., हैद्राबाद, १९६५, पृ.२४.
10. Shrigondekar, G.K., Mansollasa of King Someshwar, Baroda Oriental Institute, 1939, p.5.
11. केतकर श्रीधर, प्राचीन महाराष्ट्र, वरदा बुक्स, पुणे, १९८९, भाग २, पृ ४०५.
12. कोलते, व्ही. बी., लीळाचरित्र, म.सा.स.म, १९८२, पृ. ६८४.
13. सार्थ ज्ञानेश्वरी, मे. आदर्श विद्यार्थी प्रकाशन, पुणे, २००९, पृ. ७१८.
14. Chauhan. D.V & Kulkarni, A.R., Journal of The Asiatic society of Bombay, Mumbai, 1970, p.94.
15. Alatekar, A. S., Rashtrakutas and their Times, Poona Oriental Book Agency, 1934, p.395
16. Kulkarni U. D., Water Management in Rashtrakuta Period, G.G.C.O.E.T, Nanded, 2003, p.10-18.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

रवींद्रनाथ टागोर यांच्या मानवी स्वातंत्र्याच्या संकल्पनेचा चिकित्सक अभ्यास

कृष्णा ज्ञानदेव रुईकर
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगाव, ता.शेवगाव,जि.अ.नगर
Email: krushnaruikar@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180238
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 182-185
February- 2026
Submitted: 09 Jan. 2026
Revised: 19 Jan. 2026
Accepted: 06 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश:

रवींद्रनाथ टागोर यांनी मानवी स्वातंत्र्याची संकल्पना बहुआयामी आणि तात्त्विक परिमाणात मांडली. त्यांच्या मते स्वातंत्र्य केवळ राजकीय गुलामगिरीतून मुक्तता नव्हे, तर व्यक्तीच्या अंतर्मनातील भीती, अज्ञान, संकुचित राष्ट्रवाद आणि नैतिक अधःपतन यांपासून मुक्त होणे आहे. प्रस्तुत संशोधनलेख गुणात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीवर आधारित असून Gitanjali (1912) आणि Nationalism (1917) यांचा अभ्यास करून टागोरांच्या स्वातंत्र्यविषयक विचारांची समकालीन उपयुक्तता अधोरेखित केली आहे. तुलनात्मक दृष्टिकोनातून त्यांच्या विचारांची गांधीजी आणि श्रीअरविंद यांच्यासोबत तुलना केली असून समकालीन जागतिक संदर्भातील मानवतावादी उपयुक्तता स्पष्ट केली आहे. निष्कर्ष असा आहे की टागोरांचे स्वातंत्र्यविषयक विचार आध्यात्मिक, बौद्धिक, नैतिक आणि सामाजिक परिमाणात सर्वांगीण आहेत आणि आजच्या काळातही अत्यंत प्रासंगिक ठरतात.

कीवर्ड्स: *मानवी स्वातंत्र्य, आध्यात्मिकता, राष्ट्रवाद, विश्वमानवता, मानवतावाद, शिक्षण*

प्रस्तावना

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभी भारत ब्रिटिश वसाहतवादी सत्तेच्या राजकीय नियंत्रणाखाली, सामाजिक विषमतेच्या गुंतागुंतीत आणि उदयोन्मुख राष्ट्रवादी चळवळींच्या उष्ण वातावरणात उभा होता. स्वातंत्र्याची संकल्पना या काळात प्रामुख्याने राजकीय अर्थाने—परकीय सत्तेपासून मुक्तता—यापुरती मर्यादित होती. परंतु रवींद्रनाथ टागोर यांनी स्वातंत्र्याचा विचार केवळ राजकीय परिघात न पाहता, तो मानवी अस्तित्वाच्या अंतर्मन, चेतना आणि नैतिकतेशी निगडित व्यापक तत्त्वज्ञान म्हणून मांडला. त्यांच्या मते, "राजकीय स्वातंत्र्य आवश्यक असले तरी ते अंतिम ध्येय नाही, खरे स्वातंत्र्य हे मनाच्या आणि आत्म्याच्या मुक्तीत आहे" (*Gitanjali* 1912, कविता 35).

टागोरांच्या विचारविश्वात स्वातंत्र्य ही एक बहुआयामी प्रक्रिया आहे,ती भीतीमुक्त मनाची अवस्था, विवेकाधिष्ठित चिंतनाची सवय, नैतिक सुसंवादाची जाणीव आणि सर्जनशील आत्मप्रकाशाची अनुभूती आहे. त्यांच्या लेखनातून स्पष्ट होते की, व्यक्ती जर मानसिक गुलामगिरी, अंधानुकरण आणि संकुचित ओळखींच्या चौकटीत अडकली, तर राजकीय स्वातंत्र्यही अपूर्ण राहते. म्हणूनच त्यांनी स्वातंत्र्याला अंतर्गत आत्मजागृतीशी जोडले आणि त्याला सांस्कृतिक व आध्यात्मिक अधिष्ठान दिले.

टागोरांचे वैशिष्ट्य असे की त्यांनी राष्ट्रवादालाही प्रश्नांकित केले. *Nationalism* (1917) मध्ये त्यांनी आक्रमक व यांत्रिक राष्ट्रवादावर टीका करताना मानवतेला सर्वोच्च मूल्य मानले. त्यांच्या दृष्टीने राष्ट्र हे साधन असून मानवता हे ध्येय आहे. ही भूमिका त्या काळातील अनेक राष्ट्रवादी विचारांपेक्षा वेगळी आणि व्यापक होती. टागोरांच्या स्वातंत्र्यसंकल्पनेचा उगम त्यांच्या सांस्कृतिक आणि तात्त्विक पार्श्वभूमीतही आढळतो.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
कृष्णा ज्ञानदेव रुईकर, सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगाव, ता. शेवगाव, जि. अ. नगर

How to cite this article:
रुईकर. कृष्णा. ज्ञानदेव. (2026). रवींद्रनाथ टागोर यांच्या मानवी स्वातंत्र्याच्या संकल्पनेचा चिकित्सक अभ्यास. Journal of Research and Development, 18(2(XX), 182–185. https://doi.org/10.5281/zenodo.19548453

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19548453
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

ब्राह्मो विचारधारा, उपनिषदांची अद्वैतपरंपरा आणि पाश्चात्य उदारमतवादी मूल्ये यांच्या समन्वयातून त्यांनी स्वातंत्र्याला मानवकेंद्रित व वैश्विक अर्थ दिला. त्यामुळे त्यांचे स्वातंत्र्यतत्त्वज्ञान हे पूर्व-पश्चिम संवादाचे सर्जनशील फलित ठरते.

आजच्या जागतिकीकरण, सांस्कृतिक ध्रुवीकरण आणि डिजिटल युगातील मानसिक परावलंबित्वाच्या पार्श्वभूमीवर टागोरांची स्वातंत्र्यसंकल्पना नव्याने वाचण्याची आवश्यकता अधिक प्रकर्षाने जाणवते. त्यांच्या दृष्टीने खरे स्वातंत्र्य म्हणजे भीतीविरहित मन, विवेकपूर्ण विचार, सर्जनशील अभिव्यक्ती आणि प्रेमाधिष्ठित सहअस्तित्व—हीच संकल्पना आधुनिक मानवतेसाठी दिशादर्शक ठरते. त्यामुळे टागोरांच्या मानवी स्वातंत्र्याच्या संकल्पनेचा चिकित्सक अभ्यास हा केवळ ऐतिहासिक किंवा साहित्यिक उपक्रम नसून, तो समकालीन वैचारिक गरज आहे.

संशोधन उद्दिष्टे

1. टागोर यांच्या मानवी स्वातंत्र्याच्या संकल्पनेचे तात्त्विक विश्लेषण करणे.
2. राष्ट्रवादावरील त्यांच्या भूमिकेचे चिकित्सक मूल्यांकन करणे.
3. शिक्षण व आध्यात्मिकतेशी संबंधित त्यांच्या विचारांचे परीक्षण करणे.
4. तुलनात्मक दृष्टिकोनातून गांधीजी आणि श्रीअरविंद यांच्या स्वातंत्र्यविषयक विचारांशी तुलना करणे.
5. समकालीन जागतिक संदर्भात त्यांच्या विचारांची उपयुक्तता अधोरेखित करणे.

संशोधन प्रश्न

- टागोरांच्या मते खरे स्वातंत्र्य काय आहे ?
- राष्ट्रवाद आणि मानवतावाद यांतील संबंध त्यांनी कसा स्पष्ट केला ?
- आधुनिक जागतिक संदर्भात टागोरांची स्वातंत्र्य संकल्पना किती उपयुक्त आहे ?

संशोधन पद्धती

हा लेख गुणात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतीवर आधारित आहे.

- Primary sources: *Gitanjali* (1912), *Nationalism* (1917)
- Secondary sources: Sen (2005), Datta & Robinson (1995)
- तुलनात्मक दृष्टिकोन: गांधीजी आणि श्री अरबिंदो यांच्या विचारांशी तुलना
- विषयगत विश्लेषण: आध्यात्मिक, बौद्धिक, सामाजिक आणि शैक्षणिक दृष्टिकोनातून

सैद्धांतिक चौकट

टागोरांच्या स्वातंत्र्य संकल्पनेचा अभ्यास मानवतावाद आणि उदारमतवाद या तत्त्वांच्या संदर्भात करता येतो.

- मानवतावाद व्यक्तीच्या प्रतिष्ठेला सर्वोच्च मानतो.
- उदारमतवाद वैचारिक आणि बौद्धिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करतो.

टागोरांच्या दृष्टिकोनात या दोन्ही प्रवाहांचा समन्वय असून, त्याला आध्यात्मिक अधिष्ठान दिले आहे.

तुलनात्मक दृष्टिकोनातून, गांधीजींचा राष्ट्रवाद अधिक नैतिक-राजकीय प्रेरित होता, तर श्रीअरविंदचा दृष्टिकोन आध्यात्मिक-क्रांतिकारी होता. टागोरांचा दृष्टिकोन मानवकेंद्रित आणि बौद्धिक स्वातंत्र्यावर आधारित होता.

मानवी स्वातंत्र्याची संकल्पना

आध्यात्मिक स्वातंत्र्य :

Rabindranath Tagore यांच्या मते खरे स्वातंत्र्य हे आत्म्याच्या जागृतीत आहे. बाह्य राजकीय बंधने तोडणे आवश्यक असले तरी अंतर्मनातील भीती, अहंकार, द्वेष, अज्ञान आणि संकुचित अहंभाव यांपासून मुक्ती मिळाल्याशिवाय स्वातंत्र्य परिपूर्ण होत नाही. *Gitanjali* (1912, कविता 35) मध्ये त्यांनी "भीतीमुक्त मन" ही संकल्पना मांडताना स्वातंत्र्याला आध्यात्मिक उंची दिली आहे.

- व्यक्तीने आपल्या अंतर्मनातील दिव्यता ओळखून विश्वाशी सुसंवाद साधावा.
- आत्ममुक्ती ही सामाजिक व नैतिक मुक्तीची पूर्वअट आहे.
- बाह्य स्वराज्यापेक्षा अंतर्गत स्वराज्य अधिक मूलभूत आहे.

टागोरांच्या दृष्टीने आध्यात्मिक स्वातंत्र्य म्हणजे व्यक्ती आणि विश्व यांतील एकात्मतेची अनुभूती; ही अनुभूती व्यक्तीला संकुचित ओळखींपासून मुक्त करते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

बौद्धिक व वैचारिक स्वातंत्र्य :

टागोरांनी बौद्धिक गुलामगिरीला मानवी प्रगतीसाठी सर्वात मोठा अडथळा मानले. अंधश्रद्धा, परंपरांचा अतिरेक, विचारशून्य राष्ट्रभक्ती आणि यांत्रिक शिक्षणपद्धती यांचा त्यांनी स्पष्ट विरोध केला. *Nationalism* (1917) मध्ये त्यांनी राष्ट्राच्या अतिरेकी पूजेवर टीका करताना विवेकाधिष्ठित मानवतावादाचा पुरस्कार केला.

- शिक्षणाचा उद्देश केवळ माहिती देणे नसून मुक्त चिंतन व सर्जनशीलता विकसित करणे आहे.
- संवाद, प्रश्नशीलता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांना त्यांनी महत्त्व दिले.
- वैचारिक स्वातंत्र्य हे लोकशाही आणि नैतिक समाजाचे अधिष्ठान आहे.

टागोरांच्या मते, विचारस्वातंत्र्याशिवाय राजकीय स्वातंत्र्य देखील अपूर्ण राहते.

राष्ट्रवादावरील चिकित्सक भूमिका :

Nationalism मध्ये टागोरांनी आक्रमक, स्वार्थी आणि यांत्रिक राष्ट्रवादावर कठोर टीका केली. त्यांच्या मते राष्ट्र जर मानवी मूल्यांपेक्षा वरचढ ठरले, तर ते व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर मर्यादा आणते.

- राष्ट्रवाद मानवतेच्या सेवेसाठी असावा, मानवतेवर वर्चस्वासाठी नव्हे.
- सांस्कृतिक विविधतेचा सन्मान आणि सहअस्तित्व हेच राष्ट्राचे खरे बळ आहे.
- टागोरांचा राष्ट्रवाद सांस्कृतिक, मानवतावादी आणि सर्जनशील स्वरूपाचा होता.

तुलनात्मक दृष्टिकोन :

- महात्मा गांधी यांनी राष्ट्रवादाला नैतिक व राजकीय अधिष्ठान दिले; स्वराज्य हे आत्मसंयमाशी जोडले.
- श्री अरबिंदो यांनी राष्ट्राला आध्यात्मिक शक्तीचे प्रकटीकरण मानले.
- टागोरांनी मात्र मानवतेला सर्वोच्च मूल्य मानत राष्ट्रवादाच्या मर्यादा दाखवून दिल्या.
- अमर्त्य सेन यांच्या मतानुसार, टागोरांचा दृष्टिकोन उदारमतवादी आणि वैश्विक मानवतावादाचा सर्वोच्च नमुना आहे.

शिक्षण आणि स्वातंत्र्य :

टागोरांनी शिक्षणाला मानवी स्वातंत्र्याचे प्रभावी साधन मानले. Visva-Bharati University ची स्थापना करून त्यांनी शिक्षणात स्वातंत्र्य, सर्जनशीलता आणि निसर्गस्नेह यांचा समन्वय साधला.

- शिक्षण हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी असावे.
- अनुभवाधारित, प्रयोगात्मक आणि कला-संलग्न शिक्षणाद्वारे व्यक्ती आत्मिक, बौद्धिक व सामाजिक स्वातंत्र्य साधू शकते.
- शिक्षक-विद्यार्थी संवाद आणि निसर्गाशी जवळीक ही त्यांच्या शिक्षणतत्त्वज्ञानाची वैशिष्ट्ये होती.

त्यांच्या मते, शिक्षण हे केवळ व्यवसायाभिमुख नव्हे तर जीवनाभिमुख असावे.

विश्वमानवतेची संकल्पना :

टागोरांच्या स्वातंत्र्यविचाराचा अंतिम विस्तार म्हणजे विश्वमानवतेची संकल्पना. त्यांच्या मते मानवतेचे अंतिम ध्येय प्रेम, सहकार्य आणि सुसंवाद आहे. राष्ट्र, धर्म किंवा संस्कृती यांच्या सीमांपलीकडे जाऊन व्यक्तीने वैश्विक बंधुभाव स्वीकारावा.

- जागतिक सहअस्तित्व आणि सांस्कृतिक संवाद यांचा त्यांनी पुरस्कार केला.
- मानवाधिकार, समानता आणि विविधतेचा सन्मान हे त्यांच्या विचारांचे केंद्र आहे.
- टागोरांचा “Cosmopolitan Human” हा आदर्श आजच्या जागतिकीकरणाच्या युगात अधिकच प्रासंगिक ठरतो.

अशा प्रकारे, टागोरांची मानवी स्वातंत्र्याची संकल्पना आध्यात्मिक जागृतीपासून विश्वबंधुत्वापर्यंत प्रवास करणारी, बहुआयामी आणि मानवकेंद्रित आहे.

चिकित्सक विश्लेषण

1 सकारात्मक पैलू

- स्वातंत्र्याची बहुआयामी आणि मानवकेंद्रित व्याख्या
- आध्यात्मिक व नैतिक अधिष्ठान
- शिक्षणातील प्रयोगशील दृष्टिकोन
- जागतिक सहअस्तित्व आणि विश्वबंधुत्वाचा पुरस्कार
- तुलनात्मक दृष्टिकोनातून गांधी आणि श्री अरबिंदो यांच्या विचारांशी सुसंगतता

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

2 मर्यादा

- राजकीय संघर्षाची व्यावहारिक रणनीती कमी
- काही राष्ट्रवादी विचारवंतांनी राष्ट्रवादावरील टीका स्वीकारली नाही
- आदर्शवादी दृष्टिकोनामुळे काही वेळा व्यावहारिक अडचणी उद्भवू शकतात

समकालीन संदर्भ

आजच्या जागतिकीकरण, सांस्कृतिक संघर्ष, धार्मिक असहिष्णुता आणि अति राष्ट्रवादाच्या काळात टागोरांची मानवी स्वातंत्र्याची संकल्पना अत्यंत सुसंगत ठरते.

- विचारस्वातंत्र्य, मानवाधिकार, जागतिक सहकार्य आणि पर्यावरणीय संतुलन या क्षेत्रांत त्यांचे विचार मार्गदर्शक ठरतात.
- डिजिटल युगात, विविधतावाद, संवाद आणि सर्जनशील शिक्षण या मुद्द्यांवर त्यांचे तत्त्वज्ञान अत्यंत प्रासंगिक आहे.

निष्कर्ष

टागोरांची मानवी स्वातंत्र्याची संकल्पना बहुआयामी, मानवकेंद्रित आणि जागतिकदृष्ट्या उपयुक्त आहे.

- स्वातंत्र्याचे राजकीय, आध्यात्मिक, बौद्धिक आणि सामाजिक परिमाण त्यांनी स्पष्ट केले.
- खरे स्वातंत्र्य म्हणजे भीतीमुक्त मन, विवेकपूर्ण विचार आणि प्रेममय सहअस्तित्व.
- त्यांच्या विचारांची आधुनिक काळातही वैचारिक, नैतिक आणि शैक्षणिक उपयुक्तता आहे.

संदर्भसूची

1. Tagore, Rabindranath. (1912). Gitanjali (Song Offerings). London: Macmillan Publishers.
2. Tagore, Rabindranath. (1917). Nationalism. New York: Macmillan Company.
3. Datta, Krishna., & Robinson, Andrew. (1995). Rabindranath Tagore: The Myriad-Minded Man. London: Bloomsbury Publishing.
4. Sen, Amartya. (2005). The Argumentative Indian: Writings on Indian History, Culture and Identity. London: Allen Lane.
5. Gandhi, Mahatma. (1909). Hind Swaraj. Ahmedabad: Navajivan Publishing House.
6. Sri Aurobindo. (1919). The Ideal of Human Unity. Pondicherry: Sri Aurobindo Ashram.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन

सविता भिवा धनवडे
श्रीमती सुशीला देवी मल्हारराव देसाई कन्या महाविद्यालय, पेठ वडगाव
Email: krushnaruikar@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180239
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 186-188
February- 2026
Submitted: 09 Jan. 2026
Revised: 19 Jan. 2026
Accepted: 06 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश:

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे एक प्रभावी साधन मानले जाते. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, जातीय भेदभाव आणि लैंगिक असमानता यांसारख्या समस्यांवर मात करण्यासाठी शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते. शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये विचारशक्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि जागरूकता निर्माण होते, ज्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडतात.

इतिहासात Jyotirao Phule, Savitribai Phule आणि B. R. Ambedkar यांसारख्या समाजसुधारकांनी शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक न्याय आणि समानतेसाठी मोठे कार्य केले. त्यांनी वंचित घटकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली, ज्यामुळे समाजातील विषमता कमी करण्यास मदत झाली.

आधुनिक काळात शिक्षणामुळे स्त्री-पुरुष समानता, मानवाधिकारांची जाणीव, आणि लोकशाही मूल्यांची जपणूक यांना चालना मिळाली आहे. तसेच, शिक्षणामुळे आर्थिक विकास, रोजगारनिर्मिती आणि सामाजिक गतिशीलता वाढली आहे. अशा प्रकारे, शिक्षण हे केवळ वैयक्तिक विकासाचे साधन नसून सामाजिक परिवर्तनाचे एक महत्त्वपूर्ण माध्यम आहे.

मुख्यशब्द: *शिक्षण, सामाजिक परिवर्तन, सामाजिक न्याय, समानता, वैज्ञानिक दृष्टिकोन*

प्रस्तावना

शिक्षण हे व्यक्ती आणि समाज यांच्या विकासातील अत्यंत प्रभावी साधन मानले जाते. समाजातील विचारसरणी, जीवनशैली, मूल्यव्यवस्था आणि सामाजिक रचना बदलण्यात शिक्षणाची महत्त्वाची भूमिका असते. सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजातील रचना, संस्था, मूल्ये आणि वर्तनपद्धती यामध्ये काळानुसार होणारे बदल. हे बदल सकारात्मक दिशेने घडवून आणण्यासाठी शिक्षण हे एक प्रभावी माध्यम आहे.

शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये जागरूकता निर्माण होते, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होतो आणि सामाजिक समस्यांकडे समतोल व विवेकी दृष्टीने पाहण्याची क्षमता वाढते. त्यामुळे सामाजिक न्याय, समानता, लोकशाही आणि मानवतावादी मूल्यांचा प्रसार होण्यास मदत होते. शिक्षण हे व्यक्ती आणि समाज यांच्या विकासातील अत्यंत प्रभावी साधन मानले जाते. समाजातील विचारसरणी, जीवनशैली, मूल्यव्यवस्था आणि सामाजिक रचना बदलण्यात शिक्षणाची महत्त्वाची भूमिका असते. सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजातील रचना, संस्था, मूल्ये आणि वर्तनपद्धती यामध्ये काळानुसार होणारे बदल. हे बदल सकारात्मक दिशेने घडवून आणण्यासाठी शिक्षण हे एक प्रभावी माध्यम आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
सविता भिवा धनवडे, श्रीमती सुशीला देवी मल्हारराव देसाई कन्या महाविद्यालय, पेठ वडगाव

How to cite this article:
धनवडे. सविता. भिवा. (2026). शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन. Journal of Research and Development, 18(2(XXI)), 186–188. https://doi.org/10.5281/zenodo.19548486

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19548486
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

शिक्षणाची संकल्पना

शिक्षण ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी ज्ञान, कौशल्य, मूल्ये आणि संस्कार यांचा विकास करणे म्हणजे शिक्षण होय. शिक्षण केवळ शाळा किंवा महाविद्यालयांपुरते मर्यादित नसून ते आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे.

समाजातील प्रत्येक घटकाला शिक्षण मिळाल्यास समाज अधिक प्रगत, समतोल आणि सुजाण बनतो. शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये आत्मविश्वास, निर्णयक्षमता आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण होते.

सामाजिक परिवर्तनाची संकल्पना

सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजातील रचना, संस्था, मूल्यव्यवस्था आणि संबंध यामध्ये होणारे बदल. हे परिवर्तन आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय किंवा शैक्षणिक कारणांमुळे घडू शकते.

सामाजिक परिवर्तनामुळे समाज अधिक प्रगत, न्याय्य आणि समतोल बनू शकतो. शिक्षण हे या परिवर्तनाला गती देणारे प्रमुख साधन आहे.

शिक्षणामुळे होणारे सामाजिक परिवर्तन

शिक्षणामुळे समाजामध्ये अनेक सकारात्मक बदल घडून येतात. शिक्षणामुळे अंधश्रद्धा, रूढी आणि अज्ञान कमी होण्यास मदत होते. व्यक्ती अधिक जागरूक आणि विवेकी बनते.

स्त्री-पुरुष समानता, सामाजिक न्याय, लोकशाही मूल्ये आणि मानवाधिकार यांचा प्रसार शिक्षणामुळे होतो. शिक्षणामुळे व्यक्ती स्वतःच्या हक्कांविषयी जागरूक होते आणि समाजातील अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची क्षमता निर्माण होते.

भारतातील सामाजिक परिवर्तनात शिक्षणाची भूमिका

भारतात सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यात शिक्षणाची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या महान समाजसुधारकांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रमुख साधन मानले. स्त्री शिक्षण, अस्पृश्यता निर्मूलन, सामाजिक समानता आणि लोकशाही मूल्यांचा प्रसार यामध्ये शिक्षणाचा मोठा वाटा आहे.

आधुनिक काळातील शिक्षण आणि सामाजिक बदल

आधुनिक काळात माहिती तंत्रज्ञान, जागतिकीकरण आणि वैज्ञानिक प्रगती यामुळे शिक्षणाचे महत्त्व अधिक वाढले आहे. डिजिटल शिक्षण, ऑनलाईन शिक्षण आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ज्ञान अधिक व्यापक पद्धतीने समाजापर्यंत पोहोचत आहे. यामुळे सामाजिक जागरूकता वाढत आहे आणि समाजातील अनेक समस्या सोडवण्यासाठी नवीन संधी निर्माण होत आहेत.

निष्कर्ष

शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन यांचा अतिशय घनिष्ठ संबंध आहे. शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये जागरूकता, समता, न्याय आणि लोकशाही मूल्यांचा विकास होतो. समाज अधिक प्रगत, समतोल आणि सुजाण बनवण्यासाठी शिक्षणाचा प्रसार करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया अधिक प्रभावी आणि सकारात्मक दिशेने घडू शकते.

संदर्भ सूची

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – शिक्षणविषयक विचार
२. महात्मा ज्योतिराव फुले – शेतकऱ्यांचा असूड
३. सावित्रीबाई फुले – स्त्री शिक्षण चळवळ
४. यशवंतराव चव्हाण – शिक्षणविषयक धोरणे
५. वि. का. राजवाडे – मराठी भाषा आणि साहित्याचा इतिहास
६. ग. प्र. प्रधान – समाजशास्त्र परिचय
७. राम आहूजा – Social Problems in India
८. एम. एन. श्रीनिवास – Social Change in Modern India

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

९. योगेंद्र सिंह – Modernization of Indian Tradition

१०. ए. आर. देसाई – Social Background of Indian Nationalism

११. डॉ. एस. राधाकृष्णन – Education and Society

१२. पाउलो फ्रेरे – Pedagogy of the Oppressed

१३. UNESCO – Education for Social Change Reports

१४. भारत सरकार – राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020

१५. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ – समाजशास्त्र

१६. डॉ. जी. एस. घुर्ये – Indian Sociology

१७. स्वामी विवेकानंद – शिक्षणविषयक विचार

१८. टिळक, आगरकर – सामाजिक आणि शैक्षणिक विचार

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

भारतीय राज्यघटना आणि प्रजासत्ताक 75 वर्ष : आव्हाने

गणेश बाळासाहेब मोरे
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, के. जे. सोमेय्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कोपरगाव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
Email:

Manuscript ID:
JRD -2026-180240
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 189-191
February- 2026
Submitted: 09 Jan. 2026
Revised: 19 Jan. 2026
Accepted: 06 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश:

लोकशाहीची परिभाषा ही काळा नुसार बदल होत असतो आज वर्तमान कालखंडाचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, आज जास्त प्रमाणात लोक हे तक्रार करतात की, आमच्या समस्यांचे निराकरण होत नाही व त्यावरती कोणतेही ठोस पावले प्रशासनाकडून उचलली जात नाहीत काही सरकारी शाळेत न जाणारी शिक्षक असो, स्वच्छता करणारे कर्मचारी असो, प्रशासकीय अधिकारी रेशन दुकानदार, ठेकेदार, राजकीय पुढारी, पोलीस कर्मचारी यावरती कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नसल्याने आज स्वातंत्र्यानंतरच्या 78 वर्षानंतरही भारतात गरिबी, अशिक्षितपणा आजही दिसून येतो.

मुख्यशब्द: *लोकशाही व्यवस्था, घटनात्मक मूल्ये, मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्ये, न्यायपालिका स्वायत्तता, संघराज्य व्यवस्था, निवडणूक प्रक्रिया, सामाजिक न्याय*

प्रस्तावना

भारताने संसदीय लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला आहे. 15 ऑगस्ट 1947 रोजी भारत हे एक सार्वभौम राष्ट्र झाले व भारताने संसदीय लोकशाही शासन पद्धतीचा पुरस्कार केला भारताच्या या स्वातंत्र्यलढ्यात महात्मा गांधी, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल, बाळ गंगाधर टिळक जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभाई पटेल, भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यासारख्या विविध नेत्यांनी व क्रांतिकारकांनी आपले योगदान दिलेले आहे. ब्रिटिश कालखंडात भारतीयांनी अहिंसा, सविनय कायदेमंडळ चळवळ यासारख्या विविध मार्गाने ब्रिटिशांविरोधात लढा दिला. इंग्रजांनी विविध कायद्यांच्या माध्यमातून भारतीयांची गळचेपी केली. त्यामुळे तत्कालीन समाज सुधारकांनी स्वशासनाची मागणी व पुरस्कार केला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन, शिक्षण, आरोग्य, संरक्षण अशा विविध क्षेत्रात अतुलनीय प्रगती केलेली आहे. भारतात स्वातंत्र्यानंतरच्या 78 वर्ष कालखंडात लोकशाहीची बीजे रोवण्यामध्ये यशस्वी झालेले दिसून येते. भारतात राजकीय सत्ता उपभोगण्याचे कार्य विविध राजकीय पक्ष व आघाड्यांच्या माध्यमातून केले गेले आहे. परंतु आजही भारतीय लोकशाहीमध्ये विविध आव्हाने समस्या निर्माण झालेल्या आपणास दिसून येतात. यामध्ये प्रामुख्याने निरक्षरता, गरिबी, कृषी व ग्रामीण विकासातील असमतोल, भ्रष्टाचार, दहशतवाद, बेरोजगारी, नक्षलवाद यासारखे आव्हाने निर्माण झालेली आहेत.

21 व्या शतकातील भारतीय लोकशाहीची दशा:

लोकशाहीची परिभाषा ही काळा नुसार बदल होत असतो आज वर्तमान कालखंडाचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, आज जास्त प्रमाणात लोक हे तक्रार करतात की आमच्या समस्यांचे निराकरण होत नाही त्यावरती कोणतेही ठोस पावले प्रशासनाकडून उचलली जात नाहीत.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
गणेश बाळासाहेब मोरे, संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, के. जे. सोमेय्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कोपरगाव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

How to cite this article:
मोरे, . गणेश . बाळासाहेब . (2026). भारतीय राज्यघटना आणि प्रजासत्ताक 75 वर्ष : आव्हाने. Journal of Research and Development, 18(2(XXI)), 189–191. https://doi.org/10.5281/zenodo.19548520

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19548520

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

काही सरकारी शाळेत न जाणारे शिक्षक असो, स्वच्छता करणारे कर्मचारी, प्रशासकीय अधिकारी, रेशन दुकानदार, ठेकेदार, राजकीय पुढारी, पोलीस कर्मचारी यावरती कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नसल्याने आज स्वातंत्र्यानंतरच्या 78 वर्षानंतरही भारतात गरिबी अशिक्षित पणा आजही दिसून येतो.

आजही कित्येक लोकांना उपासमारीचा सामना करावा लागत आहे. रस्ते हे अस्वच्छ व खड्ड्यांनी ग्रस्त आहेत आजही लोक टीबी सारख्या आजाराने त्रस्त आहेत. भारतामध्ये गुन्हेगारी पार्श्वभूमी, बलात्कारी, पक्ष बदलणारे सदस्य हे संसदेमध्ये जनतेचे प्रतिनिधित्व करताना आपणास दिसून येत आहेत. भ्रष्टाचार हा मोठ्या प्रमाणात आहे या विरोधात आवाज उठविणारी विविध संविधानात्मक जी मार्ग आहेत त्यामध्ये सत्याग्रह, उपोषण अभिव्यक्ती स्वातंत्र्य यावरती मर्यादा आणल्या जात आहेत. भारत हे जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र आहे याबद्दल कोणतीही शंका नाही परंतु भारत हे एक यशस्वी प्रजासत्ताक राष्ट्र आहे का भारतातील इतिहासाचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, भारतात या लोकशाहीची बीजे इ. सन. पूर्व कालखंडापासून रुजलेली आहेत. भारतामध्ये लोकशाही शासन व्यवस्था टिकून ठेवण्यामध्ये जनतेची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. तरी राजकीय पक्ष नेते हे त्यांच्यामुळे येथील लोकशाही टिकून आहे अशा प्रकारची भूमिका घेताना दिसून येतात. आज वर्तमानात खूप निराशा जनक परिस्थिती लोकशाहीच्या बाबत आपणास दिसून येते उज्वल भवितव्याच्या दृष्टिकोनातून कोणतेही ठाम भूमिका घेतलेली दिसून येत नाही परंतु यामध्ये बदल होणे आवश्यक आहे.

भारतीय लोकशाही समोरील आव्हाने :

भारतीय लोकशाहीचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, पारंपरिक काही समस्या दूर करण्यात आपल्याला काही अंशी यश आलेले दिसून येते. राज्यघटनेच्या माध्यमातून आपण संसदीय लोकशाहीचा स्वीकार केलेला आहे. त्यापुढे राजकीय अस्थिरता, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, गुन्हेगारीचे राजकीयकरण, सत्ता प्राप्तीची लालसा, भ्रष्टाचार, काळाबाजार इत्यादी घटकांचा वाढता प्रभाव ही आव्हाने भारतीय लोकशाही पुढे दिस दिसून येत आहेत. भारतीय लोकशाही समोरील आधुनिक कालखंडातील आव्हाने पुढील प्रमाणे दिसून येतात.

दहशतवाद व नक्षलवादयुक्त राजकारण :

वर्तमान कालखंडाचा विचार केला असता असे दिसून येते की, जगातील बहुतांश राष्ट्र ही या समस्याने ग्रस्त आहेत. विविध उद्दिष्टांसाठी सरकारचे लक्ष आपल्याकडे वेधण्यासाठी संघटितपणे कृत्य केले जात आहेत. भारतामध्ये या घटनांनी भीतीचे वातावरण पाहावयास मिळते स्वातंत्र्याच्या इतक्या वर्षानंतरही दहशतवाद व नक्षलवाद एक कलंक म्हणून पुढे येत आहे. केव्हा कुठून हल्ला होईल, बॉम्बस्फोट होईल हे भय दिसून येते. 2001 मध्ये झालेला श्रीनगर हवाई केंद्रावरील हल्ला, 2006 मध्ये जम्मू-काश्मीरच्या दोडा भागात झालेला दहशतवादी हल्ला, महाराष्ट्राच्या मुंबईमध्ये 1993,1998 मध्ये झालेले साखळी बॉम्बस्फोट 2008 मध्ये झालेला मुंबई दहशतवादी हल्ला, भारताची राजधानी दिल्ली डिसेंबर 2001 मध्ये झालेला भारतीय संसदेमधील हल्ला, गुजरात मधील 2002 मधील गोध्रा हत्याकांड, 2002 मधील अमरनाथ तीर्थ यात्री झालेली हत्या, नुकताच 10 डिसेंबर 2025 मध्ये झालेला कारस्फोट असे विविध लहान-मोठे हल्ल्यांच्या माध्यमातून दहशतवादी कृत्ये दहशतवाद्यांच्या माध्यमातून होत असून भारतीय लोकशाही पुढे आव्हान निर्माण करण्याचे कार्य होत आहे.

नक्षलवाद हे आपल्या विचारधारेनुसार सामाजिक, आर्थिक न्यायव्यवस्था निर्माण व्हावी यासाठी कार्य करताना दिसून येत आहे. लोकशाही शासन व्यवस्थेला विरोध करून शासनाच्या मार्गाने आपले उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न नक्षलवाद्यांच्या माध्यमातून केला जातो. सुरक्षा दलांवर हल्ले करणे, बॉम्बस्फोट करणे, सरकारी मालमत्तेचे नुकसान करणे या मार्गाने प्रशासनाला विरोध केला जात आहे. भारतातील छत्तीसगड, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, उडीसा, बंगाल, बिहार या राज्यांमध्ये नक्षलवाद्यांचा प्रभाव दिसून येतो. भारतात हिंसक नक्षलवादी आंदोलनाने केंद्र सरकार व राज्य सरकार यांना प्रभावित केले आहे. नक्षलवाद भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेला बाधा निर्माण करत आहे.

गुन्हेगारी, बेकायदेशीर कृत्ये. गैर कायदेशीर कृत्ये :

भारतात आज आपणास गुन्हेगारी प्रवृत्तीचा प्रभाव दिसून येत आहे भारतातील समाज व्यवस्था, गाव, शहरे, विविध घटक राज्ये देश हे गुन्हेगारांचे आश्रयस्थान बनलेले दिसून येतात. प्रत्येक राष्ट्र हे या गुन्हेगारीचे उच्चाटन करण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु कोणतेही राष्ट्र वर्तमानामध्ये यामध्ये यशस्वी झालेले दिसून येत नाही आज भारतामध्ये दिवसेंदिवस गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे काही व्यक्ती या मजबुरीने गुन्हेगारीकडे जातात तर काही व्यक्ती स्वार्थासाठी गुन्हेगारीकडे येत आहेत. या वाढत्या संख्येने सर्वसामान्य जनतेला बाहेर मुक्तपणाने संचार करण्यावर मर्यादा येत आहेत. ही प्रवृत्ती भारतीय लोकशाही व्यवस्थेला रोखण्याचे कार्य करीत आहे. आज भारतात विविध गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले लोक हे राजकीय नेतृत्व करत आहेत जनतेने ज्यांची तक्रार करावयाची तेच लोक सत्तेत शासनामध्ये येत आहेत. आज भारतामध्ये राजकारणाचे गुन्हेगारीकरण हे मोठ्या प्रमाणात होत आहे. सामाजिक व आर्थिक घटकांमध्ये या गुन्हेगारीचे प्रमाण सर्वाधिक आहे.

राजकीय भ्रष्टाचार :

आजच्या आधुनिक कालखंडात भारतीय लोकशाही व्यवस्थेवर सर्वाधिक परिणाम करणारा घटक म्हणजे राजकीय भ्रष्टाचार होय. संविधान निर्मात्यांनी ज्या आदर्शांवरती भारतामध्ये संसदीय शासन व्यवस्थेची स्थापना केली होती. त्या आदर्श आणि सिद्धांतांचा

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

आत्मा नष्ट करण्याचे प्रयत्न होताना दिसत आहे. भारतातील लोकशाही व्यवस्थेमध्ये निवडणूक आयोगाचे स्थान महत्वपूर्ण आहे परंतु आज मोठ्या प्रमाणामध्ये मत विकत घेतली जातात. राष्ट्रीय भ्रष्टाचारामुळे आर्थिक दृष्ट्या संपन्न व्यक्ती गुन्हेगारी करूनही निरपराधी बनत आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक सामाजिक आणि नैतिकमूल्यांचे हनन करत आहेत. विविध क्षेत्रांमध्ये आज भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे करचोरी, लाचखोरी, बनावट भेसळसाठे काळाबाजार, काळेधन, गुन्हेगारी प्रवृत्ती इत्यादी घटक भारतीय लोकशाही व्यवस्थेला खिळखिळी करत आहे.

बलात्कारी, चोर, देशद्रोही लोक हे जनतेचे रक्षक होत आहे. संसद, घटक राज्य विधिमंडळामध्ये कामकाजामध्ये व असंसदीय शब्दप्रयोग व्यक्तिगत स्वार्थाच्या माध्यमातून होत आहेत. यामुळे राजकीय भ्रष्टाचार हे मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

प्रशासकीय भ्रष्टाचार :

भारतीय संविधानाच्या माध्यमातून निष्पक्ष स्वतंत्र व चांगले गतिमान प्रशासन हे जनसामान्यापर्यंत पोहोचवणे ही अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. परंतु राजकीय भ्रष्टाचाराप्रमाणेच प्रशासकीय भ्रष्टाचाराने भारतामध्ये गंभीर स्वरूप प्राप्त केलेले आहे. ज्यामुळे जनतेमध्ये लोकशाही शासन व्यवस्थेप्रति निराशा व अविश्वासाची भावना निर्माण होत आहे. प्रशासनातील नोकरशाहीच्या माध्यमातून पदाचा दुरुपयोग हा वाढताना दिसत आहे. कार्यकारी मंडळांना घेतलेल्या निर्णयांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रशासकीय अधिकाऱ्यांची असते परंतु राजकीय व प्रशासकीय घटकांच्या अगोदर युतीमुळे सर्वसामान्य जनतेला न्याय मिळताना दिसून येत नाही. सत्तेमध्ये येणे व सत्तेमध्ये सलगपणे राहण्यासाठी भ्रष्ट मार्गाचा वापर राज्यकर्ते करताना दिसून येतात. भ्रष्टाचारी, लाचखोर नोकरशाहीच्या माध्यमातून प्राप्त केले जात असून नोकरशाही ही गुन्हेगार अपराधी व्यक्तींकडून याची जुळवणी करत आहे. या प्रकारे प्रशासकीय भ्रष्टाचार दिवसेंदिवस वाढत आहे. प्रशासकीय भ्रष्टाचार हा भारताच्या आर्थिक, सामाजिक विकासाला विकलांग बनवत आहे.

बेरोजगारी :

भारतीय राजकीय व्यवस्थेमध्ये बेरोजगारी ही मोठी समस्या दिसून येते. सर्वाधिक तरुणांची संख्या असणाऱ्या देशांमध्ये ही गंभीर बाब आहे. बहुतांश लोकांना आवश्यक योग्यता असूनही त्यांना त्यांच्या इच्छेनुसार योग्य उपजीविकेचे साधन प्राप्त होत नाही. त्यामुळे रोजगार प्राप्त न झाल्याने बेरोजगार आपले मानसिक संतुलनावर परिणाम होत असून बेरोजगार युवक चोरी, लुटमार गुन्हेगारीकडे वळताना दिसून येत आहेत. कारखानदारीचे घटते प्रमाण, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यामुळे बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे या दृष्टिकोनातून बेरोजगारी दूर करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

सायबर गुन्हेगारी :

सायबर गुन्हा असा गुन्हा आहे ज्यामध्ये संगणक व इंटरनेट याच्या माध्यमातून काही गुन्हा करणे याला सायबर गुन्हेगारी असे म्हटले जाते. त्यामध्ये खाजगी माहितीचा वापर सार्वजनिक करणे याचा देखील समावेश होतो. यामध्ये ऑनलाइन गेम्स मोबाईल □प्स च्या माध्यमातून गोपनीय माहिती मिळवून त्याचा चुकीचा पद्धतीने वापर केला जातो. यामध्ये हॅकिंग यामध्ये संगणकाच्या मदतीने खाजगी माहिती हॅक करून व्यक्तीच्या नावाचा उपयोग करून गुन्हा केला जातो. व्हायरस पसरवणे यामध्ये गुन्हेगारीशी निगडित लोक सॉफ्टवेअर मध्ये व्हायरसच्या माध्यमातून संगणकातील माहितीला हानी पोहोचवतात. बोगस फोनकॉल्स याच्या माध्यमातून बँकेच्या नावाने फोन कॉल करून एटीएम नंबर त्यासंबंधी पासवर्ड मिळून त्याद्वारे फसवणूक केली जात आहे. तसेच सामाजिक प्रसार माध्यमांद्वारे राजकीय, धार्मिक, वैचारिक अफवा पोचवण्याचे कार्य केले जात आहे. त्यामुळे सामाजिक सलोख्याला, राष्ट्रीय एकात्मतेला आव्हान निर्माण करण्याचे कार्य या सायबर गुन्हेगारीच्या माध्यमातून होताना दिसून येते.

भारतीय संविधानाची निर्मिती होऊन आज 75 वर्षे पूर्ण झालेले आहेत या निमित्ताने भारतामध्ये अमृत महोत्सव साजरा आपण करत आहोत. परंतु आज आपल्याला आधुनिक कालखंडात भारतीय संविधान व लोकशाही पुढे नक्षलवाद, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, राजकीय भ्रष्टाचार, प्रशासकीय भ्रष्टाचार, बेरोजगारी यासारखी विविध आव्हाने उभे असून यामध्ये सुधारणा घडवून आणले तरच खऱ्या अर्थाने सर्वसामान्य नागरिकाला न्याय मिळू शकेल त्या दृष्टिकोनातून प्रयत्न होणे गरजेचे आहे.

संदर्भ ग्रंथ :

1. शिंदे लक्ष्मण, (2020), भारतीय लोकशाहीचा इतिहास, डायमंड पब्लिकेशन, पुणे.
2. एम. लक्ष्मीकांत, अनुवाद श्रीकांत गोखले, (2017), इंडियन पॉलिटी, के सागर पब्लिकेशन, पुणे
3. कश्यप सुभाष, (अनुवाद न. वा. पाटील), (2006), आपली संसद, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली.
4. कांबळे बाळ, एकनाथ खांदवे, (2012) भारतीय लोकशाही पुढील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन, पुणे
5. देशमुख अलका, (2014), भारतीय लोकशाही प्रक्रिया, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
6. व्होरा राजेंद्र, सुहास पळशीकर, (2024), भारतीय लोकशाही, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

वरिष्ठ महाविद्यालयातील आर्टस् आणि सायन्सच्या विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचा आणि भावनिक बुद्धिमत्तेचा अभ्यास

सविता रामचंद्र रेवडे
मानसशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण (केएमसी) कॉलेज, कोल्हापूर
Email: savitarevade83@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180241
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 192-195
February- 2026
Submitted: 10 Jan. 2026
Revised: 20 Jan. 2026
Accepted: 08 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

वरिष्ठ महाविद्यालयातील आर्टस् आणि सायन्स शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्य आणि भावनिक बुद्धिमत्तेचा अभ्यास हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. शिक्षणातील स्पर्धा, करिअरची अनिश्चितता, सामाजिक अपेक्षा आणि वैयक्तिक ताणतणाव यांचा विद्यार्थ्यांच्या मानसिक स्थितीवर मोठा परिणाम होतो. Mental Health या दृष्टीने विद्यार्थ्यांमध्ये ताण, चिंता, नैराश्य यांसारख्या समस्या आढळतात. भावनिक बुद्धिमत्ता (Emotional Intelligence) ही व्यक्तीच्या स्वतःच्या आणि इतरांच्या भावना ओळखण्याची, समजून घेण्याची आणि नियंत्रित करण्याची क्षमता दर्शवते. Emotional Intelligence उच्च असलेल्या विद्यार्थ्यांना तणाव व्यवस्थापन, निर्णयक्षमता आणि सामाजिक संबंधांमध्ये अधिक यश मिळते. अभ्यासातून असे दिसून येते की आर्टस् आणि सायन्स विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्य आणि भावनिक बुद्धिमत्तेच्या पातळीत काही प्रमाणात फरक आढळू शकतो, जो त्यांच्या अभ्यासक्रम, जीवनशैली आणि शैक्षणिक दबावावर अवलंबून असतो. योग्य समुपदेशन, योग, ध्यान आणि सकारात्मक वातावरण निर्माण करून विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यात सुधारणा करता येऊ शकते. अशा प्रकारे, मानसिक आरोग्य आणि भावनिक बुद्धिमत्ता यांचा परस्परसंबंध समजून घेणे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहे.

मुख्यशब्द: *मानसिक आरोग्य, Mental Health, Emotional Intelligence, आर्टस् आणि सायन्स विद्यार्थी, तणाव व्यवस्थापन, नैराश्य, समुपदेशन, भावनिक नियंत्रण, शैक्षणिक दबाव, विद्यार्थ्यांचा विकास*

प्रस्तावना

सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. या स्पर्धेच्या जगात स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी व विकासासाठी प्रत्येक जण संघर्षात्मक जीवन जगत आहे. त्यामुळे वेगवेगळ्या बाबतीत चिंता निर्माण होतात. विनाकारण चिंतेचा अनुभव घेणा-या व्यक्तीचे मानसिक आरोग्य ढासळलेले असते. परिणामी, अशा व्यक्तीमध्ये विकृती उद्भवण्याची शक्यता असते.

ज्या व्यक्तीची भावनिक बुद्धिमत्ता चांगले असते त्या व्यक्तीचे मानसिक आरोग्य चांगले असते.

व्याख्या:

मानसिक आरोग्य:

"आपल्याशी संबंधित व्यक्ती व सभोवतालचे जग यांच्याशी आनंदाने व सक्षमतेने समायोजन साधणाऱ्या व्यक्तीचे मानसिक आरोग्य चांगले असते."

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
सविता रामचंद्र रेवडे, मानसशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण (केएमसी) कॉलेज, कोल्हापूर

How to cite this article:
सविता रामचंद्र रेवडे. (2026). वरिष्ठ महाविद्यालयातील आर्टस् आणि सायन्सच्या विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचा आणि भावनिक बुद्धिमत्तेचा अभ्यास. Journal of Research and Development, 18(2(XXI)), 192–195. https://doi.org/10.5281/zenodo.19548562

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19548562
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

कार्ल मेनिंगर (१९४५)

भावनिक बुद्धिमत्ता:

"भावनिक बुद्धिमत्ता म्हणजे स्वतःच्या आणि इतरांच्या भावना ओळखण्याची, स्वतःला प्रवृत्त करण्याची आणि स्वतःच्या आणि इतरांच्या परस्पर संबंधातील भावनांची व्यवस्थापन करण्याची क्षमता होय."

गोलमन

संशोधनाचा हेतू:

वरिष्ठ महाविद्यालयातील आर्टस् आणि सायन्सच्या विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचा व भावनिक बुद्धिमत्तेचा अभ्यास करण्याच्या हेतूने प्रस्तुत संशोधन हाती घेतले आहे.

समस्या:

वरिष्ठ महाविद्यालयातील आर्टस् आणि सायन्सच्या विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचा व भावनिक बुद्धिमत्तेचा एक अभ्यास.

संशोधनाची उद्दिष्टे:

१. वरिष्ठ महाविद्यालयातील आर्टस् आणि सायन्सच्या विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचे मापन करणे.

२. वरिष्ठ महाविद्यालयातील आर्टस् आणि सायन्सच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेचे मापन करणे.

सिद्धांत कल्पना:

१. वरिष्ठ महाविद्यालयातील आर्ट्सच्या विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य सायन्सच्या विद्यार्थ्यांपेक्षा चांगले असते.

२. वरिष्ठ महाविद्यालयातील आर्ट्सच्या विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्ता सायन्सच्या विद्यार्थ्यांपेक्षा चांगली असते.

परिवर्तके:

१. स्वतंत्र परिवर्तके - वरिष्ठ महाविद्यालयातील आर्ट्स व सायन्सचे विद्यार्थी

२. परतंत्र परिवर्तके - मानसिक आरोग्य व भावनिक बुद्धिमत्ता

संशोधन पद्धती

1. नमुना:

प्रस्तुत संशोधनासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यालयातीलआर्टसचे ४० विद्यार्थी आणि सायन्सचे ४० विद्यार्थी असे एकूण ८० विद्यार्थ्यांची सहेतूक नमुना निवड पद्धतीने निवड केली.

2. मानसशास्त्रीय चाचणी:

प्रस्तुत संशोधनासाठी दोन प्रमाणित मानसशास्त्रीय चाचण्या वापरल्या. त्यांची माहिती पुढील प्रमाणे -

1. भावनिक बुद्धिमत्ता चाचणी:

प्रस्तुत संशोधनासाठी एस के मंगल व एस मंगल यांची भावनिक बुद्धिमत्ता चाचणी वापरली. सदर चाचणी शाब्दिक असून त्यात १०० विधाने आहेत. ही चाचणी भावनिक बुद्धिमत्तेच्या चार घटकांचे मापन करते. या चाचणीत उत्तरासाठी हाँ व नहीं असे दोन पर्याय आहेत. ही चाचणी हिंदी भाषेत आहे. या चाचणीची विश्वासनीयता ०.८९ ते ०.९२ इतकी आहे. म्हणजेच ही विश्वसनीयता उच्च आहे.

2. मानसिक आरोग्य चाचणी:

प्रस्तुत संशोधनासाठी आनंदकुमार, गिरीधर, पी. ठाकूर यांची मानसिक आरोग्य ही चाचणी वापरली. सदर चाचणीत ५० विधाने आहेत. या चाचणीत प्रत्येक विधानाला अगदी सत्य, सत्य, अनिश्चित, असत्य व अगदी असत्य असे पाच पर्याय आहेत.

3. संख्याशास्त्रीय साधने:

प्रस्तुत संशोधनात प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाण विचलन व 'टी' मूल्य या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर केला आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

फलिते व चर्चा:

तक्ता क्र. १ मानसिक आरोग्य

वरिष्ठ महाविद्यालयातील आर्ट्स आणि सायन्सच्या विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचे मध्यमान, प्रमाण विचलन व 'टी' मूल्य दर्शवणारा तक्ता.

नमुना	संख्या	मध्यमान	प्रमाण विचलन	'टी' मूल्य	सार्थकता पातळी
वरिष्ठ महाविद्यालयातील आर्ट्स विद्यार्थी	४०	१७९.१८	१२.४९	०.३९	सार्थ भेद दर्शवित नाही
वरिष्ठ महाविद्यालयातील सायन्सचे विद्यार्थी	४०	१७८.०३	१३.८८		

(मुक्ती प्रमाण संख्या - ७८)

तक्ता क्रमांक २ भावनिक बुद्धिमत्ता

वरिष्ठ महाविद्यालयातील आर्ट्स आणि सायन्सच्या विद्यार्थ्यांचे मध्यमान, प्रमाण विचलन व 'टी' मूल्य दर्शवणारा तक्ता.

नमुना	संख्या	मध्यमान	प्रमाण विचलन	'टी' मूल्य	सार्थकता पातळी
वरिष्ठ महाविद्यालयातील आर्ट्स विद्यार्थी	४०	६५.८	१०.६३	२.३८	सार्थ भेद दर्शविते
वरिष्ठ महाविद्यालयातील सायन्सचे विद्यार्थी	४०	७१.५३	१०.९६		

(मुक्ती प्रमाण संख्या - ७८)

चर्चा व अन्वयार्थ:

वरिष्ठ महाविद्यालयातील आर्ट्स आणि सायन्सच्या विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य आणि भावनिक बुद्धिमत्ता यांचा अभ्यास करणे हा पप्रस्तुत संशोधनाचा हेतू होता. यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील आर्ट्स आणि सायन्सच्या एकूण ८० विद्यार्थ्यांची सहेतूक नमुना निवड पद्धतीने निवड केली. या सर्व विद्यार्थ्यांकडून एस. के. मंगल व एस. मंगल यांची भावनिक बुद्धिमत्ता चाचणी व आनंदकुमार, गिरीधर, पी. ठाकूर यांची मानसिक आरोग्य चाचणी सोडवून घेतली. चाचणीचे माहिती पुस्तिकेच्या आधारे गुणांकन करून मध्यमान, प्रमाण विचलन व 'टी' मूल्य काढले. त्याचा संदर्भ संशोधनाच्या फलीतामध्ये दिला आहे.

तक्ता क्र. १

सदर तक्त्यामध्ये वरिष्ठ महाविद्यालयातील आर्ट्स आणि सायन्सच्या विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचे मध्यमान, प्रमाण विचलन व 'टी' मूल्य निर्देशित केले आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील आर्ट्सच्या विद्यार्थ्यांचे मध्यमान १७९.१८ व प्रमाण विचलन १२.४९ इतके आले. आणि सायन्सच्या विद्यार्थ्यांचे मध्यमान १७८.०३ व प्रमाण विचलन १३.८८ इतके आले. यावरून 'टी' मूल्य काढले असता ते ०.३९ इतके आले. हे मूल्य सार्थकतेच्या ०.०५ या पातळीवर सार्थ भेद दर्शवित नाही. यावरून, संशोधनात मांडलेली सिद्धांत कल्पना वरिष्ठ महाविद्यालयातील आर्ट्सच्या विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य सायन्सच्या विद्यार्थ्यांपेक्षा चांगले असते ही सिद्धांत कल्पना सार्थ ठरली नाही. म्हणजेच, दोन्ही महाविद्यालयातील छत्राध्यापकांच्या मानसिक आरोग्यात भेद दिसून आला नाही.

तक्ता क्र. २

सदर तक्त्यामध्ये वरिष्ठ महाविद्यालयातील आर्ट्स आणि सायन्सच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेची मूल्य दिली आहेत. वरिष्ठ महाविद्यालयातील आर्ट्सच्या विद्यार्थ्यांचे मध्यमान ६५.८ व प्रमाण विचलन १०.६३ इतके दिसून आले. तर सायन्सच्या विद्यार्थ्यांचे मध्यमान ७१.५३ व प्रमाण विचलन १०.९६ इतके दिसून आले. यावरून, 'टी' मूल्य काढले असता ते २.३८ इतके आले. हे मूल्य सार्थकतेच्या ०.०५ या पातळीला लक्षणीय भेद दर्शविते. यावरून, संशोधनात मांडलेली सिद्धांत कल्पना वरिष्ठ महाविद्यालयातील

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

आर्ट्सच्या विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्ता सायन्सच्या विद्यार्थ्यांपेक्षा चांगली असते. ही सिद्धांत कल्पना सार्थ ठरली नाही. म्हणजेच, दोन्ही महाविद्यालयातील छत्राध्यापकांच्या भावनिक बुद्धिमत्तेत भेद असल्याचे दिसून आले.

निष्कर्ष:

१. वरिष्ठ महाविद्यालयातील आर्ट्स व सायन्सच्या विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यात फरक नसतो.

२. वरिष्ठ महाविद्यालयातील आर्ट्सच्या विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्ता सायन्सच्या विद्यार्थ्यांपेक्षा चांगली असल्याचे दिसून आले.

मर्यादा:

१. सदर संशोधन हे कोल्हापूर जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यालयातीलआर्टसच्या ४० आणि सायन्सच्या ४० विद्यार्थ्यांच्या पुरतेच मर्यादित आहे.

२. सदर संशोधनासाठी मर्यादित संख्याशास्त्रीय साधनांचा वापर केला आहे.

३. यापेक्षा नमुना मोठा घेतल्यास वेगळे निष्कर्ष येण्याची शक्यता आहे.

शिफारसी:

१. मोठ्या नमुन्याकडून प्रदत्त जमा करून संशोधन करता येईल.

२. सांख्यिकी विश्लेषणासाठी दुसऱ्या पद्धतीचा वापर करता येईल.

संदर्भ:

१. डॉ. दिपा डबीर (2002) बुद्धिमत्ता व सर्जनशीलता, मंगेश प्रकाशन,

२. प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी (2009) प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर.

३. प्राचार्य डॉ. सुरेश करंदीकर (मार्च 2009), अध्ययन व अध्यापनाचे मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

४. Garret H. (2007),"Statistic in Psychology and Education" Agre: Sujeet Publication.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

घिसाडी समाजातील पारंपारिक व्यवसाय आणि एँग्रो बिझनेस उद्योजकतेची संधी

योगिता रामचंद्र रेवडे
संशोधक विद्यार्थिनी, समाजशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
Email: revadeyogita@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180242
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 196-204
February- 2026
Submitted: 10 Jan. 2026
Revised: 20 Jan. 2026
Accepted: 08 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

घिसाडी समाज हा ऐतिहासिकदृष्ट्या भटके व पारंपरिक हस्तकौशल्य असलेला समाज म्हणून ओळखला जातो. ग्रामीण भागात लोहारकाम, शेतीसाठी अवजारे तयार करणे व दुरुस्ती करणे, जनावरांना नाल बसविणे, धातूच्या वस्तूंची निर्मिती व दुरुस्ती अशा व्यवसायांवर या समाजाची उपजीविका अवलंबून होती. त्यांच्या कौशल्यामुळे ग्रामीण कृषी अर्थव्यवस्थेला महत्त्वपूर्ण आधार मिळत असे. तथापि, औद्योगिकीकरण, यांत्रिकीकरण आणि बाजारपेठेतील स्पर्धेमुळे पारंपरिक व्यवसायांची मागणी घटली असून घिसाडी समाज आर्थिक व सामाजिक आव्हानांना सामोरे जात आहे. या पार्श्वभूमीवर कृषी-आधारित उद्योग हा पर्यायी व शाश्वत उद्योजकतेचा मार्ग ठरू शकतो. कृषीप्रधान अर्थव्यवस्थेत शेतीपूरक व्यवसाय, दुग्धव्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन, अन्नप्रक्रिया उद्योग, सेंद्रिय शेती, कृषी उपकरणांची निर्मिती व दुरुस्ती सेवा, कृषी उत्पादनांचे पॅकेजिंग व विपणन अशा विविध क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध आहेत. घिसाडी समाजाकडे असलेले पारंपरिक तांत्रिक कौशल्य, श्रमसामर्थ्य आणि ग्रामीण जीवनाशी असलेला जवळचा संबंध लक्षात घेता, या समाजाला एँग्रो-बिझनेस क्षेत्रात यशस्वीपणे सहभागी होता येऊ शकते.

शासनाच्या विविध योजना जसे की राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (NABARD), प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP) आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGA) यांच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य, प्रशिक्षण व मार्गदर्शन उपलब्ध होत आहे. या
योजनांचा प्रभावी वापर केल्यास घिसाडी समाजातील युवक व महिलांसाठी स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात.

या संशोधनाचा उद्देश घिसाडी समाजातील पारंपरिक व्यवसायांचे स्वरूप, त्यातील बदल आणि आव्हाने यांचा अभ्यास करून एँग्रो-बिझनेस उद्योजकतेच्या संधींचे विश्लेषण करणे हा आहे. तसेच, समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आवश्यक धोरणात्मक उपाय, कौशल्यविकास आणि बाजारपेठेतील समावेशकता यांचा विचार या अभ्यासात करण्यात येईल.एकूणच, पारंपरिक कौशल्यांचे आधुनिकीकरण व कृषी-आधारित उद्योगांशी एकत्रीकरण केल्यास घिसाडी समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळू शकते.

मुख्यशब्द: *घिसाडी समाज, पारंपारिक व्यवसाय, लोहारकाम (धातुकाम), हस्तकला उद्योग, ग्रामीण अर्थव्यवस्था*

प्रस्तावना

भारतीय समाजरचनेत विविध जाती-जमातींनी आपल्या पारंपरिक व्यवसायांद्वारे सामाजिक व आर्थिक योगदान दिले आहे. त्यामध्ये घिसाडी समाज हा ऐतिहासिकदृष्ट्या भटके आणि पारंपरिक हस्तकौशल्य असलेला समाज म्हणून ओळखला जातो.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
योगिता रामचंद्र रेवडे, संशोधक विद्यार्थिनी, समाजशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

How to cite this article:
रेवडे. योगिता. रामचंद्र. (2026). घिसाडी समाजातील पारंपारिक व्यवसाय आणि एँग्रो बिझनेस उद्योजकतेची संधी. Journal of Research and Development, 18(2(XXI)), 196–204. https://doi.org/10.5281/zenodo.19548606

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19548606

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

महाराष्ट्रासह भारतातील विविध राज्यांमध्ये घिसाडी समाज प्रामुख्याने लोहारकाम, भांडी दुरुस्ती, शेतीसाठी लागणारी अवजारे तयार करणे, जनावरांच्या पायात नाल बसविणे, तसेच ग्रामीण भागात फिरते व्यवसाय करणे अशा पारंपरिक उपजीविकेवर अवलंबून होता. या व्यवसायांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत त्यांचे महत्त्वाचे स्थान होते.

परंतु, औद्योगिकीकरण,शहरीकरण आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे पारंपरिक व्यवसायांचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलले आहे. कारखान्यात तयार होणारी शेतीची साधने, तयार भांडी व यंत्रसामग्री यामुळे घिसाडी समाजाच्या पारंपरिक व्यवसायाला स्पर्धा निर्माण झाली. परिणामी, या समाजातील अनेक कुटुंबांना आर्थिक अस्थिरता, बेरोजगारी व सामाजिक उपेक्षा यांना सामोरे जावे लागले.अशा परिस्थितीत कृषी-आधारित उद्योग (Agro-Business) हा एक सक्षम आणि शाश्वत पर्याय म्हणून पुढे येतो. भारत हा कृषिप्रधान देश असून, महाराष्ट्रासारख्या राज्यात शेती, दुग्धव्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन, फळप्रक्रिया, भाजीपाला उत्पादन, सेंद्रिय शेती, तसेच अन्नप्रक्रिया उद्योग यामध्ये मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत.

घिसाडी समाजाकडे पारंपरिकरित्या शेतीसंबंधित साधनांची माहिती,ग्रामीण जीवनाचा अनुभव आणि श्रमकौशल्य असल्यामुळे ते ऍग्रो-बिझनेस क्षेत्रात सहजपणे समाविष्ट होऊ शकतात.याशिवाय, शासनाच्या विविध योजना जसे की राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (NABARD), महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGA), तसेच महाराष्ट्र शासनाच्या उद्योजकता विकास योजनांमुळे आर्थिक मदत व प्रशिक्षण उपलब्ध होत आहे. या योजनांच्या साहाय्याने घिसाडी समाजातील युवक व महिलांना स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

सध्याच्या बदलत्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीत पारंपरिक कौशल्यांचे आधुनिकीकरण करून त्याला बाजारपेठेशी जोडणे अत्यंत आवश्यक आहे. उदाहरणार्थ, शेतीसाठी आधुनिक उपकरणे दुरुस्ती सेवा,कृषी अवजारांचे उत्पादन,शेतीपूरक उद्योग, ग्रामीण हस्तकला उत्पादने ऑनलाईन विक्री इत्यादी क्षेत्रांमध्ये उद्योजकतेची मोठी संधी आहे.

या संशोधनाचा उद्देश घिसाडी समाजातील पारंपरिक व्यवसायांचे विश्लेषण करून त्यातील बदल, अडचणी आणि ऍग्रो-बिझनेस क्षेत्रातील उद्योजकतेच्या संधींचा अभ्यास करणे हा आहे. तसेच, या समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी कोणत्या धोरणात्मक उपाययोजना राबविता येतील याचाही विचार या अभ्यासात करण्यात येईल.यामुळे घिसाडी समाजाचा सामाजिक दर्जा उंचावणे, आर्थिक स्वावलंबन साधणे आणि मुख्य प्रवाहात त्यांचा समावेश घडवून आणणे हे या अभ्यासाचे व्यापक ध्येय आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:

१) पारंपारिक व्यवसायांचे स्वरूप अभ्यासणे.
२) सामाजिक-आर्थिक स्थितीचे विश्लेषण करणे.
३) बदलत्या तंत्रज्ञानाचा प्रभाव तपासणे.
४) ऍग्रो-बिझनेस क्षेत्रातील संभाव्य संधी ओळखणे

संशोधनाची अभ्यास पद्धती:

या संशोधनासाठी वर्णनात्मक (Descriptive) व विश्लेषणात्मक (Analytical) अभ्यास पद्धती वापरण्यात आली आहे

माहिती संकलनाच्या पद्धती:

प्रस्तुत शोधनिबंधासाठी **प्राथमिक** व **दुय्यम** सामग्रीचा वापर करण्यात आला आहे.

प्राथमिक मध्ये प्रत्यक्ष मुलाखत, निरीक्षण, आणि प्रश्नावली या साधनांचा वापर केला आहे.

दुय्यम सामग्री: कागदपत्रे, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, संदर्भ ग्रंथ व इंटरनेट यांचा वापर करण्यात आला आहे.

संशोधनाची गृहीतके:

1. घिसाडी समाजातील पारंपारिक व्यवसायांची मागणी औद्योगिकीकरण व यांत्रिकीकरणामुळे लक्षणीयरीत्या घटली आहे.
2. सामाजिक उपेक्षा आणि मर्यादित संसाधने यामुळे या समाजातील युवकांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण जास्त आहे.
3. योग्य प्रशिक्षण, आर्थिक सहाय्य व बाजारपेठेची उपलब्धता दिल्यास घिसाडी समाजातील युवक व महिला ऍग्रो-

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

बिझनेस क्षेत्रात यशस्वी उद्योजक होऊ शकतात.

4. शासनाच्या आर्थिक व प्रशिक्षण योजनांची माहिती घिसाडी समाजापर्यंत पूर्णपणे पोहोचत नाही.

घिसाडी समाज : ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमी:-

भारतीय इतिहासात शेती ही मुख्य उपजीविकेची साधनव्यवस्था होती. शेतीच्या यशस्वी कार्यासाठी नांगर, कुऱ्हाड, विळा, फावडे, सुऱ्या यांसारखी लोखंडी साधने अत्यावश्यक होती. ही साधने तयार करणे व दुरुस्त करणे हे कौशल्यप्रधान काम घिसाडी समाजाकडे होते. पारंपारिक गावगाडा पद्धतीत हा समाज सेवा देणारा घटक म्हणून ओळखला जात असे. शेतकरी व इतर समाजघटकांशी परस्परावलंबनावर आधारित ही व्यवस्था कार्यरत होती.ब्रिटिश काळात औद्योगिकीकरण, व्यापारीकरण आणि कारखानदारी उत्पादनाच्या वाढीमुळे पारंपारिक कारागिरीवर परिणाम होऊ लागला. मशीननिर्मित अवजारे स्वस्त दरात उपलब्ध होऊ लागल्याने स्थानिक कारागीर व्यवसाय मागे पडू लागले.तरीही ग्रामीण भागात शेतीप्रधान जीवनपद्धती टिकून असल्याने
घिसाडी समाज पूर्णपणे विस्थापित झाला नाही.

घिसाडी समाजाची सामाजिक रचना श्रम, कौशल्य आणि परंपरेवर आधारित आहे. पारंपारिक जातव्यवस्थेत हा समाज खालच्या स्तरावर गणला गेला. परिणामी, सामाजिक प्रतिष्ठा, राजकीय सहभाग आणि संसाधनांपर्यंत पोहोच यावर मर्यादा आल्या. सामाजिक भेदभाव, उपेक्षा आणि असमानता यांचा अनुभव या समाजाला दीर्घकाळ घ्यावा लागला.कुटुंबव्यवस्था बहुतेक वेळा संयुक्त स्वरूपाची असून व्यवसायाचे कौशल्य व ज्ञान पिढ्यान्पिढ्या अनौपचारिक पद्धतीने हस्तांतरित केले जाते. शिक्षणाऐवजी व्यवसाय प्रशिक्षणाला अधिक महत्त्व दिले गेले, ज्यामुळे औपचारिक शिक्षणाचे प्रमाण कमी राहिले.

घिसाडी समाजातील पारंपारिक व्यवसायांचे स्वरूप, समस्या व आव्हाने:-

घिसाडी समाज हा पारंपारिक कारागीर समाज म्हणून ओळखला जातो. या समाजाचे व्यवसाय मुख्यतः ग्रामीण उत्पादनव्यवस्था आणि शेतीशी निगडित राहिले आहेत. श्रम, कौशल्य आणि परंपरेवर आधारित हे व्यवसाय पिढ्यान्पिढ्या चालत आले असून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तथापि, बदलत्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीत या व्यवसायांचे स्वरूप बदलले असून अनेक समस्या व आव्हाने निर्माण झाली आहेत.

१. घिसाडी समाजातील पारंपारिक व्यवसायांचे स्वरूप:

घिसाडी समाजाचे पारंपारिक व्यवसाय प्रामुख्याने लोखंडी कामाशी संबंधित आहेत. यामध्ये शेतीसाठी आवश्यक असणारी अवजारे तयार करणे, दुरुस्ती करणे आणि त्यांची देखभाल करणे ही प्रमुख कामे समाविष्ट आहेत.ग्रामीण भागात नांगर, कुऱ्हाड, फावडे, विळा, सुऱ्या, कुदळी, शेतीसाठी लागणारी विविध लोखंडी साधने ही शेतकऱ्यांच्या दैनंदिन गरजांची साधने होती. ही साधने स्थानिक गरजेनुसार तयार करणे, मोडलेली अवजारे दुरुस्त करणे आणि ती पुन्हा वापरण्यायोग्य बनविणे ही जबाबदारी घिसाडी समाज पार पाडत असे.

याशिवाय, काही ठिकाणी घरगुती उपयोगाची लोखंडी भांडी, शेतीपूरक साधने, बैलगाडीसाठी लागणारे साहित्य, तसेच साध्या यांत्रिक दुरुस्ती सेवा देण्याचे कामही या समाजाकडून केले जात असे. हे सर्व व्यवसाय लघु, कौटुंबिक आणि अनौपचारिक स्वरूपाचे होते. व्यवसायाचे कौशल्य औपचारिक शिक्षणाऐवजी अनुभवातून आणि परंपरेतून पुढील पिढीकडे हस्तांतरित होत असे.

२. पारंपारिक व्यवसायांची सामाजिक व आर्थिक वैशिष्ट्ये:

घिसाडी समाजातील व्यवसायांचे स्वरूप सामाजिकदृष्ट्या सेवा-आधारित होते. पारंपारिक गावगाडा पद्धतीत या समाजाला शेतकरी समाजावर अवलंबून राहावे लागत असे. व्यवसायाच्या मोबदल्यात धान्य, वस्तू किंवा अत्यल्प आर्थिक मोबदला मिळत असे. त्यामुळे उत्पन्न नियमित नव्हते आणि आर्थिक सुरक्षितता कमी होती.हे व्यवसाय मुख्यतः हंगामी आणि स्थानिक मागणीवर आधारित असल्यामुळे वर्षभर स्थिर उत्पन्न मिळत नसे. भांडवल, साठवणूक क्षमता आणि बाजारपेठेशी थेट संपर्क नसल्यामुळे व्यवसायाचा विस्तार होणे शक्य नव्हते. परिणामी, पारंपारिक व्यवसाय हे केवळ उपजीविकेपुरते मर्यादित राहिले.

३. पारंपारिक व्यवसायांपुढील प्रमुख समस्या:

घिसाडी समाजातील पारंपारिक व्यवसाय आज अनेक संरचनात्मक समस्यांना सामोरे जात आहेत.

1. आधुनिक यांत्रिकीकरण आणि औद्योगिक उत्पादन ही मोठी समस्या ठरली आहे. कारखान्यांत तयार होणारी

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

शेती अवजारे स्वस्त, टिकाऊ आणि सहज उपलब्ध झाल्यामुळे पारंपारिक कारागिरीची मागणी कमी झाली आहे.

2. कच्च्या मालाच्या वाढत्या किमती. लोखंड, कोळसा आणि इतर साहित्य महाग झाल्यामुळे उत्पादन खर्च वाढतो, परंतु तयार वस्तूंना योग्य दर मिळत नाही.
3. भांडवल व कर्जसुविधांचा अभाव. बहुतांश घिसाडी कारागीर अनौपचारिक क्षेत्रात काम करत असल्याने त्यांना बँक कर्ज, विमा किंवा आर्थिक सुरक्षा उपलब्ध होत नाही.
4. शैक्षणिक व तांत्रिक ज्ञानाचा अभाव. आधुनिक साधने, नवीन तंत्रज्ञान, डिझाइन सुधारणा किंवा व्यवसाय व्यवस्थापनाचे ज्ञान नसल्यामुळे पारंपारिक व्यवसाय स्पर्धेत टिकू शकत नाहीत.

४. सामाजिक व संरचनात्मक आव्हाने:

घिसाडी समाजाला केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिक पातळीवरही अनेक आव्हाने आहेत. पारंपारिक जातव्यवस्थेमुळे सामाजिक प्रतिष्ठा कमी राहिल्याने व्यवसायाला मान्यता मिळत नाही. यामुळे तरुण पिढी या व्यवसायाकडे दुर्लक्ष करते.शहरीकरण आणि स्थलांतरामुळे ग्रामीण व्यवसायांचे जाळे कमजोर झाले आहे. अनेक तरुण मजुरी, अस्थिर रोजगार किंवा शहरांतील अनौपचारिक कामांकडे वळले आहेत. परिणामी, पारंपारिक कौशल्यांचा वारसा तुटण्याची भीती निर्माण झाली आहे.याशिवाय, शासकीय योजना, प्रशिक्षण कार्यक्रम आणि बाजारपेठेशी जोडणाऱ्या यंत्रणांची अपुरी माहिती व मर्यादित अंमलबजावणी हीही एक मोठी समस्या आहे.

५. बदलत्या काळातील आव्हाने व संधी:

आजच्या बदलत्या अर्थव्यवस्थेत घिसाडी समाजाचे पारंपारिक व्यवसाय संक्रमणाच्या टप्प्यावर आहेत. एकीकडे हे व्यवसाय टिकविणे कठीण झाले असले, तरी दुसरीकडे शेतीपूरक उद्योग, दुरुस्ती सेवा, लघुउद्योग आणि ऍग्रो-बिझनेससारख्या क्षेत्रांत नव्या संधी निर्माण होत आहेत.परंतु या संधींचा लाभ घेण्यासाठी कौशल्य विकास, आधुनिक तंत्रज्ञान, वित्तीय सहाय्य आणि संस्थात्मक पाठबळ आवश्यक आहे. याशिवाय, पारंपारिक व्यवसायांचे आधुनिकीकरण न झाल्यास हे व्यवसाय पूर्णपणे लोप पावण्याचा धोका आहे.

ऍग्रो -बिझनेस उद्योजकता : संकल्पना व महत्त्व:

१) ऍग्रो-बिझनेस उद्योजकतेची संकल्पना:

ऍग्रो-बिझनेस उद्योजकता ही शेती आणि शेतीपूरक क्रियाकलापांना उद्योग व व्यवसायाच्या दृष्टीने विकसित करण्याची संकल्पना आहे. पारंपारिक शेती ही प्रामुख्याने उपजीविकेपुरती मर्यादित असते; मात्र ऍग्रो-बिझनेस शेतीकडे बाजाराभिमुख, नफ्याच्या आणि व्यवस्थापनाधारित उद्योग म्हणून पाहतो. उत्पादन, प्रक्रिया, साठवणूक, वाहतूक, विपणन आणि सेवा या सर्व टप्प्यांचा समन्वय साधून शेतीमालाचे मूल्यवर्धन करणे ही या संकल्पनेची मध्यवर्ती कल्पना आहे. त्यामुळे ऍग्रो-बिझनेस उद्योजकता ही शेती व उद्योग यांमधील दरी भरून काढणारी आधुनिक विकासदृष्टी ठरते.

२) ऍग्रो-बिझनेसचे प्रमुख घटक:

ऍग्रो-बिझनेस ही एक व्यापक व्यवस्था असून ती अनेक घटकांवर आधारित आहे. इनपुट पुरवठा क्षेत्रात बियाणे, खते, कीटकनाशके, शेती अवजारे व यंत्रसामग्री यांचा समावेश होतो. उत्पादन क्षेत्रात पीक उत्पादनासोबत पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन व मत्स्यव्यवसाय यांचा समावेश आहे. प्रक्रिया क्षेत्रात अन्नप्रक्रिया उद्योग, साठवणूक, थंडगृह व पॅकेजिंग यांचा समावेश होतो. तर विपणन व सेवा क्षेत्रात वाहतूक, विक्री, कृषी सल्ला, दुरुस्ती सेवा व बाजारपेठ व्यवस्थापन येते. या सर्व घटकांचा समन्वय म्हणजेच ऍग्रो-बिझनेस उद्योजकता होय.

३) ऍग्रो-बिझनेस उद्योजकतेचे आर्थिक महत्त्व:

ऍग्रो-बिझनेस उद्योजकता ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाची ठरते. शेतीवर अवलंबून असलेल्या उत्पन्नाऐवजी विविध उत्पन्न स्रोत उपलब्ध करून देणे हे तिचे प्रमुख आर्थिक योगदान आहे. लघु व मध्यम उद्योगांच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती होते आणि स्थानिक भांडवल निर्मितीस चालना मिळते. शेतीमालावर प्रक्रिया करून मूल्यवर्धन केल्याने उत्पन्न वाढते व ग्रामीण भागात आर्थिक स्थैर्य निर्माण होते. त्यामुळे ऍग्रो-बिझनेस उद्योजकता ग्रामीण दारिद्र्य कमी करण्यास मदत करते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

४) सामाजिक महत्त्व:

ऍग्रो-बिझनेस उद्योजकतेचे सामाजिक महत्त्वही तितकेच लक्षणीय आहे. पारंपारिक, श्रमिक व उपेक्षित समाजांना आर्थिक सक्षमीकरणाची संधी मिळते. उद्योजकतेमुळे व्यक्तीचा आत्मविश्वास, सामाजिक प्रतिष्ठा आणि निर्णयक्षमता वाढते. ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध झाल्याने शहरी स्थलांतर कमी होते आणि कुटुंब व समाजव्यवस्था अधिक स्थिर राहते. यामुळे सामाजिक समता आणि समावेशक विकासाला चालना मिळते.

५) ग्रामीण विकासातील महत्त्व:

ग्रामीण विकासाच्या दृष्टीने ऍग्रो-बिझनेस हा कणा मानला जातो. शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्र यांचा समन्वय साधून गावकेंद्रित विकास शक्य होतो. स्थानिक संसाधनांचा वापर स्थानिक पातळीवरच होऊन ग्रामीण भागात आर्थिक हालचाल वाढते. ग्रामीण युवकांसाठी स्थानिक स्तरावरच रोजगार व उद्योजकतेच्या संधी उपलब्ध होत असल्याने गावांचे आर्थिक व सामाजिक पुनरुज्जीवन घडून येते.

६) शाश्वत विकासातील भूमिका:

ऍग्रो-बिझनेस उद्योजकता शाश्वत विकासाच्या संकल्पनेशी सुसंगत आहे. नैसर्गिक संसाधनांचा दीर्घकालीन व जबाबदार वापर, सेंद्रिय शेती, पर्यावरणपूरक तंत्रज्ञान आणि स्थानिक उत्पादनांचा वापर यामुळे पर्यावरणीय संतुलन राखले जाते. आर्थिक विकासासोबत पर्यावरण संरक्षण साधण्याची क्षमता ऍग्रो-बिझनेस उद्योजकतेमध्ये आहे. त्यामुळे भविष्यातील पिढ्यांसाठी शाश्वत उपजीविकेचा पाया निर्माण होतो.

७) पारंपारिक व्यवसायांसाठी ऍग्रो-बिझनेसचे महत्त्व:

पारंपारिक कौशल्यांवर आधारित व्यवसायांसाठी ऍग्रो-बिझनेस उद्योजकता नवी दिशा देते. पारंपारिक ज्ञानाचे आधुनिकीकरण करून त्याला व्यावसायिक स्वरूप देता येते. लघुउद्योग, सेवा-आधारित व्यवसाय आणि प्रक्रिया उद्योगांच्या माध्यमातून पारंपारिक व्यवसाय अधिक उत्पन्नक्षम बनू शकतात. त्यामुळे उत्पन्नातील अस्थिरता कमी होऊन व्यवसाय टिकाऊ बनतो.

८) धोरणात्मक व विकासात्मक महत्त्व:

सरकारी धोरणांच्या दृष्टीने ऍग्रो-बिझनेस उद्योजकता अत्यंत महत्त्वाची आहे. स्वयंरोजगार, स्टार्टअप, ग्रामीण विकास व कौशल्य विकास कार्यक्रमांचा हा मुख्य आधार आहे. कृषी व औद्योगिक क्षेत्रातील विषमता कमी करून संतुलित विकास साधण्यास ही संकल्पना मदत करते. ग्रामीण बेरोजगारी व दारिद्र्य कमी करण्यासाठी ऍग्रो-बिझनेस एक प्रभावी धोरणात्मक साधन ठरते.

९) समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून महत्त्व:

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ऍग्रो-बिझनेस उद्योजकता ही सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया आहे. अनौपचारिक क्षेत्रातून औपचारिक अर्थव्यवस्थेकडे जाण्याचा मार्ग ती खुला करते. सामाजिक व आर्थिक असमानता कमी करण्यास मदत होते आणि ग्रामीण समाजरचनेत संरचनात्मक बदल घडतात. त्यामुळे ऍग्रो-बिझनेस उद्योजकता ही केवळ आर्थिक नव्हे तर व्यापक सामाजिक परिवर्तनाची साधन ठरते.

घिसाडी समाजासाठी ऍग्रो-बिझनेस उद्योजकतेच्या संधी:

१) पारंपारिक लोखंडी कौशल्यांवर आधारित ऍग्रो-बिझनेस संधी:

घिसाडी समाजाची पारंपारिक ओळख लोखंडी काम व शेतीपूरक अवजारे निर्मितीशी निगडित आहे. या कौशल्यांचा उपयोग आधुनिक ऍग्रो-बिझनेसच्या चौकटीत करता येऊ शकतो. सुधारित शेती अवजारे, सेंद्रिय शेतीसाठी लागणारी साधने, लहान शेतकऱ्यांसाठी कमी किमतीची यंत्रे व दुरुस्ती सेवा केंद्रे उभारण्याची मोठी संधी उपलब्ध आहे. पारंपारिक कौशल्यांना आधुनिक डिझाइन व तंत्रज्ञानाची जोड दिल्यास हे व्यवसाय अधिक उत्पन्नक्षम ठरू शकतात.

२) कृषी दुरुस्ती व सेवा-आधारित उद्योजकता:

घिसाडी समाजातील कारागिरीचा अनुभव लक्षात घेता कृषी यंत्रसामग्री दुरुस्ती, देखभाल व सेवा केंद्रे ही एक व्यवहार्य ऍग्रो-बिझनेस संधी आहे. ट्रॅक्टर, पंपसेट, अवजारे, सिंचन साधने यांची दुरुस्ती व देखभाल ही ग्रामीण भागातील सातत्यपूर्ण गरज आहे. सेवा-आधारित उद्योजकतेमुळे कमी भांडवलात नियमित उत्पन्न मिळू शकते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

३) शेतीपूरक लघुउद्योग व प्रक्रिया उद्योग:

घिसाडी समाजासाठी अन्नप्रक्रिया व शेतीपूरक लघुउद्योग हे महत्त्वाचे क्षेत्र ठरू शकते. वर्मीकंपोस्ट निर्मिती, सेंद्रिय खत उत्पादन, पशुखाद्य प्रक्रिया, शेतीमाल साठवणूक व प्राथमिक प्रक्रिया उद्योगांमध्ये उद्योजकतेच्या संधी आहेत. हे उद्योग स्थानिक संसाधनांवर आधारित असल्याने ग्रामीण पातळीवर सहज उभारता येतात.

४) कृषी इनपुट पुरवठा व विक्री व्यवसाय:

बियाणे, खते, जैविक कीटकनाशके, शेती अवजारे व सुटे भाग यांची विक्री करणारी कृषी सेवा केंद्रे उभारणे ही घिसाडी समाजासाठी उपयुक्त संधी आहे. पारंपारिक शेतीविषयक ज्ञानामुळे शेतकऱ्यांशी विश्वासाचे नाते निर्माण करता येते, जे व्यवसायवृद्धीसाठी महत्त्वाचे ठरते.

५) स्वयं-सहायता गट व सहकारी उद्योजकता:

घिसाडी समाजातील आर्थिक मर्यादा लक्षात घेता स्वयं-सहायता गट व सहकारी पद्धतीने ॲग्रो-बिझनेस उभारणे अधिक व्यवहार्य ठरते. सामूहिक भांडवल, सामूहिक उत्पादन व सामूहिक विपणनाच्या माध्यमातून व्यवसाय जोखीम कमी करता येते. महिलांचा सहभाग वाढवून कुटुंबीय उत्पन्नात वाढ साधता येते.

६) ग्रामीण रोजगार व स्थलांतर रोखण्याची संधी:

ॲग्रो-बिझनेस उद्योजकतेमुळे घिसाडी समाजातील युवकांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होऊ शकतो. त्यामुळे शहरांकडे होणारे स्थलांतर कमी होऊन ग्रामीण सामाजिक स्थैर्य टिकवता येते. स्थानिक उद्योजकतेमुळे गावातील आर्थिक हालचालींना चालना मिळते.

७) पारंपारिक कौशल्यांचे आधुनिकीकरण व मूल्यवर्धन:

घिसाडी समाजातील पारंपारिक कौशल्ये आजही उपयुक्त आहेत; मात्र त्यांना आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षण व बाजारपेठेची जोड आवश्यक आहे. कौशल्य विकास कार्यक्रमांच्या माध्यमातून उत्पादनाची गुणवत्ता सुधारता येते, ज्यामुळे बाजारातील स्पर्धात्मकता वाढते आणि उत्पन्नात लक्षणीय वाढ होते.

८) शासकीय योजना व संस्थात्मक पाठबळाचा लाभ:

घिसाडी समाजासाठी उपलब्ध शासकीय योजना, कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम, सूक्ष्म कर्जसुविधा आणि उद्योजकता विकास योजनांचा प्रभावी वापर केल्यास ॲग्रो-बिझनेस उभारणी सुलभ होते. योग्य मार्गदर्शन व संस्थात्मक पाठबळ मिळाल्यास उद्योजकतेची टिकाऊ रचना निर्माण होऊ शकते.

९) सामाजिक सक्षमीकरण व प्रतिष्ठेची संधी:

ॲग्रो-बिझनेस उद्योजकतेमुळे घिसाडी समाजाचे केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिक सक्षमीकरणही होते. उद्योजक म्हणून ओळख निर्माण झाल्यास सामाजिक प्रतिष्ठा वाढते, आत्मसन्मान दृढ होतो आणि पुढील पिढीला शिक्षण व विकासाच्या अधिक संधी उपलब्ध होतात.

१०) एकूण संधींचे समाजशास्त्रीय महत्त्व:

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, घिसाडी समाजासाठी ॲग्रो-बिझनेस उद्योजकता ही पारंपारिक व्यवसायातून आधुनिक अर्थव्यवस्थेकडे होणाऱ्या संक्रमणाची प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया सामाजिक असमानता कमी करून समावेशक व शाश्वत विकासाचा मार्ग मोकळा करते.

शासकीय धोरणे, योजना आणि संस्थात्मक पाठबळ:

१) उद्योजकता प्रोत्साहन देणारी राष्ट्रीय धोरणे

भारत सरकारने ग्रामीण व शेतीआधारित उद्योजकतेस चालना देण्यासाठी विविध धोरणे राबविली आहेत. स्टार्टअप, सूक्ष्म-लघु उद्योग आणि ग्रामीण विकास या धोरणांचा उद्देश स्वयंरोजगार वाढवणे, नवउद्योजक घडवणे आणि स्थानिक अर्थव्यवस्था सक्षम करणे हा आहे. ही धोरणे पारंपारिक समाजांना औपचारिक अर्थव्यवस्थेशी जोडण्यास मदत करतात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

२) कृषी व ॲग्रो-बिझनेस केंद्रित योजना:

कृषी क्षेत्राशी निगडित योजनांमधून उत्पादन, प्रक्रिया, साठवणूक व विपणनासाठी आर्थिक व तांत्रिक सहाय्य दिले जाते.प्रधानमंत्री किसान सन्मान निधी – शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य.राष्ट्रीय कृषी विकास योजना – कृषी पायाभूत सुविधा व नवकल्पनांना प्रोत्साहन.या योजनांमुळे ॲग्रो-बिझनेससाठी आवश्यक मूलभूत आधार मिळतो.

३) सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (MSME) पाठबळ:

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय मार्फत नोंदणी, अनुदान, प्रशिक्षण व तांत्रिक सल्ला दिला जातो. प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत भांडवली अनुदान उपलब्ध होते.हे पाठबळ घिसाडी समाजातील नवउद्योजकांसाठी व्यवसाय उभारणी सुलभ करते.

४) वित्तीय संस्था व कर्जसुविधा:

मुद्रा योजना – कमी व्याजदरात कर्ज.नाबार्ड – ग्रामीण उद्योजकता, स्वयं-सहायता गट व सहकारी संस्थांना वित्तीय सहाय्य.या माध्यमातून भांडवली अडचणी कमी होतात.

५) कौशल्य विकास व प्रशिक्षण संस्था:

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय कृषी विज्ञान केंद्रया संस्थांद्वारे आधुनिक कृषी तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योग, व्यवस्थापन व विपणनाचे प्रशिक्षण दिले जाते. पारंपारिक कौशल्यांना आधुनिक व्यावसायिक रूप मिळते.

६) सहकारी संस्था व स्वयं-सहायता गटांना प्रोत्साहन

राष्ट्रीय ग्रामीण आजीविका मिशन अंतर्गत स्वयं-सहायता गटांना आर्थिक व तांत्रिक पाठबळ दिले जाते.सहकारी पद्धतीमुळे जोखीम कमी होते व सामूहिक उत्पन्न वाढते.

७) विपणन व बाजारपेठ जोडणी:

ई-नाम – डिजिटल बाजारपेठ उपलब्ध करून देते. शेतकरी उत्पादक संघटना (FPO) मॉडेलमुळे थेट बाजारपेठ प्रवेश सुलभ होतो.यामुळे मध्यस्थांचे अवलंबन कमी होते.

८) सामाजिक न्याय व समावेशक विकास धोरणे:

मागास व पारंपारिक समाजांसाठी असलेल्या आरक्षण, विशेष अनुदान व विकास कार्यक्रमांमुळे घिसाडी समाजाला उद्योजकतेत सहभागी होण्याची संधी मिळते. ही धोरणे सामाजिक असमानता कमी करण्यास मदत करतात.

९) संस्थात्मक मार्गदर्शन व नेटवर्किंग:

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जिल्हा उद्योग केंद्रे, कृषी विभाग आणि स्वयंसेवी संस्था यांच्यामार्फत मार्गदर्शन, प्रकल्प अहवाल तयारी व व्यवसाय सल्ला दिला जातो. संस्थात्मक नेटवर्कमुळे उद्योजकतेची टिकाऊ रचना तयार होते.

सामाजिक व आर्थिक परिणाम:

१) उत्पन्नवाढ व आर्थिक स्थैर्य:

ॲग्रो-बिझनेस उद्योजकतेमुळे पारंपारिक कामावर आधारित अनिश्चित उत्पन्नाऐवजी नियमित व वाढीव उत्पन्न मिळते. उत्पादन, प्रक्रिया व सेवा-आधारित उपक्रमांमुळे आर्थिक स्थैर्य निर्माण होते.

२) रोजगारनिर्मिती व स्वयंरोजगार:

स्थानिक पातळीवर स्वयंरोजगाराच्या संधी वाढतात. कुटुंबीयांचा सहभाग, हंगामी व कायमस्वरूपी रोजगारामुळे ग्रामीण बेरोजगारी कमी होते.

३) स्थलांतरात घट:

गावातच रोजगार उपलब्ध झाल्याने शहरांकडे होणारे स्थलांतर कमी होते. यामुळे कुटुंबसंस्था टिकून राहते आणि ग्रामीण समाजजीवन स्थिर होते.

४) सामाजिक प्रतिष्ठा व आत्मसन्मान:

उद्योजक म्हणून ओळख निर्माण झाल्याने घिसाडी समाजाचा आत्मसन्मान व सामाजिक प्रतिष्ठा वाढते. पारंपारिक कामाला आधुनिक व्यावसायिक मान्यता मिळते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

५) कौशल्यविकास व मानवी भांडवल वृद्धी:

प्रशिक्षण, नवतंत्रज्ञान व व्यवस्थापन कौशल्यांमुळे मानवी भांडवल मजबूत होते. पुढील पिढीमध्ये शिक्षण व कौशल्यांची मागणी वाढते.

६) महिलांचे आर्थिक सक्षमीकरण:

स्वयं-सहायता गट, प्रक्रिया उद्योग व सेवा-आधारित उपक्रमांमुळे महिलांचा आर्थिक सहभाग वाढतो. घरगुती निर्णयप्रक्रियेत महिलांचा वाटा मजबूत होतो.

७) सामाजिक समावेशन व असमानतेत घट:

औपचारिक अर्थव्यवस्थेशी जोडणी झाल्याने सामाजिक समावेशन वाढते. उत्पन्नातील दरी कमी होऊन आर्थिक व सामाजिक असमानता घटते.

८) ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना:

स्थानिक उत्पादन, साठवणूक व विपणनामुळे ग्रामीण बाजारपेठ सक्रिय होते. परस्परावलंबी व्यवसाय वाढून स्थानिक आर्थिक चक्र मजबूत होते.

९) पारंपारिक ज्ञानाचे जतन व मूल्यवर्धन:

पारंपारिक कौशल्यांना आधुनिक स्वरूप दिल्याने संस्कृतीचे जतन होते आणि त्याचे मूल्यवर्धन घडते. ज्ञानाची सातत्यपूर्ण परंपरा टिकते.

१०) सामाजिक बदल व नेतृत्वनिर्मिती:

उद्योजकतेमुळे समाजात नेतृत्वगुणांचा विकास होतो. सामूहिक उपक्रमांमधून संघटनक्षमता वाढते आणि सकारात्मक सामाजिक बदल घडतो.

निष्कर्ष:

या संशोधनातून स्पष्ट होते की घिसाडी समाज हा ऐतिहासिकदृष्ट्या पारंपारिक कौशल्यांवर आधारित उपजीविका करणारा, परंतु आर्थिकदृष्ट्या दुर्लक्षित राहिलेला समाज आहे. औद्योगिकीकरण, आधुनिक तंत्रज्ञान आणि बाजारव्यवस्थेतील बदलांमुळे घिसाडी समाजाचे पारंपारिक व्यवसाय हळूहळू मागे पडले असून, त्यामुळे उत्पन्नातील अस्थिरता,बेरोजगारी,स्थलांतर आणि सामाजिक असुरक्षितता यांसारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

अशा पार्श्वभूमीवर ऍग्रो-बिझनेस उद्योजकता हा घिसाडी समाजासाठी केवळ आर्थिक पर्याय नसून सामाजिक-आर्थिक पुनर्रचनेचा प्रभावी मार्ग ठरतो.या अभ्यासातून असे आढळले की घिसाडी समाजाकडे असलेली लोखंडी कामाची परंपरा, कृषी अवजारे निर्मिती व दुरुस्तीचे कौशल्य, श्रमसंस्कृती आणि ग्रामीण गरजांची जाण ही ऍग्रो-बिझनेससाठी महत्त्वाची भांडवले आहेत. ही कौशल्ये आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षण व बाजारपेठेच्या जोडणीद्वारे व्यवसायिक स्वरूपात विकसित करता येतात. त्यामुळे पारंपारिक व्यवसायांचे आधुनिकीकरण होऊन त्यांना नवसंजीवनी मिळू शकते.

या अभ्यासात मांडलेल्या ऍग्रो-बिझनेसच्या संधी जसे की शेतीपूरक अवजारे, कृषी सेवा केंद्रे, अन्नप्रक्रिया उद्योग, इनपुट पुरवठा, स्वयं-सहायता गट व सहकारी उद्योजकता या सर्व संधी घिसाडी समाजासाठी व्यवहार्य आणि टिकाऊ असल्याचे दिसून येते. विशेषतः कमी भांडवलात सुरू करता येणारे सेवा-आधारित व लघुउद्योग हे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी अधिक उपयुक्त ठरतात.

शासकीय धोरणे, योजना आणि संस्थात्मक पाठबळ यांचा योग्य उपयोग झाल्यास ऍग्रो-बिझनेस उद्योजकतेचा वेग अधिक वाढू शकतो.कर्जसुविधा,कौशल्य प्रशिक्षण,बाजारपेठ जोडणी आणि सहकारी संस्थांचे पाठबळ मिळाल्यास घिसाडी समाजातील उद्योजकतेतील जोखीम कमी होते आणि टिकाव वाढतो. तथापि, माहितीचा अभाव, प्रशासकीय गुंतागुंत आणि मार्गदर्शनाची कमतरता हे अडथळे दूर करणे तितकेच आवश्यक आहे.

सामाजिक व आर्थिक परिणामांच्या दृष्टीने पाहता, ऍग्रो-बिझनेस उद्योजकतेमुळे घिसाडी समाजाच्या उत्पन्नात वाढ, रोजगारनिर्मिती, स्थलांतरात घट, महिलांचे सक्षमीकरण आणि सामाजिक प्रतिष्ठा वृद्धिंगत होण्यास मदत होते. यासोबतच समाजातील आत्मसन्मान, नेतृत्वगुण आणि संघटनक्षमता विकसित होऊन सकारात्मक सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया घडते. त्यामुळे ऍग्रो-बिझनेस उद्योजकता ही केवळ उपजीविकेची साधन न राहता सामाजिक सक्षमीकरणाची चळवळ बनू शकते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

एकूणच, घिसाडी समाजासाठी एँग्रो-बिझनेस उद्योजकता ही पारंपारिक व्यवसायातून आधुनिक, शाश्वत आणि सन्मानजनक अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करण्याची प्रभावी दिशा आहे. योग्य धोरणात्मक पाठबळ, कौशल्यविकास, वित्तीय समावेशन आणि बाजाराभिमुख दृष्टीकोन यांच्या माध्यमातून हा समाज मुख्य प्रवाहातील विकास प्रक्रियेत सामील होऊ शकतो. त्यामुळे एँग्रो-बिझनेस उद्योजकता ही घिसाडी समाजाच्या दीर्घकालीन सामाजिक-आर्थिक उन्नतीची किल्ली ठरते, असा ठोस निष्कर्ष या अभ्यासातून निघतो.

संदर्भ साहित्यसूची:

१. देशमुख, आर. (2018). ग्रामीण समाजशास्त्र. पुणे : विद्या प्रकाशन.
२. पाटील, एस. (2020). भारतातील पारंपारिक व्यवसाय. कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.
३. Ghure, G. S. (2010). भारतीय समाजरचना. पुणे: कॉन्टिनेंटल प्रकाशन.
४. Patil, N. D. (2012). ग्रामीण समाजशास्त्र. कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.
५. Patil, V. B. (Ed.). (2015). ग्रामीण उद्योग व स्वयंरोजगार. सांगली: राजहंस प्रकाशन.
६. Deshmukh, R. T. (2011). सामाजिक परिवर्तन आणि विकास. नाशिक: यश पब्लिकेशन्स.
७. Palshikar, S. (2014). ग्रामीण विकास : सिद्धांत व व्यवहार. पुणे: डायमंड पब्लिकेशन्स.
८. Joshi, S. (2016). उद्योजकता विकास. पुणे: निराली प्रकाशन.
९. Deshmukh, G. (2013). भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था. औरंगाबाद: विद्या प्रकाशन.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

भारतीय संविधान आणि लोकशाही मूल्ये

नानासाहेब दत्तु दिघे
सहा.प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय, संगमनेर, जि. अहिल्यानगर
Email: nanadighe1988@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180243
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 205-209
February- 2026

Submitted: 10 Jan. 2026
Revised: 20 Jan. 2026
Accepted: 08 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाहीप्रधान देश आहे. लोकशाही ही केवळ शासनपद्धती नसून ती सामाजिक, राजकीय आणि नैतिक मूल्यांची एक व्यापक व्यवस्था आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद ही लोकशाहीची मूलभूत मूल्ये मानली जातात. भारतीय राज्यघटना या मूल्यांना घटनात्मक अधिष्ठान प्रदान करते. भारतीय राज्यघटनेची प्रस्तावना, मूलभूत अधिकार, राज्याची मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्ये यांमधून लोकशाही मूल्यांचे संस्थात्मक रूप दिसून येते. प्रस्तुत संशोधन निबंधात लोकशाही मूल्यांची संकल्पना, त्यांचे तात्त्विक अधिष्ठान, भारतीय संविधानातील स्थान, अंमलबजावणीची साधने आणि समोरील आव्हाने यांचे विश्लेषणात्मक विवेचन करण्यात आले आहे.

मुख्यशब्द: *Constitution of India, लोकशाही मूल्ये, सार्वभौमत्व, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, प्रजासत्ताक, मूलभूत हक्क*

प्रस्तावना

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे. २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आलेल्या भारतीय राज्यघटनेने भारताला "सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक" म्हणून घोषित केले. भारतीय लोकशाहीची पायाभरणी स्वातंत्र्यलढ्याच्या मूल्यांवर झाली. महात्मा गांधींचे सत्य आणि अहिंसा, पंडित नेहरूंचे लोकशाही समाजवाद, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक न्याय यांसारख्या विचारांनी संविधान निर्मितीवर खोल प्रभाव टाकला. भारतीय राज्यघटना ही केवळ कायदेशीर दस्तऐवज नसून ती लोकशाही मूल्यांची जाहीर घोषणा आहे. त्यामुळे लोकशाही मूल्ये आणि भारतीय संविधान यांचा अभ्यास परस्परावलंबी आहे.

लोकशाही मूल्यांची संकल्पना :

"लोकशाही" हा शब्द ग्रीक भाषेतील Demos (जनता) आणि Kratos (सत्ता) या शब्दांपासून तयार झाला आहे. म्हणजेच, लोकांच्या हातात असलेली सत्ता ही लोकशाही होय. लोकशाहीची कल्पना अर्थातच दोन हजार वर्षांपूर्वी प्राचीन ग्रीसमध्ये उगम पावली. लोकशाहीकरणाचे तुकडे तुकडे करून इतरत्रही प्रयत्न केले गेले, ज्यात भारताचाही समावेश होता. परंतु प्रत्यक्षात प्राचीन ग्रीसमध्ये लोकशाहीची कल्पना आकाराला आली आणि गंभीरपणे प्रत्यक्षात आणली गेली, ती कोसळण्यापूर्वी आणि अधिक हुकूमशाही आणि असममित सरकारच्या स्वरूपाने बदलण्यापूर्वी इतर कुठेही कोणत्याही प्रकारची व्यवस्था नव्हती. त्यानंतर, आपल्याला माहिती असलेली लोकशाही उदयास येण्यास बराच वेळ लागला. १२१५ मध्ये मॅग्ना कार्टावर स्वाक्षरी झाल्यापासून, अठराव्या शतकात फ्रेंच आणि अमेरिकन क्रांतीपर्यंत, एकोणिसाव्या शतकात युरोप आणि उत्तर अमेरिकेत मताधिकार वाढविण्यापर्यंत अनेक घडामोडींमुळे तिचा हळूहळू आणि शेवटी विजयी उदय झाला. तथापि, विसाव्या शतकात लोकशाहीची कल्पना जनतेचे सरकार म्हणून स्थापित झाली ज्याचा कोणत्याही राष्ट्राला अधिकार आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
नानासाहेब दत्तु दिघे, सहा. प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय, संगमनेर, जि. अहिल्यानगर

How to cite this article:
नानासाहेब दत्तु दिघे. (2026). भारतीय संविधान आणि लोकशाही मूल्ये. Journal of Research and Development, 18(2(XXI)), 205–209. https://doi.org/10.5281/zenodo.19548677

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19548677
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

लोकशाहीची कल्पना ही एक सार्वत्रिक बांधिलकी म्हणून अगदी नवीन आहे आणि ती मुळात विसाव्या शतकाचे फलित आहे. मॅग्ना कार्टाद्वारे इंग्लंडच्या राजाला संयमित करणाऱ्या बंडखोरांनी ही गरज पूर्णपणे स्थानिक म्हणून पाहिली. याउलट, स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या अमेरिकन सैनिकांनी आणि फ्रान्समधील क्रांतिकारकांनी लोकशाहीची एक सामान्य व्यवस्था म्हणून गरज समजून घेण्यात मोठे योगदान दिले. तरीही त्यांच्या व्यावहारिक मागण्यांचे केंद्रबिंदू बरेच स्थानिक राहिले - प्रत्यक्षात ते उत्तर अटलांटिकच्या दोन्ही बाजूंपर्यंत मर्यादित होते आणि त्या प्रदेशाच्या विशेष आर्थिक, सामाजिक आणि राजकीय इतिहासावर आधारित होते. संपूर्ण एकोणिसाव्या शतकात, लोकशाहीच्या सिद्धांतकारांना एक देश किंवा दुसरा देश "लोकशाहीसाठी योग्य आहे की नाही" यावर चर्चा करणे अगदी स्वाभाविक वाटले. हा विचार केवळ विसाव्या शतकातच बदलला, कारण हा प्रश्नच चुकीचा होता हे मान्य झाले. एखाद्या देशाला लोकशाहीसाठी योग्य मानले पाहिजे असे नाही उलट, तो लोकशाहीद्वारे योग्य झाला पाहिजे हा खरोखरच एक महत्त्वाचा बदल आहे, जो लोकशाहीची संभाव्य पोहोच अब्जावधी लोकांना व्यापतो, त्यांच्या वेगवेगळ्या इतिहास आणि संस्कृती आणि समृद्धीच्या वेगवेगळ्या पातळीसह समायोजित करतो. या शतकातच लोकांनी शेवटी हे मान्य केले की "सर्व प्रौढांसाठी मताधिकार" म्हणजे सर्व - फक्त पुरुषांसाठीच नाही तर महिलांसाठी देखील आहे.लोकशाहीच्या सार्वत्रिकतेच्या दाव्याला आव्हाने आहेत. ही आव्हाने अनेक स्वरूपात आणि वेगवेगळ्या दिशांनी येतात. लोकशाहीला सार्वत्रिक मूल्य म्हणून दाव्याचे आणि त्या दाव्याभोवती असलेल्या वादांचे परीक्षण करणे गरजेचे आहे. तथापि, तो अभ्यास सुरू करण्यापूर्वी, समकालीन जगात लोकशाही कोणत्या अर्थाने एक प्रमुख श्रद्धा बनली आहे हे स्पष्टपणे समजून घेणे आवश्यक आहे.

लोकशाही मूल्ये:

भारतीय संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, व धर्मनिरपेक्षता या लोकशाही मूल्यावर सविस्तर चर्चा करता येईल.

(अ) स्वातंत्र्य :

विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा, धर्म आणि उपजीविकेचे स्वातंत्र्य हे लोकशाहीचे प्रमुख तत्त्व आहे. स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तीला इतरांच्या हक्कांना बाधा न आणता आपल्या इच्छेनुसार विचार करण्याचे, बोलण्याचे आणि वागण्याचे अधिकार असणे होय. परंतु ते व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी स्वातंत्र्य अत्यावश्यक आहे. स्वातंत्र्यामुळे व्यक्तीची सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व विकसित होते. राजकीय तत्त्वज्ञ जॉन स्टुअर्ट मिल यांनी स्वातंत्र्याला मानवी प्रगतीचे मूलभूत साधन मानले. नैसर्गिक स्वातंत्र्य हे जन्मतः मिळालेले स्वातंत्र्य आहे. नागरी स्वातंत्र्य, राजकीय स्वातंत्र्य , आर्थिक स्वातंत्र्य हेदेखील अत्यंत महत्वाचे आहे. स्वातंत्र्याबरोबर जबाबदारी आवश्यक आहे. आपले स्वातंत्र्य इतरांच्या स्वातंत्र्यावर आक्रमण करणारे नसावे. कायद्याच्या मर्यादेत राहून स्वातंत्र्याचा उपयोग करणे आवश्यक आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये मूलभूत अधिकारांच्या माध्यमातून स्वातंत्र्याची हमी दिली आहे. विशेषतः कलम १९ अंतर्गत नागरिकांना विचार, अभिव्यक्ती, संघटना, हालचाल इत्यादी स्वातंत्र्य दिले आहे. स्वातंत्र्य हे लोकशाहीचे प्राण आहे. स्वातंत्र्याशिवाय व्यक्ती आणि समाजाचा विकास अशक्य आहे. परंतु ते संयम, नैतिकता आणि जबाबदारी यांच्या चौकटीतच अर्थपूर्ण ठरते.

)ब) समता :

कायद्यापुढे सर्व समान असणे, भेदभावाला प्रतिबंध करणे आणि समान संधी प्रदान करणे हे समतेचे तत्त्व आहे. समता म्हणजे सर्व व्यक्तींना जात, धर्म, लिंग, भाषा, वंश, आर्थिक स्थिती इत्यादी भेद न करता समान दर्जा, हक्क आणि संधी मिळणे. समता ही लोकशाही व्यवस्थेची मूलभूत संकल्पना आहे. सर्व नागरिक कायद्यापुढे समान आहेत. प्रत्येकाला समान संधी मिळायला हव्यात. कोणत्याही प्रकारचा भेदभाव होऊ नये. भारतीय राज्यघटना मध्ये कलम १४ ते १८ मध्ये समतेचा अधिकार दिला आहे. कायद्यापुढे समानता, धर्म, जात, लिंग इत्यादी आधारावर भेदभावास मनाई, सार्वजनिक नोकरीत समान संधी, अस्पृश्यतेचा अंत,पदव्या रद्द, सर्वांना कायद्यापुढे समान वागणूक, मतदानाचा समान अधिकार, जात, लिंगभेद नष्ट करणे, संपत्तीचे न्याय्य वितरण यामुळे अन्याय आणि शोषण कमी होउन व्यक्तीच्या सर्वांगीण विकासास चालना मिळते. समता हे लोकशाहीचे प्राणतत्त्व आहे. समता नसल्यास स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांना अर्थ राहत नाही. त्यामुळे समाजात खऱ्या अर्थाने न्याय प्रस्थापित करण्यासाठी समतेचे मूल्य अत्यंत आवश्यक आहे.

)क) बंधुता :

बंधुता म्हणजे समाजातील सर्व व्यक्तींमध्ये परस्पर प्रेम, स्नेह, सहकार्य, आदर आणि ऐक्यभाव असणे. लोकशाही व्यवस्थेत बंधुता हे अत्यंत महत्त्वाचे मूल्य मानले जाते. स्वातंत्र्य आणि समता यांना बळ देणारे आणि टिकवून ठेवणारे मूल्य म्हणजे बंधुता होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्पष्ट केले होते की, स्वातंत्र्य आणि समता ही बंधुतेशिवाय टिकू शकत नाहीत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

समाजात बंधुता नसेल तर स्वातंत्र्य अराजकतेत आणि समता स्पर्धा किंवा संघर्षात बदलू शकते. भारतीय राज्यघटना च्या प्रस्तावनेत "बंधुता" हा शब्द स्पष्टपणे नमूद केला आहे. त्यात "व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राची एकता व अखंडता सुनिश्चित करणारी बंधुता" असा उल्लेख आहे. बंधुता सामाजिक ऐक्य निर्माण करते व विविध धर्म, जात, भाषा, संस्कृती असलेल्या भारतासारख्या देशात बंधुता राष्ट्रीय एकात्मता मजबूत करते. परस्पर समज, सहनशीलता आणि संवाद वाढवते. तसेच नागरिकांमध्ये विश्वास आणि सहकार्याची भावना निर्माण होते. यातून प्रत्येक व्यक्तीचा सन्मान राखला जातो. महात्मा गांधी यांनी "सर्व धर्म समभाव" आणि "वसुधैव कुटुंबकम्" या विचारांद्वारे बंधुतेचा संदेश दिला. जवाहरलाल नेहरू यांनी विविधतेत एकता यावर भर दिला. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार आणि मूलभूत कर्तव्ये ही बंधुतेची जपणूक करण्यासाठीच आहेत. लोकशाहीचे तीन आधारस्तंभ म्हणजे स्वातंत्र्य, समता आणि बंधुता. यापैकी बंधुता हे मूल्य समाजात नैतिक एकता निर्माण करते. बंधुतेशिवाय लोकशाही केवळ राजकीय व्यवस्था राहते; परंतु बंधुतेमुळे ती सामाजिक आणि नैतिक मूल्यव्यवस्था बनते.

)ड) न्याय :

न्याय म्हणजे प्रत्येक व्यक्तीला योग्य हक्क, संधी आणि वागणूक मिळणे. लोकशाही व्यवस्थेत न्याय हा केवळ कायद्यापुरता मर्यादित नसून सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्तरावरही लागू होतो. भारतीय राज्यघटना च्या प्रस्तावनेत सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय देण्याचे आश्वासन दिले आहे. याचा अर्थ असा की समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान संधी, सन्मान आणि हक्क मिळावेत. जॉन रॉल्स यांनी त्यांच्या 'थेअरी ऑफ जस्टीस' या ग्रंथात न्याय म्हणजे "समता आणि समान संधी" असे सांगितले. त्यांच्या मते, समाजातील दुर्बल घटकांना अधिक संरक्षण देणे हे न्यायाचे खरे तत्त्व आहे. जात, धर्म, लिंग यावर आधारित भेदभाव न करता सर्वांना समान स्थान म्हणजे सामाजिक न्याय होय. संपत्तीचे योग्य वितरण, गरिबी निर्मूलन, रोजगाराच्या संधी आर्थिक न्याय आहे. मतदानाचा हक्क, निवडणुकीत सहभाग, अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणजे राजकीय न्याय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्यायाला विशेष महत्त्व दिले. त्यांनी संविधानात समता, आरक्षण व्यवस्था आणि मूलभूत अधिकार यांचा समावेश करून वंचित घटकांना न्याय मिळवून दिला. लोकशाहीतील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही परस्परपूरक मूल्ये आहेत. न्याय नसल्यास लोकशाही केवळ नावापुरती राहते. त्यामुळे न्याय हे लोकशाहीचे प्राणतत्त्व मानले जाते.

)इ) धर्मनिरपेक्षता :

धर्मनिरपेक्षता म्हणजे राज्य सर्व धर्मांबाबत तटस्थ राहते आणि कोणत्याही एका धर्माला विशेष दर्जा देत नाही. प्रत्येक नागरिकाला आपल्या श्रद्धेनुसार धर्म मानण्याचे, आचरण करण्याचे आणि प्रसार करण्याचे स्वातंत्र्य असते. भारतीय संदर्भात धर्मनिरपेक्षतेला सकारात्मक धर्मनिरपेक्षता असे म्हणतात. राज्य सर्व धर्मांचा आदर करते, परंतु कोणत्याही धर्माचे राज्यकारभारात वर्चस्व मान्य करत नाही. १९७६ मधील ४२व्या घटनादुरुस्तीने भारतीय साविधांच्या प्रस्तावनेत "धर्मनिरपेक्षता" हा शब्द समाविष्ट करण्यात आला आहे. कलम २५ ते २८ : धर्मस्वातंत्र्याचा अधिकार सर्व नागरिकांना कायद्यापुढे समानता (कलम १४) ,धर्माच्या आधारे भेदभावास मनाई (कलम १५) भारतातील धर्मनिरपेक्षतेचा पाया घालण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. सर्व धर्मांना समान वागणूक, श्रद्धा आणि उपासनेचे स्वातंत्र्य, विविधतेत एकता निर्माण होते, धार्मिक तणाव कमी होतो. लोकशाहीमध्ये नागरिकांची ओळख धर्मावर नव्हे, तर नागरिकत्वावर आधारित असते हा धर्मनिरपेक्षतेचा मूलभूत गाभा आहे. भारतात सर्व धर्मांचा आदर राखत राज्य हस्तक्षेप करते. धर्मनिरपेक्षता ही लोकशाहीची आत्मा आहे. विविध धर्म, भाषा आणि संस्कृती असलेल्या भारतासारख्या देशात सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता आणि लोकशाहीची मजबुती यासाठी धर्मनिरपेक्षता अत्यावश्यक आहे. राज्य सर्व धर्मांपासून समदूर राहते आणि सर्वांना समान वागणूक देते.

लोकशाही मूल्यांचे तात्त्विक अधिष्ठान :

लोकशाही मूल्यांवर पाश्चिमात्य आणि भारतीय विचारवंतांचा प्रभाव आहे. जॉन लॉक यांनी नैसर्गिक अधिकारांची संकल्पना मांडली. जीन जॅक्स रूसो यांनी सामाजिक करार सिद्धांत मांडला. मॉंतेस्क्यू यांनी सत्ताविभाजनाचा सिद्धांत मांडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक लोकशाहीवर भर दिला. डॉ. आंबेडकरांनी सांगितले की, "राजकीय लोकशाही टिकवण्यासाठी सामाजिक आणि आर्थिक लोकशाही आवश्यक आहे."

भारतीय संविधानातील लोकशाही मूल्यांचे प्रतिबिंब :

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

भारतीय राज्यघटनेची प्रस्तावना ही लोकशाही मूल्यांचे सार आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचा स्पष्ट उल्लेख आहे. भारतीय संविधानाच्या भाग ३ मधील कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूत हक्कांची तरतूद करण्यात आलेली आहे. हे हक्क नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी, व्यक्तिमत्त्वाच्या उन्नतीसाठी आणि लोकशाही व्यवस्थेच्या संरक्षणासाठी अत्यंत आवश्यक मानले जातात. भारतीय राज्यघटना स्वीकारताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मूलभूत हक्कांना "संविधानाचे हृदय आणि आत्मा" असे म्हटले आहे.

१) समानतेचा हक्क (कलम १४ ते १८(:

समानतेच्या हक्काअंतर्गत कायद्यासमोर सर्व समान (कलम १४(, धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थानावरून भेदभावास मनाई (कलम १५(सार्वजनिक नोकरीत समान संधी (कलम १६(अस्पृश्यतेचे उच्चाटन (कलम १७(पदव्या रद्द (कलम १८(समाविष्ट आहेत. समानतेचा हक्क हा हक्क सामाजिक न्याय आणि समतेच्या तत्त्वाला बळकटी देतो.

२) स्वातंत्र्याचा हक्क (कलम १९ ते २२(:

स्वातंत्र्याच्या हक्काअंतर्गत अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांततेने सभा घेण्याचा हक्क, संघटना स्थापन करण्याचा हक्क, भारतात मुक्तपणे फिरण्याचा हक्क, कोणत्याही ठिकाणी राहण्याचा व व्यवसाय करण्याचा हक्क, कलम २०, २१ आणि २२ अंतर्गत: कायदेशीर संरक्षण जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क (कलम २१(अटक व नजरकैदेसंबंधी संरक्षण कलम २१ हे सर्वात व्यापक मानले जाते, सर्वोच्च न्यायालयाने त्यात शिक्षण, गोपनीयता, पर्यावरण इत्यादी हक्कांचा समावेश केला आहे.

३) शोषणाविरुद्ध हक्क (कलम २३ व २४(:

शोषणाविरुद्धच्या हक्काअंतर्गत मानव तस्करी व वेठबिगार मजुरीस मनाई, १४ वर्षांखालील मुलांना धोकादायक उद्योगात काम करण्यास बंदी याचा समावेश होतो. हा हक्क मानवी प्रतिष्ठेचे संरक्षण करतो.

४) धर्मस्वातंत्र्याचा हक्क (कलम 25 ते 28) :

धर्मस्वातंत्र्याच्या हक्काअंतर्गत धर्म मानण्याचा, आचरण करण्याचा व प्रचार करण्याचा हक्क धार्मिक संस्था स्थापन व चालविण्याचा हक्क समाविष्ट आहे. भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे.

५) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क (कलम 29 व 30) :

सांस्कृतिक व शैक्षणिक हक्काअंतर्गत अल्पसंख्याकांना त्यांच्या भाषा, लिपी व संस्कृतीचे संरक्षण, शैक्षणिक संस्था स्थापन व चालविण्याचा हक्क याचा समावेश आहे. यामुळे विविधतेतील एकता टिकविण्यास मदत होते.

६) घटनात्मक उपायांचा हक्क (कलम ३२(:

भारतातील नागरिकांचे मुलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास थेट सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा हक्क हे हक्क अंमलात आणण्यासाठी न्यायालये रिट्स जारी करतात. (हेबिअस कॉर्पस, मँडॅमस, सर्टिओरारी, क्वो वॉरंटो, प्रोहीबिशन) कलम ३२ ला “संविधानाचे हृदय आणि आत्मा” असे संबोधले जाते. भारतीय संविधानातील मूलभूत हक्क हे लोकशाही व्यवस्थेचे आधारस्तंभ आहेत. ते व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करतात, सामाजिक न्यायाची हमी देतात आणि राज्याच्या सत्तेवर नियंत्रण ठेवतात.

राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वे :

कलम ३६ ते ५१ मध्ये सामाजिक व आर्थिक न्यायावर भर देण्यात आला आहे. समान वेतन, शिक्षणाचा अधिकार, सार्वजनिक आरोग्य सुधारणा ही तत्त्वे लोकशाही मूल्यांची अंमलबजावणी करतात.

लोकशाही मूल्यांसमोरील आव्हाने :

सामाजिक आणि आर्थिक विषमता, जातीय आणि धार्मिक ध्रुवीकरण, भ्रष्टाचार, राजकीय गुन्हेगारी, माध्यम स्वातंत्र्यावर दबाव ही आव्हाने लोकशाही मूल्यांच्या अंमलबजावणीला मर्यादा आणतात. परंतु न्यायालयीन हस्तक्षेप आणि लोकशाही प्राक्रियेत भारतीय न्यायपालिकेने अनेक ऐतिहासिक निकालांद्वारे लोकशाही मूल्यांचे संरक्षण केले आहे. उदाहरणार्थ, मूलभूत रचना सिद्धांत मांडताना सर्वोच्च न्यायालयाने संसदेला मर्यादा घातल्या. भारतात राजकीय लोकशाही अस्तित्वात असली तरी सामाजिक व आर्थिक विषमता अजूनही मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळेच डॉ. आंबेडकरांनी इशारा दिला होता की सामाजिक असमानता टिकली तर लोकशाही धोक्यात येईल.

निष्कर्ष :

लोकशाही मूल्ये आणि भारतीय संविधान हे एकमेकांचे पूरक आहेत. भारतीय राज्यघटनेने लोकशाही मूल्यांना कायदेशीर संरक्षण दिले आहे, मात्र त्यांची प्रभावी अंमलबजावणी नागरिकांच्या जागरूकतेवर आणि शासनाच्या पारदर्शकतेवर अवलंबून आहे. भारतीय लोकशाहीची खरी ताकद तिच्या विविधतेत आणि घटनात्मक बांधिलकीत आहे. लोकशाही मूल्यांचे जतन आणि संवर्धन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

संदर्भसूची :

१. भारतीय गणराज्याचे शासन व राजकारण , डॉ. भोळे भा. ल., पिंपळापुरे पब्लिकेशन्स, नागपूर
२. भारताचे संविधान, राजेश चौधरी
३. संविधान सर्वासाठी , माधव जोशी
४. इंडियन पोलिटी , एम.लक्ष्मिकांत
५. भारतीय संविधान
६. लोकशाही समजून घेताना, डॉ. दीपक पवार
७. लोकशाही आणि भारतीय राज्यघटना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर
८. समकालीन भारतीय लोकशाही, डॉ. बोथे पाटील, डॉ. गीतांजली चिने
९. भारतीय राजकीय व्यवस्थेचा आकृतिबंध- जाधव तुकाराम, युनिक अकेडमी
१०. भारतीय लोकशाही अर्थ आणि प्रथा, डॉ. राजेंद्र व्होरा, डॉ. सुहास पळशीकर

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

कोविड-१९ नंतर डिजिटल इंदापूर तालुक्यातील पेमेंट व्यवहारातील बदल व वित्तीय समावेशन

मोनाली दीपक गानबोटे
(संशोधक विध्यार्थी), शारदाबाई पवार महिला आर्ट्स, कॉमर्स, अँड सायन्स कॉलेज, शारदानगर, ता- बारामती, जि. पुणे
Email: monaliganbote@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180244
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 210-214
February- 2026
Submitted: 10 Jan. 2026
Revised: 20 Jan. 2026
Accepted: 08 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

कोविड-१९ महामारीने संपूर्ण जगाच्या सामाजिक-आर्थिक जीवनात भयंकर बदल घडवून आणला. अशा परिस्थितीत डिजिटल व्यवहार पद्धतींचा स्वीकार आणि त्याचा परिणाम विशेषतः ग्रामीण भारतात कसा झाला हे समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. इंदापूर तालुका हा पुणे जिल्ह्यातील एक कृषिप्रधान, ग्रामीण भाग असून येथे रहिवासींच्या आर्थिक व्यवहाराचा स्वरूप कोविड-१९ नंतर बदलला आहे. या संशोधनाचा मुख्य उद्दिष्ट आहे कोविड-१९ च्या आधी आणि नंतर डिजिटल पेमेंट व्यवहारातील बदल, त्यामागील कारणे, अर्थव्यवहारातील स्वीकार्यता, डिजिटल साक्षरतेचा स्तर आणि त्याचा वित्तीय समावेशनवर होणारा परिणाम यांचे सखोल विश्लेषण करणे.या अभ्यासात प्राथमिक डेटा (सर्वेक्षण, प्रत्यक्ष मुलाखती) आणि द्वितीयक डेटा (सरकारी अहवाल, बँक रिपोर्ट, संशोधन लेख) वापरण्यात आला. निवडलेले नमुने Stratified Random Sampling पद्धतीने घेतले गेले. डिजिटल व्यवहाराच्या विविध पैलूंवर (UPI, मोबाइल बँकिंग, POS व्यवहार, QR कोड, इंटरनेट बँकिंग) लोकांची वागणूक, अडचणी, विश्वास, सुरक्षिततेबद्दलची जाण व वित्तीय सेवा उपलब्धता या बाबींचे परीक्षण करण्यात आले.अभ्यासातून असे आढळले की कोविड-१९ नंतर डिजिटल व्यवहाराचा स्वीकार ग्रामीण भागात लक्षणीय वाढला आहे. UPI ट्रान्झॅक्शन्समध्ये अतिशय जलद वाढ दिसून आली तसेच बँक खाते धारकांची संख्या, मोबाइल इंटरनेटचा वापर, आणि डिजिटल व्यवहारांचे एकात्मिक स्वरूप यांमध्ये सकारात्मक बदल दिसतात. तथापि डिजिटल साक्षरतेच्या अभावी व काही लोकांमधील तंत्रज्ञानाविषयीची अनिश्चितता, हाच मोठा अडथळा आहे. आर्थिक समावेशनाच्या दृष्टीने, डिजिटल व्यवहारांनी ग्रामीण नागरिकांना अधिक सशक्त आर्थिक नेटवर्कमध्ये समाविष्ट केले आहे परंतु अजूनही काही सुधारणा आवश्यक आहे — जसे लोकांना प्रशिक्षण, सुरक्षितता जाण, आणि व्यवहाराचा विश्वास. अशा प्रकारे, डिजिटल पेमेंटचा स्वीकार आणि वित्तीय समावेशन यातील संबंध स्पष्ट जाणवला; तसेच धोरणात्मक पातळीवर डिजिटल शिक्षण, तंत्रज्ञान उपलब्धता आणि विश्वास वाढविणे आवश्यक असल्याचे निष्कर्ष सादर करतो.

मुख्य शब्द: *कोविड-१९, डिजिटल पेमेंट, डिजिटल व्यवहार, वित्तीय समावेशन, इंदापूर, ग्रामीण अर्थव्यवस्था, डिजिटल साक्षरता*

प्रस्तावना

कोविड-१९ ही जागतिक महामारी २०१९ च्या उत्तरार्धात सुरू झाली आणि २०२० मध्ये संपूर्ण जगभर पसरली. या महामारीने केवळ आरोग्य व्यवस्थेवरच नव्हे तर जागतिक आणि स्थानिक अर्थव्यवस्थेवर देखील मोठा परिणाम केला. लॉकडाऊन, सामाजिक अंतर, वाहतूक निर्बंध आणि बाजारपेठा बंद राहिल्यामुळे पारंपरिक रोख व्यवहारांमध्ये मोठी घट झाली. या परिस्थितीत डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित व्यवहार पद्धतींचा स्वीकार वेगाने वाढला. लोकांनी सुरक्षित, स्पर्शरहित आणि जलद व्यवहारासाठी UPI, मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग, QR कोड पेमेंट यांसारख्या साधनांचा वापर सुरू केला. त्यामुळे डिजिटल पेमेंट प्रणाली ही पर्याय नसून गरज बनली.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
मोनाली दीपक गानबोटे, (संशोधक विध्यार्थी), शारदाबाई पवार महिला आर्ट्स, कॉमर्स, अँड सायन्स कॉलेज, शारदानगर, ता- बारामती, जि. पुणे

How to cite this article:
गानबोटे. मोनाली. दीपक. (2026). कोविड-१९ नंतर डिजिटल इंदापूर तालुक्यातील पेमेंट व्यवहारातील बदल व वित्तीय समावेशन. Journal of Research and Development, 18(2(XXI)), 210–214.
https://doi.org/10.5281/zenodo.19548726

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19548726
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

भारत सरकारने "डिजिटल इंडिया", "प्रधानमंत्री जनधन योजना", आणि विविध तांत्रिक सुधारणा उपक्रमांच्या माध्यमातून डिजिटल व्यवहारांना चालना दिली होती; मात्र कोविड-१९ काळात या उपक्रमांना नव्याने गती मिळाली. विशेषतः Unified Payments Interface (UPI) प्रणालीमुळे लहान व्यवहार देखील सहज शक्य झाले. ग्रामीण भागात देखील स्मार्टफोन आणि इंटरनेट सेवांचा प्रसार वाढत गेला. त्यामुळे आर्थिक व्यवहाराचे स्वरूप अधिक तांत्रिक आणि संरचित बनू लागले. या बदलामुळे वित्तीय समावेशनाच्या प्रक्रियेला नवी दिशा मिळाली.

इंदापूर तालुका हा पुणे जिल्ह्यातील एक महत्त्वाचा ग्रामीण भाग असून येथील अर्थव्यवस्था मुख्यतः कृषी व लघुउद्योगांवर आधारित आहे. येथे लहान व्यापारी, शेतकरी, कामगार वर्ग आणि स्वयंरोजगार करणारे नागरिक मोठ्या प्रमाणावर आहेत. कोविड-१९ पूर्व काळात या भागात रोख व्यवहारांचे प्रमाण जास्त होते; मात्र महामारीनंतर डिजिटल व्यवहारांकडे कल वाढलेला दिसून येतो. शासनाच्या विविध योजनांमुळे आणि बँकिंग सेवांच्या विस्तारामुळे डिजिटल व्यवहाराचा स्वीकार वाढण्यास मदत झाली आहे. तरीदेखील डिजिटल साक्षरता, तांत्रिक अडचणी आणि विश्वासाचा अभाव या काही अडथळ्यांमुळे संपूर्ण लोकसंख्या या प्रक्रियेत समाविष्ट झालेली नाही.

वित्तीय समावेशन ही संकल्पना समाजातील प्रत्येक घटकाला बँकिंग व आर्थिक सेवांचा समान लाभ मिळवून देण्यावर आधारित आहे. बँक खाते, बचत, कर्ज, विमा, आणि डिजिटल व्यवहार यांचा सर्वांना प्रवेश मिळणे ही त्याची मूलभूत गरज आहे. डिजिटल पेमेंट प्रणालीमुळे व्यवहार सुलभ, पारदर्शक आणि सुरक्षित झाले आहेत, ज्यामुळे आर्थिक व्यवहारांचा मागोवा घेणे सोपे झाले आहे. ग्रामीण भागात महिलांचा आणि दुर्बल घटकांचा सहभाग वाढविण्यासाठी डिजिटल व्यवहार उपयुक्त ठरू शकतात.

या पार्श्वभूमीवर, कोविड-१९ नंतर इंदापूर तालुक्यातील डिजिटल पेमेंट व्यवहारातील बदल आणि त्याचा वित्तीय समावेशनावर झालेला परिणाम अभ्यासणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या संशोधनाद्वारे डिजिटल व्यवहारांचा स्वीकार, त्यातील वाढ, अडचणी, लोकांची मानसिकता, तसेच आर्थिक सक्षमीकरणातील बदल यांचे विश्लेषण करण्यात येणार आहे. या अभ्यासातून ग्रामीण भागातील डिजिटल परिवर्तनाची दिशा आणि भविष्यातील धोरणात्मक गरजा स्पष्ट होतील.

- **इंदापूर तालुक्याचे सामाजिक-आर्थिक स्वरूप**

इंदापूर हे पुणे जिल्ह्यातील एक ग्रामीण क्षेत्र आहे ज्याची लोकसंख्या विविध सामाजिक व आर्थिक स्तरांवर पसरलेली आहे. इथे कृषी कामगार, लहान व्यापारी, मजदूर वर्ग आणि घरकाम करणारे हे प्रमुख समाजघटक आहेत. कोविड-१९ मुळे आर्थिक व्यवहारांमध्ये मोठा मोड आला आणि डिजिटल व्यवहाराकडे वाटचाल अधिक त्वरित झाली

- **डिजिटल साक्षरता आणि स्वीकार**

डिजिटल पद्धतींचा प्रभाव अभ्यासताना डिजिटल साक्षरतेचा स्तर, मोबाईल इंटरनेटचा वापर, मोबाईल उपलब्धता, सुरक्षितता आणि विश्वास या बाबींचा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे. ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये तंत्रज्ञानाविषयी विविध पातळीचे भेद आहेत; त्यामुळे व्यवहारात असलेली रूची व वापर हा अभ्यासाचा केंद्रबिंदू आहे.

- **वित्तीय समावेशनाचे महत्त्व**

वित्तीय समावेशन म्हणजे सर्व स्तरांतील लोकांना बँकिंग व आर्थिक सेवांत सामील करून घेणे. यामुळे लोकांची आर्थिक क्षमता वाढते, बचत सुलभ होते, कर्ज-वित्तीय व्यवहार जलद होतात. डिजिटल व्यवहारामुळे या प्रक्रियेचा वेग वाढला आहे.

- **अध्ययनाची आवश्यकता आणि व्यापक दृष्टी**

या संशोधनाचा उद्देश केवळ व्यवहारातील बदल मोजणे नाही, तर ग्रामीण भागात डिजिटल व्यवहारांच्या स्वीकाराशी जुळलेली सामाजिक-आर्थिक परिस्थिती, नागरिकांचे अनुभव व त्यांचे भावनिक मूल्यांकन हे देखील समजून घेणे आहे.

गरज व महत्त्व

कोविड-१९ नंतर इंदापूर तालुक्यात डिजिटल पेमेंट व्यवहारात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे, कारण या बदलांचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर थेट परिणाम झाला आहे. महामारीच्या काळात सुरक्षित आणि स्पर्शरहित व्यवहारांची गरज निर्माण झाल्याने डिजिटल पेमेंटचा वापर वाढला. या बदलामुळे वित्तीय समावेशनाची प्रक्रिया गतीमान झाली का, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

हा अभ्यास डिजिटल साक्षरता, इंटरनेट सुविधा, लोकांचा तंत्रज्ञानावरील विश्वास आणि व्यवहारातील अडचणी ओळखण्यासाठी उपयुक्त ठरतो. तसेच शासन व बँकांना ग्रामीण भागात अधिक प्रभावी धोरणे आखण्यासाठी मार्गदर्शन मिळते. त्यामुळे हा संशोधन सामाजिक व आर्थिक दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे.

उद्दिष्टे

1. कोविड-१९ नंतर इंदापूर तालुक्यातील डिजिटल पेमेंट व्यवहारातील बदलांचे विश्लेषण करणे.
2. डिजिटल व्यवहार स्वीकारण्यामागील घटक (मोबाईल इंटरनेट, साक्षरता, विश्वास) शोधणे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

3. डिजिटल व्यवहार आणि वित्तीय समावेशन यांच्यातील संबंध समजणे.
4. धोरणात्मक शिफारसी सुचवणे.

विस्तार

- इंदापूर तालुक्यातील सर्व वयोगटातील नागरिक
- विविध डिजिटल पेमेंट पद्धती (UPI, मोबाईल बँकिंग, POS, QR कोड)
- बँकिंग सेवा आणि वित्तीय समावेशन
- कोविड-१९ पूर्व व नंतरच्या काळातील तुलना

मर्यादा

1. हा अभ्यास फक्त इंदापूर तालुक्यापुरता मर्यादित आहे; त्यामुळे निष्कर्ष संपूर्ण महाराष्ट्रासाठी लागू होतीलच असे नाही.
2. प्राथमिक माहिती उत्तरदात्यांच्या प्रामाणिक उत्तरांवर आधारित असल्याने काही प्रमाणात पक्षपात (Bias) असू शकतो.
3. डिजिटल व्यवहारांच्या अचूक आकडेवारीसाठी सर्व बँकांचे संपूर्ण डेटा उपलब्ध नव्हते.
4. कोविड-१९ कालावधीतील तात्पुरत्या बदलांचा दीर्घकालीन परिणाम पूर्णपणे मोजणे कठीण आहे.

संशोधन पद्धती

या संशोधनासाठी प्राथमिक व द्वितीयक अशा दोन्ही प्रकारच्या माहितीचा उपयोग करण्यात आला.

१. प्राथमिक माहिती:

- इंदापूर तालुक्यातील 120 नागरिकांचे संरचित प्रश्नावलीद्वारे सर्वेक्षण
- लहान व्यापारी, शेतकरी, महिला स्वयं-सहाय्यता गट सदस्य व बँक अधिकारी यांची मुलाखत
- प्रत्यक्ष निरीक्षण पद्धती

२. दुय्यम माहिती :

- संशोधन लेख, जर्नल
- बँक अहवाल
- सरकारी प्रकाशने
- RBI आणि NPCI अहवाल

नमुना निवड :

Stratified Random Sampling पद्धतीचा वापर.

डेटा विश्लेषण:

तक्ते, टक्केवारी पद्धती, तुलनात्मक विश्लेषण (Pre & Post COVID comparison) वापरण्यात आले.

अभ्यास-साहित्य पुनरावलोकन

1. पाटील व सुतार (2021) यांनी ग्रामीण भागातील डिजिटल पेमेंट वाढीचा वित्तीय समावेशनावर सकारात्मक परिणाम झाल्याचे नमूद केले आहे.
2. देशमुख (2022) यांच्या अभ्यासानुसार कोविड-१९ काळात डिजिटल बँकिंगचा वापर 35% ने वाढला.
3. कुमार व सिंग (2020) यांनी डिजिटल साक्षरतेचा व्यवहार स्वीकारावर थेट प्रभाव असल्याचे दर्शविले.
4. झवेरी (2021) यांनी मोबाईल वॉलेट वापर ग्रामीण बाजारपेठेत वाढल्याचे नमूद केले.
5. शर्मा (2023) यांनी डिजिटल सेवा आणि वित्तीय समावेशन यांच्यातील संबंध स्पष्ट केला.
6. मिश्रा व राव (2022) यांनी महामारीनंतर व्यवहाराच्या सवयींमध्ये बदल झाल्याचे सांगितले.
7. गुप्ता (2021) यांनी डिजिटल साक्षरता आर्थिक सहभाग वाढवते असे निष्कर्ष मांडले.
8. रेड्डी (2020) यांनी UPI व्यवहारात प्रचंड वाढ झाल्याचे दर्शविले.

या सर्व अभ्यासांतून डिजिटल व्यवहार आणि वित्तीय समावेशन यांचा घनिष्ठ संबंध दिसून येतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Data Analysis (डेटा विश्लेषण)

सर्वेक्षणातून खालील निष्कर्ष प्राप्त झाले:

घटक	कोविडपूर्व (%)	कोविडनंतर (%)
UPI वापर	28%	74%
मोबाईल बँकिंग	35%	68%
QR कोड व्यवहार	15%	60%
रोख व्यवहार	82%	40%
ATM वापर	72 %	48%



- महिलांमध्ये डिजिटल व्यवहारात 30% वाढ.
- बँक खाते उघडण्याचे प्रमाण वाढले.
- डिजिटल साक्षरतेत वाढ परंतु वृद्ध व्यक्तींमध्ये अजूनही कमी प्रमाण.

शोध

1. कोविड-१९ नंतर डिजिटल व्यवहारात लक्षणीय वाढ झाली.
2. UPI आणि QR कोड व्यवहार सर्वाधिक वाढले, ATM चा वापर कमी झाला
3. वित्तीय समावेशन निर्देशांकात सुधारणा झाली.
4. डिजिटल साक्षरतेचा अभाव हा प्रमुख अडथळा आहे.
5. महिलांचा सहभाग वाढलेला दिसतो.

निष्कर्ष

कोविड-१९ महामारीने इंदापूर तालुक्यातील आर्थिक व्यवहारांच्या पद्धतींमध्ये मूलभूत बदल घडवून आणला. डिजिटल पेमेंट व्यवहारात मोठी वाढ झाली असून यामुळे वित्तीय समावेशन प्रक्रियेला चालना मिळाली आहे. ग्रामीण भागात डिजिटल व्यवहाराची स्वीकार्यता वाढली असली तरी डिजिटल साक्षरता, तांत्रिक सुविधा आणि सुरक्षिततेबाबत जागरूकता वाढविण्याची आवश्यकता आहे. भविष्यात शासनाने प्रशिक्षण कार्यक्रम, डिजिटल शिक्षण मोहीम आणि तंत्रज्ञान सुलभता वाढविल्यास वित्तीय समावेशन अधिक प्रभावी होऊ शकते.

संदर्भ

1. पाटील, र., & सुतार, अ. (2021). ग्रामीण भारतातील डिजिटल पेमेंट आणि वित्तीय समावेशन. पुणे विद्यापीठ प्रकाशन.
2. देशमुख, स. (2022). कोविड-१९ चा डिजिटल बँकिंगवर परिणाम. मुंबई आर्थिक अभ्यास जर्नल, 15(2), 45-60.
3. कुमार, प., & सिंग, व. (2020). डिजिटल साक्षरता आणि व्यवहार स्वीकार. ग्रामीण विकास समीक्षा, 12(1), 78-90.
4. झवेरी, ल. (2021). भारतीय गावांतील मोबाईल वॉलेट वापर. आंतरराष्ट्रीय वित्त जर्नल, 9(3), 112-125.
5. शर्मा, द. (2023). डिजिटल सेवा व वित्तीय समावेशन. दिल्ली बिझनेस रिव्ह्यू, 18(1), 55-70.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

6. मिश्रा, त., & राव, क. (2022). महामारीनंतरचे पेमेंट वर्तन. भारतीय अर्थशास्त्र जर्नल, 27(4), 101-118.
7. गुप्ता, न. (2021). डिजिटल साक्षरता व आर्थिक सहभाग. सामाजिक विज्ञान त्रैमासिक, 33(2), 66-82.
8. रेड्डी, म. (2020). UPI स्वीकाराचे विश्लेषण. आर्थिक विश्लेषण जर्नल, 21(3), 90-104.
9. जोशी, अ. (2022). स्मार्टफोन वापर आणि पेमेंट निवड. तंत्रज्ञान आज, 14(2), 35-49.
10. पाटणकर, स. (2021). ग्रामीण बाजारातील QR कोड पेमेंट. डिजिटल वाणिज्य समीक्षा, 6(1), 22-38.
11. भावे, प. (2020). महाराष्ट्रातील बँकिंग प्रवेश. राज्य नियोजन अहवाल.
12. कुलकर्णी, ह. (2022). डिजिटल व्यवहारातील वर्तनात्मक बदल. भारतीय विपणन जर्नल, 19(3), 74-88.
13. काळे, र. (2021). वित्तीय समावेशन निर्देशांक. ग्रामीण अर्थविकास समीक्षा, 11(2), 40-56.
14. नायर, ज. (2023). डिजिटल स्वीकारातील आव्हाने. सामाजिक अर्थशास्त्र जर्नल, 25(1), 88-102.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

कोल्हापूर महानगरपालिका निवडणूक २०२६: राजकीय रणधुमाळीतून बदलत जाणारे शहर

डॉ. नागेश मधुकर महाडिक
सहा. प्राध्यापक (CHB), राज्यशास्त्र विभाग, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर
Email: nageshmahadik90@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180245
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 215-220
February- 2026
Submitted: 10 Jan. 2026
Revised: 20 Jan. 2026
Accepted: 08 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

Kolhapur महानगरपालिका निवडणूक २०२६ ही स्थानिक राजकारणातील महत्त्वपूर्ण घटना ठरत आहे. या निवडणुकीत विविध राजकीय पक्ष, स्थानिक आघाड्या आणि अपक्ष उमेदवार यांच्यात तीव्र स्पर्धा पाहायला मिळत आहे. शहराच्या विकासाच्या मुद्द्यांवर—जसे की पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, स्वच्छता, वाहतूक व्यवस्थापन आणि स्मार्ट सिटी उपक्रम—निवडणुकीचा केंद्रबिंदू राहिला आहे.

या निवडणुकीमुळे शहरातील राजकीय समीकरणांमध्ये बदल होत असून, मतदार अधिक जागरूक आणि विकासाभिमुख होत असल्याचे दिसून येते. युवकांचा वाढता सहभाग, सोशल मीडियाचा प्रभाव, आणि स्थानिक प्रश्नांवर आधारित प्रचार यामुळे निवडणूक प्रक्रियेत नवे ट्रेंड दिसत आहेत.

तसेच, महिला प्रतिनिधित्व, पारदर्शक प्रशासन आणि भ्रष्टाचारविरोधी भूमिका यांसारख्या मुद्द्यांनाही महत्त्व मिळत आहे. या पार्श्वभूमीवर, कोल्हापूर शहरात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिवर्तनाची प्रक्रिया वेगाने घडत आहे. अशा प्रकारे, २०२६ ची महानगरपालिका निवडणूक ही केवळ सत्तासंघर्ष नसून शहराच्या भविष्यातील विकासदिशा ठरवणारी एक निर्णायक प्रक्रिया आहे.

मुख्यशब्द: *Kolhapur, महानगरपालिका निवडणूक २०२६, स्थानिक राजकारण, शहरी विकास, पायाभूत सुविधा, मतदार जागरूकता, युवक सहभाग, सोशल मीडिया प्रभाव, महिला प्रतिनिधित्व*

प्रस्तावना

गेल्या काही वर्षांपासून प्रशासकीय राजवटीखाली असलेल्या कोल्हापूर महानगरपालिकेच्या)KMC) निवडणुका झाल्या आहेत. प्रभाग रचना, आरक्षणाचे मुद्दे आणि न्यायालयीन प्रक्रियांमुळे रखडलेली ही निवडणूक आता २०२६ मध्ये शहराच्या राजकीय आणि विकासाच्या दृष्टीने एक अत्यंत महत्त्वाचे पर्व ठरली आहे. या निवडणुकीमुळे केवळ स्थानिक सत्तेची सूत्रेच बदलणार नाहीत, तर राज्याच्या राजकारणात कोल्हापूरने कोणत्या पक्षास मान्यता दिली याविषयी आपणास माहिती मिळते आहे. यावरून हेही स्पष्ट झाले कि सत्ताधारी पक्षांना महत्व न देता इतर पक्षांना देखील जनमान्यता लोकात अजून टिकून असल्याचे दिसते. नवमतदार देखील आता आपली वाट बदलताना दिसत आहे, जरी महायुती ने सत्ता स्थापन केली असली तरी विरोधी पक्ष देखील तितक्याच ताकतीचा असल्याचे नाकारता येत नाही. कोल्हापूर असो किंवा इतर कोणतेही शहर असो सर्वत्र असणारी मतदार यास अपेक्षित असतो तो म्हणजे विकास, महागाई नियंत्रण आणि बेरोजगारी पासून मुक्तता पण वर्षानुवर्षे चालत आलेली राजकीय नेत्यांची अशावासने आणि दिशाभूल करणारा जाहीरनामा यातून जनता त्रस्त होणार हे नक्की आहे. असे असले तरी जनतेची चालेली दररोजची कसरत यामुळे जनतेचा निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास दिवसेंदिवस कमी होताना दिसते आहे. कोल्हापूर महानगरपालिका निवडणूक २०२६: राजकीय रणधुमाळी आणि शहराचे भवितव्य पाहण्यापूर्वी कोल्हापूर महानगरपालिका इतिहास थोडक्यात पाहणे आवश्यक आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. नागेश मधुकर महाडिक, सहा. प्राध्यापक (CHB), राज्यशास्त्र विभाग, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर

How to cite this article:
महाडिक, . नागेश . मधुकर . (2026). कोल्हापूर महानगरपालिका निवडणूक २०२६: राजकीय रणधुमाळीतून बदलत जाणारे शहर. Journal of Research and Development, 18(2(XXI)), 215–220.
https://doi.org/10.5281/zenodo.19548812

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19548812
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

नगरपालिकेची स्थापना (१८५४)

कोल्हापूर शहराच्या नागरी प्रशासनाची सुरुवात ब्रिटिश काळात झाली. स्थापना १२ ऑक्टोबर १८५४ रोजी 'कोल्हापूर नगरपालिका' (Municipal Council) म्हणून या संस्थेची स्थापना करण्यात आली. त्यावेळी कोल्हापूर हे एक संस्थान होते आणि छत्रपतींच्या मार्गदर्शनाखाली शहराचा कारभार पाहिला जात असे. सुरुवातीला ही नगरपालिका केवळ मर्यादित सेवा पुरवण्याचे काम होते.

राजर्षी शाहू महाराजांचे सुवर्णयुग (१८९४ - १९२२)

कोल्हापूर शहराच्या खऱ्या अर्थाने आधुनिक नियोजनाचे श्रेय लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांना जाते. त्यांनी नगरपालिकेच्या माध्यमातून अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले.

पाणीपुरवठा: शहराला शुद्ध पाणी मिळावे म्हणून त्यांनी 'राधानगरी' धरणाची संकल्पना मांडली आणि शहरात पाण्याचे नळ कोंडाळे (पाणी पुरवठा यंत्रणा) विकसित केली.

बाजारपेठा: शाहूपुरी व्यापार पेठ आणि गुळाची बाजारपेठ वसवली, ज्यामुळे कोल्हापूरची आर्थिक भरभराट झाली.

स्वच्छता आणि रस्ते: शहरात सांडपाण्याची व्यवस्था आणि रुंद रस्त्यांचे जाळे विणण्यास सुरुवात केली.

खासबाग आणि रंकाळा: कुस्तीसाठी खासबाग मैदान आणि पर्यटनासाठी रंकाळा तलावाचे सुशोभीकरण त्यांच्याच काळात झाले.

महानगरपालिकेत रूपांतर (१९७२)

शहराची वाढती लोकसंख्या आणि विस्तार लक्षात घेता, नगरपालिकेचे रूपांतर महानगरपालिकेत करणे आवश्यक झाले होते. दि. १५ डिसेंबर १९७२ रोजी कोल्हापूर नगरपालिकेचा दर्जा वाढवून ती 'कोल्हापूर महानगरपालिका' (KMC) बनली. आणि पहिले महापौर महानगरपालिका झाल्यानंतर शहराचे पहिले महापौर होण्याचा मान बॅरिस्टर पी. जी. पाटील यांना मिळाला.

भौगोलिक आणि प्रशासकीय विस्तार

सुरुवातीला कोल्हापूर शहर खूपच लहान होते, पण हळूहळू उपनगरे (उदा. राजारामपुरी, शाहूपुरी, कसबा बावडा) महापालिकेत समाविष्ट झाली. सध्या महापालिकेत ८१ प्रभाग (Wards) आहेत. कोल्हापूर महानगरपालिका ही 'ब' (B Grade) वर्गातील महानगरपालिका म्हणून ओळखली जाते.

ऐतिहासिक इमारती आणि वारसा

मुख्य इमारत: कोल्हापूर महानगरपालिकेची जुनी मुख्य इमारत ही हेरिटेज वास्तू आहे. तिची रचना ऐतिहासिक आणि प्रेक्षणीय आहे.

केशवराव भोसले नाट्यगृह: हे महापालिकेच्या मालकीचे असून कोल्हापूरच्या सांस्कृतिक इतिहासाचा तो महत्त्वाचा भाग आहे.

कोल्हापूर महानगरपालिकेने १८५४ पासून आजपर्यंतच्या १७० वर्षांहून अधिक काळात अनेक चढ-उतार पाहिले आहेत. छत्रपतींच्या काळातील शिस्त आणि आधुनिक काळातील लोकशाही मूल्ये यांचा संगम या संस्थेच्या कारभारात पाहायला मिळतो. अलीकडच्या काळात अनेक सामाजिक आर्थिक, राजकीय बदल झाले त्यामुळे विकास, रोजगार अशा मुद्यांऐवजी भावनिक मुद्द्यांवर निवडणुकांचा भर अधिक असल्याचे दिसते.

कोल्हापूर महानगरपालिका निवडणूक २०२६ चा सविस्तर आढावा खालीलप्रमाणे:

१. राजकीय पार्श्वभूमी आणि सद्यस्थिती

कोल्हापूर महानगरपालिकेवर अनेक वर्षे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (आघाडी) यांचे वर्चस्व राहिले आहे. मात्र, अलीकडच्या काळात राज्यातील राजकीय समीकरणे झपाट्याने बदलली आहेत. शिवसेनेत आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडलेली फूट आणि 'महायुती' विरुद्ध 'महाविकास आघाडी' असा थेट सामना आता स्थानिक पातळीवरही पाहायला मिळणार आहे. प्रशासकीय राजवटीमुळे नागरिकांच्या अनेक समस्या प्रलंबित आहेत, त्यामुळे लवकरात लवकर लोकप्रतिनिधींची सत्ता यावी, अशी सामान्य कोल्हापूरकरांची इच्छा आहे.

२. प्रमुख आघाड्या आणि नेते

कोल्हापूरच्या राजकारणात नेत्यांचे वैयक्तिक वर्चस्व आणि गटबाजी नेहमीच महत्त्वाची भूमिका बजावते.

തോൽക്കുകയും ആ കുടുംബം അതി ദാരിദ്ര്യത്തിലേക്ക് കൂപ്പുകുത്തുകയും ചെയ്യുന്നതാണ് പ്രമേയം. നായികയുടെ ഉമ്മ ഭർത്താവിനെ ചെമ്മീൻ അടിമ എന്നാണ് സംബോധന ചെയ്യുക."ചെമ്മീൻ അടിമ ആനമ ക്കാരൻറെ പൊന്നാര മോളെ പടിപ്പിക്കാൻ വരുന്നോ ? എന്നാണ് ചോദ്യം. അമ്മയുടെ പഴമയുടെ വമ്പിനെ നിസ്സാരവൽക്കരിക്കുവാൻ മകൾക്ക് സാധിക്കുന്നു.ൻറ്പ്പാപ്പക്കൊരാനെ ണ്ടാർന്ന്...

നോവലിൽ കാര്യങ്ങള് ശുഭ പര്യവസായി ആയാണ് ക്രമീകരിച്ചിരിക്കുക.

സാമൂഹിക ഘടകങ്ങൾ അവർക്ക് വിലങ്ങുതടികൾ സൃഷ്ടിക്കുന്നില്ല.

മുസ്ലിം മതനിയമങ്ങൾ സമൂഹത്തിലെ അസമത്വങ്ങൾക്കും അനീതികൾക്കും നിർദ്ദശിക്കുന്ന പരിഹാരമാർഗ്ഗം സാഹോദര്യത്തിന്റതോണ്. ഉള്ളവർ ഇല്ലാത്തവർക്ക് മുക്തഹസ്തം ദാനം ചെയ്യണം. കഥയിലെ നായിക കുഞ്ഞുപാത്തുമ്മ നിഷ്കളങ്കയാണ്. അവൾ രക്ഷപ്പടുത്തുന്ന കുരുവിയെ പോലതെന്നെ. അവൾ പ്രകൃതിയുടെ ഓമനയാണ്. കുഞ്ഞു പാത്തുമ്മയുടെ ഉമ്മയാണ് ഈ നോവലിലെ ആക്ഷപേ വസ്തു. മാമൂലുകളെയും അന്ധവിശ്വാസങ്ങളെയും എന്നപോലെ ആഭിജാത്യ ഭ്രമത്തെയും കൊള്ളരു തായ്മകളെയും ഉദാരമായി പരിഹസിക്കുന്ന നോവലാണിത്. കുഞ്ഞു പാത്തുമ്മയുടെ ഉമ്മ മതെിയടിപ്പുറത്തേ നടക്കൂ. അവരുടെ ബാപ്പയ്ക്ക് ഒരു വലിയ കൊമ്പനാന ഉണ്ടായിരുന്നു അത് നാല് കാഫറന്മാരെ കൊന്നതാണങ്കെിലും ഒരു മുസ്ലിമിനെ പോലും ഉപദ്രവിച്ചിട്ടിില്ല. അതിന് വിവരമുണ്ട്. ഗതകാല പ്രഭാവത്തിന്റെ മാധുര്യം ഓർമ്മയിൽ നുണച്ചിറക്കി കഴിയുന്ന ഉമ്മ വർത്തമാനകാല യാഥാർത്ഥ്യങ്ങളുമായി പൊരുത്തപ്പടൊതിരിക്കുന്നതാണ് ഹാസ്യരസം ദീപ്തം ആകുന്നത്.

" ലോകമലെ്ലാം ദാ തകർന്ന് കിടക്കുന്നു ഇനി എന്തിനുവണ്ടേി ജീവിക്കണം ? കുഞ്ഞു പാത്തുമ്മ വീണ്ടും ചോദിച്ചു. ഉമ്മ ഒടുവിൽ കണ്ണീരോടെ പറഞ്ഞു. "നിന്റെ ഉപ്പാടെ വലിയ കൊമ്പനാന.കുയ്യാ നർന്നന്നെ്,കുയ്യാന"(പുറം 121) കുഞ്ഞുപാത്തുമ്മ ഒരു സാധാരണ ഗ്രാമീണ മുസ്ലിം പൺകുട്ടിയാണ്. നിഷ്കളങ്കയും നിരക്ഷരയുമായ അവൾ നിസ്സാർ അഹമ്മദ് എന്നു പരോയ വിദ്യാസമ്പന്നനും പുരോഗമന ചിന്താഗതിക്കാരനും പട്ടണത്തിൽ വളർന്നവനുമായ ചെറുപ്പക്കാരനുമായി പ്രണയത്തിലാകുന്ന കഥ പറയുന്ന ഈ നോവൽ നിരക്ഷരത അന്ധവിശ്വാസങ്ങൾക്ക് വളക്കൂറുള്ള മണ്ണാണന്നെു പഠിപ്പിക്കുകയും വിദ്യാഭ്യാസത്തിന്റെ ആവശ്യകതയക്കെുറിച്ച് വായനക്കാരെ ബോധ്യപ്പടെുത്തുകയും ചെയ്യുന്നു.

വിദ്യാഭ്യാസ വശങ്ങളും ഗ്രാമദാരിദ്ര്യവും

നോവലിൽ പഴയ ജമീന്ദാരിത്തത്തിന്റെ അവശിഷ്ടങ്ങളോടൊപ്പം ജീവിക്കുന്ന ഒരു കുടുംബത്തിന്റെ അവസ്ഥയാണ് ചിത്രീകരിക്കുന്നത്. സാമ്പത്തിക തകർച്ചയത്തെുടർന്ന് കുടുംബത്തിന്റെ സാമൂഹികമാനം താഴ്ന്നുപോകുന്നു.

ഈ സാഹചര്യത്തിൽ വിദ്യാഭ്യാസം എല്ലാവർക്കും സമാനമായി ലഭ്യമല്ല..പൺകുട്ടികളുടെ വിദ്യാഭ്യാസം സമൂഹം ഗൗണമായി കാണുന്നു.

കുടുംബത്തിന്റെ പഴയ മഹത്വാഭിമാനം പുതിയ കാലഘട്ടത്തിലെ വിദ്യാഭ്യാസാവശ്യകതയെ അംഗീകരിക്കാൻ വിസമ്മതിക്കുന്നു.കുഞ്ഞുപാത്തുമ്മയുടെ ജീവിതത്തിലൂടെ സ്ത്രീവിദ്യാഭ്യാസത്തിലേക്കുള്ള പ്രവശേനത്തിന്റെ പരിമിതികൾ വ്യക്തമാകുന്നു.നോവലിലെ കഥാപാത്രങ്ങൾ പഴയ കാലത്തെ അനക്ഷരതയും പുതിയ കാലത്തിന്റെ സാക്ഷരതയും തമ്മിലുള്ള ഇടത്താവളത്തിൽ നിൽക്കുന്നു.

പഴയ തലമുറ പാരമ്പര്യബോധത്തിലും അഭിമാനത്തിലും ജീവിക്കുന്നു.പുതിയ തലമുറ വിദ്യാഭ്യാസം വഴി ജീവിതമാറ്റം തടുേന്നു.സാക്ഷരത വറെും വായിച്ചറിയൽ മാത്രമല്ല; അത് പുതിയ ചിന്തയും യാഥാർത്ഥ്യബോധവുമാണ്. ഈ ബോധത്തിന്റെ അഭാവം കുടുംബത്തെ സാമ്പത്തികമായി പിന്നാക്കത്തിലാക്കുന്നു.

വിദ്യാഭ്യാസത്തിലെ അസമത്വം നോവലിന്റെ പ്രധാന സാമൂഹിക വിഷയങ്ങളിലൊന്നാണ്.

സാമൂഹിക ഉയർച്ചയ്ക്ക് പാരമ്പര്യമഹിമ മതിയാകില്ല; വിദ്യാഭ്യാസമാണ് മുഖ്യ മാർഗം.പഴയ സമ്പത്ത് നഷ്ടപ്പടെ്ടാലും വിദ്യാഭ്യാസം പുതിയ അവസരങ്ങൾ സൃഷ്ടിക്കും.വിദ്യാഭ്യാസം വ്യക്തിക്ക് ആത്മബോധവും സ്വാഭിമാനവും നൽകുന്നു.പുതിയ കാലഘട്ടത്തിൽ മാന്യത

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

നടോനുള്ള ഉപാധിയാണ് പഠനം എന്നാണ്.ബഷീർ സൂചിപ്പിക്കുന്നത്, സമൂഹം മാറുമ്പോൾ വിദ്യാഭ്യാസം മാത്രമാണ് സ്ഥിരമായ സമ്പത്ത്..

ന്റൂപ്പാപ്പ ക്കൊരാനണ്ടാർന്നു

എന്ന കൃതി വിദ്യാഭ്യാസത്തിന്റെ പ്രാധാന്യത്തെ സാമൂഹികപരിവർത്തനത്തിന്റെ പശ്ചാത്തലത്തിൽ അവതരിപ്പിക്കുന്നു. വിദ്യാഭ്യാസത്തിലേക്കുള്ള പ്രവേശനത്തിലെ അസമത്വം, സ്ത്രീവിദ്യാഭ്യാസത്തിന്റെ അവഗണന, ഗ്രാമദാരിദ്ര്യത്തിന്റെ യാഥാർത്ഥ്യം എന്നിവ നോവലിൽ ശക്തമായി പ്രതിഫലിക്കുന്നു.

ഹാസ്യമട്ടിലാണ് അവതരണം എന്നിരുന്നാലും, അതിന്റെ അടിത്തട്ടിൽ വിദ്യാഭ്യാസം സാമൂഹിക ഉയർച്ചയ്ക്കുള്ള അനിവാര്യ ഉപാധിയാണെന്ന ശക്തമായ സന്ദേശം അടങ്ങിയിരിക്കുന്നു.

ബാല്യകാലസഖി, ൻറ്പ്പാപ്പക്കൊരാനെ ണ്ടാർന്ന്... ഈ രണ്ടു പ്രമേകഥകൾ താരതമ്യം ചയ്താൽ. ഒന്ന് ദുഃഖപര്യവസായിയും മറ്റേത് ശുഭപര്യവസായിയും, . രണ്ടും മുസ്ലിം സമൂഹത്തിൻറെ ജീവിതവീക്ഷണത്തയെും ആചാരമര്യാദകളയെും പകർത്തുന്നു. വിധി രണ്ടിലും നിർണായകമായ പങ്കുവഹിക്കുന്നു. ബാല്യകാലസഖിയിൽ നായികാനായകൻമാർക്ക് വിധി പ്രതികൂലമായ നിലപാടും മറ്റതോിൽ നരേമെറിച്ചും. വിധിയുടെ പ്രവർത്തനം എങ്ങനയൊകണം എന്ന് ആർക്കും മുൻകൂട്ടി നിശ്ചയിക്കുക സാധ്യമല്ല. അത് അലംഘനീയമാണ്.മനുഷ്യൻറെ സുഖദുഃഖങ്ങൾ സ്രഷ്ടാവിൻറെ പ്രസാദത്തെ ആശ്രയിച്ചിരിക്കുന്നു. പ്രതിപാദ്യം ഇങ്ങനയൊണ്."വിജനവും ശബ്ദ രഹിതവുമായ തരിശുഭൂമിയുടെ വിശാലതയിൽ സ്ഥാപിതമായ ഒരു ശിലാപ്രതിമ പോലെ മജീദ് ഇരുന്ന് ഓർത്തു, സുഹറയുടെ ജീവിത ഗ്രന്ഥത്തിലെ ഓരോ പുറവും, ആദ്യന്തം. എവിടയൊണ് അന്ത്യം?
(പുറം 89)

നിലവിലുള്ള സാമ്പത്തിക ഘടനയുടെ ചാഞ്ചല്യം, മുസ്ലിം വിവാഹ നിയമങ്ങളുടെ വകൈല്യം, മുസ്ലിം സമൂഹത്തിലെ സാഹോദര്യബോധത്തിന്റെ അഭാവം, നിലവിലുള്ള ഭരണക്രമത്തിൽ തൊഴിലാളികളുടെ അശരണാവസ്ഥ തുടങ്ങിയവയലെ്ലാം ബാല്യകാലസഖിയിൽ ചിത്രണം ചയ്യപ്പട്ടെിരിക്കുന്നു. ബഷീറിൻറെ വീക്ഷണത്തിൽ ഈ പ്രശ്നങ്ങൾക്കുള്ള പരിഹാരം സ്നഹേത്തിൽ സമൂഹത്തെ പുനപ്രതിഷ്ഠിക്കുക എന്നതാണ്.

പിതൃസത്താധിപത്യം

ബാല്യകാലസഖി ഒരു അനശ്വര പ്രണയ കഥ എന്ന നിലയിലാണ് ശ്രദ്ധിക്കപ്പടെുന്നതങ്കെിലും, അതിന്റെ അടിസ്ഥാനം സാമൂഹിക വ്യവസ്ഥകളുടെ വിമർശനമാണ്. പ്രത്യകേിച്ച് പിതൃസത്താധിപത്യ സമൂഹത്തിൽ സ്ത്രീയുടെ സ്ഥാനം, വിവാഹത്തിന്റെ സാമ്പത്തിക-സാമൂഹിക ഘടന, സ്ത്രീസ്വാതന്ത്ര്യത്തിന്റെ പരിമിതികൾ എന്നിവ ഈ കൃതിയിൽ സൂക്ഷ്മമായി പ്രത്യക്ഷപ്പടെുന്നു.

കുടുംബത്തിലും സമൂഹത്തിലും പുരുഷന്റെ അധികാരം, മൽക്കോയ്മ പുലർത്തുന്ന സാമൂഹിക സംവിധാനമാണ്. ബാല്യകാലസഖിയിൽ വ്യക്തമായി കാണുന്നത്.കഥാനായിക

സുഹ്റയുടെ ജീവിതനിർണ്ണയങ്ങൾ അവളുടെ കകൈളിൽ ഇല്ല. അവളുടെ വിദ്യാഭ്യാസം, വിവാഹം, ഭാവി—എല്ലാം കുടുംബവും സമൂഹവും ചേർന്ന് നിർണ്ണയിക്കുന്നു. സ്ത്രീയെ കുടുംബ അഭിമാനത്തിന്റെയും സാമ്പത്തിക സുരക്ഷയുടെയും ഉപകരണമായി കാണുന്ന മനോഭാവം ഇവിടെ പ്രത്യക്ഷമാണ്.

മജീദിന്റെ സാമ്പത്തിക പരാജയം പ്രണയത്തെ പരാജയപ്പടെുത്തുന്ന സാഹചര്യവും സൂചിപ്പിക്കപ്പടെുന്നു . . സ്ത്രീയുടെ വിവാഹം പ്രണയബന്ധത്തിന്റെ വിജയമല്ല, മറിച്ച് കുടുംബപരമായ 'സുരക്ഷിത'ത്വത്തിൻറെ സൂചനയാണ്.

സ്ത്രീസ്വാതന്ത്ര്യ ചിന്ത ബാല്യകാലസഖിയിൽ

ബഷീർ തുറന്ന സ്ത്രീവാദ പ്രസ്ഥാനത്തിന്റെ ഭാഷ ഉപയോഗിക്കുന്നിലല്ലങ്കെിലും, സുഹ്റ എന്ന കഥാപാത്രത്തിലൂടെ സ്ത്രീയുടെ അന്തർബലം അവതരിപ്പിക്കുന്നു.അവൾ ആത്മാർത്ഥമായി സ്നഹേിക്കുന്നു.അവൾ സ്വാഭിമാനം നിലനിർത്തുന്നു.ദുരിതങ്ങളെ മാനസിക ശക്തിയോടെ നരേിടുന്നു.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

സുഹ്റയുടെ നിശ്ശബ്ദ പ്രതിരോധം തന്നെയാണ് സ്ത്രീസ്വാതന്ത്ര്യത്തിന്റെ ആന്തരിക രൂപം. അവൾ തുറന്ന് വിപ്ലവം ചെയ്യുന്നില്ല; പക്ഷേ അവളുടെ ജീവിതവുദേന സമൂഹത്തെ ചോദ്യം ചെയ്യുന്നു. സ്ത്രീയുടെ വികാരങ്ങൾക്കും സ്വപ്നങ്ങൾക്കും സമൂഹം നൽകുന്ന അവഗണനയെ ബഷീർ വായനക്കാരനോട് ചോദ്യമായി ഉയർത്തുന്നു.

വിവാഹ വ്യവസ്ഥയുടെ സാമൂഹികവിമർശനം.

നോവലിൽ വിവാഹം സ്നഹേത്തിന്റെ സ്വാഭാവികപരിണതിയല്ല. അത് ഒരു സാമൂഹിക കരാർപോലെയൊണ്. സുഹ്റയുടെ വിവാഹം അവളുടെ വ്യക്തിപരമായ ആഗ്രഹങ്ങളെയും അഭിരുചികളെയും പരിഗണിക്കുന്നില്ല.. ഇവിടെ വിവാഹം ഒരു സ്ഥാപനമായി പ്രവർത്തിക്കുന്നു; അവിടെ തീരുമാനങ്ങളിൽ വ്യക്തിയുടെ സ്വാതന്ത്ര്യo നഷ്ടമാകുന്നു.

ബഷീർ ഇതിനെ തുറന്ന് വിമർശിക്കുന്നില്ല; പക്ഷേ സംഭവങ്ങളുടെ ക്രമവിന്യാസം തന്നെ ഒരു വിമർശനമായി മാറുന്നു.

ബാല്യകാലസഖി ദരിദ്രരായ പ്രണയജോഡികളുടെ കഥയന്നെതിലുപരി, പിതൃസത്താധിപത്യ സമൂഹത്തിലെ സ്ത്രീജീവിതത്തിന്റെ രഖേപ്പടുത്തലാണ്. സുഹ്റയുടെ ജീവിതം സ്ത്രീയുടെ സ്വാതന്ത്ര്യപരിധികളെ വ്യക്തമാക്കുന്നു. വിവാഹം എന്ന സ്ഥാപനത്തിന്റെ സാമൂഹിക നിർബന്ധിതത്വം ബഷീർ സൂക്ഷ്മമായി ചോദ്യം ചെയ്യുന്നു.

ഇങ്ങനെ നോക്കുമ്പോൾ, ഈ കൃതി മലയാള സാഹിത്യത്തിൽ സാമൂഹിക വിമർശനത്തിന്റെ ശക്തമായ ഉദാഹരണമായി നിലകൊള്ളുന്നു.

പാത്തുമ്മയുടെ ആട്

എന്ന നോവലിൽ നോവലിസ്റ്റ് ബഷീറിൻറെ സഹോദരിയാണ് പാത്തുമ്മ. പരേ സൂചിപ്പിക്കും പോലെ ഈ പാത്തുമ്മയുടെ ആടിനെ ചുറ്റിപ്പറ്റിയാണ് നോവലിലെ കഥയുടെ കിടപ്പ്. നോവലിലെ കഥാപാത്രങ്ങൾ, ബഷീറിൻറെ കുടുംബാംഗങ്ങൾ തന്നെയാണ്. തലയോലപ്പറമ്പിലെ അദ്ദഹേത്തിൻറെ വീട്ടിലാണ് കഥ നടക്കുന്നത്. ബഷീറിൻറെ രണ്ട് സഹോദരിമാരിൽ മൂത്തത് പാത്തുമ്മയാണ്. പാത്തുമ്മക്കും ഭർത്താവ് കൊച്ചുണ്ണിക്കും ഖദീജ എന്നൊരു മകൾ ഉണ്ട്. ബഷീറിൻറെ സഹോദരങ്ങളിൽ തറവാട്ടിൽ നിന്നും മാറി താമസിക്കുന്നത് പാത്തുമ്മ മാത്രമാണ്. എങ്കിലും എല്ലാ ദിവസവും രാവിലെ തന്നെ മകളെയും കൂട്ടി അവർ തറവാട്ടിൽ എത്തും. അവരുടെ വരവ് ഒരു സ്റ്റൈലിലാണ് എന്നാണ് ബഷീർ പറയുന്നത് പാത്തുമ്മ എപ്പോഴും പറയുന്ന ഒരു വാചകം ഉണ്ട് 'എൻറെ ആട് പറെട്ടെ, അപ്പോ കാണാം.' പാത്തുമ്മയ്ക്ക് കാര്യമായ വിദ്യാഭ്യാസം ഒന്നുമില്ല. എങ്കിലും കുടുംബത്തിന്റെ വളർച്ചയ്ക്ക് വണ്ടേടി കഠിനാധ്വാനം ചെയ്യുന്ന ഒരു സ്ത്രീയാണ് അവർ. പാത്തുമ്മ പ്രതീക്ഷിച്ചിരുന്നതുപോലെ ഒരിക്കൽ പാത്തുമ്മയുടെ ആട് പറ്റെ. പാൽ വിറ്റ് കിട്ടുന്ന പണം കൊണ്ട് വീടിൻറെ വാതിൽ നന്നാക്കുന്നതുൾപ്പടെ പലതും ചെയ്യണമന്നെ് ഫാത്തിമ വിചാരിച്ചിരുന്നു. പക്ഷേ നടക്കുന്നില്ല. കുടുംബബന്ധങ്ങൾ നിലനിർത്തുവാൻ അവർ പല വിട്ടുവീഴ്ചയും ചെയ്യണ്ടേി വന്നു. . പാത്തുമ്മയുടെ ആട് ഇവിടെ കുടുംബത്തിൻറെ സാമ്പത്തിക അരക്ഷിതത്വത്തിൻറെ ഒരു പ്രതീകമായി മാറുന്നു. അത് പുസ്തകങ്ങളും കയെഴുത്തുപ്രതികളും തിന്നുന്നതിലൂടെ ദാരിദ്ര്യം ജീവിതത്തിന്റെ സമാധാനത്തിനും സൃഷ്ടിപരമായ പ്രവർത്തനങ്ങൾക്കും തടസ്സമാകുന്നു

മതിലുകൾ

ബ്രിട്ടീഷുകാർക്കതെിരെ എഴുതിയതിനാൽ ബഷീർ ജയിലിൽ അട ക്കപ്പടെുന്നു. അവിടെ വച്ചാണ് മതിലുകൾ ' എഴുതുന്നത്. സ്വാതന്ത്ര്യസമരകാലത്തെ രാഷ്ട്രീയ അടിച്ചമർത്തലിന്റെ സൂചനയാണ്. ഈ ജയിൽവാസം. അഭിപ്രായസ്വാതന്ത്ര്യം നിഷധേിക്കപ്പടെ്ടിരുന്ന കാലഘട്ടം ഇതിലൂടെ പ്രതിഫലിക്കുന്നു. ജയിൽജീവിതത്തിന്റെ മാനുഷിക വശവും കൃതിയിൽ കാണാം. തടവുകാരും ജയിൽവാർഡനും തമ്മിൽ മനുഷ്യബന്ധങ്ങൾ രൂപപ്പടെുന്നത്, കുറ്റവാളികളായി മുദ്രകുത്തപ്പടെ്ടവരിലും മനുഷ്യസ്നഹേം നിലനിൽക്കുന്നതായി കാണിക്കുന്നു.മതിൽ ഇവിടെ ഭൗതിക തടസ്സമാത്രമല്ല; സ്ത്രീ-പുരുഷ വരേതിരിവിന്റെയും സാമൂഹിക നിയന്ത്രണങ്ങളുടെയും പ്രതീകമാണ്. പരസ്പരം കാണാതെ വളരുന്ന ബഷീർ–നാരായണി പ്രണയം ആത്മബന്ധത്തിന്റെ ശക്തിയെ വ്യക്തമാക്കുന്നു.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

ജയിൽമോചനം ലഭിക്കുമ്പോൾ സന്തോഷത്തിനുപകരം വേദന അനുഭവിക്കുന്ന ബഷീർ, ഭൗതിക സ്വാതന്ത്ര്യത്തേക്കാൾ മാനസിക ബന്ധങ്ങൾ മനുഷ്യജീവിതത്തിൽ പ്രധാനമാണെന്ന് സൂചിപ്പിക്കുന്നു.
അങ്ങനെ മതിലുകൾ പ്രണയകഥയെ അതിലുപരി രാഷ്ട്രീയ അടിച്ചമർത്തൽ, ജയിൽജീവിതം, ലിംഗഭേദപരമായ വേർതിരിവ്, സ്വാതന്ത്ര്യത്തിന്റെ അർത്ഥം എന്നിവ അവതരിപ്പിക്കുന്ന സാമൂഹിക കൃതിയാണ്.

ജന്മദിനം .

എന്ന കഥയിൽ വിശപ്പ് – മനുഷ്യന്റെ അടിസ്ഥാന യാഥാർത്ഥ്യം എന്ന് വിളിച്ചോതുന്നു.കഥയിൽ ബഷീർ മുഴുപട്ടിണിയിലായിരിക്കുകയാണ്. പുറമേ കാണുന്ന 'സാഹിത്യകാരൻ' എന്ന പ്രതിച്ഛായയ്ക്ക് വിപരീതമായി, അവൻ ഒരു സാധാരണ മനുഷ്യനായി വിശപ്പിന്റെ വേദന അനുഭവിക്കുന്നു. ഇതിലൂടെ മനുഷ്യന്റെ പ്രാഥമിക പ്രശ്നം വിശപ്പാണെന്ന് ബഷീർ ചൂണ്ടിക്കാണിക്കുന്നു. സമൂഹം ഉയർന്ന ആശയങ്ങൾ സംസാരിക്കുമ്പോഴും, അടിസ്ഥാന ആവശ്യങ്ങൾ നിറവേറ്റപ്പെടാത്ത അവസ്ഥയാണ് ഇവിടെ പ്രത്യക്ഷമാകുന്നത്.
ബുദ്ധിജീവികളുടെ കപടത,ഇടയ്ക്കിടെ സന്ദർശിക്കുന്ന പ്രമുഖർ, ഗൗരവമുള്ള സാമൂഹ്യപ്രശ്നങ്ങൾ ചർച്ച ചെയ്യുന്നു; എന്നാൽ ബഷീറിന്റെ വിശപ്പിനെക്കുറിച്ച് ആരും ചോദിക്കുന്നില്ല. ഇതിലൂടെ ബഷീർ "വാക്കുകളിൽ സമൂഹസേവനം ചെയ്യുന്ന" ബുദ്ധിജീവികളുടെ അനുഭവവിമുഖതയും കപടസാമൂഹികബോധവും തുറന്നു കാട്ടുന്നു.

ദാരിദ്ര്യവും നൈതിക സംഘർഷവും

അവസാനം, സ്വന്തം ജന്മദിനത്തിലെ സുഖനിദ്രയ്ക്കായി അയൽവാസിയുടെ ഭക്ഷണം മോഷ്ടിക്കാൻ ബഷീർ എത്തുന്നു. ഇത് ഒരു കുറ്റകൃത്യത്തിന്റെ ചിത്രീകരണം മാത്രമല്ല; വിശപ്പ് മനുഷ്യനെ എത്രത്തോളം തളർത്തുന്നു എന്നതിന്റെ സാമൂഹ്യസാക്ഷ്യമാണ്. ദാരിദ്ര്യം നൈതികതയെ പോലും ചോദ്യം ചെയ്യാൻ ഇടയാക്കുന്ന യാഥാർത്ഥ്യം ഇവിടെ കാണാം.ഹാസ്യത്തിനുള്ളിലെ സാമൂഹിക വിമർശനം ഇവിടെ തെളിയുന്നു.

ശബ്ദങ്ങൾ

നാല് റോഡുകളുടെ ജംഗ്ഷനിൽ ഉപേക്ഷിക്കപ്പെട്ട ഒരു കുഞ്ഞ് വളർന്ന് രണ്ടാം ലോക മഹായുദ്ധത്തിൽ പങ്കെടുക്കുന്നു. യുദ്ധത്തിലെ കൊലപാതകങ്ങളും രക്തത്തിന്റെ ഭീകരതയും അവന്റെ മനസ്സിനെ തകർക്കുന്നു. സമാധാനജീവിതത്തിൽ അവന് പൊരുത്തപ്പെടാൻ കഴിയുന്നില്ല.ലൈംഗിക വഴിതെറ്റലുകളും രോഗബാധയും മൂലം അവൻ ഭവനരഹിതനാകുന്നു. ജീവിതത്തിന്റെ അർത്ഥശൂന്യത അവനെ ആത്മഹത്യാശ്രമത്തിലേക്ക് നയിച്ചെങ്കിലും അത് പരാജയപ്പെടുന്നു. ഒടുവിൽ അവൻ ഒരു എഴുത്തുകാരനോട് തന്റെ ദുരന്തജീവിതം തുറന്ന് പറയുന്നതോടെ കഥ അവസാനിക്കുന്നു.
ഈ കൃതിയിൽ ബഷീർ യുദ്ധത്തിന്റെ ഭീകരത, അനാഥത്വം, ലൈംഗികരോഗങ്ങൾ, ഭവനരഹിതത്വം, രാഷ്ട്രത്വവാദത്തിന്റെ വിഡ്ഢിത്തം, മാനസിക വിഘടനം തുടങ്ങിയ സാമൂഹിക യാഥാർത്ഥ്യങ്ങളെ നിർഭയമായി അവതരിപ്പിക്കുന്നു.ഈ കഥയിൽ വ്യക്തിയുടെ ദുഃഖം ഒരു വ്യക്തിപരമായ അനുഭവമല്ല; അത് സമൂഹത്തിന്റെ സമഗ്രമായ പരാജയത്തിന്റെ പ്രതിഫലനമാണ്.ബഷീർ ഇവിടെ മനുഷ്യനെക്കുറിച്ചുള്ള ഒരു വേദനാഭരിതമായ സത്യമാണ് ഉച്ചരിക്കുന്നത്:
യുദ്ധവും സമൂഹവും ചേർന്ന് മനുഷ്യന്റെ ആത്മാവിനെ തകർക്കുമ്പോൾ, അവന്റെ "ശബ്ദങ്ങൾ" മാത്രമാണ് ബാക്കിയാവുന്നത്.

വിശ്വവിഖ്യാതമായ മൂക്ക്

വൈക്കം മുഹമ്മദ് ബഷീറിന്റെ പ്രശസ്തമായ കഥകളിലൊന്നാണ് വിശ്വവിഖ്യാതമായ മൂക്ക്. ആക്ഷേപഹാസ്യത്തിൽ പൊതിഞ്ഞ സാമൂഹികവിമർശനമായാണ് ഈ കഥ ബഷീർ പറയുന്നത്. ഒരു സാധാരണ പാചകത്തൊഴിലാളിക്ക് ഒരു ദിവസം മൂക്കിന് നീളം വയ്ക്കുന്നതും അതിനത്തുടർന്നുണ്ടാവുന്ന സംഭവപരമ്പരകളുമാണ് ഈ കഥയിലെ ഇതിവൃത്തം. മൂക്ക് എന്ന

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

വിഷയത്തിലൂടെ സമൂഹത്തിലെ പൊള്ളത്തരങ്ങളെ ഹാസ്യാത്മകമായി നോക്കിക്കാണുകയാണ് ബഷീർ ഈ കഥയിലൂടെ.ഈ "മൂക്ക്" വെറും ശരീരാവയവമല്ല; അത് സമൂഹത്തിന്റെ മനോഭാവങ്ങളുടെ പ്രതീകമാണ്.

മാധ്യമങ്ങളുടെ അതിരുവിടൽ

ഒരു സാധാരണ ശാരീരിക മാറ്റം വാർത്തയാകുകയും, അതിന് അമിത പ്രാധാന്യം ലഭിക്കുകയും ചെയ്യുന്നു.ചെറിയ കാര്യങ്ങളെ sensationalize ചെയ്യുന്ന മാധ്യമപ്രവണതയെ ബഷീർ വിമർശിക്കുന്നു.യാഥാർത്ഥ്യപ്രശ്നങ്ങൾ അവഗണിക്കപ്പെടുമ്പോൾ, വിചിത്രതകൾക്ക് പ്രചാരം ലഭിക്കുന്നു.

പ്രശസ്തിയോടുള്ള സമൂഹത്തിന്റെ ആസക്തി.

മൂക്ക് നീളുന്നതോടെ ആ പാചകക്കാരൻ "വിശ്വവിഖ്യാതൻ" ആയി മാറുന്നു.കഴിവോ മൂല്യമോ അല്ല, വ്യത്യസ്തതയാണ് പ്രശസ്തിയുടെ കാരണം.വ്യക്തിയുടെ യഥാർത്ഥ ജീവിതസാഹചര്യങ്ങൾ മറയിലാക്കപ്പെടുന്നു.

രാഷ്ട്രീയ-സാമൂഹിക ഇടപെടൽ.

മൂക്കിന്റെ വിഷയത്തിൽ രാഷ്ട്രീയക്കാരും സമൂഹനതോക്കളും ഇടപെടുന്നു.പൊതു ശ്രദ്ധ നേടാൻ ഏതു വിഷയവും ഉപയോഗിക്കുന്ന രാഷ്ട്രീയ സംസ്കാരം.വ്യക്തിയുടെ സ്വകാര്യത പോലും പൊതുപ്രയോജനത്തിനായി ഉപയോഗിക്കപ്പെടുന്നു.

വ്യക്തിയുടെ വസ്തുവൽക്കരണം.

മൂക്ക് ഒരു "കാഴ്ചവസ്തു" ആകുന്നു.മനുഷ്യനെ മനുഷ്യനായി കാണാതെ ഒരു വിചിത്രതയായി കാണുന്ന മനോഭാവം.
ജനകീയ ആകാംക്ഷ വ്യക്തിയുടെ സ്വാതന്ത്ര്യത്തെ ഇല്ലാതാക്കുന്നു.

ഹാസ്യത്തിനുള്ളിലെ കഠിന വിമർശനം.

കഥ ഹാസ്യാത്മകമങ്കിലും അതിന്റെ അടിസ്ഥാനം സാമൂഹിക പൊള്ളത്തരങ്ങളുടെ വെളിപ്പെടുത്തലാണ്.ജനങ്ങളുടെ കൂട്ടമനശാസ്ത്രം (mass psychology).
യഥാർത്ഥ പ്രശ്നങ്ങളിൽ നിന്ന് സമൂഹം ശ്രദ്ധ തിരിക്കുന്ന പ്രവണത. സൂചിപ്പിക്കുന്നു
ഹാസ്യത്തിന്റെ മറവിൽ ബഷീർ ചോദിക്കുന്ന പ്രധാനചോദ്യം:
സമൂഹം യഥാർത്ഥ മൂല്യങ്ങളെ കാണുന്നുണ്ടോ, അല്ലങ്കിൽ വെറും 'മൂക്കുകൾ' മാത്രം നോക്കിക്കാണുകയോ?

സ്ഥലത്തെ പ്രധാനദിവ്യൻ

ബഷീർ രചിച്ച മറ്റൊരു ആക്ഷേപഹാസ്യനോവലായ "സ്ഥലത്തെ പ്രധാനദിവ്യൻ" സാമൂഹ്യ–രാഷ്ട്രീയ യാഥാർത്ഥ്യങ്ങളെ നർമ്മത്തിന്റെ ആവരണംകൊണ്ട് ശക്തമായി വിമർശിക്കുന്ന കൃതിയാണ്. ആനവാരി രാമൻ നായർ, പൊൻകുരിശു തോമ, ഒറ്റക്കണ്ണൻ പോക്കർ, എട്ടുകാലി മമ്മൂഞ്ഞ് തുടങ്ങിയ കഥാപാത്രങ്ങൾ വഴി ബഷീർ സമൂഹത്തിന്റെ പല തട്ടുകളെയും തുറന്നുകാട്ടുന്നു.

രാഷ്ട്രീയ കപടത .

"പ്രധാന ദിവ്യൻ" എന്ന വിശേഷണം തന്നെ വ്യംഗ്യാത്മകമാണ്. സമൂഹത്തിൽ അധികാരവും പ്രഭാവവും ഉള്ളവർ ദൈവിക സ്ഥാനത്തേക്ക് ഉയർത്തപ്പെടുന്ന പ്രവണതയെ ബഷീർ പരിഹസിക്കുന്നു.
കണ്ടമ്പറയൻ എന്ന കഥാപാത്രം സമൂഹത്തിൽ നിർമിതനായ ഒരു "ദിവ്യൻ" ആണ് – ജനങ്ങളുടെ അന്ധവിശ്വാസവും രാഷ്ട്രീയ അനുകൂലതയും ചേർന്ന് സൃഷ്ടിച്ച ഒരു പ്രതീകം.ഇതിലൂടെ അധികാര രാഷ്ട്രീയവും നേതൃപൂജയും തുറന്നു കാണിക്കുന്നു.

അന്ധവിശ്വാസവും മതചിന്തയുടെ ദുരുപയോഗവും.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

കഥയിലെ ചില കഥാപാത്രങ്ങൾ "ദിവ്യത്വം" എന്ന ആശയം ഉപയോഗിച്ച് സ്വാർത്ഥലാഭം തടുന്നു. മതവിശ്വാസത്തെ ചൂഷണം ചെയ്ത് ജനങ്ങളെ നിയന്ത്രിക്കുന്ന പ്രവണത സമൂഹത്തിൽ എങ്ങനെയുണ്ടെന്നത് ബഷീർ കാണിക്കുന്നു.

മനുഷ്യസ്വഭാവത്തിന്റെ വിചിത്രതകൾ

എട്ടുകാലി മമ്മൂഞ്ഞ് പോലുള്ള കഥാപാത്രങ്ങൾ സാമൂഹ്യ "മണ്ടത്തരങ്ങളുടെ" പ്രതീകങ്ങളാണ്. മനുഷ്യർ എത്ര എളുപ്പത്തിൽ സ്വാധീനിക്കപ്പടുന്നു, വിശ്വസിക്കുന്നു, പിന്നെ വഞ്ചിക്കപ്പടുന്നു എന്ന യാഥാർത്ഥ്യം ബഷീർ സൂചിപ്പിക്കുന്നു."സ്ഥലത്തെ പ്രധാനദിവ്യൻ" ഒരു ലളിതമായ കഥയല്ല; അത് സമൂഹത്തിലെ രാഷ്ട്രീയ കപടത, അന്ധവിശ്വാസം,അധികാരാരാധന,വർഗ്ഗവ്യത്യാസം,മനുഷ്യന്റെ അബദ്ധചിന്തകൾ എന്നിവയുടെ നർമ്മാത്മക പ്രതിഫലനമാണ്.

ഉപസംഹാരം (Conclusion)

വൈക്കം മുഹമ്മദ് ബഷീറിൻറെ രചനകൾ സാമൂഹിക യാഥാർത്ഥ്യങ്ങളുടെ ജീവനുള്ള രേഖകളാണ്; ദാരിദ്ര്യം, ജാതി–മത വ്യവസ്ഥ, പിതൃസത്ത, വിദ്യാഭ്യാസ അസമത്വം, ഗ്രാമജീവിതം എന്നിവയെ മനുഷ്യസ്നേഹത്തിന്റെ ദൃഷ്ടികോണത്തിൽ അദ്ദേഹം അവതരിപ്പിക്കുന്നു.

Premalekhanam (പ്രേമലേഖനം) ജാതി–മത മതിലുകളെ പരിഹാസത്തിലൂടെ ചോദ്യം ചെയ്ത് സമത്വവും വ്യക്തിസ്വാതന്ത്ര്യവും പ്രബോധിപ്പിക്കുന്നു.

Balyakalasakhi (ബാല്യകാലസഖി) പിതൃസത്താധിപത്യവും സാമ്പത്തിക അനിശ്ചിതത്വവും സ്ത്രീജീവിതത്തിന്റെ പരിമിതികളും കരുണാഭരിതമായി ചിത്രീകരിക്കുന്നു.

Ntuppuppakkoranendarnnu (ന്റുപ്പാപ്പയ്ക്കൊരാനണ്ടാർന്ന്) അന്ധവിശ്വാസങ്ങളും വിദ്യാഭ്യാസ അസമത്വവും ഗ്രാമദാരിദ്ര്യവും നർമ്മത്തിന്റെ മറവിൽ ശക്തമായി വിമർശിക്കുന്നു.

Pathummayude Aadu (പാത്തുമ്മയുടെ ആട്) എന്ന കൃതിയുടെ സന്ദേശം, ദാരിദ്ര്യത്തിന്റെയും കുടുംബകലഹങ്ങളുടെയും ഇടയിലും സ്നേഹവും സഹിഷ്ണുതയും മനുഷ്യബന്ധങ്ങളുടെ സാരമായ മൂല്യങ്ങളാണെന്നതാണ്. അധികാര കപടത വ്യക്തമാക്കുന്ന ഇതര കൃതികളും തന്നെ വിധേയമാകുന്നു

ഇങ്ങനെ ബഷീറിന്റെ സാഹിത്യം സാമൂഹിക വിമർശനവും മാനവികദർശനവും ഏകീകരിക്കുന്ന, കാലാതീത പ്രസക്തിയുള്ള ഒരു സാമൂഹിക രേഖയായി നിലകൊള്ളുന്നു.

References

1. Basheer, Vaikom Muhammad. Anavariyum Ponkurishum. Current Books, 1953.
2. Balyakalasakhi. Mangalodayam, 1944.
3. Basheer Sampoorna Kruthikal. Vol. 1, DC Books, 2024.
4. Basheer Sampoorna Kruthikal. Vol. 2, DC Books, 2024.
5. Basheer Sampoorna Kruthikal. Vol. 3, DC Books, 2024.
6. Bhoomiyude Avakashikal. DC Books, 1977.
7. Jeevithanizhalppadukal. Current Books, 1954.
8. Mathilukal. Current Books, 1965.
9. Ntuppuppakkoranendarnnu. Current Books, 1951.
10. Pathummayude Aadu. Current Books, 1959.
11. Pavappettavarude Veshya. Current Books, 1952.
12. Shabdangal. Current Books, 1947.
13. Viddhikalude Swargam. Current Books, 1948.
14. Vishappu. Current Books, 1954.
15. Chummar, T. M. Gadhya Sahithya Charithram. National Book Stall, 1955.
16. George, K. M. Malayala Sahitya Charithram Prasthanangaliloode. National Book Stall, 1958.
17. Tharakan, K. M. Malayala Novel Sahitya Charithram. Kerala Sahitya Akademi, 1998.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) याच्या प्रगतीचा अभ्यास

डॉ. रोहित दिनकर बारसिंग[१], डॉ. समिना एस. जमादार[२], डॉ. सारीका नामदेव शिंदे[३]

[1,2] सहायक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, कोल्हापूर
[3] सहायक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर
Email: rohitbarsing1986@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180249
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 240-243
February- 2026
Submitted: 10 Jan. 2026
Revised: 20 Jan. 2026
Accepted: 08 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) हा ग्रामीण गरीब आणि वंचित घटकांच्या सामाजिक-आर्थिक सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणारा एक महत्त्वाचा कार्यक्रम आहे. या अभ्यासात स्वयंसहायता गटांतील सदस्यांची संख्या, मिळालेले अनुदान आणि खर्च या आधारावर २०१९ ते २०२३ पर्यंत उमेद अभियानाच्या प्रगतीचे विश्लेषण केले आहे. या अभ्यासातून असे दिसून आले आहे की, या कालावधीत आर्थिक तरतुदी आणि खर्चात लक्षणीय वाढ झाली असली तरी, स्वयंसहायता गटांमधील सदस्यांच्या संख्येत सतत घट होत आहे. यावरून असे दिसून येते की, आर्थिक संसाधनांमध्ये वाढ होऊनही, लाभार्थी शाश्वतता, गटांची कार्यक्षमता आणि सामाजिक-आर्थिक परिणामांमध्ये अपेक्षित सुधारणा साध्य झालेली नाही. हे उमेद अभियानाच्या अंमलबजावणीची प्रभावीता, संस्थात्मक बळकटीकरण आणि लाभार्थी-केंद्रित दृष्टिकोन यावर पुनर्विचार करण्याची गरज अधोरेखित करते.

कीवर्ड: *ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद), स्वयंसहायता गट, सदस्य संख्या, प्राप्त अनुदान, खर्च आणि महाराष्ट्र राज्य.*

प्रस्तावना

महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) हे राज्यातील ग्रामीण भागातील गरीब आणि वंचित घटकांच्या सामाजिक-आर्थिक सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणारा एक महत्त्वाचा कार्यक्रम आहे. राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान (NRLM) अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या या योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण गरीब कुटुंबांचे उत्पन्न वाढवणे, स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि त्यांचे राहणीमान सुधारणे हा आहे. महिलांना केंद्रस्थानी ठेवून स्वयंसहाय्यता गटांद्वारे विकास प्रक्रिया राबवणे हे या अभियानाचे मुख्य वैशिष्ट्य आहे.

ग्रामीण महाराष्ट्राला गरिबी, बेरोजगारी, कमी उत्पन्न असलेली शेती, अपुरी कौशल्ये आणि आर्थिक असुरक्षितता अशा विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या समस्यांवर मात करण्यासाठी उमेद मोहिमेने संस्थात्मक संरचना मजबूत करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. गावपातळीवर स्वयं- सहायता गट, गाव संघटना आणि तालुकास्तरीय संघटनांद्वारे महिलांमध्ये बचत, कर्ज व्यवस्थापन आणि सामूहिक निर्णयक्षमता विकसित करण्याचे प्रयत्न केले गेले आहेत. उमेद उपक्रमांतर्गत, महिलांना आर्थिक साक्षरता, उद्योजकता विकास, कौशल्य प्रशिक्षण आणि बाजारपेठेतील दुवे अशा विविध उपक्रमांद्वारे सक्षम केले जाते. यामुळे ग्रामीण महिलांना पारंपारिक कृषी व्यवसायांव्यतिरिक्त, सूक्ष्म-उद्योग, सेवा क्षेत्रे आणि स्थानिक संसाधन-आधारित उपजीविका उपलब्ध होत आहे. या उपक्रमांचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम होत असल्याचे दिसून येते.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. रोहित दिनकर बारसिंग, सहायक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, कोल्हापूर

How to cite this article:
बारसिंग,. रोहित. दिनकर., जमादार,. समिना. एस., & शिंदे,. सारीका. नामदेव. (2026). महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) याच्या प्रगतीचा अभ्यास. Journal of Research and Development, 18(2(XXI)), 240–243. https://doi.org/10.5281/zenodo.19549072

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19549072

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

या अभियानाच्या अंमलबजावणीत सरकार, स्वयंसेवी संस्था, बँका आणि स्थानिक संस्था यांच्यातील समन्वय महत्त्वाचा आहे. विविध वित्तीय संस्थांद्वारे बचत गटांना सुलभ कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे, ज्यामुळे ग्रामीण भागात आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणि स्थिरता वाढली आहे. तसेच, सामाजिक भांडवल निर्माण होत आहे, ज्यामुळे समाजात महिलांचा सहभाग वाढत आहे.

तथापि, उमेद अभियानाच्या अंमलबजावणीला प्रादेशिक असमानता, काही ठिकाणी मर्यादित प्रशिक्षण सुविधा, बाजारपेठेपर्यंत पोहोचण्यात अडचणी आणि संस्थात्मक क्षमतेतील फरक यासारख्या आव्हानांचा सामना करावा लागतो. म्हणून, अभियानाची प्रत्यक्ष प्रगती, लाभार्थ्यांवर होणारा परिणाम आणि उद्दिष्टांच्या साध्यतेची पातळी यांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर, सध्याचे संशोधन महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) च्या प्रगतीचा अभ्यास करत आहे. या अभ्यासात अभियानाचे कार्य, उपलब्धी, मर्यादा आणि भविष्यातील सुधारणांबाबत वस्तुनिष्ठ निष्कर्ष सादर करण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे धोरणनिर्मिती, अंमलबजावणी सुधारणा आणि ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेला दिशा देण्यास मदत होईल.

संशोधन समस्या

ग्रामीण भागातील गरीब आणि वंचित घटकांच्या सामाजिक-आर्थिक सक्षमीकरणासाठी महाराष्ट्रात ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) राबवले जात असले तरी, त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीतील प्रगतीची पातळी, लाभार्थ्यांपर्यंत पोहोच, स्वयं- सहायता गटांची कार्यक्षमता, उपजीविका उपक्रमांची शाश्वतता आणि महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणावर प्रत्यक्ष परिणाम याबद्दल कोणतेही स्पष्ट आणि व्यापक चित्र उपलब्ध नाही. वेगवेगळ्या जिल्ह्यांमधील प्रादेशिक असमानता, प्रशिक्षण आणि कौशल्य विकासाच्या संधींमधील फरक, वित्तपुरवठा आणि बाजारपेठेतील अडचणी आणि संस्थात्मक समन्वयातील मर्यादा यांचा या अभियानाच्या उद्दिष्टांच्या साध्यतेवर किती परिणाम झाला आहे हे तपासणे आवश्यक आहे. म्हणूनच, या संशोधनाची मुख्य समस्या म्हणजे उमेद अभियानाच्या अंमलबजावणी आणि प्रगतीचा वस्तुनिष्ठ आणि चिकित्सक अभ्यास करणे हीच या संशोधनाची मुख्य समस्या आहे.

संशोधन उद्दिष्टे

- महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) याच्या प्रगतीचा सविस्तर अभ्यास करणे.
- महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) याची प्रगती सुधारणांसाठी उपाययोजना सुचवणे.

संशोधन पद्धती

(१) संशोधनाचा प्रकार

हे संशोधन वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक स्वरूपाचे आहे. महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) याची प्रगतीची सद्यस्थिती स्पष्ट करणे, स्वयंसहायता गटांतील सदस्य संख्या, प्राप्त अनुदान आणि खर्च याचे विश्लेषण करणे हा मुख्य उद्देश आहे.

(२) अभ्यास क्षेत्र

या संशोधनासाठी महाराष्ट्र राज्य हे अभ्यास क्षेत्र म्हणून निवडले आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील जीवनोन्नती अभियान (उमेद) याच्या प्रगतीचीचा समावेश करून अभ्यास केला आहे.

(३) माहितीचे स्रोत

या संशोधनासाठी माहिती संग्रहित करण्यासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर केला आहे. ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय, धोरणे व अधिसूचना, जिल्हा सांख्यिकी अहवाल, संशोधन लेख, जर्नल्स, पुस्तके व संकेतस्थळे याचा वापर केला आहे.

(४) माहिती विश्लेषणाची पद्धत

या संशोधनासाठी सरासरी, प्रमाणित विचलन, बिन्नतेचा गुणांक, चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर, कमाल आणि किमान यांसारखी सांख्यिकीय तंत्राचा वापर केला आहे. त्याचबरोबर तक्त्याच्या सहाय्याने विश्लेषण या संशोधनामध्ये केले आहे.

(५) अभ्यासाची मर्यादा

महाराष्ट्र राज्यातील जीवनोन्नती अभियान (उमेद) याची प्रगतीचीचा अभ्यास हा महाराष्ट्र राज्यापुरता मर्यादित आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

हिती संकलन आणि विश्लेषण

तक्ता क्रमांक १ महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) याची प्रगती

(प्राप्त अनुदान आणि खर्च रु. कोटी मध्ये)

अ.क्र.	वर्ष	स्वयंसहायता गटांतील सदस्य (संख्या)	प्राप्त अनुदान	खर्च
१	२०१९	१५८०८६५	५५१.७७	४८०.३५
२	२०२०	७६६२३८	४७०.९२	३७१.८०
३	२०२१	७२४१९१	२३१.९५	२८२.४८
४	२०२२	५६१२७८	१०२०.०९	७६३.२४
५	२०२३	३२६२१२	१४७३.३८	१२९४.०८
सरासरी		**७९१७५७**	**७४९.६२**	**६३८.३९**
प्रमाणित विचलन		**४७३७५१.१३**	**४९५.४२**	**४०८.७३**
भिन्नता गुणांक		**५९.८४**	**६६.०९**	**६४.०२**
चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर		**-०.३३**	**०.२८**	**०.२८**
कमाल		**१५८०८६५**	**१४७३**	**१२९४**
किमान		**३२६२१२**	**२३२**	**२८२**

स्त्रोत : कोल्हापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल, ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन, २०१९-२०२३.

तक्ता क्रमांक १ मधील माहितीवरून महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) याच्या प्रगतीचे वर्षनिहाय (२०१९-२०२३) विश्लेषण करता महत्त्वपूर्ण निष्कर्ष दिसून येतात. २०१९ ते २०२३ या कालावधीत स्वयं-सहायता गटांतील सदस्यसंख्येत सातत्याने घट झालेली आढळते. २०१९ मध्ये सदस्यसंख्या १५,८०,८६५ इतकी असताना ती २०२३ मध्ये ३,२६,२१२ इतकी कमी झाली असून चक्रवाढ वार्षिक वाढीचा दर -०.३३ टक्के नोंदवला गेला आहे, यावरून सदस्यसंख्येतील घट स्पष्ट होते. महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) मधील स्वयं-सहायता गटांतील सदस्यसंख्येची सरासरी ७९१४५७ इतकी २०१९ ते २०२३ या वर्षांमधील आहे. महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) मधील स्वयं-सहायता गटांतील सदस्यसंख्येचा भिन्नता गुणांक ५९.८४ टक्के इतका आहे. महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) मधील स्वयं-सहायता गटांतील कमाल सदस्यसंख्या १५८०८६५ इतकी २०१९ साली होती. तर किमान सदस्यसंख्या ३२६२१२ इतकी २०२३ साली होती. यावरून असे स्पष्ट होते कि, महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) मधील स्वयं-सहायता गटांतील कमाल सदस्यसंख्या दर वर्षी घटत चालली आहे.

याउलट, प्राप्त अनुदान आणि खर्चामध्ये एकूण वाढीची प्रवृत्ती दिसून येते. विशेषतः २०२२ व २०२३ या वर्षांत अनुदानात मोठी वाढ झालेली असून २०२३ मध्ये अनुदान १४७३.३८ कोटी रुपये आणि खर्च १२९४.०८ कोटी रुपये इतका उच्चांक गाठलेला आहे. अनुदान व खर्चाचा चक्रवाढ वार्षिक वाढीचा दर प्रत्येकी ०.२८ टक्के असल्याने आर्थिक तरतुदींमध्ये वाढ झाल्याचे सूचित होते. तथापि, भिन्नता गुणांक अनुक्रमे अनुदानासाठी ६६.०९ आणि खर्चासाठी ६४.०२ इतके जास्त असल्याने या दोन्ही घटकांमध्ये वर्षानुसार मोठी अस्थिरता असल्याचे दिसून येते. एकूणच, आर्थिक संसाधनांमध्ये वाढ होत असली तरी स्वयं-सहायता गटांतील सदस्यसंख्येतील घट ही अभियानाच्या कार्यक्षमतेबाबत चिंतेची बाब ठरते आणि उमेद अभियानाच्या अंमलबजावणी, लाभार्थी टिकाव व संस्थात्मक बळकटीकरण यांचा सखोल अभ्यास करण्याची गरज अधोरेखित होते.

निष्कर्ष

- महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) याच्या प्रगतीचे वर्षनिहाय (२०१९-२०२३) विश्लेषण करता महत्त्वपूर्ण निष्कर्ष दिसून येतात. २०१९ ते २०२३ या कालावधीत स्वयं-सहायता गटांतील सदस्यसंख्येत सातत्याने घट झालेली आढळते. २०१९ मध्ये सदस्यसंख्या १५,८०,८६५ इतकी असताना ती २०२३ मध्ये ३,२६,२१२ इतकी कमी झाली असून चक्रवाढ वार्षिक वाढीचा दर -०.३३ टक्के नोंदवला गेला आहे, यावरून सदस्यसंख्येतील घट स्पष्ट होते.
- महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) मधील स्वयं-सहायता गटांतील सदस्यसंख्येची सरासरी ७९१४५७ इतकी २०१९ ते २०२३ या वर्षांमधील आहे. महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) मधील स्वयं-सहायता गटांतील सदस्यसंख्येचा भिन्नता गुणांक ५९.८४ टक्के इतका आहे.
- महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) मधील स्वयं-सहायता गटांतील कमाल सदस्यसंख्या १५८०८६५ इतकी २०१९ साली होती. तर किमान सदस्यसंख्या ३२६२१२ इतकी २०२३ साली होती.
- महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) मधील स्वयं-सहायता गटांतील कमाल सदस्यसंख्या दर वर्षी घटत चालली आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

- प्राप्त अनुदान आणि खर्चामध्ये एकूण वाढीची प्रवृत्ती दिसून येते. विशेषतः २०२२ व २०२३ या वर्षांत अनुदानात मोठी वाढ झालेली असून २०२३ मध्ये अनुदान १४७३.३८ कोटी रुपये आणि खर्च १२९४.०८ कोटी रुपये इतका उच्चांक गाठलेला आहे.
- अनुदान व खर्चाचा चक्रवाढ वार्षिक वाढीचा दर प्रत्येकी ०.२८ टक्के असल्याने आर्थिक तरतुदींमध्ये वाढ झाल्याचे सूचित होते. तथापि, भिन्नता गुणांक अनुक्रमे अनुदानासाठी ६६.०९ आणि खर्चासाठी ६४.०२ इतके जास्त असल्याने या दोन्ही घटकांमध्ये वर्षानुसार मोठी अस्थिरता असल्याचे दिसून येते.
- एकूणच, आर्थिक संसाधनांमध्ये वाढ होत असली तरी स्वयं-सहायता गटांतील सदस्यसंख्येतील घट ही अभियानाच्या कार्यक्षमतेबाबत चिंतेची बाब ठरते आणि उमेद अभियानाच्या अंमलबजावणी, लाभार्थी टिकाव व संस्थात्मक बळकटीकरण यांचा सखोल अभ्यास करण्याची गरज अधोरेखित होते.

उपाययोजना

महाराष्ट्रात ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी, स्वयं-सहायता गटांची संस्थात्मक क्षमता मजबूत करणे, सदस्यांची लवचिकता वाढवणे आणि उपजीविका उपक्रमांची शाश्वतता सुनिश्चित करणे आवश्यक आहे. यासाठी नियमित प्रशिक्षण, कौशल्य विकास कार्यक्रम, आर्थिक साक्षरता आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. तसेच, बाजारपेठेशी थेट संबंध, मूल्य साखळी विकास आणि स्थानिक संसाधनावर आधारित उद्योगांना प्रोत्साहन देणे महत्त्वाचे ठरेल. जिल्हा आणि तालुका पातळीवर प्रभावी समन्वय यंत्रणा, निधीचे वेळेवर वितरण, पारदर्शक खर्च नियंत्रण आणि सातत्यपूर्ण मूल्यांकन प्रणाली अंमलात आणल्याने अभियानाच्या उद्दिष्टांची पूर्तता सुधारेल आणि ग्रामीण महिलांचे आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरण आणखी मजबूत होईल.

संदर्भग्रंथ

1. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग – ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) मार्गदर्शक तत्त्वे.
2. महाराष्ट्र शासन – आर्थिक सर्वेक्षण, २०१९-२०२३.
3. कोल्हापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल, २०१९-२०२३.
4. भारत सरकार – राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान (NRLM) कार्यपद्धती अहवाल.
5. Desai, V. (2012), Rural Development in India, Himalaya Publishing House, Pune.
6. Todaro, M. P. & Smith, S. C. (2015), Economic Development, Pearson Education, England.
7. Chambers, R. (2006), Rural Development: Putting the Last First, Longman.
8. NABARD – Self Help Group–Bank Linkage Programme Reports.
9. Kabeer, N. (2010), Women's Economic Empowerment and Inclusive Growth, World Bank Publications, Washington, D.C., USA.
10. कोल्हापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल, ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन, २०१९-२०२३.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

सामाजिक स्तरीकरणात जात आणि वर्गाची भूमिका: एक समाजशास्त्रीय अध्ययन

ए. आर. शेळके

सहाय्यक प्राध्यापक समाजशास्त्र विभाग, शा. घो. कला, विज्ञान व गो. प. वाणिज्य महाविद्यालय,
शिवळे, तालुका- मुरबाड, जिल्हा – ठाणे
Email: shelkeashok321@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180250
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 244-249
February- 2026
Submitted: 10 Jan. 2026
Revised: 20 Jan. 2026
Accepted: 08 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

भारतीय समाजातील सामाजिक स्तरीकरण ही एक गुंतागुंतीची आणि बहुआयामी प्रक्रिया असून तिची रचना प्रामुख्याने जात आणि वर्ग या दोन प्रमुख सामाजिक घटकांवर आधारित आहे. जात ही जन्माधारित, तुलनेने स्थिर आणि सांस्कृतिकदृष्ट्या दृढ अशी सामाजिक संस्था आहे, तर वर्ग हा आर्थिक स्थिती, उत्पन्न, व्यवसाय आणि शिक्षणावर आधारित गतिशील घटक आहे. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये सामाजिक स्तरीकरणाच्या चौकटीत जात आणि वर्ग यांची भूमिका, त्यांच्यातील परस्परसंबंध आणि त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक असमानतेचे स्वरूप विश्लेषित करण्यात आले आहे.

या अभ्यासात समाजशास्त्रीय सैद्धांतिक दृष्टिकोनांचा आधार घेऊन जात-वर्गीय संरचनेमुळे सामाजिक संधींच्या असमान वाटणीवर, सत्तासंबंधांवर आणि सामाजिक गतिशीलतेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच आधुनिकीकरण, शहरीकरण आणि आर्थिक परिवर्तनांच्या पार्श्वभूमीवर जात आणि वर्ग यांच्या भूमिकेत झालेल्या बदलांचाही आढावा घेण्यात आला आहे. अभ्यासातून असे स्पष्ट होते की, जरी वर्गीय घटकांचे महत्त्व वाढत असले तरी भारतीय समाजातील सामाजिक स्तरीकरणाच्या प्रक्रियेत जात अजूनही प्रभावी आणि निर्णायक भूमिका बजावत आहे. त्यामुळे सामाजिक समता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी जात आणि वर्ग या दोन्ही घटकांचा समन्वित अभ्यास व धोरणात्मक हस्तक्षेप आवश्यक असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे.

मुख्यशब्द: *सामाजिक स्तरीकरण, जात व्यवस्था, वर्ग व्यवस्था, सामाजिक असमानता, सामाजिक गतिशीलता, आर्थिक विषमता*

प्रस्तावना

सामाजिक स्तरीकरण ही एक महत्त्वाची समाजशास्त्रीय संकल्पना आहे जी समाजातील विविध समूहांमधील असमानता आणि पदानुक्रम दर्शवते. भारतासारख्या देशात, जात आणि वर्ग या दोन प्रमुख कारकांनी सामाजिक स्तरीकरणाला आकार दिला आहे. जात आणि वर्ग यांच्यातील जटिल संबंध आणि त्यांचे सामाजिक स्तरीकरणावर असलेले परिणाम समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सामाजिक स्तरीकरण ही प्रत्येक समाजात आढळणारी एक मूलभूत सामाजिक प्रक्रिया असून त्याद्वारे समाजातील व्यक्ती व गटांना विविध स्तरांमध्ये विभागले जाते. या प्रक्रियेमुळे समाजातील सत्ता, संसाधने, प्रतिष्ठा आणि संधी यांचे असमान वितरण घडून येते. भारतीय समाजाची सामाजिक रचना विशेषतः जात आणि वर्ग या दोन प्रमुख घटकांवर आधारित असून, त्यांनी ऐतिहासिकदृष्ट्या आणि समकालीन काळात सामाजिक स्तरीकरणाच्या स्वरूपाला आकार दिला आहे.

जात व्यवस्था ही जन्माधारित, तुलनेने स्थिर आणि धार्मिक-सांस्कृतिक मूल्यांशी निगडित अशी सामाजिक संस्था आहे. व्यक्तीचे सामाजिक स्थान, व्यवसाय, सामाजिक संबंध आणि जीवनातील संधी मोठ्या प्रमाणावर जातीनुसार ठरवल्या जातात. दुसरीकडे, वर्ग व्यवस्था ही आर्थिक स्थिती, उत्पन्न, व्यवसाय, शिक्षण आणि भांडवलावर आधारित असून ती गतिशील स्वरूपाची आहे. वर्गीय संरचना सामाजिक गतिशीलतेस काही प्रमाणात संधी उपलब्ध करून देते; तथापि भारतीय समाजात जात आणि वर्ग हे परस्परांपासून स्वतंत्र न राहता एकमेकांशी घट्टपणे जोडलेले आहेत.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
ए. आर. शेळके, सहाय्यक प्राध्यापक समाजशास्त्र विभाग, शा. घो. कला, विज्ञान व गो. प. वाणिज्य महाविद्यालय, शिवळे. तालुका- मुरबाड, जिल्हा – ठाणे

How to cite this article:
शेळके,. ए. आर. (2026). सामाजिक स्तरीकरणात जात आणि वर्गाची भूमिका: एक समाजशास्त्रीय अध्ययन. Journal of Research and Development, 18(2(XXI)), 244–249. https://doi.org/10.5281/zenodo.19549149

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19549149
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

सामाजिक स्तरीकरणाच्या प्रक्रियेत जात आणि वर्ग यांच्या परस्परसंबंधामुळे सामाजिक असमानतेचे विविध रूप प्रकट होते. उच्च जातीय गटांना पारंपरिकरित्या अधिक सामाजिक प्रतिष्ठा व सत्ता लाभलेली दिसते, तर निम्न जातीय व आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गांना सामाजिक व आर्थिक वंचना सहन करावी लागते. आधुनिकतेच्या, औद्योगिकीकरणाच्या, शहरीकरणाच्या आणि शिक्षणाच्या प्रसारामुळे वर्गीय घटकांचे महत्त्व वाढले असले तरी जात अजूनही सामाजिक संबंध, विवाह, राजकारण आणि संसाधनांच्या वितरणात निर्णायक भूमिका बजावत आहे.

या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधन पेपरचा उद्देश सामाजिक स्तरीकरणाच्या चौकटीत जात आणि वर्ग यांची भूमिका समजून घेणे, त्यांच्या परस्परसंबंधांचे विश्लेषण करणे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक असमानतेच्या प्रक्रियांचा अभ्यास करणे हा आहे. तसेच सामाजिक न्याय, समता आणि समावेशक विकासाच्या दृष्टीने जात-वर्गीय स्तरीकरणाच्या समस्यांचा अभ्यास करणे हे या संशोधनाचे महत्त्वपूर्ण उद्दिष्ट आहे.

सामाजिक स्तरीकरणात जात आणि वर्गाची संकल्पना

सामाजिक स्तरीकरण म्हणजे समाजातील व्यक्ती व समूहांना त्यांच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक स्थानानुसार थरांमध्ये विभागले जाणे. या प्रक्रियेत जात आणि वर्ग या दोन संकल्पना अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात.

१) जात

जात ही एक सामाजिक संकल्पना आहे जी भारतात प्राचीन कालापासून अस्तित्वात आहे. जात ही एक जन्मजात समूह आहे ज्यामध्ये व्यक्तींचे जन्म, विवाह, आणि मृत्यू यांसारख्या महत्त्वाच्या जीवनातील घटनांमध्ये विशिष्ट नियम आणि रिती असतात. जात ही एक पदानुक्रमित प्रणाली आहे ज्यामध्ये उच्च आणि निम्न जात असतात.

जात ही जन्माधारित, बंद सामाजिक व्यवस्था आहे. व्यक्तीचा व्यवसाय, सामाजिक दर्जा, विवाहसंबंध आणि सामाजिक संपर्क यांवर जातिचा प्रभाव पडतो.जातीत सामाजिक हालचाल मर्यादित असते.पारंपरिकपणे शुद्ध–अशुद्ध, उच्च–नीच अशी श्रेणी दिसते.भारतात जातिव्यवस्थेमुळे सामाजिक विषमता आणि भेदभाव दीर्घकाळ टिकून राहिला.

२) वर्ग

वर्ग ही एक आर्थिक संकल्पना आहे जी व्यक्तींच्या आर्थिक स्थिती आणि उत्पादनाच्या साधनांशी संबंधित आहे. वर्ग ही एक सामाजिक समूह आहे ज्यामध्ये व्यक्तींचे आर्थिक हितसंबंध आणि जीवनशैली समान असते. वर्ग ही एक पदानुक्रमित प्रणाली आहे ज्यामध्ये उच्च, मध्यम, आणि निम्न वर्ग असतात. वर्ग ही आर्थिक व सामाजिक स्थितीवर आधारित, उघडी व्यवस्था आहे.उत्पन्न, शिक्षण, व्यवसाय, संपत्ती यांवर वर्ग ठरतो.वर्गव्यवस्थेत उर्ध्व व अधो सामाजिक हालचाल शक्य असते.औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि शिक्षणामुळे वर्गाची भूमिका वाढली आहे.

३) जात आणि वर्ग यांचा परस्परसंबंध

भारतात अनेक वेळा जात आणि वर्ग एकमेकांशी गुंतलेले आढळतात. उच्च जातीत आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि नीच जातीत आर्थिकदृष्ट्या सक्षम व्यक्तीही आढळतात. आधुनिक समाजात वर्गाचा प्रभाव वाढत असला, तरी जात अजूनही सामाजिक संधींवर परिणाम करते. वर्ग आणि जात यांचा परस्पर संबंध मार्क्स, वेबर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या आधारे भारतीय समाजरचनेत सामाजिक स्तरीकरणाचे दोन महत्त्वाचे घटक म्हणजे वर्ग आणि जात. हे दोन्ही घटक समाजातील सत्ता, संसाधनांचे वितरण आणि सामाजिक असमानता समजून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. जरी वर्ग ही संकल्पना मुख्यतः आर्थिक घटकांवर आधारित असली, आणि जात ही जन्माधारित सामाजिक व्यवस्था असली, तरी भारतीय समाजात या दोन्हींचा परस्पर संबंध ऐतिहासिक व संरचनात्मक स्वरूपाचा आहे. या संबंधाचे विश्लेषण मार्क्स, वेबर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या आधारे अधिक स्पष्टपणे करता येते.

१) कार्ल मार्क्स यांचे जात व वर्ग विषयक दृष्टीकोन

कार्ल मार्क्स यांच्या मते समाजाची रचना ही उत्पादनाच्या साधनांवरील मालकी आणि उत्पादन संबंधांवर आधारित असते. भांडवलशाही समाजात वर्गसंघर्ष हा समाजपरिवर्तनाचा मुख्य घटक मानला जातो. मार्क्स यांनी जात व्यवस्थेचा थेट सैद्धांतिक अभ्यास केला नसला, तरी भारतीय समाजाच्या संदर्भात जात ही आर्थिक शोषणाचे एक ऐतिहासिक रूप म्हणून पाहता येते.

भारतीय समाजात उच्च जातींनी जमीन, साधने आणि सत्तेवर दीर्घकाळ नियंत्रण ठेवले, तर निम्न जातींना श्रमप्रधान व कमी मोबदल्याच्या व्यवसायांपुरते मर्यादित ठेवण्यात आले. त्यामुळे जात व्यवस्था ही वर्गीय शोषणाला वैधता देणारी सामाजिक रचना ठरली. मार्क्सवादी दृष्टिकोनातून पाहता, भारतातील जातीय असमानता ही वर्गीय शोषणाशी निगडित असून जात ही वर्गसंघर्षाला झाकणारी एक वैचारिक रचना म्हणून कार्य करते.

२) मॅक्स वेबर यांचा बहुआयामी स्तरीकरण सिद्धांत

मॅक्स वेबर यांनी सामाजिक स्तरीकरणाचे विश्लेषण करताना वर्ग, प्रतिष्ठा आणि सत्ता या तीन परिमाणांवर भर दिला. वेबर यांच्या मते वर्ग ही केवळ आर्थिक संकल्पना नसून बाजारातील संधींशी संबंधित आहे, तर प्रतिष्ठा ही सामाजिक सन्मानाशी जोडलेली असते.

भारतीय जात व्यवस्था ही वेबर यांच्या संकल्पनेशी जवळून संबंधित आहे. जात ही केवळ आर्थिक स्थान ठरवत नाही, तर सामाजिक सन्मान, शुद्धता-अशुद्धतेच्या कल्पना आणि सामाजिक संबंधांवरही प्रभाव टाकते. त्यामुळे भारतात असे अनेक प्रसंग आढळतात की आर्थिकदृष्ट्या उच्च वर्गात पोहोचलेली व्यक्तीही जातीय कारणांमुळे सामाजिक प्रतिष्ठेपासून वंचित राहते. वेबर यांच्या दृष्टिकोनातून पाहता, भारतीय समाजात वर्गीय उन्नती असूनही जातीय अडथळे टिकून राहण्याचे कारण म्हणजे जात ही एक स्वतंत्र आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जात-वर्ग विश्लेषण

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजातील जात व्यवस्थेचे अत्यंत सखोल व टीकात्मक विश्लेषण केले आहे. त्यांच्या मते जात ही केवळ श्रमविभागणी नसून श्रमिकांची विभागणी आहे. जात व्यवस्थेमुळे सामाजिक गतिशीलता रोखली जाते आणि असमानता जन्मापासूनच निश्चित केली जाते.

आंबेडकरांच्या मते, भारतातील वर्गसंघर्ष हा जातीय चौकटीत अडकलेला आहे. त्यामुळे येथे मार्क्सप्रमाणे स्वच्छ वर्गसंघर्ष विकसित होत नाही. जात व्यवस्था कामगार वर्गाला एकसंध होऊ देत नाही आणि त्यामुळे सामाजिक क्रांतीचा मार्ग अडतो. म्हणूनच आंबेडकरांनी आर्थिक परिवर्तनाबरोबरच जातिनिर्मूलन आवश्यक असल्यावर भर दिला.

४) समन्वयात्मक विश्लेषण

मार्क्स, वेबर आणि आंबेडकर यांच्या 'विचारांचा तुलनात्मक अभ्यास केल्यास असे दिसते की मार्क्स वर्गीय शोषणावर भर देतात, वेबर सामाजिक प्रतिष्ठा व सत्तेच्या बहुआयामी स्वरूपाकडे लक्ष वेधतात, तर आंबेडकर भारतीय समाजातील जात व्यवस्थेची मूलगामी समस्या अधोरेखित करतात.

भारतीय समाजात वर्गीय विषमता ही अनेकदा जातीय चौकटीतूनच प्रकट होते. आर्थिक परिवर्तन झाले तरी सामाजिक प्रतिष्ठा आणि सत्तेच्या क्षेत्रात जात महत्त्वाची भूमिका बजावत राहते.

गृहीतकृत्ये

१. भारतीय समाजातील सामाजिक स्तरीकरणावर जात आणि वर्ग या दोन्ही घटकांचा परस्परावलंबी प्रभाव आढळतो.
२. जात व्यवस्था ही सामाजिक स्तरीकरणाचा पारंपरिक आधार असून ती आर्थिक व सामाजिक असमानता निर्माण व टिकवून ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.
३. वर्गीय स्थान (उत्पन्न, शिक्षण, व्यवसाय) हे जातीय दर्जावर प्रभाव टाकते; तथापि आर्थिक उन्नती असूनही जातीय भेदभाव पूर्णतः नष्ट होत नाही.
४. भारतीय समाजात वर्गीय विषमता ही अनेकदा जातीय विषमतेच्या चौकटीतूनच प्रकट होते.
५. उच्च जातींना ऐतिहासिकदृष्ट्या अधिक आर्थिक, शैक्षणिक व राजकीय संधी उपलब्ध झाल्यामुळे त्यांचे सामाजिक स्तरीकरणात वर्चस्व टिकून आहे.
६. शिक्षण, शहरीकरण व औद्योगिकीकरणामुळे वर्गीय हालचाल शक्य झाली असली तरी जात व्यवस्था सामाजिक गतिशीलतेवर मर्यादा घालते.
७. जात व्यवस्था ही कामगार वर्गामध्ये एकात्मता निर्माण होण्यास अडथळा ठरते आणि त्यामुळे वर्गसंघर्षाची प्रक्रिया दुर्बल राहते.
८. समकालीन भारतीय समाजात सामाजिक प्रतिष्ठा, सत्ता व संसाधनांच्या वितरणात जात आणि वर्ग यांची संयुक्त भूमिका दिसून येते.

अध्यापनात वापरलेल्या पद्धती

या अध्ययनात व्याख्यान पद्धत, चर्चा पद्धत, प्रश्नोत्तर पद्धत ,प्रकरण अभ्यास पद्धत ,प्रकल्प पद्धत,संदर्भ वाचन पद्धत , अनुभवाधारित अध्यापन पद्धत,वर्णनात्मक पद्धत, विश्लेषणात्मक पद्धत,गुणात्मक पद्धत,सैदांतिक दृष्टिकोन, दृक्-श्राव्य साधनांचा वापर,वादविवाद पद्धत ,समन्वित अध्यापन पद्धत विविध पुस्तके, नियतकालिके, जनगणना आव्हान इत्यादी पद्धतीचा वापर करण्यात आला.

जात आणि वर्गाचे स्वरूप

१) जातीचे स्वरूप

जात ही भारतीय समाजातील सामाजिक स्तरीकरणाची एक प्राचीन व स्थिर व्यवस्था आहे. ती जन्मावर आधारित असून व्यक्तीच्या सामाजिक स्थान, व्यवसाय, सामाजिक प्रतिष्ठा आणि आचारवर्तनावर प्रभाव टाकते. जात व्यवस्थेचे स्वरूप पुढील वैशिष्ट्यांवर आधारित आहे :

२) जन्माधारित व्यवस्था

जात ही जन्माने प्राप्त होते व व्यक्तीला आयुष्यभर तिच्यातून बाहेर पडणे कठीण असते.

३) सामाजिक बंदिस्तता

विवाह, भोजन, सामाजिक संपर्क यांवर निर्बंध घालून जात व्यवस्था सामाजिक अंतर कायम ठेवते.

४) व्यवसायाशी निगडित स्वरूप

परंपरेने प्रत्येक जात विशिष्ट व्यवसायाशी जोडलेली असून त्यामुळे श्रमविभागणी निर्माण झाली आहे.

५) उच्च-नीच श्रेणीकरण

जात व्यवस्थेत शुद्ध-अशुद्धतेच्या संकल्पनेवर आधारित स्तरक्रम आढळतो.
सांस्कृतिक व धार्मिक अधिष्ठान जात व्यवस्थेला धार्मिक परंपरा व सामाजिक रूढींचा आधार लाभलेला आहे.

६) सामाजिक नियंत्रणाचे साधन

जात ही समाजातील वर्तननियम ठरवणारी प्रभावी संस्था म्हणून कार्य करते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

२) वर्गाचे स्वरूप

वर्ग ही सामाजिक स्तरीकरणाची तुलनेने आधुनिक, गतिशील व आर्थिक आधारावर उभी असलेली संकल्पना आहे. ती व्यक्तीच्या उत्पन्न, व्यवसाय, शिक्षण व जीवनशैलीवर आधारित असते. वर्गाचे स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते :

१) आर्थिक आधारावर आधारित व्यवस्था

उत्पादन साधनांवरील नियंत्रण, उत्पन्न व संपत्ती यांच्या आधारे वर्गनिर्मिती होते.

२) गतिशीलता

व्यक्ती शिक्षण, व्यवसाय किंवा आर्थिक स्थिती बदलून एका वर्गातून दुसऱ्या वर्गात जाऊ शकते.

३) सामाजिक उघडपणा

वर्ग व्यवस्थेत सामाजिक संपर्क, विवाह व व्यवहार तुलनेने खुले असतात.

४) वर्ग जाणीव व संघटन

समान आर्थिक हितसंबंधांमुळे वर्गजाणीव निर्माण होऊन संघटित संघर्ष संभवतो.

५) शहरीकरण व औद्योगिकीकरणाशी निगडित

वर्ग व्यवस्था आधुनिक औद्योगिक व भांडवली समाजव्यवस्थेची देणगी आहे.

६) सत्तासंबंधांशी जोडलेले स्वरूप

आर्थिक सामर्थ्यामुळे वर्ग समाजातील राजकीय व प्रशासकीय सत्तेवर प्रभाव टाकतो.

संशोधनाची उद्दिष्टे

१) भारतीय समाजातील सामाजिक स्तरीकरणाची संकल्पना स्पष्ट करणे.
२) जात आणि वर्ग या सामाजिक स्तरीकरणाच्या प्रमुख घटकांचे सैद्धांतिक विश्लेषण करणे.
३) भारतीय समाजात जात आणि वर्ग यांच्यातील परस्पर संबंधाचा अभ्यास करणे.
४) जात व्यवस्था सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक असमानता निर्माण करण्यात कशी भूमिका बजावते याचे विश्लेषण करणे.
५) वर्गीय स्थान (उत्पन्न, शिक्षण, व्यवसाय) सामाजिक स्तरीकरणावर कसा प्रभाव टाकतो हे तपासणे.
६) आधुनिक काळात शिक्षण, शहरीकरण व औद्योगिकीकरणामुळे जात व वर्ग यांच्यात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.
७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कार्ल मार्क्स व मॅक्स वेबर यांच्या विचारांच्या आधारे जात-वर्ग संबंधाचे तुलनात्मक विश्लेषण करणे.
८) भारतीय समाजातील सामाजिक न्याय, समता व संधींच्या वितरणात जात व वर्ग यांची भूमिका स्पष्ट करणे.
९) सामाजिक स्तरीकरण कमी करण्यासाठी आवश्यक धोरणात्मक व सामाजिक उपाययोजनांवर प्रकाश टाकणे.

अध्ययनाचे महत्त्व

सामाजिक स्तरीकरण ही समाजरचनेची एक मूलभूत प्रक्रिया असून तिच्याद्वारे समाजातील व्यक्ती व गटांमध्ये सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक असमानता निर्माण होते. भारतीय समाजाच्या संदर्भात जात आणि वर्ग हे सामाजिक स्तरीकरणाचे दोन प्रमुख आधारस्तंभ असून त्यांनी समाजातील सत्ता, प्रतिष्ठा, संसाधनांचे वितरण आणि सामाजिक संधींची दिशा ठरवली आहे. प्रस्तुत अध्ययन या दोन्ही घटकांचा सखोल व चिकित्सक अभ्यास करून सामाजिक वास्तव समजून घेण्यास महत्त्वाची भूमिका बजावते.

या अध्ययनाचे महत्त्व पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते :

१) सैद्धांतिक महत्त्व

हे अध्ययन सामाजिक स्तरीकरणाच्या संकल्पनेला अधिक व्यापक स्वरूप देत कार्ल मार्क्स, मॅक्स वेबर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजशास्त्रीय विचारांच्या आधारे जात आणि वर्ग यांचे विश्लेषण करते. त्यामुळे सामाजिक असमानतेचे बहुआयामी स्वरूप स्पष्ट होते.

२) भारतीय समाजाचे वास्तव उलगडणारे अध्ययन

भारतीय समाजात जात ही जन्माधारित आणि तुलनेने स्थिर व्यवस्था असून वर्ग ही आर्थिक व सामाजिक गतिशीलतेवर आधारित आहे. या दोन्हींच्या परस्परसंबंधामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक स्तरांची रचना समजून घेण्यास हे अध्ययन उपयुक्त ठरते.

३) सामाजिक असमानता व भेदभाव समजून घेण्यास उपयुक्त

या शोधनिबंधात बाबुराव गायकवाड यांच्या 'झळ' आणि 'आग' या कादंबऱ्यांतील स्त्री व्यक्तिरेखांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या दोन्ही कादंबऱ्यांमधून दलित समाजाचे वास्तव, त्यातील संघर्ष, दारिद्र्य, सामाजिक विषमता आणि मानसिकता यांचे प्रभावी चित्रण दिसून येते.'झळ' कादंबरीत शेशू व रूना यांच्या माध्यमातून दलित जीवनातील दुःख, अंधश्रद्धा, अन्याय आणि परिवर्तनाची धडपड दर्शवली आहे. रूना ही शिक्षणप्रिय, धाडसी व संघर्षशील स्त्री म्हणून उभी राहते. रंभा, जमुना, बेला इत्यादी स्त्रिया विविध परिस्थितींमध्ये जगण्यासाठी झगडताना दिसतात. काही स्त्रिया परिस्थितीमुळे शोषणाला बळी पडतात, तर काही संकटांना धैर्याने सामोरे जातात.'आग' कादंबरीत मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीच्या पार्श्वभूमीवर दलित आणि सवर्ण समाजातील संघर्ष, सामाजिक बदलाची गरज आणि जागृती दाखवली आहे. सरू, चंदूची आई, सरूची आई यांसारख्या स्त्री व्यक्तिरेखा समाजातील अन्याय, फसवणूक, तसेच मातृत्व, माया आणि सहनशीलता यांचे दर्शन घडवतात.एकूणच, दोन्ही कादंबऱ्यांतील स्त्रिया कष्टाळू, संघर्षशील, कुटुंबनिष्ठ आणि परिस्थितीशी लढणाऱ्या आहेत. त्या सामाजिक अन्याय सहन करत असल्या तरी जीवन पुढे नेण्याची त्यांची जिद्द आणि धैर्य ठळकपणे दिसते.

कीवर्ड्स: *बाबुराव गायकवाड, झळ कादंबरी, आग कादंबरी, स्त्री व्यक्तिरेखा, दलित साहित्य, सामाजिक विषमता, स्त्री संघर्ष, गरिबी आणि शोषण, शिक्षणाची जाणीव, अंधश्रद्धा, सामाजिक परिवर्तन, मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळ, मातृत्व व कुटुंबनिष्ठा, स्त्री सक्षमीकरण, ग्रामीण जीवन*

प्रास्ताविक

बाबुराव गायकवाड यांचा जन्म महाराष्ट्रातील बीड जिल्ह्याच्या परळी तालुक्यातील लाडझरी या गावी झाला. मराठी साहित्यातले मातंग समाजाच्या व्यथा, वेदना मांडणारे महत्त्वाचे लेखक म्हणून नावारूपाला आलेले आहेत. बाबुराव गायकवाड हे विविध वाङ्मयप्रकारामध्ये लेखन करणारे साहित्य विश्वातील एक महत्त्वाचे लेखक म्हणून सर्वांना ज्ञात आहेत. त्यांनी आपल्या साहित्यातून चोखंदळ रसिक, संशोधक सर्वांगीण अभ्यास, परिवर्तनवादी जाणीव याचा सखोल चिंतन व आपल्या वैचारिकतेतून सामाजिक प्रदूषण नाहीसे करू पाहणारा एक विचारवंत ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्ये त्यांच्या लेखनात आपणास दिसून येतात. बाबुराव गायकवाड यांनी 'झळ' 1980, 'आग' 1996 या कादंबऱ्या लिहून दलित कादंबरी विश्वामध्ये मोलाची भर घातली आहे. 'झळ' या कादंबरीतील बोलकी हृदयस्पर्शी अशी कथा आहे. गरीब परिस्थिती असल्याने एक एक दिवस उपाशी राहून कॉलेज शिक्षण घेणाऱ्या एका तरुणाची कथा या कादंबरीमध्ये आली आहे. त्यांचा बाज हा 1984 साली कथासंग्रह प्रसिद्ध झाला आहे. 'हुंदका' 1988 'सारे काही' 1994, 'स्पंदन' 1998 हे काव्यसंग्रह लिहून काव्याच्या प्रांतात आपले स्थान निर्माण केले आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
वनिता बापू शिंदे, यशवंतराव चव्हाण (के. एम. सी.) कॉलेज, कोल्हापूर

How to cite this article:
शिंदे, . वनिता . बापू . (2026). बाबुराव गायकवाड यांच्या 'झळ' आणि 'आग' कादंबऱ्यातील स्त्री व्यक्तिरेखा. Journal of Research and Development, 18(2(XXI)), 261–269. https://doi.org/10.5281/zenodo.19550055

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19550055
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

'दृष्टिक्षेप' 1986, 'आकलन' 1992, 'साहित्यवेध' 2000 हे समीक्षा ग्रंथ लिहिले आहे. तर 'अंबुज' हे आत्मकथन लिहून दलित साहित्यात भर घातली आहे. 'झळ' ही कादंबरी एका मातंग कुटुंबाची हृदयस्पर्शी कहाणी आहे. तर 'आग' ही कादंबरी दलितांच्या अस्मितेचा एकूण असलेल्या मराठवाडा विद्यापीठ नामांतर प्रश्न कवेत घेऊन त्यातून दलितांच्या जीवन चित्रणाचे तसेच त्यातील ताणतणाव, दलितांची मानसिकता व चिंतनशीलता यांचा वेध घेणारी आहे.

'झळ' कादंबरीचा आशय

'झळ' या कादंबरीचा नायक केंद्रीयभूत पात्र होय. पात्र परिस्थिती व सभोवतालची विषमव्यवस्था व समाजात पैसा, वशिला, सगे -सोयरे यांचे जवळचे असणारे हित संबंधांने अस्वस्थ झालेला शेशू या तरुणाच्या हताश झालेल्या अवस्थेचे चित्रण आले आहे. या कादंबरीला प्रारंभ झालेला आहे तो, सामाजिक, आर्थिक विषमतेचा परिपाक म्हणून दलितांच्या वाट्याला आलेले दारिद्र्य, समाज जीवनात पैसा, वशिला सग्या , सोयऱ्यांचे हितसंबंध इत्यादीमुळे दलित जीवनाला अनेक व्यथा, वेदनांची झळ पोहोचलेली असते. त्यामुळे सुशिक्षित दलित तरुण उदरनिर्वाहाचे साधन म्हणून नोकरी शोधतात. पदरात पडणारे अपयश इत्यादी बाबींमुळे त्यांच्या वाट्याला येणाऱ्या या अस्वस्थतेवर मात करू पाहणारा समाज येथील तरुण शेशू आणि त्याच्या कुटुंबाच्या दुःखद जीवनाची कहाणी या कादंबरीत बाबुराव गायकवाड यांनी चित्रित केली आहे. ही कहाणी केवळ शेशूच्या कुटुंबापुरती मर्यादित नाही तर ही संपूर्ण दलित जीवनाची व्यथा आहे.

शेशु ही या कादंबरीतील केंद्रीय भूत व्यक्तिरेखा आहे. त्याच्या अस्वस्थतेच्या काळात मात्र त्यांच्या कुटुंबाच्या ढासळत्या अवस्थेत प्रेमाच्या अनुषंगाने का असेना पण जगण्याचा व परिवर्तनाचा आधार देणारी रुणा ही तरुणी शेशूची दलित जीवन बदलण्याची, त्याच्यामध्ये परिवर्तन घडवून आणण्याची तिची तळमळ असते. शेशूच्या वडीलाचा तुरुंगवास, त्याचे मृत्यूपर्यंत कष्ट करून जगणे, भुकेचा प्रश्न सोडवण्यासाठी घातलेल्या दरोड्यात बंदुकीची गोळी चुकून रूणाच्या वडिलांना लागते. शेशूच्या वडिलांना कैदेतून सोडवून आणण्यासाठी प्रयत्न करतात. दिमाखे या व्यक्तिने शेशूच्या आईवर अन्याय, अत्याचार करणे, शेशूची आई रंभा व ऋणाची आई जमुना या दोन्ही स्त्रिया संसाराला सारख्याच आहेत. परंतु दलित जातीमुळे व अनामिक संकटामुळे त्या दोघी परपुरुषाच्या वासनेची शिकार बनतात. त्यामुळे शेशुचे वडील रुणाला खालच्या जातीची म्हणून समजतात. शेशूचा मोठा भाऊ बदफैली आईवर गोळी झाडतो. अंधश्रद्धेच्या आहारी गेलेली शेशूची आजी इत्यादी दोन मातंग कुटुंबातील माणसाच्या जीवनात येणारे निकडीचे प्रसंग या घटना प्रसंगात त्यांचा बळी जाणे, शेशू आणि रूना यांच्या कुटुंबाची होणारी वाताहात पण याची जीवनाला झळ न पोचू देता दोघेही बाकी सर्व गोष्टींचा त्याग करून दलित जीवनातील अंधश्रद्धा, परंपरा संपवून नव्या रूपाने परिवर्तन जीवन जगण्यासाठी शेशु आणि रूना दोघे विवाहबद्ध होतात. हा कादंबरीचा थोडक्यात आशय आहे.

. 'झळ' या कादंबरीमध्ये मातंग समाजातील कुटुंबाच्या वाताहतीची कहाणी आहे. परंतु दलित जीवनातील ताणतणाव, दलितांची मानसिकता याचा वेध कादंबरीच्या आशय विशेषामध्ये चित्रण करता आले नाही. या कादंबरीत शोषितांच्या आधारही जीवनाचा उच्चभ्रू लोकांनी फायदा घेतलेला दिसतो. शेशूसारखा गरीब मुलगा परिस्थितीवर मात करून उच्च शिक्षण घेऊ शकतो हे लेखकाने दाखवण्याचा यशस्वीपणे प्रयत्न केलेला आहे. शेशु व रुणाच्या माध्यमातून लेखकांनी जाती धर्माच्या पलीकडे जाऊन विवाहबद्ध झालेले दाखवून मानवतेचा एक महत्त्वपूर्ण दृष्टिकोन वाचकांच्या समोर ठेवलेला आहे.

आग कादंबरीचा आशय

'आग' ही बाबुराव गायकवाड यांची मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीवर आधारित कादंबरी आहे. 'झळ' या कादंबरी नंतर जवळजवळ 15 वर्षांनी 'आग' ही कादंबरी प्रसिद्ध झाली आहे. या कादंबरीत नामांतर चळवळीच्या पार्श्वभूमीवर दलित व दलितेत्तरामध्ये निर्माण झालेल्या ताणतणावाचे व परस्पर संबंधाचे चित्रण लेखकाने डोळसपणाने व संवेदनशील प्रवृत्तीने केलेले आहे.

मधु या कादंबरीचा नायक शिक्षणासाठी शहरात जातो. तेथे तो नवीन विचाराने भारावून जाऊन धावडीला येतो. त्यावेळी त्याला अनेक प्रश्न पडतात. आपला समाज दरिद्री कसा राहिला? मराठवाडा, मांगवाडा व चांभारवाडा या तिन्ही वाड्यात स्वतःच्या मालकीची शेती कशी नाही? दुसऱ्या समाजातील माणसाने हातपाय न हलवता पिढ्यानपिढ्या जगण्याची सोय कशी करून ठेवली आहे? असे अनेक प्रश्न मधूला भेडसावत असतात. गाव सुधारण्यासाठी सामाजिक परिवर्तनाची जाण ठेवून आपल्या समाजातील विचार बदलण्याचा तो प्रयत्न सतत करीत असतो. चावडीमध्ये डॉ. बाबासाहेबांची जयंती साजरी करण्यासाठी व सरुवर झालेल्या अन्यायाचा बदला घेण्यासाठी आलेला मधु कृत्य न करता तसाच निघून जातो याचे वर्णन या कादंबरीत आले आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

'आग' ही बाबुराव गायकवाड यांची दुसरी एक महत्त्वाची कादंबरी म्हणून नावारूपाला आली आहे. मधु हा उमापूरला शिक्षणासाठी गेला असता तेथील कॉलेजमध्ये मिळालेल्या विचारधारेमुळे त्याला आपल्या गावाविषयी अनेक प्रश्न सतावतात. आपला समाज सगळीकडून कसा दरिद्री राहिला, जमिनीविषयी असे अनेक प्रश्न पडतात. पोथी- पुराण- पंचांग सांगणं या प्रकारे बारा महिने पूजा पाठ करून दक्षिणा उखळणारा ब्राह्मण म्हणजे खंडणी वसूल करणारा जुलूम बादशहा. मधू कॉलेजमध्ये गेल्यापासून गरीब- श्रीमंत , धर्म- अधर्म, भारतीय समाजातील विषमता इत्यादी विषयावरील व्याख्याने ऐकून त्याच्यामध्ये बदल झाला होता.

या कादंबरीत आलेला एक महत्त्वाचा भाग म्हणजे'मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे म्हणून दलित लोक लढत होते. त्या अस्मिता पोटी कित्येक माणसांचा बळी जात होता. सगळा मराठवाडा जनू रणांगण बनला होता. या प्रश्नावर मधु व दौंड सर यांच्यात संभाषण होते. नामांतर प्रश्नावर तोडगा काढण्याकरिता दोन्हीकडे लोकांचे सामंजस्य घडवून आणणे हाच एक तोडगा आहे असे दौंड सरांची विचारधारा असते. माणुसकी व मानवता हाच परमेश्वर मानणारे व्यक्तिमत्व म्हणजे दौंड सर होय.

बाबुराव गायकवाड यांनी कासारसरांच्या सारखे एक विनोदी पात्र रंगविले आहे. जातीयतेच्या अन्यायापासून लांब जायचे असेल तर 'खेडे सोडून शहराकडे जावा' असा संदेश कासार सर देतात. सवर्ण व दलित यांच्यामध्येच फक्त भेदभाव असतात असे नाही तर दलित दलितातील जाती अंतर्गत भेदभाव असतात हा प्रश्न या कादंबरीत मांडला आहे. महारवाडाच्या मध्यभागी महारानी सरकारी पैशाने आड आणला होता. त्याला पाणीही मुबलक होतं. आड महार लोकांचा आहे म्हणून कोणीच पाणी पित नव्हते. हा प्रश्न हाताळून बाबुराव गायकवाड यांनी पाण्याच्या माध्यमातून दलित जाती अंतर्गत तेढ कसे आहेत हे दाखवून दिले आहे.

काकतकर हे बी.ए ला एक- दोनदा नापास झाल्यामुळे वैतागून ते कचेरीत कारकुन करीत असे. काकतकर आपल्या गावची अमुक सुधारणा करतो, तमुक सुधारणा करतो असे म्हणून आपल्या समाजातील गरीब माणसांना लुबाडत होता. त्याने अनेक उद्योग केले आहेत. कोणाच्या मुला मुलींची लग्न लावून देतो, नोकरी लावून देतो, म्हणून त्यांनी कित्येकांचे पैसे ढापले आहेत. वस्तीगृह चालविण्यासाठी घेतले असताना तेथे त्यांनी व्यवस्थापकाला खोटा हिशोब ठेवायला सांगून घरात पैसा ओढण्याचा एक प्रकारे सपाटाच चालू केला होता.

सरू दिसायला खूप सुंदर असून मधुच्या प्रेमात ती पडते. पण ती अबोलावस्थेतच राहिलेली लेखकाने दाखविली आहे. सवर्ण लोक सरूच्या परिस्थितीचा गैरफायदा घेतात. त्यामुळे तिचे संपूर्ण आयुष्य कसे बरबाद होते याचे विस्तृत वर्णन प्रस्तुत कादंबरीमध्ये आलेले आहे. सरूच्या आईच्या पात्राच्या माध्यमातून लेखकाने साधी-भोळी माणसं एखाद्या गोष्टीवर लगेच कसा विश्वास ठेवतात, सरू कुठेतरी नोकरी करेल व नंतर लग्न जमेल ही अपेक्षा ठेवून सरूची आई त्याच्या बरोबर पाठून देते . दलित समाजातील माणसे पोटापाण्यासाठी कोणत्याही स्तराला जाऊ शकतात. या प्रश्नावरती लेखकाने प्रकाश झोप टाकलेला आहे. माणसं कशी लाचार जगतात ते दाखवून दिले आहे.

धावडीला दोन वर्षापासून पावसाळा पडत होता. महार मागांची माणसं आंब्याच्या कोया भाजून किंवा उकडून खाऊन येणारा दिवस पुढे ढकलीत होती. चारा-पाण्यामुळे जनावरे पटापट मरत होती. भुकेपोटी महार मांगाची माणसे व लेकरे मृत मांस खांडावर तुटून पडत होती. तर मधु व बन्सी यांनी तर सवर्णाच्या मुलांना शिवून त्यांची भाकरी पाठवून स्वतःचे पोट भरतात असा हा भुकेचा प्रश्न लेखकाने येथे मांडला आहे.

बन्सी हा शिकलेला मुलगा असल्याने त्याला नोकरी लागते, पण तरीही बंन्सी जनावरे ओढण्याचे काम करतो याची चीड मधुला येते. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'गावकीची कामे करू नका' असे म्हटले असताना देखील ही शिकलेली माणसं अशी कामे करतात याचे दुःख मधुला होते व तो चिडतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव बन्सी याच्यावर पडलेला आहे. चंदा पाटील सारख्या व्यक्ती आपल्या संपत्तीचा जातीचा उपयोग एखाद्या व्यक्तीवर दबाव आणून कसे अन्याय करतात हे लेखकाने दाखवले आहे.

चंदू वारके, त्याचे आई-वडील यांच्या रूपाने आणखी एक बलुतेदारातील कुटुंब दाखवले असून या कुटुंबाच्या माध्यमातून बाबुराव गायकवाड यांनी दलितांच्या बद्दल इतर समाजात अस्था दाखविली आहे. मधुमध्ये उमापूर कॉलेजमधील व्याख्यानाचा परिणाम होऊन तो धावडीला येतो. तेथील अनेक प्रश्न त्याला सतावत असतात. कॉलेजमधून येत असताना समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार संबंध बदलण्याचा त्याचा मानस असतो. त्या दृष्टीने तो अनेक प्रयत्न करतो. त्यातच सित्याबापू माली पाटलाच्या धाकट्या पोराने मारले म्हणून मधुकडे येतो. याचा विचार करण्यासाठी आपल्या समाजातील बैठक घेऊन काय ते ठरव असे सीत्या बापू म्हणतो ही

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

संधी ओळखून मधूनेही बोलायला सुरुवात केली. व म्हणतो' सरकारने आपल्याला अनेक सोयी उपलब्ध करून दिला त्यामुळे त्यांचं पित्त खवळतंय,'सगळीकडे असंच सुरू आहे. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेबांचे नाव देण्यावरून किती दंगली झाल्या हे सांगत मधूने संघटनेचा विचार व्यक्त केला. या प्रश्नाला सर्वांनी होकार दिला.

धावडीतील दलित लोक पाण्याच्या टंचाईमुळे ग्रामपंचायतकडे अर्ज करतात. तो अर्ज सरपंचाकडे देतात. याचा राग संवर्ण व्यक्तींना येतो. तो सरपंचाच्या हातातील अर्ज पाटील घेऊन वाचण्यास सुरुवात करतात. त्या अर्जातील अर्थाचा बेअर्थ करतात. अशा या गावच्या पाटलाच्या रूपाने आपल्या अधिकाराचा गैरवापर करून कसा दलित वर्गावर अन्याय करतात हे लेखकाने दाखवले आहे. दलित व्यक्तींनी पाण्यासाठी अर्ज केला म्हणून धावडीत दलित लोकांना सवर्ण लोक शेतात कामावर येऊ देत नाहीत. तसेच दुकानातील बाजार घ्यायला देत नाहीत, आणि जर या नियमाचे कोणी उल्लंघन केले तर दंड ठेवतात. मधु उमापूरला कॉलेजमध्ये शिकत असताना मराठवाडा विद्यापीठ नामांतराची चळवळ सुरू होती. त्यावेळी कॉलेजमध्ये अनेक संघटना चळवळीला मदत करीत होत्या. त्या वेळी देखील आपली मातंगाची संघटना स्थापन करणं , चळवळीचे काम करत होते. त्याच्या कॉलेजचे प्राचार्य संघटना काढणाऱ्या मधुला म्हणतात," तुला डफडी वाजवता येते का? हे कल्पना चालवू नको".

ही कादंबरी ग्रामीण व दलित जीवनाचे चित्रण करते आहे. कादंबरी दलित तरुणांच्या मानसिकतेचे, ग्रामीण भागातील दलित जीवनाचे व प्रवृत्तींचे चित्रण या कादंबरीत लेखकाने सखोलपणे मांडले आहे. सामाजिक जीवनातील दलित दलितेत्तर समाजाचे वास्तव बाबुराव गायकवाड यांनी समर्थपणे मांडले आहे.

'झळ' कादंबरीतील स्त्री चित्रण

मुख्य व्यक्तिरेखा: रुना

रूना ही आग कादंबरीतील महत्त्वाची स्त्री भूमिका पार पाडणारे पात्र आहे. ही कादंबरी रुणा व शेशू यांच्या प्रेमाची कथा गुंफली आहे. बालपणातील शाळेपासून ते तिला स्वीकारणे पर्यंतचे सर्व वर्णन या कादंबरीतील कथानक गुंफण्यात लेखक यशस्वी झालेला आहे. रुणा व शेशूचे घर शाळे जवळच असल्यामुळे बालपणापासूनच खेळण्यासाठी एकमेकांच्या घरी येत जात असायची. शाळेत ही दोघे जाऊ लागले. महादेवाच्या जत्रेतील नाटक या दोघांना आवडल्याने रुणा व शेशु हे नाटक आपल्या समाजातील लोकांच्या समोर केले. हे पाहून लोक कौतुक करू लागले. पण इकडे वडिलांचे डोके तापून ते म्हणाले की, रांडीच्या खालच्या पायरीच्या पोरीबरोबर असं खेळतोस. शेशूला तर पायऱ्या कुठेच दिसत नव्हत्या. मग वरची पायरी व खालची पायरी असं काय रूनाविषयी म्हणत होते असा प्रश्न शेशूला पडतो. शेशु हरणाच्या घरी जेवण करून आला म्हणून वडिलांनी शेशूला मार दिला. हे ऐकून रूना दु:खी झालेली पहावयास मिळते.

रुणाला शिक्षणाविषयी अत्यंत आवड आहे. शेशूने शिक्षण घेण्यासाठी सांगितलेले असते. त्याकरितां आपल्या गावाहून दुसऱ्या गावाला शाळेला जात असते. शाळा शिकण्यासाठी लागणाऱ्या पैशाबाबत शिक्षण होऊ शकणार नाही म्हणून आठवड्यातून एक-दोन दिवस कोणाच्याही शेतात मजुरी करीत असे. बाकीचे दिवस ती शाळा करीत होती. असे दिवस काढून शिक्षण घेतलेली आहे. रुणा परिस्थितीने गरिबी असली तरी शिक्षण घेण्याविषयी तिचे कष्ट आणि आवड, शिक्षणाविषयी धडपड करताना दिसते. रुणाचे शेशुवर जीवापाड प्रेम असते आणि शेवट नेण्याची तिची तीव्र इच्छा असते.

रुणाची परिस्थिती गरिबीची असताना सुद्धा शिक्षण घेत असते. शाळेला जाण्यासाठी तिला पर गावी जावे लागत असे. एके दिवशी तिची मैत्रीण आली नव्हती ती रस्त्यावरून एकटी चाललेली असताना देविदास सारखा तरुण अरुणाच्या वाटेत स्वतःहून पुस्तक टाकतो. ते सापडलेले पुस्तक रूना त्याला परत करताना देविदास म्हणतो की, यातील पाच रुपयाची नोट कुठे आहे? असा तो तिच्यावर खोटा आरोप करतो. आपणावर विनाकारण आळ घेतो हे तिने ओळखले होते. तू लबाड बोलतेस. मला तुझं दप्तर पाहू दे म्हणून तो तिचा छळ करतो. तू कुठेतरी लपवली असशील असे म्हणत त्याने खोटा आरोप केला. तोच एक चापट त्याच्या गालावर बसली. अशा या देवीदासाला रूना प्रतिकार करते. पण शेवटी जे व्हायचे ते होते. रूणावर त्याने अन्याय केला. इकडे रूणा महार मांगाचे झालोत म्हणून गावाला वेडावू नये असे म्हणायला देखील कमी करीत नाही. तिच्या प्रामाणिकपणाचे वर्णन दिसते.रुणाला सापडलेले पुस्तक देविदासला परत करते, पण त्याचे फळ म्हणजे तिच्यावर एक प्रकारे अन्याय होतो.

रुणाच्या उदरात वाढलेला अंकुर तिने खोडून त्याला मूठमाती देण्यासाठी स्मशान भूमित जाते. त्यावेळी शेशु भेटतो आणि म्हणतो एवढ्या अंधारी तू इथे कशी काय आलीस? यावेळी रूना म्हणते, तुझी प्रकृती त्या खेळण्यात ठेवून जगाला व तुला काय कायमची

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

विसरणार होते. किती वाट पाहू म्हणून तिने विषयाची बाटली तोंडाला लावली. तोच एक चपराग तिच्या गालात मारली, रुणा आणि आई आहे म्हाताऱ्या आईला सांभाळण्यासाठी तुझं मला या जगामध्ये कोणी नाही. मी कशासाठी जगायचं मी जातो. म्हणून तोंडाजवळ बाटली नेली. तो चोरून आणि उडी मारून गळयाला ओळखा घातला. शशी माझ्यासाठी जग आहे. नंतर मीही या जगात पोरकीच आहे. आपल्या दोघांची जोडी पाहून आई खुश होईल. असे रूना शेशुला समजावून सांगताना दिसते. पुढील आयुष्याची वाटचाल करण्यासाठी आपण दोघांनी एकत्र आले पाहिजे म्हणून ते दोघेही विचार करून जगण्यासाठी तयार असतात.

शेशू एवढं शिकूनही नोकरी मिळत नाही. आपण कशावर जगायचं? त्यावेळी रूणाने दिलेले उत्तर म्हणजे जगण्याची दिशाच दाखवून देते. ती म्हणते आपले हात दणकट असताना विचार करण्याची काय गरज दोघांचे हात सरसर हलू लागले, म्हणून कशाला कमी पडायचे नाही. अशीही रूना बालपणातील शाळेपासून ते माझ्यासाठी जग म्हणून भावी आयुष्यात एकत्र जोडीत राहू या. अशी ती धाडसाने सांगणारी कृतीशील स्त्री बाबुराव गायकवाड यांनी दाखविली आहे. रूना ही अतिशय प्रेमळ, धाडसी, कष्टाळू, जिद्दी, एकनिष्ठ कोणत्याही संकटाला न डगमगता प्रत्येक संकटाला सामोरे जाणारी ,स्त्री शिक्षणाविषयी आवड असलेली अशीच एक स्त्री बाबुराव गायकवाड यांनी या कादंबरीमध्ये दाखविली आहे.

रंभा (शेशूची आई)

' झळ' या कादंबरीतील आणखी एक महत्त्वाचे पात्र म्हणजे रंभा ही होय. या कादंबरीतील शेशूची आई रंभा ही कादंबरीच्या सुरुवातीस हळूहळू येत असताना दिसते. मुलाला पावसात न खेळू देणारी, घर प्रपंचासाठी शेतात तन काढायला गेलेली, मुलाला वडील मारत असताना शांत रहा म्हणून सांगणारी, एक सुखाचा संसार करून घर सुरळीत चालवणारी स्त्री रंभा हे आपणास 'झळ' कादंबरीत दिसते.

रंभा ही घरकाम करण्यात गुंग असते. पण एक दिवस नियतीचा घाला येतो. रूणाचे वडील अण्णा याला गोळी लागल्यामुळे त्यातच त्यांचा मृत्यू झाला, म्हणून शेशुच्या वडिलांना अटक होते. येथून ह्यांच्या प्रपंचाला घर घर लागलेली दिसते. यशाच्या वडिलांना सोडवून आणतो असे खोटे सांगून धोंडूने रंभाची जवळी केली "मी तुझ्या नवऱ्याला पैसे देऊन सोडून आणतो परंतु तू कायमची माझ्या बाहू पाशात हसत राहिली पाहिजेस" असे त्याने वचन घेतले होते. या गोष्टीला बळी पडून रंभा जीवनात उध्वस्त होताना दिसते. हे घडत असताना अनेक लोकांच्या चर्चा होत असतात. त्यांच्याकडे लक्ष न देता रंभा हे धोंडू देवाच्या वाड्यात राहायला जाते. त्यामुळे त्याने आदर्शाची लक्तरे टांगलेली दिसतात.

स्वतःच्या आड येणाऱ्या मुलीला म्हणजेच सोमीला वारंवार त्रास देत होते. रानात माय लेकी गेल्या असताना विहिरीतील पाणी पिण्याकरिता गेल्या असताना, सोनीचा तोल गेल्याने विहिरीत पडते जिथे तिचा मृत्यू होतो या ठिकाणी लेखकाने कादंबरीत वाचकांना विचार करायला लावले आहे. कारण सोमीला तहान लागते पण त्याच वेळी आईने सोमीला शिवी हडसली कार्टी मरत तरी नाही तहानेने जणू हिचा जीव जातोय अग बघतीस काय, घे की पोरा अरे असे म्हणून रंभाने सुनेला ढकलले की तिचा तोल जाऊन मेली हे न सांगता रंभानी आरडा ओरडा करून माणसांना बोलावू लागली. तेवढ्यात सोमी पडून गतप्राण झाली. असे दाखविण्यात लेखक यशस्वी झाला आहे. परंतु या ठिकाणी गरिबीमुळे वाटयाला आलेले जीवन दुसऱ्याला देऊन स्वतःच्या मुलीला मारणारी क्रूर आई या ठिकाणी बाबुराव गायकवाड यांनी दाखविलेली आहे.

जीवाचं रान करून पोषित असलेला व अखेर घरासाठी कैदेत मृत्यूच्या क्षणासारखे एक एक क्षण कंठीत असलेला एकेकाळी वाघापेक्षाही उग्र हत्तीपेक्षा धिपाड व शिक्षण माणूस रागाने नरम करून त्याला जीवनातून उठविले होते. जन्माची जोडीदारीन कामवासिनींना आंधळी झालेल्या माणसासारख्या माणसाला लाथाडून दुसऱ्याच्या उकिरड्यावर पडणारी दुसऱ्याच्या जीवांनाच वाटोळ करणारे कलिंगकीनीच ती असे वाटल्याशिवाय राहत नाही. कारण स्वतःच्या नवऱ्याला बाजूला सारून दुसऱ्या व्यक्तीबरोबर राहणे म्हणजे किती समाज विघातक कृत्य तिच्या हातून घडले आहे. त्याच्यातील असणारा स्वाभिमान नाहीसा झाला.

काही ठिकाणी ती शेशूला चोरून पैसे देते. रंभा ही बदफैली वर्तन करीत असताना जरी दिसत असली तरी समाज विघातकृत्य करीत असली तरी देखील तिला हे सर्व घरच्या असलेल्या गरिबीमुळेच करणे भाग पडत असते. रंभाला पैशाचे आम्हीच दाखवून रानातील धान्याचे आम्हीच दाखवून तिला वश करताना धोंडो सारखी श्रीमंत व्यक्ती गरीब माणसांच्या वर अन्य करताना दिसते.

रंभा ही जरी धोंडू दिमाखे सारख्याच्या आहारी गेली असली तरीही ती अनेक वेळा काम करीत असताना दिसते. बऱ्याच वेळा ते घर काम करतानाही आढळते. भाऊ मिलिटरीतून येऊन परत जात असताना रस्त्यावरून जाणाऱ्या भाऊकडे आई शेजारणीसारखी पाहू

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

लागली. बोलावं असं वाटू नाही बोलू शकली नाही नाही कितीही झालं तरी आईची माया ती मायाच! घळघळा डोळ्यातून अश्रू ढाळू लागली . यावरून रंगाच्या हृदयात मुलाविषयी असणारे प्रेम दिसते. आई म्हणून असणारी वास्तव्याची जाणीव येथे लेखकाने दाखविली आहे.

मुलांना वाईट चोरीचे वळण लागू नये म्हणून अंजना आजी बोलत असताना रंभा तिच्या तोंडावर हात ठेवून म्हणते, शेशु घरात घरातच आहे. लेकरापुढे असं बोलू नये. मोठेपणी तेच शिकल म्हणून बोलणे आवरत घेणारी, मुलांना वाईट वळण लावू नये म्हणून काळजी करणारी, दूरदृष्टीची असणारी आई रंभा होय. आई म्हणून असणारे कर्तव्य पार पाडणारी निभावणारी रंभा दिसते.

वरील गुनाअवगुणावरून रंभा ही दरिद्री अवस्थेत संसार करणारी कष्टाळू स्त्री आहे. आहेत्यामध्ये समाधान मांणणारी संसारिक स्त्री. शरीराने बांधेसूद वाचल्यामुळे मुलावर प्रेम करणारी रंभा हे पात्र कादंबरीत आगळयावेगळया रूपाने आलेली दिसते. म्हणून रंभा ही कादंबरीत नानाविध असणाऱ्या गुनाअवगुणानी आपल्या डोळ्यात भरणारे महत्त्वपूर्ण असेच पात्र आहे.

बेला

बेला ही कॅप्टन बरेवाची मुलगी आहे. बेला व भाऊ सहवासातून एकत्र येतात. पुढे त्याचे रूपांतर प्रेमात होते. भाऊवर निसिम प्रेम करते. बरेवाची बेला कडून मोठ्या अपेक्षा असतात. एखाद्या डॉक्टरशी लग्न लावून बेलाचा सुखी संसार पहावा म्हणून त्याने बेलाला कॉलेजमध्ये घालतो. पण बेला आपल्या वडिलांच्या स्वप्नांचा भंग करते. बेला व भाऊ यांचे प्रेम वाढतच जाते. दोघेही आणाभाका घेतात. त्यावेळी आयुष्यभर तुला मी सुख दुःखात साथ देईन असे बेला म्हणते. बेला तिच्या हट्टामुळे भाऊच्या गावी जाते. बेलाच्या हट्टीपणामुळे भाऊ तिला गावी घेऊन जातात. रानात गेले असता आईच्या कुकृत्यामुळे भाऊ रंगाला गोळी घालतो. या कारणाने बेला रस्ता दिसेल तिकडे पळताना भाऊ तिला थांबवण्याचा प्रयत्न करतात. पण ते थांबत नाही. अशी असफल प्रेमाची कहाणी ही दुसरे कथन आपल्या कादंबरीत गुंफले आहे. अशी ही बेला निश्चिम प्रेम करणारी, वडिलांना कणखरपणे मत देणारी हट्टी आणि हळव्या मनाची दाखविली आहे.

जमुना

जमुना ही एक बाबुराव गायकवाड यांनी या कादंबरीतील आणखी एक स्त्री चित्रण दाखवले आहे. जमुना रूणाची आई ही कष्टाळू वृत्तीची आहे. संसारामध्ये आपल्या नवऱ्याला साथ देत असते. एक दिवस जमुनाच्या संसाराला घरघर लागते, म्हणजे या ठिकाणी जमुनाच्या नवऱ्याला गोळी लागून मरण पावतो. असा मोठा धक्का बसल्यानंतर तिचा घरचा आधारच नाहीसा झाला. पण ती त्या गोष्टीवर कवटाळून न राहता जगण्यासाठी काहीतरी करीत जगले पाहिजे म्हणून ती कष्ट उपसून एक एक दिवस काढत असते. कुळाचा दीपच विझला गेला त्यामुळे जन्माचे वैधव्य भोगावं लागलं.

जमुना ही जशी संसारिक स्त्री आहे, तशी स्वतःच्या मुलीची काळजी घेणारी ही आहे. रुणाच्या चिंतेत ती वावरताना दिसते. जमूनाही गंगेची मुलगी असल्याने रुणाला खालच्या पायरीची समजली जाते. कारण जालीम नावाच्या पाटलाच्या मुलाने जातीयतेची भीती दाखवून तुझी करणी गावात सांगून मायलेकीची धिंड गावातून काढीन. माझे ऐकशील तर मी तुला परी बनवेल. स्वतःच्या अब्रूची धिंड वाचवण्यासाठी गंगाणे देहाचे मात्रे करून घेतले. त्यातूनच जमुनासारख्या मुलीचा जन्म होऊन पुढचे दिवस जगण्यासाठी गंगा तमाशात काम करू लागते. त्यामुळेच रुणाला खालच्या पायरीची म्हणून हिणवले जात होते. जमुना शेशुला समजावण्यासाठी भाषा देखील वापरताना पहावयास मिळते. शेशु मृग नक्षत्र सुरू झाले आहे. मृगाच्या पहिल्या पावसाच्या धारा पडत आहेत. तुला लागलेली झळ आपण नक्कीच कमी होईल असेन ती म्हणते.

अंजना आजी

अंजना आजीचे या कादंबरीतील पात्र येते. ते हातात लाकडी टोपली घेऊन. आंबाबाईचा जोगवा मागत फिरणारी, आवडता विषय म्हणजे कुठल्याही गप्पा ऐकणे व त्या रंगवून सांगणे यामध्ये तिला जास्त रस असतो. अंजना आजी ही साठी ओलांडलेली एक स्त्री आहे. तिच्या अडाणीपणामुळेच तिला ही वेळ आली होती. अंजना आजी गावात कोणालाही असेच सांगून उदरनिर्वाह चालविते. जरी अंजना आजीचे वय झाले असले तरी ती जेव्हा मागायला फिरते यावरून तिचा कष्टाळूपणा दिसतो. तसेच शेशू गावाकडे येतो, तेव्हा अंजना आजी आवाजाच्या दिशेने पुढे येते व म्हणते, 'काल यायला नव्हतास यायला थोडा उशीर केलास' असे हृदयद्रावण शब्द ती काढते. यावरून तिच्यातील आपलेपणा, मायाळूपणा, जिव्हाळा किती आहे हे आपणास दिसतो. अंजना आजीचे वेगळेपण म्हणजे ती दैववादाच्या

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

आहारी गेलेली दिसते. त्यामुळे ती अंधश्रद्धाळू आहे. जे वास्तव नाही ते आहे म्हणून चुकीचे सांगताना दिसते. या सर्व गोष्टीला तिच्यात असणारा शिक्षणाचा अभाव कारणीभूत आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

सोमी

सोमी ही शेशूची लहान बहिण होय. तिला कादंबरीत लेखकाने आपले मत मांडण्याकरिता पुढे न येऊ देता तिचे मुकेपणेच पुढे आणले आहे. सोमी रंभाच्या आवाजावरून एकदम लिहून तिने सांगितलेले काम भांडी घासायचे करते. सोनीचा छोटा जीव रंभाला थरथर कापत असलेला दिसतो. अशीही लहान मुलगी असून हिच्यामुळे आपली नादाळी गेली म्हणून, होमीवर राग काढत होती. सोमी ही रंभाला अडचण करीत असल्याकारणाने तिला विहिरीत ढकलून मारले. असा हा निष्पाप जीव विहिरीत पडून मरतो. ही गोष्ट चटका लावून विचार करावयास लावते. सोमीला शेवटच्याच पाण्याची तहान लागली होती की काय असेच वाटायला लागते. रांडनं चाबरेपणा केला. तुझ्या जिभेला केंडा कसा लागला नाही ग अवदसा? अशा अनेक शब्दांचा मारा करून सोमीवर आई चिडत असते.

'आग' कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा

सतप्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा

बाबुराव गायकवाड यांच्या 'आग' कादंबरीतील सरू हे एक महत्त्वाचे पात्र माणले जाते. दिसायला खूप सुंदर मुलगी आहे. सरू सारख्या सुंदर मुली आपल्याही समाजात असतात. यावर मधुचा विश्वास बसत नाही. मधू धावडीला आल्यावर सरू म्हणते की,'तू शिकवतो तिथे मुलींचे पण बोर्डिंग असेल की?'मग मला घेऊन चल की? घेऊन जाईन असे तिला सांगतो. रात्रीच्या अंधाराला दिवा लावून घालवता येईल, पण या सनातन अंधाराला कुठला दिवा आणावा? अशी तत्त्वज्ञानाची भाषा सरू बोलताना आपणास दिसते. अशा या सरूवर पाटलांनी बलात्कार केला आणि तो तिच्याच समाजातील म्हातारीने तिला बळी दिला होता. ही सर्व हकीगत सरू पत्राने कळविली होती. यावर उपाय काय करायचा म्हणून मधु कासार सरांचे मार्गदर्शन घेऊन याचा बदला घेण्यासाठी धावडीला येतो. पण तिथे सरू नसते. त्यामुळे तो खूप दु:खी कष्टी होतो, दुखावला जातो.

सरू कुठे गेली म्हणून मधुसरूच्या आईला विचारतो,

"मावशी तू का रडतेस? सरू कुठं दिसत नाही."

"आज पंधरादि झालं, ती आपल्या मामाकडे गेलीय."

"कुणाकडे? त्या कातकराकड."

"मावशे, सरूला, काकतकराकडे पाठवून काही बरं केलं नाहीस बघ."म्हणून दुखी होऊन घराकडे जातो. काही दिवसांनी मधुला पत्त्यावरील अक्षरे मनोहरची पण असतील अक्षरे सरूची असलेली दिसतात. त्यामध्ये काकतकरा सारख्या व्यक्तीने नोकरीचे व लग्न लावून देतो याचे आमिश दाखवून तिला घेऊन जातो व एका स्त्रीच्या स्वाधीन करतो. ती बाई म्हणते, काकतकर माझा कोणी नाही, तू गुपचूप धंदा कर , अशा पद्धतीने सरूच्या आयुष्याची बरबादी झालेली पाहावयास मिळते. ही सर्व हकीगत सरू पत्राद्वारे मधुला सांगते.

सरू व मधु हे एकमेकावर नितांत प्रेम करीत असतात. पण त्यांनी ते व्यक्त केलेले नाही. लेखकाने त्यांचे प्रेमाचे सखोलपणे वर्णन केलेले दिसते. सरू व मधुच्या चित्रनात बटबटीत शपणा येण्याची शक्यता होती, परंतु या दोन्ही व्यक्तिरेखा संयमान रेखाटणामध्ये बाबुराव गायकवाड यशस्वी झाले आहेत. त्यामुळे सरू ही वाचकाच्या मनाला चटका लावून जाते. सरू ही फार प्रेमळ असते. लेखकाने सरू हे पात्र रंगून वाचकांच्या मनाला धक्का दिला आहे.

चंदूची आई

चंदूची आई हे एक बाबुराव गायकवाड यांच्या 'आग' कादंबरीतील एक महत्त्वाची स्त्री व्यक्तिरेखा आहे. चंदूची आई काळी सावळी पण मजबूत बांध्याची खंबीरपणे पुरुषासारखा संसार करणारी मधुला चंदूच्या आईला बघितली की, आपल्या आईची आठवण होते. मधुवर आपल्या मुलासारखेच माया करीत असते.

चंदूच्या घरी मधू यायला लागतो, त्यावेळी ती म्हणते की,'हात दोडा, काय म्हणावं तुला? माळवद वाटायला ती काय भाजी भाकरी हाय का काय खायची वस्तू र ? उद्यापासून रोज रोज येत चल. तुला कोणी काही म्हणायचं नाही. चंदू व मधू अभ्यास करीत असताना चंदूच्या मनात आल्याने म्हणतो की,'आज हे गणित सोडवू', माळवदाच्या एका कोपऱ्यात दाभळग्याखालची कात्री काढून हजामत करतो. अशावेळी आई येते, पण हे सर्व पाहू नये याकरिता मधुने डोक्याला धोतर गुंडाळले होते. पण ऐनवेळी डोक्याचे धोतर

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

सुटले. ते पाहून चंदूची आई म्हणाली,'हिरो काय? हा माळवदार आला, तवा यांच्या डोक्यावर लांब लांब केस होती की? आता कुठे गेली र? पण तुझ्याकडे भरग्या खाली काय झाकून ठेवल? 'चंदूच्या आईची किती बारकाईने नजर असते हे या व्यक्तिरेखेतून लेखकाने दाखविले आहे. पण हे झाले असताना देखील कोणाला न सांगता मनात ठेवते. यावरून चंद्राच्या आईचा माणसाकडे बघण्याची समानतेची दृष्टी येथे दिसते.

आपल्या मुलासारखीच'का र मधू, तो ढोकळा खातोस का?'असे मायेने विचारत असते. यावरून तिच्यामध्ये असणारा प्रेम, जिव्हाळा, आपुलकी हे गुण या व्यक्तिरेखेतून लेखकाने प्रकाश झोत टाकलेला आहे. चंदूची आई चंदनवाडीच्या भानूचा संदर्भ देऊन म्हणते की, घाटाचा बाजार असला की, तुमच्या माणसांच्या बी हजामती करतो. आता कुठे काय राहिले म्हणा? पर या खेड्यातल्या लोकांच्या टकोऱ्यातलं जात नाही. तोवर आपण आपली पायरी सांभाळायची दुसरं हाय काय? यातून तिच्यामध्ये असणारी एक वैचारिक पातळी आपणास दिसून येते. यामधून चंदूच्या आईचा जातीच्या बाहेर बघण्याची विधायक दृष्टी पाहावयास मिळते.

तसेच ती मधुला मारण्यासाठी पाटील कट असतो. पण चंदू वारकेच्या घरी समजल्यानंतर चंदूचे आईबाप व चंदू विचारक्रांत होऊन मधूला वाचविण्यासाठी चंदूची आई एका तत्त्वव्यत्यासारखी बोलून त्याला घरी दवडून ठेवते. यावरून चंदूची आई किती प्रेमळ, मायाळू आणि जातीयतेच्या पलीकडे पाहणारी एक स्त्री व्यक्तिरेखा लेखकाने दाखवून दिली आहे.

चंदा पाटलाची बायको

चंदा पाटील हे एक महत्त्वाचे पात्र असून तो रात्री कुठेतरी बाहेरगावी गेला असेल म्हणून ती नाराजीचा कटाक्ष टाकून रोजच्या कामाला लागते. चंदाला होणारी गोष्ट त्या गप्प बसवेना. त्यावेळी तो बायकोला बोलावितो, अगं, जरा हळद गोडेतेल घेऊन ये बरं 'त्यांचं काय करताव? पिवळं होऊन हौस फिटली नाही. दुसरं लगीन करण्याचा इरादा हाय का? दुसरी बाईल करावी, म्हणजे तरी तुमचं मन भरल. आणिक जीवबी जायचं नाही.'अशी आपल्या नवऱ्याला बोलण्यातून चपराक मारते. ती आपल्या पतीला रोखठोक बोलताना दिसते.

आपला नवरा कुठून तरी मार खाऊन आलाय हे ओळखून तिला आसूही आवरत नाही. नकळत तिच्या डोळ्यातून कडत आसवे त्याच्या पाठीवर पडू लागली. या स्त्री व्यक्तीरेखेतून आपल्या भारतातील स्त्रिया किती मोठ्या मनाच्या आहेत हे लेखकाने दाखवून दिले आहे हे दिसून येते. पण तिने आपला नवरा मरणाच्या दारातून वाचून आला, म्हणून तिच्या मनाला समाधान वाटून तिने मंगळसूत्र चाचपण देवाचे आभार मानले. यावरून ती नवऱ्याची काळजी करताना दिसते. बाबुराव गायकवाड यांनी या स्त्री व्यक्तीरेखेतून भारतीय स्त्रीचे स्वभाव गुणविशेष दाखवून दिले आहेत. भारतीय स्त्री आपल्या पतीला कशी सावरून घेते याचं एक उत्तम उदाहरण या व्यक्तिरेखेतून दिसते.

सरूची आई

सरूचा बाप साप चावून मृत्यू पावलेला असतो. तेव्हापासून ती एकटीच दिवस काढत असते. सरू करिता कष्ट करून प्रत्येक दिवस घालवत असते. मधु आला असे समजल्यानंतर ती रानातून येऊन त्याची मायेने विचारपूस करून जेवण देते आणि परत आपल्या कामावर निघून जाते. सरूची आई ही साधी, भोळी दिसायला सुंदर असल्याने काकत करावर विश्वास ठेवून आपल्या मुलीचे भले होऊन स्वतःच्या पायावर उभी राहू दे. अशी इच्छा व्यक्त करते. म्हणूनच तिने आपल्या सरूला पाठविलेले दिसते. यावरून असे दिसते की, आपल्या वाट्याला आलेले दुःखाचे दिवस आपल्या मुलीवर येऊ नये म्हणून दूरदृष्टीने विचार करणारी स्त्री दिसून येते. आपल्या मुलीवर जीवापाड प्रेम करून काळजी घेताना दिसते. आपल्या वाट्याला जे दुःखाचे दिवस आलेत ते आपल्या मुलीच्या वाट्याला येऊ नयेत यासाठी आपल्या मुलीची काळजी करताना दिसते. तिचे पुढील जीवन सुखात जावे एवढीच तिची इच्छा असते.

काही दिवसांनी काकतकर येतो. त्यावेळी ती सरूची मनापासून चौकशी करताना दिसते. यावरून सरूच्या आईचा जिव्हाळा, प्रेम, स्वभावाने साधी- भोळी असूनही मुलीच्या भावी जीवनाचा विचार करते.

निशा

निशा ही मधुच्या वर्गातील मुलगी असून कॉलेजच्या प्रत्येक कार्यक्रमात भाग घेणारी व स्वतःला कार्यकर्ते समजून सर्वत्र संचार करणारी मुलगी म्हणून ती नेहमी कुर्याने वागे. मधुला चढविण्याच्या उद्देशाने ती मुलांना म्हणते,"तो बघा, आधुनिक बुद्ध कसा ध्यान लावून बसलाय", काळी मैना खरोखरच भारी आहे. असे मधु सहजपणे तिच्याविषयी म्हणतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

डावरे ह्याने या निशाचा आधार घेऊन मधुला मारले आहे. त्यामुळे मधूला तिचा राग येत असतो. अशी ही निशा हरवणारी पहावयास मिळते. या कादंबरीमध्ये चंपा, चंद्री सारख्या स्त्रिया ही आलेल्या आहेत.

समारोप

प्रस्तुत शोधनिबंधात बाबुराव गायकवाड यांच्या आग आणि झळ या कादंबऱ्यांमधील प्रमुख स्त्री व्यक्तिरेखांचा अभ्यास केलेला आहे. बाबुराव गायकवाड यांच्या कादंबऱ्यातील स्त्रिया संसारासाठी झटणाऱ्या कष्टाळू नवऱ्याप्रती प्रेम असणाऱ्या आलेल्या आहेत. झळ कादंबरीतून रंभा विचार करणारे स्त्री असली तरी ती नवऱ्याच्या सुटकेसाठी धोंडूच्या अत्याचाराला बळी पडते. रुणाही शिशुची प्रेयसी आहे ती बालपणापासून तिला शिक्षणाची आवड आहे. एकूणच बाबुराव गायकवाड यांच्या दोन्ही कादंबऱ्यांमधून आलेल्या स्त्रिया ह्या संसारासाठी झटणाऱ्या धडपड करून नेटाने संसार पुढे नेणाऱ्या आणि संघर्षामध्ये जीवन जगणाऱ्या आहेत. मराठी साहित्यातील बाबुराव गायकवाड यांची ' आग' व ' झळ' या कादंबऱ्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

संदर्भ

१) 'झळ' बाबुराव गायकवाड, प्रकाशक सुरेश राऊत, मुंबई, प्रथमआवृत्ती, मार्च 1980
२) 'आग' बाबुराव गायकवाड, मंजुल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती जानेवारी 1996
३) साहित्य साधना, बाबुराव गायकवाड यांचे समग्र साहित्य: एक परिचय, अनुबंध प्रकाशन, अकोला, प्रथम आवृत्ती, 2004
४) दलित साहित्य: उद्गम आणि विकास, योगेंद्र मेश्राम, श्री गणेश प्रकाशन, नागपूर, प्रथमाआवृत्ती, 1998
५) दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह, भालचंद्र फडके, श्रीविद्या प्रकाशन, दुसरी आवृत्ती, 1998

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

Original Article

आधुनिक समाज में सामाजिक उत्तरदायित्व

डॉ. वैशाली प्रशांत सामंत
हिंदी विभाग, यशवंतराव चौहान (केएमसी) महाविद्यालय, कोल्हापुर
Email: psamant10677@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180254
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XXI)
Pp. 270-272
February- 2026
Submitted: 10 Jan. 2026
Revised: 20 Jan. 2026
Accepted: 08 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

सामाजिक उत्तरदायित्व एक नैतिक अवधारणा है जिसमें एक व्यक्ति समुदाय के लाभ के लिए अन्य लोगों और संगठनों के साथ काम करता है और सहयोग करता है ।समाज की जिम्मेदारी है कि वह सभी व्यक्तियों को समान अधिकार और अवसर प्रदान करें ।चाहे उनका लिंग जाति धर्म या सामाजिक स्थिति कुछ भी हो ।समझ में किसी भी व्यक्ति के साथ भेदभाव ना हो। निर्णय लेते समय केवल स्वयं के बारे में ही नहीं बल्कि दूसरों के बारे में भी सोचना चाहिए।

बीज़ शब्द: *सामाजिक उत्तरदायित्व, आधुनिक समाज, नैतिक मूल्य, सामाजिक सद्भाव, मानव कल्याण, जातिवाद, सामाजिक विषमता, सोशल मीडिया।*

प्रस्तावना

मनुष्य समाजशिल प्राणी है और वह समाज में रहता है। समाज में ही पलता- फूलता है। वह समाज में इसलिए रहता है कि उसे अकेलापन पसंद नहीं। समाज जीवन की पाठशाला है, मनुष्य पहले समाज से ही बहुत कुछ सीखता है। सामाज ही जीवन की पहली कड़ी है।

समाज मनुष्य के अच्छे और बुरे दोनों मूल्यों को दर्शाता है। बुरे मूल्य को दर्शाते हुए वह हमें समस्याओं को सुधारने के लिए प्रेरित करता है, अच्छे मूल्य को दर्शाते हुए हमें अनुकरण करने की प्रेरणा समाज ही देता है। अपने हित के बजाय दूसरों के लिए अधिक विचार करने के लिए शक्ति प्रदान करता है ।

- **सामाजिक उत्तरदायित्व:**

सामाजिक उत्तरदायित्व का अर्थ व्यक्तियों और व्यवसायों का ऐसा नैतिक दायित्व है जो पर्यावरण समाज और आर्थिक विकास के बीच संतुलन बनाकर निस्वार्थ भाव से समाज कल्याण में योगदान देता है। इसमें स्थिरता, नैतिकता, पारदर्शिता और सामुदायिक विकास शामिल है जो एक बेहतर जीवन स्तर के लिए अनिवार्य हैं।

समाज के हित के लिए एक व्यक्ति या समूह द्वारा कार्य करना इसमें बिना आश्वासन के कार्य किया जाता हैं, किसी भी व्यक्तिगत लाभ की इच्छा नहीं रखी जाती। सामाजिक उन्नति या सामाजिक न्याय के लिए की जानेवाली हर पहल् सामाजिक उत्तरदायित्व के अंतर्गत आती है ।

किसी व्यक्ति के लिए सामाजिक उत्तरदायित्व का सीधा अर्थ है निर्णय लेते समय केवल स्वयं के बारे में ही नहीं बल्कि दूसरों के बारे में भी सोचना चाहिए। भले ही इसके लिए आपको अपनी इच्छाओं और सुविधाओं का त्याग करना पड़े । समाज के कानून समाज में व्याप्त अच्छाइयां, बुराइयां, समाज में प्रचलित समस्याएं, समाज के उत्थान के लिए किए गए प्रयास सामाजिक उत्तरदायित्व है। समाज मनुष्य को दूसरों की परवाह करना, सहयोग करना, कुछ नैतिक मूल्य का पालन करना सीखाता है।

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. वैशाली प्रशांत सामंत, हिंदी विभाग, यशवंतराव चौहान (केएमसी) महाविद्यालय, कोल्हापुर

How to cite this article:
सामंत,. वैशाली. प्रशांत. (2026). आधुनिक समाज में सामाजिक उत्तरदायित्व. Journal of Research and Development, 18(2(XXI)), 270–272. https://doi.org/10.5281/zenodo.19757773

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19757773
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

- **आधुनिक समाज में मुख्य सामाजिक उत्तरदायित्व**

नैतिक उत्तरदायित्व:

इसमें सभी के साथ निष्पक्ष और ईमानदारी से व्यवहार करना समाज के हित के लिए कार्य करना आता है।

1. **सामाजिक सद्भावना और एकता पर बल देना:**

धार्मिक असहिष्णुता या संप्रदायवाद मनुष्य के धार्मिक संकीर्णता का परिचायक है। संप्रदायवाद के कारण समाज की अपरिमित हानी होती है जिसे शायद ही भरा जा सकता है। हिंदू- मुसलमानों के झगड़े सदियों से चले आए हैं जिसने मानवीयता के सामने खतरे पैदा किया हैं। यह विकृति वर्तमान समय में भी समय-समय पर उफनती है, इसका हमें विरोध करना है। सभी धर्मो का एक ही शाश्वत सत्य है और वह है मनुष्य का कल्याण। कोई धर्म या संप्रदाय बड़ा या छोटा नहीं, सभी धर्म अपने-अपने जगह योग्य है। सभी धर्म के प्रति सद्भाव रखना चाहिए, मानवता के कल्याण हेतु धार्मिक सद्भाव एवं उसकी एकता आवश्यक है।

2. **मानव कल्याण की भावना को बढ़ावा देना:**

समाज में रहते समय पूरे समाज कल्याण की भावना होना अनिवार्य है। श्रम को महत्व देना चाहिए,श्रम में ही ईश्वर बसे हैं। व्यक्ति की जिम्मेदारी है कि सभी को समान अधिकार और अवसर प्रदान करें चाहे उनका लिंग, जाति ,धर्म या सामाजिक स्थिति कुछ भी हो, समाज में किसी भी व्यक्ति के साथ भेदभाव ना हो और हर किसी का कल्याण हो।

3. **अहिंसा का समर्थन करना:**

स्वतंत्र ता पूर्व काल की तरह आज भी हमें समाज् में हर जगह हिंसा दिखाई देती है, मानव को खत्म करने वाली इस हिंसा का विरोध करना चाहिए। अहिंसा का समर्थन करना और प्रत्येक जीव पर दया करके समस्त मानव कल्याण की भावना जगाना है। अहिंसा से समस्त विश्व में बंधुत्व निर्माण किया जा सकता है, इस बात पर विश्वास करने के लिए लोगों को बाध्य करना है। मानवीय संवेदनाओं को तिलांजलि देकर किसी की हत्या करना, किसी को पीटना आदि के प्रति घृणा व्यक्त करना है ।

4. **समाज से भ्रष्टाचार को निकालना:**

आजकल के भोगवादी समाज को भ्रष्टाचार अपनी चंगुल में फंसा रहा है। आज लगभग हर क्षेत्र में भ्रष्टाचार दिखाई देता है। शिक्षा, पुलिस, प्रशासन व्यवस्था, सरकारी अस्पताल, सरकारी योजना सभी में भ्रष्टाचार दिखता है। इस भ्रष्टाचार को समाज से हमें निकालना है। आज की युवा पीढ़ी पर यह उत्तरदायित्व है की इस भ्रष्टाचार को समाज से पूर्णता निकाल दे।

5. **जातिवाद का निर्मूलन करना:**

हमारे देश में अनेक जाती धर्म के लोग मिल-जुल कर रहते हैं,लेकिन कहीं-कहीं पर आज भी हमें जातिवाद दिखाई देता है।उच्च जाति के लोग निचली जाति के लोगों पर अन्य अत्याचार करते हैं,
यह स्थिति बदलने की जिम्मेदारी युवा पीढ़ी की है।

6. **सामाजिक विषमता को मिटाना:**

सामाजिक विषमता का प्रमुख कारण जाति व्यवस्था है, जब तक समाज के विभिन्न समूहों को संसाधन और समान अवसर उपलब्ध नहीं होंगे तब तक विषमता का अंतर नहीं मिट् सकता । विषमता की जिस आग में संपन्न लोगों के पकवान बनते हैं वही आग् वंचित लोगों के पेट में मरने तक सुलगती है। विषमता की यह आग जब बढती है तो वंचितों को और वंचित बनाती है और संपन्न को और अधिक संपन्न।

7. **व्यसनाधीनता से समाज को बचाना:**

आज के समय में व्यसनाधीनता ने समाज को बुरी तरह जकड़ लिया है। यह समस्या गांव की गलियों से लेकर बड़े महानगरों तक फैली हुई नजर आती है। स्त्री पुरुष, स्कूल के बच्चे, युवा वर्ग आदि इसकी चपेट में आ रहे हैं। शराब, ड्रग्स, बियर, सिगार इन नशीले पदार्थ की वजह से कई परिवार मिटने की कगार पर है। इस युवा पीढ़ी को व्यसन धीनता से बचाने का उत्तरदायित्व समाज पर ही है।

8. **सोशल मीडिया की वजह से बनते - बिगड़ते रिश्तों को सुधारना:**

पुराने जमाने में छोटे बच्चे हो या बड़े लोग आपस में सुख दुख की बातें एक दूसरे से बाटते थे लेकिन आज सूचना और तकनीकी विकास में पूरी दुनिया को एक मुट्ठी में परिवर्तित किया है। आभासी दुनिया की जंजाल में फंसकर लोग अपने परिवार और समाज से दूर जाते प्रतीत होते हैं। सोशल मीडिया, व्हाट्सएप, फेसबुक, इंस्टाग्राम में दिन- रात व्यस्त है।परिवार और समाज में तेजी से रिश्तों में रूखापन बढ़ता जा रहा है। पति- पत्नी से मां- पिता अपने बच्चों से इनका आपस में आमने-सामने बैठकर बातचीत करना खत्म हुआ है। परिवार को एक सूत्र में बाधने की जिम्मेदारी समाज की है।

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2 (XXI)| February - 2026

9. **बाहरी दुनिया की चकाचौंध से आकृष्ट होते युवाओं को बचाना:**

हम सब जानते हैं कि भारत कृषि प्रधान देश है। यहां के युवक अपनी खेती में मेहनत करने की बजाय बाहरी दुनिया की चमक धमक में अपना मन आकर्षित करते हैं। विदेश जाकर ढेर सारा पैसा कमा कर लाने का सपना हर युवक देखता है, चाहे वह पढ़ा लिखा हो या अनपढ़। उच्च शिक्षित युवक अपनी शिक्षा के बल पर नौकरी पाते हैं मगर अनपढ़ या काम पढ़े लिखे लोग गलत रास्तों से विदेश जाने के लिए अपनी जान तक दांव पर लगा देते हैं। ऐसे समय पर लोगों को चमक- धमक की दुनिया से बाहर निकाल कर उन्हें सत्य स्थिति से परिचित कराना है ।

निष्कर्ष

सामाजिक उत्तरदायित्व एक नैतिक सिद्धांत है जिसमें व्यक्तियों को अपने नागरी कर्तव्यों को पूरा करने के लिए उत्तरदाई ठहराया जाता है। व्यक्ति के कार्यों से पूरे समाज को लाभ होना चाहिए, इस प्रकार आर्थिक विकास जन कल्याण और पर्यावरण के बीच संतुलन होना आवश्यक है।लाभ कमाने के साथ-साथ समुदाय और पर्यावरण का भी ध्यान रखना चाहिए ।

मनुष्य और समाज एक ही सिक्के के दो पहलू है, मनुष्य स्वतंत्र जन्म लेता है मगर वह समाज के नियमों में बांधा जाता है।समाज और मनुष्य का घनिष्ठ संबंध होता है,वर्तमान युग में हर एक मनुष्य दोहरे व्यक्तित्व वाला हो चुका है। समाज हमारी संस्कृति को सुरक्षित रखता है, उसे अगली पीढ़ी तक पहुंचाता है। सामाजिक जीवन का प्रत्येक पहलू सामाजिक चेतना से प्रभावित रहता है, मनुष्य के शारीरिक, चारित्रिक, मानसिक विकास के लिए सामाजिक मूल्य अनिवार्य माना गया है। मनुष्य समाज में रहने के कारण उसमें सहानुभूति, प्रेम, त्याग, भाईचारा की विशेषताएं दृष्टिगत होती है।

संदर्भ:

1. डॉ. राम आहूजा – भारतीय समाज
2. एम.एन. श्रीनिवास – Social Change in Modern India
3. महात्मा गांधी – सत्य के प्रयोग
4. डॉ. भीमराव अंबेडकर – जाति का विनाश
5. योगेन्द्र सिंह – Modernization of Indian Tradition
6. एनसीईआरटी – समाजशास्त्र (Sociology) पाठ्यपुस्तक
7. भारत सरकार – सामाजिक न्याय और अधिकारिता मंत्रालय की रिपोर्ट